
म. ग्रं. सं. ठाणें
विषय वैकुंठी
सं. नं. ४५८

या अभंगांची चर्चा



तुकारामचर्चा मंडळामध्यें चर्चा झालेले १८०० स्फुट अभंग या प्रमाणें सुमारें सहा खंडांत छापून प्रसिद्ध होतील. पुढील अभंगाची ही चर्चा करून तुकारामांच्या सर्व अभंगांची आवृत्ति काढण्याचा संपादकांचा मनोदय आहे. प्रत्येक भागाचीं क्राऊने षोडशपत्री आकाराचीं पृष्टें ४००, कापडी बांधणी, किंमत दोन रुपये. दरवर्षी दोन भाग प्रसिद्ध होतील.


ग्राहकांनीं रा. रा. **माधव रामचंद्र जोशी,**

[redacted]२ नारायण पेठ, पुणें शहर

यांजकडे नांवें नोंदवावींत.

REFBK-0003293

पटवर्धन–केळकर



श्री

तुकारामाच्या अभंगांची

चर्चा

खंड १ ला. अभंग १–३५०

हा ग्रंथ

तुकाराम–चर्चा–मंडळाच्या टिपणांवरून

कै. प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन बी. ए.

इंग्रजी व मराठी भाषांचे माजी अध्यापक, फरग्युसन कॉलेज, पुणें,

व

प्रो. गणेश हरी केळकर एम्. ए.

इंग्रजी भाषेचे अध्यापक, फरग्युसन कॉलेज, पुणें,

यांनीं तयार केला आहे.

329.3

REFBK-0003293

किंमत दोन रुपये.

मुद्रक:—**गणेश काशिनाथ गोखले**, सेक्रेटरी
श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, ४०५-९६ शनवार पेठ पुणें शहर..

सर्व हक्क प्रकाशकांनीं राखून ठेविले आहेत.

प्रकाशक:—**माधव रामचंद्र जोशी**, बी. ए.
नारायण पेठ घ. नं. २९९, पुणें.

प्रस्तावना.

येथील प्रार्थनासमाजाच्या विद्यमानें कै. डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या धुरीणत्वाखालीं तुकारामाच्या अभंगांची चर्चा कित्येक वर्षें चालली होती ही गोष्ट मराठी साहित्यसेवकांस बरेच दिवस माहीत आहे, इतकेंच नाहीं तर मागें कांहीं दिवस दैनिक ज्ञानप्रकाशांत व वरींच वर्षें मधून मधून सुबोधपत्रिकेंत या चर्चेचीं टिपणें प्रसिद्धहि होत असत. आज पुस्तकरूपानें या चर्चेचा पहिला खंड प्रसिद्ध करण्याचा सुयोग येत आहे. या निमित्तानें या तुकाराम–चर्चा–मंडळाच्या कामाची थोडीशी हकीगत येथें देणें गैरवाजवी होणार नाहीं. तुकाराम–मंडळाची स्थापना १९०१ च्या सुमारास झाली व तेव्हां-पासून १९१५–१६ पर्यंत मंडळ अस्तित्वांत होतें. उन्हाळ्याची सुटी, किंवा पुण्यांत प्लेगची सांथ असली म्हणजे कामांत तात्पुरता खंड पडत असे. मंडळाच्या सभा शुक्रवारीं होत व चर्चा अजमासें १॥–२ तास चालत असे. व तेवढ्या वेळांत कधीं दोन तीन, कधीं पांच सहा अभंगांची चर्चा होई. चर्चेला येणाऱ्या मंडळींत गु. डॉ. भांडारकरांखेरीज, रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे, रा. गणेश सखाराम खरे, शिवरामपंत गोखले, प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन, ही मंडळी नियमानें येत, व रा. सा. गोविंद-राव कानिटकर, वीरकर वगैरे मंडळी मधून मधून येत. चर्चेंत प्रमुखपणानें भाग डाक्टर साहेब, मराठे, पटवर्धन यांचाच असे हें पुढील ग्रंथावरून स्पष्टच होईल. या चर्चेचीं टिपणें कै. पटवर्धन हे घरीं येऊन लिहीत, डा० भांडारकरांना दाखवीत व जरूर तर पुन्हां एकदां लिहून काढीत. कित्येक वेळां नवीन सभेच्या आरंभीं जुनीं टिपणें वाचीत असतांना जुन्या चर्चेचा फेरविचारहि होत असे. कांहीं दिवस चर्चेचीं टिपणें रा. रा. रामचंद्र विष्णू माडगांवकर यांजकडे जात व त्यांनीं वाचून शंका विचारिल्या तर त्यांचाहि

विचार मधून मधून होत असे. सन १९०९–१० या दोन वर्षें मी एम्. ए. च्या परीक्षेकरितां मराठीचा अभ्यास करीत असतां बहुत करून या सभांना जात असे व त्या वेळेपासूनच तुकारामाच्या अभंगांची गोडी मला लागली हेंहि या ठिकाणीं मी कृतज्ञपणें नमूद करून ठेवितों.

सन १९१५ च्या सुमारास वार्धक्यामुळें गु. डा. भांडारकरांना सभांना येणें कठीण पडूं लागलें. व त्यानंतर मराठे, खरे वगैरे मंडळीहि त्याच कारणानें येतनाशी झाली आणि कांहीं दिवसांनीं चर्चेचें काम बंद पडलें; त्यावेळीं अजमासें १८०० अभंगांची चर्चा झाली होती. या चर्चेचीं कै. पटवर्धन यांनीं केलेलीं टिपणें सुदैवानें शाबूत आहेत. या टिपणांवरून तुकारामाच्या अभंगांची एक नवीन आवृत्ती तयार करण्याचा कै० पटवर्धन यांचा संकल्प होता. पण कालेजांतील काम, कौटुंबिक आपत्ती, वगैरे अडचणींमुळें ती गोष्ट मागें पडत गेली व कामाला आरंभहि होण्यापूर्वीच कै. पटवर्धन यांच्यावर मृत्यूचा आकस्मिक घाला पडल्यामुळें कदाचित् ती तशीच राहील असेंहि एकदां वाटत होतें. परंतु कै० पटवर्धन यांच्या कुटुंबांतील व ऋणानुबंधी मंडळींनीं प्रोत्साहन दिल्यामुळें मला हें काम हातांत घेण्याला धीर आला व तशी माझी इच्छा मी त्यांना कळविली; आणि त्यांनींहि आढेवेढे न घेतां मजकडे तें सोंपाविलें. यानंतर छापण्याच्या खर्चाची व्यवस्था करावयाची अडचण उभी राहिली, पण ती पटवर्धनांच्याच ऋणानुबंधांतले माझे मित्र रा. रा. माधव रामचंद्र जोशी यांनीं अंशतः अंगावर घेतली व डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनेंहि प्रकाशनाकरितां थोडीशी मदत करण्याचें कबूल केलें. ही जुळवाजुळव करितां करितां कै० पटवर्धनांच्या मृत्यूनंतर तीन एक वर्षें मोडलीं व १९२४ अखेर मी कामाला लागलों. या पुढील माझ्या अडचणींची हकीगत मी सांगत बसत नाहीं. हस्तलिखित प्रत गतवर्षीच छापावयास गेली होती. पण पुण्यांतील छापखान्यांत कामांची–विशेषतः शालोपयोगी पुस्तकांची–गर्दी असल्यामुळें छापण्याला अवकाश लागला आणि–थोड्याशा घाईनेंच कां होईना–पण आज पुस्तक प्रसिद्ध होत आहे यांतच मला समाधान आहे.

चर्चेच्या एकंदर पद्धतीवरून सुबोधपत्रिकेंत ज्या प्रकारचीं टिपणें प्रसिद्ध होत असत तीं घाटणीच मीं कायम ठेविली आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. पत्रिकेंत प्रसिद्ध झालेलीं टिपणें कै. पटवर्धन यांच्या देखरेखीखालीं रा. शिवरामपंत गोखले यांनीं केलेलीं होतीं व तीं टिपणें, विशेषतः तो पद्धति, रा. पटवर्धन यांनीं पसंत केलेली होती, म्हणून मीं तिचाच अवलंब केला आहे. सर्वच पाठभेद नमूद केलेले नाहींत. कित्येक ठिकाणीं माडगांवकर, मराठे, पटवर्धन, डॉ. भांडारकर यांचीं-एकदोघांचीं किंवा सर्वांचीं-एकवाक्यता झाली नाहीं त्या ठिकाणीं त्यांचे अर्थ निरनिराळे दिले आहेत; कित्येक ठिकाणीं माझे भिन्न अर्थ मीं सुचविले आहेत व कित्येक ठिकाणीं मूळचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां "संपादकीय" टिपणें दिलीं आहेत. हें सर्व करितांना टिपणांना घरून जितकें करितां येईल तितकें करण्याचा प्रयत्न मीं केला आहे.

आहेत त्या टिपणांवरून झालेल्या अभंगांची आवृत्ति तयार करावयाला चारएक वर्षें लागतील व आजच्या अजमासाप्रमाणें ती सहा भागांनीं प्रसिद्ध होईल. त्याशिवाय चर्चा व्हावयाचे असे अजमासें १६०० स्फुट अभंग व किरकोळ आख्यानें वगैरे मिळून १००० अभंग रहातात; त्यांविषयीं मी आजच निश्चयानें कांहीं लिहित नाहीं परंतु एवढें मात्र म्हणावयाला हरकत नाहीं कीं, लोकाश्रयाशिवाय संपादक व प्रकाशक या दोघांनाहि हें काम फार दिवस चालवितां येणार नाहीं. अशा प्रकारच्या पुस्तकांना मागणी फार मोठी येणार नाहीं हें उघड आहे. व त्यामुळें आवृत्तीहि वेतावीच काढावी लागते आणि त्या मानानें किंमत ठेवितां येत नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार केला तर क्राउन षोडशपत्री आकाराच्या ४०० पानांच्या कापडी पुस्तकाची दोन रुपये किंमत ही मर्यादितच आहे असें आम्हीं म्हणतों. आणि या किंमतीनें मर्यादित मुदतींत पुस्तकाची विक्री होत गेल्यास प्रकाशकांची पुस्तकाचे खंड वेळोवेळीं प्रकाशित करावयाची तयारी आहे, आणि सवड होईल तशी लिहिण्याची माझीहि तयारी आहे. तेव्हां या खंडावरून संबंध

आवृत्तीची जी अटकळ करितां येईल ती साहित्यभक्तांना पसंत असेल तर जरूर तेवढा लोकाश्रय पुस्तकविक्रीच्या रूपानें मिळण्याला अडचण पडूं नये असें मला वाटतें. आणि असा आश्रय मिळाला तर चार पांच वर्षांत हें काम पुरें करण्याची आमच्याकडून हयगय होणार नाहीं येवढेंच येथें वाचकांना सांगून ठेवितों.

मंडळाच्या चर्चेच्या वेळीं माडगांवकरांनीं छापिलेला गाथा व कै. शंकर पांडुरंग पंडित यांनीं छापिलेली इंदुप्रकाश प्रत यांचा उपयोग करीत. आख्यानें वगैरे अभंग वगळले तर या दोन प्रतींतील अभंगाचा क्रम सारखाच आहे. टिपणांचा क्रम माडगांवकर गाथेला धरून आहे म्हणून त्या क्रमानेंच अभंग या आवृत्तींत छापिले आहेत. व पहिल्या ओळींची वर्णाक्षरसूचि शेवटीं दिली आहेत.

श्री गणेश प्रिंटिंग वर्क्सचे चालक रा. रा. गणेश काशिनाथ गोखले यानीं हें काम सुबक व काळजीपूर्वक छापून दिलें याबद्दल मी त्यांचे आभार मानितों.

फर्ग्युसन कॉलेज,
ता. ३ आक्टोबर १९२७

गणेश हरी केळकर.

श्री

तुकारामाच्या अभंगांची

चर्चा

xxx

तुकारामाचे अभंग.

२

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी। वृत्ति राहो ॥ १ ॥
आणिक नलगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त नको देवा ॥ २ ॥
ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी ।
तेथें चित्त झणी जडों देसी ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म ।
जे जे कर्मधर्म नाशवंत ॥ ४ ॥

पाठभेद—चरण ३. 'झणी–' झणीं.

अर्थ—१ विटेवर चरण सारखे असून त्यांकडे दृष्टि लागली आहे अशी विठ्ठलाची मूर्ति उभी आहे. त्या ठिकाणीं, त्या मूर्तीच्या रूपाच्या ठिकाणीं, हे देवा, माझें मन स्थिरपणें लागून राहो. २ दुसरे कांहीं, मायेचे, दिसावयाला मात्र असणारे, परंतु खोटे, पदार्थ मला नकोत. या मायेच्या वस्तूंचे विषयीं मला इच्छा नसो. ३ ब्रह्मलोक, विष्णुलोक वगैरे पदें, स्थानें, जीं आहेत, तीं अखेरीस दुःख देणारीं आहेत. तेथें माझें चित्त जडूं देऊं नकोस. ४ तुकाराम म्हणतातः—यांतलें वर्म, मुख्य रहस्य, आह्मांला समजलें. कर्ममूलक जे जे धर्म आहेत ते नाशवंत होत, ते आह्मांला नकोत.

वाद—चरण ३.

(१) दुःखाची शिराणी म्हणजे दुःखाचीं आगरें.

(२) शिराणी शब्दाची व्युत्पत्तिः शिरवणी—शिरोणि; ज्याचे योगें शिर वर वसविल्यासारखें होतें तें, शेवट, कळस, अशी दिसते. पुण्यसंचय संपल्यावर ब्रह्मलोकाहून पतन होतें म्हणून ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी, अखेरीस दुःख देणारीं असें म्हणणें मंडळींत ठरलें.

चरण ४.

जे जे 'कर्मधर्म' ते ते नाशवंत—येथें 'कर्मधर्म' याचा अर्थ काय ?

(१) जीं कर्में व धर्म आहेत ते सर्व नाशवंत आहेत.

(२) कर्ममूलक जे जे धर्म आहेत ते ते नाशवंत आहेत, शाश्वत आधार देणारे नाहींत. मं० ठ०

लक्ष्यप्रयोग—तेथें चित्त झणीं जडों देसी = तेथें चित्त जडूं देऊं नको. वर्तमान किंवा भविष्य काळाच्या रूपार्शी 'झणीं' शब्दाचा प्रयोग केला म्हणजे अर्थ नकारवाचक होतो याचें हें उदाहरण आहे. असे प्रयोग जुन्या कवींच्या ग्रंथांत फार आहेत.

शब्द—साजिरी–शोभिवंत. **वृत्ति**–अन्तःकरणाची प्रवृत्ति, चित्ताचें लय. **राहो**–स्थिर असो. **आणिक**–दुसरा. **मायिक**–मायेचा, अशाश्वत, असत्य असून सत्य दिसणारा. **पदार्थ**–वस्तु, विषय. **आर्त**–(नपुंसक) उत्कंठा, इच्छा, आसलेली वृत्ति, भूक. **ब्रह्मादिक**–ब्रह्मलोक वगैरे; अमुक अनुष्ठानें, अमुक याग, अमुक कर्में केलीं ह्मणजे अमुक 'लोकांची' प्राप्ति होते या समजावर कटाक्ष आहे. **पदें**–स्थानें, लोक. **शिराणी**– <शिरौणी–शिरवणी=ज्याचें योगें वर शिर बसविल्यासारखें होतें, शेवट, कळस, परिणाम, फल. **झणी**–नको. **वर्म**–मुख्य तत्त्व;रहस्य. **कर्मधर्म**–कर्ममूलक धर्म. **नाशवंत**–अशाश्वत.

शेरा—देवापाशीं एकाग्रतेचें मागणें. विठोवाची भक्ती, दुसरें कांहीं नको. तरुणपणाचा, मूर्तिपूजेचा पगडा मनावर पूर्ण होता, मूर्तीचेच ठिकाणीं श्रद्धा होती, त्या वेळचा. वा. ब. प.

२

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥
तुळसीहार गळां कासे पीतांवर ।
आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं ।
कंठीं कौस्तुभमणी विराजित ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

पाठभेद—चरण १. 'उभें'–'उभा.' च. २. 'तुळसी'–'तुळशी'.

अर्थ—१ विठ्ठलाचें तें सुंदर स्वरूप विटेवर उभें आहे. कमरेवर हात ठेविलेले आहेत. २ गळ्यांत तुळशीचा हार आहे. कासेला पितांबर कसलेला आहे. असें हें विठ्ठलाचें स्वरूप, हेंच मला निरंतर आवडतें. ३ कानांत मकरकुंडलें झळकत आहेत. कंठाचे ठिकाणीं कौस्तुभमणी शोभत आहे. ४ तुकाराम म्हणतात—हें विठ्ठलाचें मुख हेंच माझें सर्व सुख. तेंच मोठ्या भक्तीनें मी पाहीन. त्याचे दर्शनांतच मला सगळें सुख आहे.

वाद—नाहीं.

लक्ष्यप्रयोग:—'कटावरी,' 'विराजित' विराजतो किंवा शोभेनें ठेवलेला आहे, धारण केलेला आहे या अर्थीं.

शब्द-ध्यान-उभें राहण्याची ऐट, किंवा ढब, स्वरूप. **कर**-हात. **कटावरी**-कमरेवर, कटीवर. **गळां**-गळ्यांत. **कासे**-कासेला, कमरेला. **पीतांबर**-रेशमाचें वस्त्र, पिंवळें रेशमी वस्त्र. **मकरकुंडलें**-मकराच्या, माशाच्या आकाराचीं कुंडलें. **तळपती**-झळकतात. **श्रवणीं**-कानांत. **विराजित**-शोभतो. **श्रीमुख**-शोभिवंत मुख. **आवडीनें**-प्रीतीनें, भक्तीनें.

शेरा—विठोबाच्या मूर्तीचें ध्यान. सगुणभक्तीचा पगडा मनावर पूर्ण होता, त्यावेळचा-तरुणपणाचा. वा. ब. प.

२

सदा माझे डोळे जडो तुझी मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ।
गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्वकाळ ॥ २ ॥
विठो माउलीये हाचि वर देईं ।
संचरोनि राहों हृदयामाजी ॥ ३ ॥
तुका म्हणे कांहीं न मागें आणीक ।
तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

पाठभेद—च० १. डोळे–डोळां मूर्ती–मूर्तीं चरण २ 'देईं'–'देई'

अर्थ—१. हे सख्या, रुक्मिणीपते, विठ्ठला, माझे डोळे नेहमीं तुझ्या मूर्तीवर असोत, तुझ्या स्वरूपीं लागलेले असोत. २. तुझें रूप गोड आहे, तुझें नांव गोड आहे. त्यांतच मला नेहमीं गोडी वाटो, त्यांची आवड नेहमीं मला दे; ३. हे आई, विठाई, मला हाच वर दे. माझ्या अंतरांत तूं संचार कर, तेथेंच रहा. ४. तुकाराम म्हणतात—आणखी दुसरें कांहीं मागत नाहीं. तुझ्या पायांपाशीं मला हवें तें सारें सुख आहे. तुझी भक्ती मला घडूं दे म्हणजे झालें.

वाद—नाहीं.

लक्ष्यप्रयोग: —'मूर्ती' इ[illegible]ती स्त्री. नामाची सप्तमी ईं प्रत्यय लागून झाल्याचें हें उदाहरण आहे. '**डोळे जडो**' कर्ता बहुवचनीं असून क्रियापदाचें रूप एकवचनी आहे. प्रयोग दुष्ट खरा, तरी 'डोळे' याचा अर्थ 'दृष्टि' मनांत असल्यानें हा प्रयोग झाला असावा. 'डोळां' असा पाठ घेतला तर "मूर्ती' असा पाठ घ्यावा.

शब्द. जडो. लागून राहोत. **सोयरिका**-सख्या. **माउलिये**-आई. **वर**-इच्छिलेलें मागणें. **संचरोनी**-शिरून आणि सर्वत्र वावरून. **आणीक**-दुसरे.

शेरा—देवा, तुझी भक्ति दे, असें काकुळतीचें मागणें. सगुण भक्तीचा पगडा मनावर होता त्या वेळचा- तरुणपणाचा. वा. व. प.

४

राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥ १ ॥
कस्तुरी मळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥
मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें ।
सुखाचें ओतलें सकळ ही ॥ ३ ॥
कासे सोनसळा पांघरे पाटोळा ।
घनसांवळा बाइयानों ॥ ४ ॥
सकळही तुम्ही व्हा गे एकीसवा ।
तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥ ५ ॥

पाठभेद—चरण २ 'कस्तुरी मळवट'-'कस्तुरीमळवट.'

अर्थ—१.हा राजतेजानें शोभणारा, कोमल, बालाप्रमाणें नाजुक, मदनाची मूर्तीच जशी, असा सुंदर आहे. याच्या तेजापुढें रवीचें व चंद्राचें तेज लोपतें, दिसेनासें होतें. २ ललाटभागीं किंवा कपाळीं कस्तुरीचा मळवट भरला आहे, अंगाला चंदनाची उटी लाविली आहे, गळ्यांत वैजयंतीची माळ रुळत आहे, शोभिवंतपणें खेळत आहे. ३ मुकुटाचे आणि कुंडलांचे योगानें, मूळचेंच सुंदर मुख जास्तीच शोभिवंत झालें आहे.जसें कांहीं सगळें सुखाचें,सुभग तेवढें येथें ओतलें आहे, इतकें हें मुख मधुर आहे. ४ बायांनों, या मेघाप्रमाणें नीलवर्ण, श्याम-सुंदर सांवळ्याकडे पहा ! कमरेला सोनसळा नेसला आहे आणि वर पाटोळा, पाटाव, रेशमी वस्त्र पांघरला आहे. ५ बायांनों, तुम्हीं सर्व जणी एक जागीं व्हा, एके बाजूस व्हा, आतां धीर निघत नाहीं.

वाद—चरण २.

कस्तुरी आणि मळवट असा अर्थ काय ?

(१) कस्तुरीचा मळवट; ललाटाला किंवा कपाळाला कस्तुरी खूप माखली आहे असा भाव.

चरण ३.

पाटोळा शब्दाचा उत्पत्ति व अर्थ काय ?

(१) 'पट्टावलि' या संस्कृत शब्दापासून आलेला 'पोटाळा' शब्द मोलवान् वस्त्राला, पांघरावयाच्या वस्त्राला, लावितात.

चरण ४.

'एकीसवा' शब्दाचा अर्थ काय ?

(१) एकीसवा ह्मणजे एकसारख्या, एक जागीं. मं० ठ०

(२) अभंगाच्या अर्थाचा संदर्भ पहातां एकीसवा म्हणजे 'एके बाजूस' असा अर्थ करावासा वाटतो, व त्या शब्दाचा प्रयोग तसाच इतरत्र असावासें वाटतें. वा. ब. प.

लक्ष्यप्रयोग—'मुगुट कुंडलें' हें वेगळे शब्द असून प्रयोग समासा-सारखा आहे. 'एकीसवा व्हा.'

शब्द- राजस-राजतेजानें शोभणारा. **सुकुमार**-लहान मुलाप्रमाणें कोमल व नाजूक. **रविशशिकळा**-सूर्यचंद्राचें तेज. **लोपलिया**-दिसतनाशा झाल्या. **कस्तुरी मळवट**-ललाटावर किंवा कपाळावर लावलेला भला मोठा कस्तुरीचा लपेट

रुळे–शोभेनें लोळते, शोभते. **वैजयंती**–ही पंचरत्नांची माळ श्री विष्णूचे गळ्यांत असते अशी प्रसिद्धि आहे, हींत हिरा, माणिक, पाच, नीळ, व मोतां हीं पंच रत्नें आहेत तीं महाभूतांचीं द्योतक समजतात. **मुगुट**–मुकुट, शिरोभूषण **ओतलें**–रस करून सांच्यांत ओतून तयार केलें. **कासे**–कमरेस. **सोनसळा**–जरीकांठी पीतांवर, सोन्याचीं अर्थात सोन्याच्या रंगाची किनार ज्याला आहे असें उंची वस्त्र. **पाटोळा**—पट्टा वलि. पांघरण्याचें वस्त्र. कुणवी लोकांत हा शब्द अजून रूढ आहे. नेसावयाचें किंवा पांघरावयाचें रेशमी किंवा उंची वस्त्र. **घननळि**–मेघश्याम. **सांवळा**–श्यामल **एकसिवा**–एकसारख्या, एकत्र(२) एकीकडे बाजूस, दूर.

शेरा—गोपींचा--गवळणींचा--अभंग आहे. यांतील वर्णन कृष्णाला लागू पडतें. कृष्णाच्या भेटीसाठीं उत्सुक झालेल्या एका गोपीचे हे अधीरतेचे उद्गार आहेत. कृष्ण–गोपींच्या लीला भक्तीनें गाण्यांत आनंद वाटत होता अशा वेळचा, तरुणपणाचा, लौकिकसमजुतींचा पगडा दाखविणारा. वा. ब. प.

५

कर कटावरी तुळशीच्या माळा ।

ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥ १ ॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी ।
ऐसें रूप हरी दावी डोळां ॥ २ ॥
कटीं पीतांबर कास मिरवली ।
दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ॥ ३ ॥
गरुडपारावरी उभा राहिलासी ।
आठवे मानसीं तोंचि रूप ॥ ४ ॥
झुरोनी पांजरा होऊं पाहें आतां ।
येई पंढरीनाथा भेटावया ॥ ५ ॥
तुका म्हणे माझी पुरवावी आस ।
विनंती उदास करूं नये ॥ ६ ॥

पाठभेद—च० १ ' दावीं '–' दावी. '

अर्थ—१. कमरेवर हात ठेविले आहेत, गळ्यांत तुळशीच्या माळा आहेत असें रूप, हे देवा, मला दाखीव. २ दोन्ही चरण विटेवर ठेविले आहेत असें

रूप देवा, माझ्या दृष्टीस पडूं दे. ३. कमरेस पितांवर शोभतो आहे आणि पितांबराची ऐटींत कास घातली आहे -काचा मारिला आहे, अशी स्वतंत्र मूर्ती मला दाखीव. ४. तूं ज्या गरुडपारावर उभा राहिला होतास तेंच रूप, तीच मूर्ती मला दाखीव. तेंच रूप मला मनांत आठवतें. ५. पंढरीनाथा, तुझे दर्शनासाठीं मी झुरत आहें, झुरून झुरता हाडांचा सांपळा होण्याच्या मार्गास आहे. आतां देवा, ये लवकर भेट द्यावयाला. ६ तुकाराम म्हणतात— एवढी माझी आस, मनींची आशा पुरवावी. मजविषयीं तटस्थवृत्ति, उदासीन पणा धरूं नये, अशी विनंती आहे.

वाद—चरण. ६

(१) माझी आस पुरवावी. मला उदास करूं नये, हीच आतां विनंति.

(२) विनंति कीं माझी आस पुरवावी, विनंतीचा अव्हेर करून मला उदास करूं नये.

(३) विनंतीचा अव्हेर करूं नये.

(४) विनति कीं आस पुरवावी. उदास—

'अंः ! आपल्याला काय करायचें' मारूं दे हाका, तिकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं' असली बेपर्वावृत्ति धरूं नये. 'उदास' शब्दाचा प्रयोग 'औदासीन्य·दुर्लक्ष' या अर्थीं तुकारामाच्या अभंगांत नेहमीं आढळतो. देवा, आपल्याला दया येवो ही विनंति असा भाव. वा. ब. प.

लक्ष्यप्रयोग—'कटीं' - 'कटिं' या इकारान्त शब्दाची 'ईं' प्रत्ययान्त सप्तमी, अभंग ३ 'मूर्ती' पहा. 'कास मिरदिली' ऐटीनें काचा मारिला या अर्थीं; 'वहिर्ली'; 'पांजरा होऊं पाहें'; 'उदास करूं नये.'

प्रश्न—गरुडपार कोठें, कसा आहे आणि त्याचा पूर्वसंदर्भ व पूर्वसंबंध काय ? 'गरुडपार' किंवा 'गरुडखांब' म्हणून, पंढरपुरच्या देवळाचे गाभाऱ्या समोर एक भाग आहे. पण 'गरुडपारावरी उभा राहिलासी' याचा संदर्भ काय ? वा. ब. प.

शब्द.-कास-काचा. **मिरविली**-ऐटीनें घातली. **वहिली**-स्वतंत्र, 'वायली.' वल्लभ-वलाहो-वहालो-वहिलो-वहिला. **पांजरा**-सांपळा, आस्थिपंजर. **उदास**-उदासीनपणा, दुर्लक्ष.

शेरा—विठोबाच्या दर्शनाची उत्कट इच्छा--उत्कंठा. अभंग विठ्ठलदर्शनोत्कंठेचा आहे. विठोबाच्या मूर्तीचें स्वरूप शुद्ध, विरल, होऊन तें निर्गुणनिराकार परमेश्वरस्वरूपीं लीन अजून झालें नाहीं. अभंग अर्थात् वारकरी पेशाच्या पहिल्या पहिल्या दिवसांतला आहे. तरुणपणींचा. अभंग १, २ व ५ हे एकाच अर्थाचे, एकाच वर्णनाचे बहुतेक एकाच शब्दांचे आहेत. त्याच त्या शब्दांची जुळणी मात्र बदलून नवीं पदें बनविणें हे प्रसंगभेदीं संभवनीय आहे. एरवीं काव्यदृष्टीनें फारसें श्लाघ्य नव्हे. तेव्हां ते निरनिराळ्या प्रसंगांचे असले पाहिजेत. तसें असल्यास सगळे आरंभींच कसे ? पंढरपुरच्या जुन्या पोथींचा, व जोगांच्या पोथींचा क्रम हाच आहे. अभंगाचा कालानुक्रम ठरविण्यास सबळ आधार असता म्हणजे वरील प्रश्नाचा उलगडा झाला असता. वा. व. प.

६

गरुडाचें वारिकें कासे पितांबर ।
सांवळें मनोहर कैं देखेन ॥ १ ॥
बरवया वरवंटा घनमेघ सांवळा ।
वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ २ ॥
मुगुट माथां कोटी सूर्यांचा झळाळ ।
कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥ ३ ॥
ओतींव श्रीमुख सुखाचें सकळ ।
वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥ ४ ॥
उद्धव अक्रूर उभे दोहींकडे ।
वर्णिती पवाडे सनकादिक ॥ ५ ॥
तुका म्हणे नव्हे आणिकांसारिखा ।
तोचि माझा सखा पांडुरंग ॥ ६ ॥

पाठभेद:—चरण २ ' बरवया '–' बरविया '

अर्थ—१. गरुड वाहन आहे, कासेला पितांबर आहे,असें तें श्यामसुंदर, मन हरण करणारें रूप मला केव्हां दिसेल ? २. बरवा आणि सुंदर, दाट ढगाप्रमाणें-कृष्णमेघाप्रमाणें सांवळा, गळ्यांत वैजयंती माळ शोभत आहे असा माझा तो विठोबा केव्हां पाहीन ? ३. डोक्याला मुकुट आहे, तो कोटि सूर्या-

च्या प्रकाशाच्या लखलखाटासारखा आहे. कंठामध्यें स्वच्छ कौस्तुभमणी शोभत आहे. ४. सगळ्या सुखाचें ओतून तयार करावें तसें तें शोभिवंत मुख आहे. डाव्या बाजूस लाडकी रुक्मिणी आहे. ५. दोहों बाजूस, इकडे उद्धव व तिकडे अक्रूर उभे आहेत. सनक वगैरे स्तुतिस्तोत्र गात आहेत. ६. असा जो अनन्यसाधारण अद्वितीय पांडुरंग तोच माझा सखा, तो केव्हां पाहीन ?

वादः—चरण २.

' वरवया बरवंटा ' या शब्दांचा अर्थ व व्याकरण काय ?

१ ' वरवया बरवंटा ' म्हणजे ' उत्तमांतला उत्तम. ' बरवया हें सामान्यरूप.

२ वरवया हें विशेषण. वरवंटा हेंही विशेषण. दोन्ही ' तो ' चीं विशेषणें. बरवया म्हणजे वरवा. बरवंटा म्हणजे सुरेख बरवया ∠ वरवय्या; वय्या हा प्रत्यय आहे. संस्कृत ' इक ' प्रत्ययाचा अपभ्रंश. वरवंटा म्हणजे चांगला, चोखट, सुंदर. जें येणें मानें बरवंट आणि तैसेंचि अति चोखट । इ. ज्ञानेश्वरी अध्याय ६ ओवी १७१ पहा. मं. ठरलें.

चरण ३.

(१) मस्तकावर कोटि सूर्यांच्या तेजाप्रमाणें चमकणारा असा मुकुट घातला आहे.

(२) मस्तकावर मुकुट आहे आणि एकंदर तेज कोट सूर्यांच्या प्रकाशाच्या लखलखाटाप्रमाणें आहे.

लक्ष्यप्रयोगः—'वरवया'; 'बरवंटा' 'झळाळ' पुल्लिंगी; 'घनमेघ सांवळा' समासासारखा प्रयोग.

शब्दः—**वारिकें**-वाहन, घोडें. **वरवया**-वरवा, वरवय्या. **बरवंटा**-चांगला, चोखट, सुरेख. जसें ' अति वरवंटा बाळा । आली सुलक्षणा गोंवळा ' ॥ **घनमेघ**-दाट मेघासारखा. **झळाळ**-(बहुधा स्त्रीलिंगी; पण येथें पुल्लिंगी) लखलखाट. **ओतींव**-ओतलेलें, ओतल्यासारखें. **वामांगीं**-डाव्या बाजूस. **वेल्हाळ**-प्रिय, लाडकी. **उद्धव**-उद्धवाची मूर्ति उद्धव व अक्रूर **अक्रर**-अक्रूराची मूर्ति हे पौराणिक आहेत. कृष्णचरित्र ठाऊक आहे त्यांना यांचा परिचय असलाच पाहिजे.**पवाडे**-स्तुतीचीं गीतें. **सनकादिक**-सनक वगैरे. **आणिकांसारखा**-इतर देवांप्रमाणें. **पांडुरंग**-विठोबा. पंढरीचा

विठोबा मूळ 'पांडुरंग' शुभ्र अंगाचा गोरा होता असें हा शब्द सांगतो तो सांवळा कधीं झाला ? वा. व. प.

शेरा:—विठ्ठलाचें वर्णन; दर्शनाची इच्छा. सगळें वर्णन सगुण मूर्तीचें, विठोबाला कृष्णाचा अवतार समजून विठोबाच्या मूर्तीवरच प्रेम करणाऱ्या कवीनें रचिलेलें, स्वतंत्र प्रतिभेच्या उदयापूर्वीचें, लौकिक ग्रहांनीं आंखलेलें आहे. अभंग तरुणपणींचा—मूर्तीचीच भक्ति करणाऱ्या स्थितींतला दिसतो. वा., ब. प.

७

नये जरी तुज मधुर उत्तर ।
दिधला सुस्वर नाहीं देवें ॥ १ ॥
नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल ।
येईल तैसा बोल रामकृष्ण ॥ २ ॥
देवापाशीं मागें आवडीची भक्ति ।
विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मना सांगतों विचार ।
धरावा निर्धार दिसेंदिस ॥ ४ ॥

पाठभेद:—चरण. ३ 'मागें'—मागे.

अर्थ:—१ हे मना, जरी तुला गोड भाषण येत नाहीं, जरी देवानें तुला गोड आवाज दिला नाहीं, (तरी कांहीं हरकत नाहीं.) तरी त्यावांचून विठ्ठल उपाशीं आहे असें नाहीं. विठ्ठल त्यासाठीं अडून बसत नाहीं. तुला जसें येईल तसें नामस्मरण कर. 'रामकृष्ण' 'रामकृष्ण' हें तुला जसें म्हणतां येईल तसें ह्मण, २ देवापाशीं आवडीनें भक्ति माग. भावबळानें विश्वासावरोबर प्रीति माग. विश्वासही माग.प्रीतीही माग किंवा भावाच्या जोरानें,प्रीतीनें,विश्वासानें भक्ति माग. ४ हे मना, तुला विचार सांगतों. दिवसानुदिवस, उत्तरोत्तर, अधिकाधिक निर्धार धरावा.

वास:—चरण ३.

(१) विश्वासानें, प्रीतीनें, भाववळानें, आवडीची भक्ति माग.

(२) विश्वासासह प्रीति माग. भाववळानें विश्वास माग व प्रीति माग.

(३) विश्वासयुक्त प्रीतीच्या आणि भावाच्या जोरावर तुला आवडते ती भक्ति देवापाशीं माग.

(४) विश्वासानें, प्रीतीनें आणि भावाच्या जोरावर देवाला आवडते ती भक्ति माग.

चरण ४.

(१) तुका म्हणतो: मना तुला हा विचार सांगतों, याविषयीं दिवसें-दिवस निर्धार घर.

(२) हे मना तुला ही एक मसलत सांगतों. उत्तरोत्तर अधिकाधिक निर्धार घर. आपला आवाज गोड नाहीं, आपल्याला गोड बोलतां येत नाहीं, असें म्हणून हातपाय गाळूं नको. दिवसेंदिवस अधिकच निश्चय ठेव.

लक्ष्यप्रयोग:—' **उत्तरें** ' ' वचनें ' या अर्थी; 'विश्वासेशीं'; 'दिसेंदिस.'

शंकास्थान:—' विश्वासेंशीं प्रीति भाववळें ':—विश्वास आणि भाव जवळ जवळ सारखेच नव्हेत काय ? प्रीतीनें माग असा अन्वय, कीं प्रीती माग असा ? ' भक्ति ' हें ' प्रीति ' या मनोभावाचें आविष्कृत स्वरूप होय. ' आवडती भक्ति माग आणि त्या भक्तीच्या मूळाशीं अवश्य हवी ती प्रीति माग ' असा आशय आहे काय ? वा. ब. प.

शब्द.—मधुर—गोड. **उत्तर**—वचन, बोलणें. **सुस्वर**—गोड स्वर, गोड आवाज. **भुकेला**—उपाशीं. **आवडीची**—देवाला जी कोणती आवडते ती. (२) तुला जी आवडते ती. **विश्वासेशीं**—विश्वासासहित; विश्वासावरोबर; (२) विश्वासानें. **भाववळें**—श्रद्धेच्या जोरावर. **विचार**—शहाणपणाची गोष्ट, मसलत. **निर्धार**—दृढव्रत, निश्चय, करारीपणा. **दिसेंदिस**—दिवसानुदिवस.

शेरा:—मनास उपदेश, स्वत:स शिक्षण, भजनमाहात्म्य: या अभंगाचा भाव साधा, शब्द साधे, ओघ सरळ आहे. काव्योद्गार बराच पक्व दशेस आल्यानंतरचा हा अभंग असावा. तरुण प्रौढपणींचा. वा. ब. प.

८ वी

सावध झालों सावध झालों ।
हरिच्या आलों जागरणा ॥ १ ॥
तेथें वैष्णवांचे भार ।
जयजयकार गर्जतसे ॥ २ ॥
पळोनियां गेली झोंप ।
होतें पाप आड तें ॥ ३ ॥
तुका म्हणे तया ठाया ।
ओल छाया कृपेची ॥ ३ ॥

पाठभेद—जुन्या इंदुप्रकाश–आवृत्तींत नमूद झालेले नाहींत.
चरण १ ' जालों '–' झालों; '–इंदिराप्रेस.
चरण ३. झोप–झोंप–जो. छा. प्र.
चरण ४ " ओल "–' ओळे ' ,, ,,

अर्थः—१ जागा झालों. शुद्धीवर आलों. हरीच्या जागरणाला आलों. हरिजागरला, हरिभजनाला आलों. २ हरिजागराचे ठिकाणीं वैष्णवांचे समुदाय आहेत. किती तरी वैष्णवभक्त आहेत. ' जयजय ' शब्दाची गर्जना सुरू आहे ३ झोंप आतां पळाली. झोंप म्हणजे पापच होतें तें हरिजागराला मला येऊं देत नव्हतें; तें पापच आड येई. त्या पापाची झोंप डोळ्यांवरची उडाली. ४ तुकाराम म्हणतातः—जेथें हरिजागर होतो, वैष्णवांचा मेळा जमतो, हरिनामाचा जयजयकार होतो, तेथें हरीची कृपा असते. तेथें हरिकृपेचा आसरा, हरिकृपेचा, ओलावा असतो. भवताप बाधत नाहीं.

वादः—चरण ३.

(१) झोंप पळाली आणि पापाचा प्रत्यवाय होता तोही गेला.

(२) पापाचीच झोंप आजवर डोळ्यांवर होती. पापाचा पगडा होता म्हणून हरिजागराची किंमत कळत नसे. आज हरिजागराला आलों तेव्हां पापापासून मुक्त झालों. झोंप जाऊन जागा झालों.

चरण ४

(१) ' ओळे ' पाठ जोगांनीं दिला आहे. तो घेऊन त्याचा अर्थ 'वळते' असा करावा. तेथें कृपेचा छाया वळते.

(२) ' ओळे ' हा पाठ कै. शंकर पांडुरंग पंडितांजवळच्या पोथ्यांत नव्हता. कां कीं, तो त्यांनीं नमूद केलेला नाहीं. इतर कोठेंही आढळत नाहीं. ' ओल ' हा पाठही रसहीन नाहीं. संसारतापानें त्रासलेल्या कृपेचा ओलावा हवा. जेथें हरिनामाचा गजर तेथें हरिकृपेचा ओलावा असतो. तेथें कृपेची छाया, सावली असते. उन्हाच्या तापानें होरपळलेल्यांस जशी थंड पाण्याची आणि गार सावलीची जरूर, तशीच संसारतापानें तप्त झालेल्यांस हरिकृपेच्या ओलाव्याची आणि हरिकृपेच्या छत्राची जरूर. तो ओलावा आणि ती सावली हरिजागराचे ठिकाणी असते असा भाव.

लक्ष्यप्रयोग:—' जयजयकार गर्जतसे ' अकर्मक प्रयोग, 'ओल, छाया' दोन रूपकें एकदम एकाच वाक्यांत आहेत.

शब्द:—सावध–जागा, भानावर आहे असा. **जागरण**–भजनांत स्मरणांत, कीर्तनांत, झोंपेचा वेळ घालविणें; भजन करून जागणें; भजन–स्मरण–घोष वगैरे. **वैष्णव** विष्णूचा भक्त; भक्तिमार्गाचा उपासक; भागवत; विठोबाचा भक्त वारकरी. **भार**–समुदाय घोळका. जयजयकार ' जय पाडुरंग, जयखंडोबा ' या चालीवर घोष **आड** वाटेंत आडवें, प्रतिबंध करणारें. **ठाया**–जागेकडे, ठिकाणीं. **ओल**–ओलावा, आर्द्रता, द्रव. **छाया**–सांवली, आसरा, निवारा. **कृपेची**–हरीच्या प्रसादाची, भगवंताच्या दयार्द्रबुद्धीची.

शेरा—अध्यात्मिक जागृति. खऱ्या भक्तांची, भाविकांची गांठ पडून दृष्टीवरचें पटल एकदम निघाल्याबरोबर होणारा आनंद या अभंगांत आहे. अजून आनंद हरिनामगजराचाच आहे, तरी तो नवा आहे. तरुण-प्रौढपणींचा.

वा. ब. प.

९

आपुलिया हिता जो असे जागता ।
धन्य माता पिता तयाचिया ॥ १ ॥
कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्विक ।
तयाचा हरिख वाटे देवा ॥ २ ॥

गीता भागवत करिती श्रवण ।
अखंड चिंतन विठोबाचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज घडो त्याची सेवा ।
तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥ ४ ॥

पाठभेद:—चरण १ ' असे '–' होय '–जोग.
चरण २ ' तयाचा '–' तयांचा ' पाहिजे काय ?
चरण ३ ' अखंड '–' आणीक '–शं. पां. पंडितांची प्रत.
चरण ४ ' त्याची '–' त्यांची ' पाहिजे ? ' घडो '–' घडे ' पाहिजे ?

अर्थ—१ जो माणूस आपल्या खऱ्या कल्याणाविषयीं जागा असतो; सावध असतो, आपल्या हिताला जागतो, त्याचे आईबाप धन्य होत. २ कारण, कुळांत सात्विक, सत्वगुणयुक्त मुलें निपजलीं तर त्याचा, त्या गोष्टीचा, देवाला आनंद वाटतो. ३ जे गीता, भागवत इत्यादि पवित्र ग्रंथांचें श्रवण करितात, ते ग्रंथ वाचलेले ऐकतात, त्यांचें निरूपण ऐकतात, आणखी एकसारखें, मध्यें खळ पडूं न देतां, विठोबाचें चिंतन करितात. ४ तुकाराम ह्मणतात:—मला अशा माणसांची सेवा घडो. त्यांची सेवाचाकरी माझे हातून होवो. तसें झालें तर मग माझ्या भाग्याला सीमा नाहीं. मी अपार भाग्याचा असें मी समजेन.

वाद:—चरण २.

(१) ' कुळामध्यें जीं कन्यापुत्र सात्विक होतात त्यांचा देवाला आनंद वाटतो. '–जोग.

(२) कुळांत सत्वगुणसंपन्न मुलें निपजलीं तर त्या गोष्टीचा देवाला आनंद वाटतो.

(३) चरण १ प्रमाणेंच याही चरणाचा आशय असून चरणाची रचना मात्र जरा संदिग्ध झाली आहे असें समजून अर्थ करावा. ज्या कुळांत सात्विक मुलें निपजतात तें कुळ धन्य. त्या कुळाचा देवालाही आनंद वाटतो. असें कुळ पाहून देवालाही आनंद होतो.

चरण ३.

(१) तीं मुलें गीता, भागवत इत्यादि ग्रंथांचें श्रवण करितात आणि विठोबाचें निरंतर चिंतन करितात. (म्हणून त्यांचा देवाला आनंद होतो.)

(२) जे कोणी गीता-भागवतांचें श्रवण करितात आणि विठोबाचें निरंतर चिंतन करितात, (त्यांची माता पिता धन्य.)

चरण ४.

(१) तुका म्हणतोः—त्याची. जो आपल्या हिताला जागतो त्याची सेवा मला घडो. (घडेल तर मग मी मोठथा भाग्याचा.)

(२) ' त्यांची ' असा अनेकवचनीं पाठ समजून, अशा प्रकारचीं, पूर्वोक्त वर्णनाचीं जीं माणसें त्यांची सेवा माझ्या हातून घड़ो. घडेल तर इत्यादि.

एकंदर अभंग दोन रीतींनीं लावितां येतो एकः—चरण १ व चरण ४ मुख्य धरून मधल्या दोन चरणांस गौणत्व द्यावयाचें व अर्थ करावयाचा तो येणेंप्रमाणेंः—

आपल्या खऱ्या हिताला जो जागतो, परमेश्वरभजनाला लागतो तो खरा नरजन्माला आला. तो स्वतःचें हित साधतो इतकेंच नव्हे, त्याचेयोगें त्याचे आईबापही धन्य होतात. कांकीं कुळांत सात्विक मुलें निपजलीं तर देवाला आनंद होतो. कारण तीं गीताभागवत श्रवण करितात आणि विठोबाचें चिंतन करतात. अशा रीतीनें जो आपल्या हिताला जागून कुळाचा उद्धार करतो त्याची मला सेवा घडो, ह्मणजे मी मोठा भाग्यवान असें समजेन.

दुसरें—चरण ४ हाच प्रधान समजून पहिल्या तीन चरणांचा चवथ्या चरणांतील ' त्याचा ' शब्दाशीं विशेषणात्मक संबंध लावावयाचा. जे स्वहिताला जागतात, जे सात्विक निपजतात आणि जे गीताभागवत श्रवण करितात त्यांची मला सेवा घडो इत्यादि.

प्रश्नः—चरण २ ' तयाचा ' आणि चरण ४ ' त्याची ' हीं एकवचनें कां ? जोगांनीं पाठ एकवचनीं घेऊन अर्थ अनेकवचनीं केला आहे. रूपें अनेकवचनींच पाहिजेत काय ? तसा पाठ कोठें आहे ? वा. व. प.

लक्ष्यप्रयोगः— " तयाचिया माता पिता " या प्रयोगांत दोन तीन प्रकारांचा मिसळा झाला आहे. ' त्यांच्या माता, त्यांचे पिते, ' ' तयाचिया पितामाता ' ' त्याच्या माता-आई, आजी वगैरे आणि त्याचा पिता ' इत्यादि तीन चार प्रयोगांचा संकर आहे असें समजावें. किंवा छंदाच्या सोईकरितां " पितामाता " या समासाचीं पदें उलटींपालटीं केलीं आहेत असें समजावें. असल्या द्वंद्व समासांत शेवटच्या पदाचें लिंग सबंध समासाचें समजावयाचें

किंवा सबंध समास नपुंसकलिंगी समजावयाचा, असा मराठ्यांचा प्रघात आहे. उ० 'आईबाप' हें पुल्लिंगी अनेकवचन किंवा नपुंसकलिंगी एकवचन समजतात. २ 'सेवा घडो. तरी देवा पार नाहीं.'

शब्दः-आपुलिया-स्वतांच्या. **हिता**-कल्याणाला, खऱ्या परमार्थिक कल्याणाला. **जागता**-सावध, दक्ष, जागा. **धन्य**-कृतार्थ, सफलजन्म. **होती**-निपजतात. **सात्विक** साधुमार्गानें चालणारीं; सत्वगुणानें युक्त. **हरिख** हर्ष, आनंद. **गीता**-भगवद्गीता. **भागवत**-या नांवाचा प्रसिद्ध ग्रंथ. **श्रवण करिती**-ऐकतात, **अखंड**-निरंतर, खळ पडूं न देतां, **चिंतन**-ध्यास, ध्यान, **देवा**-देवाला, भाग्याला, **पार**-सीमा.

शेरा-विठोबाचें चिंतन वगैरे करणारांची सेवा घडो अशी प्रार्थना. भक्तिमार्गानें जाणारांची महती.

१ विठोबाचें-सगुण विठोबाचें चिंतन, गीतादिकांचें श्रवण वगैरे लौकिक मार्गाचा पगडा मनावर होता तेव्हांचा अभंग दिसतो. अजून अन्तःकरण-विवेचनाची जरूर भासूं लागली नव्हती, गीताश्रवणच पुरेसें वाटत होतें. तरुणपणींचा. २. गीताभागवताचे श्रवणाचा मात्र उल्लेख आहे. पठणाचा, वाचनाचा, अध्ययनाचा नाहीं. ही गोष्ट तात्कालीन समाजस्थितीची निदर्शक आहे. गीताभागवतादि वाचनाचा परिपाठ तुकारामाच्या डोळ्यांपुढें असणाऱ्या मंडळींत नव्हता हें उघड होतें ही मंडळी फक्त श्रवण करी. ३. अभंगांत एकंदरीनें खऱ्या हिताला जागणें, अर्थात् केवळ ऐहिक गोष्टींत गुरफटून न जाणें, सात्विक वृत्ति ठेवणें, कोणाच्या अध्यामध्यांत नसणें आणि गीताभागवतश्रवण आणि विठ्ठलाचें चिंतन करीत राहणें या साध्या, फारशा खोलांत न जाणाऱ्या मार्गाची प्रशंसा आहे. अजून दृष्टि अन्तर्मुख झालेली नव्हती असें दिसतें. ४. अभंग ८ च्या पुढची पायरी दिसते.-वा. ब. प.

१०

अंतरींची घेतो गोडी ।
पाहे जोडी भावार्चा ॥ १ ॥
देव सोयरा देव सोयरा ।
देव सोयरा दीनाचा ॥ २ ॥
आपुल्या वैभवें ।
शृंगारावें निर्मळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे जेवी सवें ।
प्रेम द्यावें प्रीतीचें ॥ ४ ॥

पाठभेद:—चरण ३.
'' आपल्या वैभवें '–' आपुल्याच वैभवें '–जोग, इंदिरा.
' निर्मळ '–' निर्मळें, '–जोग.

अर्थ:—१ देव भक्ताच्या अन्त:करणांतली गोडी घेतो. (बाहेर कांहीं गोड त्याला देतां आलें नाहीं तरी हरकत नाहीं. मनांत त्याचें प्रेम असलें, मन त्याचेकडे दिलें म्हणजे तेवढें त्याला पुरतें.) भक्तानें भावाची जोड केली आहे कीं नाहीं एवढें देव पाहतो, भाव असला म्हणजे तो दुसरें कांहीं मागत नाहीं. २ दीन, गरीब, दुबळें जें कोणी, ज्याला कशाचें सामर्थ्य नाहीं त्याचा सखा देव होतो, भाव मात्र पाहिजे. ३ त्याचें दैन्य तो स्वतांच्या वैभवानें झांकतो–सुशोभित करतो. आपलें सोज्ज्वल वैभव दीनाला देतो आणि त्याचा दीनपणा हा एक अलंकारच असें करितो. ४ (फार काय), त्याच्या सवें, त्याचेबरोबर, त्याचे पंक्तीस जेवतो. आवडीचें प्रेम देतो, प्रीतीची आवड देतो.

वाद:—चरण १.

(१) देव हा आपल्याविषयीं भक्तांच्या अंत:करणांत असणाऱ्या गोडीचें ग्रहण करतो, आणि आपल्याविषयीं त्यांचे मनांत भावाची जोड किती आहे हें पाहतो. संप्रदायी–जोग.

(२) दुसरें कांहीं त्याला मिळालें नाहीं तरी नुसती मनांतली आवड तेवढी देव स्वीकारितो व तिच्या जोडीला भाव पाहातो, भावाची अपेक्षा

करितो. अन्तःकरणांत देवाची आवड, आणि देवावर माव येवढ्या दोन गोष्टी असल्या म्हणजे तेवढ्यांवर देव संतुष्ट होतो. मग याशिवाय बाकी कांहीं भक्ताजवळ नसलें, तो अगदीं दीन असला, तरी त्याला चालतें.

(३) देवाला नुसता मनोनैवेद्य गोड लागतो. भाव मात्र हवा.

चरण २.

(१) देव दीनाचा दयाळू आहे. देव दीनाचा सखा आहे.

चरण ३.

(१) ' देव हा आपले ऐश्वर्यानें त्याला स्वच्छ शृंगारतो. ' सांप्रदायिक–जोग.

जोगांचा पाठ ' निर्मळें ' आहे. त्याप्रमाणें तें ' वैभवें'चें विशेषण होतें. अर्थ तर ' शृंगारतो'च्या क्रियाविशेषणासारखा केला आहे. वा. ब. प.

(२) दीन भक्तावर आपलें निर्मळ–सोज्ज्वल–ऐश्वर्य चढवून त्याला देव सुशोभित करतो, त्याचें दैन्य घालवितो.

(३) दीनाचा ओंगळपणा घालवून निर्मळ–स्वच्छ–सजवितो.

चरण ४.

(१).....आपल्याविषयींचें प्रेम देतो.

(२) प्रीतीचें–भक्ताच्या आवडीचें–भक्ताला आवडतें तें प्रेम देतो.

(३) प्रीतीच्या मोबदला प्रेम देतो. भक्तावर प्रेम करितो.

(४) प्रीतिचें प्रेम, प्रीतीची आवड द्यावी, प्रीती आवडावी, देवाचे ठायीं प्रीती ठेवणें आवडावें असें करितो.

प्रीतीची आवड कोणीं द्यावी ! देवानें ! देव बरोबर जेवतो असा पूर्वार्ध. उत्तरार्धांत देवानें प्रीतीची आवड द्यावी हें कसें शोभणार ?

(५) देव दीनांच्या पंक्तीस जेवतो. त्याला—देवाला आवडतें जें प्रेम तें त्याला द्यावें म्हणजे झालें. एक प्रेम–भक्ति दिली कीं देव भक्तासवें जेवतोही, असा भावार्थ दिसतो. या चरणाचें उत्तरार्ध पहिल्या चरणाचें पुनरुच्चारण आहे असें वाटतें. वा. ब. प.

लक्ष्यप्रयोग:–' अंतरींची गोडी; ' जोडी पाहे. ' अपेक्षा करतो किंवा पारखतो या अर्थी; ' शृंगारावें ' ' द्यावें '–ही विकरणानें विध्यर्थी, परंतु अभि-

प्रेतानें रीतिवर्तमानकाळीं रूपें आहेत. विध्यार्थीं रूपांचा रीतिभूतार्थीं प्रयोग प्रचारांत आहे. उ. भिकाऱ्याचें अमंगळ पोर तें, पण रावसाहेबांनीं त्याला हातानें भरवावें=रावसाहेब भरवीत असत. येथें तेंच रूप रीतिवर्तमान दाखवीत आहे.

शेरा:—देवाला भाव हवा. मनांतलें प्रेम हवें. येथें दृष्टि आंत वळलेली, अंतर्मुख झालेली दिसते. गीता—भागवत—श्रवणादि बाह्य साधनांनीं समाधान न होऊन त्याचे पलीकडे खोल ठाव घेतल्यावर झालेला मनाचा निश्चय या अभंगांत आहे. अभंगाची भाषाही साधी आणि अभिप्रेत बरोबर व्यक्त करणारी आहे. नवाशिक्या कवीची दिसत नाहीं. अभंग बहिर्मुख, तारुण्य उलटल्यानंतरचा, प्रौढवयांत शिरल्यावरचा किंवा शिरते वेळचा असावा.

वा. ब. प.

११

सुखें बोळंब दावी गोहा ।
माझें दुःख नेणा पाहा ॥ १ ॥
आवडीचा मारिला वेडा ।
होय होय कैसा ह्मणे भिडा ॥ २ ॥
निपट मज न चले अन्न ।
पायली गहूं सांजा तीन ॥ ३ ॥
गेले वारीं आणिली साकर ।
सात दिवसां दहा शेर ॥ ४ ॥
अखंड मज पोटाची व्यथा ।
दुधभात साकर पथ्या ॥ ५ ॥
दोपाहरा मज लहरी येती ।
शूद्ध नाहीं पडे सुपती ॥ ६ ॥
नीज नये घालीं फुलें ।
जवळी न साहती मुलें ॥ ७ ॥

अंगीं चंदन लाविते भाळीं ।
सदा शूळ माझे कपाळीं ॥ ८ ॥
हाड गळोनि आलें मास ।
माझें दुःख तुह्मां नेणवे कैसें ॥ ९ ॥
तुका ह्मणे जिता गाढव केला ।
मेलियावरि नरका गेला ॥ १० ॥

पाठभेद—चरण ३–हा चरण जोगांचे प्रतींत ७ वा आहे.

चरण ४. ' गेले वारीं आणिली साकर '–' गेले वारीं तुम्ही आणिली साकर '. शं. पां. पं. प्रत.

' सात दिवसा दहा शेर '–'सातदी गेली साडे दहा शेर'. शं. पां. पं. प्र. ' सात दिवस गेली साडे दहा शेर '. जोग. जोगांचे प्रतींत हा चरण ८ वा आहे.

चरण ५. ' साकर पथ्या '–' साकर तूप पथ्या '–पं. प्र. जोग. जोगांचे प्रतींत हा चरण ३ रा आहे.

चरण ६. ' सुपती '. ' सूपती '. जोग चरण ४.

चरण ७. ' नीज नये घाली इ. '–' नीज नये खालीं घाली इ. '–जोग. ' घाली ' असा सानुस्वार पाठ बरा वाटला म्हणून मूळांत घेतला आहे. ' घाली ' असाहि पाठ आहे.

अर्थः—१. बायको नवऱ्याला सुखासुखीं मोठें ढोंग किंवा कौतुक दाखविते व ह्मणते. ' हें पहा. माझें दुःख तुह्मांला कळत नाहीं. ' २. आणि आवडीमुळें वेडा झालेला, बायको प्यार असल्यामुळें, मोहानें झपाटलेला नवरा भिडेनें पहा कसें हो–हो म्हणतो... ३. बायको ह्मणते, अगदीं मुळीं कसें तें मला अन्न जात नाहीं. तीन सांजा मिळून सारे पायलीभर गहूं लागतात. ४. गेल्या आठड्यांत–आज आठ दिसां किंवा गेल्या खेपेस साकर आणिली ती दहाची दहा शेर सात दिवसांत संपली. ५ मला सारखी पोटदुखी आहे. त्यामुळें पथ्याला नुसता दूधभात आणि साखर खावी लागते. ६ दोन-प्रहरीं मला चक्कर येते आणि मी बेशुद्ध पडतें–निजतें. ७. झोंप कशी ती येत नाहीं, म्हणून (अंथरुणावर) फुलें अंथरतें. मुलें जवळ मुळींच सोसत नाहींत.

८. अंगाला, कपाळाला चंदन लावतें, तें माझें सारखें कपाळ दुखत असतें म्हणून. ९. अहो, सगळीं हाडें गळून गेलीं. नुसतें आतां मांस त्या जागीं आलें आहे. तुह्मांला माझें दुखणें कसें कळत नाहीं! १०. तुकाराम म्हणतातः— या बायकोच्या वेडानें बिचारा जिवंतपणीं शुद्ध गद्धा बनला आणि मेल्यावर नरकांत पडला. स्वार्थ आणि परमार्थ दोहोंसही मुकला.

वादः—चरण १.

(१) ' माझें दुःख तुम्हां जाणत नाहीं व पहातही नाहीं. '

सांप्रदायिक.

(२) हें पहा, माझें दुःख तुह्मांला कळत नाहीं. किंवा, माझें दुखणें तुह्मांला कळत नाहीं.

चरण ३.

(१) ' तीन वेळेनां मिळून पायलभिर गव्हांचा सांजा लागतो. '

संप्रदायिक.

जोगांच्या प्रतींत हा चरण सातवा आहे; पण त्याचा अर्थ तिसऱ्या चरणाचे ठिकाणीं दिला आहे. तो वरच्यासारखाच आहे. त्यांत ' सांजा 'चा अर्थ ' वेळेस ' केल्यावर पुनः 'सांजा' कोठून येतो ?

(२) तीन वेळां मिळून सारे पायलीभर गहूं लागतात !

चरण ४.

गेल्या वारीं तुम्ही साडे दहा शेर साखर आणिली होती. ती सात दिवसांत संपली. सांप्रदायिक.

गेल्या वारीं म्हणजे काय ?

(१) गेल्या खेपेस साखर दहा शेर—(किंवा साडे दहा शेर) आणिली ती सात दिवसांत संपली.

(२) गेल्या बाजाराचे दिवशीं इ०

(३) गेल्या आठवड्यांत इ०

(४) आज आठा दिसा इ०

चरण ५.

(१) दोनप्रहरीं मला लहरी येतात आणि मी अंथरुणावर बेशुद्ध झोंपेंत पडतें. सांप्रदायिक.

(२) दोनप्रहरीं मला चक्कर करते, ' शुद्ध नाहीं ' अशी मी निजतें— अंथरुणावर बेशुद्ध पडतें.

चरण १०.

(१) तिनें नवऱ्याला जिवंत असतांना गाढव केला म्हणून तो मेल्यावर नरकास गेला. संप्रदायिक.

(२) जिवंतपणीं तो वायकोच्या वेडानें गद्धा बनला आणि मेल्यावर नरकांत पडला.

लक्ष्य प्रयोगः—' नेणा. ' द्वितीय पुरुषीं अनेक वचनीं वर्तमानकाळीं निरनुस्वाररूप. २. आवडीचा मारिला. ३. ' भिडा ' भिडेनें या अर्थीं. ४. ' न चळे '. ५. ' सुपती पडे '.

शब्द-सुखें-सुखासुखीं. **वोळंब**-कांगाव. ढोंग. कौतुक. **दावी**-दाखविते. **गोहा**-नवऱ्याला, (गोहो =कोंकणीशब्द.) **आवडीचा**-आवडीनें. **मारिला**-मारिलेला, झपाटलेला. **भिडा**-भिडेनें, मुर्वतीमुळें. **निपट**-अगदीं, मुळींच. **चळे**-चालतें, पचतें. **सांजा**-वेळांस, वेळां. **गेले**-मागल्या. **वारीं**-(१) खेपेस. (२) आठवड्यांत. (३) बाजाराचे दिवशीं. (४) आठा दिवशीं. **अखंड**-सारखी, खळ नाहीं अशी. **व्यथा**-दुखणें. **पथ्या**-सोसेसें खावयाला. **पाहरा**-प्रहरीं. **लहरी**-(एकवचन किंवा अनेकवचन.) चक्कर, भोवंड. **येती**-येते किंवा येतात. **सुपती**-अंथरुणावर, पलंगावर, किंवा हातरीवरः-झोंपीं. **भाळीं**-कपाळावर. **चंदन**-चंदनाचें उटणें. **शूळ**-टोंचल्यासारखें दुखणें. **नेणवे**-समजत नाहीं. ओळखतां येत नाहीं. **जिता**-जिवंत (असतां.) **नरका**-अधोगतीला.

शेराः--व्यवहाराचा. लौकिकी कोटी. तरुणपणींचा. १ केवळ हरदासी नक्कल छदांत गोंवून केलेला अभंग आहे. २ या अभंगावरून तुकारामाचे वेळीं सामान्य समाजाचें व खुद्द तुकारामाचेंहि स्त्री जातीविषयीं मत किती अनुदार होतें तें दिसून येतें. पुरुषाच्या खऱ्या हिताला स्त्री, इतर ऐहिक विषयांप्रमाणेंच प्रतिकूल, आड येणारी आहे असेंच या अभंगांत ध्वनित आहे. स्त्री जर याप्रमाणें हितविघातक आहे तर लग्न कशाला करावें ? स्त्रीविषयीं ही अनुदार आणि कोती कल्पना मराठी वाङ्मयांत बऱ्याच ठिकाणीं आढळते. महाराष्ट्राच्या सामाजिक संस्कृतीचें स्वरूप जर अशा उद्गारांवरून ठरविलें तर तें एका बाजूनें किती ओंगळ दिसेल ? स्त्रीजातीच्या खऱ्या योग्यतेची व अधिकाराची योग्य कल्पना व्हावी तितकी आम्हांस झालेली नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. २ सर्व मनुष्य

मात्रासंबंधानें समबुद्धि, आणि सर्व मनुष्यें–स्त्री असो, पुरुष असो, परमेश्वर-स्वरूप आहेत, हीं भावना ज्यांनीं एकीकडे प्रतिपादावी त्यांनींच कधीं कधीं स्त्रीविषयीं कोणत्या दृष्टीचे उद्गार काढावे हें कशाचें दर्शक आहे ? ३ लौकिक समजुतीचा मनावर पगडा स्पष्ट दिसतो. सर्वांना सारख्या पदावर आणून ठेवणाऱ्या वैष्णव सिद्धान्ताचा खुला प्रकाश अजून हृदयांत पडला नव्हता असें दिसतें. वा. व. प.

१२

पावलें पावलें तुझें आह्मां सर्व ।
दुजा नको भाव होऊं देऊं ॥ १ ॥
जेथें तेथें देखें तुझींच पाउलें
त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥ २ ॥
भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद ।
आह्मां नको वाद त्यांशीं देऊं ॥ ३ ॥
तुका म्हणे अणु तुजविण नाहीं ।
नभाहून पाही वाढ आहे ॥ ४ ॥

पाठभेद—चरण ४. " पाहीं "–पाही–जोग.

अर्थ—१ तुजपासून मिळावयाचें तें सर्व आह्मांस प्राप्त झालें–मिळालें. आतां यापुढें मन बदलूं देऊं नको. २ जिकडे तिकडे तुझेच चरण मला दिसताहेत. हे विठ्ठला तिन्ही भुवनांचें हें विश्व सारें तूंच भरलें आहेस. तूंच सर्वत्र सांचला आहेस. ३ भेदाभेदमतें, हें निराळें तें निराळें, हा देव निराळा तो निराळा, जग निराळें देव निराळा, इत्यादि निरनिराळीं मतें प्रतिपादणें हे वेडेपणाचे संवाद होत. आम्हांला त्यांशीं वाद करायाला लावूं नको. ४ तुकाराम ह्मणतातः—हे देवा, अणुही असा नाहीं त्यांत तूं नाहींस. इतका तूं सूक्ष्म आहेस, आभाळा–आकाशाहूनहीं मोठा आहेस.

वाद—चरण १.

(१) अहो देवा, तुमचें सर्व कांहीं आम्हांस प्राप्त झालें. आतां येवढेंच मागणें कीं. दुसरा कांहीं भाव माझे अंतःकरणांत होऊं देऊं नका. ' जोग. संप्रदायीं

(२) तुजपासून आम्हांला जें कांहीं मिळायाचें तें मिळालें. आतां मन पालटूं देऊं नको.

(३) आतां यापुढें मनांत भेदभाव येऊं देऊं नका. आजचा लोभ, आजची ममता कायम ठेवा.

चरण ३.

(१) ' भेद व अभेद यां विषयींचे संवाद भ्रमांतले आहेत म्हणून त्या मतवाद्यांशीं वाद करण्याचा प्रसंग येऊं देऊं नका. ' जोग. संप्रदायी.

चरण ४.

हा चरण पुढील वाक्याचा अनुवाद आहे. ' आणोरणीयान् महतो महीयान. '

लक्ष्यप्रयोग—' तुझें पावलें ' २ संचलें. ३ ' भ्रमाचे संवाद '-- ४ ' वाढ ' ५ ' आहे.--' आहेस या अर्थीं.

शब्द-पावलें-मिळालें, प्राप्त झालें. **तुझें**--तुझ्यापासून मिळावयाचें तें, [२] तुझ्या मालकीचें जें कांहीं तें. **दुजा**-भिन्न, दुसरा, निराळा. **भाव**-बुद्धि, मनाची भावना, **देखें**-पाहतों. **संचलें**-खचलें; भरून राहिलें, **भेदाभेदमतें**-भेदप्रतिपादन व अभेद-प्रतिपादन, नानापंथ; द्वैताद्वैत वाद. **भ्रमाचे**-भ्रममूलक, डोकें भडकल्यावर सुचणारे किंवा डोकें फिरायला लावणारे. **संवाद**-पूर्वपक्ष-उत्तरपक्ष; संभाषण. **वाद**-आपले म्हणणें खरें असें सिद्ध करण्यासाठीं दुसऱ्याचें खोडून खात्री करण्यासाठीं उत्तर-प्रत्युत्तर करणें. **त्यांशीं**-भिन्न मताच्या प्रतिपादकांशीं. **अणु**-लहान कण. **तुजविण**-तुझ्याविरहित; ज्यांत तूं नाहींस असा. **नभाहूनि**-आकाशापेक्षांही. **वाढ**-मोठा.

शेरा—विठ्ठलाचें सर्वव्यापित्व. देवाचे सर्वव्यापक स्वरूपाची प्रतीति. प्रौढपणींचा. सर्वत्र देवाची प्रतीति येऊं लागल्यावरचा. या अभंगाची भाषाही सरळ, सहज ओघानें चालणारी आहे. हृदयाचे आपोआप निघणारे ' उद्गार असेच खुळेपणानें बाहेर पडायाचे. ' भेदाभेदमतांशीं वाद देऊं नको, या विनंतीवरून मनाची कोणती स्थिति दिसते ? ' न जाणों कदाचित् आमच्या मनाचा निश्चय ढळेल ' अशी अंधुक भीतिच त्या विनंतीचे मुळाशीं आहे काय ? किंवा तितकाच वेळ फुकट जाईल अशी भीति आहे ? वा. व. प.

१३

वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी ।
पूर्वकर्मा होळी करूनी सांडूं ॥ १ ॥
अमुप हें गांठीं बांधूं भांडवल ।
अनाथां विठ्ठल आम्हां जोगा ॥ २ ॥
अवघे होती लाभ एका या चिंतनें ।
नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥ ३ ॥
जन्ममरणाच्या खुंटतील खेपा ।
होईल हा सोपा सिद्ध पंथ ॥ ४ ॥
गेले पुढें त्यांचा शोधीत मारग ।
चला जाऊं माग घेत आम्ही ॥ ५ ॥
तुका ह्मणे घालूं जीवपणा चिरा ।
जाऊं त्या माहेरा निजाचिया ॥ ६ ॥

पाठभेद:—अनाथां—अनाथा

अर्थ—आम्ही विठ्ठलाच्या पायांचे रज वंदूं; त्याच्या उष्टावळी जेवूं; आणि पूर्वार्जित कर्म असेल त्याची होळी करून तें दूर टाकून देऊं, नाहींसें करूं. विठ्ठल हा आम्हां अनाथांच्या जोगा आहे. तोच आमचें मोठें, न सरणारें भांडवल, तें पदरीं बांधूं. त्याच्या नामसंकीर्तनानें आह्मांला सगळे लाभ होतील. जन्म मरणाच्या खेपा खुंटतील आणि हा मुक्तीचा माग सोपा आणि तयार होईल. आमच्या आधीं जे अगोदरच या मार्गावरून चालत गेले आहेत, त्यांचा माग काढीत जाऊं चला. जीवपणावर दगड घालून त्याचें निरसन करूं आणि निजात्मरूपी माहेराला जाऊं.

वाद—नाहीं.

लक्ष्यप्रयोग:— "पूर्व कर्मा होळी करुनी ', होळी करून पूर्वकर्म सांडून टाकूं. २. पूर्वकर्माची होळी करून तें सांडून टाकूं.

शब्द-अमुप-पुष्कळ, ज्याला जोड नाहीं असें; म्वाप. **मारण**-मार्ग, वाट माग **माग**-मार्ग परंतु ' माग काढणें ' या शब्द संप्रहयांत ' खुणांच्या सहाय्यानें शोध किंवा तपास करणें असा अर्थ होतो. **चिरा घालणें**-डोक्यावर धोंडा घालून ठार

मारणें (गुहेला तोंडाशीं दगड लावून बंद करितात त्याला अनुलक्षुन असावें. प्रो. पोतदार. **माहेर** -परमेश्वर स्वरुपांत लीन होणें याला पुष्कळ वेळां कवींनी माहेरीं जाण्याची उपमा दिली आहे. लहान वयांत सासूरवासिनीला माहेरीं जाण्यात जसें सुख वाटतें किंवा त्याविषयींची उत्कंठा असते तशीच उत्कंठा, तसेंच सुख भक्ताला हरिस्वरूपी लीन होण्य.त वाटतें त्याकाळीं माहेरवास इतका दुर्लभ होता का ? सं.

शेरा:—मध्यमवर्यींचा. भक्तीचें महात्म्य सांगितलें आहे. वा. ब. प.

१४

जेविले ते संत मागें उष्टावळी ।
अवघ्या पत्रावळी करुनी झाडा ॥ १ ॥
सोंवळया ओंवळया राहिलों निराळा ।
पासूनि सकळां अवघ्यां दूरी ॥ २ ॥
परें परतें मज न लगे सांगावें ।
हें तों देवें बरें शिकविलें ॥ ३ ॥
दुसऱ्यातें आम्ही नाहीं आतळत ।
जाणोनि संकेत उभा असें ॥ ४ ॥
येथें कोणीं कांहीं न धरावी शंका ।
मज चाड एका भोजनाची ॥ ५ ॥
लांचावला तुका मारितसे झड ।
पुरविलें कोड नारायणें ॥ ६ ॥

पाठभेद:— च० २ दुरी दुरीं च० ३ असें--असे

अर्थ—संत जेवले आहेत. मागे उष्टावळी आहेत. त्या साऱ्या पत्रावळी गोळा करून, सगळें उष्टें गोळाकरून, मला घाला. मी तुमच्या सोंवळयाओंवळया-पासून अगदीं दूर, लांब उभा आहें. दुसरें तिसरें मला कांहीं सांगावयाला नको. उष्टावळीं खाण्याचें देवानें मला बरें शिकविलें आहे. दुसऱ्यानें कोणी मला सांगावयाला नको. मला देवानेंच तें शिकविलें आहे. आम्ही दुसऱ्या कोणाला, लोकांना शिवत नाहीं, देवाचा तसा संकेत समजून मी येथें एकीकडे उभा आहें,

येथें कोणी कांहीं शंका धरूं नये. मला एक भोजन हवें आहे. मी जेवणाला लाचावलों, सवकलों आहें. जेवणावर मी झड मारितों; नारायणानें हें माझें कोड पुरविलें.

वादः—अभंगाचा भावार्थ—संताचें उष्टें खाऊन नारायणाची प्राप्ती मला होते असा दिसतो. मला उष्टया पत्रावळी झाडून संतांचें उष्टें घाला. मी कोणाला शिवत नाहीं. सोंवळ्याओंवळ्यापासून, तुह्मां सर्वांपासून मी दूर आहें. दूर उभा रहा हें मला कोणीं दुसऱ्यानें सांगावयाला नको. मला हें दूर उभा राहून उष्टें खाणें ' देवानेंच शिकविलें आहे. मी दुसऱ्याला शिवत नाहीं, दूर उभें राहण्याचा देवानें सांगितलेला संकेत समजून मी उभा आहें.मला भोजनाशीं कारण ''—असा अर्थ करावा ह्मणजे ' उभा असें ' हा पाठ बरोबर वाटतो. ह्मणूनच ' परें ' ह्मणजे दुसऱ्यानें असें ध्यावेसें वाटतें. वा. ब. प.

च० १ मागें उष्टावळी—संत जेविले तें मागतों. अवघ्या पत्रावळी उष्टावळी करून झाडा. असा अर्थ लावितां येईल.

च० ३ परें परतें '' दूर जा, लांव हो. '' हें मला सांगावें लागत नाहीं.

रा. गणेश सखाराम खरे.

लक्ष्यप्रयोगः—च० २ ' पासुनी सकळां अवघ्यां दुरीं '

शब्द-आतळणें-शिवणें, आदळणें असा पाठ असावा काय ? '' आदळूं नको '' शिवूं नको, दूर हो अशा अर्थीं कानडी प्रदेशांत म्हणण्याची चाल आहे. **संकेत**-१ तूं संतांच्या उष्टावळी खा ह्मणजे तेथें मी तूला भेटेन असा देवाचा संकेत जाणून. **झड**-झोड. **कोड**-कौतूक.

शेराः—विचार व भाषासरणी ही दोन्ही अनुभविक माणसाचीं, प्रौढपणांतील दिसतात.

१५

देवाच्या प्रसादें करा रे भोजन ।
व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥ १ ॥
ब्रह्मादिकांसी हें दुर्लभ उच्छिष्ट ।
नका मानूं वीट ब्रह्मरसीं ॥ २ ॥
अवघियांपुरतें वोसंडलें पात्र ।
अधिकार सर्वत्र आहे येथें ॥ ३ ॥
इच्छादानी येथें वळला समर्थ ।
अवघेंचि आर्त पुरवितो ॥ ४ ॥
सरे येथें ऐसें नाहीं कदाकाळीं ।
पुढती वाटे कवळीं घ्यावें ऐसें ॥ ५ ॥
तुका म्हणे पाक लक्षुमीच्या हातें ।
कामारी सांगातें निरुपम ॥ ६ ॥

पाठभेद:—नाहींत

अर्थ—जे जे कोणी येथें येण्याला अधिकारी असाल ते ते येथें या आणि देवाच्या प्रसादानें, प्रसाद घेऊन घेऊन, भोजन करा. हें संतांचें उच्छिष्ट ब्रह्मादिकांना देखील दुर्लभ. ब्रह्मरसच हा. याचा वीट मानूं नका. सगळ्यांना पुरेल असें भांडें भरलें आहे. आणि लागेल तेवढें घेण्याचा अधिकार सर्वांना सर्व ठिकाणीं आहे. प्रत्यक्ष देव–इच्छिलेलें देणारा–समर्थ तो इकडे वळला आहे. तो सगळेंच मनाचें कोड पुरवितो. येथें हें भांडार कधीं संपेल असें नाहींच. घेतलें तरी पुन्हां पुन्हां कवळचे कवळ घ्यावे असें वाटतें. हा स्वयंपाक लक्ष्मीनें स्वतः केला आहे. आणि तिला मदतगार निरुपम असा विष्णू प्रत्यक्ष आहे.

वाद—नाहीं.

शब्द-वोसंडलें-भरलें-भरून चाललें **आर्त**-मनाचें कोड, उत्कंठा **कामारी**-कामकरी. **ज्ञानेश्वरी**-मग माझी होती कामारी । तिये वांचून येरें मारीं.

शेरा:—१४ व १५ हे एकाच सारखे दिसतात. एका विषयाला धरून आहेत.

१६

अवगुणांचे हातीं ।
आहे अवघी फजिती ॥ १ ॥
नाहीं पात्रासवें चाड ।
प्रमाण तें फिकें गोड ॥ २ ॥
विष तांब्या वाटी ।
भरली लावूं नये होटीं ॥ ३ ॥
तुका म्हणे भाव ।
शुद्ध बरा सोंग वाव ॥ ४ ॥

पाठभेद—चरण १. अवघीच–अवघी.

अर्थ—अवगुण उपयोगाचे नाहींत. त्यांनीं फजीती होते. पात्राची मातबरी नाहीं. गुणावगुणांची सारी किंमत. विष तांब्यांत असलें काय, किंवा वाटींत असलें काय, विष तें विषच. त्यानें भरलेलें भांडें ओंठाला लावूं नये. तात्पर्य इतक्रेंच कीं, भाव पाहिजे. सोंग फुकट. मूळ नाणें चांगलें पाहिजे. मग तें कोठेंही, कोणापाशींही असो. सोंग खोटें, तें उपयोगाचें नाहीं असा भाव.

वाद—नाहीं.

लक्ष्यप्रयोगः—' पात्रासवें चाड ' तृतीयेच्या अर्थानें.

च० ३ विष तांब्या वाटी भरली लावूं नये होटीं ।–क्रियापदाचें परू शेवटल्या कर्त्याच्या लिंगवचनाप्रमाणें केलें आहे.

शब्द-प्रमाण–पाहिजे तें, इष्ट, मुख्य, महत्वाची गोष्ट.

शेरा—शुद्ध भाव बरा. अभंग तरुणपणींचा दिसतो. वा. ब. प.

कां ? भाषा उदाहरणें देण्याची तऱ्हा सडेतोड निवाडा हीं लक्षणें प्रौढपणाचीं वाटतात. (सं.)

(८८) १७

हरिच्या जागरणा ।
जातां कां रे नये मना ॥ १ ॥
कोठें पाहासील तुटी ।
आयुष्य वेंचे फुकासाठीं ॥ २ ॥
ज्यांची तुज गुंती ।
ते तों मोकलिती अंतीं ॥ ३ ॥
तुका म्हणे वरा ।
लाभ काय तो विचारा ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ ज्यांची—ज्यांसी.

अर्थ—हरिच्या जागरणाला जाण्याचें कां रे तुझ्या मनास येत नाहीं ? हरिच्या जागरणाला गेलास तर तें तुझ्या कां रे मनास येत नाहीं ? आयुष्य सगळें फुकट जातें. ही तूट, हें नुकसान कोठें पहाशील ? त्याची सोय कशी लावशील ? तें कसें भरून काढणार बाबा ? ज्यांच्याकरितां तुझा जीव गुंततो, ज्यांच्या पाशांनीं तूं बांधिलेला आहेस, तीं सारीं अखेरीस तुला सोडतात. तेव्हां चांगला लाभ काय, खरी जोड कोणती याचा विचार करा.

वाद—च० २ कोठें...तुटी. फुकासाठीं आयुष्य वेंचतें हीच तूट किंवा खोट आहे. ही कोठें भरून काढशील, या तुटीची सोय कोठें, कोणत्या उपायानें लावशील, असा भावार्थ.

" या प्रपंच संगतीनें जें तुझें आयुष्य फुकट गेलें तें नुकसान तूं कोठें भरून काढशील ? " जोग सार्थ गाथा.

शब्द-तुटी-तूट नुकसान. मूळचा व्यापारी शब्द-तुकारामाच्या परिचयांतला असलाच पाहिजे. **गुंती**-गुंतणें, मोह-माया **मोकलणें**-कंठ मोकळा करून रडणें, निराशेनें रडणें, निराश होऊन रडणें ' मोकळा यापासून क्रियापद.

शेरा—भक्तिहीनाला उपदेश. मध्यम वयींचा. वा. ब. प.

१८

धर्माची तूं मूर्ती ।
पाप पुण्य तुझे हातीं ॥ १ ॥
मज सोडवीं दातारा ।
कर्मापासूनि दुस्तरा ॥ २ ॥
करिसी अंगीकार ।
तरी काय माझा भार ॥ ३ ॥
जीवींच्या जीवना ।
तुका म्हणे नारायणा ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ 'मूर्ति' असाहि पाठ आहे.

अर्थ—नारायणा, तूं मूर्तिमंत धर्म आहेस, पापपुण्य तुझ्या हातांतलें आहे. उदारा, दुस्तर कर्मापासून मला सोडीव. तूं माझा अंगीकार केलास, मला आश्रय दिलास, तर तुला काय माझें ओझे व्हायचें आहे ? हे जीवींच्या जीवना, प्राणाच्या प्राणा, तुला काय आहे माझा भार ?

वादः—नाहीं.

शब्द—**दुस्तर**-तरून पलीकडे जाण्याला कठीण.

शेराः—देवाची प्रार्थना, काकळूत अभंग मध्यम वयांतील. बा. ब. प.

१९

ब्रह्मादिक जया लाभासि ठेंगणे ।
बळिये आम्ही भले शरणागत ॥ १ ॥
कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ ।
केला पद्मनाभ सेवाऋणी ॥ २ ॥
कामधेनुचिया क्षीरा पार नाहीं ।
इच्छेचिये वाही वरुषावें ॥ ३ ॥

बैसलिया ठायीं लागलें भरतें ।
त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥ ४ ॥
हरिनाम आम्हां विष्णुदासा जगीं ।
नारायण अंगीं विसांवला ॥ ५ ॥
तुका म्हणे बहु लाटे हें भोजन ।
नाहीं रिता कोण रहात राहो ॥ ६ ॥

पाठभेद:—च० ६ लाटे–वाटे–लाटे.
राहता–राहो राहत राहों. ग. कृ. प्रत.

अर्थ:—आम्ही देवाला शरण गेलेले भक्त मोठे बळिवंत आहों. आह्मांला झालेल्या लाभाच्या मानानें, ब्रह्मलोकादि लाभ लहान, ठेंगणे. आम्ही वासना टाकून देऊन भजनाची जोड केली आहे. आणि सेवेच्या, भक्तीच्या साहय्यानें परमेश्वराला आमचा ऋणी करून ठेविलें. भक्ति ही कामधेनु आहे. तिच्या दुधाला पार नाहीं. ती हव्या त्या प्रकारानें, हवें तितकें, दूध देते. बसल्या ठिकाणीं तिच्या दुधाला भरतें येतें. तें इतकें कीं त्यानें वरच्या त्रिपुटीचा भेद होतो. ज्ञाता–ज्ञान–ज्ञेय–कर्ता–कार्य इत्यादि क्रमीचा, अथवा सत्व–रज–तमांच्या लयीचा नाश होतो. आम्हां विष्णूदासांना जगांत कोठेंही हार नाहीं. नारायण आमच्या आंगीं स्थिर झाला आहे, विसावला आहे. हें परमेश्वर प्राप्तीचें जेवण–या जेवणाचा मोठा लाट लागला आहे. येथें कोणी रिता, उपाशीं राहूं ह्मटलें तरी तो रहावयाचा नाहीं.

वाद:—च० २ केला.....सेवाऋणी. पद्मनाभ सेवेच्यामुळें आम्हीं ऋणी करून ठेविला.

च० ४ त्रिपुटी म्हणजे काय ?
ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान; ध्येय, ध्याता, ध्यात इत्यादि माडगांवकर.
च० ५ हारि.....जगीं.

१ आह्मांला जगांत कोठेंही हार अपजय नाहीं. देवाच्या कृपेनें जें पाहिजे तें मिळतें.

२ आह्मां विष्णुदासांना हरी परमेश्वर जगांत आमच्या बाहेर नाहीं. तो नारायण आंगींच विसांवला. वा. ब. प.

च० ६ ' राहात राहों–कोणी रिता नाहीं. राहों नाहीं. आम्ही राहणार नाहीं. डॉ. भांडारकर.

" राहता राहो " हा ग. कृ. प्र. चा पाठ घेतल्यास ' कोणी राहणार असेल तर राहो बिचारा. ' असा अर्थ करावा.

शेरा:––भजनाचा महिमा–मध्यमवयींचा. वा. व. प.

२०

दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरी ।
आपणाबाहेरी । न लगे ठाव धुंडावा ॥ १ ॥
इतुलें जाणावया जाणा । कोणें तरी मनें मना ।
पारधीच्या खुणा । जाणतेंचि साधाव्या ॥ २ ॥
देह आधीं काय खरा । देहसंबंध पसारा ।
बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ॥ ३ ॥
तुका करी जागा । नको वासपूं वाउगा ।
आहेसि तूं अंगा । अंगीं डोळे उघडीं ॥ ४ ॥

च० २ जाणतेंचि–जाणे तेणेंचि (इंदुप्रकाश निर्णयसागर.)

पाठभेद:—च० २ कोड तरी--कोंडे तरी (जोग)

च० ४ वासपूं--चाचपूं (जोग.) अंगा--अगा (जोग.) आंगा--अगा (माडगांवकर.)

अर्थ:—एक द्वैत खंडलें, नाहींसें झालें, म्हणजे जें जें सारें उरतें तें सारा हरी परमेश्वर आहे. मग त्याला धुंडावयाला आपणा बाहेर जावें लागत नाहीं. पण ही गोष्ट समजावयाला मनाला मनानें कोंडावयाला पाहिजे. मन अंतर्मुख करावयाला पाहिजे. पारधीच्या खुणा ज्याला ठाऊक त्यानेंच पारधीस जावें. ज्याला हरीची पारध करावयाची त्याला या खुणा समजल्या पाहिजेत. त्यानें द्वैत सांडिलें पाहिजे. व मनानें मनाला कोंडिलें पाहिजे. (इंद्रियद्वारा तें बाहेर धांवतें तें त्याला आंतच दवडलें पाहिजे.) ३ आधीं देहच काय खरा आहे,

तर देहसंबंधानें प्राप्त होणारा पसारा खरा असावयाचा ? चोराला जसें बुजगावणें हींच राखण आहे असें वाटतें, त्याप्रमाणें देह नश्वर असूनही आम्हांला खरा वाटतो. ४ बाबानों, तुम्हांला तुकाराम जागा करितो. उगीच इकडे तिकडे चाचपूं नका. नुसतें डोळे उघडून पहा. म्हणजे तुमचे तुम्हींच मोठे आहांत.

चर्चा—च० १ **दुजें** खंडे तरी.

१दुसरें कांहीं आहे हें ज्ञान डॉ. भांडारकर.

३ दुसरें कांहीं जाणत नाहीं असें झालें तर (भांडारकर.

३ द्वैत (जोग.)

च. २ "कोंडा" असा पाठ कल्पून मन मनानें कोंडा, कोंडावयास जाणा, असा अर्थ करावा. डॉ. भांडारकर

च. २ इंदुप्रकाश पाठ "जाणतेंचि" असा घेतला तर-'जाणता, ज्ञाता, असेल त्यानें,' असा अर्थ करावा.

च० ४ तूं स्वतः मूळचाच थोर, परमेश्वरच आहेस. पण डोळे उघडून तें ज्ञान करून घे म्हणजे झालें.

लक्ष्य प्रयोग

शब्द—१ **दुजें**-द्वैत. २ दुसरें कांहीं आहे हें ज्ञान. **इतुकें**-इतकें, हें. **बुजगावणें**-शेतांत पीक राखण्याकारितां काठी पुरून तिला कपडे वगैरे घालून माणसासारखें दिसावेसें करितात तें. **वाउगा**-वावगा, फुकट, व्यर्थ.

शेरा—अद्वैतपर मध्यम वयांतील. वा. ब. प.

२१

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेदभ्रम अमंगळ ॥ १ ॥
अइका जी तुम्ही भक्त भागवत ।
कराल तें हित सत्य करा ॥ २ ॥

कोणाही जिवाचा न घडो मत्सर ।
वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे एका देहाचे अवयव ।
सुख दुःख जीव भोग पावे ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ अइका आइका (माडगांवकर.)

अर्थ—सर्व जग विष्णुमय आहे असें मानणें हा (खरा) वैष्णवांचा धर्म. त्यांच्या दृष्टीनें भेदाभेद हे अमंगळ भ्रम आहेत. सगळें सारखें विष्णू-समान. २ भक्त भागवतहो, हें एवढें ऐका, जें काय तुह्मांला करावयाचें असेल तें खरें, हिताचें, (तुमच्या धर्माला साजेल असें, व म्हणून विहित असेल तें) तेंच करा. कोणाचाही मत्सर घडूं नये हें सर्वेश्वराच्या पूजनाचें रहस्य. ४ (याला उदाहरण) हात, पाय वगैरे अवयव निरानिराळे असले तरी ते एकाच देहाचे. त्यांपैकीं एखाद्याला सुख दुःख झालें तर त्याचा अनुभव जीवाला, व त्या द्वारा सर्व अवयवांना येतोच कीं नाहीं ? तेथें वेगळेपणा नाहीं. सर्व माणसें एकच. विष्णुमय.

चर्चा—नाहीं.

शब्द=भेदाभेदभ्रम–हें माझें हें दुसऱ्याचें अशाप्रकारचे भ्रम, खोटीं मतें.

शेरा—वैष्णव धर्माचें रहस्य. मध्यम वयांतील वा. ब. प.

२२

आम्ही तरी आस ।
झालों टाकोनी उदास ॥ १ ॥
आतां कोण भय धरी ।
घुढें मरणाचें हरी ॥ २ ॥
भलते ठायीं पडो ।
देह तुरुंगीं हा चढो ॥ ३ ॥
तुमचे तुम्हांपाशीं ।
आम्ही आहों जैसीं तैसीं ॥ ४ ॥

गेले मानापमान ।
सुखदुःखाचें खंडन ॥ ५ ॥
तुका म्हणे चित्तीं ।
नाहीं वागवीत खंती ॥ ६ ॥

पाठभेद—

अर्थ—आम्ही तर देह टाकून उदास झालों. आतां याच्यापुढें मरणाचें भय कोण धरितो ? आतां हरीपुढें मरणाचें भय कोण धरितो ? हरी बरोबर असतां मरणाची भीति कोण धरितो ? आतां देह भलत्यासलत्या ठायीं पडो किंवा घोड्यावर आरूढ होवो. तुमची स्थिति, तुमचें म्हणणें तुमच्यापाशीं. आम्हांला तें पटत नाहीं. आम्हांला आतां फिकीर नाहीं. आम्ही आहोंत तशीं आहों. मानापमान गेले, सुखदुःखाचें खंडन झालें. आम्ही आतां कशाची खंती धरीत नाहीं. तेव्हां आतां आम्हांला संसाराच्या गोष्टी कशाला सांगतां ?

चर्चा—च० ३ देह घोड्यावर चढो किंवा भलत्या ठिकाणीं पडो. घोड्यावर वसणें ही वैभवाची खूण; तत्कालीन सामाजिक परिस्थितीची निदर्शक आहे.

च० ४. ' तुमचें तुम्हांपाशीं—' देवाला उद्देशून म्हटलें आहे. च० २ मधील हे हरी हें संबोधन पहा. (वा० ब० प. डा. भांडारकर)
अभंग एखाद्या प्रसंगाला उद्देशून लिहिलेला दिसतो. अभंग देवाला उद्देशून घेण्यापेक्षां, संसाराच्या दृष्टीनें उपदेशाच्या गोष्टी सांगावयाला आलेल्या मंडळीस उत्तरादाखल आहे असें धरून, तुमचें सांगणें तुमच्यापाशीं असूं दे; आम्ही, मी, हा आहें असा आहें असा अर्थ करावा. वा० ब० प.

शब्द—**तुरंग**-घोडा, तुरग.

शेरा—विरक्ति मनांत पूर्ण वाणली, संसाराची आशा मागें पडली, अशा मनस्थितींतला. तरुणपणचा नसावा. प्रौढपणांतला दिसतो.

२३

निंदी कोणी मारी ।
वंदी कोणी पूजा करी ॥ १ ॥
मज हेंही नाहीं तेंही नाहीं ।
वेगळा दोहींपासूनि ॥ २ ॥
देहभोग भोगें घडे ।
जें जें जोडे तें तें खरें ॥ ३ ॥
अवघें पावे नारायणीं ।
जनार्दनीं तुकयाचें ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ खरें-बरें.
चर्चा नाहीं.

अर्थ—कोणी निंदी, कोणी वंदी, कोणी मारूं दे किंवा पूजा करूं दे; मला कशाचेंच कांहीं वाटत नाहीं. हेंही नाहीं, तेंही नाहीं. मी दोहींपासूनही वेगळा आहें. भोक्तृत्वाप्रमाणें देहभोग घडतो. जें जें भोगाला येईल तें तें बरेंच आहे. माझें सुखदुःख सारें नारायणाला पोचतें. मी अलिप्त आहें.

शेरा—उदासीनवृत्ति अंगांत मुरलेली. प्रौढपणींचा .

२४

जन विजन झालें आम्हां ।
विठ्ठलनामाप्रमाणें ॥ १ ॥
पाहें तिकडे मायबाप ।
विठ्ठल आहे रखुमाई ॥ २ ॥
वन पट्टण एकभाव ।
अवघा ठाव सरता जाला ॥ ३ ॥
आठव नाहीं सुखदुःखा ।
नाचे तुका कवतुकें ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ प्रमाणें प्रमाण च० ४ कौतुकें कवतुकें (जोगप्रत.)

अर्थ—आम्हांला जन,जग,किंवा संसार, हा विजनासारखाच झाला आहे. व विठोबाचें नांव तेवढें राहिलें आहे तें तेवढें पाहिजे.बाकी असून नसून सारखेंच. जिकडे पाहतों तिकडे मला बापमाय, विठ्ठल रखुमाई हींच दिसतात. वन असो, किंवा शहर असो, मला तें सारखेंच आहे. मला कोणतेंही ठिकाण आतां चालतें. सुखदुःखाची आठवणही उरली नाहीं. तुका कौतुकानें नाचतो.

चर्चा—च० १ ' प्रमाणें ' हा पाठ घेऊन "आम्हांला विठ्ठलनामासारखें सर्व जन हें विजन झालें" असा अर्थ कित्येकांनीं केला आहे तो बरोबर दिसत नाहीं.

२ " जन किंवा विजन=जनरहित आम्हांला विठ्ठल नामाप्रमाणेंच झाले आहेत. " जोग गाथा-याचा अर्थ मला तरी समजत नाहीं. (सं.)

३ " विठ्ठलनामाप्रमाणें " असाच पाठ घ्यावयाचा असेल तर खालील अर्थ बरा दिसतो. ' विठ्ठल नामाच्या प्रमाणामुळें, किंवा तें प्रमाण मानल्यामुळें जन हें विजन झालें.

च० ३ " सरता झाला. " १ सर्व सारखेंच आहे. २ सर्व विठ्ठलानें भरून गेलें. सरता.

शब्द—**विजन**-एकांत, जनरहित जागा, प्रमाण. **सरता झाला**-१ (मला सर्वजग) चालतें, सारखेंच आहे. (२) भरून उरलें.

शेरा:---भक्तीची एकतानता. प्रौढपणींचा.

२५

हिरा ठेवितां ऐरणीं ।
वांचे मारितां जो घणीं ॥ १ ॥
तोचि मोल पावे खरा ।
करणीचा होय चुरा ॥ २ ॥
मोहरा होय तोचि अंगें ।
सूत न जळे ज्याचे संगें ॥ ३ ॥

तुका म्हणे तोचि संत ।
सोसी जगाचे आघात ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जो हिरा ऐरणावर ठेवून त्यावर घणाचे आघात दिले तरी फुटत नाहीं, वांचतो, तोच खरा, त्यालाच मोल येतें. कृत्रिम असला तर तो तेव्हांच फुटतो. त्याचा चूर होतो. ज्याच्या संगानें सूत जळत नाहीं, भोंवतीं सूत गुंडाळून विस्तवांत टाकिला असतां ज्याचे संगतीमुळें सूत जळत नाहीं, तोच खरा मोहरा, तोच मणी मोहरा म्हणावयाचा. तुकाराम म्हणतात, त्याचप्रमाणें, जगाचे आघात सोसतो तोच संत.

चर्चा—च० २ करणी=कृत्रिम मणी, काच वगैरे.

शब्द—च० ३ मोहरा-एक प्रकारचें रत्न आहे असा अर्थ सर्वत्र दिला आहे, यापेक्षां जास्त स्पष्टीकरण केलेलें मला कोठें आढळलें नाहीं. (सं.)

शेरा—संतमहिमा. प्रौढपणींचा.

२६

आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ॥ १ ॥
ऐसा संतांचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ॥ २ ॥
तीर्थें पर्वकाळ ।
अवघीं पायांपें सकळ ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा ।
त्यांची केली पावे सेवा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत

अर्थ—साधूंचे आलिंगनानें मोक्ष होतो, मिळतो, सायुज्य मुक्ति लाभते. असा संतांचा महिमा आहे. येथें बोलावयाची सीमा झाली. सायुज्य मुक्ती

मिळते, इतकें म्हटल्यावर सांगावयाचें आणखी काय राहिलें ? तीर्थें, पर्वण्या, सगळें संतांच्या पायापाशीं आहे. त्यांची सेवा केली म्हणजे ती देवाला पोंचते.

चर्चा—नाहीं.

शब्द--सीमा–अखेर, 'सीमा झाली' इतकें सांगितलें म्हणजे बोलणेंच खुंटलें.

शेरा—संतमहिमा. तरुणपणींचा. वा. ब. प.

२७

माझिया मीपणा ।
जाला यावरी उगाणा ॥ १ ॥
भोगी त्यागी पांडुरंग ।
त्यानें वसविलें अंग ॥ २ ॥
टाळिलें निमित्त ।
फार थोडें घात हित ॥ ३ ॥
यावें कामावरी ।
तुका म्हणे नाहीं उरी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत

अर्थ—आतां यापुढें माझ्या मीपणाचा झाडा झाला. (देहाविषयीं मीपणा वाटत होता त्याचा निरास झाला. (जोग.) भोग भोगणारा किंवा त्यांचा त्याग करणारा यापुढें मी नव्हें. सगळें पांडुरंग आहे. तोच सर्वांगीं वास करून राहिला आहे. त्यानें निमित्त होतें तें काढून टाकिलें. फार आणि थोडें जें कांहीं होतें तें सर्व गेलें. घात गेला आणि हितही गेलें. आतां सगळेंच कामावर यावें, येतें. एकदां सर्व पांडुरंग मय झाल्यावर मग दुसरें कांहीं उरलेंच नाहीं.

चर्चा—च० १ उगाणा म्हणजे काय ?

परमेश्वरानें माझ्या सर्व गुणदोषांचा एकंदर हिशेव घेतला, त्यानें जवाबदारी आपल्यावर घेतली. त्यामुळें माझी सोडवणूक झाली असा भाव.

च० ३ 'फार–थोडें घात हित.' म्हणजे काय ?

१ फार-थोडें, घात-हित (अर्थातच लौकिक किंवा ऐहिक कल्याण किंवा अकल्याण) यांचें मूळ (निमित्त) काय, तर मीपणा. तो मीपणा गेला म्हणजे सर्वच गेलें.

च० ४ यावें कामावरी इ०

१ आतां कामादिक वृत्ति वर येण्याइतका आमचेमध्यें अवशिष्ट भाव राहिला नाहीं. (जोग गाथा.)

२ आतां आम्हीं देहभावावर यावें (परत देहधर्मांची, घातहिताची काळजी करावी) अशी उरी उरली नाहीं, जरूर राहिली नाहीं. (बावूराव.)

३ कामावरी यावें=कामीं लागावें, उद्योगाला लागावें. (जें कर्तव्य असेल तें करीत रहावें. स्वस्थ बसण्याची, त्यागाची जरूर उरली नाहीं. आम्हीं आतां काम करीत असावें, त्याग, निवृत्ति हीं नकोत. डॉ. भांडारकर व वा. व. प. मं. ठरलें.

शब्द—**उगाणा**-गोळा करणें, गोळा करून आपलासा करणें. भक्तांचीं पापें आपण घेऊन नाहींशीं करणें, निरसन, क्षालन, मोक्ष, फिटणें. ∠ उगवणें, वाकी वसूल करून घेणें, फेडून घेणें. **यावें कामावरी**-सगळें कामीं यावें, हितकरणीं लागावें. देवानें कामावरी यावें. देवच सगळें काम करूं लागल्यावर वाकी काय उरलें ? असा अर्थ. हा अर्थ मंडळींना पसंत पडलेला दिसतो. (सं०). **उरी**-शिल्लक, शेष.

शेरा—पूर्णभक्तीचा निदर्शक. अद्वैताची छटा आहे. प्रौढपणींचा. वा. व. प.

२८

सकळ चिंतामणी शरीर ।
जरी ज़ाय अहंकार आशा समूळ ॥
निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि ।
निर्मळ स्फटिक जैसा ॥ १ ॥
मोक्षाचें तीर्थ नलगे वाराणसी ।
येती तयापासीं अवघीं जनें ॥

तीर्थासि तीर्थ जाला तोचि एक ।
मोक्ष तेणें दर्शनें ॥ २ ॥
मन शुद्ध तया काय करिती माळा ।
मंडित सकळां भूषणांसी ॥
हरिच्या गुणें गर्जतातीं सदा ।
आनंद तयां मानसीं ॥ ३ ॥
तन मन धन दिलें पुरुषोत्तमा ।
आशा नाहीं कवणाची ॥
तुका म्हणे तो परिसाहूनि आगळा ।
काय महिमा वर्णूं त्याची ॥ ४ ॥

पाठभेद—च० २...झाला तोचि एक । मोक्ष तेणें इ०

च० ३ आनंद तया–तयां.

अर्थ—जर आशा, अहंकार, समूळ जातील तर त्या माणसाचें शरीर म्हणजे चिंतामणीसारखें. मग त्याच्यापाशीं निंदा, हिंसा, कपट, देहबुद्धि हीं नाहींशीं होऊन तो स्फटिकासारखा स्वच्छ होतो. मोक्ष देणारें तीर्थ जें वाराणसी त्याचीही मग जरूर रहात नाहीं. सगळे लोक मुक्त होण्यास त्याचे कडेच येतात. त्याच्या दर्शनानेंच मोक्ष होतो. ज्याचें मन शुद्ध त्याला माळा कशाला हव्यात ? शुद्ध मन हें सगळ्या भूषणांना भूषण होतें. जे नेहमीं हरीच्या गुणांनीं गर्जतात त्यांच्या मनांत आनंद नांदतो. ज्यांचें तन मन धन पुरुषोत्तमाला दिलें, ज्यांना कशाचीही आशा घरिली नाहीं, ते घुरुष परिसापेक्षां थोर. त्यांचा महिमा मी काय वर्णूं ?

चर्चा—च० ३ मंडित सकळा भूषणांसी.

१ ' भूषणासीं ' = भूषणांहीं, भूषणांनीं असा अर्थ करून, ' ज्याचें मन शुद्ध त्याला इतर भूषणें नसलीं तरी तो सर्व भूषणांनीं भूषित झाला आहे असेंच समजावें. ' असा अर्थ करावा.

(२) तो इतर भूषणांना भूषणभूत होतो.

शब्द--आगळा–थोर, श्रेष्ठ.

लक्ष्यप्रयोग---' येती तयापासीं अवघीं जनें '

शैली—अनन्यभक्ति. प्रौढपणींचा. छंद विचार करण्यासारखा आहे.

२९

आहे तें सकळ कृष्णासी अर्पण.।
न कळतां मन दुजें भावी ॥ १ ॥
म्हणऊनी पाठी लागतील भुतें ।
येती गवसीत पांच जणें ॥ २ ॥
ज्याचें त्या वंचलें आठव न होतां ।
दंड या निमित्ता कारणें हा ॥ ३ ॥
तुका म्हणे काळें चेपियेला गळा ।
मी मी वेळोवेळां करितसे ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ गवसीत--गिंवसीत.

च० ४ चेंपियेला चेपियेला.

अर्थ—जें आहे तें सारें कृष्णालाच अर्पण. अज्ञानामुळें मनाला परकीपणा—द्वैतभाव-वाटतो. आणि असा द्वैतभाव वाटावयाला लागल्यामुळेंच पंचमहाभूतें पाठीस लागतात—पंचमहाभूतात्मक देहाची उपाधि पाठीस लागते,—देहबुद्धि उत्पन्न होते. म्हणूनच पांच महाभूतांचा झालेला देह पाठीस लागतो, पुनः पुनः देहधारण करावा लागतो, जन्म—मरणाचा फेरा पाठीस लागतो. ३ म्हणूनच जग आणि जगांतील चराचर विषय पाठीस लागतात; मी निराळा, तूं निराळा, तो निराळा, असे जगांतील अनंत विषय निराळेपणानें गोचर होतात. आणि पंचेंद्रियें शोधीत येतात. प्राणी पंचेंद्रियांच्या ताब्यांत जातो. हें अज्ञान नसतें तर हे सारेंच कृष्णार्पण होतें. ज्याचें त्यालाच आपल्या खऱ्या स्वरूपाचें स्मरण न राहिल्यामुळें तो (जीव) आपल्या स्वरूपाला मुकला. त्याला आपल्या खऱ्या स्वरूपाची ओळख राहिली नाहीं. व त्यामुळें हा जन्ममरणाच्या फेऱ्याचा दंड (तो) जीव पुन्हा पुन्हा भोगतो. यमानें गळा चेपला तरी मी मी म्हणतोच आहे. देहबुद्धि सुटत नाहीं.

हाच अभंग ता. २९ एप्रिल १९१० रोजीं पुन्हा वाचला त्या वेळचें टिपण.

१ जें काय आहे तें सारें कृष्णालाच वाहिलेलें आहे, कृष्णाचें आहे. असें असतांना तें कृष्णाचें नव्हे, दुसऱ्याचें आहे, माझें आहे, अशी भावना मन करितें, ती न कळतां, अज्ञानामुळें. २ अशी 'भावना होते' म्हणूनच पंचेंद्रियें हीं भुतें

पाठीस लागतील. सगळीं अशा माणसाचा शोध करीत येतील. ३ खऱ्या प्रकाराचें विस्मरण होऊन, ज्याचें, कृष्णाचें जें, तें त्याला दिलें नाहीं या कारणानें हा दंड होय. पंचेंद्रियें व त्यांचे विषय यांपुढें मनुष्याला मान वांकवावी लागते ही शिक्षा त्यामुळें होते. ४ तु. म्ह. बाबा, मी मी करतो आहेस तो तुझा गळा काळानें दाबिला आहे म्हणून कीं काय ? मं. ठ.

चर्चा--च० २ वर दिलेल्या तीन अर्थांपैकीं घ्यावयाचा कोणता ? दुसरा घेण्यास मन तयार नाहीं. कारण, जन्ममरणाला भिणारांपैकीं तुका नव्हता. " गर्भवासीं, सुखें घालावें आम्हांसीं " असें म्हणणारांपैकीं तो. म्हणून हा अर्थ बरा वाटत नाहीं. तिसऱ्यांत पूर्णाद्वैत ध्वनित होतें. व तें तसें अभिप्रेत आहे असें म्हणण्यास पहिला चरण आड येतो. आहे हें सगळें कृष्णाला अर्पण केलें आहे असें पहिल्या चरणांत म्हटलें आहे. कृष्णच आहे असें म्हटलें नाहीं. म्हणजे येथें अद्वैत नाहीं, स्वात्मार्पणभाव आहे. एकंदरींत तिसरा अर्थही गौणच. म्हणून पहिलाच अर्थ बरा वाटतो. (वा. ब. प.)

पहिला अर्थ सोपा, सरळ, आहे म्हणून तो घेणें एकंदरींत जास्त बरें. तुकारामाला गर्भवास नकोसा नव्हता म्हणून त्यानें कित्येक वेळां जन्ममरणाच्या फेऱ्याबद्दल वैतागाचे उद्गार काढलेच नसतील असें कसें म्हणतां येईल ?--शिवाय तुकारामाला गर्भवास प्रिय कधीं वाटूं लागला ? तो तसा वाटूं लागण्याइतकी मनाची त्याची उन्नति एकदमच झाली होती कीं काय, किंवा ती हळूहळू झाली? ती क्रमानेंच झाली असें मानिलें -व तेंच बरोबर आहे--तर ती होत असतां अगर होण्यापूर्वी जन्ममरणाच्या फेऱ्याविरूद्ध त्याचे उद्गार निघालेही असतील. पण याहीपेक्षां आणखी एका निराळ्याच दिशेनें आपण विचार केला पाहिजे तो असा.

तुकारामाचे अभंग म्हणजे एकाद्या वेदांत्यानें पद्धतशीर लिहिलेलें वेदांतावरलें प्रमाणबद्ध पुस्तक नव्हे. तें तसें असतें तर मग त्यांत सुसंबद्धपणा असावाच असें म्हणावयाला जागा राहिली असती. निरनिराळ्या वेळीं, निरनिराळ्या प्रसंगांनीं मनांत उत्पन्न झालेल्या विचारविकारांच्या छटा अभंगांत आहेत. किंबहुना अशा छटा म्हणजेच अभंग. त्यांत इकडे तिकडे थोडासा विसंगतपणा असला म्हणून बिघडलें काय ! उलट, तसा विसंगतपणा नसेल

तर मात्र अभंगांचा अभंगपणा गेला असें म्हणण्याचा प्रसंग यावयाचा.. (संपादक).

शब्द--भावी-भावना धरितें (मन), **पांचजणें**-१ पंचमहाभूतें, २ पंचभूतात्मक देह, **वंचिलें**-ज्यांचा त्यांनीं घात करून घेतला,कां तर, आठवण नाहीं म्हणून. अभंग २८७८ (शं. पां. प्रत. पहा,) गिंडे.

शेरा--अहंकार नको. सगळें कृष्णाचेंच आहे. त्यालाच अर्पण करावें; अशा अभिप्रायाचा अभंग; प्रौढपणीचा. वा. व. प.

३०

महारासी शिवे ।
कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥ १ ॥
तया प्रायश्चित्त कांहीं ।
देहत्याग करितां नाहीं ॥ २ ॥
नातळे चांडाळ ।
त्याचा अंतरीं विटाळ ॥ ३ ॥
ज्याचा संग चित्तीं ।
तुका म्हणे तो त्या याती ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ कोपे—कोपें.

च० ३ त्याच्या—त्याचा.

अर्थ—१ महाराला शिवतो, महाराचा स्पर्श होतो व तेवढ्यानें रागावतो तो खरा ब्राह्मण नव्हे. अशा ब्राह्मणानें विटाळाचें पाप घालविण्यास कितीही प्रायश्चित्तें केलीं, देहांत प्रायश्चितहि घेतलें तरीहि तो पावन होत नाहीं. चांडाळ न शिवे, शिवत नाहीं; (अर्थातच, बाहेरून) त्याचा खरा विटाळ अंतरांत मनाला आहे.—महार चांडाळ प्रत्यक्ष शिवला नाहीं तरी प्रत्यक्ष कोपाच्या रूपानें त्याचा विटाळ मनाला राहतोच. कोप हाच म्हार, किंवा ' महार ' म्हणजे महारजातीचा माणूस अर्थ घेतला, तर एकंदरींत अर्थ जरासा अध्यात्मिक करावा तो असा--महाराचा बाहेरून जरी स्पर्श नाहीं,

तरी तो महार, मी ब्राह्मण, असा विचार मनांत आला कीं मनाला महाराचा विटाळ झालाच. तो धुणार कसा ? तुकोबा म्हणतात, ज्याचें चिंतन मनांत तींच याती जनांत व्हावयाची. मनांत महार आला कीं हा महारच. मनांत भंगी आला कीं हाही मनानें भंगीच. मनांत ज्या भावाचा संग त्या जाती-चाच तो व्हावयाचा. मनांत प्रेम, भक्ति, या भावना आल्या कीं हा प्रेम-मय, भक्तिमय झाला. मनांत हीन भावना आल्या कीं, हा हीन झाला.

चर्चा—१ अभंग लौकिक अनुभवांतल्या एखाद्या प्रसंगाला अनुलक्षून लिहिला आहे, किंवा अशा एखाद्या प्रसंगामुळें सुचलेला आहे अशी कल्पना केली तर तो प्रसंग अशा प्रकारचा असावा—एखादा ब्राह्मण, समजा गांवचा कुळकर्णी, कामाच्या निमित्तानें वेसकरावर रागावला व त्याला शिक्षा करण्या-करितां त्याच्या अंगावर धांवून गेला. अशा प्रसंगानें तुकाराम म्हणतात—जो ब्राह्मण रागावतो व महाराला शिवतो, किंवा रागानें (कोपें) महाराला शिवतो तो ब्राह्मण नव्हे.

किंवा अध्यात्मिक रीतीनें अर्थ लाविला तर, जो ब्राह्मण रागावतो म्हणजे रागरूपी महाराला शिवतो तो आपल्या ब्राह्मण्याला मुकला—असा अर्थ करावा.

च० २ अशा माणसाला प्रायश्चित्त नाहीं. लौकिकांतल्या महाराचा विटाळ कदाचित् लौकिक प्रायश्चित्तानें जाईल. पण कोप हा महारच; आणि त्याचा विटाळ अंतराला, मनाला, होतो तो जाणार कसा ?

च० ३ तो चांडाळ (कोपरूपी) आकळत नाहीं. त्याचें आकलन निर्दा-लन करितां येत नाहीं. कारण त्याचा विटाळ मनाला झालेला असतो. (आध्यात्मिक).

किंवा ज्याला कोप येतो त्याच्या अंतरीं विटाळ असतो, म्हणून त्याचें शमन, आकलन, शुद्धीकरण करतां येत नाहीं, अर्थांतच, बाह्य प्रायश्चित्तानें त्याची शुद्धि होत नाहीं असा भाव (लौकिक).

शब्द—नातळे-आकलन करणें किंवा ताब्यांत आणणें अशा अर्थीं, आकळणें किंवा आतळणें असे दोन्ही शब्द सांपडतात.

शेरा—शेवटच्या चरणाची घाटणी, व एकंदरींतच अभंगांतील विचार-सरणी पाहिली म्हणजे अभंग प्रौढपणांतला आहे असें वाटतें.

३१

तेलणीशीं रुसला वेडा ।
रागें कोरडा खातो भिडा ॥ १ ॥
नाडिलें लोकां टाकिला गोहो ।
बोडिलें डोकें सांडिला मोहो ॥ २ ॥
आपुलें हित आपण पाहीं ।
संकोच तो न धरी कांहीं ॥ ३ ॥
शेजारणीच्या गेली रागें ।
कुतऱ्यांनीं घर भरिलें मागें ॥ ४ ॥
पिसारागें भाजिलें घर ।
नागविलें तें नेणें फार ॥
तुका म्हणे वांच्या रागें ।
फोडिलें सावलें देखिलें जगें ॥ ५ ॥

पाठभेद--च० २ नाडिलें–नावडे.

च. ६ वांच्या–यांच्या.

,, ,, सोवळें सावलें. (तुकाराम तात्यांची प्रत.)

अर्थ--देवाच्या भजनानें देव पावला नाहीं म्हणून रुसून काय होतें अशा आशयाचा अभंग असावा. तो तसा धरल्यास दुसरा चरण मुख्य होईल.—

कोणी एक माणूस तेलणीवर रागावला, रुसला, आणि मग तेल कसें मागावें, घ्यावें, या भिडेनें रागानें त्यानें आपली भाकरी कोरडीच खाल्ली.

वेडा ! रागावलास तेलणीवर आणि रागानें, भिडेनें कोरडें खातोस त्याचें तेलणीला काय ? तेव्हां आपलें हित आपण पाहिलें पाहिजे. उगाच संकोच घरून आपली कोणी दाद घेत नाहीं. दुसरा आपलें ऐकत नाहीं, आपलें हित करीत नाहीं म्हणून त्याच्यावर रागावून काय होतें ? एक बाई होती, तिला लोकांनीं त्रासविलें म्हणून ती लोकांवर रागावली. आणि तिनें नवरा सोडिला, डोकें बोडलें, घराचा, संसाराचा मोह सांडला आणि घरांतून उठून गेली. यांत झालें काय ? जगाला तमाशा मात्र दिसला. शेजाऱ्यांवर रागावली

आणि घर उघडें टाकून चालती झाली आणि मागें कुत्र्यांनीं घर घाण केलें; यांत नुकसान कोणाचें ?

तशीच, कोणी एक बाई घरांत पिसवा झाल्या म्हणून त्यांच्यावर रागावली आणि त्यांच्या त्रासानें तिनें घर पेटवलें, यांत पिसवांचें गेलें काय ? लुगड्यांत उवा झाल्या म्हणून लुगडें फेडून टाकिलें—झालें काय ? उवा गेल्या थोडयाच. ही मात्र लोकांना नागडी उघडी पहावयाला सांपडली. सारांश, अशी डोक्यांत राख घालून उपयोग नाहीं. स्वतांचें हित स्वतांच पाहिलें पाहिजे. दम काढिला पाहिजे आणि चिकाटी सोडतां कामा नये.

चर्चा—च० १ भिडा—भिडेनें, लाजेनें, तेलणीवर रागावल्यानंतर आतां तिच्याकडून तेल कसें मागावें, किंवा घ्यावें अशा प्रकारच्या संकोचामुळें. तेलणीच्या भिडेमुळें. पाहा, धरी असे पाट शुद्ध करून घ्यावे.

च० २ नाडिलें. (नावडे असाही पाठ आहे.) लोकां=लोकांनीं नाडिलें किंवा फसविलें, म्हणून लोकांच्या त्रासानें नवरा टाकला.

(२) नावडे " असा पाठ घेतला तर—लोकांना नवरा आवडेना, लोक त्याची टर करून चिडवावयाला लागले म्हणून,—असा अर्थ करावा. लोकांना नवरा आवडला नाहीं, म्हणून बायका सहसा उठून जात नाहींत, म्हणूनच जर एकादी गेली तर ती वेडी !

शब्द—**गोहो**—नवरा; घो असें कोंकणात म्हणतात. **सावलें**—लुगडें. **वांच्या**—उवांच्या ('यांच्या' असा पाठ आहे तो अगदींच अशुद्ध वाटता.)

लक्ष्यप्रयोग—नाडिलें लोकां=लोकांनीं.

शेरा—सडेतोडपणानें, नेहमींच्या व्यवहारांतले, व श्रोत्यांना पटतील असे अगदीं ग्राम्य देखील दृष्टांत देऊन आशय मनांत ठसविण्याची तुकारामांची पद्धत या अभंगांत उत्कृष्ट रीतीनें दिसते. एखाद्या, व्यावहारिक, सामान्य माणसाच्या तोंडांत जी भाषा ग्राम्य, त्याज्य वाटली असती ती तुकारामांच्या अभंगांन तशी वाटत नाहीं. त्यांच्या संगतीनें तीही शोभून जाते, यापेक्षां दुसरें काय म्हणावयाचें ?

३२.

मज दास करी त्यांचा ।
संतदासांच्या दासांचा ॥ १ ॥
मग होत कल्पेयरी ।
सुखें गर्भवास हरी ॥ २ ॥
नीच वृत्ति काम ।
परी मुखीं तुझें नाम ॥ ३ ॥
तुका म्हणे सेवे ।
माझे संकल्प वेचावे ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—साधुसंगतीचा महिमा गात असतांना तुकाराम म्हणतात—संतांचे जे दास आहेत, त्यांचे चेले, नोकरचाकर, त्यांच्या दासांचा दास जरी मला केलेंस तरी मला चालेल.

तसें केल्यावर मग कल्पाचे कल्प जरी गर्भवास घडला तरी सुखानें घडो. वाटेल तितकें हलकें काम करीत असलों तरी एक गोष्ट पाहिजे. तुझें नांव मुखीं पाहिजे म्हणजे तें हलकें कामही चालेल. माझें सगळे संकल्प, मनोरथ, हे सगळे त्या संतदासांच्या सेवेला आणि त्या द्वारानें परमेश्वराच्या सेवेला खर्च व्हावे एवढीच माझी इच्छा आहे.

चर्चा—च० ३ नीच वृत्ति काम—उपजीविकेचें साधन हलकें, आणि इतर व्यवसायही हलके असले तरी मला चालतील.

वृत्ति = उपजीविकेचा व्यवसाय.

काम = इतर कामधाम.

शब्द—**होत**—होवोत, होऊत, होत, होऊं देत, झाले तरी चालतील. **वेचावे**-वेचणें-खर्च करणें, वेचन.

शेरा—संत-समागमाची उत्कृष्ट इच्छा.

३३.

सदा तळमळ ।
चित्ताचिये हळहळ ॥ १ ॥
त्याचें दर्शन न व्हावें ।
शव असतां तो जिवें ॥ २ ॥
कुशब्दाची घाणी ।
अमंगळविली वाणी ॥ ३ ॥
नेणे शब्द पर ।
तुका म्हणे परउपकार ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ जिवें–जिवे.

च० ४ नेणें–नेणें. परउपकार–उपकार.

अर्थ—अभंग दुर्बोध आहे.

ज्याच्या चित्ताची नेहमीं तळमळ चालते, जो नेहमीं मनांत हळहळत असतो, ज्याला समाधान नाहीं अशा माणसाचें दर्शन देखील नको. तो जिवंत असून मेल्यासारखाच. त्यानें कुशब्दाच्या घाणीनें–हळहळीचे, दुःखाचे, शब्द तोंडानें काढून, तोंड अमंगळ केलें इतकेंच. त्याला हळहळीखेरीज, असमाधानाखेरीज, दुसरा शब्दच माहीत नाहीं. तो परोपकार जाणत नाहीं (अर्थातच त्याला त्याचें समाधान नाहीं).

किंवा,

अभंग तुकारामांनीं स्वतःला उद्देशूनच लिहिला आहे असें धरून शेवटचा चरण मुख्य कल्पावा म्हणजे अर्थ असा होईल.—

ज्याच्या चित्ताला कधीं समाधान नाहीं...अशाचें दर्शन नको-तो जिवंत असूनही प्रेतच. पण नको. मीं असले कुशब्द वापरून आपली वाणी अमंगळ मात्र केली; आपल्याला दुसरा शब्द नको, दुसरें कांहीं मी जाणत नाहीं. एकच जाणतों; वें तें म्हणजे परोपकार.

चर्चा—च० १ चित्ताचिये हळहळ.

3293

चित्ताची हळहळ. अभंग वाचतांना, किंवा म्हणतांना 'ये' 'ही.' असे पादपूराणार्थ शब्द येतातच.

च० २ 'जिवे' असा पाठ शुद्ध दिसत नाहीं.

च० ४ नेणे नेणें-पहिला पाठ पहिल्या अर्थाशीं सुसंगत आहे व दुसरा दुसऱ्या बरोबर घ्यावा.

किंवा.

च० २ हा मुख्य धरून व बाकीचे चरण त्याला बाकीचे विशेषणासारखे समजून अर्थ करावा. "ज्याच्या चित्ताला समाधान नाहीं.....त्याचें दर्शन नको.

३४

जया नाहीं नेम एकादशीव्रत ।
जाणावें तें प्रेत शव लोकीं ॥ १ ॥
त्याचे दिवस नित्य काळ लेखिताहे ।
रागें दांत खाये करकरां ॥ २ ॥
जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन ।
नाहीं तें स्मशान गृह जाणा ॥ ३ ॥
जये कुळीं नाहीं एकही वैष्णव ।
त्याचा बुडे भवनदीतापा ॥ ४ ॥
विठोबाचें नाम न उच्चारी जें तोंड ।
प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ॥ ५ ॥
तुका म्हणे त्याचे काष्ठ हातपाय ।
कीर्तना नव जाय हरिचिया ॥ ६ ॥

पाठभेद—नव जाय–न वजाय.

अर्थ—ज्याला एकादशीव्रत नाहीं, जो एकादशी करीत नाहीं तो मेला आहे असें समजावें. त्याचे दिवस मृत्यु मोजीत आहे आणि रागानें करकरां दांत खातो आहे. ज्याच्या घरीं दारीं तुळसीवृंदावन नाहीं तें घर

स्मशान समजावें. ज्याच्या कुळांत एकही विष्णुभक्त, वैष्णव नाहीं त्याचा भव-नदी उतरून जाण्याचा तापा, तराफा बुडाला असें समजा. ज्याच्या तोंडून विठोबाचें नांव निघत नाहीं, त्याचें तोंड म्हणजे चांभाराचें कुंडच. जो हरीच्या कीर्तनाला जात नाहीं त्याचे हात-पाय काष्ठवत् होत.

चर्चा—नव जाय असा पाठ बरा दिसतो नव = नैंव किंवा न हो.

शब्द तापा = ताफा, तराफा, नदी उतरून जाण्याकरितां केलेली सांगड.

शेरा—लौकिक मूर्तिपूजेचा पगडा मनावर होता त्या काळचा, तरुण-पणींचा असावा असें वाटतें. (संपादक).

३५

आम्ही सदैव सुडके । जवळी येतां चोर धाके ।
जाऊं पुडी भिके । कुतरीं घर राखती ॥ १ ॥
नांदणूक ऐसी सांगा । नाहीं तरी वांयां भागा ।
थोरपण आंगा । तरी ऐसें आणावें ॥ २ ॥
अक्षय साचार । केलें सायासांनीं घर ।
एरंड सिंहार । दुजा भार न साहती ॥ ३ ॥
धन कण घरोघरीं । पोटभरे भिकेवरी ।
जतन तीं करी । कोण गुरें वासरें ॥ ४ ॥
जाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण माती ।
झळझाळित भिंती । वृंदावनें तुळसीचीं ॥५॥
तुका म्हणे देवा । अवघा निरसाविला हेवा ।
कुटुंबाची सेवा । तोचि करी आमुच्या ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—हरिभक्तांची लौकिक वैभवाविषयीं अनासक्ति वर्णन करीत असतां तुकाराम म्हणतात—आम्हीं नेहमीं भुकेबंगाल दरिद्री. आम्हांला कांहीं चोरांची भीति नाहीं. उलट चोरच जवळ आला तर आम्हांला भिईल. भिक्षावृत्तीनें पुडीला जाऊन पोट भरतों, उलट, कुतरीं आहेत—म्हणजे कुत्र्याच्या वृत्तीचीं

माणसें आहेत तों घरादाराची राखण करीत वसतात. हरिभक्तहो, खरी नांदणूक अशी असावयाला पाहिजे. ती आहे का सांगा, नाहीं तर तुम्ही फुकट भागतां, यातायात करितां,असें मी म्हणेन. थोरपण अंगीं आणावयाचें असेल तर तें असें आणावें. आमचें घर पहा. त्याला कधीं मोडण्या तोडण्याची भीति नाहीं. मोठ्या प्रयासांनीं आम्हीं तें घर कायम टिकेल असें केलें आहे. त्याला शिंवार एरंडाचें घातलें आहे. एरंडच ते; त्यांना दुसरें कसलें ओझें सहन होणार ? त्यांना वैभवाचा भार कसा झेंपेल ? त्यांच्या शिंवारानें आमची दौलत तेवढी सुरक्षित रहावयाची. आणि ती तरी काय आहे ? कण कण घरोघर मागून पोट भरतें, मग गुरें वासरें संभाळण्याची खटपट कोण करितो ? तेव्हां आतां आम्हांला कांहीं काळजी नाहीं. शेणमाती हें आमचें भांडवल. मातीच्या झळझळीत भिंती, बाहेर तुळशीचीं वृंदावनें हें आमचें सर्वस्व. इतर सगळा हव्यास देवाला वाहिला आहे, त्याच्याकडे त्याचा निरवाळा केला आहे. तोच आमच्या कुटुंबाची चाकरी करितो.

चर्चा—च० १ कुतरीं घर राखतीं—कुणाचें, जेथें जायचें तें, किंवा कुतरीं म्हणजे कुत्र्याच्या वृत्तीचीं माणसें असा अर्थ करावयाचा ? तशीं असतील तीं घर राखीत बसतात. आमच्या सारख्या सुडक्यांना घराची काय पर्वा ?

च० ३ दुजा भार=अर्थातच वैभवाचा.

च० ४ धन कण=धान्यकण.

निरविला--निरसला, त्याच्याकडे सोंपविला.

देवा=देवाला, देवाकडे.

३६.

पराविया नारी माउली समान ।
मानिलिया धन काय वेचे ॥ २ ॥
न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष ।
काय तुमचें यास वेचे सांगा ॥ २ ॥

बैसलिये ठायीं म्हणतां रामराम ।
काय होय श्रम ऐसें सांगा ॥ ३ ॥
संतांचे वचनीं मानितां विश्वास ।
काय तुमचें यास वेचे सांगा ॥ ४ ॥
खरें बोलतां कोण लागती सायास
काय वेचे यास तुमचें सांगा ॥ ५ ॥
तुका म्हणे देव जोडे याच साठीं ।
आणिक ते आटी न लगे कांहीं ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—परक्या बायका आईसारख्या मानिल्यास तुमचें काय वेचतें ? दुसऱ्याची निंदा, दुसऱ्याच्या धनाचा अभिलाष न केलात तर तुमचें काय खर्च होतें ? बसल्या ठिकाणीं ' राम ' ' राम ' म्हटलेंत तर त्यांत तुम्हांला काय श्रम होणार आहेत बोला ! साधुसंतांच्या बोलण्यावर विश्वास ठेविलात तर तुमचें काय जातें ? खरें बोलायला काय श्रम पडतात, काय खार लागतो बोला, तुका म्हणे, याच गुणांनीं देव जोडतो, देव जोडायला आणखी कांहीं आटाआट करावी लागत नाहीं.

चर्चा—च० ६ याच साटीं=याचाच मोबदला, एवढी (सत्यवचन) किंमत दिल्यानें असा अर्थ मंडळींत पुन्हा चर्चा होऊन ठरला ता. ३-८-०६

शब्द—**परवीया**-परक्याची. **सायास**-श्रम. **आटी**-आटाआट, श्रम, धुडणें.

च० २ "परद्रव्य अभिलाष न करितां...यास काय वेचे"—या प्रयोगांत यास म्हणजे पूर्वीच्या वाक्यांत जी गोष्ट सांगितली तिला उद्देशून असा अर्थ.

याचप्रमाणें च० ३, ४, ५ मधील प्रयोग.

शेरा—भक्ति, वैराग्य अंगांत पुरें बाणलें व देवभजनापेक्षां सदाचरणांत धर्माचें रहस्य आहे असें वाटावयाला लागलें अशा काळांतील, प्रौढपणीचा, आहे असें वाटतें.

संपादक.

३७

शुद्ध बीजा पोटीं ।
फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥
मुखीं अमृताची वाणी ।
देह देवाचे कारणीं ॥ २ ॥
सर्वांगीं निर्मळ ।
चित्त जैसें गंगाजळ ॥ ३ ॥
तुका म्हणे जाती ।
ताप दर्शनें विश्रांती ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत

अर्थ—बीज शुद्ध असलें म्हणजे त्याचे पोटीं फळेंही रसाळ आणि सुरेख येतात. याच न्यायानें, माणसानें जर नेहमीं तोंडीं अमृतासारखी वाणी ठेविली आणि देह देवाकारणीं लाविला तर काय नाहीं होणार ? त्याला चांगलीं फळें आलींच पाहिजेत. अंतर्बाह्य निर्मळ असणाऱ्याला गोड फळांना काय कमी ? शरीर निर्मळ तसेंच मन निर्मळ असला माणूस म्हणजे प्रत्यक्ष देव. त्याचें दर्शन घेतांच ताप नाहींसे होतात व मनाला विश्रांती मिळते, समाधान प्राप्त होतें.

शब्द—गोमटीं-सुरेख, चांगलीं.

शेरा—प्रौढपणींचा.

३८

चित्त समाधानें ।
तरी विष वाटे सोनें ॥ १ ॥
बहु खोटा अतिशय ।
जाणा भले सांगों काय ॥ २ ॥

मनाच्या तळमळें ।
चंदनेंही अंग पोळे ॥ ३ ॥
तुका म्हणे दुजा ।
उपचार पीडा पूजा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत

अर्थ—चित्त समाधानानें असेल तर सोनें विष्टेसारखें वाटतें. त्याचा लोभ वाटत नाहीं. अतिशय--अतिलोभ--हा फार खोटा हें आपण भले लोक जाणतांच आहां, मी काय सांगावें ? मनाला तळमळ असली म्हणजे अंगाला चंदन लाविल्यानेंहि आग होते. तुकोबा ह्मणतात—याला दुसरे तिसरे कांहीं उपचार नकोत. पूजा उपचार म्हणजे पीडा; समाधान हाच खरा उपचार. दुसरी कांहीं उपचार केले, किंवा लोकांत कांहीं मानमान्यता झाली तरी ती कष्टदायक होते.

चर्चा—च० १ चित्त समाधानें (असे) तरी सोनें असा प्रयोग घ्यावा.
च० ३ तळमळें--तळमळे=तळमळीनें असा पाठ जास्त बरा वाटतो.

शब्द—अतिशय-अत्यासक्ति, हावरेपणा. **पूजा**-मान्यता, लोकांत होणारी मान्यता ही पीडाच, ही कष्टदायी. **दुजा**-समाधानाखेरीज इतर उपचार.

शेरा—लौकिक मोठेपणा खोटा--खरें समाधान मनाचें, असा आशय. लौकिक मोठेपणाचा तिटकारा तुकारामबुवांनीं अनेक प्रसंगीं व्यक्त केला आहे.

३९

परिमल म्हूण चोळूं नये फूल ।
खाऊं नये मूल आवडतें ॥ १ ॥
काय एक नव्हे धरितां अंतरीं ।
कासवीचे परी वेळोवेळां ॥ २ ॥
मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद ।
यंत्र भेदुनी नाद पाहूं नये ॥ ३ ॥
कर्मफळ म्हणुनी इच्छूं नये काम ।
तुका म्हणे वर्म दावूं लोकां ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ हा चरण पंढरपूरच्या पोथींत अधिक आहे.

अर्थ—परिमळ येत असला म्हणून फूल चोळूं नये. आवडतें म्हणून मूल खाऊं नये. कासवीप्रमाणें अंतरीं, अंतरावर धरूनच काय नाहीं होणार? कासवी पिलांना पाजीत नाहीं. त्यांना दूर धरून नुसती त्यांकडे पहात बसते तेवढ्यानेंच त्यांचें पोषण होतें. ३ मोत्यांचें पाणी मनोहर असलें म्हणून चाखून पाहूं नये. गोड वाद्य असलें म्हणून फोडून नाद पाहूं नये, माझ्या कर्मांचें (चांगल्या) फळ मला मिळालें पाहिजे, किंवा तें मिळणारच या भावनेनें काम, म्हणजे कामनेचे विषय जे असतील ते, आपण होऊन जवळ करूं नये, त्यांच्या ठिकाणीं आसक्ति ठेवूं नये. तुकोबा म्हणतात—आम्ही लोकांना हें वर्म (आचरणाचें) सांगतों कीं कर्मांचें फळ म्हणून कामनेचे विषय जवळ करावयाचे असा प्रकार करूं नये.

चर्चा—च० २. 'अंतरीं' याचा अर्थ 'मनांत' असा करून मनांत प्रेम असल्यावर काय होणार नाहीं? कासवीला पिलांना पाजावें लागत नाहीं. तिच्या मनांतील उत्कट प्रेमामुळें जरी तिनें पिलांकडे पाहिलें तरी त्यांचें पोषण होतें.

काय एक नव्हे—असें काय आहे कीं तें होणार नाहीं?

शब्द—म्हण-म्हणून **यंत्र**-वाद्य. **काम**-कामनेचे विषय.

शेरा—रा. माडगांवकरांनीं शंका काढिल्यावरून या सर्व अभंगाचा संदर्भ देवाकडे लावावा असें ठरलें—देव कृपाळू म्हणुन त्याचा अंत पाहूं नये. त्यानें आपल्याला नुसतें अंतरीं ठेविलें, आपली आठवण ठेविली, तरी देखील तेवढ्यानेंच होणार नाहीं असें काय आहे! (वा० व. प०)

"हा अभंग अगदींच स्फुट आहे कीं यांचें परमेश्वर भक्तीकडे पर्यवसान आहे?" अशी शंका पहिल्या वाचनाचे वेळीच उपस्थित झाली होती असें टिपणांच्या मूळ प्रतीवरून दिसतें. पुढें माडगांवकरांनीं पुन्हा वाद काढिल्यावरून अभंगाचा अर्थ एका विशेष प्रकारानेंच लावण्याचें मंडळींत ठरलेलें दिसतें. (संपादक)

४०

माया तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया ।
अंग आणि छाया तयापरी ॥ १ ॥
तोडितां न तुटे सारितां निराळी ।
लोटांगणातळीं हारपते ॥ २ ॥
दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं ।
आणीक ते आटी विचाराची ॥ ३ ॥
तुका म्हणे उंच वाटे उंचपणें ।
ठेंगणी लवणें जैसी तैसी ॥ ४ ॥

पाठभेद--च० ४ ठेंगणी-ठेंगणीं,
जैसी तैसी--जैसीं, तैसीं,

या शब्दांत 'णी' वर अनुस्वार नको असें मंडळींत ठरलें. गणपत कृष्णाजींत हा पाठ आहे.

अर्थ--माया तेंच ब्रह्म व ब्रह्म तीच माया; अंग आणि छाया यांच्या प्रमाणें एक आहे तेथें दुसरें आहे. एकाला सोडून दुसरें नाहीं. माया ब्रह्मापासून तोडायला लागलें तर तुटत नाहीं. ती दूर सारण्यासाठीं वांकलें, ओणवें झालें तर लोटांगणाखालींच नाहींशी होते; दडते; लपते. ३ जिथें द्वैत नाहीं, माया आणि ब्रह्म हीं जर निराळीं नव्हेतच, तर, तिथें बळ कशाला, आणि विचाराची आटाआट तरी कशाला ? ती छाया जी आहे ती, अंग उंच असलें किंवा आपण उभे असलों म्हणजे उंच होते. आपण वांकलों (लवणें) म्हणजे ठेंगणी होते. जशी काया असेल तशी छाया.

चर्चा०--च० ३. जेथें निराळेपणा नाहीं तेथें पृथक्भाव उत्पन्न करण्यासाठीं किंवा तो नाहींसा करण्यासाठीं बळ कशाला व विचाराची आटाआट तरी कशाला ?

शब्द--**हारपते**-नाहींशी होते. लपते. **आटी**-आटाआट. **लवणें**-वांकल्यामुळें.

शेरा--वाद करीत बसूं नका. ब्रह्म आणि माया यांचा हा संबंध असाच आहे. विचाराची यातायात कशाळा ? बळ कशाला हवें ? मुख्यार्थावर लक्ष ठेवा. माया कांहीं चुकत नाहीं. प्रातिभासिक खरी. पण ती सत्त

आहे. ती तशी आहे असें जमेस धरूनच मुख्यार्थाचें साधन करावयाचें. उगीच वाद करीत बसण्यांत अर्थ नाहीं. मं. ठ.

४१

दुर्जनासी करी साह्य ।
तोही लाहे दंड हे ॥ १ ॥
शिंदळीच्या कुंटणी वाटा ।
संग खोटा खोट्याचा ॥ २ ॥
येर येरा कांचणी भेटे ।
आगी उठे तेथूनी ॥ ३ ॥
तुका म्हणे कापूं नाकें ।
पुढें आणिकें शिकविती ॥ ४ ॥

पाठभेद—दंड हे लाहे—लाहे दंड हे.

अर्थ—दुष्टाला जो साह्य करितो, त्यालाही दंड होतो. कुंटणी या शिंदळीच्या वाटा. खोट्याची संगत खोटीच असावयाची. ३ एक दोरी दुसऱ्या दोरीला भिडून कांचणी लागली म्हणजे तेथून आगीचा डोंबाळच उठावयाचा. तसेंच, दोन दुष्ट माणसांची गांठ पडली म्हणजे त्यांतून पापाचरण, संकट हींच निघावयाचीं. तुकाराम म्हणतात—असल्या माणसांचीं आपण नाकें कापलीं पाहिजेत. कारण, हीं माणसें आपण वाईट असून थांबत नाहींत. दुसऱ्याला पुढें आपले ढंग शिकवितात.

चर्चा—च० २ शिंदळी या मूळच्या वाईटच, पण त्या अधःपाताच्या मार्गाकडे कुंटणीच्या वाटेनें जातात. त्यामुळें त्यांचा नाश होतो पण त्यांच्याबरोबर कुंटणींचाही होतो.

च० ३. येरयेरां...भेटे. एक दोरी दुसऱ्या दोरीला कांचणी (सारखी) होते म्हणजे घाताला कारण होते. मं० ठ०

रा० माडगांवकरांच्या शंकेवरून अभंगाचें वाचन पुन्हा होऊन मूळांत दिलेला अर्थ पुढें आला. " दोन दोऱ्यांची गांठ पडली व त्या एकमेकींना घांसल्या तर तेथून आग उठते. " असा अर्थ होईल. (वा०व० प०)

यांपैकीं दुसरा अर्थ मला जास्त बरा वाटतो म्हणून तो मी मुख्य धरतों. सं.

शब्द-साह्ये-सहाय. **लाहे**-लाभतो,पावतो. **कांचणी**-घासणें. एक पदार्थ दुसऱ्यावर घांसून त्या ठिकाणीं घट्टा पडतो तें. **आणिकें**-दुसरीं माणसें.-सामान्येनपुंसकम्.मी मुलें शिकाबितों हा लौकिक प्रयोग पहा.

शेरा—स्फुट. दुष्टांची संगत वाईट. अभंगांत आत्मविश्वास आहे. प्रौढपणींचा वाटतो.

४२

वृत्ति भूमी राज्य द्रव्य उपार्जिती ।
जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥ १ ॥
भाडेकरी वाहे पाठीवरी भार ।
अंतरीचें सार लाभ नाहीं ॥ २ ॥
देव पूजेवरी ठेवूनियां मन ।
पाषाणा पाषाण पूजी लोभें ॥ ३ ॥
तुका म्हणे फळ चिंतिती आदरें ।
लाघव हे चार शिंदळीचे ॥ ४ ॥

पाठभेद —-च० ४. आदरें--आदर

वृत्ति, भूमि, द्रव्य, राज्य, वगैरे मिळविण्याची जे इच्छा करितात, त्यांना देव नाहीं, देवाची प्राप्ति नाहीं, असें खात्रीनें समजा. भाडेकरी, भाड्याचा गाढव पाठीवर ओझें वहातो. पण गोणीच्या आंतलें सार त्याला मिळत नाहीं. ३ तसाच देवपूजेच्या निमित्तानें किंवा पूजेच्या साहित्यानें गुंग होऊन जो पूजा करूं पहातो त्याची पूजा म्हणजे एका दगडानें दुसऱ्या दगडाची पुजा केल्यापैकींच प्रकार. ४ सारांश काय, फळाचें आदरानें चिंतन

करितात. असे लोक आणि यांचें वर्तन म्हणजे शिंदळीच्या मायावी चाळ्यांसारखें समजावें.

चर्चा—च० २ ओझ्याच्या जनावराला ओझ्याची उपाधि मात्र होते. भाडोत्री भक्ताला कदाचित् पूजेची दक्षणा, द्रव्य, वृत्ति, हीं मिळतात. कर्माचें लौकिक फळही मिळतें. पण देवपूजेचें खरें सुख जें मनाचें समाधान तें त्याला मिळत नाहीं.

च०—३ देवपूजेवरी मन—१ देवपूजा मनांत आणून, किंवा मनांत आहे असें दाखवून.

(२) पूजेच्या साहित्यावर लक्ष ठेऊन; दुसरा अर्थ गौण— मं० ठ०

शब्द—**वृत्ति**-निर्वाहाचा धंदा, किंवा साधन, शेतवाडी वगैरे. **उपार्जिती**-मिळवितात, संपादन करितात. **निश्चिती**-निःसंशय, खरोखर, खचित. **अंतरीचें**-आंतिल **सार**=मुख्य वस्तु. महत्त्वाचा भाग. **लाघव**-मायावी प्रकार. **चार**-चाळ.

शेरा—बिदागीच्या आशेनें, लाभाच्या आशेनें, भजनपूजन करणाऱ्या दांभिक भक्तांवर कडक टीका आहे. प्रौढपणींचा.

४३

पवित्र सोवळीं। एक तींच भूमंडळीं ॥ १ ॥
ज्यांचा आवडता देव। अखंडित प्रेमभाव ॥ २ ॥
तींच भाग्यवंतें। सरतीं पुरतीं धनवित्तें ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा। त्याचीं केली पावे सेवा ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ त्यांचीं केली पायसेवा (ग. कृ. प्रत)
त्यांची केल्या पावे सेवा (इं. प्र.)

अर्थ—या जगांत, पवित्र आणि सोवळें असें त्यानांच म्हणतां येईल. ज्यांचा देव आवडता आहे, ज्यांची देवाविषयी निष्ठा अभंग आहे, तींच भाग्यवंत, धन वित्तादिकांनीं परिपूर्ण संपन्न, ज्यांना धन वित्तादि गोष्टींत कांहीं

कमी नाहीं अशीं तींच. त्यांची सेवा केली तर तीं देवाला पोचते, किंवा देवाच्या ठिकाणीं रुजू होते

शब्द--सोवळीं-समंगल. **पूज्य**-अमंगळ किंवा टाकाऊ नव्हेत. **सरतीं पुरतीं**—संपन्न, हवें तितकें धनधान्य ज्यांच्या पाशीं आहे अशीं.

लक्ष्यप्रयोग--' सरतीं पुरतीं धनवित्तें; '

त्याचप्रमाणें ज्यांचा देव आवडता तींच (माणसें) पवित्र 'तींच सोवळीं'. असे नपुंसकलिंगी प्रयोगहि लक्ष्य आहेत. अशीं माणसें कोणत्याहि प्रकृतींचीं असोत, पुरुष, स्त्री, कशींहि असोत तीं तुकारामांच्या दृष्टीनें सारखींच- असा आशय.

४४

आशावद्ध जन ।

काय जाणे नारायण ॥ १ ॥
करीं इंद्रियांची सेवा ।
पाहे आवडीचा हेवा ॥ २ ॥
भ्रमलें चावळे ।
तैसें उचित न कळे ॥ ३ ॥
तुका ह्मणे विषें ।
अन्न नाशियेलें जैसे ॥ ४ ॥

पाठभेद— नाहींत.

अर्थ—आशावंत माणूस नारायणाला काय ओळखणार ? तो इंद्रियांची सेवा करतो आणि आवडीचा हेवा—हव्यास- मिळवावयाचें ते पहातो. त्याला नारायण कसला ? भ्रमलें—भ्रम, वेड, लागलेलें माणूस चावळतें, वरळतें, बडबडतें तसेंच हेंही माणूस त्याला योग्यायोग्य कळत नाहीं. जसें विषानें नासलेलें अन्न तसेच हे; विषानें अन्नाचा नास होतो तसाच आशेनें चित्ताचा नाश होतो असा भावार्थ.

चर्चा—च० ३ भ्रमलें चावळे=भ्रम झालेलें वेड लागलेलें माणूस बडबडतें तसें...मं. ठ.

शब्द-भ्रमलें-भ्रमलेलें माणूस. **हेवा**-हव्यास. **चावळे**-बडबडतें.

लक्ष्यप्रयोग—" आशाबद्धजन, काय जाणे नारायण " " आवडीचा हेवा पाहे. "

५०.

ढेकरें जेवण दिसे साचें ।
नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ॥ १ ॥
हेही बोल तेही बोल ।
कोरडे फोल रुचीविण ॥ २ ॥
गव्हाचिया होती परी ।
फकेवरी खाऊं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे असे हातीचें कांकण ।
तयासि दर्पण विल्हाळक ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ " फके वरी खाऊं नये " असा हा शब्द तोडून पाठ बहुतेक ठिकाणीं आहे, तो गौण वाटतो. ' फकेवरी ' म्हणजे नुसते कोरडे फके मारतात त्या प्रकारानें. " वरी " हें अव्यय.

अर्थ—जेवण बरें झालें कीं नाहीं हें समजावयाला कष्ट लागत नाहींत. ढेंकर आली कीं समजावें बरें झालें. कुंथाकुंथ झाली, मुद्दाम कुंथून ढेंकर काढावी लागली कीं समजावें, जेवण कच्चें झालें. २ त्याचप्रमाणें, (अनुभवाचे) तेही बोलच आणि (वरवरचे) तेही बोलच. ज्याला ज्ञानाचा अनुभव, आत्मप्रत्यय, आला असेल त्याचें बोलणें आणि नुसतें वायफळ बोलणें यांत वरवर पहाणाराला तरी फरक दिसत नाहीं. पण कोरडे बोल फुकट आहेत, त्यांना रुचि नाहीं. ३ गव्हांचे पुष्कळ प्रकार होतात. पण उगाच कोरडे बकाणे भरून उपयोग काय ? तुकोबा म्हणतात, हातचें कांकण असेल त्याला आरशाचा काय उपयोग ? त्याला आरसा कशाला ?

डॉ० भांडारकरांनीं सुचविलेला अर्थ. ढेंकर आली म्हणजे जेवण खासें झालें असें दिसतें, नाहीं तर कच्चें, उगाच कुंथाकुंथी. ढेंकर येते तेही बोलच, आणि कुंथाकुंथीचेही बोलच. पण एक अनुभवाचे, अंतरीं धालेल्याचे आणि दुसरे कोरडे, रुचिविण, फोल. गव्हांच्या ज्या अनेक परी होतात त्या चाखाव्या, पण उगाच कोरडे बकाणे भरूं नयेत. अनुभवाच्या परी ध्याव्यात; वरवरचें शब्दावडंबर नसावें. अनुभवाचें तें तेव्हांच दिसतें. त्याला शब्दकथन लागत नाहीं. हातच्या कांकणाला आरसा नको.

चर्चा०— च० १–२. ढेंकरेनें समाधान दिसतें, पण असत नाहीं. तेव्हां ढेंकर व कुंथाकुंथी दोन्ही फुकटच. हेही बोलच व तेहि बोलच. दोन्ही कोरडे, फोल. प्रत्यक्ष रुचि पाहिजे.

च० २ "हेहि बोल. तेही बोल." मला अजून वाटतें कीं सामान्यतः सर्व शाब्दिक पंडितांस उद्देशून तुकारामांनीं हें म्हटलें आहे. सारेच कोरडे बोल. येथून तेथून सारेंच शब्दावडंबर. खऱ्या, जिव्हाळ्याच्या शब्दापोटीं समाधान असतें, तेंच खरें. असा तुकारामांचा आशय दिसतो.

(वा. ब. प.)

ढेंकर दिसते समाधानाची, पण तशी नसेलही. रा. का. वा. मराठे.

च० २ हेही बोल तेही बोल. एक वरवरचे, अननुभवी माणसाचे, दुसरे खरे, अंतरीं धालेल्याचे.—हें सर्व शाब्दिक पंडितांस—साधुसंतांचें खरें सत्त्व आंगीं नसणारांस, नुसत्या शब्दांचाच बखेडा माजविणारांस उद्देशून म्हटलें आहे खऱ्या सत्त्वापोटीं समाधान, शांति, असते तेंच खरें कांकण, त्याला आरसा नको.

च० ४ विल्हाळक=दाखविणारें—दर्शक. असा अर्थ असेल का ?

शब्द—काचें-कच्चें, खरें नव्हे तें, खोटें. **फोल** फुकट. **परी**-प्रकार. **फकेवरी**-फके भरून, फक्यानीं. **विल्हाळक**-दाखविणारें दर्शक.

लक्ष्यप्रयोग—ढेंकरें (पुल्लिंगी).

शेरा—नुसता वाद नको, कांहीं तरी सप्रमाण अर्थ हवा, कांहीं प्रत्यक्ष फळ पाहिजे असा भावार्थ. उगाच तंडणाऱ्या वारकऱ्यांस, किंवा ब्राह्मण भिक्षुकांस उद्देशून हा अभंग असेल का ?

वा. ब. प.

४६

करावी ते पूजा मनेंचि उत्तम
लौकिकाचें काम काय असे ॥ १ ॥
कळावें तयासि कळे अंतरीचें
कारण तें साचें साचा अंगीं ॥ २ ॥
अतिशया अंतीं लाभ किंवा घात
फळ देतें चित्त बीजा ऐसें ॥ ३ ॥
तुका म्हणे जेणें राहे समाधान
ऐसें तें भजन पार पावी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—पूजा मनानेंच करावी, ती तशी केली म्हणजे उत्तम. लौकिकी अवडंबर कशाला पाहिजे? ज्याला (देवाला) कळावयाला हवें त्याला मनातलें, मनांतला भाव समजतो, त्याला लौकिक अवडंबर लागत नाहीं. कारण, जो अंतरीं, मनानें, खरा त्याच्या अंतःकरणांतला हेतु, भाव, खराच असतो. त्याला लौकिक प्रदर्शनाची चाड नाहीं.

अतिशया अंतीं—अति हव्यास केल्यानें—घरीं, दारीं, बाजारीं पूजेचें अवडंबर माजविल्यानें कांहीं उपयोग होईलच असें नाहीं. कदाचित् फायदा होईल, पण एकादे वेळीं घातहि होईल, मनांत जसा भाव असेल तसें फळ मिळेल, कारण बीज तसें फळ. बाह्य अवडंबर हें कदाचित् मनांतल्या उत्कट भक्तीचें दर्शक असूं शकेल व तसें असेल तेव्हां त्यामुळें लाभ होईल; पण घुष्कळदां तें वरोपचाराचें, ढोंगाचेंहि, दर्शक असूं शकेल; अशा वेळीं केवळ वरवरच्या प्रदर्शनामुळें लाभापेक्षां घातच होण्याचा संभव जास्त.

म्हणून तुकाराम म्हणतात—ज्या भजनानें मनाला खरें समाधान होतें तेंच भजन संसारांतून पैलतीराला जावयाला उपयोगीं पडणार व तेंच खरें.

चर्चा च० ३ 'कारण तें साचें साचा अंगीं.'

भक्त स्वतां ज्या ठिकाणीं साचा, किंवा खरा असेल त्याठिकाणीं अंतरींचा भाव हाहि खरा असतो. मं० ठ०

शब्द अतिशय हव्यास, लौकिक देखाव्याची हौस.

४७

एकादशी सोमवार न करिती ।
कोण त्यांची गति होईल नेणों ॥ १ ॥
काय करूं बहु वाटे तळमळ ।
आंधळीं सकळ बहिर्मुख ॥ २ ॥
हरिहरा नाहीं बोटभरी वाती ।
कोण त्यांची गति होईल नेणों ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं नारायणीं प्रीति ।
कोण त्यांची गति होईल नेणों ॥ ४ ॥

पाठभेद— च० १ एकादशी— एकादशीव्रत.

अर्थ—एकादशी सोमवार करीत नाहींत त्यांची गति काय होईल न जाणे. काय करावें ? तळमळ होते मनाची या सगळया लोकांकडे पाहून. सगळीं माणसें आंधळीं, सगळीं बहिर्मुख, ऐहिक विचारांत गढलेलीं, मन नेहमीं बाहेर धावतें अशीं—जगांत गुरफटलेलीं. हरिहरांना बोटभर वात लावीत नाहींत, त्यांची गत काय होणार ? देवाच्या ठिकाणीं प्रीति नाहीं त्यांचें कसें होणार ?

शब्द— **गत**—परिणाम, अखेर. **बहिर्मुख**—तोंड बाहेर असलेलीं, ज्यांचा व्याप, कर्तेपणा, बाहेरच्या दिखाऊ वस्तूंपुरता आहे, ज्यांची दृष्टि अंतरगाकडे वळलेली नाहीं अशीं.

शेरा—शैववैष्णवांविषयीं समबुद्धि असून संसारी लोकांविषयीं अध्यात्मिक अनुकंपा या अभंगांत दिसते. शिवाला भजा, विष्णूला भजा, पण कोणाला तरी भजा. मुळींच कोणी ज्यांच्या गंधींहि नाहीं त्यांना काय करावें ?

४८

नव्हे आराणूक संवसारा हातीं ।
सर्वकाळ चित्तीं हाचि धंदा ॥ १ ॥
देवधर्म सांदीं पडिला सकळ ।
विषयीं गोंधळ गाजतसे ॥ २ ॥
रात्रिदीस न पुरे कुटुंबाचें समाधान ।
दुर्लभ दर्शन ईश्वराचें ॥ ३ ॥
तुका म्हणे आत्महत्या रे घातकी ।
थोर होते चुकी नारायणीं ॥ ४ ॥

पाठभेद च० ४ आत्महत्या रे—आत्महत्यारे

अर्थ—संसाराच्या हातून आराणूक, आराम, विश्रांती मिळावयाची नाहीं. कारण संसार म्हटला म्हणजे तो नेहमींच डोळ्यांपुढें असणार, तो मनापासून दूर होत नाहीं. संसाराला लागलें म्हणजे धर्म सगळा सांदीकोंपऱ्यांत पडला आणि विषयांच्या गोंधळाला जागा झाली. कुटुंब आलें कीं त्याचें समाधान करावयाला रात्रंदिवस पुरत नाहींत, मग देवाचें दर्शन कसें घडणार ? तुकाराम म्हणतात हा संसाराचा धंदा म्हणजे केवळ आत्महत्याच म्हणावयाची. हा मार्ग नाशाचा आहे. व या मार्गाला लागल्यामुळें नारायणाच्या ठिकाणीं, त्याच्यासंबंधानें आपली मोठी चूक होत आहे.

चर्चा—च. १. आराणूक म्हणजे काय ?

आराणूक=१ साधन, आराघना, (२) विश्रांति, समाधान.

नव्हे आराणूक परि मनीं वाहे । ६१०. अवघी झाली आराणूक । ६३२ जावयासी वना । ८०४ या अभंगावरून आराणूक ह्मणजे विश्रांति, समाधान, मनस्वास्थ्य असा अर्थ दिसतो ८ आरमण = आराम.

च० ३. रात्रींदिस हा कर्ता. समाधान (साधण्याला).

च० ४ 'आत्महत्यारे' असा एक शब्द घेऊन संसाराच्या मार्गाला जे लागले ते आत्मघातकी समजावे असा अर्थ करावा.'

शब्द—आराणूक-विश्रांति, समाधान. **सांदीं**—कोपऱ्यांत.

शेरा—संसाराचा पसारा पाहून उद्वेग आल्यावेळचा. तरुणपणचा अभंग. जीव तेव्हांच जिकिरीस येण्याच्या वयांतला. संसार आणि ईश्वरसाधन यांचें समीकरण बसविण्याइतका धीर मनाला आला नव्हता. उतावीळपणाच्या वयांतला.

वा० व० प.

४९

स्मशान ते भूमि प्रेतरूप जन ।
सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥ १ ॥
भरतील पोट श्वानाचिया परी ।
वस्ति दिली घरीं यमदूतां ॥ २ ॥
अपूज्य लिंग तेथें अतित न घे थारा ।
ऐसी वस्ती चोरां कंटकांची ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं ठावी स्थिती मती ।
यमाची निश्चिती कुळवाडी ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ निश्चिती-निश्चिती.

अर्थ—ज्या गांवचे जन सेवाभक्तीहीन ती भूमि स्मशान, ते जन म्हणजे प्रेतें. ते कुत्र्याप्रमाणें आपलीं पोटें भरतात. त्यांच्या घरीं यमदूतानांच थारा मिळाला आहे म्हणावयाचा ! ज्या गावांत शिवलिंगाची पूजा होत नाहीं, देवपूजा होत नाहीं, तेथें अतिथी अभ्यागत थाऱ्यालादेखील उभा रहावयाचा नाहीं. चोराकंटकांची वस्ती ती. त्या ठिकाणीं स्थितिमति कांहीं नाहीं, आपण कोण आहों, काय करावयाचें याचा विचार नाहीं. अशी जागा यमाची वतनदारीच.

चर्चा—च० ३ 'अपूज्य लिंग तेथें' या चरणावर बरीच चर्चा झाली. लिंग म्हणजे लिंगभोग = विषयभोग असा अर्थ घेऊन व 'अपूज्य' याच्या ठिकाणीं पूज्य असा पाठ कल्पून ज्या ठिकाणीं विषयाचे भोगच पूज्य आहेत त्या ठिकाणीं अतिथी थारा घेत नाहीं, असा अर्थ सुचविण्यांत जाला. हा अर्थ

दुसऱ्या चरणाशीं सुसंगतही आहे. परंतु असा पाठ कोठेंही सांपडत नाहीं. 'अपूज्य लिंग' असाच पाठ सर्व ठिकाणीं आहे म्हणून लिंग = शिवलिंग, लक्षणेनें–देव. ज्या ठिकाणीं देवाची पूजा होत नाहीं तेथें अतिथि थाऱ्याला देखील उभा राहणार नाहीं. डॉ. भांडारकर.

अतिथि न घे थारा. अतिथि उभा रहाणार नाहीं. २ अतिथीला थारा मिळणार नाहीं, ज्या ठिकाणीं देवाला कोणी विचारीना, तिथें माणसाला कोण विचारणार ?

च० ४ स्थिति मतीं = तीथमती असा पाठ कोणी सुचविला.

तीथमती = तिथी, वार, धर्माचरण— बाबूराव.

शब्द--कटंक-कांटा. दुसऱ्याला त्रास ज्याच्या पासून होईल असा माणूस. ग्राम-कटंक. कुलवाडी-वतनदारी.

शेरा—तो काळ पुंडाईचा, बेबंदशाहीचा होता.लहान सहान दऱ्याखोऱ्यां-तून गढ्या, कोट वगैरे बांधून पुंड लोक वाटा मारण्याचा धंदा करीत असत. कित्येक गांवचेगांव चोरांनीं वसविलेले असतील असेंही वाटतें. " चो-रांची आळंदी " वगैरेसारख्या गांवांच्या नांवावरून अशी कल्पना बांधावयाला हरकत नाहीं. एखाद्या वारीच्या वेळीं अशा एखाद्या गांवीं मुक्काम करण्याचा प्रसंग आला, त्या वेळीं वारकरी भिऊन मुक्कामाला राहिले नाहींत, किंवा त्यांना त्या गांवांत आश्रय मिळाला नाहीं अशा प्रसंगाला उद्देशून हा अभंग लिहिला असेलका ? संपादक.

५०

अहा कटा त्याचे करिती पितर ।
वंशीं दुराचार पुत्र झाला ॥ १ ॥
गळेचि ना गर्भ नव्होचि कां वांझ ।
माता त्याची लाजलावी पापी ॥ २ ॥
परपीडे परद्वारीं सावधान ।
सादरचि मन अभाग्याचें ॥ ३ ॥

न मिळतां निंदा चाहडी उपवास ।
संग्रहावे दोष सकळही ॥ ४ ॥
परउपकार पुण्य त्या वावडें ।
विषाचें तें किडें दुग्धीं मरे ॥ ५ ॥
तुका म्हणे विटाळाचीच तो मूर्ति ।
दया क्षमा शांती नातळे त्या ॥ ६ ॥

पाठभेद—च० ५ विषाचें–विषयाचें. 'विषाचें' हाच पाठ सरस वाटतो म्हणून तोच मुळांत छापला आहे.

अर्थ—कुळांत दुराचारी पुत्र झाला तर त्याचे पितर आपल्या दैवाला दोष देऊन शोक करितात. हा असा पापी झाला, याला जन्म देऊन याच्या आईनें कुळाला लाज आणली, त्या पेक्षां त्याचा गर्भच कां गळून गेला नाहीं, किंबा त्याची आई वांझच कां झाली नाहीं, असें त्यांना वाटतें. परपीडा, परद्वार करावयाला हा नेहमीं तयार. कोणाची निंदा, चहाडी करावयाला मिळाली नाहीं तर याला उपास घडलाच. (अन्नसुद्धां गोड लागावयाचें नाहीं.) एकंदरींत त्याचा उद्योग काय, तर सगळे दोष आपल्या ठिकाणीं संग्रहित करावयाचे. परोपकार, पुण्य यांचें त्याला वावडें. हा असा किड त्याचें पोषण विषानें व्हावयाचें. लोकांचें अन्न तें यांचें वीष, लोकांचें वीष तें याचें अन्न. विटाळाची मूर्तीच तो. त्याला दया, क्षमा, शांति हे गुण शिवावयाचे नाहींत.

चर्चा—च०४ संग्रहावे दोष सकळही–कोणीं ? अर्थातच अशा पापी माणसानें, त्याच्या ठिकाणीं सर्व दोषांचा संग्रह होतो, असा भाव.

शब्द—**आहा कटा**–हा दैवा' असे दैवाला दोष देणारे शब्द. **वांज**–वांझ. **लाज-लावी**–वंशाला लाज लाणणारी. **सादर**–सावध, उत्सुक. **वावडें**–त्याज्य, वातुळ, न खाण्याजोगा पदार्थ. **नातळे**–आकळत नाहीं, न शिवे. **किडें**–किडा, नपूंसकरूप.

विषाचे किडे, विषांत रहाणारे किडे, दुधांत मरतात अशी त्या वेळीं समजूत होती. मं० ठ. नाना योगी.

अशी समजूत आहे. ह. वि. पटवर्धन.

किंवा " माता त्याची ! लाजलावा ! पापी ! असा पाठ वाचून त्याची माता पापी, लाज लावा तिला, असा अर्थ करावा. —मं० ठ.

लाजलावा = लाज लावणारा—तो पापी, कुळाला लाज आणणार, त्याची माता वांझ कां झाली नाहीं ? मं० ठ.

५१

श्वान शीघ्रकोपी ।
आपणा घातकर पापी ॥ १ ॥
नाहीं भीड आणि धीर ।
उपदेश न जिरे क्षीर ॥ २ ॥
माणसांसी भुंके ।
विजातीनें द्यावे थुंके ॥ ३ ॥
तुका ह्मणे चित्त ।
मळिण करा तें फजित ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—शीघ्रकोपी माणूस म्हणजे शुद्ध कुत्रें. स्वतांचा घात करणारा, पापी; त्याला भीड, धीर, काहीं नाहीं. रोग्याला जसें दूध पचत नाहीं तसें त्याला उपदेशाचे शब्द कोणीं सांगितले तर ते रुचत नाहींत. उपदेशाचें दूध त्याला जिरत नाहीं. पचत नाहीं. (मं. ठ) माणसांवर भुंकतो. विजातीनें, परजातीनें किंवा हलक्या लोकांनीं देखील त्याच्या तोंडावर थुंकावें ! तो स्वजातीयांवर, आपल्या जवळच्यांवर भुंकतो; ते त्याची गय करितात म्हणून. पण विजातीय–परके त्याच्या तोंडावर थुंकतात, त्याची छी, थू करितात. त्याचें चित्त मळलेलें आहे, तें फजीत करा.

शब्द—विजातीनें-परक्या, हलक्या जातीनें. **थुंकी**–थुकणें.

लक्ष्यप्रयोग—थुंके द्यावे.

शेरा—कोपिष्टावर तडाका आहे. शब्दांच्या तडाक्यावरून अभंग तरुणपणचा वाटतो. शब्दांच्या मानानें गर्भित अर्थ कमी. वा. ब. प.

५२

देखोनि हरखली अंड ।
पुत्र झाला म्हणे रांड ।
तंव तो जाला भांड ।
चाहाड चोर शिंदळ ॥ १ ॥
जाय तिकडे पीडी लोकां ।
जोडी भांडवल थुंका ।
थोर झाला, चुका ।
वर कां नाहीं घातली ॥ २ ॥
भूमि कांपे त्याच्या भारें ।
कुंभपाकाचीं शरीरें ।
बोले निष्ठुर उत्तरें ।
पापदृष्टि मळिणाचित्त ॥ ३ ॥
दुराचारी तो चांडाळ ।
पाप सांगतों विटाळ ।
तुका म्हणे खळ ।
म्हणोनियां निषिद्ध तो ॥ ४ ॥

पाठभेद--च• ३ 'बोले निष्ठुर उत्तरें' बहुतेकप्रती. निष्ठुरउत्तरें इंदु प्र.

अर्थ--कोणा एका स्त्रीला अनुलक्षून तुकाराम म्हणतातः--अंडें पाहून तिला हर्ष झाला. मला पुत्र झाला असें वाटून तिला आनंद झाला. पण तो तर भांडखोर, चहाड, चोर, शिंदळ असा निघाला. जिकडे जाई तिकडे लोकांना पीडा देई असा झाला. थुंका हें भांडवल त्यानें जोडलें. आतां तो वाढला, थोर झाला आहे. पण गर्भांत असतांनाच ओटीवर चुका घालून त्याचा गर्भपात कां केला नाहीं ? त्याच्या भारानें भूमी कांपते. त्याचें शरीर म्हणजे जणूं काय कुंभ पाक नरकाचें (साधनच.) तो पापदृष्टी, मळिणचित्त, त्याच्या तोंडीं गोड शब्द नाहीं, निष्ठुर उत्तरें बोलतो. असा माणूस म्हणजे चांडाळ, दुराचारी. त्याच्या संगतीनें विटाळ व्हावयाचा. तो खळ आणि म्हणून निषिद्ध.

चर्चा—चुका...घातली. " चुका नांवाची वनस्पति. ती पोटावर घातली म्हणजे गर्भ गळून पडतो. (नाना योगा.)

चुका घालून गर्भ पाडून कां नाहीं टाकिला ? मं. ठ.

शब्द—**भांड**-भांडखोर, **चुका**-एक वनस्पति. **कुंभपाक**-नरक,

शेरा—दुर्जनांवर आग पाखडली आहे. संतापानें शिव्यांचा भडिमार केला आहे. अभंग तरुणपणांतील. संसारावद्दलचा उद्वेग अजून आहे. बायकापोरांबद्दलच्या हर्षविषादानें अजून मनाला तिडीक येते, अशा काळांतील अभंग दिसतो. चरणांची जुळवाजुळव कृत्रिम दिसते. चरण जुळविणें म्हणजे कविता अशा समजुतीच्या काळांतील अभंग. वा. ब. प.

कुंभपाकाचीं शरीरें--कुंभपाक नांवाच्या नरकाचीं शरीरेंच जशीं, नरकाचीं साधनेंच जणूं काय—मं. ठ.

किंवा " कुंभपाकाचीं शरीरें=विषानें भरलेलीं अशीं दुरुत्तरें बोलतो.—

५३

नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर ।
घालूं तुज भार पांडुरंगा ॥ १ ॥
नेणें राग वेळ काळ घात मात ।
तुझें पायीं चित्त ठेंवि देवा ॥ २ ॥
तुका म्हणे मज चाड नाहीं जना ।
तुज नारायणा वांचूनीयां ॥ ३ ॥

पाठभेद—घातमात-घातपात. वा० ब. प.

अर्थ—मला गाणें समजत नाहीं, किंवा माझा स्वरही गोड नाहीं. तेव्हां माझा सर्व भार, पांडुरंगा, तुझ्यावर आहे. काळ वेळ मी कांहीं जाणत नाहीं. किंवा घात मातही मला समजत नाहींत. सुरावर, शास्त्रशुद्ध एका सप्तकांतून दुसऱ्या सप्तकांत खालीं वर कसें जावें, गावें, काय म्हणावें हें मला कांहीं कळत नाहीं. केवळ तुझ्यापायीं चित्त ठेवून गातों आहे एवढेंच. तुकोबा

म्हणतात—मला लोकांची चाड नाहीं. नारायणावांचून, तुझ्याखेरीज, मला लोक काय करावयाचे ?

चर्चा—घात म्हणचे काय ? खालच्या सप्तकांतून वरच्या सप्तकांत त्याच सुरावर एकदम जाणें. पारिभाषिक, शास्त्रीय शब्द. रा. ग. स. खरे.

सुस्वर—हें विशेषण नव्हे; क्रियाविशेषण 'नाहीं' याचें.

'काळ वेळ' 'घात मात'- संहारार्थी समजावे.

लक्ष्यप्रयोग. घालूं तुज भार; मज चाड नाहीं जना.

शब्द. चाड = महत्त्व, पर्वा.

शेरा—शुद्धभक्ति पाहिजे असा आशय. 'नये जरी तुज मधुर उत्तर' हा अभंग पहावा. नुसती साधी भक्ति हवी. दुसरें कांहीं आराधनाचें साधन नाहीं. असा भावार्थ. जराशा अधिक पक्व स्थितींतला अभंग दिसतो.

५४

माझी पाठ करा कवी ।
उट लावी दारोदार ॥ १ ॥
तंव तया पारखी सिव ।
लाजे ठाव सांडितां ॥ २ ॥
उष्टावळी करूनि जमा ।
कुंथुनि प्रेमा आणितसे ॥ ३ ॥
तुका म्हणे बाहेरमुदी ।
आहाच गोविंदीं न सरती ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ उट लावी दारोदार—दारोदार उठ लावी ग. कृ. लाज ठाव सांडितो. ग. कृ. बाहेर मुद्री ग, कृ. आणितसे-आणितो. पंढरपुर.

अर्थ—कवी दारोदार जाऊन माझी (कविता) पाठ करा अशी (लोकांना) हुट हुट लावितो, पण त्याची परीक्षा (गांवाच्या) शिवेलाच होते. शिवेपर्यंत त्याच्या जवळचें भांडवल संपतें. व ठाव सांडितां, म्हणजे आपलें गांव सोडून पलीकडल्या गांवाला गेला म्हणजे, त्याचें वर्म बाहेर फुटून तो लाजतो,

शरमिंदा होतो. उष्टावळी–उष्टी कविता–गोळा करून तो कुंथून उसनें प्रेम आणितो खरें, पण तें सर्व बाहेरचें, वरवरचें, उथळच. तें गोविंदाच्या ठिकाणीं सरत नाहीं, रुजू होत नाहीं.

चर्चा––च० १ "कविता" हें पद अध्याहृत घेऊन 'कवी माझी (कविता) पाठ करा अशी हूट दारोदार लावी' असा अन्वय करावा. डा. भांडारकर. मं. ठ.

च० २ 'सिवे' असा पाठ असेल काय ? प्र. रा. भांडारकर.

१ तोंवर त्याला पारखी, परीक्षा करणारा भेटतो.

२. तेव्हां त्याला शीव पारखी होते, गावांत रहातां येत नाहीं. गांवची शीव सोडून जावें लागतें, गावांत तोंड दाखविण्याची सोय रहात नाहीं. म्हणून तो लाजेनें गांव सोडून जातो. रा. खरे.

३. पण गांवच्या शिवेपर्यंतच त्याचें तुटपुंजें ज्ञान सरतें, शिवेपाशींच त्याची परीक्षा होते व मग ठाव सांडितां–अंत लागला म्हणून–शरमतो.

माझी कविता उत्तम हा ठाव सुटला म्हणजे लाजतो. डॉ. भांडारकर.

४. वर दिला आहे त्याप्रमाणें सं०

ठाव = १ पुंजी. २ मूळ ठिकाण.

च० ४बाहेरमुदी...सरती–बाहेरची मुद्रा उथळ ती गोविंदाचे ठिकाणी रुजू होत नाहीं.

न सरती = पोंचत नाहींत. मं०ठ० डॉ. भांडारकर.

बाहेरमुदी = बाह्यमुद्रा.

आहाच = उथळ. डॉ. भांडारकर.

हा अभंग ५।४।०७ रोजीं पुन्हां वाचला. डॉ. भांडारकर यांनीं चर्चा सुरू केली. च० २ या संबंधानें खालील चर्चा झाली–तों त्याला पारखी, परीक्षा करणारा, शिवतो, भेटतो. त्याची गांठ पडते व आपली कविता उत्तम हा त्याचा ठाव सुटतांच तो लाजतो. डॉ. भांडारकर.

यांत 'सिव' याचा अर्थ 'शिवे' असा घ्यावा लागतो.

वा० ब० प०

शब्द––**कवी**–करिता करणारा. **उट**–हुटहुट, टुमणें, **पारखी**–परीक्षा करिते. **सिव** शीव, गांवाची सीमा. **ठाव**–मूळ ठिकाण. **उष्टावळी**–गोळा करून आण-

लेल्या कविता. **बाहेरमुदी**-वाह्यमुद्रा, वरवरचें ढोंग, दिखाऊपणा. **आहाच**-उथळ. **न सरती**—रुजु होत नाहींत, पुरी पडत नाहींत.

५५

उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा ।
नेदूं आतां पीडा आतळों ते ॥ १ ॥
कशासाठीं हात भरूनि धुवावे ।
चालतिया गोवे मारगासी ॥ २ ॥
काय नाहीं देवें करूनि ठेवलें ।
असे तें आपुलें ते ते ठायीं ॥ ३ ॥
तुका म्हणे जेव्हां गेला अहंकार ।
तेव्हां आपपर बोळविले ॥ ४ ॥

पाठभेद च० ४—आपपर—आप आणि पर (तळेगांव पोथी.)

अर्थ—उपाधींच्या नांवानें एकदा स्नान करून उपाधि दूर करून मोकळा झालों. आतां पुन्हा ती पीडा आपल्याला शिवूं देणार नाहीं. मुद्दाम हात भरावे, घाण करावे, आणि धुवावे हें कशाला पाहिजे ? चालत्या मार्गांत गोवे, आडथळे, कशाला पाहिजेत ? देवानें काय नाहीं करून ठेविलें ? जें कांहीं आहे तें आपलेंच नाहीं का देवानें करून ठेविलें ! आपापल्या ठिकाणीं तें आपलेंच. एकदां अहंता गेली म्हणजे मीतूंपणाला निरोप मिळाला.

चर्चा० १—उपाधींच्या नादीं लागून एकदां आमच्या आंगावर ठपका आला, शिंतोडा आला, आम्हांला त्याचा उपसर्ग लागला. आतां त्याचा स्पर्श होऊं देणार नाहीं. खरे.

२ उपाधींचा विटाळ फिटला. अतिशूद्रादिकांचा विटाळ झाला असतां ब्राह्मण स्नान करितात, मराठे मात्र कोणाकडून तरी शिंतोडा घेऊन शुद्ध होतात या अर्थाला अनुलक्षून, 'उपाधींचा विटाळ फिटला. आतां उपाधींशीं संसर्ग राहिला नाहीं.' पां. दा. गुणे.

नेंदूं.....ते—आतां त्या पीडेचा पुन्हा संसर्ग–विटाळ-स्पर्श होऊं देणार नाहीं. 'आह्मीं' हा कर्ता अध्याहृत. पां. दा. गुणे.

च. ३ उपाधि सोडून आपलें चालावयाचें नाहीं असें म्हणणारांस उत्तरादाखल चरण आहे. मं. ठ.

शब्द—उपाधि—वाह्य पाश, वंधनें. **सिंतोडा**—थेंब, ठिपका. ठपका. **सिंतोडा घेतला**–१ ठिपका आला, २ स्नान केलें, शुद्ध झालों. उदक सोडलें ? **नेंदू**–न देऊं. **गोवे**–आडथळे **आपपर**–मीतूं. **बोळविले**–बोळवण केली, निरोप दिला.

५६

योगाचें तें भाग्य क्षमा ।
आधीं दमा इंद्रियें ॥ १ ॥
अवघीं भाग्यें येती घरा ।
देव सोयरा जालिया ॥ २ ॥
मिरासीचें ह्मणूं सेत ।
नाहीं देत पीक उगें ॥ ३ ॥
तुका ह्मणे उचित जाणा ।
उगी सिणा काशाला ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—योगाचें खरें सौभाग्य म्हणजे क्षमा. म्हणून आधीं इंद्रियांचें दमन करा. एकदां देव सोयरा झाला म्हणजे सगळीं भाग्यें घराला येतात. शेत हक्काचें, मिराशींचें, असलें म्हणून उगीच श्रम न करितां पीक देत नाहीं. सुज्ञांना योग्य तें समजतच आहे, उगाच शीण कशाला ? देव आपलाच खरा. पण तो सोयरा व्हावयास आयास करावे लागतात. इंद्रियदमनादि तप करावें लागतें.

शब्द—दमा–दमन करा. **सोयरा**–आप्त (अभंग १०.) **मिरास**–परंपरागत हक्क. सेत–शेत. **सिणा**–श्रम करा. सिणणें, शिणणें. **म्हणे**–म्हणून (अभंग ३९.) **जाणां**–जाणतच आहांत. (अभंग ३८.)

शेरा—जरा पक्व दशेंतील अभंग असावा. वा. ब. प.

५७

न ये नेत्रीं जळ ।
नाहीं अंतरीं कळवळ ॥ १ ॥
तों हे चावटीचे बोल ।
जग रंजवणें फोल ॥ २ ॥
न फळे उत्तर ।
नाहीं स्वामी जों सादर ॥ ३ ॥
तुका म्हणे भेटी ।
जंव नाहीं दृष्टादृष्टी ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ नेत्रीं—नेत्रां.

अर्थ—डोळ्यांना नाहीं पाणी, मनाला नाहीं आच, तोंपर्यंत वरवरचे शब्द फोल, नुसत्या चावटीचे, चेष्टेचे. नुसती लोकांची, ऐकणारांची घटकाभर करमणूक होईल. पण तें फुकट आहे. जोंवर देव भेटत नाहीं, तोंपर्यंत कितीही बोललें तरी तें फुकटच. जोंपर्यंत देवाची दृष्टादृष्ट व भेट झाली नाहीं तोंवर उत्तर न फळे, फळाला न आल्यासारखेंच.

चर्चा—च० ३ नाहीं स्वामी जों सादर—जोंपर्यंत देव सादर नाहीं, प्रत्यक्ष भेटला नाहीं. मं०ठ०

'स्वामी' हें संबोधनार्थी करून कित्येकजण, हे स्वामी, देवा, जोंवर आम्ही सादर नाहीं तोंवर हे बोल फुकट.

शब्द—**चावटी**-स्त्री० चेष्टा, वडवड. **फोल**-फुकट. **उत्तर**-वचन, बोलणें. **फळ** फळास येतें. **सादर**-तत्पर, हजर.

५८

बाईल सवासिण आई ।
आपण पितरांचे ठायीं ॥ १ ॥
थोर वंच झाला नष्टा ।
अवघ्या अपसव्य चेष्टा ॥ २ ॥

विषयांचे चरवणीं ।
केली आयुष्याची गाळणी ॥ ३ ॥
तुका म्हणे लंडा ।
नाहीं दया देवधोंडा ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ चरवणीं–चरणीं.

अर्थ—श्राद्धपक्षाचे वेळीं ब्राह्मण सवाष्ण बोलावण्याचे ऐवजीं, आईचे ठिकाणीं बायकोच सवाष्ण आणि बापाच्या ठिकाणीं आपणच ब्राह्मण असें म्हणतो तो नष्टच. फारच खर्च झाला म्हणावयाचा त्याला ! त्याचें सव्यापसव्य म्हणजे नुसत्या चेष्टाच. कर्मनष्ट तो. सगळा जन्म विषयांच्या चरवणींत, विषयोपभोगांत, विषयतर्पणांत खर्च करून घालवला. असल्या चांडाळाला कसली दया न कसली माया, देव आणि धोंडा त्याला सारखेच. अधमच तो.

चर्चा––विषयांचे चरवणीं––

चरवण = १ तर्पण, भोगणें, भोगानें मन संतुष्ट करून घेणें.

२ चरण–चरणें. चारणें.

पहिला अर्थ मंडळींत ठरला.

दुसरा अर्थ सरळ वाटतो—वा. ब. प.

शब्द—गाळणी = उसपा. **लंड** = धर्मभ्रष्ट.

शेरा—लौकिक धर्मावर विश्वास होता त्या वेळचा.

५९

दानें कांपे हात ।
नावडे तेविशीं मात ॥ १ ॥
कथी चावटीचे बोल ।
हिंग क्षीरीं मिथ्या फोल ॥ २ ॥
न वजती पाय ।
तीर्था म्हणे वेचूं काय ॥ ३ ॥
तुका म्हणे मनीं नाहीं ।
न ये आकारातें कांहीं ॥ ४ ॥

पाठभेद—दानें. 'दानीं' असा पाठ बरा दिसेल का ? वा. ब. प.

अर्थ—दानधर्मानें हात कांपतो, त्या बाबतींत गोष्ट काढिलेली मुळींच खपत नाहीं. उगाच चावटपणा करितो, बचाबचा बोलतो. दुधांत, किंवा खिरींत हिंग टाकावा त्या प्रमाणें सगळें फुकट, फोलकट बोलतो. तीर्थाकडे जावयाला पाय घेत नाहींत, आणि म्हणतो गेलों तर वेचूं काय ? खर्चूं काय ? तुकोबा म्हणतात—मनांत नाहीं त्या ठिकाणीं जनांत, रंगारूपाला काय येणार?

शेरा—लौकिक आचारांचा अंमल मनावरून निघाला नव्हता तेव्हांचा असावा. तीर्थाटनावर अद्याप विश्वास होता असें दिसतें.

वा. ब. प.

६०

वळितें जें गाई ।
त्यासी फार लागे काई ॥ १ ॥
निवे भावाचे उत्तरीं ।
भलते एके धणी वरी ॥ २ ॥
न लगती प्रकार ।
कांहीं मनाचा आदर ॥ ३ ॥
सांडी थोरपणा ।
तुका म्हणे सवें दीना ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ कृष्णाचें स्वरूप धरून जें दैवत गाईं वळतें त्याला (संतुष्ट व्हावयाला) असें काय फार लागतें ? भावाचे, भक्तीचे शब्द बोललें तर त्यांनी त्याचें हवें तेवढें समाधान होतें. त्याला कांहीं सोपस्काराचे प्रकार लागत नाहींत, मान, आदर लागत नाहीं. दीनदुबळ्यां बरोबर आपलें थोरपण विसरून देव त्यांचा सखा होतो.

चर्चा—च० २

१ भावाच्या भलते एके उत्तरीं धणीवरी निवे.
धणी = समाधान.

च० ३ देवाला सोपस्काराचे निरनिराळे प्रकार लागत नाहीं. मानाचे, आदराचे प्रकार लागत नाहींत.

लक्ष्यप्रयोग—" सवें दीना "

शेरा—देवाला भाव मात्र पाहिजे.

६१.

मैत्र केले महाबळी ।
कामा न येती अंतकाळीं ॥ १ ॥
आधीं घे रे रामनाम ।
सामा भरीं हा उत्तम ॥ २ ॥
नाहीं तरी यम ।
दांत खातो करकरां ॥ ३ ॥
धन मेळविलें कोडीं ।
काळ घेतल्या न सोडी ॥ ४ ॥
कामा न ये हा परिवार ।
सैन्य लोक बहु फार ॥ ५ ॥
तंववरी मिरविसी बळ ।
जंव आला नाहीं काळ ॥ ६ ॥
तुका म्हणे बापा ।
चुकवीं चौऱ्यांशीच्या खेपा ॥ ७ ॥

पाठभेद—च० ४ काळ घेतल्या न सोडी–तुज घेतल्या न सोडी.

अर्थ—मोठमोठे मित्र केले, जोडले, तरी ते अंतकाळीं कामाला येत नाहींत. तेव्हां आधीं रामनाम घे. हाच गल्ला सांठवून ठेव. नाहींतर यम करकरां दांत खातो आहे. तो तुझी गय करणार नाहीं. कोडी धन मिळविलें तरी

देखील तें घेतल्याशिवाय काळ सोडीत नाहीं. हा प्रपंच, हा परिवार, हे भोंवतीं गोळा केलेले लोक अखेरीस कामाला येणार नाहींत, उपयोगी पडावयाचे नाहींत. जोंपर्यंत काळ आला नाहीं तोंपर्यंतच या परिवाराचें बळ मिरवतो आहेस. बाबा, चौऱ्यांयशीच्या खेपा चुकव.

चर्चा—च० ३ पूर्वार्ध–यांत शेवटचा शब्द गळला आहे असें वाटतें. छंद साधण्याकरितां " रा " कारांत एक शब्द शेवटीं यावयला पाहिजे. अभंग २८।२९ पहा.

लक्ष्यप्रयोग—' सामा भरीं, ' ' सैन्य लोक ' सामा = माल

शेरा—तरुणपणांतील.

६२.

कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार ।

एकाचें उत्तर एका नये ॥ १ ॥
तैसें मज नको करूं कमळापति ।
देई या संगति सज्जनांची ॥ २ ॥
तिनें पाचारिलें इल बा म्हणोन ।
येरु पळे आण झाली आतां ॥ ३ ॥
तुका म्हणे येरयेरा जें विछिन्न ।
तेथें वाढे सीण सुखापोटीं ॥ ४ ॥

अर्थः—सज्जनांची संगति मागत असतांना तुकाराम म्हणतात, एका कानडी बाईनें मराठी नवरा केला तेव्हां एकमेकांची भाषा दोघांना समजेना. देवा, (दुर्जनांच्या संगतींत टाकून) माझी तशी स्थिती करूं नको. मला सज्जनांची संगत दे. ३ तिनें याला हाक मारली " इल बा " इकडे या. याला वाटलें कीं ही मला शपथ घालते. व म्हणून तो लांबच पळाला. तुकाराम म्हणतात स्वभावतःच ज्या गोष्टींचा परस्पराशीं विरोध असतो त्यांच्या ठिकाणीं सुख शोधावयाला गेलें तर ते मिळत नाहींच पण शीण मात्र वाढतो.

चर्चा—च० ३ आण = शपथ, कोणती ? इलवा 'यल्लम्मा' असें ऐकून यल्लम्माची शपथ असें वाटलें ?

च० ४ १ सुखाचे बाबतींत शीण वाढे. मंडळींचा अभिप्राय.

२ सुखासुखीं शीण वाढतो (संपादक.) कमळापति,=विष्णु. तुकारामाच्या अभंगांत हा व असे इतर शब्द सामान्य अर्थानें केवळ देव या अर्थानें घातले आहेत असें दिसतें.

शब्द—येरु-इतर, दुसरा-या ठिकाणीं 'नवरा'

शेरा—तुकाराम मराठी प्रांतांत रहाणारे, त्यांना हा, कानडी बायको आणि मऱ्हाटा नवरा, यांचा अनुभव कोठें आला ? पंढरपुरास काय ?

६३.

सुख पाहतां जवापाडें ।
दुःख पर्वताएवढें ॥ १ ॥
धरीं धरीं आठवण ।
मानीं संतांचें वचन ॥ २ ॥
नेलें रात्रीनें तें अर्धें ।
बाळपण जराव्याधें ॥ ३ ॥
तुका म्हणे पुढां ।
घाणा जुंपीजेसी मूढा ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ जुंपिजेसी-जुंतिजेसी-जुंति जेसी.

अर्थ—संसारांत सुख पाहूं गेलें तर जवा येवढें, आणि दुःख पर्वताइतकें. राईएवढें सुख आणि पर्वताएवढे दुःख, अशी संसाराची स्थिति आहे. तेव्हां मानवा, आठवण धर, जागा हो आणि माझें म्हणणें एवढें ऐक. आयुष्य तें किती ? त्यांतून अर्धें तर रात्रीनेंच नेलें. बाकीच्यांत बाळपण, जरा, दुखणींबाणीं आहेतच. बाकीचें उपयोगाला यावयाचें पण आठवण ठेविली

नाहींस तरं पुढेंही, बाकी राहिलेल्या आयुष्यांतही, मूर्खा, तूं घाण्याला जुंपला जाशील.

चर्चा—च. ३ अर्धें आयुष्य रात्रीनें नेलें, बाकींच्यांत जरा, व्याधि आहेतच. तुकारामाच्या अभंगांत अनुक्त अभिप्राय पुष्कळ वेळां असतो.

च० ४ पुढां–पुढें, पुढील आयुष्यांत.

घाणा जुंपिजेसी मूढा ग. कृ. पाठ हा बरोबर आहे. " जुंतिजेसी " व " जुंतिजसी " असेहि पाठ आहेत.

घाणा जुंती जसी मूढा. हा पाठ दुर्बोध दिसतो.

लक्ष्यप्रयोग—' व्याधें ' नपुं० प्रयोग. नेहमींचा प्रयोग स्त्रीलिंगी आहे.

शब्द-जरा = म्हातारपण. **व्याधें** व्याधि. स्त्री०नाम = रोग या ठिकाणीं नपु. ना. = व्याधि, रोग. **घाणा** = घाण्याला.

शेरा—प्रौढपणींचा.

६४.

वोलावयाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥ १ ॥
जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥ २ ॥
जळो त्याचें तोंड ।
नको दृष्टीपुढें भांड ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा ।
तया दुरी मज ठेवा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—गोविंदा, तुला विसरून ज्याला संतनिंदा घडली, जो तुला विसरला, इतकेंच नव्हे, ज्यानें साधूंचीहि निंदा केली, त्याच्याशीं बोलावयाचा संबंध मनांत देखील येऊं देऊं नको. त्याचें असलें तोंड माझ्या दृष्टीपुढें देखील नको. जळेना कां तें ! देवा त्याच्यापासून मला चार पावलें दूर ठेवा कसा ?

चर्चा—१ तयादुरी मज ठेवा किंवा २ तया मजदूरी ठेवा. तया दुरी = त्याच्यापासून दूर. तया मजदूरी ठेवा, त्याला माझ्यापासून दूर ठेवा. मुद्दाम विलक्षण प्रयोग करण्यापेक्षां नं० २ चा अन्वय बरा दिसतो. वा० ब० प०

भाषेचा प्रघात पहिल्या अन्वयाला धरून आहे म्हणून तो जास्त बरा असें मला वाटतें. सं०

शेरा—लौकिकी अभंग, धर्मभ्रष्ट माणसावर तडाका. वा० ब० प०

६५.

तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोध तैसेचि खळ ॥ १ ॥
कांरे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ २ ॥
मानदंभासाठीं ।
केली अक्षरांची आटी ॥ ३ ॥
तप करूनि तीर्थाटन ।
वाढविला अभिमान ॥ ४ ॥
वांटिलें तें धन ।
केली अहंता जतन ॥ ५ ॥
तुका म्हणे चुकलें वर्म ।
केला अवघाचि अधर्म ॥ ६ ॥

पाठभेद—च० ३ मानदंभ पोटासाठीं–ग. कृ. व पंढरपूर पोथी.

अर्थ—तीळ तांदूळ जाळून उपयोग काय ? कामक्रोध हे खळ आहेत ते तसेच आहेत. ते कांहीं जळले नाहींत, शमले नाहींत. बाबा, उगाच कशाला श्रम केलेस ! पांडुरंगाचें भजन नाहीं तर व्यर्थ कशाला शिणलास ? पुष्कळ विद्वत्ता संपादन केलीस, अक्षरांची आटाघाट केलीस ती मानासाठींच ना! तप, तीर्थाटनें करून साधलें काय? अभिमान वाढला. पुष्कळ धन वांटलें. दानधर्म केला. पण अभिमान

तसाच जपून ठेविला आहे. तात्पर्य, मुख्य गोष्टच चुकली. सगळें केलेंस तें पापच, अधर्मच तो. त्यांत पुण्य घडलें नाहीं.

चर्चा–तीळ जाळिले तांदुळ-त्या वेळच्या लौकिक जादू टोण्याचा एक प्रकार.

शब्द—तैसेचि–जसेच्या तसेच **खळ**–दुष्ट. **वाउगा**–व्यर्थ **आटी**–आटावाट अ० ३६।४० सायास **वर्म**–मुख्य गोष्ट अ० ३९.

शेरा—दंभावर तडाका. अहंता, कामक्रोध गेले पाहिजेत हें मुख्य आहे. त्या वेळच्या धर्माचरणाचें प्रतिबिंब यांत दिसतें.

६६.

संवसारतापें तापलों मी देवा ।
करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥
म्हणऊनि तुझे आठविले पाय ।
ये वो माझे माय पांडुरंगे ॥ २ ॥
बहुतां जन्मींचा झालों भारवाही ।
सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥ ३ ॥
वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं ।
कणव न करी कोणी माझी ॥ ४ ॥
बहु पांगविलों बहु वागविलों ।
बहु दिवस झालों कासाविस ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां धांव घालीं वेगीं ।
ब्रीद तुझें जगीं दीनानाथा ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.


अर्थ—संसाराच्या तापानें–या कुटुंबाची सेवा करितां करितां, देवा, मी तापलों, त्रासलों आहें. म्हणून तुझे पाय आतां आठविले. आई, पांडुरंगे, ये (आणि मला सोडव.) पुष्कळ जन्मांचें ओझें (त्यांत केलेल्या पापपुण्यांचें ओझें) मी आतांपर्यंत वाहिलें. पण कसें सुटावें हें वर्म अजून मला कळलें नाहीं. मनांतून व बाहेरून, दोन्हींकडून मी चोरांनी वेढलों आहें. त्यांच्या कचाट्यांत

सांपडलों आहें. पण कुणाला माझी दया येत नाहीं. अगदी पंगू झालों, अगदीं नागवणूक झाली, पुष्कळ दिवस अगदीं कासावीस झालों आहें. तूं दीनांचा कैवारी असें म्हणतात, तें ब्रीद राख आणि माझ्या सोडवणुकीला धांव.

चर्चा—नाहीं.

शब्द—**सवंसार**-संसार अ० ४८. **कुटुंब**-प्रपंच अ० ४८. **पांडुरंग**-स्त्री० करुणेनें आईला हांक मारितात तसें. **भारवाही**-भारवाहक. **सुटीजें हें**-सुटावें ज्या योगानें तें. वर्म अ० ३९-६५. **वेढियलों**-वेढून गेलों कर्मणी प्रयोग. **अंतर्बाह्यात्कारीं**-आंतून बाहेरून. **चोरीं**-चोरांकडून. **कणव**-दया, करुणा, कनवाळू. **पांगाविलों**-१ पंगु केलों २ दुबळा केला गेलों. **कासावीस**-अतिशय घाबरा. **वेगीं**-लवकर. cf. वेगीं, बिग्गाबिगीं.

शेरा—अभंग तरुणपणीचा खास नव्हे. लौकिक धर्माचरणावरील श्रद्धा नाहींशी होऊन दृष्टि अंतर्मुख होत होती अशा आध्यात्मिक संक्रमणावस्थेचें प्रतिबिंब यांत दिसतें. संसारतापाला वैतागलेल्या स्थितींत लिहिलेला, किंवा तिचें वर्णन करण्याकरितां लिहिलेला. अभंगाची भाषा सोपी आहे; सजलेली नाहीं. प्रौढपणांतील संपादक.



भक्तऋणी देव बोलती पुराणें ।
निर्धारवचनें साच खरीं ॥ १ ॥
मागें काय जाणों आइकिली वार्ता ।
कबिर सातें जातां घडिया वांटी ॥ २ ॥
माघारिया धन आणिलें घरासी ।
ने घे केला त्यासी त्याग तेणें ॥ ३ ॥
नामदेवाचिया घरासी आणिलें ।
तेणें लुटविलें द्विजांहातीं ॥ ४ ॥
प्रत्यक्षासी काय द्यावें हें प्रमाण ।
व्यंकोबाचें ऋण फेडियलें ॥ ५ ॥

वीज दळोनियां केली आराधना ।
लागे नारायणा पेरणें तें ॥ ६ ॥
तुका म्हणे नाहीं जयासी निर्धार ।
नाडला साचार तोची एक ॥ ७ ॥

पाठभेद—च० १ खरीं–करी–करीं, खरीं–तळेगांव, पंढरपूर. भक्त ऋणी असा पाठ अशुद्ध आहे.

अर्थ—देव भक्तांचा ऋणी असें पुराणें म्हणतात. आणि तीं वचनें, साच, खरींच खरीं असा माझा विश्वास आहे, किंवा, देव तीं वचनें खरीं करतोही असा माझा विश्वास आहे. कारण, मागलें असें एक ऐकलें आहे कीं कबीर बाजाराला जात असतांना घड्या (शालजोड्यांच्या) वांटीत असे. देवानें उलट त्यांची किंमत कबीराच्या घरीं पोंचविली तेव्हां जें एकदा दिलें तें परत घ्यावयाचें नाहीं म्हणून कबीर घेईना. तसेंच नामदेवाच्या घरीं देवानें धनाच्या राशी आणून ओतल्या. त्यानें त्या ब्राह्मणांच्या हातून लुटविल्या. पण, प्रत्यक्षाला प्रमाण कशाला ? व्यंकोबाचें ऋण नारायणानेंच फेडलें. व्यंकोबानें बियाणांचे दाणे दळून जेवण घातलें, पण घुढें पेरणीची वेळ आली तेव्हां देवालाच तें भरून देऊन पेरणी साधावी लागली. याप्रमाणें देव भक्तांचा ऋणी आहे. त्यांचें उणें तो भरून काढितो. तेव्हां भक्त कधीं नाडलेले असावयाचे नाहींत. ज्याला निर्धार नाहीं तोच एक नाडलेला. भक्त निर्धारी, निश्चयाचे ते कधींच नाडलेले नसावयाचे.

वाद—च० १ करीं असा पाठ बरा वाटत नाहीं. तूं आपलें वचन खरें करून दाखव असें देवाला सांगण्याचा उद्देश अभंगांत दिसत नाहीं. 'खरीं' हा पाठ बरा वाटतो. किंवा देव हीं वचनें खरीं करितो असाही अर्थ करितां येईल. 'निर्धार' हें 'वचन' यांचें विशेषण करावें.

च० २ सातें म्हणचे काय ? संती = बाजार (कानडी), बाजारांत घड्या नेऊन विकावयाच्या त्या कबीर वांटून टाकीत असे. २ सातें=साथें=बरोबर – कोणाच्या ? सातें जातां = जात असतां ? एकंदरींत पहिलाच अर्थ बरा दिसतो.

कबिराचे सातें घडिया वांटी असाही पाठ आहे. ग. कृ.

च० २ " मागें " या शब्दावरून कबीर नामदेव हे तुकोबांच्या पूर्वीचे; त्यांच्या आख्यायिका बऱ्याच जुन्या. म्हणून तुकोबा नवीन उदाहरणें देतात.

च० ५ प्रत्यक्ष = डोळ्यांदेखत घडलेलें, त्याला प्रमाण, मागील दाखला कशाला ? व्यंकोबाचें ऋण. हा व्यंकोबा कोण ? कांहीं प्रतींत 'एकोबा' असा पाठ आहे. एकनाथाविषयीं अशी एखादी आख्यायिका आहे का ? व्यंकोबाचा व दामाजीचा कांहीं संबंध आहे काय ? 'प्रत्यक्षासि' या शब्दावरून व्यंकोबा तुकारामांचा समकालीन होता काय ?

च० ६ बीज दळोनियां.....ही आख्यायिका कोणाची ?

" लागो " असा पाठ चुकीचा दिसतो. लागे हें बरोबर आहे.

लक्ष्यप्रयोग—' भक्तऋणी '

' ने घे केला त्यासि त्याग तेणें '

शेरा—लौकिकी समजुतींचा पगडा मनावर स्पष्ट दिसतो. तरुणपणींचा. शेवटचा चरण सुभाषित वजा आहे. संपादक.

६८.

भोगे घडे त्याग ।
त्यागें अंगा येती भोग ॥ १ ॥
ऐसें उफराटें वर्म ।
धर्मा अंगींच अधर्म ॥ २ ॥
देव अंतरे तें पाप ।
खोटे उगवा संकल्प ॥ ३ ॥
तुका म्हणे भीड खोटी ।
लाभ विचारावा पोटीं ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ " खोटा वाऊगा संकल्प " असाहि आहे.

अर्थ—मनोभाव शुद्ध असला म्हणजे भोग घडत असतांहि त्याग घडतो, जनकराजाप्रमाणें भोग भोगूनही अभोगी रहातां येतें. आणि भाव शुद्ध नसला

म्हणजे त्याग करूनहि संसार टाकून रानावनांत भटकलें तरीहि भोग सुटत नाहीं तो दूर सारावा तसा अधिकच आंगाशीं येतो, चिकटतो. व्यवहाराचें व आध्यात्मिक उन्नतीचें रहस्य असें उलटेंच आहे. जो आपण 'धर्म' 'धर्म' म्हणून करतों त्यांतच अधर्माचीं बीजें सांपडतात. आणि ज्याला आपण अधर्म समजतों तोंच धर्म असतो. तुम्ही कांहींहि करा, ज्यानें देव जोडतो तें पुण्य, ज्यानें देव अंतरतो तें पाप. म्हणून खोटे संकल्प असतील ते सोडून द्या. उगाच लोकलाजेनें भीड म्हणून एखादें कर्म करणें हें खोटें. खरें काय, किंवा खोटें काय, लाभाची गोष्ट कोणती तें मनाला विचारावें, जनाला विचारूं नये.

वा० ब० प० मं ठ.

चर्चा—च० १ त्याग = १ दान, चिं. बं. भानू. २ संसाराचा त्याग, मं० ठ०;

च० ३ उगवा–उगवणें. टाकून देणें, सोडणें मं० ठ० संकल्प=मनाचे भाव बुद्धि. खोटा वाउगा संकल्प असाही पाठ आहे ग. कृ.

च० ४ 'लाभ विचाराच्या पोटीं' असाही पाठ आहे.–विचारावा = विचार करून पहावें–लाभ कोणता तें. पोटीं = मनांत, अंतर्यामीं पहावें. विचाराच्या पोटीं = विचाराच्या आंत.

६९.

भोरप्यानें सोंग पालटिलें वरी ।
वक ध्यान करी मत्स्या जैसें ॥ १ ॥
टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं ।
देखों नेदी जगीं फांसे जैसे ॥ २ ॥
ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा ।
भीतरील फांसा कळों नेदी ॥ ३ ॥
खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी ।
कापावया नळी तयासाठीं ॥ ४ ॥
तुका म्हणे तैसा भला मी लोकांत ।
परी तूं कृपावंत पांडुरंगा ॥ ५ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—स्वतांच्या लौकिक भलेपणावर खरमरीत टीका करितांना तुकोबा म्हणतात.–मी दिसावयाला तेवढा भला आहें. लोकांना भला वाटतों. पण तूं कृपावंत नसतास तर, देवा, माझी धडगत नव्हती. कारण माझें हें भलेपण म्हणजे भोरप्याच्या सोंगासारखें आहे. भोरपी, बहुरूपी, वरून वाटेल तें सोंग करील, पण तो स्वतः कांहीं बदलत नाहीं. किंवा बगळा मासे धरावयाला जसा ध्यानस्थ योग्यासारखा उभा असतो तसें. मैंद–वाटमारे–असतात ते टिळे माळा लावून खऱ्या वारकऱ्यांबरोबर जातात पण फांसा टाकून जीव घेण्याचें त्यांचें खरें कसब ते बाहेर दिसूं देत नाहींत. तसेंच धींवर गळावर आमिष चिकटवून मासे धरतो, तें आंतला फांसा लपवून करितो. खाटीक जनावरें पाळतो तें दयेच्या मिषानें; पण वेळ आली म्हणजे नळी कापण्याकरितांच खरोखर. तसेंच माझें ढोंग वरून सुरू आहे. अंतरंग मात्र आहे तसेंच आहे. तूं कृपावंत आहेस म्हणून निभावून ने झालें. मं० ठ०

चर्चा—च० ४ नळी कापावया तयासाठीं = नळी कापण्यासाठीं असा अर्थ–मं० ठ०

शब्द—**फांसा**–फांस, पाश. **मैंद**–वाटमारे लोक.

शेरा—स्वत:वर कडक टीका.

७०.

गेली वीरसरी ।
मग त्यासी रांड मारी ॥ १ ॥
मग नये तैसी सत्ता ।
गेली मागील आणितां ॥ २ ॥
भंगलिया चित्ता ।
न ये काशानें सांधितां ॥ ३ ॥
तुका म्हणे धीर ।
भंगलिया पाठीं कीर ॥ ४ ॥

म्हणजे त्याग करूनहि संसार टाकून रानावनांत भटकलें तरीहि भोग सुटत नाहीं तो दूर सारावा तसा अधिकच आंगाशीं येतो, चिकटतो. व्यवहाराचें व आध्यात्मिक उन्नतीचें रहस्य असें उलटेंच आहे. जो आपण 'धर्म' 'धर्म' म्हणून करतों त्यांतच अधर्माचीं बीजें सांपडतात. आणि ज्याला आपण अधर्म समजतों तोंच धर्म असतो. तुम्ही कांहींहि करा, ज्यानें देव जोडतो तें पुण्य, ज्यानें देव अंतरतो तें पाप. म्हणून खोटे संकल्प असतील ते सोडून द्या. उगाच लोकलाजेनें भीड म्हणून एखादें कर्म करणें हें खोटें. खरें काय, किंवा खोटें काय, लाभाची गोष्ट कोणती तें मनाला विचारावें, जनाला विचारूं नये.

वा० ब० प० मं ठ.

चर्चा—च० १ त्याग = १ दान, चिं. बं. भानू. २ संसाराचा त्याग, मं० ठ०;

च० ३ उगवा–उगवणें. टाकून देणें, सोडणें मं० ठ० संकल्प=मनाचे भाव बुद्धि. खोटा वाउगा संकल्प असाही पाठ आहे ग. कृ.

च० ४ 'लाभ विचाराच्या पोटीं' असाही पाठ आहे.–विचारावा = विचार करून पहावें–लाभ कोणता तें. पोटीं = मनांत, अंतर्यामीं पहावें. विचाराच्या पोटीं = विचाराच्या आंत.

६९.

भोरप्यानें सोंग पालटिलें वरी ।
वक ध्यान करी मत्स्या जैसें ॥ १ ॥
टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं ।
देखों नेदी जगीं फांसे जैसे ॥ २ ॥
ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा ।
भीतरील फांसा कळों नेदी ॥ ३ ॥
खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी ।
कापावया नळी तयासाठीं ॥ ४ ॥
तुका म्हणे तैसा भला मी लोकांत ।
परी तूं कृपावंत पांडुरंगा ॥ ५ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—स्वतांच्या लौकिक भलेपणावर खरमरीत टीका करितांना तुकोबा म्हणतात.–मी दिसावयाला तेवढा भला आहें. लोकांना भला वाटतों. पण तूं कृपावंत नसतास तर, देवा, माझी धडगत नव्हती. कारण माझें हें भलेपण म्हणजे भोरप्याच्या सोंगासारखें आहे. भोरपी, बहुरूपी, वरून वाटेल तें सोंग करील, पण तो स्वतः कांहीं बदलत नाहीं. किंवा बगळा मासे धरावयाला जसा ध्यानस्थ योग्यासारखा उभा असतो तसें. मैंद—वाटमारे–असतात ते टिळे माळा लावून खऱ्या वारकऱ्यांबरोवर जातात पण फांसा टाकून जीव घेण्याचें त्यांचें खरें कसव ते बाहेर दिसूं देत नाहींत. तसेंच धींवर गळावर आमिष चिकटवून मासे धरतो, तें आंतला फांसा लपवून करितो. खाटीक जनावरें पाळतो तें दर्यैंच्या मिषानें; पण वेळ आली म्हणजे नळी कापण्याकरितांच खरोखर. तसेंच माझें ढोंग वरून सुरू आहे. अंतरंग मात्र आहे तसेंच आहे. तूं कृपावंत आहेस म्हणून निभावून ने झालें. मं० ठ०

चर्चा—च० ४ नळी कापावया तयासाठीं = नळी कापण्यासाठीं असा

अर्थ–मं० ठ०

शब्द—फांसा–फांस, पाश. मैंद–वाटमारे लोक.

शेरा—स्वतःवर कडक टीका.

७०.

गेली वीरसरी ।
मग त्यासी रांड मारी ॥ १ ॥
मग नये तैसी सत्ता ।
गेली मागील आणितां ॥ २ ॥
भंगलिया चित्ता ।
न ये काशानें सांधितां ॥ ३ ॥
तुका म्हणे धीर ।
भंगलिया पाठीं कीर ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ सांधितां–संपादितां च० ४ पाठीं कीर–पाठीं कर.

अर्थ—एकदां वीरश्री, आंगचा पराक्रम नाहींसा झाला म्हणजे त्या माणसाला बायकोही जिंकील. मग तशी–पुर्वीसारखी–गेलेली मागील सत्ता पुन्हां आणतां येत नाहीं. एकदां चित्त भंगलें, मनाचा हिरमोड किंवा विरस झाला म्हणजे तें पुन्हां कशानेंहि सांधतां येत नाहीं, जोडतां येत नाहीं. पुन्हां त्याला कार्यक्षम करितां येत नाहीं. तुकोबा म्हणतात, एकदां मनाचा धीर गेला म्हणजे मन वाळवी लागल्यासारखें होतें.

चर्चा—च. ४ ' कीर ' म्हणजे काय ?

१ किरी लागणें, वाळवी लागणें असें म्हणतात त्याच्यावरून असेल काय ?

श्री. रा. भां.

२ किर्र=अंधार, भीति धीर सुटला म्हणजे मन हें भीतीचें ठिकाण होतें,

डा. भांडारकर.

कीर=फजिती (बावूराव); व्यर्थ (माडगांवकर)

शब्द—पाठीं–मागाहून, नंतर **किर**–व्यर्थ, निश्चयें करून, फजिती वगैरे अर्थ. **सांधितां**–जोडितां. **काशानें**–कशानें (हि).

७१.

युक्ताहार न लगे आणिक साधनें ।
अल्प नारायणें दाखविलें ॥ १ ॥
कलियुगामाजीं करावें कीर्तन ।
तेणें नारायण देईल भेटी ॥ २ ॥
न लगे लौकिक सांडावा वेव्हार ।
घ्यावें वनांतर भस्म दंड ॥ ३ ॥
तुका म्हणे मज आणिक उपाव ।
नसती ते वाव नामेंविण ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत

अर्थ—कलियुगांत परमेश्वराच्या प्राप्तीकरितां,देव भेटण्याकरितां, नियमित, शास्त्रांनीं सांगितलेला आहार किंवा जपतपादि इतर साधनें नकोत. नारायणानें अगदीं सोपें, थोडक्यांत असें, साधन दाखविलें आहे.२ कलियुगांत कीर्तन करावें म्हणजे नारायण-प्राप्ति होईल. हा दररोजचा व्यवहार सांडावा, सोडावा, लागत नाहीं; भस्म लावून दंड घेऊन वनांतराला जावें लागत नाहीं. तुकोबा म्हणतात नामाशिवाय इतर उपाय हे मला वाव, फुकट, वावगे दिसतात.

शब्द. युक्ताहार-जपतपाकरितां अवश्य म्हणून सांगितलेला फलमूलादिकांचा आहार. **न लगे**-लागत नाहीं **आणिक**-इतर, आणखी.

ल. प्रयोग-वनांतर घ्यावें-वनांत जावें.

शेरा-कलौ संकीर्त्ति केवलम्-

७२.

कंठीं कृष्णमणी ।
नाहीं अशुभ ते वाणी ॥ १ ॥
हो कां नर अथवा नारी ।
रांड तयां नांवें खरीं ॥ २ ॥
नाहीं हातीं दान ।
शूरपणाचें कांकण ॥ ३ ॥
वाळियेली संतीं ।
केली बोडोनि फजिती ॥ ४ ॥
तुका म्हणे ताळा ।
नाहीं त्याची अवकळा ॥ ५ ॥

पाठभेद—च. १ नर-पुरुष.

अर्थ—ज्या माणसाच्या (पुरुष किंवा स्त्री) गळ्यांत (पक्षीं वाणींत) कृष्ण मणी ' कृष्ण ' असा शब्द (पक्षीं-मंगळसूत्र) नाहीं. त्याची वाणी अशुभ,

तें माणूस पुरुष असो किंवा बायको असो, त्याला रांडच म्हणावें. हातांत दानशूरपणाचें किंवा सौभाग्याचें लक्षण असें कांकण नाहीं अशी रांड म्हणजे संतांनीं वाळींत टाकिल्या सारखीच. तिची संत चांगली बोडंती करितात. तुकोबा म्हणतात–तात्पर्य काय, एकदा ताळ सुटला म्हणजे त्याची अवकळा जाणावी, अधोगति होते असें समजावें.

चर्चा. च. १ कृष्णमणी–१ पुरुष, पक्षीं कृष्णाचें नांव. २ स्त्री पक्षीं–मंगळसूत्र. सौभाग्याचें लक्षण. ३ तुळशीची माळ ! रा. साठे.

जिच्या गळ्यांत मंगळसूत्र नाहीं ती स्त्री व ज्याच्या कंठांत कृष्णाचें नांव नाहीं तो पुरुष हीं अशुभ समजावीं मं. ठ.

च० २ रांड हा शब्द 'नारी'शीं जुळवून घ्यावा व 'रंडको' असा अध्याहृत शब्द घेऊन तो ' नर ' या शब्दाकडे लावावा. (फेरचर्चेंत ठरलें).

च० ३ दान । शूरपणाचें कंकण.

चरणाच्या एका अर्धांत समासांतील एक पद व दुसऱ्या अर्धांत दुसरें पद अशा प्रयोगाचें उदाहरण. अभंग ३३ नेणे शब्द पर । तुका म्हणे उपकार ' रांड–मूळचा अर्थ विधवा असा दिसतो.

असें असल्यास स्थानभ्रष्टशब्दाचें (degraded words) हें एक चांगलें उदाहरण आहे.

" विधवा " या अर्थापासून " बाजार बसवी " पर्यंत शब्दाची अधोगती कशी झाली हें पाहिल्यास तात्कालिक सामाजिक स्थितीवर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे.

च० ४ वाळियेली–वाळियेणें = वाळींत टाकणें.

'केली बोडोनि फजिती'–अर्थ लक्षणेनें घ्यावा.

व्यवहारांत त्याची चांगली बोडंती केली, चांगली फजिती केली असें लोक म्हणतात, तसेंच येथें समजावें.

ताळा–मर्यादा, संगति, निर्बंध.

शेरा—बेताल वर्तनावर कटाक्ष आहे.

७३.

माया ब्रह्म ऐसें म्हणती धर्मठक ।
आपणासरिसे लोक नागविले ॥ १ ॥
विषयीं लंपट शिकवी कुविद्या ।
मनामागें नांद्या होऊनि फिरे ॥ २ ॥
करूनि खातां पाक जिरे सुरण राई ।
करितां अतित्याई दुःख पावे ॥ ३ ॥
औषध द्यावया चाळविलें बाळा ।
दावूनियां गुळा दृष्टीपुढें ॥ ४ ॥
तरावया आधीं शोधा वेदवाणी ।
वांजट बोलणीं वारा त्यांचीं ॥ ५ ॥
तुका म्हणे जयां पिंडाचें पाळण ।
न घडे नारायण भेट तयां ॥ ६ ॥

पाठभेद–च० ३ आतताई, आतित्याई,

अर्थ—वरवर पसारा दिसतो ती माया, खरें काय तें ब्रह्म, दिसणारी माया आणि असणारें ब्रह्म, असें भोंदू धर्मठक माणसें सांगतात. अशा बोलण्यानें ते स्वतः फसतातच पण् आपल्याबरोबर लोकांचीहि फसवणूक करितात. असे लोक हे खरे विषयाला लंपट असतात. आणि विषय म्हणजे वरवरचें, माया, तेव्हां त्यांच्यामागें थोडेसें लागलें म्हणून काय हरकत आहे असा विचार करितांना शेवटीं आसक्त होऊन कुविद्या शिकवितात आणि, मन हें नंदीबैल, हें ज्किडे नेईल तिकडे त्याच्या मागें फिरत जातात. ३ सुरण काय किंवा राई मोहरी काय, पाक करून खाल्लीं तर जिरतात, पचतात. पण कच्चीं खाल्लीं, आततायीपणा केला तर दुःख होतें. औषध देण्याकरितां मुलाला गूळ दृष्टीपुढें दाखवून चाळवावें त्यासारखें हें आहे. ५ म्हणून खरोखर तरावयाचें असेल, मोक्ष हवा असेल तर वेदवाणी काय आहे तें पहा आणि ती समजून घेऊन, या धर्मठकांचीं फोल, वांझट बोलणीं दूर करा. तुकोबा म्हणतात,

पिंडाचें पाळण, शरीरभोग भोगणें हींच ज्यांची इच्छा त्यांना नारायणाची भेट घडावयाची नाहीं.

चर्चा च० १ धर्मठक–धर्माच्या नांवावर लोकांना ठकविणारे. शाब्दिक वेदांती. सरिसे–सारखे.

धर्मठक आपण फसतात, आणि आपल्यासारखेंच इतरांसही फसवितात.

च० २ लंपट कोण ? धर्मठक तेच लंपट का ? मग 'शिकवी' हें एकवचन कां ? किंवा "विषयीं लंपट" हा भोंदूचा दुसरा प्रकार घ्यावयाचा ? (वा. ब. प.) वर अर्थ केला आहे त्यांत धर्मठक तेवढे एकच असेंच गृहीत घेतलें आहे. बोलणें चालणें वेदांत्यासारखें पण करणी मात्र विषयलंपटाची असे जे ते धर्मठक पहिल्या चरणांत व दुसऱ्या चरणांत त्यांचेंच सामान्यत्वानें वर्णन आहे.

च० ३ सुरण खाजरें आणि मोहरी तिखट, पण शिजवून पकवून खाल्लीं तर पचतात. पण नुसतींच खाण्याचा आततायीपणा केला तर बाधतात.

च० ४ चाळविलें–गुळाच्या आशेनें मूल औषध घेईल म्हणून त्याच्या घुटें गूळ ठेविला. त्यानें औषध घेतलें नाहींच. पण गूळ मात्र खाल्ला, तसें वेदांताकडे लक्ष लागावें म्हणून, विषयांत काय आहे, विधि निषेध सारखाच अशा प्रकारची वैराग्यवृत्ति उत्पन्न व्हावी म्हणून, जारण मारणादि विद्या, निःसंगपणा शिकविला. पण असें करितांना निःसंगपणा, विषयलंपटपणा तेवढा राहिला आणि वेदांत गेला.. म्हणून तुकाराम ५ व्या चरणांत उपाय सांगतात.

शब्द—धर्मठक–भोंदू लोक. २ धर्मालाही ठकविणारे. **सरिसे**–सारखे. **नांद्या**–नंदीबैल घेऊन फिरणारा. **अतित्याई, आतातार्ई**–अत्याचार, **चाळविणें**—फसविणें, नादीं लावणें. **वांजट**–फोल, निष्फल.

लक्ष्यप्रयोग––विषयीं लंपट.

शेरा–उगाच ब्रह्मज्ञानाचें सोंग करून त्याच्या नांवाखालीं विषयसंतर्पण करणें चुकीचें आहे. आधीं वेदविहित कर्मधर्म काय असतील ते नीट करा, मग वेदांताच्या गप्पा सांगा असा भाव. मं. ठे.

७४.

मृगजळ दिसे साचपणाऐसें ।
खोट्टियाचें पिसें ऊर फोडी ॥ १ ॥
जाणोनि कां करा आपुलाले घात ।
विचारा रे हित लवलाहीं ॥ २ ॥
संचित सांगातीं बोळवण सवें ।
आचरलें द्यावें फळ तेणें ॥ ३ ॥
तुका म्हणें शेवीं स्मशान तोंवरी ।
संबंध गोवरी अंगीसवें ॥ ४ ॥

पाठभेद:—च० ३ द्यावें–ध्यावें.

च. ४ अंगीं–आगी.

अर्थ:—मृगजळ हें अगदीं खऱ्यासारखें दिसतें; पण तें खोटें. पण हरिणें त्याच्या मागें वेड्यासारखीं लागून शेवटीं ऊर फुटून मरतात. तसाच संसार हा खोटा. मग त्याच्या मागें लागून आपला घात कां, रे, करून घेतां ? खरें हित काय असेल त्याचा विचार करा. त्याचें ज्याचें संचित ज्याच्या त्याच्या बरोबर असतें, त्याची बोळवण ज्यानें त्यानें स्वतांच (सवें) केली पाहिजे. संचित, कर्म, हें असें आहे कीं त्यानें आपलें फळ दिलेंच पाहिजे. कर्म हें आपलें फळ देणारच. जसें ज्यानें आचरण केलें असेल तसें त्याला फळ मिळावयाचेंच. तु. म्ह. शेवटीं स्मशान, आणि त्यावेळीं गोवरींशींच सबंध यावयाचा.

चर्चा. च• २ सवें = स्वतां, जातीनें ∠ स्वयमेव. मोल्स्वर्थ. आमचेकडे मराठे लोक स्वतां या अर्थीं " सवांग " असा शब्द योजितात. प्रत्येकाचें संचित त्याच्या सांगातें असतें व त्याची बोळवण त्यानें स्वतांच केली पाहिजे. तें आचरणासारखें फळ देणारच.

च० ४ आचरिलें घ्यावें फळ तेणें (ग. कृ.) हा पाठ बरा वाटतो. जसें ज्यानें आचरण केलें असेल तसें फळ त्यानें भोगिलें.

किंवा, आचरिलें द्यावें फळ तेणें. जें आचरण केलें त्यानें--त्या कर्मानें आपलें फळ दिलेंच पाहिजे.

स्मशान तोंवरी=स्मशानापर्यंत मं० ठ०

एकंदरींत अर्थ--शेवटीं स्मशान, त्यावेळीं गोवरीशीं, आगीशीं संबंध यावयाचा.

शब्द--**पिसें**-वेड. **विचारा**-विचार करा. **सांगाती**-बरोबर. **सवें**-स्वतां. च० ३. **तोंवरी**-त्या ठिकाणीं ? **आगीसवें**-आगीशीं.

ल. प्र. 'साचपणा ऐसें' यापासूनच साचपणसें असा प्रयोग होईल "सें" =असें, सारखें.

शेरा:—खोटें टाकून द्या, व खरें असेल तें शोधा असा भावार्थ.

७५.

गौळीयांचीं ताकपिरें ।
काय पोरें चांगलीं ॥ १ ॥
येवढा त्यांचा छंद देवा ।
काय सेवा भक्ती ते ॥ २ ॥
काय उपास पडिले होते ।
कण्यांभोंवते विदुराच्या ॥ ३ ॥
तुका म्हणे कुब्जा दासी ।
रूपरासी हीनकळा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ. गौळ्याचीं पोरें, ताकट तीं. त्यांच्यांत असें काय चांगलें होतें कीं प्रभूनें, कृष्णानें, त्यांच्यांत मिसळावें आणि त्यांच्याशीं आंगाशीं अंग घांसून खेळावें ! त्यांचा देवाला इतका छंद कां, अशी त्यांची भक्ती किंवा सेवा तरी

लोकोत्तर होती काय ? किंवा, केवढी लोकोत्तर असली पाहिजे ! ३ विदुरानें देवाच्या घरच्या कण्या खाल्ल्या त्या काय त्या कण्यांभोवतीं उपास पडले होते म्हणून ? ४ कुब्जा ही हीनकळा दासी असून देवाला ती रूपराशी अशी कां वाटावी ? तेव्हां भक्ती, सेवा, ही देवाला आवडते हेंच खरें.

शब्द—**ताकपिरें**-ताक पिणारीं, ताकट. **कुब्जा**-पाठीला पोंक आलेली, कुरूप स्त्री. **लक्ष्यप्रयोग.**—कण्याभोंवतीं उपास पडले होते.

शेरा.—भक्तीचें माहात्म्य सांगितलें आहे.

७६.

आतां तरी पुढें हाचि उपदेश ।
नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥
सकळांच्या पायां माझें दंडवत ।
आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥
हित तें करावें देवाचें चिंतन ।
करूनियां मन शुद्धभावें ॥ ३ ॥
तुका म्हणे हित होय तो व्यापार ।
करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥

पाठभेद.—च० ३ शुद्धभावें—एकविध च० ४ हित—लाभ.

अर्थ.—आतां याच्यापुढें एवढा एकच उपदेश करावयाचा, कीं बाबांनों, आयुष्याचा नाश करूं नका. सगळ्यांना पायां पडून सांगतों, कीं, बाबांनों आपापलें मन शुद्ध करा. देवाचें ध्यान करावें, कारण तें हित, हितकर, हिताचें, म्हणून. मन शुद्ध करून, भक्तीभावानें देवाचें चिंतन करावें. ४ ज्यानें स्वतःचें हित होईल तें करा, तसें आचरण करा. यापेक्षां निराळें, विशेष असें काय सांगावयाला पाहिजे ?

च० ३ " करूनियां मन शुद्ध भावें "

असा पाठ बरा. ' शुद्धभावें ' (सामासिक) चुकीचा दिसतो.

वा. ब. प. व पां. दा. गुणे.

शेरा.—मन शुद्ध करून देवाचें चिंतन करा असा उपदेश.

५७.

भक्ताविण देवा ।
कैचें रूप घडे सेवा ॥ १ ॥
शोभविलें येरयेरां ।
सोनें एके ठायीं हिरा ॥ २ ॥
देवाविण भक्ता ।
कोण देता निष्कामता ॥ ३ ॥
तुका म्हणे बाळ ।
माता जैसें स्नेहजाळ ॥ ४ ॥


पाठभेद—च० २ ठायीं–माठीं (तुकाराम तात्यांची प्रत.)

अर्थ—भक्त असल्यावांचून देवाला रूप कोणतें व सेवा तरी कुठली ? भक्त आहे तरच देवाला तो कांहीं तरी रूप देणार आणि त्या रूपांत त्याची सेवा करणार. नाहींतर देवाला रूप नाहीं, आणि सेवा नाहीं. सोनें आणि हिरा यांनीं एकमेकांना शोभा द्यावी तसें हें आहे. नुसतें सोनें किंवा नुसता हिरा यांची काय शोभा ? तीं परस्परांना पोषक झालीं पाहिजेत. तसेंच देव आहे म्हणून भक्ताला निष्कामभक्ती करावयाला जागा आहे. तेव्हां देवभक्तांचें हें नातें आणि प्रेम मूल आणि आई यांचें नातें असावें तसें आहे. त्यांचें प्रेम एकमेकांत गुंतलेलें, परस्परसापेक्ष आहे. देवाशिवाय भक्त नाहीं आणि भक्ताशिवाय देव नाहीं.

शब्द. **येरयेरां** = परस्परांना एकमेकांना **स्नेहजाळ** = गुंतागुंतीचें प्रेम.

लक्ष्यप्रयोग—शोभविलें...हिरा. अनुक्ताभिप्रायाचें उदाहरण.

शेरा—भक्तदेवांची सापेक्षता वर्णिली आहे. 'तुझें यशाचि तारितें' हा केकावलींतील श्लोक तोलून पहावा.



७८.

विश्वाचा जनिता ।
म्हणे यशोदेसी माता ॥ १ ॥
ऐसा भक्तांचा अंकित ।
लागे तैसी लावी प्रीति ॥ २ ॥
निष्काम निराळा ।
गोपी लावियेल्या चाळा ॥ ३ ॥
तुका म्हणे आलें ।
रूपा अव्यक्त चांगलें ॥ ४ ॥

पाठभेद.—नाहींत.

अर्थ—विश्वाचा उत्पन्न करणारा देव आणि त्यानें यशोदेला, एका सामान्य स्त्रीला, आई म्हणावें हा काय न्याय आहे ? पण हें असेंच आहे. देव हा भक्तांचा बंदा आहे. भक्तांना हवें तसेंच तो त्यांच्याशीं प्रेम लावतो. कामनाभेदांप्रमाणें निरनिराळ्या भक्तांपाशीं तो निरनिराळ्या रुपांनीं रहातो. नाहीं तर तो स्वतां निष्काम आणि सगळ्या जगापासून निराळा आहे. तरीही तो गोपींना चाळा लाविंतो. (त्यांच्या भक्तीप्रमाणें त्यांना प्रसन्न होऊन त्यांना आपल्या नादीं लावतो.) याप्रमाणें मूळचा अमूर्त, अव्यक्त, असून देवानें चांगलें रूप भक्तांकरितां धरलें आहे.

च० २ लागे तैशी = हवी तशी; जशी लागेल तशी; त्यांच्या योग्यतेप्रमाणें; आपलें प्रेम लावून घेण्याची त्यांची पात्रता असेल त्या प्रमाणें (सं.)

चर्चा—च० ३ गोपी लावियेल्या चाळा = गोपी चाळाला लाविल्या ? किंवा ' गोपीं ' (ग. कृ.) असा पाठ घेतला तर गोपीं लावियेला चाळा = गोपींना चाळा लाविला.

शेरा—लौकिक समजुतींस अनुसरून भक्तिप्रेमाचें वर्णन आहे.

७९.

काय दिनकरा ।
केला कोंवड्यानें खरा ॥ १ ॥
कां हो ऐसा संत ठेवा ।
भार माझे माथां देवा ॥ २ ॥
आडविलें दासीं ।
तरी कां मरती उपवासी ॥ ३ ॥
तुका म्हणे हातीं ।
कळा सकळ अनंतीं ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत

अर्थ—सूर्याला कोंबड्यानें खरें केलें असें म्हणावयाचें कीं काय ? सूर्य उगवतांना कोंवडा आरवतो ही गोष्ट खरी, पण कोंवडा आरवला नाहीं तर सूर्य उगवलाच नाहीं असें म्हणावयाचें कीं काय ? तसेंच देव आणि मी यांचें आहे. संतहो (देवा) देवासाठीं माझ्या डोक्यावर हें ओझें कां ठेवितां? देव प्राप्त व्हावा म्हणून माझ्यावर–कोंबड्यावर भार कां टाकितां? मी काय देव आणणार ! तो आला तर येईल. धन्याला, मालकाला, नोकरांनीं आडविलें तर धनी उपाशीं का मरतील ?. (तसेंच मी आडवून धरलें तर देव तुम्हांला भेटावयाचा थांबेल असें का म्हणावयाचें ?) तुकोबा म्हणतात सर्व कळा, सर्व किल्ली, सर्व सत्ता जी कांहीं आहे ती देवाच्या हातांत आहे.

चर्चा—च० २ कांहो...देवा । इतर चरणांच्या मानानें पहातां या चरणांत एक शब्द जास्त आहे.. कांहो ऐसा ठेवा । कांहो संत ठेवा । असे चरण आलटून पालटून म्हणतांना दोन्ही शब्द चरणांत आले असावे.

च० ३ वरें दिलेला अर्थ प्रो. भानू यांनीं सुचविलेला आहे. तो घेऊन दुसरा चरण नीट लाविता येत नाहीं असें मत वा० ब. प. यांनीं नमूद केलें आहे. त्यांचा अर्थ–मी दासानें अडविलें, संतांना देवप्राप्तीच्या मार्गांत अडथळा केला, तर त्यांना–संतांना–देवाची गांठ पडावयाची नाहीं, त्यांना देवभेटीचा

उपास पडेल कीं काय ? आम्हीं अडविलें तर हे संत उपाशीं का मरतील ! नाहीं, कारण सर्व कळा देवाच्या हातांत आहेत, आमच्या हातांत कांहीं नाहीं.

एकंदरींत, वरील अभंगाचा अर्थ मंडळींनीं दोन प्रकारांनीं लाविलेला आहे.

१. कांहो, तुकारामबोवा, तुमचा विठोबा आम्हांला प्राप्त करून द्या पाहूं, असें म्हणणाऱ्या अश्रद्ध माणसांस तु.नीं दिलेलें हें उत्तर आहे.

दिनकराला कोंबड्यानें का केला ! नाहीं. तसें देवाला मीं का केलें ? मी देवाला आणणारा कोण आणि आडविणारा तरी कोण ! जर दासांनीं, भक्तांनीं, अडविलेंच तर ते उपाशीं का मरतील ? अनंताच्या ठिकाणीं सर्व कला आहेत. असा एक प्रकारच्या अर्थाचा सारांश—

२ या तुक्यानें देवाला आडवून धरिलें आहे म्हणून त्याचें लक्ष आमच्याकडे जात नाहीं, आणि आम्ही उपाशीं मरतों, असें म्हणणाऱ्या 'मत्सरी वारकऱ्यांस हें उत्तर आहे. मी आडविलें म्हणून देवाचें लक्ष तुमच्याकडे जात नाहीं असें जोखीम माझ्या माथीं कां बाबा ! समजा, आम्ही दासांनीं देवाला आडविलें म्हणून देव थांबेल कीं काय ! आम्हीं कोंबडीं, तो सूर्य. तो अनंत आहे, सर्व सत्ता त्याची, तो आपल्या भक्तांचे मनोरथ पुरवील असा दुसऱ्या अर्थाचा सारांश.

मला एकंदरींत पसंत आहे तो अर्थ मीं वर दिला आहे. (संपादक)

शेरा.—" हांक मारा म्हणजे दार उघडेल " असा भक्तांना उपदेश.

८०.

जेवितांही धरी ।
नाक हागतिया परी ॥ १ ॥
ऐसियाचा करी चाळक ।
आपुलीच अवकळा ॥ २ ॥
सांडावें मांडावें ।
काय ऐसें नाहीं ठावें ॥ ३ ॥
तुका म्हणे करी ।
ताका दुधा एक सरी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—हागायला बसलें असतांना जसें धरतात त्याप्रमाणें जेवतांना नाक धरतो तो मूर्ख. अशा वेड्या माणसाच्या चाळ्यांनीं त्याचीच अवकळा, फजिती, होते. २ सांडावें काय, मांडावें काय, हें ठाऊक नाहीं तेथें काय करणार? अशा माणसाला, तुकाराम म्हणतात, दूध आणि ताक एकच. चांगलें वाईट, ग्राह्य त्याज्य यांतील भेद त्याला कांहींच कळत नाहीं. त्याला सगळेंच सारखें.

शब्द—अवकळा-फजिती. **सरी**-योग्यता.

शेरा—भगवद्भक्तींत अर्थ काय असें विचारणाऱ्या पाखंड्यास उत्तर.

मं. ठ.

८१.

हो कां पुत्र पत्नी बंधु ।
त्यांचा तोडावा संबंधु ॥ १ ॥
कुळीं आलें खट्याळसें ।
शिवों नये लिंपों दोषें ॥ २ ॥
फोडावें मडकें ।
मेलें लेखीं घायें एकें ॥ ३ ॥
तुका म्हणे त्यागें ।
विण चुकीजेना भोगें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—पुत्र असो, पत्नी असो, बंधु असो या सर्वांचा संबंध तोडावा. हें सर्व दुष्टपणाचें, खट्याळ, त्रास देणारें आहे हें कळून चुकलें. त्यांचा स्पर्श नको, संबंध नको, त्यांच्या दोषानें अंग लिंपून घ्यावयाला नको. विटाळ नको त्यांचा. हीं मेलीं आहेत असें समजून एका घावानें मडकें फोडून टाकावें. तुकाराम म्हणतात-संसाराचा त्याग केल्याशिवाय भोग चुकावयाचा नाहीं, सुटावयाचा नाहीं.

च० २ खट्याळसें–'खोटें' असा अर्थ मंडळीच्या चर्चेंत नमूद केला आहे. पण तो बरोबर दिसत नाहीं. खट म्हकजे दुष्ट मनुष्य, खट्याळ = ज्याच्या-पासून त्रास होईल तो किंवा ती गोष्ट. संकट, कड्याळ !

च० ३ मेलें लेखीं घायें एकें–मेलें अशा समजुतीनें, मेलें असें समजून. (पां. दा. गुणे) हें सर्व मेलें लेखीं । याचे मडकें एकें घायें फोडावें। असा एकं-दर अर्थ कोणी सुचविला आहे. त्यांत बरीच ओढाताण करावी लागते ती पहिल्या अर्थानें टळते म्हणून पहिलाच जास्त बरा वाटतो.

लक्ष्यप्रयोग— १ दोषें लिंपों नये २ भोगें चुकिजेना.

तुका म्हणे **त्यागें** । **विण** चुकिजेना भोगें

शब्द—खट्याळ-१ खोटें असें २ त्रासदायक. **नये लिंपों**-विटाळूं नये.

शेरा-तरुणपणांतील नैराश्याची छटा या अभंगांत पडलेली दिसते.

८२.

व्याल्याविण करी शोभनतांतडी ।
चार ते गधडी करीतसे ॥ १ ॥
कासया पाल्हाळ आणीकांचे देखी ।
सांगतां नव्हे सुखी साखरेसी ॥ २ ॥
कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी ।
रूप दावी कष्टी मळिण वरी ॥ ३ ॥
तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका ।
अनुभवेंविण नका वाव घेऊं ॥ ४ ॥

पाठभेद–नाहींत.

अर्थ—बाळंत व्हावयाच्या अगोदर बारशाची घाई करण्याचे चाळे करिते, काय म्हणावें हिला ? गधडीच ती ! दुसरीं काय करतात त्यांचे पाल्हाळ हिला कशाला पहावयाला हवेत, दुसऱ्यांनीं पाल्हाळ केले ते पाहून हिला काय उपयोग ! ही साखर आहे असें नुसतें तोंडानें म्हटल्यानें साखर मागणाराचें

समाधान होतें कीं काय? कुंथाच्या ढेंकरानें, मुद्दाम आळेबळें काढिलेल्या ढेंकरानें, घुष्टी येत नाहीं. तसेंच कुष्ट रोगी जो आहे तो आपलें पांढरें अंग झांकण्याकरितां वरून रंग लावून मळिण रूप दाखवितो. तु. म्हणतात—वाचाळांनो, ऐका, अनुभवाशिवाय कोरडा शब्दपसारा माजवूं नका.

चर्चा—१ अजून बाळंतपणाला ।ठिकाण नाहीं आणि अगोदरच बारशाची घाई करते. मं. ठ.

शोभनतांतडी=उत्सवाची घाई. शोभन=शुभप्रसंग.

च० २ साखरेसीं = साखरेनें (तृ०) साखर आहे असें सांगून, केवळ शब्दांनीं.

च० ३ कुंथ = कुंथणें (घु० नाम). देवेल = देववेल– देतां येईल.

रूप दावी कुष्टी मळिण वरी–कुष्टी हा पाठ बरोबर आहे असें धरून मं. ठ. अर्थ मीं वर दिला आहे. तो पाठ व अर्थ हे दोन्ही मला बरोबर वाटत नाहींत. 'कष्टी' असा पाठ घेतला तर सबंध चरणाचा अर्थ असा लागेल–

कुंथाच्या ढेंकरानें पुष्टी येत नाहीं. पोट भरत नाहीं. कारण वरचें, बाहेरचें, मळीण रूप, भुकेनें सुकलेलें तोंड, तो आंत कष्टी आहे, भुकेलेलाच आहे हें दाखवील. भूक लपून रहावयाची नाहीं. संपादक

च० ४ वाद. असा पाठ घेतला तर 'वाद घेऊं नका' = 'निष्फळ बडबड करूं नका' असा अर्थ बरा दिसेल.

शब्द—**शोभन**–शुभप्रसंग, वारसें. **चार**–चाळे **पाल्हाळ**–अघळपघळपणानें करणें किंवा बोलणें **कुंथ, ढेंकर** पु. नामें. **वाव**–वारा, निष्फळ बोल. वाद.

शेरा—दुसऱ्याला दिसावयाला नुसता पाल्हाळ कशाला?

८३.

जेणें घडे नारायणीं अंतराय ।
होत बाप माय वर्जावीं तीं ॥ १ ॥
येर प्रिया पुत्र धना कोण लेखा ।
करिती जीं दुःखा पात्र शत्रु ॥ २. ॥
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु ।
राज्य माता निंदु भरतें केली ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय ।
आणीक उपाय दुःखमूळ ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ होत बापमाय–हो कां बाप माय

अर्थ—ज्याच्या योगानें देवाच्या ठिकाणीं अडथळा येतो तीं आईबाप का असेनात, वर्जावीं, टाकून द्यावीं. सग इतर–प्रिया, पुत्र धन–यांचा काय हिशोब, यांना कोण विचारतो ? तीं शत्रूच; दुःख देतात. प्रल्हादानें बापाला बिभिषणानें भावाला–रावणाला टाकिलें. देव दूर होतो म्हणून भरतानें राज्य आणि माता हीं निंद्य, त्याज्य ठरविलीं. तु. म्ह. हरीचे पाय मिळाले म्हणजे त्यांत सगळा धर्म आला. बाकी सगळे उपाय दुःखाला कारण होतात.

शब्द—**अंतराय**–अडथळा. **लेखा**–गणती, हिशेब.

ल. प्र. राज्य माता निंदु भरतें केली.

८४.

मान अपमान गोवे ।
अवघे गुंडूनी ठेवावे ॥ १ ॥
हेंचि देवाचें दर्शन ।
सदा राहे समाधान ॥ २ ॥

शांतीची वसती ।
तेथें खुंठे काळगती ॥ ३ ॥
आली ऊर्मी साहे ।
तुका म्हणे थोडें आहे ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ मानपमानाचे गोवें ।

अर्थ—मान अपमान हे अडथळे आहेत, हे सर्व गुंडाळून ठेवावे, बाजूला सारावे. देवाचें दर्शन म्हणजे तेंच. मनाला समाधान राहिलें म्हणजे झालें. ज्या ठिकाणीं शांति आणि समाधान हीं नांदतात त्या ठिकाणीं काळाचें देखील कांहीं चालत नाहीं. उर्मी–लाट–दुःखाची–संकटाची लाट आली तेवढी सोसली म्हणजे झालें. हें अगदीं थोडें आहे. पण एवढें केलें म्हणजे झालें.

शब्द—**गोवे**-पाश, गुंतागुंत. **गुंडाळून ठेवणें**—आंथरुण वगैरे गुंडाळून बाजूला सारून ठेवतात त्याप्रमाणें, **उर्मी**-लाट, उमाळा, उचल.

शेरा—शांतीचें महत्त्व गाइलें आहे.

८५.

थोडें आहे थोडें आहे ।
चित्त साहे जालिया ॥ १ ॥
हर्षामर्ष नाहीं अंगीं ।
पांडुरंगीं सरलें तें ॥ २ ॥
अवघ्या साधनांचें सार ।
न लगे फार शोधावें ॥ ३ ॥
तुका म्हणे लटिकें पाहें ।
सांडीं देहअभिमान ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ.—मन सहाय झालें, (पाहिजे तें करावयाला मन एकदां तयार झालें) म्हणजे मग बाकीचें फार थोडें आहे. अंगांत हर्ष अमर्ष, आनंद आणि

संताप, हे राहिले नाहींत, पांडुरंगाच्या ठिकाणीं सर्व लीन झालें. हेंच काय तें सगळ्या साधनांचें सार आहे. हें कांहीं फार शोधावयाला लागत नाहीं. दिसतें हें सगळें खोटें आहे असें समज आणि देहाचा अभिमान सांड म्हणजे झालें.

शब्द-साहे-सहाय **हर्षामर्ष**-हर्ष विषाद. **सरलें**-संपलें, लीन झालें.

शेरा—समाधान आणि निरासक्ति यांचें महत्त्व सांगितलें आहे.

८६.

आतां उघडीं डोळे ।
जरी अद्यापि न कळे ।
तरी मातेचिया खोळे ।
दगड आला पोटासी ॥ १ ॥
मनुष्यदेहाऐसी निध ।
साधली ते साधे सिद्ध ।
करूनि प्रबोध ।
संत पार उतरले ॥ २ ॥
नाव चंद्रभागेतिरीं ।
उभी पुंडलीकाचे द्वारीं ।
कट धरूनियां करीं ।
उभाउभीं पालवी ॥ ३ ॥
तुका म्हणे फुकासाठीं ।
पायीं घातलीया मिठी ।
होतो उठाउठीं ।
लवकरीच उतार ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—आतां डोळे उघड; अजूनहि जर उमजला नाहींस तर आईच्या पोटीं (खोळेला=वारेंत) दगडच आलास म्हणावयाचा. मनुष्य देहासारखा

निधि–ठेवा. सांपडला आहे, त्याच्या सहाय्यानें साधूं म्हणशील ती सिद्धि साधेल. अशी सिद्धि करून संतजन संसार नदीच्या पलीकडल्या तीराला गेले. तुम्हां आम्हांला पलीकडे नेण्याकरितां विठ्ठलाच्या रूपानें नांव पुंडलीकाच्या दरवाज्यांत उभी आहे. कंबरेवर हात ठेवून उभाउभीं तुम्हांला ती खुणावीत आहे, कीं चला, या. तु. म्ह. देवाच्या पाया मिठी घातली म्हणजे दुसरे कांहीं मोल न पडतां लवकरच उतार होईल (आणि मी पलीकडल्या तीराला जाईन).

शब्द—**खोळ** = गर्भाचे भोंवतीं असलेलें कवच; पाणमोटळी. मं. ठ. **प्रबोध** = जागृति **निध** = ठेवा. Treasure. **पालवी** = खुणवितो, खुणेनें बोलावितो <पल्लवयति, अंगावरील वस्त्राच्या पदरानें खुणावितो. **घातलिया** = घातल्यास. हाच पाठ बरोबर आहे.

शेरा—भक्ती करा असा उपदेश.

८७.

न करीं रें संग राहें रे निश्चळ ।
लागों नेदीं मळ ममतेचा ॥ १ ॥
या नांवें अद्वैत खरें ब्रह्मज्ञान ।
अनुभवावांचून बडबड ते ॥ २ ॥
इंद्रियांचा जय वासनेचा क्षय ।
संकल्पाही न ये वरी मन ॥ ३ ॥
तुका म्हणे न ये जाणीव अंतरा ।
अंतरीं या थारा आनंदाचा ॥ ४ ॥

पाठभेद.—संकल्पाही वरी नये मन–संकल्पाही नंये वरी मन.

अर्थः—ऐहिक वस्तूंची संगत धरूं नको, त्यांच्या लोभांत सांपडूं नको. ममतेचा मळ मनाला लागू देऊं नको. याचें नांव अद्वैत. हें खरें ब्रह्मज्ञान. इतर, अनुभवावांचून जें असेल तें सगळें फुकट, ती सगळी बडबड. असें ब्रह्मज्ञान झालें म्हणजे इंद्रियें ताब्यांत येतात, वासनेचा क्षय होतो आणि मग

मन संकल्पापर्यंतही येत नाहीं. मनाची धांव अमकें असावें, हवें, असें नुसतें म्हणण्यापर्यंतही जात नाहीशी होते. अशा स्थितींत–मी ज्ञानी असा–अभिमान मनाला शिवत नाहीं आणि मन नुसतें शुद्ध आनंदानें भरून जातें.

चर्चा:—. च० ३ वरी मन संकल्पा नये.

आणि मग याशिवाय–मन संकल्पाला येत नाहीं, मं० ठ०

किंवा, मन संकल्पावरी नये. मन संकल्पापर्यंत धांवत नाहीं. संपादक.

च० ४ जाणीव, कसली ? मी ज्ञानी अशी ? अशा प्रकारचा अभिमान.

जाणीव = मी मोठा असा अभिमान. मं. ठ. व डॉ भांडारकर.

लक्ष्यप्रयोग—संकल्पा ही वरी नये मन.

शेरा—संगत्याग सांगितला आहे.

८८.

पंढरीचा महिमा ।

देतां आणीक उपमा ॥ १ ॥
ऐसा ठाव नाहीं कोठें ।
देव उभाउभीं भेटे ॥ २ ॥
आहेति सकळ ।
तीर्थें काळें देती फळ ॥ ३ ॥
तुका म्हणे पेठ ।
भुमिवरी हे वैकुंठ ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—पंढरीचा महिमा काय वर्णन करावा ? त्याला दुसरी उपमा देऊं म्हटलें तर असें दुसरें पुण्यक्षेत्र नाहीं. या ठिकाणीं देव ताबडतोब, उभाउभी, भेटतो. ३ इतर दुसरीं तीर्थें पुष्कळ आहेत पण त्यांचें फळ काळांतरानें, अवकाशानें मिळतें. पंढरी म्हणजे भरली पेंठ–पृथ्वीवरचें प्रत्यक्ष वैकुंठच हें.

च० १ उत्तरार्ध–व च० २ पूर्वार्ध हीं एकत्र घेऊन अर्थ करावा.

च० ३ व ४. इतर तीर्थें व पंढरी यांच्यांत तुलना केली आहे. इतर तीर्थें हीं शेतासारखीं आहेत. आज पेरावें तेव्हां पुढें पीक यावयाचें. पण पंढरी ही भरली पेंठ. तिथें नेहमीं सगळाच माल तयार मिळतो.

शब्द—**कालेंकरून**=कालांतरानें, सावकाश. **पेंठ**. बाजार. **उभाउभीं**=तावडतोव.

शेरा—पंढरी माहात्म्य.

८९.

तीर्थीं धोंडा पाणी ।
देव रोकडा सज्जनीं ॥ १ ॥
मिळालिया संतसंग ।
समर्पितां भलें अंग ॥ २ ॥
तीर्थीं भाव फळे ।
येथें अनाड तें वळे ॥ ३ ॥
तुका म्हणे पाप ।
गेलें गेल्या कळे ताप ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—तीर्थाचे ठिकाणीं धोंडे आणी पाणि हीं असतात. खराखुरा, रोख-ठोक, देव पाहिजे असेल तर तो सज्जनांच्याकडे मिळावयाचा. संतसंगाचा लाभ झाला म्हणजे (अंग समर्पिलें) त्यांना सर्व देऊन त्यांची सेवा केली तर चांगलें. ३ तीर्थांच्या ठिकाणीं भाव असला, श्रद्धा असली, तर ती फळाला येते. पण संतांच्या संगानें अनाडी, अडाणी, अडमुठें असेल तेंही वळतें. अभाविकालाही पुण्य लागतें. तु. म्ह. सज्जनांचे संगानें पाप जातें व तें गेलें हें मनाचा ताप नाहींसा झाला म्हणजे कळतें. ताप नाहींसा होणें ही पाप गेल्याची खूण.

चर्चा—तीर्थाचे ठिकाणीं भावालाच फळ येतें. पण संतसंगानें अडाणीहि वळतो असा भाव. माडगांवकर

शेरा—तीर्थापेक्षां संतसंग बरा.

शंका च० ४ व ५ यांचा अर्थ काय ?

शब्द—**नेवरे** = पांढरे **कुडें** = खोटें, मनांत वेरच दिवस सांचवून ठेविलेली गोष्ट.

शेरा. हरिदासाच्या नकलेंतील गोष्टीला धरून केलेला अभंग. पुराणाला जाऊन त्यांत लक्ष नाहीं, चोकडाची आठवण त्या ठिकाणींही होते, असली भक्ती व्यर्थ आहे हा भाव.

९२.

दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी ।
देखोनियां दूरी व्हावें तया ॥ १ ॥
आइका हो तुम्ही मात हे सज्जन ।
करूं संघष्टन नये बोलों ॥ २ ॥
दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ ।
वाणी रजस्वला स्रवे तैशी ॥ ३ ॥
दुर्जनाचें भय धरावें त्यापरी ।
पिसाळलेवरी धांवे श्वान ॥ ४ ॥
दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग ।
बोलिलासे त्याग देशाचा त्या ॥ ५ ॥
तुका म्हणे किती सांगावें पृथक ।
अंग कुंभपाक दुर्जनाचें ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत

अर्थ—दुष्ट माणसाची घाण अगदीं विष्टेसारखी. त्याचें दर्शन झालें तर तेथून दूर पळावें सज्जन लोकहो, हें माझें म्हणणें तुम्ही ऐकून घ्या. दुर्जनाची संगत करूं नये, त्याच्याशीं भाषण देखील करूं नये. दुर्जनाचा नेहमीं विटाळ धरावा. रजस्वला स्रवे तशी त्याची वाणी नेहमीं अमंगळ बोलते. पिसाळलेलें कुत्रें गांवभर धावूं लागलें म्हणजे जसें त्याचें भय धरून लोक पळतात तसें

दुर्जनापासून दूर व्हावें. दुर्जनाचा अंगसंग बरा नव्हे. ज्या देशांत दुष्ट लोक असतील तो देश देखील सोडावा. निरनिराळें किती वेळां, किंती प्रकारांनीं, सांगावें ? दुर्जनाचें अंग म्हणजे प्रत्यक्ष कुंभीपाक नरकच.

शब्द.—मात = भाषण. मूळ कानडी शब्द. **संघष्टन** = संगत. **कुंभीपाक** = एक नरक.

लक्ष्यप्रयोग—पिसाळलें श्वान वरी धांवे. वरी हें पादपूरक ? किंवा, पिसाळल्यावर श्वान धावूं लागतें.

शेरा—दुर्जनाचें वर्णन.

९३.

अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा ।
ओळखा जातीचा अत्यंज तो ॥ १ ॥
वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण ।
श्रेष्ठाचें वचन न मानी जो ॥ २ ॥
तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न ।
तैसा तो दुर्जन शिवों नये ॥ ३ ॥

पाठभेद—च० १ अत्यंज–अधम.

अर्थः—वितंडवादी माणूस शुद्ध बीजाचा नव्हे. तो जातीनें म्हार असें समजा. ज्याला वेदश्रुति किंवा इतर ग्रंथ प्रमाण नाहींत, किंवा श्रेष्ठांचें वचन नहि ज्याला प्रमाण नाहीं, तो दुर्जन. तु. म्ह. मद्यपानाचें मिष्टान्न जसें त्याज्य तसाच तो दुर्जन देखील त्याज्यच. त्याला शिवूं देखील नये.

शब्द. बीज = बीं, कुळ, शुद्धबीज. **अतिवादी** = वितंडवाद घालणारा माणूस. **मद्यपानाचें मिष्टान्न** = मद्यपान हेंच मिष्टान्न, मद्यपानावरोबर असणारें मिष्टान्न ?

शेरा—दुर्जनाची केवळ लौकिक समजुतीनें निर्भर्त्सना केली आहे. मनाची समता आणि धीरवृत्ति अजून आली नव्हती अशा वेळचा.

९०.

घेऊनियां चक्र गदा ।
हाचि धंदा करितो ॥ १ ॥
भक्ता राखे पायांपासीं ।
दुर्जनासी संहारी ॥ २ ॥
अव्यक्त तें आकारलें ।
रूपा आलें गुणवंत ॥ ३ ॥
तुका म्हणे पुरवी इच्छा ।
जया तैसा विठ्ठल ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—विठ्ठल हा हातांत गदाचक्र घेऊन एकच धंदा करितो. भक्तांना आपल्या पायापाशीं ठेवून संभाळतो व दुष्टांचें पारिपत्य करितो. विठ्ठलाच्या रूपानें अव्यक्त तें आकाराला आलें, निराकार आणि निर्गुण तें साकार आणि सगुण झालें. तु. म्ह. विठ्ठल हा सर्वांच्या इच्छा पुरवितो. जो जसा असेल तसा त्याला तो तसा आहे.

शब्द· आकारलें=आकाराला आलें.

लक्ष्यप्रयोग—अव्यक्त तें आकारलें. जया तैसा विठ्ठल ' ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ' याचें मराठी रूपांतर.

शेरा—विठ्ठलाची लौकिक स्तुति.

९१.

देखोनि पुराणिकांची दाढी ।
रडे फुंदे नाक ओढी ॥ १ ॥
प्रेम खरें दिसे जना ।
भिन्न अंतरीं भावना ॥ २ ॥

आवरितां नावरे ।
खुर आठवी नेवरे ॥ ३ ॥
बोलों नये मुखावाटां ।
म्हणे होता ब्यांचा तोटा ॥ ४ ॥
दोन्ही सिंगें चारी पाय ।
खुणा दावी म्हणे होय ॥ ५ ॥
मना आणितां बोकड ।
मैला त्याची चरफड ॥ ६ ॥
होता भाव पोटीं ।
मुखा आलासे शेवटीं ॥ ७ ॥
तुका म्हणे कुडें ।
कळों येतें तें रोकडें ॥ ८ ॥


पाठभेद—नाहींत.

अर्थ—पुराणिक पुराण सांगत असतां श्रोत्यांपैकीं एकाला अगदीं रडें कोसळलें. पुराणिकाची दाढी पाहून तो रडूं लागला, फुंदूं लागला, नाक घुसूं लागला. लोकांनां वाटलें श्रोता काय प्रेमळ आहे हो ! पुराणश्रवणानें तो अगदीं सद्गदित झालेला दिसला. पण त्याच्या मनांतला भाव निराळा होता. त्याला रडें कांहीं केल्या आवरेना. बोकडाचे पांढरे खूर त्याला आठवले. काय करूं ! तोंडानें बोलून दाखवितां येत नाहीं. पण फक्त ब्यां तेवढें नाहीं बाकी सगळें आहे. पुराणिकानें लाक्षणिक अर्थ घेऊन, ब्या नाहींत म्हणजे बिया नाहींत, बीजें नाहींत, ब्रह्म व आत्मा यांचें ज्ञान नाहीं असें वाटून, खुणा केल्या दोन का ? चार का ? श्रोता होय म्हणाला. कारण त्याच्या मनांत दोन शिंगें आणि चार पाय आठवले. बोकड मेला होता तो मनांत आणून तो तळमळूं लागला. शेवटीं पोटांत होतें तें बाहेर आलें. माझा बोकड मेला हो, अगदीं असाच होता, त्याची दाढी अशीच होती हें शेवटीं बाहेर आलें. तेव्हां, वाईट आहे तें शेवटीं कळों येतें. झांकत नाहीं.

आपलीहि अवस्था तशीच व्हावयाची. तेव्हां करावें काय ? पुढें तर भयंकर अवस्था दत्त म्हणून उभी आहे. ही भीति नसती म्हणजे काळजी नव्हती. पण घुढच्याला, होणार आहे त्याला भितों, असा अर्थ घेतां येईल काय ?

वा. ब. प.

९६.



मांडवाच्या दारा ।
पुढें आणिला म्हातारा ॥ १ ॥
म्हणे नवरी आणा रांड ।
जाळा नवऱ्याचें तोंड ॥ २ ॥
समय न कळे ।
काय उपयोगीं ये वेळे ॥ ३ ॥
तुका म्हणे खरा ।
येथूनिया दूर करा ॥ ४ ॥

पाठभेद——नाहींत.

अर्थ— १ लग्नाला मांडव घातलेला आणि तयारी झालेली. अशा प्रसंगीं माणसें पाहिजेत म्हणून म्हाताऱ्याला मांडवाच्या दाराशीं आणलें. म्हातारीं माणसें फटकळ, वेळ प्रसंगाचा विचार न करितां वाटेल तें म्हणावयाचीं, त्याप्रमाणें हा म्हातारा म्हणतो, आणा पाहुं नवरी, रांड कुठें आहे ती ! आणि त्या नवऱ्याचें तोंड जाळा पाहूं ! मनांत "नवरीला आणा आणि नवऱ्याला मुंडावळी घाला" असाच अर्थ असेल. वेळ काय, प्रसंग कोणता, हें कळत नाहीं असा हा माणूस अशा वेळीं काय उपयोगी ! तु. म्ह. या गाढवाला दूर हांकून द्या झालें.

मं० ठ०

२ "आणिला" या शब्दावरून दुसराही एक अर्थ मनांत येतो. 'म्हातारा' हा स्वतःच नवरदेव होता असें समजावें. मांडवापुढें म्हातारा नवरदेव आणिला त्याला कुठला धीर निघावयाला ? आणा म्हणतो रांड नवरी कोठें आहे ती.

आणि, "घाला त्याच्या डोंबलावर, जाळा त्याचें एकदाचें" हे कवीचे धिःकार तोंडसूचक उद्गार असावे. समय कोणता, वेळ कशी, अशा वयाला शोभतें काय हें कळत नाहीं अशा या गाढवाला द्या हांकून. वा. ब. प. यांना दुसरा अर्थ जास्त बरा वाटतो.

शेरा— बोलणें, करणें वागणें हीं प्रसंगाला अनुरूप पाहिजेत.

९७.

कांहीं नित्यनेमाविण ।
अन्न खाय तोचि श्वान ।
वांया मनुष्यपण ।
भार वाहे तो वृषभ ॥ १ ॥
त्याचा होय भूमी भार ।
नेणे यातीचा आचार ।
जाला दावेदार ।
भोगवी अघोर पितरांसी ॥ २ ॥
अखंड अशुभ वाणी ।
खरें न बोलेचि स्वप्नीं ।
पापी तयाहुनी ।
आणिक नाहीं दुसरा ॥ ३ ॥
पोट पोसी एकला ।
भूतीं दया नाहीं ज्याला ।
पाठीं लागे आल्या ।
अतिताचे दाराशीं ॥ ४ ॥
कांहीं संतांचें पूजन ।
न घडे तीर्थांचें भ्रमण ।

९४.

शब्दा नाहीं धीर ।
ज्याची बुद्धि नाहीं स्थिर ॥ १ ॥
त्याचें न व्हावें दर्शन ।
खळा पंगतीं भोजन ॥ २ ॥
संतास जो निंदी ।
अधम लोभासाठीं वंदी ॥ ३ ॥
तुका म्हणे पोटीं ।
भाव आणीक जया होटीं ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—ज्याची बुद्धि स्थिर नाहीं, ज्याच्या बोलांत बोल नाहीं, त्याचें दर्शन नको. त्याच्यासारख्या दुष्टाच्या पंगतीला जेवणें नको. जो संतांची निंदा करितो आणि लोभासाठीं–कांहीं लाभ होईल या आशेनें, अधम, नीच-माणसांची स्तुति करितो त्याचें दर्शन नको. ज्याच्या पोटांत भाव एक आणि ओठांत, बोलण्यांत, दुसराच त्याचें तु. म्ह. दर्शन नको.

च० ३ " संतांस " असा पाठ पाहिजे असें वाटतें.

शब्द-आणीक-दुसरा, निराळा. होटीं-ओठांत, ओंठावर, बोलण्यांत.

शेरा—दुटप्पी वर्तनावर टीका, त्याचा तिटकारा.

९५.

चोरें चोरातें करावा उपदेश ।

आपुला अभ्यास असेल तो ॥ १ ॥
शिंदळीच्या अंगणीं वेचितां पाउलें ।
होईल आपुलें तिच्या ऐसें ॥ २ ॥
तुका म्हणे भितों पुढिलिया दत्ता ।
म्हणउनि चिंता उपजली ॥ ३ ॥

पाठभेद––च. २ अंगणीं–मागें.

अर्थ—सभोंवतीं पहावें तों अशी स्थिति दिसते कीं चोर चोराला उपदेश करतो आहे. स्वतांचा जो अभ्यास असेल तोच तो दुसऱ्याला सांगणार ! शिंदळीच्या मागें गेलें, तिच्या पावलावर पाऊल टाकून चालूं लागलें, म्हणजे आपलेंहि तिच्यासारखेंच व्हावयाचें. अशा स्थितींत माझें पुढें कसें होणार ही काळजी मला लागली आहे. पुढील परिणाम दत्त म्हणून उभा आहे त्याची भीति वाटते. मं. ठ.

चर्चा—च० ३ " घुढिलिया दत्ता. " पुढील परिणामाचें भयंकर चित्र डोळ्यांपुढें उभें रहातें त्याला.

'घुढील' म्हणजे १ या आयुष्यांतच येणारा काय ?

२ मरणोत्तर प्राप्त होणारा काय ?

दत्त म्हटलें कीं दत्ताची मूर्ति पुढें उभी रहाते असा दत्ताचा लौकिक या काळांत झालेला दिसतो. हा दत्तावतार कधीं झाला व त्याची इतकी प्रसिद्धी कशी झाली ?

या अभंगाचा अर्थ मागील अभंगाच्या अनुरोधानें लावावा–खळांचा उपदेश त्यांच्या जोगताच असावयाचा मूर्ख लोक त्यांचे मागें जाऊन फसावयाचे, आणि त्यांना पुढें यमाचे फटके खावे लागणार म्हणून भितों. बाबूराव. दिलेल्या अर्थाहून थोडासा व्यापक व अधिक आध्यात्मिक अर्थ घ्यावासा वाटतो, तो खालीं स्पष्ट केला आहे. वा. ब. प.

दत्त = दैवगति माडगांवकर.

लक्ष्यप्रयोग—" वेचितां पाउलें. "

शेरा–सभोंवतालची स्थिति अगदीं सडलेली पाहून विषण्ण झालेला हॅमलेट ज्याप्रमाणें मरणोत्तर स्थितींचें अनिश्चित व म्हणूनच भयंकर चित्र चिंतून थबकतो आणि कर्तव्यमूढ होतो तशीच तुकारामाच्याहि मनाची स्थिति नसेल काय ? येथें—जगांत–सगळे चोर आहेत. उपदेश करणारेही चोर आणि ऐकणारेहि चोरच. चोरांनीं चोरांना उपदेश करावा आणि त्यांचा त्यांनीं ऐकावा असा येथें प्रकार आहे; खरा हितोपदेश येथें मिळावयाचा नाहीं. यांच्या उपदेशाप्रमाणें वागावें तर मन शंका घेतें. शिंदळीसारखें वागल्यानें

९९.

हरिहरां भेद ।
नाहीं करूं नये वाद ॥ १ ॥
एक एकाचे हृदयीं ।
गोडी साखरेच्या ठायीं ॥ २ ॥
भेदकासी नाड ।
एक वेलांटीच आड ॥ ३ ॥
उजवें वामअंग ।
तुका म्हणे एक अंग ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—हरि व हर—शंकर—यांच्यांत भेद नाहीं. याविषयीं वाद करूं नये. हर हा हरीच्याहृदयांत व हरी हा हराच्या ठिकाणीं वास करितो. जशी साखरेच्या ठिकाणीं गोडी असते त्याप्रमाणें. भेदकाला, नाड, अडचण, काय ती एकच, फक्त वेलांटीची तेवढी आड येते. फरक फक्त एक वेलांटीचाच. नाहींतर दोन्ही एकच. उजवें आंग आणि डावें आंग यांत कांहीं फरक नाहीं. सगळें मिळून अंग एकच, त्याप्रमाणें.

चर्चा—च० १ हरिहरां भेद नाहीं, वाद करूं नये—असा अन्वय.

च० ३ भेदकासी नाड...**नाड** म्हणजे काय? नड, अडचण—पण वेलांटी ही भेदकाच्या मार्गांत अडचण कशी? 'हरि' आणि 'हर' यांच्यांत भेद करावयाला भेदकाला वेलांटीच उपयोगी पडते.

१००.

वक्त्या आधीं मान ।
गंध अक्षता पूजन ।
श्रोता याति झाला जाण ।
तरी त्या नाहीं उचित ॥ १ ॥

शीर सर्वांगाप्रमाण ।
यथाविधि कर चरण ।
धर्माचें पाळण ।
सकळीं सत्य करावें ॥ २ ॥
पट्ट पुत्र सांभाळी ।
पिता त्याची आज्ञा पाळी ।
प्रमाण सकळीं ।
ते मर्यादा करावी ॥ ३ ॥
वरासनीं पाषाण ।
तो न मानावा सामान्य ।
येर उपकरणें ।
सोनियाचीं परी नीच ॥ ४ ॥
सोनियाचा पैजण ।
मुगुटमाणि केला हीण ।
जयाचें कारण ।
तया ठायीं अळंकार ॥ ५ ॥
सेवका स्वामींसाठीं मान ।
त्याचें नाम त्याचें धन ।
तुका म्हणे जाण ।
तुम्ही संत तदर्थीं ॥ ६ ॥

पाठभेद—च० १ उचित–अधिकार.

अर्थ—आधीं मान वक्त्याचा मग श्रोत्यांचा. गंध, अक्षता, पूजन हीं वक्त्याला आधीं; श्रोत्यांत एखादा यती असला तरी त्याला आधीं मान नाहीं. सर्व अवयवांत शीण प्रमाण. हातपायांचा मान त्याच्या मागून त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें आहेच. त्याच अनुरोधानें, ज्यांनीं त्यांनीं आपापल्या धर्माचें पाळण करावें हें सत्य. मुलगा गादीचा मालक झाला, गादी संभाळूं लागला,

यमाचा आंदण ।
सीण थोर पावेल ॥ ५ ॥
तुका म्हणे त्यांनीं ।
मनुष्यपणा केली हानि ।
देवा विसरूनी ।
गेलीं म्हणतां मी माझें ॥ ६ ॥

पाठभेद—च० ' न बोले स्वप्नीं ' असाहि पाठ आहे.

अर्थ—कांहीं नित्यनेम केल्याशिवाय किंवा पाळित्याशिवाय–नियमानें कांहीं तरी धर्मकृत्य आपल्या मागें लावून घेऊन तें केल्याशिवाय–जो अन्न ग्रहण करतो तो कुत्र्यासारखा. त्या बैलानें मनुष्य जन्माचें ओझें फुकट वाहिलें. भूमीला त्याचा भार होतो. जातीकुळाचा (आपल्या) आचार काय हें त्याला ठाऊक नाहीं. कुळाचा दावेदारच तो. पितर त्याच्यामुळें अघोर नरकांत जातात. ज्याचें भाषण नेहमीं अमंगळ, जो कधींहि खरें बोलत नाहीं, (स्वप्नांत देखील), त्याच्याहून अधिक पापी दुसरा कोणी नाहीं. जो स्वतःचें मात्र पोट भरतो, पण इतर भूतांची ज्याला दया येत नाहीं; अतिथि, भिकारी, आले तर त्यांच्या पाठीस लागून त्यांना घालवून देतो, तो पापी. संतांचें पूजन, किंवा तीर्थाटन, ज्याला थोडें देखील घडत नाहीं तो म्हणजे यमाचें भक्ष्यच. तो अतिशय श्रम पावेल. अशीं माणसें आहेत त्यांनीं, तु. म्ह. मनुष्यपणाला काळिमा आणिला. मी माझें म्हणतां म्हणतां तीं देवाला विसरलीं. '

लक्ष्यप्रयोग–" यमाचा आंदण. "

शेरा—सात आठ प्रकारचीं माणसें माणुसकीला कमीपणा आणणारीं त्यांची यादी. बऱ्याच लौकिक समजुती आहेत.

९८.

कन्या गो करी कथेचा विकरा ।
चांडाळ तो खरा तया नांवें ॥ १ ॥
गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण ।
यातीशीं कारण नाहीं देवा ॥ २ ॥
जे जैसें करिती ते तैसें पावती ।
भोग ते भोगिती केले कर्मीं ॥ ३ ॥
आशाबद्ध करूं नये तें करिती ।
तुका म्हणे जाती नरकामधीं ॥ ४ ॥

पाठभेद——च० ३ पंढरपूर प्रतींत जास्त आहे.

अर्थ—गाय, कन्या किंवा हरिकथा यांचा विकरा करितो, याना मोलानें विकतो, तो चांडाळ. त्याचें नांव तेंच. माणसाचा उंचनीचपणा त्याच्या गुणावगुणांवरूनच ठरावयाचा, तेथें जातीचा कांहीं संबंध नाहीं. जे जसें करितात तसें ते भरतात, केल्यां कर्माचीं फळें त्यांना तशींच मिळतात. आशेच्या लोभानें माणसें करूं नये तशीं कर्में करितात आणि मग नरकांत जातात. करावें तसें भरावें. मं. ठ.

चर्चा—च० २ देवाला जातीशीं कांहीं कारण नाहीं. त्याला गुणावगुणच प्रमाण.

लक्ष्यप्रयोग——च० २ गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण, यातीशीं कारण नाहीं देवा.

शब्द—**कारण** = कर्तव्य. **विकरा** = विक्रय, विकणें.

शेरा—कर्मासारखें फळ मिळतें.

प्रमाणें द्रौपदीला संकट पडलें त्यावेळीं गडबडीनें द्रौपदीनें देवाचें स्मरण केलें, त्याचा धांवा केला, देवाला धीर निघेना. गरुडालाही मागें टाकून द्रौपदीसाठीं देव धांवून आला. तु. म्ह. देव भक्तांसाठीं फार तांतडी करितो. त्याला प्रेमाची आवड फार.

चर्चा--च० २ उठा उठी करी धांवा. हा चरण कोणाकडे घ्यावयाचा, परीक्षितीकडे ? परीक्षितीने घाइघाईनें देवाचा धांवा केला ? २ किंवा द्रौपदी कडे घ्यावयाचा ? तो तसा घ्यावा हें बरें दिसतें. वा० ब० प० परीक्षितीकडे घेणें विसंगत दिसतें.--पां. दा. गु.

शब्द—द्रौपदीच्या लागीं=द्रौपदीसाठीं.

च० १ परीक्षितीला तूं साप चावून सात दिवसांत मरशील असा शाप होता. म्हणून त्यानें सात दिवस भागवत ऐकिलें व मरण चुकविलें अशी कथा आहे.

शेरा—देवाला भक्ताचें प्रेम वाटतें; तो भक्ताला संकटाच्या वेळीं सहाय्य करितो.

१०३.

बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता ।
वचन नेणतां क्षमा कीजे ॥ १ ॥
वाट दावी तया न लगे शिणावें ।
अतित्याई जीवें नाश पावे ॥ २ ॥
निंब दिला रोग तुटाया अंतरीं ।
पोभाळितां वरी आंत चरे ॥ ३ ॥
तुका म्हणे हित देखण्यासी कळे ।
पडती आंधळे कूपामाजीं ॥ ४ ॥

पाठभेद—च. २ शिणावें–रुसावें.

अर्थ--आतांपर्यंत जें कांहीं बोललों, सांगितलें, तें तुमच्या हिताकरितां. त्यांतले शब्द मनावर घेऊं नका. शब्दांकडे पाहूं नका. शब्द वेडे वांकडे

असतील. मला कोणते शब्द योजावे हें कळलें नसेल तर त्याची क्षमा करा. २ जो वाट दाखवितो त्याच्यावर रागावूं नये. डोक्यांत राख घालणारा माणूस, आडमार्गानें जाणारा आतताई, जीवानें मरतो, जिवानिशीं जातो. ३ रोग तुटण्याकरितां पोटांत लिंब दिला, तो पोटांतच घ्यावा. वरच्यावरच चोळला तर रोग मात्र आंत बळावतो. डोळस आहे त्याला हित कळतें; जो पाहील त्याला हित दिसतें. अंधळे असतील, डोळे झांक करतील, ते विहिरींत पडतात व मरतात. मं. ठ.

चर्चा. च॰ १ वचन=१ श्रेष्ठवचन, शास्त्राधार. शास्त्रविरुद्ध ठाऊक नसून उपदेश केला त्याची क्षमा असावी. चिं. गं. भा.

२ बोलणें, बोलण्याची पद्धत. का. बा. म.

नेणतां=१ मनास न आणितां, मनावर न घेतां, अर्थांतच तुम्ही श्रोत्यांनीं. याठिकाणीं वचन=बोलणें, पद्धत. मराटे.

च॰ २ अतित्याई = अत्याचार करणारा माणूस.

मागें " आततायीपणा " असा अर्थ गेला आहे.

च॰ ३ एकंदरींत दुर्बोधच. माशा उपदेश हा लिंब, लोकांचा कुत्सितपणा हा रोग. असा अर्थ दिसतो.

पोभाळितां–पोभाळणें–चोळणें. पोभाळणें याचा मूळ अर्थ पू होणें. निंब पोटांत घ्यावयाचा असतो. तो तसा न घेतां वर चोळला तर त्या ठिकाणीं अंग पोभाळेल. पू होईल व ती जखम आंत चरेल. रोग बरा होण्याऐवजीं हें नवीनच दुखणें व्हावयाचें.

शेरा—डोळे उघडून पहा असा उपदेश.

१०४.

माकडें मुठीं धरिले फुटाणे ।
गुंतले ते नेणे हात तेथें ॥ १ ॥
काय तो तयाचा लेखावा अन्याय ।
हित नेणे काय आपुलें तें ॥ २ ॥

म्हणजे बाप देखील त्याची आज्ञा पाळतो. हीच मर्यादा सगळ्यांनीं प्रमाण करावी. ज्यानें त्यानें आपला अधिकार पाहून वागावें. वरासनाच्या ठिकाणीं, ज्या ठिकाणीं देवता मांडितात तेथ, दगड असला तरी तो सामान्य मानूं नये; दुसरीं उपकरणें सोन्याचीं असलीं, तरी तीं उपकरणेंच, तीं कमी प्रतीचीं. पैंजण सोन्याचा असला आणि मुकुटमणी हीणाचा असला तरी पैंजण पायांतच पाहिजे आणि मुकुटमणी डोक्यावरच पाहिजे. ज्याच्या करितां जें असेल तें त्या ठिकाणीं पाहिजे. प्रत्येक गोष्ट जिथल्या तिथें पाहिजे. चाकराला मान धन्यामुळें. नांव धन्याचें, धनहीं धन्याचेंच. तसेंच संतांना मान देवासाठीं—मं० ठ.

शब्द-प्रमाण = मुख्य गोष्ट, श्रेष्ठ. **पट्ट** = गादी **मर्यादा**=प्रमाण **पैंजण**=पायाच्या बोटांतील दागिना.

शेरा—शेवटच्या चरणांत सांगितलेला आशय.

१०१.

घरीं रांडा पोरें मरती उपवासी ।
सांगे लोकांपासीं थोरपण ॥ १ ॥
नेऊनिया घरा दाखवावें काय ।
काळतोंडा जाय चुकवूनि ॥ २ ॥
तुका म्हणे आम्हीं जाणों त्या प्रमाण ।
ठकावे हें जन तैसे नहों ॥ ३ ॥

पाठभेद—च० उपवासी—उपवासीं

अर्थ—घरीं बायकापोरें उपाशीं मरताहेत आणि बाहेर बढाई सांगतो—माझें असें आहे, इतकें आहे, इतक्या गाई म्हशी आहेत. "पाहूं या, चलाहो" असें म्हटलें तर हा घरीं नेऊन दाखविणार काय? म्हणून मग तोंड चुकवितो. "जरा जाऊन येतों अं" असें म्हणून तेथून पाय काढतो. तु. म्ह. आम्हीं त्याला ओळखून आहों हें अगदीं खरें समजा. इतर लोक फसतील तसे आम्ही फसणार नाहीं.

चर्चा—च० ३ 'आम्ही जाणों त्या प्रमाण.' या चरणार्धाचे बरेच अर्थ सुचविण्यांत आले.

१ आम्ही त्या प्रमाण जाणों ? आम्ही त्याला प्रमाण समजूं—असें तुम्हांला वाटतें का ? का० बा० म०

२ आम्ही त्याला ओळखतों, त्याप्रमाणें पाहिलें म्हणजे हे लोक—इतर-याला ठकतात, तसे आम्ही नव्हे.

माडगांवकरांच्या शं. उत्तर. वा० ब० प०

३ आम्ही अशा लोकांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून चालतों. इतर लोक फसतील तसें आमचें होणार नाहीं. डॉ. भांडारकर. व मं० ठ०

४ आम्हीं त्याला खरें खरें ओळखतों. चिं. गं. भानु.

५ आम्हीं त्याला ओळखतों हें खरें समजा. वा० ब० प०

शब्द—**काळतोंडा** = लाजेनें तोंड चुकविणारा; काळ्या तोंडाचा.

शेरा—बढाईखोर माणसाची निर्भर्त्सना.

१०२.

शुकसनकादिकीं उभारिला बाहो ।
परिक्षितीस हो दिसां सातां ॥ १ ॥
उठाउठीं करी स्मरणाचा धांवा ।
धरवत देवा नाहीं धीर ॥ २ ॥
त्वरा जाली गरुड टाकियेला मागें ।
द्रौपदीच्या लागें नारायणें ॥ ३ ॥
तुका म्हणे करी बहुत तांतडी ।
प्रेमाची आवडी लोभ फार ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ लोभ फार—लोभपर

अर्थ—अहो, सात दिवसांच्या अखेरीस शुकसनकादिकांनीं हात वर करून परीक्षिताला आशीर्वाद दिला. तो मुक्त झाल्याबद्दल त्याचें अभिनंदन केलें. त्याच-

शुकें नळिकेसी गोवियेले पाय ।
विसरोनि जाय पक्ष दोन्ही ॥ ३ ॥
तुका म्हणे एक ऐसे पशु जीव ।
न चले उपाय कांहीं तेथें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—माकडानें ओंजळींत फुटाणे धरून ठेविले तर त्यांत काय झालें ? त्याचे हात मात्र अडले. हात गुंतून राहिले हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. त्याला आपलें हित काय तें कळत नाहीं हा त्याचा अन्याय असें समजावयाचें कीं काय ? त्याचप्रमाणें पोपटाचा गोष्ट. तो नळीला पाय गुंतवितो व गुंतून पडतो. पण आपल्याला पंख आहेत आणि नळीचे पाय सोडून दिले तरी उडतां येईल हें तो विसरतो. असे कित्येक पशू आणि जीव जगांत दुसरेहि आहेत. त्यांना आपलें हित काय तें कळत नाहीं. आणि संसाराच्या लोभांत अडकून पडतात. त्यांच्या ठिकाणीं उपाय चालत नाहीं.

चर्चा. १ माकडें...फुटाणे–मडक्यांत फुटाणे घालून ते माकडापुढें ठेविले म्हणजे तें दोन्ही हात मडक्यांत घालून ओंजळ भरून काढावयाला पाहतें. ओंजळ निघत नाहीं, आणि फुटाणे तर सोडवत नाहींत. मराठे.

खांबाच्या आडून माकडाला फुटाणे घातले म्हणजे हातांत फुटाणे घेऊन तो खांबाला धरून बसतो. रा. ब. गो. वा. कानिटकर.

च० ३ शुकें...पाय. एका तारेंत नळी घालून तो झाडाच्या फांदीला लावून ठेवावी. राघू त्या नळीवर बसला म्हणजे ती नळी फिरते व राघू नळीला लोंबत रहातो. नळी सोडवत नाहीं कारण पडेन असें वाटतें म्हणून.

च० ४ पशुजीव = पशुसारखा जीव ज्यांचा असे लोक. डॉ. भांडारकर.

पशुसारखा जीव ज्यांचा अशा प्रकारचा बहुव्रीहि समास तुकारामाच्या कवितेंत विरळा येतो. तसा अर्थ करण्यापेक्षां असे पशु व असे जीव एकच, सारखेच. त्यांच्या ठिकाणीं कांहीं उपाय चालत नाहीं. असा अर्थ घ्यावा हें बरें वाटतें. वा० ब. प०

शब्द—**मुठीं**=मुठींत. इं प्रत्ययांत सप्तमी 'अ'कारांत स्त्री० नामाची क्वचित् होते. **लेखावा**=मानावा. **गोवियेले**=गुंतविले. **उपाय** = उपाय. **एक** = कित्येक.

शेरा.—अभंगांत अन्योक्ति आहे असें वाटतें. स्वतां होऊन प्रपंचाचे पाशांत गुंतावयाचें व मागून हळहळत बसावयाचें. पण विचार करणाराला या जाळ्यांतून सुटण्याचें साधन स्वतांपाशींच आहे असा अभिप्राय दिसतो.

१०५.

हरि तूं निष्ठुर निर्गुण । नाहीं माया वहु कठिण ।
नव्हे तें करिसी आन । कवणें नाहीं केलें तें ॥ १ ॥
घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव । राज्य घोडे भाग्य सर्व ।
पुत्र पत्नी जीव । डोंवाघरीं वोपाविलीं ॥ २ ॥
नळदमयंतीचा योग । विघडिला त्यांचा संग ।
ऐसें जाणे जग । पुराणेंही बोलती ॥ ३ ॥
राजा शिबी चक्रवर्ती । कृपाळु दयाळु भूतीं ।
तुळविलें अंतीं । तुळे मास तयाचें ॥ ४ ॥
कर्ण भिडतां समरंगणीं । बाणीं व्यापियेला रणीं ।
मागसी पाडोनी । तेथें दांत तयाचे ॥ ५ ॥
बळी सर्वस्वें उदार । जेणें उभारिला कर ।
करूनि काहार । तो पाताळीं घातला ॥ ६ ॥
श्रियाळाच्या घरीं । धरणें मांडिलें मुरारी ।
मारविलें करीं । त्याचें बाळ त्याहातीं ॥ ७ ॥
तुज भावें जे भजती । त्यांच्या संसारा हे गति ।
ठाव नाहीं पुढती । तुका म्हणे करिसी ते ॥ ८ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—देवा तूं निष्ठुर आहेस, निर्विकार आहेस, तुला दयामाया कांहीं नाहीं. कधीं कुणी केलें नाहीं तें, भलभलतें करतोस तूं. हरिश्चंद्र राजाचें भाग्य, वैभव, राज्य, घोडे हीं सर्व तूं घेतलींस आणि मुलगा, बायको आणि स्वतां यांना तूं त्याला डोंबाच्या घरीं विकून घ्यावयाला लावलेंस. नळदमयंतीचा

वियोग करविलास असें पुराणें सांगतात. शिबी राजा सार्वभौम. तो मोठा कृपाळु होता. त्याला आपलें स्वतांचें मास तागडींत घालून वजन करावयाला लावलेंस. कर्ण समरांगणांत उभा आहे, शत्रूनीं वेढिलेला आहे, अशा वेळीं त्याचे दांत पाडून मागितलेस. बळी फार उदार होता, सर्वस्व देण्याला देखील तयार, त्यानें दान देण्याकरितां हात वर केला तों तूं कहार करून त्याला पाताळीं घातलास. श्रियाळाच्या घरीं धरणें घेतलेंस आणि प्रत्यक्ष त्याच्या मुलाचा घात त्याच्याकडून करविलास. याप्रमाणें जे भक्तिभावानें तुला भजतात त्यांच्या संसाराची अशी भलती गत तूं करितोस. मग पुढें मरणोत्तर काय त्यांची गति करशील हें कळत नाहीं.

शब्द—**आन** = भलतें कांहीं तरी. **वोपविलीं**—**ओपणें** = विकणें. **डोंब** = स्मशानाची राखण करणारा महार. **तुळें** = तुळेनें, तागडीनें. **धरणें मांडिलें** = आडवून वसलास. **त्या हातीं** = त्याचे हातून. **काहार** = कहर, पराकाष्ठा, अनर्थ.

शिबिराजा—शिबिराजा दयाशील. त्याचें सत्व पहाण्याकरितां इंद्र व दुसरा एक देव श्येन व कपोत यांचीं रूपें घेऊन गेले. व श्येन कपोताच्या पाठीस लागला. शिबीनें कपोताला आश्रय दिला तेव्हां श्येनानें बदली तितकें नरमांस मागितलें. तें शिबिराजानें आपल्या आंगचें काढून तोडून दिलें. अशी कथा आहे. मराठे.

च० ५ कर्णाचा दांत सोन्याचा होता, तो मागितला ही कृष्णाचीच युक्ती.
मराठे.

शेरा—देवा, तुला भजतात त्यांच्या संसाराची इथें, या जगांत ही स्थिति करितोस, मग पुढें काय करणार आहेस कुणाला ठाऊक? हा अर्थ धरल्यास, सुखदुःखाची विषम वांटणी जगांत पाहून विचारी माणसाच्या मनाची जशी संदेहवृद्धि होते तशीच हा अभंग रचिते वेळीं कवीची झाली होतीसें वाटतें. अत्यंत पापभीरु माणूस जगांत हाल अपेष्टा काढतो. तर अत्यंत नीतिभ्रष्ट चैनींत लोळतो हें कसें? ईश्वराच्या घरीं हें कसें खपतें? असले उद्वेगाचे प्रश्न मनांत येतात. व त्यांचें समाधानकारक उत्तर मिळत नाहीं. कवीनेंही तें येथें मुग्धच ठेविलें आहे. वा० ब० प०

१०६.

चाल कैलासी मोकळा ।
वोल विठ्ठल वेळोवेळां ॥ १ ॥
तुज पापचि नाहीं ऐसें ।
नाम घेतां जवळी वसे ॥ २ ॥
पंच पातकांच्या कोडी ।
नामें जळतां न लगे घडी ॥ ३ ॥
केली मागें नको पाहों ।
तुज जमान आम्ही आहों ॥ ४ ॥
करीं तुज जीं करवती ।
आणिक नामें घेऊं किती ॥ ५ ॥
तुका म्हणे काळा ।
रीग नाहीं निघती ज्वाळा ॥ ६ ॥

पाठभेद—च० ४ पाहों–राहों । पुढें–तुज.

अर्थ—विठ्ठल, विठ्ठल असें वरचेवर म्हण, म्हणजे मोकळा झालास, जा. सगळ्या पापांतून मुक्त झालास. तुझें असें कोणतेंहि पापच नाहीं, कीं तें विठ्ठलाचें नांव घेतल्यावर तुझ्यापाशीं राहील.पंच महापापांच्या राशी देखील देवाचें नांव घेतल्याबरोबर जळून जातात. घटकेचा देखील उशीर लागत नाहीं. मागें पापें केलींस असें म्हणतोस? तीं पाहूं नको, त्याची काळजी करूं नको आणि पुढच्या संबंधानें आम्हीं जवाबदार आहोंत. काय, पुष्कळ पापें केलीं आहेत असें म्हणतोस ? करेर. हवीं तेवढीं कर. तीं सारीं जळून खाक व्हावयाचीं. त्यांचीं आणखी नांवें तरी किती सांगूं ? त्या ठिकाणीं काळाला देखील रीघ मिळावयाची नाहीं. पापें जळावयाला लागलीं म्हणजे त्यांच्या ज्वाळा निघतील.

चर्चा—च० ३ कोडी=वीस असें कोशांत सांपडतें. Score या इंग्रजी शब्दाचा अपभ्रंश आहे काय ? कोडी = राशी.

च० ४ केलीं मागें नका **राहों**। **तुज** जमान असा पाठ आहे तो बरोबर

दिसत नाहीं. **पाहों** व **पुढें** असेच पाठ घेण्यानें अर्थ संगतवार लागतो, म्हणून ते पाठ घ्यावे. मं. ठ.

च० ५ करीं तुज...या चरणाचा मं. ठ. ला अर्थ वर दिला आहे. डॉ. भांडारकरांचें या अर्थानें समाधान झालें नाहीं. त्यांना याचा अर्थ निराळा हवा होता. वा० ब० प०

'आतां मागें नको राहों,' हा पाठ घेतला तर "पापें केलींस तीं केलींस आतां नामस्मरणाला तरी मागें राहूं नको, मग आम्ही तुला जामीन आहोंत" असा अर्थ करावा.

च० ६ काळा रीघ नाहीं।...कोठें? तूं कितीही पापें केलींस तरी त्यांच्यामुळें तुला शासन करावयाला काळाला सवड मिळावयाची नाहीं. असा भाव दिसतो. सं०

शब्द. कोडी=राशी. **जमान**=जामीन. **रीघ**=रीग, सवड, अवकाश.

शेरा.—नामाच्या महिम्याचें लौकिकी स्तोत्र.

१०७.

बाळ बापा म्हणे काका।
तरि कां निरपराध पारिखा ॥ १ ॥
जैसा तैसा भाव गोड।
पुरवी कोड विठ्ठल ॥ २ ॥
साकरेसी म्हणतां धोंडा।
तरी कां तोंडा न रुचे ॥ ३ ॥
तुका म्हणे आरुष बोल।
नव्हे खोल आहाच ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ तरिका निपराध पारिखा. च० ४ बोल—फोल.

अर्थ—मुलानें बापाला काका म्हणून हांक मारिली त्यामुळें बाप कांहीं परका होत नाहीं, किंवा मूल अपराधी ठरत नाहीं, कां? तर त्या ठिकाणीं शब्दाला

महत्त्व नसतें. तसेंच देवाच्या ठिकाणीं–जसा भाव, तसा देव; आपला भाव असेल त्याप्रमाणें विठ्ठल आपलें कोड पुरवितो. ३ साखरेला धोंडा म्हटलें तरी ती काय तोंडाला रुचकर लागणार नाहीं ? तु. म्ह. बोलणें जरी आर्ष, रुक्ष, वेडेंवांकडें असलें तरी तें केवळ आर्ष म्हणून फोल असें मात्र म्हणूं नये.

चर्चा—च० १ " निपराध " असाही पाठ आहे तो घेतल्यास त्याचा अर्थ ' पारखा ' = परका असा करावा. निपराध = नीच, हलकट, पारखा–बाबूराव.

(१) तरी तो कां अपराधी असा पाठ असेल का ?

(२) ' का ' हें केवळ पादपूरक घ्यावें–सं.=तरी तो निरपराधीच.

च० ४ आरुष बोल आहाच नव्हे, बोल. बोल=ओला. बोलणें वाहेरून रुक्ष दिसलें तरी तें वायफळ नव्हे, त्यांत ओलावा असतो. माडगांवकर.

वा० व० प०

" फोल" असा पाठ घेतल्यास **फोल** व **आहाच** हे दोन्ही एकाच अर्थी.

च० ४ मुलाचे बोल आर्ष असले तरी त्यांतला भाव सरळ निष्कपटपणाचा असतो.

शब्द-निपराध ' पारखा ' बाबूराव. **आरुष** = आर्ष ऋषीचे = कठीण–कारण वेदकालीन ऋषींची भाषा पुढें समजेनाशी, दुर्बोध झाली. **आहाच** = फुकट, निष्फळ.

शेरा—भाव तसा देव.

१०८.

चित्तीं नाहीं तें जवळी असोनि काय ।
वत्स सांडी माय तेणें न्यायें ॥ १ ॥
प्रीतीचा तो वायु गोड लागे मात ।
जरी जाय चित्त मिळोनियां ॥ २ ॥
तुका म्हणे अवघें फिकें भावाविण ।
मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ॥ ३ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—मनांत नसलें आणि मग एकादी वस्तु अगदीं हाताशीं असली, एकादी गोष्ट करणें अगदीं आपल्या हातांत असलें, तरी काय उपयोग ? आई मुलाकडे पहात नाहीं त्या न्यायानेंच. गाईच्या मनांत वासराला पाजावयाचें नसलें म्हणजे ती त्याच्याकडे वघत नाहीं. बोलण्यांत प्रीतीच्या वाऱ्याची झुळुक असली म्हणजे तें बोलणें गोड लागतें; चित्तें एकमेकांशीं मिळून गेलीं म्हणजे बोलणें गोड लागतें. २ तु. म्ह. भाव नसला म्हणजे सगळें फिकें. अन्नांत मीठ नसलें म्हणजे अन्न जसें फिकें लागतें, त्याला जशी रुचि येत नाहीं तसें.

चर्चा—च० २ प्रीतीचा.....मात १ शब्द म्हणजे वायूच. तो प्रेमानें भरलेला असला, आंतून प्रेम असलें म्हणजे त्या बाहेरच्या शब्दांनीं सांगितलेली गोष्ट गोड लागते. माडगांवकर.

या अर्थांत वायू''ची फार ओढाताण होते. ध्वनिशास्त्राच्या आधारानें 'वायु'चा प्रयोग 'शब्द' या अर्थी तुकारामानें केला असेल हें संभवत नाहीं.

वा. ब. प.


२ मात = गोष्ट. कोणतीही गोष्ट गोड लागते ती प्रीतीचें वारें असतें म्हणून. डॉ. भांडारकर.

३. डॉ. भांडारकरांचा अर्थ घेतल्यास उत्तरार्धाचा संबंध लागत नाहीं. पूर्वार्धांतच अर्थ पूर्ण होतो. चित्त मिळून नुसता वाराहि गोड लागतो, प्रीतीची म्हणून मातीहि गोड लागते. वा. ब. प.

रा. पटवर्धनांनीं सुचविलेल्या अर्थांत 'मात' या शब्दाची ओढाताण होते. म्हणून एकंदरींत डॉ. भांडारकरांचाच अर्थ घ्यावा सं.

शब्द—**मात**=गोष्ट. कानडी ? **सांडी**=टाकिते, दुर्लक्ष करिते.

शेरा—बरें वाईट भावावर आहे.



१०९.

काय काशी करिती गंगा ।
भीतरीं चांगा नाहीं तो ॥ १ ॥
आधणीं कुचर बाहेर तैसा ।
नये रसा पाकासी ॥ २ ॥
काय टिळे करिती माळा ।
भाव खळा नाहीं त्या ॥ ३ ॥
तुका म्हणे प्रेमेंविण ।
बोले भुंके अवघा शीण ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ नाहीं त्या–नाहीं तो.

अर्थ—जो मनानें शुद्ध नाहीं, त्याला काशी काय करणार आणि गंगा तरी काय करणार ? कुचर असतो तो जसा बाहेर तसाच आधणांत, तो कधी शिजावयाचा नाहीं, पाकाला यावयाचा नाहीं. २ ज्या खळाच्या मनांत देवाविषयीं भक्ति नाहीं, त्यानें टिळे लाविले आणि माळा घातल्या तरी काय उपयोग ? तु. म्ह. प्रेमाशिवाय बोलणें आणि भुंकणें एकच. सगळाच शीण.

शब्द–चांगा–चांगला, शुद्ध **भीतरीं**–आंत, अंतर्यामीं **कुचर**–कठिण दाणा.

शेरा—शुद्धपणा मूळचा, अंतरींचा, पाहिजे, वरवरचा उपयोगीं नाहीं.

११०.

शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास ।
बाईल तो त्यास न विसंवे ॥ १ ॥
दुष्टबुद्धि चोरी करी निरंतर ।
तो म्हणे इतर लोक तैसे ॥ २ ॥
तुका म्हणे जया चित्तीं जे वासना ।
तयाची भावना तयापरी ॥ ३ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—शिंदळ असतो त्याला साडूचा विश्वास येत नाहीं आणि तो आपली बायको त्याला विसंबत नाहीं. ज्याची बुद्धि दुष्ट तो नेहमीं चोऱ्या करितो. आणि इतर लोकही तसेंच करीत असतील असा त्याला संशय येतो. ३ तु. म्ह. ज्याची जशी वासना, तशी त्याची भावना असते.

शब्द—**शिंदळ** = व्यभिचार करणारा पुरुष, किंवा वाईट चालीची स्त्री. **न विसंबे** = विसंवत नाहीं. **विसंबणें** = विश्वासानें हवालीं करणें, अंगावर टाकणें.

शेरा—जशी वासना तशी भावना.

१११.

धाकुट्याचे मुखीं घांस घाली माता ।
वरी करी सत्ता शाहाणियां ॥ १ ॥
ऐसें जाणपणें पडिलें अंतर ।
वाढती तो थोर अंतराय ॥ २ ॥
दोन्ही उभयतां आपणाचि व्याली ।
आवडीची चाली भिन्न भिन्न ॥ ३ ॥
तुका म्हणे अंगापासूनि निराळें ।
निवाडिलें बळें रडतें स्तनीं ॥ ४ ॥

पाठभेद— नाहींत.

अर्थ—आई लहान मुलाला भरविते आणि जाणत्या, मोठ्या, मुलांवर सत्ता करिते, त्यांना रागें भरते. २ धाकटा आणि मोठा यांच्यांत हें जें अंतर पडतें तें जाणतेपणामुळें. जों जों मुलें वाढतात, थोर होतात तों तों आई आणि तीं यांच्यामधील अडथळा वाढतो, अंतर जास्त जास्त होतें. लहान आणि जाणतें हीं दोन्ही मुलें एकाच आईचीं, पण आवडीचा प्रकार मात्र वेगळा. ४ तु. म्ह. जाणतें असतें तें ती अंगापासून दूर करिते आणि रडतें त्याला स्तनीं लावते.

चर्चा—च० १ शहाणियां वरी सत्ता करी. असा अन्वय. सामान्यरूप आणि पुढील शब्दयोगी अव्यय एकमेकांपासून दूर आहेत.

च० ३ आवडीची चाली भिन्न भिन्न.

लहानाला जवळ करणें व थोराला रागें भरणें या दोहींतही प्रेम आहेच. थोराला आई रागें भरते ती त्याच्यावर प्रेम नसतें म्हणून नव्हे. दोघांच्या ठिकाणीं प्रेम एकसारखेंच. पण, तें दाखवावयाचा प्रकार मात्र निराळा.

च० ४ निवडिलें बळें.....निवडिलें=मोठें झालेलें (मूल), जाणतें, निवडिलें=निवडिलेलें=वाढलेलें मं. ठ.

बळें=मुद्दाम, बळानें.

वर दिलेला अर्थ मला चुकीचा वाटतो. ' बळें ' हें क्रियाविशेषण केल्यामुळें हा घोंटाळा झाला आहे. त्यामुळेंच निवडिलें=वाढलेलें असा चमत्कारिक अर्थ करावा लागला. बळें=बळवान्, जाणतें (मूल) अंगापासूनि निराळें निवडिलें, रडतें (रडणारें, लहान मूल) स्तनीं (लावी) असा अन्वय. संपादक.

शेरा—प्रेम एकच, पण प्रकार भिन्न.

११२.

देवाचे म्हणोनी देवीं अनादर ।
हें मोठें आश्चर्य वाटतसे ॥ १ ॥
आतां येरा जना म्हणावें ते काई ।
जया भार डोईं संसाराचा ॥ २ ॥
त्यजुनि संसार अभिमान सांटा ।
जुलूम हा मोठा दिसतसे ॥ ३ ॥
तुका म्हणे आळस करूनियां साहे ।
बळें कैसें पाहें वांयां जाती ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—आम्हीं देवाचे, (दास, किंवा भक्त) असें म्हणून हे देवाच्या ठिकाणीं अनादर करितात, याचें मोठें आश्चर्य वाटतें. तेव्हां आतां, इतर लोक, ज्यांच्या डोक्यावर संसाराचा भार आहे, त्यांना काय म्हणावयाचें? त्यांना दोष लावायला काय तोंड आहे ? हे भक्त म्हणविणारे लोक संसाराचा त्याग करून देखील अभिमानाचा सांठा करितात, हा मोठा जुलूमच झाला म्हणावयाचा ! तु. म्ह. हे लोक आळसाच्या संगतीनें जाणून बुजून वायां जातात, आयुष्याचा नाश करितात.

शब्द—सांटा=सांठा. **येर**=इतर सामान्य लोक. **साहे**=सहाय्य.

शेरा—आम्हीं देवाचे दास, तेव्हां देवानेंच आमचा सगळा भार घेतला पाहिजे, आम्हांला आतां मोक्षप्राप्तीकरितां श्रम करण्याची काय जरूर आहे, किंवा पोट भरण्याकरितां तरी काम कशाला करावयाला हवें, इतरांनीं आमच्या चरित्रार्थाचा भार कां वाहूं नये, असें म्हणणाऱ्या आळशी आयतोबांच्यावर रोंख दिसतो. " आळस करुनि सारे वायां जाती " हें मुख्य धरावें.—

संपादक.

११२.

उपदेश भलत्या हातीं ।
जाला चित्तीं धरावा ॥ २ ॥
नये जाऊं पाठावरी ।
कवटी सार नारळें ॥ २ ॥
स्त्री पुत्र बंदिजन ।
नारायण स्मरवितो ॥ ३ ॥
तुका म्हणे रत्नसार ।
परि उपकार चिंधीचे ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—उपदेश असला म्हणजे मग तो भलत्या हातीं जरी असला तरी घ्यावा, मनांत ठेवावा. बाहेरच्या भांड्यावर जाऊं नये. उदाहरणार्थ नारळांत कवटी देखील उत्तम, कां तर नारळामुळें. ३ तसेंच स्त्रीपुत्र, दासदासी हीं त्याज्य नव्हेत, कारण त्यांच्यामुळें नारायणाचें स्मरण होतें. ४ तु. म्ह. रत्न हें मुख्य खरें. पण तें चिंधींत बांधलें असलें तर चिंधीचे उपकार रत्नाला होतात. रत्नाकरितां चिंधीही पत्करावी लागते, तसेंच हें आहे.

चर्चा—च० २ कवटी सार नारळें.

१ कवटी देखील सारी=उत्तम कां ? नारळें=नारळामुळें. सारी हें कवटीचें विशेषण. सारूं=चांगलें, बरें (गुजराथी) सं. डॉ. भां.

२ ' कवटी, पण सार नारळ ! संक्षिप्त रीतीनें सांगितलें आहे. कवटीवर जाऊं नये. कारण नारळ हें सार. सार काय तें नारळांत असतें. मराठे. हा अर्थ करितानां फार ओढाताण होते. (सं.)

च० ३ स्त्रीपुत्र, दासदासी हीं जरी त्याज्य असलीं तर त्यांच्यामुळें देवाची आठवण होते. स्त्रीचें नांव रखुमाई असलें, मुलाचें नांव विठोबा, नारायण, पांडुरंग असें कांहीं असलें, तसेंच चाकराचें, तर त्यांना नांवानें हांक मारण्यांत तोंडानें देवाचें नांव येतें असा अर्थ आहे काय ? सं•

च० ४ चिंधीचे उपकार. मोहरा हें रत्न ओळखूं येतें तें त्याला बांधिलेली चिंधी जळत नाहीं म्हणून. न जळणारी चिंधी रत्नसाराला=मोहऱ्याला मोहरा ठरविते, हा चिंधीचा उपकार.

उत्तम रत्न असलें तरी त्याचें रक्षण चिंधीच करते. आणि तिचा त्यामुळें रत्नावर उपकार होतो, आपल्या इकडे हिरे मोतीं कापडाच्या चिंधींत बांधण्याची चाल आहे हें मनांत ठेवून अर्थ करावा. वा. ब. प. माडगांवकर.

शब्द—**कवटी** = नारळाचें बाहेरचें कवच, करटी. **सारी** = चांगली, ग्राह्य. **सारूं** (गुजराती) = बरें, मुख्य गोष्ट.

शेरा—पात्रावर जाऊं नये. सार मुख्य.

११४.

संतांचे गुणदोष आणितां या मना ।
केलिया उगाणा सुकृताचा ॥ १ ॥
पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ ।
चिरोनि केळी केळ गाढव तो ॥ २ ॥
तुका म्हणे गंगे अग्नीसी विटाळ ।
लावी तो चांडाळ दुःख पावे ॥ ३ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—संतांचे गुणदोष मनास आणिले, त्यांच्या गुणदोषांची चिकित्सा करूं लागलें, म्हणजे केलेलें पुण्य नाहींसें होतें. फूल पिळून काढून त्याचा वास पाहूं जातो, किंवा केळीचा गाभा चिरून आंत केळीं कोठें आहेत तें शोधितो तो गाढव समजावा. त्याचप्रमाणें गंगा किंवा अग्नि यांना विटाळ लावूं पहातो तो दुःख पावतो. गंगा आणि अग्नि हीं स्वतःच शुद्ध. त्यांच्यापासून इतरांना शुद्धि मिळावयाची. तींच दूषित ठरलीं तर जगांत शुद्ध किंवा सोंवळें राहिलें कोठें ?

चचो—च० १ उगाणा = झाडा ? —सुकृतांचा उगाणा होय = होतो असें क्रियापद अध्याहृत घ्यावें. वा. ब. ब.

शब्द-उगाणा = नाश. **पिळोनियां पाहे**-परिमळ म्हण चोळूं नये फूल.- हा चरण पहावा.

शेरा—संतांच्या ठिकाणीं दोष नाहीं.

अर्थ—उपदेश असला म्हणजे मग तो भलत्या हातीं जरी असला तरी घ्यावा, मनांत ठेवावा. बाहेरच्या भांड्यावर जाऊं नये. उदाहरणार्थ नारळांत कवटी देखील उत्तम, कां तर नारळामुळें. ३ तसेंच स्त्रीपुत्र, दासदासी हीं त्याज्य नव्हेत, कारण त्यांच्यामुळें नारायणाचें स्मरण होतें. ४ तु. म्ह. रत्न हें मुख्य खरें. पण तें चिंधींत बांधलें असलें तर चिंधीचे उपकार रत्नाला होतात. रत्नाकरितां चिंधीही पत्करावी लागते, तसेंच हें आहे.

चर्चा—च० २ कवटी सार नारळें.

१ कवटी देखील सारी=उत्तम कां ? नारळें=नारळामुळें. सारी हें कवटीचें विशेषण. सारूं=चांगलें, बरें (गुजराथी) सं. डॉ. भां.

२ ‘ कवटी, पण सार नारळ ! संक्षिप्त रीतीनें सांगितलें आहे. कवटीवर जाऊं नये. कारण नारळ हें सार. सार काय तें नारळांत असतें. मराठे. हा अर्थ करितानां फार ओढाताण होते. (सं.)

च० ३ स्त्रीपुत्र, दासदासी हीं जरी त्याज्य असलीं तर त्यांच्यामुळें देवाची आठवण होते. स्त्रीचें नांव रखुमाई असलें, मुलाचें नांव विठोबा, नारायण, पांडुरंग असें कांहीं असलें, तसेंच चाकराचें, तर त्यांना नांवानें हांक मारण्यांत तोंडानें देवाचें नांव येतें असा अर्थ आहे काय ? सं•

च० ४ चिंधीचे उपकार. मोहरा हें रत्न ओळखूं येतें तें त्याला बांधिलेली चिंधी जळत नाहीं म्हणून. न जळणारी चिंधी रत्नसाराला=मोहऱ्याला मोहरा ठरविते, हा चिंधीचा उपकार.

उत्तम रत्न असलें तरी त्याचें रक्षण चिंधीच करते. आणि तिचा त्यामुळें रत्नावर उपकार होतो, आपल्या इकडे हिरे मोतीं कापडाच्या चिंधींत बांधण्याची चाल आहे हें मनांत ठेवून अर्थ करावा. वा. ब. प. माडगांवकर.

शब्द—**कवटी** = नारळाचें बाहेरचें कवच, करटी. **सारी** = चांगली, ग्राह्य. **सारूं** (गुजराती) = वरें, मुख्य गोष्ट.

शेरा—पात्रावर जाऊं नये. सार मुख्य.

११४.

संतांचे गुणदोष आणितां या मना ।
केलिया उगाणा सुकृताचा ॥ १ ॥
पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ ।
चिरोनि केळी केळ गाढव तो ॥ २ ॥
तुका म्हणे गंगे अग्नीसी विटाळ ।
लावी तो चांडाळ दुःख पावे ॥ ३ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—संतांचे गुणदोष मनास आणिले, त्यांच्या गुणदोषांची चिकित्सा करूं लागलें, म्हणजे केलेलें पुण्य नाहींसें होतें. फूल पिळून काढून त्याचा वास पाहूं जातो, किंवा केळीचा गाभा चिरून आंत केळीं कोठें आहेत तें शोधितो तो गाढव समजावा. त्याचप्रमाणें गंगा किंवा अग्नि यांना विटाळ लावूं पहातो तो दुःख पावतो. गंगा आणि अग्नि हीं स्वतःच शुद्ध. त्यांच्यापासून इतरांना शुद्धि मिळावयाची. तींच दूषित ठरलीं तर जगांत शुद्ध किंवा सोंवळें राहिलें कोठें ?

चर्चा—च० १ उगाणा = झाडा ? —सुकृतांचा उगाणा होय = होतो असें क्रियापद अध्याहृत ध्यावें. वा. ब. ब.

शब्द-**उगाणा** = नाश. **पिळोनियां पाहे**-परिमळ म्हण चोळूं नये फूल-हा चरण पहावा.

शेरा—संतांच्या ठिकाणीं दोष नाहीं.

११५.

चुंवळीचा करी चुंबळीशीं संग ।
अंगीं वसे रंग क्रियाहीन ॥ १ ॥
बीजा ऐसें फळ दावी परिपाकीं ।
परिमळ लौकिकीं जातीऐसा ॥ २. ॥
माकडाच्या गळां रत्न कुळांगना ।
सांडूनिया सुना बिदी धुंडी ॥ ३
तुका म्हणे ऐसा व्याली ते गाढवी ।
फजिती ते व्हावी आहे पुढें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत

अर्थ—चुंबळ ठेवून मैथुनाची भावना करितो त्याचा रंग, त्याची शृंगार-चेष्टा क्रियाहीनच. बीज तसा परिपाक आणि झाडाची जात जशी असेल तसा त्याच्या फुलाला वास यावयाचा. माकडाच्या गळ्यांत रत्न बांधिलें तर त्याला त्याची काय किंमत ? तसेंच सुना—श्वान, कुत्र्याच्या वृत्तीचा बाहेर ख्याली माणूस, घरची बायको सोडून गल्ल्या धुंडीत जातो. तु, म्ह. अशा मुलाला जन्म जिनें दिला ती गाढवी. अजून फजिती व्हावयाची ती पुढेंच आहे.

चर्चा—च० १ चुंबळीचा करी.....संग.....

चुंभळ्या = व्यभिचारी पुरुष. चुंभळ = चुंबळ=व्यभिचारिणी स्त्री, असा अर्थ घेतला तर ? चुंवळीचा = शिनळ माणूस, शिंदळीशीं संग करितो त्याच्या आंगीं रंग व क्रिया वाईटच वसते, असा अर्थ करावा, वा. ब. प.

(२) चुंवळीवर चुंबळ ठेवून तेथें मैथुनाची भावना करितो त्याच्या आंगीं रंग व क्रिया हीन प्रकारचीच असते. स्वतः निर्बळ किंवा क्लीब असणारा पण चावट माणूस शृंगाराचे चाळे फार करितो त्याला उद्देशून हा चरण व अभंग लिहिला आहे काय ?

च० २ सुना बिदी धुंडी.....

(१) 'सुना' हें बिदीचें विशेषण करावें सुना बिदी = सुन्या, रिकाम्या गल्ल्या. डॉ० भां० पण मग रिकाम्या बिदी धुंडणार कोण आणि कशाला ?

(२) सुना = नागडा, नंगा, वस्त्रहीन ? वा. ब. प.

सुना = नंगा माणूस, कुलांगना, टाकून बिदी धुंदी.

(३) २ सुना = कुत्रा, श्वानवृत्तीचा पुरुष संपादक

शब्द—चुंबळ = शिनळ = शिनळ स्त्री. **रंग** = वर्ण. शृंगार चेष्टा. **चुंबळ** = गवताची किंवा चिरगुटाची गुंडाळी डोक्यावर ओझें घेतांना खालीं घेतात ती. **क्रियाहीन** = पोकळ, निष्क्रिय. **परिपाक** = परिणाम **कुलांगना** = कुलस्त्री. **सुना** = कुत्रा, तशा प्रकारच्या वृत्तीचा माणूस. **बिदी** = गल्ली.

लक्ष्यप्रयोग.

च० २ बीजा ऐसें फळ दावी = दिसतें.

च० ४ फजीती व्हावी आहे = व्हावयाची आहे.

शेरा—अभंगाचा मतितार्थ फारसा नाहीं. तुकारामाच्या अभंगांत पुष्कळदां कविता करावयाची म्हणून केली, असा प्रकार झाला असल्याची शंका येते. तशांतलाच हा अभंग असेल काय ? " बीजा ऐसें फळ दावी पाकीं " हा चरण मुख्य धरिल्यास, बाकीच्या चरणांत मूर्ख लोकांचा तिरस्कार असाव। असें वाटतें. वा. ब. प.

११६.

सांपडला संदीं ।
मग बाळिया पडे बंदीं ॥ १ ॥
ऐसी कोणी वाहे वेळ ।
हातीं काळाच्या सकळ ॥ २ ॥
दाता मागे दान ।
जाय याचका शरण ॥ ३ ॥
तुका म्हणे नेणां ।
काय सांगों नारायणा ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ बंदीं—फंदीं.

अर्थ—संदींत, अडचणींत, सांपडला म्हणजे तो बळिष्ठ असला तरी बंदांत पडतो, गोत्यांत येतो, लाचार होतो. अशी एक वेळ येईलच कीं, आम्हीं सर्व काळाच्या हातांत जाऊं. केव्हां कशी वेळ येईल याचा नेम नाहीं. सगळें काळाच्या हातांत आहे. दाता असतो त्याला लोकांपाशीं दान मागण्याची पाळी येते; याचकाकडे शरण जावें लागतें. तु. म्ह. नारायणा, तुम्हांला काय सांगावयाचें ? तुम्हांला समजत नाहीं का ? तुम्हांला सर्व समजतें आहेच.

चर्चा—च० २ सगळें काळाच्या हातीं आहे. अशी–अडचणीची–वेळ केव्हां तरी येतेच.

ऐसा आहे कोणी बळी ? ऐसें कोणा आहे बळ? असा पाठ असेल का ? असा असला तर अर्थ जास्त बरा लागेल. असें वर कुणाला आहे का, कीं तो काळाला जिंकील? नाहीं. सगळें काळाच्या हातांत आहे. संपादक.

च० ४ नारायणा, नेणां ? सांगों काय ? तुम्हांला समजत का नाहीं ? मी काय सांगूं ?

डॉ. भांडारकर.

मराठी काव्यांत प्रश्नार्थी शब्दांशिवाय प्रश्नार्थी वचन फारसें येतांना दिसत नाहीं. म्हणून डॉ. भांडारकरांचा अर्थ घ्यावयाला मन कचरतें. वा० ब० प०

शब्द—संदीं = सांदी कोपऱ्यांत, अडचणींत. **बळिया** = बलवान माणूस.

शेरा—' बळी असला तरी त्या अडचणीची वेळ येते, व तो लाचार होतो. नारायणाला ओळखणें हा अडचणी तरून जावयाचा उपाय. तो तुम्ही बळी हो, जाणत नाहीं, मग काय सांगावें ? अशा अभिप्रायाचा हा अभंग असावा असें वाटतें.

११७.

सर्प विंचू दिसे ।
धन अभाग्या कोळसे ॥ १ ॥
आला डोळयांस कवळ ।
तेणें मळलें उजळ ॥ २ ॥

अंगाचे भोंवडी ।
भोय झाड फिरती धोंडी ॥ ३ ॥
तुका म्हणे नाड ।
पाप ठाके हिताआड ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ उजळ–जवळ

अर्थ.—अभागी माणूस असला म्हणजे धन न दिसतां त्याच्याऐवजीं त्याला साप, विंचू आणि कोळसे दिसतात. डोळ्यांना कावळीचा रंग आला म्हणजे उजळ असतें तेंहि मळीण दिसूं लागतें. अंगाला भोंवड आली म्हणजे भोंवतालचीं भुई, झाडें, धोंडे, सर्व फिरताहेत असें वाटतें. तु. म्ह. पाप ही नाड आहे–तें हिताच्या आड येतें.

चर्चा—च० २ 'जवळ' या पाठानें अर्थ लागत नाहीं. तो पाठ नीरस समजावा.

शेरा—नाहीं.

११८.

न देखेन कांहीं ।
म्यां पाहिलें सकळही ॥ १ ॥
जालों अवाघियांपरी ।
मी हें माझें ठेलें दुरी ॥ २ ॥
न घेतां घेतलें ।
हात पाय उसंतिलें ॥ ३ ॥
खादलें न खातां ।
रसना रस धाली घेतां ॥ ४ ॥
न बोलोनि बोलें ।
केलें प्रगट झांकिलें ॥ ५ ॥

पाठभेद—च० ४ धाली–जाली

अर्थ—मीं कांहींच पाहिलें नाहीं तरी सर्व पाहिलें. मी सर्वांच्या सारखा, देवाशीं एकरूप झालों, निराळा राहिलों नाहीं. मी, माझें, अशा प्रकारचा भाव माझ्या ठिकाणीं उरला नाहीं हातांनीं घेतलें नाहीं पण सर्व कांहीं पावलें. न खातां खाल्लें–न चाखतां सर्व चाखलें. जीभ रस घेत असतांना रस–स्वरूपच झाली. न बोलतां बोललों आणि झाकिलेलें होतें तें प्रकट केलें. कानांनीं ऐकिलें नाहीं, तरीपण सर्व ध्यानांत आलें, समजलें.

चर्चा—च० ३ उसंतिलें=उचलिलें, पार पाडिलें, शेवटास नेलें. प्रत्यक्ष भोग न घेतांहि सगळे इंद्रियप्राप्त आनंद भोगल्यासारखे झाले. मं० ठ०

च० ४ रसना रस (न) घेतां रसच झाली. मागील अर्धांतला 'न' इकडे घेतला पाहिजे. रस न घेतांही, रसना रस घेऊन समाधान पावली, रसच झाली. मं० ठ०

च० ४ माडगांवकर. शंका व उत्तर. "रसना रस झाली घेतां" रसना रसास्वाद घेतां तद्रूप झाली, रसना व रस यांतील भेद नाहींसा झाला, असा अर्थ घ्यावा. माडगांवकर.

असा अर्थ घेतला तर प्रत्यक्ष इंद्रियोपभोग नसतां त्याचें कार्य झालें असें जें अभंगाचें स्वारस्य तें घुष्ट होत नाहीं. वा. ब. प.

च० ६ न बोलतां बोलल्याचा, व गूढ न उकलतां उकलल्याचा आनंद झाला. वा० ब० प० डॉ. भांडारकर.

शब्द–उसंतणें–उसंतणें, आटपणें, शेवटास नेणें.

शेरा—आध्यात्मिक ऐक्य वर्णिलें आहे. भेदाभेद लुप्त झाला, सर्व कांहीं समजलें, एका ब्रह्मस्वरूपांत सर्व कांहीं आलें, सर्वत्र परमेश्वर दिसला, देवमय झालें, म्हणजे सर्व इंद्रियांचे आनंद प्रत्यक्ष भोगाशिवाय अनुभवाला येतात.

११९.

इहलोकींचा हा देहे ।
देव इच्छिताती पाहें ॥ १ ॥
धन्य आम्ही जन्मा आलों ।
दास विठोबाचे झालों ॥ २ ॥
आयुष्याच्या या साधनें ।
सच्चिदानंद पदवी घेणें ॥ ३ ॥
तुका म्हणे पावठणी ।
करूं स्वर्गाची निशाणी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—हा या लोकींचा देह देवांना देखील प्रिय वाटतो, हवासा वाटतो. आम्ही धन्य, कीं हा जन्म आम्हांला मिळाला; आणि विठोवाचे दास झालों. आयुष्य हें साधन, त्याचा उपयोग करून आम्हांला सच्चिदानंद ही पदवी घेतां येते. नरजन्म हा धन्य, कारण त्याच्या पावठणीवर स्वर्गाची निशाणी-करितां येते, या पायरीवर स्वर्गाचें निशाण रोवितां येतें.

चर्चा—च० १ मानव देहालाच मुक्ति आहे. देवांना देखील मोक्षा-करितां मानवजन्म पाहिजे. डॉ. भांडारकर.

च० ४ ही पावठणी निशाणी करूं. या पायरीवर स्वर्गाचें निशाण रोवूं. ही मनुष्य जन्माची पायरी चढून स्वर्ग मिळवूं. डॉ. भांडारकर.

या अर्थांत स्वारस्य कमी आहे असें वाटतें. १ चरणांत देवांना इह-लोकीं जन्म हवा, स्वर्गापेक्षांही इहलोक श्रेष्ठ असें सांगितल्यावर, नरजन्म ही पायरी चढून स्वर्ग मिळवूं असें म्हणणें विसंगत दिसतें. " स्वर्गाची निशाणी ही पावठणी करूं " असा अन्वय घेऊन स्वर्गासच आपण पायरी करूं, नर-जन्माच्या साधनाचा उपयोग करून, स्वर्गाची उगाच पायरी करून मोक्षपद मिळवूं, असा अर्थ करावा. वा. ब. प.

नरतनु जरी पावठणी आहे–पायरीसारखी आहे–तरी स्वर्गप्राप्तीचें चिन्ह, निशाण, करून टाकूं. माडगांवकर.

शब्द-पावठणी-पायरी. निशाणी-खूण, निशाण.

शेरा—नरदेहाचें महात्म्य सांगितलें आहे.

१२०.

पंडित वाचक जरी जाला पुरता ।
तरी कृष्णकथा ऐके भावें ॥ १ ॥
क्षीर तुपा साकरे जालिया भेटी ।
तैसी पडे मिठी गोडपणें ॥ २ ॥
जाणोनियां लाभ घेईं हा पदरीं ।
गोड गोडावरी सेवीं बापा ॥ ३ ॥
जाणिवेचें मूळ उपडोनी खोड ।
जरी तुज चाड आहे तुझी ॥ ४ ॥
नाना परिमळद्रव्यउपचार ।
अंगीं उटी सार चंदनाची ॥ ५ ॥
जेविलियाविण शून्य ते शृंगार ।
तैसी गोडी हरिकथेविण ॥ ६ ॥
ज्याकारणें वेदश्रुति हीं पुराणें ।
तेंचि विठ्ठलनाणें तिष्ठे कथे ॥ ७ ॥
तुका म्हणे दगडाचीं पेवें ।
खळखळ आघवें मूळ तेथें ॥ ८ ॥

पाठभेद—च० ८ खळखळ-खळखळे.

अर्थ—माणूस जरी वाचक व पंडित झाला तरी तो कृष्णकथा भावानें ऐकितो. क्षीर, तूप, आणि साखर यांची भेट झाली म्हणजे त्या गोडपणानें तोंडाला मिठी पडते, गोडपणाचा कळस होतो, त्याप्रमाणें पांडित्याची जोड भावभक्तीशीं झाली म्हणजे होतें. हें समजून हा लाभ पदरीं घे. गोडावर

गोडाचें सेवन कर. जर तुझी तुला चाड असेल तर अहंमन्यतेचें मूळ खोडून काढ. नानापरिमळद्रव्यें अंगाला लाविलीं, अंगाला चंदनाची उत्तम उटी लाविली, तरी हे सर्व शृंगार जसे उपाशीं पोटीं निरुपयोगी, तसेंच हरिकथे-शिवाय रसिकता नाहीं; हरिकथेशिवाय आम्हांला रसिकपणा आहे असें म्हणणें फुकट आहे. ज्याच्या कारणें वेदश्रुतिपुराणें हीं आहेत तेंच एक विठ्ठलरूपी नाणें कथेंत खरें. बाकीं सगळीं दगडाचीं पेवें; नुसती खळखळ मात्र. सगळें मूळ काय तें तेथें–विठ्ठलनामांत–आहे.

चर्चा—च० १ पंडित असूनही कृष्णकथा भावानें ऐकेल तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें. " अधिकस्य अधिकं फलम् " या न्यायानें. मं. ठ.

च० ४ खोड=खोडून टाक ? किंवा, मूळ, बुंधा. मूळ आणि खोड एकच.

खोड=झाडाचा बुंधा असा अर्थ केल्यास या चरणाचा संबंध वरच्या चरणाशीं घ्यावा लागतो. वा. ब. प.

च० ५ व ६ जोडून घ्यावयाचे.

शून्य ते **शृंगार** । तैसी गोडी **हरि**कथेविण–दुष्टप्रासाचें उदाहरण.

च० ७।८ तेंचि विठ्ठल नाणें तिष्ठे कथे.

याचा अर्थ काय ? इतर पेवें दगडाचीं, नुसती खळखळ होते. खणलें तर आंत धन असल्यासारखा आवाज होतो, पण नाणें मिळत नाहीं. खरें नाणें विठ्ठलकथेंत तेवढें मिळतें असा एकंदरींत अर्थ दिसतो. पण आहेत त्या शब्दांतून तो कसा निघावयाचा हें कळत नाहीं.

शेरा—नामाचा महिमा सांगितला आहे.

१२१.

आणिकांच्या कापिती माना ।
निष्ठुरपणा पार नाहीं ॥ १ ॥
करिती बेटे उसणवारी ।
यमपुरी भोगावया ॥ २ ॥

सेंदराचें दैवत केलें ।
नवस बोले तयासी ॥ ३ ॥
तुका म्हणे नाचती पोरें ।
खोडितां येरें अंग दुखे ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—दुसऱ्यांच्या माना कापितात, त्यांचा घातपात करितात, त्यांना बळी देतात, त्यांच्या दुष्टपणाला पार नाहीं. बेटे नरक भोगण्याची, नरकांत जाण्याची उसनवारीच करताहेत जसे ! शेंदूर फासून देव बनविला आणि त्याला नवस बोलला आहे. (तो फेडण्याकरितां बोकडाचा बळी देणाराला उद्देशून हा अभंग दिसतो.) पोरखेळ आहेत सारे. दुसऱ्यानें खोडावें तर त्याचें मात्र तोंड दुखतें.

चर्चा—च० ४ खोडितां येरें अंग दुखे. दुसऱ्यांच्या माना कापून, बोकड कापून शेंदराच्या देवाचा नवस फेडावयाचा हें यांचें करणें दुसऱ्यानें खोडून काढावयाचा प्रयत्न केला तर त्याचें मात्र तोंड दुखावयाचें. ते लोक कांहीं ऐकावयाचे नाहींत. मं. ठ.

१२२.

गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी ।
कोणें चराचरीं त्याग केला ॥ १ ॥
गायत्री स्वमुखें भक्षीतसे मळ ।
मिळाल्या वाहाळ गंगाओघ ॥ २ ॥
कागाचिये विष्ठें जन्म पिंपळासी ।
पांडवकुळासी पाहतां दोष ॥ ३ ॥

शकुंतला सूत कर्ण शृंगी व्यास ।
यांच्या नामें नाश पातकांसी ॥ ४ ॥
गणिका अजामेळ कुब्जा तो विदुर ।
पाहातां विचार पिंगळेचा ॥ ५ ॥
वाल्हा विश्वामित्र वसिष्ठ नारद ।
यांचें पूर्व शुद्ध काय आहे ॥ ६ ॥
न व्हावीं तीं जालीं कर्में नरनारी ।
अनुतापें हरी स्मरतां मुक्त ॥ ७ ॥
तुका म्हणे पूर्व नाठवी श्रीहरी ।
मूळ जो उच्चारी नरक त्यासी ॥ ८ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—" सोमः प्रथमो विविदे गंधर्वो विविदे परः । तृतीयः पतिरग्निस्ते तुरीयस्ते मनुष्यजः " या विवाहाच्या कल्पनेला धरून तुकाराम म्हणतात–

कुमारीचें मनुष्याशीं लग्न होण्यापूर्वी गंधर्व, अग्नि, सोम यांच्याशीं तिचा विवाह झालेला असतो असें शास्त्र आहे. तरीपण जगानें ती भ्रष्ट झाली असें म्हणून तिचा त्याग केला आहे का ! गाय स्वतः मळ खाते, गांवचे ओहोळ मिळूनच गंगेचा ओघ होतो, म्हणून तीं काय अपवित्र झालीं ? पिंपळ इतका पवित्र, पण त्याचा जन्म कावळ्याच्या विष्ठेंत. पांडव इतके थोर, पण त्यांचें कुळ पाहूं नये. शकुंतला, कर्ण, शृंगी, व्यास, पिंगळा नांवाची वेश्या, कुब्जा, विदुर, वाल्हा कोळी, विश्वामित्र, नारद, यांचीं कुळें काय शुद्ध आहेत ? तसेंच होऊं नयेत तीं कर्में मागें हातून झालीं; तीं पाहून काय करावयाचें ? पश्चात्तापानें हरीचें स्मरण केलें म्हणजे मुक्ती मिळते. तु. म्ह. देव मागलें (तुमचें) आठवींत बसत नाहीं. जो त्याचा उच्चार करील, तो नरकांत (जातो.) जाईल.

चर्चा –

सूत—हीन जातीचा, प्रतिलोमज; हे पूर्वीं पुराणिकाचा धंदा करीत.

हीन जातीच्या पुरुषापासून उच्च जातीच्या आईच्या पोटीं झालेला तो प्रतिलोम.

शृंगर्षि--विभांडक ऋषीचा मुलगा दासीपासून झालेला. विभांडक उर्ध्वरेता होता.

गणिका पिंगला--शिवलीलामृतांत कथा आहे. हिनें रात्रभर वाट पाहून सकाळीं आपल्याला देवाला वाहून घेतलें.

वासिष्ठ-मित्रावरुणांचे उर्वशीला पाहून रेतस्खलन झालें. त्यापासून उर्वशीच्या पोटीं झालेले.

नारद—दासीपुत्र.

च० ५ पहातां ।विचार-प्रश्नार्थी-विचार कशला पहातां ? किंवा-विचार पहातां दोष. असें अध्याहृत घ्यावें.

शब्द-वाहाळ-ओहोळ, ओढा. पुष्कळ ओहोळ एकत्र मिळाल्यानेंच गंगा होते.

मं. ठ.

शेरा--जातीवर शुद्धपणा किंवा मोठेपणा अवलंबून नाहीं. पूर्वीचें पाहूं नये. अनुताप करावा, हरीचें स्मरण करावें, म्हणजे पाप हरतें.

१२३.

सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें ।
भक्षावया दिलें श्वानालागीं ॥ १ ॥
मुक्ताफळहार खरासी घातला ।
कस्तुरी सुकराला चोजाविली ॥ २ ॥
वेदपारायण वधिरा सांगे ज्ञान ।
तयाची ते खूण काय जाणे ॥ ३ ॥
तुका म्हणे ज्याचें तोचि एक जाणे ।
भक्तीचें महिमान साधु जाणे ॥ ४ ॥

पाठभेद-नाहींत.

अर्थ–"ज्याचें तोंच एक जाणे" अशा अर्थानें तुकोबा म्हणतात–सोन्याचें ताट खिरीनें भरलें आणि तें कुत्र्यापुढें खायला ठेवलें तर काय उपयोग ? त्याला त्याची काय गोडी ? गाढवाला मोत्याचा हार घातला, नाहीं तर डुकराला कस्तुरी माखली, तरी त्यांना त्याचें काय मोल ? तसेंच एखादा पंडित मारून शिरा ताणून बहिऱ्याला वेदज्ञान सांगूं लागला तर त्या बहिऱ्याला त्यांतलें काय कळणार ? या सर्वांचें वर्म निराळेंच आहे. तें एवढेंच कीं ज्याचें रहस्य त्याला कळावयाचें, ज्याचा जो विषय त्यालाच त्याचें महत्त्व समजणार आहे; भक्तीचा महिमा संतांनाच कळावयाचा इतरांना कळावयाचा नाहीं.

शब्द—चोजविली = कौतुकानें खावयाला घातली. बधिर = बहिरा.

शेरा—भक्तीचें महत्त्व. अभंग पोक्त वयांतील दिसतो वा. ब. प.

१२४.

ऐसा हा लौकिक कदा राखवेना ।
पतितपावना देवराया ॥ १ ॥
संसार करितां म्हणती हा दोषी ।
टाकितां आळसी पोटपोसा ॥ २ ॥
आचार करितां म्हणती हा पसारा ।
न करितां नरा निंदिताती ॥ ३ ॥
संतसंग करितां म्हणती हा उपदेशी ।
येरा अभाग्यासी ज्ञान नाहीं ॥ ४ ॥
धन नाहीं त्यासी ठायींचा करंटा ।
समर्थासी ताठा लाविताती ॥ ५ ॥
बहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ ।
न बोलतां सकळ म्हणती गर्वी ॥ ६ ॥

भेटिसी नवजातां ह्मणती हा निष्ठुर ।
येतां जातां घर बुडाविलें ॥ ७ ॥
लग्न करूं जातां ह्मणती हा मातला ।
न करितां जाला नपुंसक ॥ ८ ॥
निपुत्रिका ह्मणती पहा हो चांडाळ ।
पातकाचें मूळ पोरवडा ॥ ९ ॥
लोकं जैसा ओक धरितां धीरवेना ।
अभक्ता जिरेना संतसंग ॥ १० ॥
तुका ह्मणे आतां ऐकावें वचन ।
त्यजुनियां जन भक्ती करा ॥ ११ ॥

पाठभेद—च० ३ न करितां—न करित्या.
च० ५ लाविताती—म्हणताती.

अर्थ—१ लौकिक म्हटला म्हणजे तो असा आहे कीं तो कधीं संभाळतां यावयाचा नाहीं. लौकिक राखणें कठीण. संसार करायला लागलें तर म्हणतात, कायहो, काय संसारांत गुरफटून गेला आहे अगदीं ! टाकावा, संसाराकडे पाहूं नये, तरीहि वाईटच. आळशी, पोटपोशा म्हणतात.

आचार, वेदविहित कर्मधर्म करावे तर म्हणतात, कशाला पसारा मांडला आहे हो ! बरें, न करावींत तरीहि निंदा होतेच.

३ साधूंच्या संगतींत रहावें तर म्हणतात, झाला आतां ब्रह्मज्ञान सांगणारा ! तसें न केलें तर म्हणतात, तो मूर्ख, त्याला अक्कल नाहीं.

४ घन नसलें तर म्हणतात, मूळांतच दरिद्री; जाईल तेथें फुटक्या नशिबाचा असें म्हणतात. मातबराला, " फार ताठा हो ! " असें म्हणतात. घुष्कळ बोललें तर वाचाळ, न बोललें तर गर्विष्ट. कुणाला भेटावयाला गेलें नाहीं तर निष्ठुर म्हणतात, गेलें तर म्हणतात, जातां येतां घर बुडविलें. लग्न करावें तर मस्त झाला, करूं नये तर नपुंसक. मुलें बाळें नसलीं तर निपुत्रिक, चांडाळ असें म्हणतात. पोरें असलीं तर, काय पोरवडा हो ! पापाचें मूळ सगळें, अशी निंदा करितात. तेव्हां, ओकारी आली म्हणजे ती जशी थांब-

वितां येत नाहीं, तसें लोकांचें तोंडही थांबवितां येत नाहीं. अभक्त असेल त्याला संतसंग देखील जिरावयाचा नाहीं. तु. म्ह. आतां सांगतों ऐका. लौकिकाचा नाद टाका आणि भक्ति करावयाला लागा.

चर्चा—च० ४ उपदेशी म्हणजे काय ? १ उपदेश घेणारा हा अर्थ बरा. माडगांवकर. २ किंवा, उपदेश करितो, क्रियापद.

च० ७ न करितां, (लग्न केलें नाहीं तर).

शब्द—**पोटपोसा**=कसेंबसें पोट भरणारा. **पसारा**=व्याप. **ठायींचा** = मुळांतच, जातीचा **पोरवडा** = पोराबाळांचें लटांबर

शेरा—लोकाराधन दुर्घट आहे. भक्तिमार्ग बरा. जगाला त्रासून, जिगजिगीस येऊन लिहिलेला दिसतो.

१२५.

धर्म रक्षावयासाठीं ।
करणें आटी आम्हांसी ॥ १ ॥
वाचा बोलों वेदनीति ।
करूं संतीं केलें तें ॥ २ ॥
न बाणतां स्थिति अंगीं ।
कर्म त्यागी लंड तो ॥ ३ ॥
तुका म्हणे अधम त्यासी ।
भक्ति दूषी हरीची ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—धर्माचें रक्षण व्हावें म्हणून ही सारी आटाआट. तोंडानें वेदनीति सांगूं. वेदांत काय काय करावें म्हणून सांगितलें आहे तें सांगूं. आणि संतांनीं आचरण केलें आहे तसें आचरण करूं. अंगांत अनुभव आला नसतां, जो कर्माचा त्याग करितो तो धर्मलंड म्हणावा. जो हरिभक्तांला दूषण लावतो तो अधम.

शब्द--आटी= आटाआट, श्रम.

शेरा—कर्म करा, भक्ति करा. अनुभवाशिवाय कर्म किंवा भक्ति यांचा त्याग करणें चुकीचें आहे असा भावार्थ.

१२६.

चवदा भुवन जयाचिये पोटीं ।
तोचि आम्हीं कंठीं सांठविला ॥ १ ॥
काय एक उणें आमुचिये घरीं ।
वोळंगती द्वारीं रिद्धिसिद्धी ॥ २ ॥
असुर जयानें घातले तोरडीं ।
तो आम्हांसि जोडी कर दोन्ही ॥ ३ ॥
रूप नाहीं रेखा जयासि आकार ।
आम्हीं तो साकार भक्तीं केला ॥ ४ ॥
अनंत ब्रह्मांडें जयाचिये आंगीं ।
समान तो मुंगीं आम्हांसाठीं ॥ ५ ॥
तुका म्हणे आम्हीं देवाहूनि बळी ।
जालों हें निराळी ठेवुनि आशा ॥ ६ ॥

पाठभेद—च० ३ तोरडीं–तोडरीं.

५ व्या चरणानंतर कांहीं प्रतींत " ऋद्धिसिद्धि सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी । असा चरण आहे.

अर्थ—ज्याच्या पोटीं चवदा भुवनें तोच आम्हीं कंठांत सांठविला. मग आमच्या घरीं काय कमी आहे ? दाराशीं रिद्धिसिद्धि झुलत आहेत. ज्यानें मोठमोठे राक्षस पायांखालीं घातले तो आमच्या पुढें हात जोडून उभा आहे. ज्याला नाहीं रूप, नाहीं आकार, त्याला आम्हीं रूप दिलें. आम्हीं भक्तांनीं, त्याला साकार सगुण बनविलें आहे. ज्याचे आंगीं अनंत ब्रह्मांडें तो आम्हांला

मुंगीसमान होय. रिद्धिसिद्धिला ज्यांनीं लाथा हाणल्या ते या प्राकृत संसाराला कशाला भीक घालतील ?

चर्चा--६आम्ही भक्त देवाहूनहि वळी आहोंत, कारण आम्ही आशा निराळी ठेविली आहे, संसारांतल्या आशेचा त्याग केला आहे.

तेथें या प्राकृता कोण मानी ?

प्राकृत म्हणजे यःकश्चित् प्रपंच असाच अर्थ करावयाला पाहिजे. (माडगांवकर)

किंवा "या यःकश्चित् माणसाला" असेंही होईल. जेथें रिद्धिसिद्धींनां आम्ही विचारीत नाहीं, तेथें हा प्राकृत, सामान्य माणूस, प्रपंचांत गढलेला. माणूस, आम्हांला आड येऊं लागला, आम्हांला उपदेश करावयाला लागला तर त्याला कोण विचारितो ? कोणी सामान्य माणूस भक्तिमार्गापासून तुकारामाचें मन वळवीत असतां, अडचणीचें भैरव स्वरूप वर्णन करूं लागला तेव्हां त्याला उत्तर असावें. वा० ब० प्र०

शब्द-वोळगंती-अवलंबतात, अवलंबून आहेत. **तोरडीं**-बंदींत. **तोरडीं=cf.** तो़रड्या (दागिना),

शेरा--भक्तीचा महिमा. एकदां आशा सोडली म्हणजे निवृत्तकाम भक्त देवाहूनही बळी असा आशय.

१२७.

केला मातीचा पशुपति ।
परि मातीसि काय देव म्हणती ।
शिवपूजा शिवासि पावे ।
माती मातीमाजी सामावे ॥ १ ॥
तस पूजिती आम्हां संत ।
पूजा घेतो भगवंत ।
आम्ही किंकर संतांचे दास ।
संत पदवी नको आम्हांस ।

केला पाषाणाचा विष्णु ।
परी पाषाण नव्हे विष्णु ।
विष्णुपूजा विष्णूसि अर्पे ।
पाषाण राहे पाषाणरूपें ॥ ३ ॥

केली कांशाची जगदंबा ।
पारि कांसें नव्हे अंबा ।
पूजा अंबेची अंबेला घेणें ।
कांसें राहे कांसेपणें ॥ ४ ॥

ब्रह्मानंदपूर्णामाजी ।
तुका म्हणे केली कांजी ।
ज्याची पूजा तेणेंचि घेणें ।
आम्हीं पाषाणरूप राहणें ॥ ५ ॥

पाठभेद —नाहींत.

अर्थ—मातीचा सांब केला म्हणून मातीला सांब म्हणतील कीं काय ? शिवाची पूजा शिवाला पोंचते आणि माती मात्र पुन्हा मातीला मिळते. तसेंच आम्हीं संतांचे दास, भक्त, संतांनीं किंवा कोणीं आमची पूजा केली तर ती देवाला पोंचते. आम्हीं चाकर, आम्हांला संत कशाला म्हणतां ? दगडाचा विष्णु केला म्हणून दगड का विष्णु होतो ? विष्णूची पूजा विष्णूला पावते, दगड मात्र दगडच रहातो. कांशाची जगदंबा केली म्हणून कांसें मात्र जगदंबा नव्हे. अंबेची पूजा अंबेला, कांसें तें कांसें. ब्रह्मानंदानें जे पूर्ण असतील त्यांच्या ठिकाणीं आम्हीं कांजी केली तर त्याचें त्यांना काय ? त्यांचा ब्रह्मानंद म्हणजे पुरणासारखा, आमची कांजी आमच्याजवळ. ज्याची पूजा त्यानेंच ती घ्यावयाची. आम्ही पाषण तें पाषाणच रहावयाचे.

च० २ पूजा करणारे लोक तुकोबांची पूजा करीत असतां, त्यांस मोठेपणा देऊन तुकोबा म्हणतात, तुम्ही संत, आमची पूजा करितां, आम्हांला संत म्हणतां, तें कां ? वा. ब. प.

१ लौकिकी–पुरण हें आनंद देणारें, आम्हीं काय ! कांजी केली आहे.

२ अनुभवानें जे पूर्ण असतील त्यांना ब्रह्मानंदाचें सुख, आम्ही कच्चे, आमचें सुख त्या मानानें कांजीप्रमाणें.

च० ५ पूर्णामाजी–पूर्णामाजी किंवा पुरणामाजी–पुरण व कांजी यांतील विरोध लक्ष्यांत ठेवून चरण केलेला दिसतो. चरणाचा अर्थ लौकिकी किंवा आध्यात्मिक असा दुहेरी लागेल.

शब्द—कांजी = पेज.

शेरा—तुकोबांना पूजादि विधींनीं गौरवणाऱ्या लोकांस उत्तर आहे. मी पाषाणच, पूजा देवाला, असा भाव. जन पूजी मला त्यांचा कां आभार, याचा तो विचार जाणा देवा । हा अभंग पहावा.

१२८.

ते माझे सोयरे सज्जन सांगाती ।
पाय आठविती विठोबाचे ॥ १ ॥
येर मान विधिपाळणापुरते ।
देवाचीं तीं भूतें म्हणोनियां ॥ २ ॥
सर्वभावें जालों वैष्णवांचा दास ।
करीन त्यांच्या आस उच्छिष्टाची ॥ ३ ॥
तुका म्हणे जैसे उदास हरिदास ।
तैसी नाहीं आस आणिकांची ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जे विठोबाच्या पायांची आठवण ठेवितात, ते सज्जन लोक माझे सोयरे, माझे सोबती; येरां बाकीच्यांनांही मी मानतों, ओळखतों, मान देतों. पण तो नुसता विधिपाळणा पुरता, उपचाराकरितां; औपचारिक, लौकिक-रीतीनें. तीहीं देवानेंच केलेलीं माणसें म्हणून त्यांना मानतों. बाकी, अगदीं

सर्वात्मतः मनोभावानें जर मी कोणाचा दास झालों असेन तर तो विष्णु-भक्तांचा. त्याचें उष्टें खाण्याची मी आस करीन. तु. म्ह. जसे मला हरीचे दास आवडतात, तसे दुसरे कोणीहि आवडत नाहींत.

चर्चा—२ येरा मानी विधि पाळगापुरते–हा पाठ अशुद्ध दिसतो, लिहिण्यांत किंवा वाचण्यांत 'णा' च्या ऐवजीं 'गा' वाचला गेल्यामुळें चूक झाली असावी. इंदुप्रकाशप्रतीचा पाठ 'पाळणा' असा आहे तो बरा आहे.

वा० ब्र० पं०

शब्द—**मानती** = मानवतात, प्रिय वाटतात.
शेरा—संतसंगतीचा महिमा.

१२९.

दया तिचें नांव भूतांचें पाळण ।
आणिक निर्दळण कंटकाचें ॥ १ ॥
पाप त्याचें नांव न विचारी नीत ।
भलतेंचि उन्मत्त करी सदा ॥ २ ॥
धर्मनीतीचा तो ऐकूनि वेव्हार ।
निवडिलें सार असार तें ॥ ३ ॥
तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं ।
देवासही आटी जन्म वेणें ॥ ४ ॥

पाठभेद—" धर्मनीतिचा " हा चरण कांहीं प्रतींत आढळत नाहीं. अर्थाच्या संदर्भानें पाहिलें तो पाहिजे असें वाटतें.

अर्थ—तिचें नांव दया, कीं जिच्या योगानें भूतमात्रांचें पाळण होतें. आणि कंटकांचें, दुष्ट लोकांचें, निर्दाळण होतें; उलटपक्षीं, त्याचें नांव पाप, कीं ज्याच्या योगानें माणूस उन्मत्त होऊन, नीतीचा विचार न करतां, भलतेंच आचरण करितो. धर्म आणि नीति यांचा व्यवहार ऐकून असें हें सार आम्हीं निवडून काढिलें आहे. धर्मरक्षणासाठीं देवालाहि मोठी यातायात करावी लागते, जन्म घ्यावे लागतात.

चर्चा. परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे । या गीताश्लोकाचें रूपांतर.

शब्द—**आटी** = आटाआट, लास, अभंग ४०, १२५ पहावे.

शेरा—भूतदया आणि नीतिपालन हाच धर्म.

१३०.

करावें गोमटें ।
बाळा माते तें उमटें ॥ १ ॥
आपुलिया जीवाहुनी ।
असे वाल्हें तें जननी ॥ २ ॥
वियोग तें तिस ।
त्याच्या उपचारें तें विष ॥ ३ ॥
हरिणी चुकली पाडसा ।
धुंडाळी ती दाही दिशा ॥ ४ ॥
रानीं हिंडों गेली गाय ।
घरीं वत्स वाट पाहे ॥ ५ ॥
तुका म्हणे पायें ।
डोळा सुखावे ज्या न्यायें ॥ ६ ॥

पाठभेद—च० ६ पायें—माये.

अर्थ—मुलाला कांहीं तरी चांगलें करावें म्हणजे तें मातेला उमटतें; त्याचा तिला उपकार वाटतो, त्यामुळें तिला मूठमर मांस येतें. मूल म्हणजे आईला स्वतांच्या जिवाहून प्रिय; त्याचा वियोग झाला म्हणजे त्याच्या खस्ता खाण्यांत जो तिला आनंद वाटत होता तो गेला. त्यामुळें त्याचा वियोग म्हणजे विषच, केवळ विषासारखा होतो. हारिणी पाडसाला चुकली म्हणजे ती दाही दिशा धुंडाळते. गाय रानांत हिंडावयाला जाते, पण मागें घरीं पाडस

असतें म्हणून घराची वाट पहाते, तिचें सर्व चित्त घराकडे असतें. तु. म्ह. पायांला (तूप चोळलें) म्हणजे जसें डोळ्यांना सुख होतें त्या न्यायानें बाळाला केलेलें आईला मानवतें.

चर्चा—च. ३ त्याच्या उपचारें–त्याचें, मुलाचें, आजपर्यंत केलें सवरलें, त्याच्या. करितां खस्ता खाल्ल्या म्हणूनच आतां त्याचा वियोग विषासारखा दुःसह होतो.

(१) त्याच्या उपचारें=त्याला केलेल्या उपचारांमुळें, त्याच्याकरितां खस्ता खाल्या म्हणून. मं. ठ.

(२) किंवा, उपचार=गुण (मुलाचे) रा. ब. मराठे.

त्यानें, बाळानें केलेल्या गुणांमुळें, त्याचे गुण आठवल्यामुळें, आतां त्याचा वियोग विषासारखा होतो. हा अर्थ मातेच्या वात्सल्याला पोषक असा वाटत नाहीं, म्हणून गौण, त्याज्य. वा. ब. प.

किंवा च० २ व ३ एकत्र घेतले तर–

वियोग तें तिला विष. पण तें विष, त्याच्या उपचारें, त्याची दुसरीकडे प्रतिष्ठा झाली, त्याचा लौकिक झाला, त्याला मानमान्यता मिळाली, म्हणजे तो वियोग देखील वाल्हें असे–प्रिय वाटतो–असाही एकच अर्थ सुचतो.

वा. ब. प.

चर्चा—च० ४।५ या अभंगांत नकोतसे वाटतात ते पुढील अभंगांत असले तर बरे.

शब्द—**उमटे**-ठसतें, समजतें. **वाल्हें**-वाहाळ, <**वल्लभं**=प्रिय.

शेरा—परमेश्वराचें भक्तावरील प्रेम वर्णिलें आहे.

१३१.

कन्या सासुऱ्यासी जाये ।
मागें परतोनी पाहे ॥ १ ॥
तैसें जालें माझ्या जीवा ।
केव्हां भेटसी केशवा ॥ २ ॥

चुकलिया माये ।
बाळ हुरू हुरू पाहे ॥ ३ ॥
जीवनावेगळी मासोळी ।
तैसा तुका तळमळी ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ तुका म्हणे तळमळी–असाही पाठ आहे.

अर्थ—मुलगी सासरीं जाते तेव्हां वियोगदुःखामुळें पुन्हां पुन्हां मागें वळून पहाते. तसें माझ्या जीवाला झालें आहे. देवा, मला केव्हां भेटशील असें झालें आहे. आई चुकली, दिसेनाशी झाली तर मूल दीनवाणीनें हुरुहुरु पहातें. पाण्यावांचून मासळी तळमळते तसाच मी देवाशिवाय तळमळतों. खोल अर्थानें, मी या प्रपंचांत आलों मृत्युलोकीं जन्माला आलों म्हणजे माहेर सोडून घरून बाहेर आल्यासारखा झालों आहें. घराला मुकलों तों परत घरीं केव्हां जाईन असें झालें आहे. भक्तांना देवचिंतन हें माहेर. तें सुटून प्रपंच मागें लागणें म्हणजे मुलीला सासरीं जाण्यासारखें आहे. उथळ अर्थ घेतला तर, पंढरीहून परत गेलेला तुकाराम पंढरीला उद्देशून हें म्हणत आहे असाहि अर्थ घेतां येईल.

शब्द—**हुरुहुरु** = चुकल्या चुकल्यासारखें.

शेरा—प्रपंचपसाऱ्यानें होणाऱ्या देवाच्या वियोगाचें दुःख वर्णिलें आहे. मध्यमवयांतील ?

१३२.

हातीं होन दावी वेना ।
करिती लेंकीच्या धारण ॥ १ ॥
ऐसे धर्म झाले कळी ।
पुण्य रंक पाप बळी ॥ २ ॥
सांडिले आचार ।
द्विज चाहाड झाले चोर ॥ ३ ॥

टिळे लपविती पातडीं ।
लेती विजारा कातडीं ॥ ४ ॥
बैसोनियां तक्कां ।
अन्नेंविण पिडिती लोकां ॥ ५ ॥
मुदबख लिहिणें ।
तेलतुपावरी जिणें ॥ ६ ॥
नीचाचे चाकर ।
चुकलिया खाती मार ॥ ७ ॥
राजा प्रजा पीडी ।
क्षेती दुश्चितासी तोडी ॥ ८ ॥
वैश्यशूद्रादिक ।
हे तों सहज नीच लोक ॥ ९ ॥
अवघे बाह्य रंग ।
आंत हिरवें वरी सोंग ॥ १० ॥
तुका म्हणे देवा ।
काय निद्रा केली धांवा ॥ ११ ॥

पाठभेद—च० ६ तेल तूप साबण केणें—असाहि पाठ आहे.
च० १० वरि—बाह्य.

अर्थ—हातांत पैसे घेऊन मग मुलगी दाखवितात आणि तिची धारण ठरवीत बसतात, किंमतीची घासाघीस करितात, असे धर्म कलियुगांत झाले. पुण्यवान ते रंक, दीन, झाले आहेत आणि पाप्यांना बळ आलें आहे. त्यांची पोळी पिकली आहे. ब्राह्मणांनीं आपला आचार टाकिला.आणि ते चोरी चहाडी करूं लागले. टिळे आणि पोथ्या लपवून विजार कातडीं पांघरावयाला लागले. गादीतक्कांवर बसून लोकांना उपाशी छळतात. मुदपाकखान्यावरचे कारकून होऊन जमाखर्च लिहितात. तेलतुपावर निर्वाह करितात. हलकटाची चाकरी करितात. जरा चूक झाली कीं मार खातात. राजा प्रजेला पीडतो. जमीनदार

गरीवांस छळतो. ब्राह्मण व क्षत्रिय यांची ही दशा ! मग वैश्यशूद्रांचें कसें ! ते तर जन्मतःच नीच लोक. आचारांत, वागणुकींत, सर्व वाहेरचा भपका आहे. आंत कचें, वरून सगळें सोंग. देवा, (असे धर्म झाले) तुम्हीं झोंप कां घेतलीत ? उठा आणि लवकर धांवून या; आमची सोडवणूक करा.

चर्चा—१ वेना १ वयाणा ? भांडारकर मं. ठ.

नवऱ्या मुलाकडील मंडळींनीं वयाणा म्हणून हातांत होन दाखविला कीं मुलीचा वाप लेकींची धारण करावयाला लागतो, असा अर्थ.

२ वेना=भावडती मुलगी (गुजराथी.) हातांत पैसा पडला कीं मुलगी दाखवितो भाव, करीत बसतो. वा० व० प०

च० ४ लेती विजारा कातडीं–विजार घालणें, कातड्याचे पट्टे वगैरे घालणें हें मुसलमानी अमलाचें निदर्शक आहे. त्या वेळची सामाजिक परिस्थिती यांत प्रातिबिंबित झाली आहे.

च० ६ तेल तुप..." तेल तूप सावण केणें " असाहि पाठ आहे. त्याचा अर्थ, तेल, तूप, साबण अशा पदार्थांचा व्यापार करून पोट भरतात. केणें म्हणजे किरकोळ जिन्नस.

च० ८ क्षेत्री दुश्चित्तासी तोडी–१ शेतकरी, जमीनदार, गरीब दुबळ्यांना तोडतो, छळतो. डॉ. भांडारकर.

(२) क्षत्रिय खालावलेल्या क्षत्रियाला तोडतो–नाहींसें करितो.

रा. ब. कानिटकर.

३ राजा प्रजेला पीडतो, व पंढरपुरासारख्या क्षेत्रांत क्षेत्रस्थ भट मरण-दुखानें होरपळलेल्या लोकांस तोडतोडून छळतो असा अर्थ असेल काय ?

वा० ब० प०

४ च० ४ पासून च० ७ अखेरपर्यंत ब्राह्मणांचा हीन आचार सांगितला. च० ९ मध्यें बाकीचे राहिलेले वैश्यशूद्रादिक, हे तर बोलून चालून नीच, हीन वृत्तीचे असें सांगितलें. त्या अर्थी च० ८ मध्यें क्षत्रियांचेंच वर्णन केलें असलें पाहिजे. क्षत्रियांचा धर्म इतरांचें रक्षण करणें, ते उलट क्षत्रियच दीन-दुबळ्याचा छळ करितात, त्यांना मारतात असा अभिप्राय दिसतो. रा. ब. कानिटकर यांचा अर्थ थोडासा फरक करून ग्राह्य धरावा. दुश्चित्तः=दुबळे, (इतर, खालावलेले क्षत्रिय, असा नव्हे). संपादक.

शब्द—धारणा—भाव, दर, किंमत, 'धारण' या शब्दाचें अनेकवचन.

बेना—१ वयाणा (२) चांगली मुलगी) **रंक**=गरीब, लाचार. **पातडीं**=पोथ्या पडशी ? **मूदबख**=स्वयंपाकघर, पाकखाना-तेथील जमाखर्च. स्वाऱ्या शिकाऱ्यांचे राजदरबारचे व तेथील निरनिराळ्या कारखान्यांचे हिशेब. **क्षेत्री**=क्षत्रिय. **हिरवें**=कच्चें.

शेरा—सामाजिक स्थितीचा निदर्शक अभंग.

१३३.

साळंकृत कन्यादान ।
करितां पृथिवीसमान ॥ १ ॥
परि तें न कळे या मूढां ।
येई कळों भोग पुढां ॥ २ ॥
आचरितां कर्म ।
भरे पोट राहे धर्म ॥ ३ ॥
सत्या देव साहे ।
ऐसें करूनियां पाहें ॥ ४ ॥
अन्न मात्र धन ।
हें तों प्रारब्धाआधीन ॥ ५ ॥
तुका म्हणे सोस ।
दुःख आतां पुढें नासे ॥ ६ ॥

पाठभेद—च० १ " पृथ्वी दानाच्या समान " असाहि पाठ आहे.

च० ६ दुःख-सुख.

अर्थ—अलंकार घालून मुलगी वराचे स्वाधीन केली तर तें कन्यादान पृथ्वीदानाप्रमाणें पुण्यकारक आहे. पण तें या मूर्खाला कळत नाहीं. पुढें याचा भोग काय तें समजेल-पुढें दुःख भोगावें लागेल म्हणजे मग याला काय तें कळून येईल. ज्यानें त्यानें आपलें विहित कर्म आहे तें केलें म्हणजे धर्माचें-ही रक्षण होतें आणि पोट भरतें. स्वार्थ व परमार्थ दोन्ही साधतात. खरें

असेल त्याचें सहाय देव करतो. तसें वागून तर पहा. अन्न, मान, धन, या गोष्टी प्रारब्धाच्या आधीन आहेत. तु. म्ह. आतां लोकनिंदा, दुःखभोग आणि ढपुं सर्वस्वीं नास होईल.

चर्चा—च. ६ आतां या लोकांत (मुलगी विकून पैसे मिळाले म्हणून) तात्पुरतें सुख होईल पण पुढें नाश आहे. सुख हाच पाठ बरा. (संपादक) डॉ. भांडारकरांना "दुःख" हाच पाठ बरा वाटला.

शेरा—कन्याविक्रय करणाऱ्या बापाला उद्देशून आहे काय ?

वा. ब. प.

१३४.

दिवट्या वाद्यें लावुनि खाणें ।
करूनि मंडण दिली हातीं ॥ १ ॥
नवरा नेई नवरी घरा ।
पूजन वरा पाद्याचें ॥ २ ॥
गौरविली विहिण व्याही ।
घडिलें कांहीं ठेवूं नका ॥ ३ ॥
करूं द्यावें न्हावें वरें ।
ठायींचें कां रे न कळेचि ॥ ४ ॥
वऱ्हाडियांचे लागे पाठीं ।
जैसी उटिका तेलीं ॥ ५ ॥
तुका म्हणे जोडिला थुंका ।
पुढें नरका सामग्री ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

मशाली, दिवट्या, वाद्यें लावून आणि जेवणावळी मेजवान्या करून मंडण करून वराच्या हातांत नवरी दिली, त्याला अर्पण केली. त्याला दरवाज्यांत आल्यावर पायांवर पाणी वगैरे घालून गौरविलें, त्याचा सत्कार केला आणि त्यानें नवरी घरीं नेली. विहीण व्याही यांचा गौरव केला. आणि इतरही जें जें कांहीं योजिलें होतें तेंहि झालें. वरानें न्हावें, त्याला वाटेल तें करूं द्यावें; इतकें सगळें करतां पण या सगळ्या देखाव्याखालीं, मूळचें शाश्वत जें कांहीं आहे त्याकडे तुमचें लक्ष कां जात नाहीं ?- ज्याप्रमाणें उटीचीं द्रव्यें तेलांत मिळून जातात त्याप्रमाणें हा वऱ्हाड्यांत गर्क होतो. त्यांचा मानमरातब राखण्यांत चूर होतो. पण मुख्य गोष्ट म्हणजे मुलीचे पैसे घेऊं नयेत ही त्याला कळत नाहीं कशी ? तु. म्ह. अशा माणसानें या लोकांत जगाच्या छीथूपणाची जोड केली, आणि नरकाचें साधन करून ठेविलें, दुसरें काय ?

चर्चा—च० १ दिवट्या वाद्यें लावून, खाणें घालून, मुलीला मंडण करून हातीं दिली—असा अर्थ करावा.

च० ३ घडिलें = १ संकल्पिलेलें, योजिलेलें. किंवा, २ जें जें कांहीं केलेलें असेल, दागदागिने तें सर्व मुलीला द्या, ठेवूं नका.

च० ४ वरानें न्हावें, प्यावें, खावें. हें सगळें करूं देतां आणि तें बरेंही आहे. पण मूळांतच चुकतें त्याची वाट काय, मुलीचे पैसे घेतले त्याचें काय ?

शब्द--**पाद्य** = पायांवर पाणी घालून पाय धुणें वगैरे पूजनाचे उपचार.
ठायींचें = मूळांतलें मुख्य तत्व. थुंका = छीथू.

शेरा—कन्याविक्रय करणारावर ताशेरा.

१३५.

ब्रह्महत्या मारिल्या गाई ।
आणिक कांहीं पाप केलें ॥ १ ॥
ऐका जेणें विकिली कन्या ।
पवाडे त्या सुन्याचे ॥ २ ॥

नरमांस खादली भाडी ।
हांका मारी म्हणोनि ॥ ३ ॥
अवघें पाप केलें तेणें ।
जेणें सोनें अभिलाषिलें ॥ ४ ॥
उच्चारितां मज तें पाप ।
जिव्हे कांप सुटतसे ॥ ५ ॥
तुका म्हणे कोरान्न रांड ।
बेटा भांड मागेना कां ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—ज्यानें मुलगी विकली त्यानें ब्रह्महत्त्या केली, गाई मारिल्या, आणखी काय काय म्हणून जीं पापें आहेत तीं केलीं. तो कुत्र्यासारखा, त्याचे पोवाडे गातों ते ऐका. त्यानें नरमांस खाल्लें, कुंटणपणा करून त्यानें भाड खाल्ली. आणि आतां हाका मारीत बसला आहे. द्रव्याचा अभिलाष करून कन्याविक्रय केला, त्यानें सगळीं जीं पापें म्हणून आहेत तीं सगळीं केलीं. त्याच्या त्या पापांचा उच्चार देखील करवत नाहीं. जीभ कांपूं लागते. तु. म्ह. असला हा रांडलेक भीक मागून आपलें पोट कां भरीत नाहीं ?

चर्चा—भाड खाणें = कुंटणगिरीवर मिळकत करणें. कसबिणीच्या धंद्यावर जगणें. भाड्या अशी कानडी शिवी आहे. मुलीचा पैसा घेतला म्हणजे तिच्या देहविक्रयाचे पैसे घेतल्यासारखेंच होतें हा भाव. मं. ठ.

हांका मारी = दुःख करितो, ओरडतो. भाड खाल्ली म्हणून आतां रडत बसावें लागलें आहे (लोकनिंदेमुळें) मं. ठ.

" मारीं " असा पाठ घेऊन " म्हणून त्याच्या नांवानें मी हांका मारतों " असा अर्थ असेल काय ? " पोवाडे ऐका सुन्याचे " या चरणाशीं हा अर्थ जास्त सुसंगत आहे असें मला वाटतें. संपादक.

शब्द—रांडबेटा = रांडलेक, (भानू) **भांड** = भांडखोर माणूस, वाईट माणूस.

रांड व भांड असे दोन शब्द निराळे केले तरी हरकत नाहीं. संपादक.

१३६.

याचा कोणी करी पक्ष ।
तोही त्याशीं समतुल्य ॥ १ ॥
फुकासाठीं पावे दुःखाचा विभाग ।
पुर्वजांसीं लाग निरयदंडीं ॥ २ ॥
ऐके राजा न करी दंड ।
जरि या लंड दुष्टासी ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याचें अन्न ।
मद्यपानासमान ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—या असल्या माणसाचा जो पक्ष धरितो तोही त्याच्या सारखाच व्यर्थ दुःखाचा वांटा पावतो. आणि त्याच्यामुळें पूर्वजांना निरय दंड भोगावा लागतो. अशा प्रकारचा माणूस आपल्या राज्यांत आहे हें समजूनहि जर राजानें त्याला दंड केला नाहीं, तर त्याचें अन्न खाऊं नये. तेंहि मद्यपानाप्रमाणें समजावें.

लक्ष्यप्रयोग—१ त्याचा कोणी करी पक्ष २ दुसरा चरण तिसऱ्यापेक्षां लांब आहे.

शेरा—कन्याविक्रय करणारावर तडाका. त्याला राजानें शिक्षा करावी, राजानें कायद्यानें अशा प्रकारानें आळा घालावा असें तु. चें म्हणणें आहे असें दिसतें.

शेरा—१३२-१३६ हे पांच अभंग कन्याविक्रयविषयक आहेत. यांतील कडक भाषेवरून तुकारामाच्या वेळीं कन्याविक्रयाची चाल बरीच प्रचारांत असावी असें दिसतें.

१३७.

कपट कांहीं एक ।
नेणें भुलवायाचें लोक ॥ १ ॥
तुमचें करितों कीर्तन ।
गातों उत्तम ते गुण ॥ २ ॥
दाऊं नेणें जडीबुटी ।
चमत्कार उठाउठी ॥ ३ ॥
नाहीं शिष्यशाखा ।
सांगों अयाचित लोकां ॥ ४ ॥
नव्हें मठपति ।
नाहीं चाहुरांची वृत्ति ॥ ५ ॥
नाहीं देवार्चन ।
असे मांडिलें दुकान ॥ ६ ॥
नाहीं वेताळ प्रसन्न ।
कांहीं सांगों खाणखूण ॥ ७ ॥
नव्हें पुराणिक ।
करणें सांगणें आणीक ॥ ८ ॥
नेणें वाद घटा पटा ।
करितां पंडित करंटा ॥ ९ ॥
नाहीं जाळीत भणदीं ।
उदो म्हणोनि आनंदी ॥ १० ॥

नाहीं हालवीत माळ ।
भोंवतें मेळवुनि गाबाळ ॥ १८ ॥
आगमींचें कुडें नेणें ।
स्तंभन मोहन उच्चाटणें ॥ १२ ॥
नव्हे यांच्या ऐसा ।
तुका निरयवासी पिसा ॥ १३ ॥

पाठभेद—च० १२ स्तंभ आणि उच्चाटणें–असाहि पाठ आहे.

अर्थ—लोकांना भुलवावयाचें असें कांहीं एक कपट मला माहीत नाहीं. मी तुमचें कीर्तन करितों आणि तुमचे गुण गातों– तेवढें मला माहित आहे. जडीबुटी करणें, ताबडतोब चमत्कार करून दाखविणें, हें माझ्या अंगांत नाहीं. शिष्यवृंद मी भोवतीं गोळा केलेला नाहीं. माझा उपदेश मी सांगावा अशी कोणी माझ्याकडे याचना करावी लागत नाहीं. न विचारतांच मी काय सांगावयाचें तें सांगतों. मी मठपति नाहीं, किंवा चाहुरांची वृत्ति, इनाम, असेंहि मला कोणीं दिलेलें नाहीं. किंवा देवार्चनाचें मीं दुकानहि काढिलें नाहीं. मला वेताळ प्रसन्न नाहीं, कीं ज्याच्या सहाय्यानें तुमच्या मनांतल्या खाणाखुणा मला सांगतां येतील. मी कांहीं पुराणिक नाहीं, सांगणें एक व्यगणें भलतेंच अशांतला प्रकार माझ्याकडे नाहीं. घटपटादि वाद मला येत नाहींत. मी करंटा पंडित आहें. माझें पांडित्य अगदीं बेताचें आहे. उदो उदो म्हणून आनंदानें, आवेशानें, अंबाबाईचीं भणदीं मला जाळतां येत नाहींत. किंवा भोंवतीं गबाळ गोळा करून माळा हालवण्याचें कसब माझ्यापाशीं नाहीं. वेदवेदांगें मला माहीत नाहींत, किंवा स्तंभन, मोहन, उच्चाटणांसारख्या आसुरीविद्याही मला येत नाहींत. मी या इतरांच्या सारखा शहाणा नव्हें. वैराग्यवृत्तीनें रहाणारा पिसा असा माणूस मी आहें.

चर्चा—४ सांगों अयाचित लोकां—मागील चरणार्धांतील–नाहीं–हें अध्याहृत घेऊन आम्हीं अयाचित साधू आहोंत असें लोकाला सांगत नाहीं असा अर्थ करावा. डॉ. भांडारकर.

आम्हांपासून हितबोध घेण्यास आमचें शिष्यत्व पत्करावें लागत नाहीं. कोणी न विचारितां मागतांच मी उपदेश करितों. संपादक.

च० १३ तुकाराम या लबाड भोंदूंच्यासारखें नरकाचें साधन करून ठेवण्याइतका खुळा नाहीं. त्याला खरें शहाणपण कोणतें तें कळतें.

तुका पिसा. तो या लोकांसारखा निरयवासी नव्हे. तुकाराम वेडा खरा. पण तो या कपटी लबाडांसारखा नरकवासी, नरकाचा धनी नाहीं.

डॉ. भांडारकर

असा अर्थ तुकारामावर आत्मश्लाघेचा आरोप येऊं नये म्हणून लावावा असा डॉ. भांडारकरांचा अभिप्राय. मी असलें नरकाचें साधन करण्याइतका वेडा नाहीं असें सरळ म्हटल्यास त्यांत आत्मश्लाघा कोठें व कशी होते कोण जाणे ?

वा. ब. प.

भणदीं = भोप्ये किंवा गोंधळी हे हातीं घेऊन नाचतात तीं विस्तवाचीं मडकीं, पोत.

वा. ब. प.

शब्द—जडीबुट्टी=जडाव किंवा कलाबतूचें कौशल्याचें काम, चमत्कारिक पदार्थ, मन गुंगून टाकण्यासारखा पदार्थ किंवा वस्तु. **अयाचित** = न विचारतां, न मागतां, **चाहूर** = १२०बिघे. **वृत्ति** = नेमणूक, इनाम. **खाणाखुणा** = मनकवडेपणा. **करंटा** = कमनशिबाचा. **भणदीं** = धूप जाळण्याचें पात्र. **उदो** = < उदयोस्तु-उदो बोला आईचा आनंदी आनंद, आनंदी आनंद-असें म्हणण्याचा भोप्यांचा परिपाठ आहे. **गबाळ** = पोथ्यापत्रें. **आगम** = वेदाविद्या तीन वेदांतली; ही दैवी विद्या. स्तंभन, मोहन, उच्चाटण = ही अथर्व वेदांत सांगितली आहे, ही आसूरी. **कुडें** = कोडें.

शेरा—तात्कालीन भोंदूंचें वर्णन.

१३८.

रडोनियां मान ।
कोण मागतां भूषण ॥ १ ॥
देवें दिलें तरी गोड ।
राहे रुचि आणि कोड ॥ २ ॥
लाविता लावणी ।
विके भीके केज्या दानीं ॥ ३ ॥

तुका म्हणे धीरा ।
विण कैसा होतो हिरा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—रडून मान मागण्यांत भूषण कोणतें ? देवानें दिलें तर गोड, मग त्यांत रुचि आहे, कौतुक आहे लावणी लाविली म्हणजे मग विकण्याकरितां, भिकेला घालावयाला, मोबदल्यानें द्यावयाला, दानाला, हवें तितकें (धान्य) होतें. तु. म्ह. धीराशिवाय हिरा होईल कसा ? कोणत्याही गोष्टीला धीर पाहिजे. वा० ब० प०; सुखटणकर.

(२) रडून मान मागण्यांत भूषण काय ? लावणी लावतां,=आर्जवें केलीं तर, आर्जवें करून मला मान द्या असें म्हटलें तर दानी,=दान देणारा माणूस मान विकत देतो, मोबदल्यानें देतो, असें होतें; भिकेला दान विकतो असें होतें तें काय कामाचें ? धीर पाहिजे, मान मिळो न मिळो; धीरावांचून हिरा होत नाहीं. डॉ. भांडारकर व रा. ब. मराठे.

चालू परिस्थितीमुळें वरील अर्थ अभंगांत दिसला असावा. मला वाटतें अभंगाचें पर्यवसान आध्यात्मिकच आहे. रडून मागून एकादा दागिना अंगावर घालण्यांत मतलब काय ? त्याप्रमाणें देवा, मला संतपणा दे असें मागण्यांत अर्थ नाहीं. तो देवानें देण्यांत गोडी आहे, कौतुक आहे. पण देव तरी संतपणा देईल केव्हां ? लावणी लाविता=आपण पेरावें तेव्हां देव त्याचें फळ देतो. लावणी लाविली म्हणजे विकावयाला काय, किंवा भीक घालावयाला, दानाला मोबदल्याला काय, सगळ्याच गोष्टींना धान्य वाटेल तितकें मिळतें. धीर मात्र पाहिजे. वा० ब० प०

" पिके "–विके असा पाठ असेल तर तो एकंदरींत कोणत्याही अर्थाशीं जास्त सुसंगतपणानें लागेल. वा. ब. प.

लावणी लावून=आर्जव करून, मान मिळवतोस तो विक्रीचा, भिकेचा. केज्याचा, दानाचा. डॉ. भांडारकर.

शब्द—**केजें** = धान्य, नारळ. धान्य देऊन भाजीपाला वगैरे घेतात त्याच्यावर कटाक्ष आहे. **लावणी** = १ लागवड, पेरणी. **कोड** = कौतुक. २ आर्जव.
डॉ. भांडारकर.

लक्ष्यप्रयोग—च० ४ तुका म्हणे धीरा विण कैसा होता हिरा.
शेरा—धीराचें महत्त्व.

१३९.

पूज्या एकासनीं आसनीं आसन ।
बैसतां गमन मातेशीं तें ॥ १ ॥
सांगतों ते धर्म नीतीचे संकेत ।
सावधान हित व्हावें तरी ॥ २ ॥
संतां ठाया ठाव पूजनाची इच्छा ।
जीवनींचा वळसा सांपडला ॥ ३ ॥
तुका म्हणे एकाएकीं वरासन ।
दुजें तेथें भिन्न अशोभ्य तें ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ आसन—आसनें.
च० ४ वरासन—वरासनें.

अर्थ—पूज्य माणसांच्या बरोबरीनें एका आसनावर अपूज्यांनीं बसणें, म्हणजे मातेशीं गमन करण्याप्रमाणें आहे. हित व्हावें असें वाटत असेल तर सावधान व्हा, सावधपणानें चित्त देऊन ऐका. धर्म आणि नीतीचे संकेत काय आहेत ते सांगतों. संताच्या ठायीं पूजनाची इच्छा असणें म्हणजे जीवींचा एक वळसा सांपडल्यासारखें आहे (अक्षय्य जीवनाचें रहस्य थोडेसें हस्तगत झालें असेंच म्हणावयाचें.) तुकाराम म्हणतात—वरासन=मुख्य आसन म्हटलें म्हणजे तें एकालाच शोभतें. दुसरें इतर कोणी त्या ठिकाणीं बसेल तर तें शोभत नाहीं.

च० १ पूज्यांचे समोर आसनावर बसणें असाहि पहिल्या चरणाचा अर्थ होईल. मराठे.

च० ३ जीवनींचा वळसा सांपडला. येथें " वळसा " असा शब्द मागें असल्यामुळें पुढें " पडला " चें " सांपडल । " असें हस्तदोषानें झालें आहे काय ? वा० ब० ¯०

चर्चा. च० ३ वरील अर्थांत या चरणाचा अर्थ बरोबर झाला आहे असें वाटत नाहीं. संतांच्या ठिकाणीं आपल्याला ठाय मिळावा, त्यांच्या जागेशीं आपल्याला जागा मिळावी, आणि त्यांच्या बरोबरीनें आपलें पूजन व्हावें अशा प्रकारची इच्छा होणें यामुळें जन्मोजन्मींचा फेरा सांपडला. जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडावें लागलें. असा अर्थ बरा वाटतो. संपादक.

शब्द—**संकेत**=सिद्धांत. **वरासन**=श्रेष्ठ आसन. **वळसा**=(२) फेरा (१) किल्ली, रहस्य.

शेरा—पूज्यांच्या अतिक्रम करूं नये.

१४०.

जेणें मुखें स्तवी ।
तेंचि निंदेपाठी लावी ॥ १ ॥
ऐसी अधमाची याती ।
लोपी सोनें खाय माती ॥ २ ॥
गुदद्वारावाटे ।
मिष्टान्नांचा नरक लोटे ॥ ३ ॥
विंचु लाभाविण ।
तुका म्हणे वाहे शीण ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—ज्या मुखानें स्तुती त्यानेंच निंदा करावी अशी अधमाची जात. सोनें लपवून माती खातो. मिष्टान्नाचा हा नरकच गुदद्वाराच्या वाटेनें लोटला आहे कीं काय ? विंचू पाठीवर नांगी वहातो, त्याचा त्याला लाभ नाहीं, शीण मात्र; आणि त्याची पीडा इतरांना होते.

चर्चा—च० ३ मिष्टान्नें खाल्लीं तरी शेवटीं गुदद्वारानें त्यांचा नरकच होऊन बाहेर पडतो, त्या प्रमाणेंच अधमाला जरी चांगलें शिकविलें किंवा येत असलें तरी त्याच्या तोंडांतून बाहेर पडावयाचें तें नरकाप्रमाणें घाणेरडेंच असावयाचें.

शेरा—अधमलक्षण.

१४१.

अधमाची यारी ।
रंग पतंगाचे परी ॥ १ ॥
विटे न लागतां क्षण ।
मोल जाय वायांविण ॥ २ ॥
सर्पाचिया परी ।
विषें भरला कल्हारीं ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा ।
मज झणीं ऐसें दावा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—अधम माणसाचें साह्य म्हटलें म्हणजे पतंगाच्या रंगाप्रमाणें असावयाचें. त्याचा रंग पतंगाच्या रंगासारखा. तो तेव्हांच विटतो आणि मोल दिलेले पैसे मात्र वायां जातात. सापाप्रमाणेंच तो अंतःकरणांत विषानें भरलेला. तुकाराम म्हणतात मला असले लोक दाखवूं नका. देवा त्यांचें मला दर्शन देखील नको.

चर्चा—च० ४ झणीं=नको असा अर्थ जुन्या ग्रंथांत आढळतो. डॉ. भांडारकर, माडगांवकर.

झणीं=झटकन्, लवकर. असे असतील ते मला लवकर दाखवून द्या-कशाला? त्यांचें शासन करावयाला, असें गृहीत धरावें. संपादक.

कल्हारीं=हृदयांत असा अर्थ लक्षणेनें केला आहे.

शब्द—**यारी**=संगत, सोबत, सहाय्य. **पतंग** = एक प्रकारचें लांकूड. **कल्हार** = संचय.

शेरा—अधमावर विश्वास ठेवूं नये.

१४२.

आणिकांची स्तुति आम्हां ब्रह्महत्त्या ।
एकावांचूनि त्या पांडुरंगा ॥ १ ॥

आम्हां विष्णुदासां एकाविध भाव ।
न म्हणों या देव आणिकांसि ॥ २ ॥
शतखंड माझी होईल रसना ।
जरी या वचना पालटेन ॥ ३ ॥
तुका म्हणे मज आणिका संकल्पें ।
अवघींच पापें घडतील ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—त्या एका पांडुरंगावांचून दुसऱ्या कोणाची स्तुति करणें म्हणजे आम्हांला ब्रह्महत्त्या जशी तसें आहे. आम्हा विष्णुदासांचा भाव एकविध आहे. दुसऱ्या कोणाला आम्ही देव म्हणत नाहीं. जर या वचनांत अंतर पडलें तर माझ्या जीभेचे शतशः तुकडे पडोत. यांत जर कांहीं माझा दुजाभाव झाला, जर मीं दुसरा देव संकल्पिला, तर माझ्या हातून सगळीं पातकें घडल्या-सारखेंच होईल.

चर्चा—च० ४ आणिका संकल्पें=याशिवाय इतर कांहीं संकल्प केला तर. किंवा आणिक=दुसरा कोणी देव–त्याचा संकल्प केला तर. विठोबा शिवाय इतर देव मनांत आणिला तर.

शब्द. आणिक=दुसरे.

शेरा—एकविध भक्ती.

१४३.

तान्हेल्याची धणी ।
फिटे गंगा नव्हे उणी ॥ १ ॥
माझे मनोरथ सिद्धी ।
पाववावे कृपानिधि ॥ २ ॥
तूं तो उदारांचा राणा ।
माझी अल्पचि वासना ॥ ३ ॥

कृपादृष्टी पाहें ।
तुका म्हणे होई साह्ये ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—गंगेचें पाणी प्याल्यानें तान्हेल्या माणसाची तहान भागते. पण त्यामुळें गंगा कांहीं कमी होत नाहीं. देवा, तूं कृपेचा समुद्र आहेस तूं माझे मनोरथ पुरीव. तूं तर उदारांचा राजाच आहेस. आणि माझी आशा काय, एवढीशी. तेव्हां, माझ्याकडे कृपादृष्टीनें पहा आणि मला साह्य हो.

चर्चा—नाहीं.

शब्द—धणी = समाधान; उणी = कमी.

शेरा—देवाचें सहाय मागितलें. देव कृपाळू आहे.

१४४.

संतांचा अतिक्रम ।
देवपूजा तो अधर्म ॥ १ ॥
येती दगड ते वरी ।
मंत्रपुष्पें देवा शिरीं ॥ २. ॥
अतितासी गाळी ।
देवा नैवेद्यासी पोळी ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा ।
ताडण भेदकांची सेवा ॥ ४ ॥

पाठभेद — चरण २, तेवरी—तैसे वरी. पंढरपूरप्रत.

अर्थ—संतांचा अतिक्रम करून देवपूजा करणें म्हणजे अधर्म. संतांच्या डोक्यावर दगड येतात आणि देवाला मंत्रांनीं आळवून फुलें वाहतो. अतीताला शिव्या आणि देवाला नैवेद्य पोळीचा, असल्या प्रकारचा भेद करणाऱ्यांची सेवा म्हणजे देवाला ताडणच होय.

२ किंवा "तैसेवरी" असा पाठ घेतला तर—तैसेवरी=तशानें—संतांची

अवहेलना करणें व देवाची पूजा करणें यानें–देवाच्या डोक्यावर मंत्रपुष्पें जरी वाहिलीं तरी दगड आल्यासारखेंच होतें–असाही अर्थ करावा. वा. ब. प. पंढरपूर प्रतींतील तेवरी हा पाठ सरस आहे मं.ठ. तेवरी=त्यांवर-संतांवर. शब्द. भेदक–भक्तिप्रपंच करणारे, देव व संत यांच्यांत भेद करणारे. शेरा—सामान्य उपदेश.

१४५.

करणें तें देवा।
हेंचि एक पावे सेवा ॥ १ ॥
अवघें घडे येणें सांग।
भक्त देवाचें तें अंग ॥ २ ॥
हेंचि एक वर्म।
काय बोलिला तो धर्म ॥ ३ ॥
तुका म्हणे खरें।
खरें त्रिवाचा उत्तरें ॥ ४ ॥

पाठभेद––नाहींत.

अर्थ—जें काय करणें तें देवाकरितां करणें ही एकच सेवा देवाला पावते आणि फळाला येते. इतर सेवा व्यर्थ. सर्व कर्में देवाकरितां करणें हींच काय ती सेवा. असें केल्यानें सर्व सांग होतें, पूर्ण होतें, त्यांत कांहीं व्यंग रहात नाहीं. कारण भक्त हें देवाचें अंगच आहे. धर्मानें वर्म वर्म म्हणून जें काय सांगितलें, धर्माचें वर्म जें काय तें एवढेंच. खरा धर्म काय तो हाच. हेंच खरें, खरें, खरें, असें त्रिवार सांगतों.

चर्चा––च० २—असें करणारा भक्त म्हणजे देवाचें अंगच, देवाचा अंशच.
च० ३ काय बोलिला तो धर्म–१ जो काय धर्म म्हणून सांगितला तो हाच.
२ जो बोललेला, लौकिकांत सांगितलेला धर्म तो या पुढें काय होय? हाच खरा. हेंच खरें वर्म. हा अर्थ किंचित् सरस वाटतो. वा० व० प०

शब्द--वर्म = रहस्य. त्रिवाचा = तीन वेळां उच्चारून.
शेरा—देवार्पण कर्म असावें हाच धर्म.

१४६.

मागें नेणपणें घडलें तें क्षमा ।
आतां देतों सीमा करूनियां ॥ १ ॥
परनारीवें जया घडलें गमन ।
दावीतो वदन जननीरत ॥ २ ॥
उपदेशावरी मन नाहीं हातीं ।
तो आतां पुढती पाहूं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे साक्षी असों द्यावें मन ।
घातली ते आण पाळावया ॥ ४ ॥

पाठभेद—नेणपणें–नेणतेपणें.

अर्थ--मागें जें तुमच्या हातून न कळत कांहीं घडलें असेल त्याची क्षमा करितों. परंतु या पुढें मात्र सीमा घालून देतों. मर्यादा करून देतों. तिचें उल्लंघन पुढें होतां कामा नये. मागचें माफ; पण पुढें जपलें पाहिजे. ज्याला परनारीचें गमन घडलें असेल तो मात्रागमनी समजावा. उपदेश घेतल्यानंतरहि –किंवा उपदेश करून सुद्धां–ज्याचें मन ताब्यांत रहात नाहीं, तो आम्हांला दृष्टीसमोर नको, पुढें पहावयाला नको. नेहमीं मन साक्षी असों द्यावें. ही जी मर्यादा घातली ती पाळण्याकरितां मन हें नेहमीं सावध ठेवा.

चर्चा—च० १ क्षमा (करावी, करितों–अध्याहृत.) किंवा क्षमावें–माफ करावें–नानायोगी.

उपदेशावरी–च० ३ १ उपदेशानंतर देखील २ उपदेशाला वरतो, उपदेश घेतो (आणि नंतर)–नामायोगी. या अर्थांत ओढाताण फार होते. संपादक.

च० ४ जी आपण मर्यादा घातली ती पाळावयाला मन साक्षी असों द्यावें.

शेरा--अभंग अनुतप्तशिष्यांस उद्देशून रचिलेला असल्यास क्षमा करतों हाच अर्थ बरा. प्रसंग तसाच असावा. मनोनिग्रह सांगितला आहे.

माडगांवकर–वा० ब० प०

१४७.

आणिकांच्या घातें ।
ज्यांचीं निवतील चित्तें ॥ १ ॥
तेचि ओळखावे पापी ।
निरयवासी शीघ्रकोपी ॥ २ ॥
कान पसरोनी ।
ऐके वदे दुष्ट वाणी ॥ ३ ॥
तुका म्हणे भांडा ।
धीर नाहीं ज्याच्या तोंडा ॥ ४ ॥

पादभेद—नाहींत.

अर्थ—दुसऱ्यांचा घात झाला म्हणजे ज्यांना बरें वाटतें, ज्यांच्या चित्ताला समाधान होतें ते नरकांतले, शीघ्रकोपी, दुष्ट असे समजावे. असला माणूस कान पसरून दुष्ट वाणी ऐकतो व बोलतो. तु. म्ह. त्या भांडाच्या तोंडाला धीर नाहीं, आवर नाहीं.

चर्चा. च० ४ ज्याच्या तोंडाला धीर, आवर कांहीं नाहीं असा तो भांड असा अर्थ करावा–माडगांवकर. वा० व० प०

शब्द—निवणें = संतोष पावणें. **निरय** = नरक. **भांड** = भांडखोर.

शेरा—विघ्नसंतोषी माणसाचें वर्णन.

१४८.

कुंभ अवघा एक आवा ।
पाकीं एकीं गु फेडावा ॥ १ ॥
ऐसे भिन्न भिन्न साटे ।
केले प्रारब्धाचे वांटे ॥ २ ॥

हिरे दगड एक खाणी ।
कैंचें विजातीला पाणी ॥ ३ ॥
तुका म्हणे शिरीं ।
एक एकाची पायरी ॥ ४ ॥

पाठभेद—गु फेडावा–गुफे डावा.

अर्थ—१ मडकीं तेथून सगळीं एकच. एकाच आव्यांत भाजतात. परंतु कांहींचा उपयोग स्वयंपाकाकडे होतो आणि कांहीं गू काढण्याकडे जातात.

२ असें प्रत्येकाचें संचित निरनिराळें असतें, नशिबानें निरनिराळे वांटे करून दिले म्हणून असा प्रकार होतो. ३ हिरे दगड हे दोन्ही एकाच खाणींतून निघतात. पण एकाला पाणी असतें. आणि त्या हीन जातीच्या कोळशाला नसतें; त्याला पाणी कुठलें असावयाला ? तु. म्हणतात. एकाचें नशीब डोक्यावर बसण्याचें. हिरा मुकुटांत घालितात, आणि दगड ?–पायरीला.

चर्चा—मूळांत छापिलेला पाठच शुद्ध आहे, दुसरा नुसता नमूद केला आहे, तो उघड उघड चुकीचा दिसतो. संपादक.

शब्द—**फेडणें** = साफ करणें. 'मायावेडी गू, फेडी.' **साटे** = संचित-प्रकार. **विजाती** = हीन जातीचा. (श्रेष्ठ तो हिरा, आणि कनिष्ठ तो दगड.) **पाणी** = तेज, चमक.

शेरा—स्थितिभेद नशिबानेंच केला आहे.

१४९.

मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात ।
तोंडीं लाळ हात चोळी रिते ॥ १ ॥
ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठेंविण ।
रुचि नेदी अन्न चवी नाहीं ॥ २ ॥
बोलों जाणे अंगीं नाहीं शूरपण ।
काय तें वचन जाळावें तें ॥ ३ ॥
तुका म्हणे बहु तोंडें जे वाचाळ ।
तेंग तेंचि मूळ लटिक्याचें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—मांडे, पुऱ्या, यांच्या गोष्टी फक्त तोंडानें सांगतां येतात; त्यामुळें तोंडाला पाणी सुटतें आणि आनंदानें उगीच रिकामे हात चोळतो अशा माणसाच्या बाता फिक्या, जसें मिठाशिवाय अन्न तशा; त्यांना रुची नाहीं, चव नाहीं. २ अंगांत ताकद नाहीं आणि शूरपणाच्या गोष्टी बोलतो, अशा माणसाचें बोलणें काय जाळावयाचें आहे ? ४ तु. म्ह. जे फार बडबड-णारे असतात त्यांचें तें बडबडणें म्हणजे खोटेपणाचें लक्षण.

चर्चा—कोणा एका माणसाला मांडे पुऱ्या यांच्या गोष्टी बोलतां येतात. सांगतांना तोंडाला पाणी सुटतें व आनंदानें हात चोळतो. जणूं काय याला मांडें पुऱ्या खायला मिळाल्याच.

शब्द—तेंग तेंच = तें हंग, हंग. (कानडी) तेंच. मं० ठ०

शेरा—बडबड ही खोटेपणाची खूण.

१५०.

न लगे चंदना सांगावा परिमळ ।
वनस्पतिमेळ हाकारुनी ॥ १ ॥
अंतरींचें धांवे स्वभावें बाहेरी ।
धरितांही परि आवरेना ॥ २ ॥
सूर्य नाहीं जागें करीत या जना ।
प्रकाश किरणाकर म्हूण ॥ ३ ॥
तुका म्हणे मेघ नाचवी मयूरें ।
लपवितां खरें येत नाहीं ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ सांगावा-पुसावा. च० ३ किरणाकर-किरणा कर.

अर्थ—वनस्पतींच्या सभा भरवून त्यांच्यापुढें चंदनाला आपला परिमळ सांगावा लागत नाहीं. आंत जें असेल तें सहज, आपोआप बाहेर पडतें. धरतां

धरतां आवरत नाहीं. सूर्य कांहीं लोकांना सांगावयाला जात नाहीं कीं आपण प्रकाशाच्या किरणांचा आकर=म्हणजे पुंज आहोंत म्हणून तुका. म्हणतात, कीं मेघ मयूरांना नाचवितो. खरें असेल तें लपवितां येत नाहीं.

चर्चा—च० ३ प्रकाश किरणा कर म्हूण—

१ किरणा, प्रकाश कर म्हूण—किरणांनो, प्रकाश करा म्हणून सूर्य लोकांना जागें करीत नाहीं. भानू, लिमये, मराठे.

२ ' प्रकाशकिरणाकर '=प्रकाशाच्या किरणांचा आकर=पुंज, तो आपण असें म्हणून सूर्य लोकांना जागें करीत नाहीं. देवदत्त भांडारकर वा० ब० प०

३ जसें परिमळ म्हूण चंदन वनस्पति मेळ हाकारित नाहीं, तसेंच "प्रकाश किरणाकर" म्हणून=हा माझा किरणसमुदाय असें म्हणून सूर्य या लोकांना जागें करीत नाहीं. हाका मारीत नाहीं. वा० ब० प०

या दिसंति गुणाः सर्वे विकसंत्येव ते स्वयम् ।
न हि कस्तूरिकागंधः शपथेन निवार्यते ॥

(४) स्वतां प्रकाशकिरणाकर असला म्हणून सूर्य लोकांना जागें करावयास जात नाहीं, त्याचा प्रकाश आपोआपच लोकांना दिसतो असा अर्थ.

वा. ब. प.

चर्चा—थोडासा पाठभेद कल्पून "प्रकाश किरणां कर म्हूण सूर्याल जन जागें करीत नाहीं." असा अर्थ घ्यावा असें डॉ. भांडारकरांना बाटत होतें. पण हा अर्थ मागील चरणाशीं, व अभंगाच्या एकंदर अर्थाच्या संदर्भाशीं विसंगत आहे—आपल्या अंगचा परिमळ चंदन लोकांना दाखवावयला मुद्दाम जात नाहीं. याला धरून प्रस्तुत चरणाचा अर्थ "आपल्या अंगचा प्रकाश दाखविण्यास सूर्य लोकांना बोलावीत नाहीं" असा हवा.

शब्द—**म्हूण**=म्हणून. **हाकारूनि**=हाका मारून.

शेरा—खरें तें लपत नाहीं, अंगांतील गुण झांकत नाहींत.

१५१.

चंदनाचे हात पायही चंदन ।
परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥ १ ॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार ।
सर्वांगें साकर अवघी गोड ॥ २ ॥
तुका म्हणे तैसा सज्जनापासून ।
पाहातां अवगुण मिळेचि ना ॥ ३ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—चंदनाचे हातपाय सर्व चंदनच. त्याचप्रमाणें परिस सर्व बाजूंनीं परीसच. त्याला हीन अंग नाहीं. दिव्याला पाठीं पोटीं, कोठेंहि, अंधार नाहीं. साखर सर्वस्वी गोडच. तसाच, सज्जनाकडे अवगुण शोधिला तरी मिळावयाचा नाहीं.

शब्द—**हीन** = कमी प्रतीचें. **साकर** = साखर.

शेरा—संतमहिमा सांगितला आहे.

१५२.

मना करा रे प्रसन्न ।
सर्व सिद्धीचें कारण ।
मोक्ष अथवा बंधन ।
सुखसमाधान इच्छा ते ॥ १ ॥
मनें प्रतिमा स्थापिली ।
मनें मना पूजा केली ।
मनें इच्छा पुरविली ।
मन माउली सकळांची ॥ २ ॥

मन गुरु आणि शिष्य ।
करि आपुलेंचि दास्य ।
प्रसन्न आपआपणास ।
गति अथवा अधोगती ॥ ३ ॥
साधक वाचक पंडित ।
श्रोते वक्ते ऐका मात ।
नाहीं नाहीं आन दैवत ।
तुका म्हणे दुसरें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—मन प्रसन्न ठेवा, सर्व सिद्धींचें कारण काय तें मन, त्याप्रमाणें असिद्धींचें कारणही मनच. मोक्ष किंवा बंधन, सुख, समाधान, किंवा इच्छा, हावरेपणा, हीं सर्व मनामुळें घडतात. देवाच्या प्रतिमा करणारें तेंही मनच, त्याचप्रमाणें मनाची पूजा करणारें तेंही मनच. इच्छा पुरविणारें मनच. त्याचप्रमाणें सगळ्याचें कारण, माउली, मनच. गुरु आणि शिष्य हे प्रकार मनानेच मन आपलेंच दास्य आपण करतें. आपलें आपल्यालाच प्रसन्न होतें (किंवा, अप्रसन्नहि होतें.) चांगल्या गतीला किंवा वाईट गतीला कारण मनच. हे साधकांनो, वाचकांनो, पंडितांनो, श्रोतेहो, वक्तेहो, सांगतों ऐका, मनाशिवाय दुसरें दैवत नाहीं.

चर्चा—च० २ 'ते' हें सानुस्वार "तें" असें असावें. तसें असेल तर तें=मन नसेल तर ते=ती—जी कांहीं मनाची इच्छा असेल ती. मांडगांवकर.

शब्द—आन = अन्य.

शेरा—मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः । किंवा,

मनश्पुञ्बंग माधम्मा मनश्शेठ्ठा मनोमया ।
मनसा चे प्रदिष्टंते भासति वा करोति वा ।
ततो नं दुःखमन्येते चक्कं वहतो रथम् ।

१५३.

मायबापें जरी सर्पीण कीं बोका ।
त्यांचे संगें सुखा नपवे वाळ ॥ १ ॥
चंदनाचा शूळ सोनियाची बेडी ।
सुख नेदी फोडी प्राण नाशी ॥ २ ॥
तुका म्हणे नरकीं घाली अभिमान ।
जरी होय ज्ञान गर्व ताठा ॥ ३ ॥

पाठभेद— नाहींत.

अर्थ—सर्पीण आई असली किंवा बोका बाप असला तर तीं सापाचीं किंवा मांजराचीं पिलें सुख पावत नाहींत, त्यांना तशा आईबापांपासून सुख होत नाहीं. शूळ चंदनाचा केला, किंवा बेडी सोन्याची केली तरी त्यांच्यापासून सुख होत नाहीं. शूळ शरीर फोडतो आणि प्राण घेतो. त्याचप्रमाणें ज्ञानाचा गर्व झाला म्हणजे त्यापासून सुख होत नाहीं. दुःखच होतें. नरक प्राप्ति होते.

शेरा—बोका पिलें खातो, सर्पीण अंडीं नासते या गोष्टींचा आधार घेऊन उपदेश केला आहे. ज्ञानाचा ताठा झाला तर तो ज्ञानाचा जरी असला तरी त्यापासून सुख नाहीं. बाप असला तरी तो जर बोक्याच्या जातीचा, बोकाच, असेल तर त्यापासून जसें पिलाला सुख होत नाहीं, त्याप्रमाणें.

१५४.

शिकल्या बोलाचे सांगतील वाद ।
अनुभवभेद नाहीं कोणा ॥ १ ॥
पंडित हे ज्ञानी करितील कथा ।
न मिळती अर्था निजसुखा ॥ २ ॥
तुका म्हणे जैसी लांचासाठीं ग्वाही ।
देतील हे नाहीं ठावी वस्तु ॥ ३ ॥

पाठभेद---नाहींत.

अर्थ--शिकलेल्या बोलाचे नुसते पोपटासारखे प्रतिध्वनी काढणारे पढांक पुष्कळ मिळतील. पण स्वतःच्या अनुभवाचें गुह्य कोणापाशींच नाहीं. हे ज्ञानी, पंडीत कथाकीर्तनें करितील. परंतु मुख्य अर्थ जो मनाचें समाधान, तो त्यांच्यापाशीं नाहीं. मूळ वस्तु, खरा प्रकार, काय आहे तें माहीत नसतांना लांचासाठीं जशी लोक खोटी आणशपथ वहातात, तसा यांचा प्रकार आहे. ब्रह्मज्ञान, आणि त्यापासून होणारें मनाचें समाधान हीं यांच्यापाशीं नाहींत. पण पैशासाठीं वाटेल तें बोलतील. जणूं काय ब्रह्मज्ञानाचा यांना अनुभव आलाच आहे.

चर्चा--च० १ अनुभव भेद=अनुभवानें येणारें मार्मिक ज्ञान, मर्म.

च० २ निजसुखा अर्था-मनाचें समाधान हें जें मुख्य-त्या अर्थाला.

शेरा—अनुभवावांचून बोलणें व्यर्थ, बोलक्या हरिदासांवर तडाका.

१५५.

प्रारब्ध क्रियमाण ।
भक्तां संचित नाहीं जाण ॥ १ ॥
अवघा देवाचि जाला पाहीं ।
भरोनियां अंतर्बाही ॥ २ ॥
सत्त्वरजतमबाधा ।
नव्हे हरिभक्तांसी कदा ॥ ३ ॥
खाय बोले करी ।
अवघा त्यांच्या अंगें हरी ॥ ४ ॥
देवभक्तपण ।
तुका म्हणे नाहीं भिन्न ॥ ५ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ—भक्तांना मुळीं प्रारब्ध नाहींच. क्रियमाणही नाहीं, संचितही नाहीं. भक्त अवघा देवच झाला. आंत बाहेर देव भरून देवरूपच पावला. सत्त्वरजतमांची बाधा हरिभक्तांना कधीं होत नाहीं. ते खातात, बोलतात, करितात, हें सर्व लौकिकांत खरें. वास्तविक पहातां त्यांच्या रूपानें देवच खातो, बोलतो, करतो असें म्हणावयाला पाहिजे. देवपण व भक्तपण भिन्न नाहीं. देव आणि भक्त एकच.

चर्चा—च० १ प्रारब्ध क्रियमाण संचित...हा प्रयोग व्यावहारिक असेल काय? उदाहरणार्थ "काशीबाई आहेत कां तेथें? नाहीं, काशी नाहींन् बाई नाहीं." अशासारखें; येथें—प्रारब्ध नाहीं—क्रियमाण नाहीं न् संचित नाहीं—प्रारब्धच मुळीं नाहीं—पुढें होणारें तें क्रियमाण व मागलें झालेलें तें संचित अशा कोणत्याच प्रकारचें प्रारब्ध मुळीं नाहींच.

किंवा, २ प्रारब्ध=जन्माचें कारण असें जें कर्म तें संचित=भोगशेष. क्रियमाण=प्रस्तुताचरित कर्म. हीं तीनहि नाहींत. डॉ. भांडारकर.

प्रारब्धाचा नाश मोक्षाशिवाय होत नाहीं. संचिताचा नाश भोगानेंच होतो.

च० ३ सत्त्वरजतम बाधा—मांच योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते. या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें.

शब्द—**प्रारब्ध**=पूर्वजन्मीचें कर्म, जें या जन्माला व त्यांतील सुखदुःखाला कारण होतें तें.

संचित=जें भोगानेंच संपावयाचें असतें तें, भोगावयाचें उरलेलें कर्म. **क्रियमाण**=हल्लीं करतों तें कर्म.

शेरा—देवभक्तांचें ऐक्य.

१५६.

शास्त्रांचें जें सार वेदांची जो मूर्ति ।
तो माझा सांगती प्राणसखा ॥ १ ॥
म्हणउनि नाहीं आणिकांचा पांग ।
सर्व जालें सांग नामें एका ॥ २ ॥

सगुण निर्गुण जयाचीं हीं अंगें ।
तोचि आम्हांसंगें क्रीडा करी ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते ।
स्वयंभू आइते केले नव्हों ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ " जयाचीं अंगें ' असाहि पाठ आहे.

अर्थ—देव म्हणजे सर्व शास्त्रांचें सार, वेदांची प्रत्यक्ष मूर्तिच तो. तो माझा सखा, जिवलग आहे. म्हणून इतरांची गरज मला नाहीं; त्यांचा लोभ नाहीं. एका नामें करूनच मी सर्व परिपूर्ण झालों, मला सर्व कांहीं मिळालें. सगुण आणि निर्गुण हीं दोन ज्याचीं आंगें तो देवच आमच्याशीं खेळतो. तु. म्ह. आम्ही प्रत्यक्ष ब्रम्हदेवाचे बाप–विधात्याचें विधाते आम्ही. आम्ही स्वयंभू आयते आपोआप झालेले; केलेले नव्हों.

शब्द—पांग = गरज लोभ.

पांग आणि सांग यांपैकीं सांग=सर्व अंगांनीं परिपूर्ण–पांग कांहीं अंगांनीं कमी, व्यंग, असा अर्थ आहे का ? पांग=उणेपणा, अपेक्षा.

शेरा—देवभक्तांचें ऐक्य.

१५७.

ऐका महिमा आवडीची ।
बोरें खाय भिल्लीणीचीं ॥ १ ॥
थोर प्रेमाचा भुकेला ।
हाचि दुष्काळ तयाला ॥ २ ॥
अष्टमा सिद्धींला ।
न मनी क्षीरसागराला ॥ ३ ॥
पोहे सुदामदेवाचे ।
फके मारी कोरडेच ॥ ४ ॥
न म्हणे उच्छिष्ट अथवा थोडें ।
तुका म्हणे भक्तीपुढें ॥ ५ ॥

पाठभेद—च० १ 'भिलटीचीं' असाहि पाठ आहे.

अर्थ—भक्तीचें माहात्म्य, मोठेपणा सांगतों, तो ऐका. शबरीनें भक्तिपूर्वक दिलेलीं बोरें देवानें आवडीनें खाल्लीं. म्हणून, देव हा प्रेमाचा भुकेला. त्याला प्रेमाचा दुष्काळ. तो आठ सिद्धि किंवा क्षीरसागर यांना मानीत नाहीं. सुदाम देवाचे पोहे कोरडेच फकीवारी खातो. भक्ती असेल तर तुम्हीं द्याल तें थोडें किंवा उष्टें असें देव म्हणत नाहीं. थोडें असो, उष्टें असो, भक्तीचें असलें म्हणजे त्याला चालतें.

चर्चा—४ फके मारी कोरडेच.

१ पोहे कोरडे, नुसतेच, दूध दहीं वगैरे कालवणाशिवाय फके मारी= बकाणे भरून खातो.

२ पोहे थोडे असल्यामुळें संपले. तेव्हां कोरडेच फके मारी जणूं काय हा खरोखरच पोहे खात आहे.

कथेप्रमाणें पोहे तीन मुठीच होते. एक मूठ कृष्णानें खाल्ले. मग त्यांतले रुक्मिणीनें मागितले. तेव्हां एक घास खरा व बरेच फुके असें कृष्ण करीत असे. या कथाभागाला उद्देशून फके मारी कोरडेच असें असावें. वा० ब० प०

शब्द—फका = मूठ, ओंजळभर (पोहे) कोरडे, सूके.

शेरा—देव प्रेमाचा भुकेला.

१५८.

कोणें तुझा सांग केला अंगीकार।
निश्चिति त्वां थोर मानियेली ॥ १ ॥
कोणें ऐसा तुज उपदेश केला ।
नको या विठ्ठला शरण जाऊं ॥ २ ॥
तेव्हां तज कोण घालील पाठीसी ।
घांसील भूमीसी वदन यम ॥ ३ ॥
कांरे नागवासी आयुष्य खातो काळ ।
दिसेंदिस बळ क्षीण होतें ॥ ४ ॥

तुका ह्मणे यासी सांगा कोणी तरी ।
विसरला हरी मायबाप ॥ ५ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ—तूं जी ही निश्चित्ती मानिली आहेस, अगदीं इतका बेपर्वाईनें वागतोस त्या तुझा अंगीकार कोणीं केला आहे तें सांग. तुझें रक्षण करण्याचा कोणीं मक्ता घेतला आहे कीं काय ? विठ्ठलाला शरण जाऊं नको असा उपदेश तुला कोणीं केला? जेव्हां यम तुझी मानगुटी धरून तुला जमिनीवर पालथा पाडील आणि तुझें तोंड मातींत घाशील तेव्हां तुझें रक्षण कोण करणार आहे ? तूं असा नागवला कां जातोस, जात आहेस ? काळ आयुष्य खात आहे, दिसें दिस बळ क्षीण होतें–हें तुला कळत नाहीं का ? तु. म्ह. याला कोणी तरी चार उपदेशाचे शब्द सांगा हो, हा देवाला, आपल्या आईबापाला विसरला.

च० ३ कुस्तींत एक पहिलवान दुसऱ्याला जमिनीवर पाडून त्याला मातींत लोळवितो, त्यावरून सुचलेली उपमा.

च० ५ देव हाच आईबाप.

शब्द—**अंगीकार**=पाठपुरवणी, मदत. **निश्चिंती** = बेपर्वाई. **नागवसी** = नागविला जातोस, फसतोस.

शेरा--देवापासून पराङ्मुख झालेल्या अभक्ताला इशारा.

१५९.

साधूनी बचनाग खाती तोळा तोळा ।
आणिकांतें डोळां न पाहावे ॥ १ ॥
साधुनी भुजंग धरितील हातीं ।
आणिकें कांपती देखोनियां ॥ २ ॥
असाध्य तें साध्य करितां सायास ।
कारण अभ्यास तुका ह्मणे ॥ ३ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ—अभ्यासानें, संवयीनें, तोळा तोळा बचनाग खातात. इतरांना तें डोळ्यांनीं बघवत देखील नाहीं इतकें भयंकर वाटतें. त्याचप्रमाणें अभ्यासानें नाग देखील हातांत धरतात. दुसऱ्यांचा पाहूनच थरकांप होतो. असाध्य म्हणून जी गोष्ट दिसते किंवा वाटते ती सायासांनीं साध्य करितां येते. सर्वाला कारण ' अभ्यास '. तेवढा असला म्हणजे सर्व मिळतें.

शब्द—**साधुनी** = साधन करून, प्रयत्नानें, अभ्यासानें. **आणिकें** = इतर,सामान्य लोक. ज्यांना संवय नाहीं असे लोक. **अभ्यास** = संवय, सराव.

शेरा—अभ्यासानें सर्व साध्य होतें.

१६०.

आमची गोसावी अयाचितवृत्ति ।
करवीं शिष्याहातीं उपदेश ॥ १ ॥
दगडाची नाव आधींच ते जड ।
ते काय दगड तारूं जाणे ॥ २ ॥
तुका म्हणे वेष विटंविला त्यांनीं ।
सोंगसंपादणी करिती वरी ॥ ३ ॥

पाठभेद—आमची–आमचे.

अर्थ—आमची वृत्ति गोसाव्यासारखी, अयाचित. आम्हीं कांहीं कोणापाशीं मागावयाचे नाहीं. कोणीं दिलें तर मात्र घेतों. असें तोंडानें सांगावयाचें आणि शिष्याकडून उपदेश करून गुरुदक्षिणा घ्यावयाची. असें करणें म्हणजे दगडाची नांव करण्यासारखेंच. दगड स्वतांच जड तो दुसऱ्याला काय तारणार ? त्यानें काय दगड तारण व्हायचें आहे ? तु. म्ह. या अशा लोकांच्याकडून सोंगाची संपादणी मात्र होते. निरनिराळे प्रकार होतात. आणि त्यामुळें साधूच्या वेषाची विटंबना मात्र होते.

चर्चा—च० १ 'आमचे गोसावी' असा पाठ घेऊन, अगदीं अयाचित वृतीचे. फक्त शिष्यांच्या कडून कथा करवून बिदागी मागतात इतकेंच, असा अर्थ करितां येईल. वा० ब० प०

गोसावी=हरिदास.

" आमची " असा पाठ बहुतेक प्रतींत सांपडतो व तो चरणाच्या उत्तरार्धाशीं जुळतोही. म्हणून तोच बरा असें वाटतें. संपादक.

शब्द—परी = प्रकार. (२) परंतु.

लक्ष्यप्रयोग—ते काय दगड तारूं जाणे.

शेरा—ढोंग्यावर तडाखा.

१६१.

मृगजळा काय करावा उतार ।
पावावया पार पैलथडी ॥ १ ॥
खापराचे होन खेळती लेंकुरें ।
कोण त्या वेव्हारें लाभ हानी ॥ २ ॥
मंगळदायक करिती कुमारी ।
काय त्यांची खरी सोयरीक ॥ ३ ॥
स्वप्नींचें जें सुख दुःख जालें कांहीं ।
जागृतीं तो नाहीं साच भाव ॥ ४ ॥
सारीं झालीं मेलीं लटिकें वचन ।
बद्ध मुक्त शीण तुका म्हणे ॥ ५ ॥

पाठभेद—च० १ पार–तीर. च० २ वेव्हारें–व्यापारें.

अर्थ—मूळांत खरें पाणी नाहीं, आणि मृगजळच असलें, तर त्याच्या पलीकडल्या तीराला पोंचावयाला उतार काय करावयाचा, कशाला पाहिजे ? खापराचे होन करून मुलें देवघेवीचे खेळ खेळतात. पण त्या व्यवहारानें लाभ कसला आणि हानी तरी कसली ? मुली खेळांत लग्नें लावितात, ती काय खरी सोयरीक होते ? स्वप्नांत सुख किंवा दुःख होतें; पण त्याला खरेपणा जागेपणीं नाहीं. हीं सारीं, हें सर्व जग जन्माला आलें व मेलें असें म्हणणें

खोटें. किंवा अमुक बद्ध आहे, तमुक मुक्त आहे हेंही व्यर्थ; शीणाचाच प्रकार.

चर्चा—सारीं...जालीं...वचन. कोणीं झालेंही नाहीं व मेलेंही नाहीं. कुतो बंधः कुतो मोक्षः

शब्द—मंगलदायक = लग्नाचा सोहळा.

शेरा—सारेंच लटकें तिथें बंध कसचा आणि मोक्ष कसचा ? वेदांताचा प्रथम संस्कार असावा.

१६२.

माझें ह्मणतां याला कां रे नाहीं लाज ।
कन्या पुत्र भाज घन वित्त ॥ १ ॥
कोणी सोडवीना काळाचे हातींचें ।
एकाविणें साचें नारायणा ॥ २ ॥
तुका म्हणे किती सांगावें चांडाळा ।
नेणें जीवकाळा कोण्या जीतो ॥ ३ ॥

पाठभेद—च० १ कांरे–कांहीं च० ३ जीवकळा–जीवनकळा.

अर्थ—माझें धन, माझें वित्त, माझी बायको, माझा मुलगा, असें हें माझें, तें माझें असें म्हणावयाला यांला लाज कशी वाटत नाहीं ? काळाच्या हातांतून एका नारायणाशिवाय कोणी सोडविणार नाहीं, हें खरें. चांडाळाला काय सांगावें ? कोणतीही जीवकळा या मूर्खाला समजत नाहीं. नुसता जगला आहे एवढेंच.

च० ३ नेणें...जीतो. जीवकळा = जीवनाचें रहस्य. कोण्या जीवकळेनें तो जगतो हें मला समजत नाहीं. जन्म म्हणजे त्याला वाटतें तरी काय ? हें मला कळत नाहीं. असाही अर्थ लागतो. (वा. ब. प.) (सं०).

शब्द—जीवकळा = जीवनाचें रहस्य. तृतीयेचें एकवचनी रूप.

शेरा—संसारांत गुंतलेल्याला उपदेश.

१६३.

आंधळयासि जन अवघेंचि आंधळें ।
आपणासी डोळे दृष्टी नाहीं ॥ १ ॥
रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न।
तोंडासी कारण चवी नाहीं ॥ २ ॥
तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण ।
तया त्रिभुवन अवघें खोटें ॥ ३ ॥

पाठभेद––च० ३ अवघें–सर्व.

अर्थ––माणूस स्वतः आंधळा असला म्हणजे त्याला सर्व जगच आंधळें वाटतें. स्वतःला दृष्टि नाहीं. आणि त्यामुळें डोळे कसे असतात तेंच माहीत नाहीं. रोग्याला मिष्टान्नदेखील विषासारखें लागतें. कारण तोंडाला चव नाहीं म्हणून. त्याचप्रमाणें जो स्वतः शुद्ध नाहीं त्याला सर्व जग खोटें वाटतें.

चर्चा––च० १आपणासी...नाहीं-आपल्याला डोळे कधींच दृष्टीस पडले नाहींत डोळे कसे असतात ते स्वतः कधीं पाहिलेच नाहींत. आपल्याला डोळे नाहींत तेव्हां जगालाही नाहींतच. माडगांवकर. वा. ब. प.

शेरा––पापी असेल त्याला जगांत पापच दिसतें.

१६४.

छळी विष्णुदासा कोणी ।
त्याची अमंगळ वाणी ॥ १ ॥
येऊं न द्यावा समोर ।
अभागी तो दुराचार ॥ २ ॥
नावडे हरिकथा ।
त्याची व्यभिचारिण माता ॥ ३ ॥

तुका म्हणे याति ।
भ्रष्ट तयाची ते माति ॥ ४ ॥

पाठभेद--च० ४ तुका म्हणे याति हो का तयाचि भलती–असाहि पाठ आहे.

अर्थ--जो कोणी विष्णुदासांना छळतो, त्याची वाणी अमंगळ. तो दुराचार अभागी, समोर येऊं देऊं नये. ज्याला हरिकथा आवडत नाहीं, त्याची माता व्यभिचारीण समजावी. तु. म्ह. त्या माणसाची बुद्धि खोटी, भ्रष्ट झालेली आणि म्हणूनच जातही भ्रष्टच समजावी.

शेरा—भक्तांची निंदा करूं नये. त्यांचा आदर करावा असा भाव.

१६५.

बोलविसी तैसें आणीं अनुभवा ।
नाहीं तरी देवा विटंबना ॥ १ ॥
मिठेविण काय करावें मिष्टान्न ।
शव जीवेंवीण शृंगारिलें ॥ २ ॥
संपादणीविण विटंबिलें सोंग ।
गुणेंविण चांग रूप हीन ॥ ३ ॥
कन्यापुत्रेंविण मंगळदायकें ।
वेचिलें हें फिकें द्रव्य तरी ॥ ४ ॥
तुका म्हणे तैसी होते मज परी ।
न देखें अंतरीं प्रेमभाव ॥ ५ ॥

पाठभेद—च० २ मिष्टान्न–पक्कान्न.

अर्थ—देवा, जसें माझ्याकडून बोलवितां, तसेंच माझ्या अनुभवाला आणून द्या. नाहींतर, नुसती विटंबना आहे. मीठ नसलें तर मिष्टान्न काय करावयाचें ? किंवा कुडींत प्राण नाहीं असलें शव पुष्कळ शृंगारलें त्याचा काय उपयोग ? सोंग घेतलें आणि त्याची संपादणी करितां आली नाहीं तर त्यांत

काय अर्थ आहे ? किंवा रूप चांगले आहे पण चांगले गुण मात्र नाहींत, तर तसें असणें हें हीनच, कमीपणाचेंच. किंवा पुष्कळ लग्नें केलीं. पण कन्यापुत्र, मुलेंबाळें, संतति नाहीं. तर त्याचा काय उपयोग ? पुष्कळ द्रव्य खर्चिलें तरी फुकटच. तु. म्ह. देवा, माझा प्रकार तसाच आहे. अंतःकरणांत भक्तीचा उमाळा नाहीं आणि वरवर भक्तीचे, प्रेमाचे, शब्द मात्र बोलतों.

च० ४ कन्या पुत्रें विण मंगळदायकें...

१ विवाहांत मुख्य दैवत म्हणजे नवरानवरी. ज्या लग्नांत नवरा आणि नवरी हींच नाहींत, त्या ठिकाणीं पुष्कळ खर्चवेंच केला, समारंभ केला तरी तें फिकेंच. सर्व खर्च केलेला फुकटच असा अर्थ केल्यास तो सरस होईल काय?

वा० ब० प०

मंगलदायकें=विवाहादि मंगलकार्यांस जीं कारण होतात, तीं कन्यापुत्रांदिक. ज्यांच्या अभावीं कितीही द्रव्य वेंचिलें म्हणजे–गोळा केलें–तरी तें फिकें म्हणजे व्यर्थ. तें रूपास येत नाहीं–दि. वि. माडगांवकर.

उत्तरार्धांतील वेंचिलें=गोळा केलें–जमविलें. अर्थ मला बरा वाटत नाहीं. द्रव्यार्जन केवळ मुलांबाळांकरितांच करावयाचें असा ध्वनि निघतो तो बरोबर दिसत नाहीं. अभंगाच्या अभिप्रायास कोणताही अर्थ पोषकच होणार आहे.


वा. ब. प.

" दारान् अपत्याय " असें किंवा अशाच प्रकारचीं वचनें संस्कृत ग्रंथांतून आढळतात, त्यांचाच अनुवाद ४ थ्या चरणांत आढळतो. वंशस्थिति वंशवृद्धि यांकरितांच बायकांचा उपयोग. त्याकरितांच लग्न. पुरुष व स्त्री मिळून संसार पूर्ण होतो, सांग होतो, स्त्रीशिवाय पुरुष व्यंग,विवाह म्हणजे दोन परस्पर पूरक अशा अंगांचा मिलाफ अशी उदात्त पवित्र कल्पना यांत दिसत नाहीं. चवथ्या चरणांत आमची बायकांविषयीं हीन कल्पना प्रतिबिंबित झालेली दिसते.

वा. ब. प.

शब्द--विटंबना = फाजिती. **संपादणी** = बतावणी. आचरण. **मंगळदायक** = लग्न. **पिकें** = फुकट. **परी** = प्रकार.

शेरा—अंतरीं प्रेमभाव हवा. नुसती क्रिया **लायफळ.**



१६६.

अंगीं ज्वर तया नावडे साकर ।
जन तो इतर गोडी जाणे ॥ १ ॥
एकाचिये तोंडीं पडिली ते माती ।
अवघे ते खाती पोटभरी ॥ २ ॥
चारितां बळें येत असे दांतीं ।
मागोनियां घेती भाग्यवंत ॥ ३ ॥
तुका म्हणे नसे संचित हें बरें ।
तयासि दुसरें काय करी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ –ज्याच्या अंगांत ताप आहे, त्याला साखर आवडत नाहीं. इतरांना ती गोड लागते. तसेंच अन्न एखाद्याच्या तोंडीं पडलें तर नुसत्या माती सारखें लागतें. पण दुसरे लोक पोट भरून खातात.कित्येकांच्या तोंडांत बळा-घातलें, चारिलें, तर तें त्यांना गिळवत नाहीं. दातीं येतें. पण भाग्यवंत अस तील ते मागून घेऊन आवडीनें खातात. सारांश, तु. म्ह. ज्याचें संचितच बरें नसेल, त्याला दुसरें कोणी काय करील ?

चर्चा च० ३ दातीं येणें––नकोसें होणें, ओकारी येणें, भारभूत होणें.
(माडगांवकर).

गुरांच्या पोटांत विष वगैरे म्हणजे त्यांना चारा नकोसा होतो, व तो तोंडांत घातला तरी त्यांना गिळवत नाहीं व दातीं परत येतो. यावरून सुचलेली कल्पना.

शेरा—संचितापुढें इलाज नाहीं. निराशेचे उद्गार.

१६७.

धिग जिणें तो बाइले आधीन ।
परलोक मान नाहीं दोन्ही ॥ १ ॥
धिग जिणें ज्याचें लोभाबरी मन ।
अतीतपूजन घडेचि ना ॥ २ ॥
धिग जिणें आळस निद्रा जया फार ।
अमित आहार अघोरिया ॥ ३ ॥
धिग जिणें नाहीं विवेक वैराग्य ।
झुरे मानालागीं साधुपणा ॥ ४ ॥
तुका म्हणे धिग ऐसे झाले लोक ।
निंदक वादक नरका जाती ॥ ५ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जो बाईलवेडा, बायकोच्या आधीन, त्याचें जिणें व्यर्थ. त्याला मान नाहीं. या जगांत मान नाहीं आणि परलोकांत मुक्तीहि नाहीं. त्याचप्रमाणें ज्याचें मन लोभाला गुंतलें, त्याचें जिणें व्यर्थ. त्याच्या घरीं अतिथीपूजन व्हावयाचें नाहीं. ज्याला आळस, निद्रा, फार त्याचें जिणें व्यर्थ, अतिशय खाणारा, किंवा अघोर कर्में करणारा यांचें जिणें व्यर्थ. त्याला विवेक, वैराग्य कांहीं नाहीं. तो नुसता मानासाठीं, साधुपणासाठीं झुरतो. अशा माणसाचें जिणें व्यर्थ. तु. म्ह. असे लोक फुकट; निंदक किंवा वादक यांच्या जातीचे ते. ते नरकाला जातात.

शब्द--**धिग** = धिक, तुच्छ. **अमित** = पुष्कळ, अतिशय.

लक्ष्यप्रयोग—झुरे मानालागीं साधुपणा–मानालागीं, साधुपणा (लागीं) झुरे, असा अन्वय करावा.

शेरा—बाइलबुद्धि, लोभ, आळस, निद्रा, अत्याहार, विवेक किंवा वैराग्य यांचा अभाव, मानाची हांव वगैरे गोष्टी व्यर्थ. नरकाचीं साधनें.

१६८.

अरे हें देह व्यर्थ जावें ।
ऐसें जरी तुज व्हावें ।
द्यूतकर्म मनोभावें ।
सारीपाट खेळावा ॥ १ ॥
मग कैचें हरिचें नाम ।
निजेलिया जागा राम ।
जन्मोजन्मींचा अधम ।
दुःख थोर साधिलें ॥ २ ॥
विषयसुखाचा लंपट ।
दासीगमनीं अति धीट ।
तया तेचि वाट ।
अधोगति जावया ॥ ३ ॥
आणीक एक कोड ।
नरका जावयाची चाड ।
तरी संतनिंदा गोड ।
करीं कवतुकें सदा ॥ ४ ॥
तुका म्हणे ऐसें ।
मना लावीं रामपिसें ।
नाहीं तरी आलिया सायासें ।
फुकट जासी ठकोनी ॥ ५ ॥

पाठभेद—लावीं–लावी रामपिसें–राम पिसें.

अर्थ—अरे, हें देह व्यर्थ जावें अशी जर तुझी इच्छा असली तर द्यूत खेळ, सारीपाट खेळ. मग हरिनाम कुठचें ? जागा असून निजलेल्याला राम कुठचा ? असा माणूस जन्मोजन्मींचा अधम. त्यानें थोर दुःखांचें साधन

करून ठेविलें असें म्हटलें. पाहिजे. तो विषयसुखाचा लंपट दासींशीं व्यभिचार करण्यांत अति धीट. त्याला अधोगतीला, नरकाराला, जावयाला तींच वाट. अधोगतीची आणखी हौस असेल तर हीसेनें संतनिंदा करावी म्हणजे झालें. हें सगळें असें आहे; हीं सगळीं नरकाचीं साधनें आहेत. मनाला रामाचें, देवाचें, वेड लावून घे नाहींतर सायासानें नरजन्माला येऊन फुकट जाशील.

चर्चा—निजेलिया जागा राम–! आध्यात्मिक दृष्टीनें जो निजलेला आहे, ज्याला झोंप लागली आहे तो लौकिक व्यवहारांत जागा असला तरी त्याला राम कुठचा सुचावयाला !

२ जो निजलेला आहे, आध्यात्मिक शुद्ध ज्याला नाहीं तो लौकिक व्यवहारांत जागा असला तरी त्याला राम जागता कोठचा ! त्याचे मुखीं रामनाम जागृत कोठून असणार ! असःबयाचें नाहीं. वा० ब० प०

च० ३ ' दासीगमनीं अतिधीट '–तुकारामांच्या अभंगांत या गोष्टीचा उल्लेख व निषेध अनेक ठिकाणीं केला आहे. तुकारामकालीन समाजांत हा प्रकार बराच रूढ होता काय ! सं०

१६९.

अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव ।
प्रतिमा तो देव कैसा नव्हे ॥ १ ॥
नाहीं भाव तया सांगावें तें किती ।
आपुलाल्या मतीं पाखांडिया ॥ २ ॥
जया भावें संत बोलिले वचन ।
नाहीं अनुमोदन शाब्दिकांसी ॥ ३ ॥
तुका म्हणे संतीं भाव केला बळी ।
न कळतां खळीं दूषिला देव ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ दूषिला देव–दूषिलें देवां.

अर्थ—सगळेंच ब्रह्मरूप, जगांत कोठेंहि परमेश्वराशिवाय रिकामा असा ठाव नाहीं. मग प्रतिमेंत देव नाहीं असें कसें म्हणतां येईल ? ज्यांच्या ठिकाणीं भाव नाहीं, असे आपापल्या मतालांच चिकटून बसणारे–हेकेखोर पांखडी त्यांना काय आणि किती सांगावें ? संत ज्या भावानें वचन बोलले त्याचें अनुमोदन केवळ शाब्दिकांना–शब्दच्छल करणारे जे पाखंडी त्यांना–नाहीं- तुका म्हणे–संतांनीं भाव बळी केला. पण तें न कळल्यामुळें खळांनी देवाला दूषण मात्र लाविलें.

च० २ आपलाल्या मतीं पाखंडिया.

१ ज्यांना भाव नाहीं असल्या पांखंड्यांना आम्हीं आपापल्या मतीं किती सांगावें ? भाव असला तर देव दिसेल असें आम्हीं भाविकांनीं सांगितलें तरी पांखांड्याला त्याचा काय उपयोग ? कारण त्याच्या ठिकाणीं भाव नाहीं म्हणून.

२ आपापल्या मतानें ते पाखंडी स्वतःसिद्ध, ते आम्हीं सांगून काय ऐकितात, त्यांना काय सांगावें ?

च० ३ ज्या भावानें संत बोलले त्या भावाचें अनुमोदन शाब्दिकांना करितां येत नाहीं. कारण अनुमोदन करावयालाहि भाव लागतोच.

शब्द—अनुमोदन = प्रचीति, प्रत्यय.

शेरा—भावाशिवाय देव नाहीं.

१७०.

एक तटस्थ मानसीं ।
एक सहजाचि आळसी ॥ १ ॥
दोन्ही दिसती सारिखीं ।
वर्म जाणे तो पारखी ॥ २ ॥
एक ध्यानीं करिती जप ।
एक वैसुनि घेती झोंप ॥ ३ ॥
एकां सर्वस्वाचा त्याग ।
एकां पोटासाठीं जोग ॥ ४ ॥

एकां भक्ति पोटासाठीं ।
एकां देवासवें गांठीं ॥ ५ ॥
वर्म पोटीं एका ।
फळें दोन म्हणे तुका ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—कोणी विरक्त, उदासीन, संसारांत अर्थ नाहीं असें मनापासून खरोखरच वाटणारे. कोणी आळशी. दोघेही वरून सारखेच दिसतात. पण दोघांतला फरक ज्याला कळतो तो खरा पारखी.

२ कोणी खरोखरच समाधी लावून ध्यान करतात, जप करितात, कित्येक नुसतीच झोंप घेतात.

३ कोणी सर्वस्वाचा त्याग करून खरोखरच भिकारी होतात. तर कोणीं पोटासाठीं भिक्षावृत्ती पत्करलेली असते, जोगवा मागतात.

४ कोणाची भक्ति देवाची गांठ पडण्याकरितां असते. कोणी पोटाकरितां भक्तीचें ढोंग करितात.

तु.म्ह. मी यांतलें वर्म सांगतों. बाहेरून एकसारखें दिसणाऱ्या प्रकारच्या पोटांत फळें मात्र भिन्न असूं शकतील–हें वर्म.

शब्द—**तटस्थ**=विरक्त, **वर्म**=रहस्य, **जोग**=जोगवा, भिक्षा.

शेरा—ढोंग आणि सारखींच दिसतात, पण पारखी त्यांची परीक्षा करितो.

७१.

काय कळे बाळा ।
बाप सदैव दुबळा ॥ १ ॥
आहे नाहीं हें न कळे ।
हातीं काय कोण्या वेळे ॥ २ ॥
देखिलें तें दृष्टी ।
मागे घालूनियां मिठी ॥ ३ ॥

तुका म्हणे भावें ।
माझ्या मज समजावें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—आपला बाप दैववान्–श्रीमंत आहे कीं दुबळा-भिकारी आहे हें मुलाला काय कळतें ?

२ कोणत्या वेळीं त्याच्या हातांत (सत्ता) आहे, आणि केव्हां नाहीं हें त्याला–मुलाला–कळत नाहीं. आणि जी चांगली वस्तु त्याच्या दृष्टीस पडेल ती तें बापाला मिठी घालून लडिवाळपणानें मागतें.

४ देवा, तु. म्ह. माझें तसेंच आहे. तेव्हां माझा भाव जसा असेल त्याप्रमाणें तुम्हीं मला समजा म्हणजे झालें.

चर्चा—च० ४ देव माझ्या भावानें मला ओळखतो, देवांनें ओळखावें= देव ओळखतो. (माडगांवकर) हा अर्थ बरा दिसत नाहीं–मी पाहिलें तें मागतों म्हणून देवा, मला तुच्छ मानूं नका. माझा भाव पहा हा अर्थ जास्त बरा दिसतो. संपादक.

च० ४ तुका म्हणे माझ्या भावें (हें) मज समजावें–असा अन्वय करून कोणी या अभंगाचा अर्थ असा सुचविला आहे. अदेय काय किंवा अयोग्य काय जें तें देण्याला देव दुबळा आहे हें माझ्या भावाच्या योगानें मला समजावें. मी अजून पात्र झालों नाहीं तर देव देण्यास दुबळा आहे असमर्थ आहे. मं. ठ.

" दुबळा " यांचा इंग्रजी Unable असा अर्थ धरून इंग्रजी तऱ्हेवर हा अर्थ झाला आहे. पहिल्या तीन ओळी देवाकडे शब्दशः लावूं नयेत. त्या फक्त अज्ञान मुलाची स्थिति वर्णन करण्याकडे घ्याव्या. जसें बाप भिकारी असला तरी तें न समजतां मूल त्याच्याकडे लडिवाळपणानें हवें तें मागतें तसें मीं तुम्हांला बाप समजून हवें तें मागतों असा अर्थ करावा. दुबळा हें देवाकडे लावण्याचें कारण दिसत नाहीं. वा. ब. प.

शब्द—**सदैव** = भाग्यवान्.

शेरा—मी भावाशिवाय दुसरें कांहीं मागत नाहीं.

१७२.

भजन घाली भोगावरी ।
अकर्तव्य मनीं धरी ॥ १ ॥
धिग त्याचें साधुपण ।
विटाळूनी वर्तें मन ॥ २ ॥
नाहीं वैराग्याचा लेश ।
अर्थचाड जीवें आस ॥ ३ ॥
हें ना तैसें जालें ।
तुका म्हणे वायां गेलें ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ जीवें–जीवे.

अर्थ—भजन करतो पण तें भोगाची इच्छा, फळाची आशा, धरून करितो; विषयोपभोगाला तें साधन होईल अशा रीतीनें करितो. आणि जें करूं नये तें मनांत धरतो. अशा माणसाच्या साधुपणाला धिःकार असो. मन विटाळून जगांत वावरणारा तो. त्याच्या ठिकाणीं वैराग्याचा लेश देखील नाहीं. पैशाची चाड नाहीं व घड हें हि नाहीं व तें हि नाहीं असें होतें, माणूस इह आणि परत्र या दोन्हीलाहि मुकतो आणि सारेंच वायां जातें.

चर्चा—१ भजन घाली भोगावरी–

१ भजन कर असें कोणीं सांगितलें म्हणजे तें माझ्या भोगांत नाहीं हो, नशिबांत नाहीं, असें म्हणून नशिबाला दोष लावून भजन करावयाचें टाळतो.

डॉ. भांडारकर. प्रो. भानू.

२ विषयोपभोगाकडे भजन घालतो, विषयोपभोगांच्या पाठीं लागतो.

चर्चा होऊन हा अर्थ घ्यावा असें मं० ठ०

शब्द—अकर्तव्य = जें करूं नये तें. भोग अकर्तव्य, तो मनांत धरतो. **जीवें** = जीवापासून, मनापासून. **जीवे** = जिवंत रहातो, जगतो.

लक्ष्यप्रयोग—हें–ना–तें–सें " असें लिहावें.

शेरा–दोन्ही डगरींवर हात नको.

१७३.

एकादशीस अन्नपान ।
जे नर करिती भोजन ।
श्वानविष्ठेसमान ।
अधम जन तो एक ॥ १ ॥
ऐका व्रताचें महिमान ।
नेमें आचरती जन ।
गाती ऐकती हरिकीर्तन ।
ते समान विष्णूशीं ॥ २ ॥
अशुद्ध विटाळशींचें खळ ।
विडा भक्षितां तांबूल ।
सांपडे सबळ ।
काळा हातीं न सुटे ॥ ३ ॥
सेज वाज विलास भोग ।
करी कामिनीशीं संग ।
तया जोडे क्षयरोग ।
जन्मव्याधी बाळिवंत ॥ ४ ॥
आपण न वजे हरिकीर्तना ।
आणिकां वारी जातां जना ।
त्याच्या पापा जाणा ।
महा मेरु ठेंगणा ॥ ५ ॥
तया दंडी यमदूत ।
जाले तयाचे अंकित ।
तुका म्हणे व्रत ।
एकादशी चुकलीया ॥ ६ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--एकादशीच्या दिवशीं जे लोक अन्न खातात, जेवतात ते अधम. त्यांचें तें भोजन म्हणजे श्वानाच्या विष्ठेप्रमाणें समजावें. या व्रताचा महिम। ऐका. जे हें व्रत नियमानें पाळितात, गातात, हरिकीर्तन करितात ते विष्णू-सारखे; विष्णुरुप होतात असें समजावें. या दिवशीं विडा खाल्ला तर तें खाणें विटाळशीचें अशुद्ध होय. असा पापी माणूस बलवान् जो काळ त्याच्या हातीं सांपडतो. सुटत नाहीं. या दिवशीं जो शेजबाज करितो, त्याला क्षयरोग जडतो. स्वतां हरिकीर्तनाला जात नाहीं, व दुसऱ्याला जाऊं देत नाहीं, त्याच्या पापाच्या मानानें मेरू पर्वत जरी पाहिला तरी तो लहानच. असे पुरुष यमाचे अंकित झाले. त्यांना यमदूत शिक्षा करितात. एकादशी व्रत चुकल्यानें असें होतें.

शब्द-महिमान = माहात्म्य, **सजबाज** = विलास, **न वजे** = जात नाहीं, **वारी** = निवारण करतो, **ठेंगणा** = लहान. **अंकित** = ज्यावर "हे माझे" अशी खूण यमानें केली आहे ते.

लक्ष्यप्रयोग--त्याच्या पापें महामेरु ठेंगणा जाणा.

शेरा--लौकिकी अभंग. तरुणपणींचा असावा.

१७४.

करवितां व्रत अर्ध पुण्य लाभे ।
मोडवितां दोघे नरका जाती ॥ १ ॥
शुद्धबुद्धि दोघां होय एक मान ।
चोरासवें कोण जिवें राखे ॥ २ ॥
आपुलें देऊनी आपुलाचि घात ।
न करावा थीत जाणोनियां ॥ ३ ॥
देऊनियां वेच धाडीं वाराणसी ।
नेदावें चोरासी चंद्रबळ ॥ ४ ॥

तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग ।
भक्ति हे मारग मोडूं नये ॥ ५ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—कोणाकडून व्रत करविलें तर त्याचें अर्धें पुण्य करविणाराला लागतें. मोडविलें तर दोघेही नरकाला जातात. दोघेहि शुद्ध बुद्धीचे असले तर दोघांची योग्यता सारखी. दोघांनाहि एकच मान मिळतो. पण चोरांची संगत केली आणि त्यांच्याबरोबर गेलें तर मग जिवंत कोण राखील ? वस्तु-स्थिति ओळखावी, आणि आपलें देऊन वर आपलाच घात करून घेऊं नये. आपल्या पदरचा खर्च देऊन वाटलें तर एखाद्याला काशीला पाठविण्याचें पुण्य घ्यावें. पण चोराला फुकटच्या तोंडानें चंद्रबळ देखील सांगूं नये. तु. म्ह. तप, तीर्थ, व्रत, यज्ञ, भक्ति हे पुण्याचे मार्ग आहेत, हे मोडूं नयेत.

चर्चा—च० २ शुद्ध बुद्ध. शुद्ध=मायेपासून अलिप्त. बुद्ध=परमात्म्याच्या स्वरूपाची ओळख असणारा; या दोघांनाही एकच मान.

२ किंवा ज्यांची बुद्धि शुद्ध आहे असे कोणी असतील त्यांना मान एकच.

दोघांची बुद्धि शुद्ध आहे अशा दोघांची गांठ पडली तर दोघांनाहि मान मिळतो. पण चोराच्या संगतीनें एखादा भला माणूस जरी जाऊं लागला तरी त्याच्या जीवाला भय.

शब्द-**थीत** = १ स्थिति, वस्तुस्थिति २ फुकट, व्यर्थ ?

चंद्रबळ देणें—एकादें कृत्य करण्याला चंद्र–वेळ–अनुकूल आहे असें सांगणें. चोराला चंद्रबळ आहे, असें देखील फुकटचें सांगूं नये.

थीत=१ स्थिति, वस्तुस्थिति. मं. ठ.

किंवा **थीत**=एकाच ठिकाणीं राहिलेलें, स्थिर. मं. ठ. वा. ब. प.

२ **वायां**, व्यर्थ. (हा अर्थ कोठून आला ?)

धाडीं द्वि. पु. आज्ञार्थी रूप. मं. ठ.

शेरा—लौकिकी अभंग. व्रतें–वैकल्यें मोडूं नयेत या अर्थाचा.

१७५.

इनामाची भरली पेठ ।
वाहाती दाट मारग ॥ १ ॥
अवघेचि येती वाण ।
अवघे शकुन लाभाचे ॥ २ ॥
अडचणी त्या केल्या दुरी ।
देण्या उरी घेण्याच्या ॥ ३ ॥
तुका म्हणे जोडी झाली ।
ते आपुली आपणा ॥ ४ ॥

पाठभेद--च० १ इनामाची-इमानाची.

अर्थ--आपली आपणाला जी जोड ती झाली, आत्मप्राप्ति झाली; भक्तीच्या योगानें प्राप्त होणारी अत्यंत उन्नत स्थिति प्राप्त झाली, मग काय ? सगळें परमेश्वराचें ब्रह्मांड आमचेंच. मग हें सगळें आमचें वतन, ही आम्हांला इनाम झालेली पेठ. सगळे मार्ग, सगळे रस्ते वहाताहेत. सगळा माल येत आहे. सर्व लाभाचींच चिन्हें आहेत. साऱ्या देण्याघेण्याच्या अडचणी (उरी) दूर झाल्या. आतां द्वायाध्यायाचें कांहीं राहिलें नाहीं. आपली आपल्याला जोड झाली. माझा मला मी मिळालों. वा० ब० प०

अभंगाचें पर्यवसान काय ?

रूपक धरून अर्थ लाविला तर अभंग चांगला लागतो. दुसरा कांहीं अर्थ सुचेना, तेव्हां रूपकी अर्थ सांगण्याचें धाडस केलें आणि तो शेवटीं मंडळींना पसंत पडला. आत्मप्राप्ति झाली, स्वतांची स्वतांला जोड झाली, म्हणजे मग सगळी इनामाची पेठ. मी वतनदारच मग सर्व अस्तित्वाचा. सगळ्या अडचणी दूर झाल्या. देण्यायेण्याच्या उरी=बाक्या राहिल्या नाहींत. वा० ब० प०

च० ३ देण्याच्या किंवा घेण्याच्या उरी राहिल्या नाहींत. देवघेव सुरू आहे, व्यवहार चालू आहेत. पण मी अमकें अमक्याचें देणें, किंवा त्याच्याकडून घेणें, अशा प्रकारचा घोर मनाला नाहीं. सगळी पेठच माझी. देणारा, घेणारा, सर्व माझा मींच असें झालें. वा० ब० प०

२ इतर सर्व अडचणी दूर केल्या, आणि फक्त देण्याघेण्याचें बाकी राहिलें. किंवा बिनमोल असा बोध किंवा उपदेश, तेवढा मात्र घ्यावयाचा राहिला आहे, असा अर्थ अभंग ५०२ च्या आधारानें रा. माडगांवकर करितात,तोही वाईट नाहीं. वा० ब० प०

शब्द—**वाण**=जिन्नस. **उरी**=बाकी. मया संतुष्ट मनसः सर्वीः सुखमयाः दिशः' हा चरण पहावा.'

१७६.

वेदाचें गव्हर न कळे पाठकां ।
अधिकार लोकां नाहीं येरां ॥ १ ॥
विठोबाचें नाम सुलभ सोपारें ।
तारी एकसरें भवसिंधु ॥ २ ॥
जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ ।
येर तो सकळ मूढ लोक ॥ ३ ॥
तुका म्हणे विधिनिषेध लोपला ।
उच्छेद झाला या मारगाचा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जे नुसते पाठक आहेत, त्यांना वेदाचें गुह्य कळत नाहीं. आणि दुसऱ्या लोकांना अधिकार नाहीं. तेव्हां विठोबाचें नांव हें भवसिंधूतून तारावयाला सर्वांत सोपें व सर्वांना साध्य असें साधन आहे. जे जाणते आहेत त्यांना मंत्र तंत्र काळ या सगळ्या गोष्टी साधायला कठीण वाटतात. आणि आणि बाकीचे मूढ, त्यांना कळत नाहीं, म्हणून साधत नाहींत. तु. म्ह. या काळांत विधिनिषेध सगळे लोपले; या जुन्या मार्गाचा उच्छेद झाला.

चर्चा–च० १-३-४ हे एका संदर्भानें घ्यावे व चरण २ हा निराळा घ्यावा. वेदपठण उपयोगी नाहीं. (च० १) आणि मंत्रतंत्रादि कलियुगांत साध्य आहेत त्या गोष्टी करावयाला जावें तर विधिनिषेध लोपलेला. कोणी काय करावें, कां व कसें करावें, कोणते नियम केव्हां व कसे पाळावे याचा कांहीं

घरबंध राहिला नाहीं. मंत्रतंत्र करणारावर त्यांचा दुरुपयोग न करण्याची जबाबदारीहि तशीच असते. तिची जाणीव कलियुगांत कोणाला राहिली नाहीं. म्हणून हाही मार्ग निरुपयोगीच. (च० ३–४) तेव्हां विठोबाचें नांव तेवढें राहिलें तें सोपें असा भाव. (च० २)

शब्द—**गव्हर** = गुहा, गुह्य, मर्म, अंतरंग. **उच्छेद** = नाश. **सोपारें** = सोपें. **एकसरें** = एकदम.

शेरा—विठोबाचें नांव सरळ सोपारें.

१७७.

विधीचें सेवन ।
विषयत्यागातें समान ॥ १ ॥
मुख्य धर्म देव चित्तीं ।
आदि अवसान अंतीं ॥ २ ॥
बहु अतिशय खोटा ।
तेंं होती बहु वाटा ॥ ३ ॥
तुका म्हणे भावें ।
कृपा करीजेते देवें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—कोणत्याही वस्तूचें विधिपूर्वक सेवन करणें म्हणजे विषयत्याग. प्रमाणेंच होय. देवावर विश्वास ठेवून वागणें हा मुख्य धर्म. हेंच आरंभीं आणि शेवटींहि असेंच. कोणत्याहि गोष्टीचा अतिशय (या ठिकाणीं संदर्भानें–विचाराचा, तर्काचा) अतिरेक करणें हें खोटें. फार तर्क केला म्हणजे फांटे मात्र फुटतात. तु. म्ह. एक भाव तेवढा असला म्हणजे देव कृपा करितो.

चर्चा—च० १ विधीनें सेवन–योग्य मार्गानें, देव चित्तीं धरून विषयांचे भोग घेतले तरी ते न घेतल्या सारखेच.

लक्ष्यप्रयोग—च० ४ देवें करिजेतें–कर्मणिप्रयोग. आतांच्या मराठींतून गेल्यासारखाच आहे.

शब्द—अतिशय=आतिरेक येथें–संदर्भानें, तर्काचा.

शेरा––मनांत शुद्ध भाव असला म्हणजे देव कृपा करितो.

१७८.

येथींचिया अळंकारें ।
काय खरें पूजन ॥ १ ॥
वैकुंठींच्या लावूं वाटा ।
सर्व सांटा ते ठायीं ॥ २ ॥
येथींचिया नाशवंतें ।
काय रितें चाळवूं ॥ ३ ॥
तुका म्हणे वैष्णवजन ।
माझे गण समुदाय ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ लावूं–लागों.

अर्थ—या जगांतल्या लौकिकी उपचारांनीं देवाचें पूजन काय व्हावयाचें आहे? तेव्हां लोकांना या नाशवंत वस्तूंच्या पाठीं लावून रिकामें कशाला चाळवूं? सगळा सांठा, जें कांहीं सर्वस्व आहे तें वैकुंठांत आहे. तुका. म्ह. जे वैष्णव आहेत, ते सर्व मला हवेत, माझे मित्र कायते तेच.

चर्चा––च० २ 'वैकुंठींच्या वाटा लावूं'–वैष्णवजन ही माझी सोबतीची मंडळी, ते व आम्हीं मिळून वैकुंठींच्या वाटा लावूं. तयार करूं, आम्हीं आपल्यालाच वैकुंठाच्या वाटेला लावूं. डॉ. भांडारकर.

असाच अर्थ घ्यावयाला पाहिजे असें दिसत नाहीं. पुढील अभंग व हा एकाच प्रसंगीं रचिलेले दिसतात. ते तसे घेऊन–तेव्हां स्वामी बोलवितो तसें मी बोलतों. ऐहिक पूजा आणि अलंकार कशाला? नाशवंत वस्तूंनीं लोकांना चाळवूं कशाला? त्यांना अगदीं वैकुंठींच्या वाटेला लावूं–असा अर्थ करावा.

शब्द—गण = मंडळी, ठरलेली मंडळी.

शेरा—अनुभवामुळें आलेल्या आत्मविश्वासाचे शब्द.

१७९.

उजळावया आलों वाटा ।
खरा खोटा निवाड ॥ १ ॥
बोलविले वोलें वोल ।
धनी विठ्ठल सन्निध ॥२॥
तरी मनीं नाहीं शंका ।
बळें एका स्वामीच्या ॥ ३ ॥
तुका म्हणे नये आम्हां ।
पुढें कामा गबाळ ॥४॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—वाटा उजळावयाला, त्यांच्यावर प्रकाश पाडून खऱ्याखोट्यांचा निवाडा करावयाला मी येथें आलों आहे. त्याप्रमाणें खरें काय आणि खोटें काय याचा निवाडा करून टाकितों. देव विठ्ठल हा माझा धनी. तो ज्याप्रमाणें बोलवील त्याप्रमाणें मी बोलतों. मला त्या धन्याचें बळ (पाठबळ) आहे. त्याच्या जोरावर मी हें सर्व बोलतों. कसलीहि शंका मनांत येत नाहीं. तु. म्ह. आमच्यापुढें गबाळ उपयोगी नाहीं.

चर्चा—च. ४ गबाळ=१ पोथ्यांचा पसारा. २ गोंधळ, अर्धवट, अस्पष्ट संदिग्ध बोलणें. तें आम्हांला नको. जें खरें आहे तें विश्वासानें सांगतों. (२) पूजेअर्चेचें गबाळ, पसारा नको.

शब्द—उजळावया उजळणें = स्वच्छ करणें. **बोलविले** = बोलविलेले (बोल) बोलें. **गबाळ** = गोंधळ, पसारा, घोंटाळा.

१८०.

बोलावें तें धर्मा मिळे ।
बरें डोळे उघडूनी ॥ १ ॥
कशासाठीं खावें शेण ।
जेणें जन थुंकी तें ॥ २ ॥
दुजें ऐसें काय बळी ।
जें या जाळी अग्नीसी ॥ ३ ॥
तुका म्हणे शूर रणीं ।
गांढें मनीं बुरबुरी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—चांगले डोळे उघडून उघड्या डोळ्यांनीं जें बोलावें, करावें तें धर्माला मिळतें असतें; धर्माशीं सुसंगत असतें. तोंड देखलें बोलून, ज्यानें लोकांची थुंकी घ्यावी लागते तें तसलें, बोलून, शेण कां खावें ? स्पष्ट बोलणें—हें प्रत्यक्ष अग्नीसारखें आहे. याला कोण जाळणार ? स्पष्टवक्तेपणाला डर कशाची ?

तु. म्ह. जे शूर ते रणांत सांपडावयाचे, त्याचप्रमाणें ते स्पष्टपणानें बोलावयाला भीत नाहींत. गांडे-भित्रे-मात्र मनांत कुरवुरतात.

शेरा—करावें तें बरे डोळे उघडून करावें.

धर्माला अनुसरून नीट डोळे उघडून स्वच्छ दृष्टीनें विचार करून बोलणें हा अग्नि आहे. हा खोट्याला जाळून टाकितो. खोट्यानें याला कशाची भीति ! विवेक दृष्टीनें जें जसें दिसतें तें तसें स्पष्ट बोलावें. शूराप्रमाणें रणांत यावें. व्यर्थ भ्याडासारखें मनांत कुरकुरूं नये. असा एकंदर भाव. वा. ब. प.

१८१.

बरा देवा कुणवी केलों ।
नाहीं तरि दंभें असतों मेलों ॥ १ ॥
भलें केलें देवराया ।
नाचे तुका लागे पायां ॥ २ ॥
विद्या असती कांहीं ।
तरी पडतों अपायीं ॥ ३ ॥
सेवा चुकतों संतांची ।
नागवण हे फुकाची ॥ ४ ॥
गर्व होता ताठा ।
जातों यमपंथें वाटा ॥ ५ ॥
तुका म्हणे थोरपणें ।
नरक होती अभिमानें ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—देवानें मला कुणवी केलें तें बरें झालें. नाहीं तर दंभाखालीं मेलों असतों. देवा, बरें केलेंस. मी आनंदानें तुझ्या पायां पडतों, नाचतों. कांहीं विद्या असती तर अपायीं पडतों, अपाय झाला असता. संतांची सेवा चुकलों असतों आणि फुकट नागवणूक मात्र झाली असती. गर्व, झाला असता, आणि यमाच्या, नरकाच्या, वाटेला लागलों असतों. तु. म्ह. अभिमानाच्या योगानें, थोरपणाच्या नादीं लागलें म्हणजे, नरक मात्र प्राप्त होतो.

चर्चा—च० ४ नागवण हे फुकाची–१ उगाच नागवण मात्र झाली असती. २ विद्या ही उगाच नागवण मात्र आहे–हा अर्थ मूळच्या टिपणांत आहे, पण तो मला बरोबर वाटत नाहीं. (सं.)

लक्ष्यप्रयोग—च. ५ जातों यमपंथें वाटा (तृतीया)

शब्द—दंभ = ढोंग अपाय = संकट, नुकसान.

शेरा—कुणबीपणांत समाधान.

१८२.

दाता नारायण ।
स्वयें भोगिता आपण ॥ १ ॥
आतां काय उरलें वाचे ।
पुढें शब्द बोलायाचे ॥ २ ॥
देखती जे डोळे ।
रूप आपुलें तें खळे ॥ ३ ॥
तुका म्हणे नाद ।
झाला अवघां गोविंद ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—देणारा परमेश्वर आणि भोग भोगणाराहि स्वतां तोच. तेव्हां आतां याच्यापुढें बोलावयाचें काय उरलें ? जें डोळ्यांना दिसतें तें आपलें स्वरूप आणि शब्द जो जो ऐकूं येतो तो गोविंदस्वरूपच अशी स्थिती झाली म्हणजे पुढें बोलावयाला कांहीं उरलें नाहीं.

शब्द—दाता = देणारा.

शेरा—सारें गोविंदमयच, त्या ठिकाणीं हें आपलें हें परकें असा निराळेपणा उरला नाहीं.

१८३.

कृपा करुनि देवा ।
मज साच तें दाखवा ॥ १ ॥
तुम्ही दयावंत कैसे ।
कीर्ति जगामाजी वसे ॥ २ ॥
पाहोनियां डोळां ।
हातीं ओढवाल काळा ॥ ३ ॥

तुका म्हणे देवा ।
माझा करावा कुडावा ॥ ४ ॥

पाठभेद—वसे–असे; कुडावा–कुढावा.

अर्थ—देवा, माझ्यावर कृपा करा आणि खरें असेल तें मला दाखवा. तुम्ही दयावंत आहांत अशी तुमची कीर्ति सर्व जगांत आहे, ती खरी कशावरून ? जर माझ्यावर तुम्हीं कृपा केली नाहीं तर मग ती कीर्ति खरी असें तरी कसें म्हणावें ? तुम्हीं डोळ्यांनीं पहात असून देखील मला काळा हातीं ओढवाल. तुमच्या देखतां देखतां काळ मला कदाचित् घेऊन जाईल. म्हणून म्हणतों, देवा, माझ्या भोंवतीं आपल्या कृपेचें कुंपण घालून माझें रक्षण करा.

शब्द–**कुडावा** कुडणें = कुंपण घालणें, कूड = कुंपण. किंवा, **कुढावा** = रक्षण संरक्षण. **साच** = खरें. **ओढवाल** = ओढून नेऊं घाल.

शेरा––मला खरें असेल तें दाखवा म्हणून देवाची प्रार्थना.

१८४.

ठायींची ओळखी ।
येईल टाकूं टाका सुखीं ॥ १ ॥
तुमचा जाईल इमान ।
माझे कपाळीं पतन ॥ २ ॥
ठेविला तो ठेवा ।
अभिलाषें वुडवावा ॥ ३ ॥
मनीं न विचारा ।
तुका म्हणे हे दातारा ॥ ४ ॥

पाठभेद––नाहींत.

अर्थ—देवा तुम्ही व मी मूळचे एकाच गांवचे, एकाच ठिकाणचे; ती ओळख सुखानें, सहज टाकून देतां येईल असें वाटलें तर टाकून द्या बापडी.

असें केलेंत तर तुमचें इमान जाईल. आणि माझ्या कपाळीं नरकांत पडणें.

हें येईल. मीं जो ठेवा तुमच्यापाशीं विश्वासानें आणून ठेविला तो लोभानें तुम्ही बुडविला असें होईल. म्हणून देवा, असला वाईट विचार मनांत देखील आणूं नका.

शब्द—पतन–नरकांत पडणें. **अभिळोषें**–लोभानें. **ठायींची** = मूळची, मूळ ठिकाणची. **ठेवा** = देव. **सुखी** = सहज, एकदम. प्रयास न करितां.

शेरा—परिणत स्थितींतील. अगदीं मूळचे एक व आम्ही एक अशा वृत्तिचा. वा. ब. प.

१८५.

तुझें वर्म ठावें ।
माझ्या पाडियेलें भावें ॥ १ ॥
रूप कांसवाचे परी ।
धरूनि राहीन अंतरीं ॥ २ ॥
नेदीं होऊं तुटी ।
मेळवीन दृष्टादृष्टी ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा ।
चिंतन तें तुझी सेवा ॥ ४ ॥

पाठभेद—नेदीं–नेदी; राहीन–राहिलों.

अर्थ—माझ्या भावानें, भक्तिभुळें, तुझें वर्म, देवा, मला सांपडलें आहे. कासवाप्रमाणें तुझें रूप अंतरीं धरून राहीन. ताटातूट होऊं देणार नाहीं. दृष्टीला दृष्टी भिडवून राहीन. तु. म्ह. देवा, चिंतन करणें हीच तुझी सेवा.

चर्चा—च० २ कासवाचे–अंतरीं.

१ कांसव ज्याप्रमाणें आपले हातपाय वगैरे सारें रूप आंतल्या आंत ओढून धरून नुसतें दगडासारखें पडतें, त्याप्रमाणें मी अंतरीं धरून बसेन. मनाला आंत ओढून धरून बसेन. बाहेर पडूं देणार नाहीं–म्हणजे डौल वगैरे करणार नाहीं. पूजेचा पसारा माजविणार नाहीं. डॉ. भांडारकर.

२ किंवा ' राहे न ' असा पाठ घेऊन कांसवासारखें गूढ आंतल्या आंत गुप्त झालेलें तुझें रूप अंतरीं धरून न राहे. धरून ठेवूं म्हणाल तर, देवा, तें तसें गुप्त रहाणार नाहीं. तें मी ओळखलें. रा. ब. मराठे.

इतका घोंटाळा या चरणांत असेलसें वाटत नाहीं. मेळवीन दृष्टादृष्टी, चिंतन ते तुझी सेवा, या पुढच्या चरणांवरून सरळ अर्थ चिंतनाच्या कल्पनेला पोषक असा हवा.

मागें ३९ व्या अभंगांत " कासवीचे परी वेळोवेळां अंतरीं धरितां काय नव्हे " असें आहे. त्याचाच हा अनुवाद असावा. त्या ठिकाणीं कासवी आपल्या पोराचें पोषण त्याचें ध्यान करून करते—या कविसंकेताला अनुसरून कासवीचा दृष्टांत ध्यानास दिलेला आहे, तसाच येथें घ्यावा. कांसव ज्याप्रमाणें ध्यान, निरीक्षण करून पोराकडे पहातें, त्याप्रमाणें, प्रेमानें, एकाग्रतेनें तुझें रूप मनांत धरून राहीन असा या चरणाचा सरळ अर्थ लागतो.

माडगांवकर.

वरील दृष्टांत " ध्याना " पुरताच घ्यावा. ध्यानाची एकाग्रता या दृष्टांतानें ठरवावी, देवभक्तांचा संबंध ठरवूं नये. वा. ब. प.

शब्द-तुटी = ताटातूट, दृष्टादृष्टि = दृष्टिला दृष्टि भिडवून.

शेरा—भावामुळें देवाची भेट होते.

१८६.

गहूं एक जाती ।
परी त्या पाधाणी नासिती ॥ १ ॥
वर्म जाणावें तें सार ।
कोठें काय थोडें फार ॥ २ ॥
कमाईच्या सारें ।
जाति दाविती प्रकार ॥ ३ ॥
तुका म्हणे मोल ।
गुणा मिथ्या फिके बोल ॥ ४ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--गहूं येथून तेथून एकच. पण अनाडी बायका ते नासून टाकितात. कोठें काय हवें, किती पाहिजे, थोडें कोठें पाहिजे, फार कोठें पाहिजे, हें वर्म ओळखावयाला पाहिजे हें काय तें मुख्य आहे. जशी कमाई त्याप्रमाणें प्रकार दिसतात. अंगीं गुण असले म्हणजे मोल येतें, फिके बोल मिथ्या. (जशी मेहनत करावी त्याप्रमाणें जाती निरनिराळे प्रकार दाखवितात. चांगलें किंवा वाईट प्रकारचें पीक येतें.)

शब्द-**पाधाणी** = अनाडी बायको **कमाई**. = मेहनत. **दाविती** = दिसून येतात.

शेरा--बोलणें फुकट; मोल काय तें गुणाला आहे.

१८७.

पुण्यवंत व्हावें ।
घेतां सज्जनांचीं नांवें ॥ १ ॥
नेघे माझे वाचे तुटी ।
महालाभ फुकासाठीं ॥ २ ॥
विश्रांतीचा ठाव ।
पायीं संतांचिया भाव ॥ ३ ॥
तुका म्हणे पापें ।
जाती संतांचिया जपें ॥ ४ ॥

पाठभेद च० २ माझे वाचे–माझी वाचा.

च० ४–तुका म्हणे जपें संताचिया पापें असाहि पाठ आहे.

अर्थ—सज्जनांचीं नांवें घेतलीं, त्यांचें स्मरण केलें म्हणजे आपल्याला पुण्य लागतें. तेव्हां हे माझ्या वाचे तुटी न घे. सज्जनांचें नांव घ्यावयाला मागें घेऊं नको. खळ पडूं देऊं नको. फुकटचा महालाभ होत आहे तो हातचा

घालवूं नको. संतांच्या पायीं भाग ठेवणें हेंच माझें विश्रांतीचें ठिकाण. त्यांच्या नामस्मरणानें सर्व पापें नाहींशीं होतात.

शब्द-ठाव = ठिकाण.

शेरा—संतमहिमा.

१८८.

देव होईजेत देवाचे संगतीं ।
पतन पंगतीं जगाचिया ॥१॥
दोहींकडे दोन्ही वाहातील वाटा ।
करितील सांटा आपुलाला ॥२॥
दाखविले परी नाहीं वर्जिजेतां ।
आला तो तो चित्ता भाग भरा ॥३॥
तुका म्हणे अंगीं आवडीचें बळ ।
उपदेश मूळबीजमात्र ॥४॥

पाठभेद च० १ जगाचिया-देवाचिया च० ३ भाग-मार्ग.

अर्थ—देवाच्या संगतीनें देव होतां येतें आणि जगाच्या नादाला लागलें म्हणजे अधःपात होतो. या दोन वाटा आहेत त्या दोन निराळ्या दिशांनीं वाहतात. जे ज्या वाटेनें जातील त्याप्रमाणें ते आपापला सांठा करितील. फळ पावतील. आपापल्या वांट्याच्या सांठ्याला पोंचतील. ज्याचे त्याचे भाग मी दाखवून दिले. काय केलें म्हणजे काय होतें हें मी सांगितलें, पण अमुकच करावें आणि अमुक करूं नये असें करणें माझ्या हातांत नाहीं. सांगणें हें काम माझें तें मी केलें. करणें न करणें तुमच्याकडे. ज्याच्या चित्ताला जो भाग येईल तो त्यानें भरावा. तु. म्ह. उपदेश हा केवळ बीजमात्र आहे. खरोखर आवड असते त्याचें बळ असतें. मनाला आवडतें तेंच हातून होतें. त्याचेंच बळ फार चालतें. (उपदेश नुसता बीजमात्र. आपण शेतांत बीं पेरलें, पण तें रुजणें हें जसें जमिनीच्या गुणावर अवलंबून रहातें, त्याप्रमाणें उपदेशाचें आहे. तो पटणें व त्याप्रमाणें वागणूक होणें हें ज्याच्या त्याच्या मनावर आहे.)

चर्चा—च० ३. ज्याचे त्याचे भाग मीं काय आहेत ते दाखविले. देवाच्या वाटेनें गेलें तर काय होतें व जगाच्या वाटेनें गेलें तर काय होतें—या दोन्ही गोष्टी मी सांगितल्या. दाखविले हें क्रियापद–दाखविले (ले) भाग असें विशेषण नव्हे.

मागच्या चरणांत वाटा शब्द असूनहि मनांत तदर्थक मारग, मार्ग हा शब्द राहून त्यामुळें " आला जो तो चित्ता मार्ग बरा " असे उद्गार निघणें शक्य आहे. असाच पाठ घेणें बरें वाटतें.

भाग भरा–असा पाठ घेऊन एकंदरींत अर्थ ज्याचा भाग तो भरतो अशा प्रकारानें करावा असें मंडळींचें मत पडलें. मला तो मुळांत घेतला आहे त्याप्रमाणें घेणें जास्त पसंत आहे. वा. ब. प.

वर्जिजेतां नाहीं = १ टाळतां येत नाही (वा. ब. प.) २ उपयोगीं नाहीं (माडगांवकर)

शेरा—आंगीं आवडीचें बळ. उपदेश बीजमात्र.

१८९.

शोधिसील मूळें ।
त्याचें करिसी वाटोळें ।
ऐसे संताचे ब्रे ट
तुझे बहु झाले त्र ।। २ ॥
लौकिकाबाहेरी ।
घाली रोखीं जया धरी ॥ ३ ॥
तुका म्हणे गुण ।
तुझा लागालिया शून्य ॥ ४ ॥

पाठभेद—धरी–घरी.

अर्थ—देवा, ज्याचीं मुळें शोधतोस त्याचें वाटोळें होतें असा संतांनीं तुझ्या नावानें बोभाटा केला आहे. तुझ्या फार तऱ्हा झाल्या. ज्याला रोखीं

धरतोस, रोखतोस, त्याला लौकिकाच्या बाहेर घालवितोस; तुझा गुण लागला म्हणजे सगळें शून्य होतें, वाटोळें होतें. त्या माणसाच्या संसाराचें वाटोळें होतें.

अभंग दोन अर्थांनीं आहे.

च० १ मूळ शोधणें=मुळासकट उपटून काढण्याचा प्रयत्न करणें, ज्याप्रमाणें आपण झाड खणून काढतों त्याप्रमाणें.


२ मूळापर्यंत प्रवेश करणें–अंतःकरणांत खोल शिरून अंतःकरण देवमय करणें.

च० २ तट=तऱ्हा, थेर. असे तुझे अनेक प्रकार झाले.

च० ३ रोखणें=नजर ठेवणें डोळा ठेवणें. लौकिकाबाहेर घालणें. १ दुर्लौकिक करणें. २ संसारांतून मुक्त करणें.

शून्य=१ वाटोळें–२ संसारापासून मुक्ती.

शेरा—नाहीं.



वैद्य वांचविती जीवा ।
तरी कोण ध्यातें देवा ॥ १ ॥
काय जाणे कैसी परी ।
प्रारब्ध तें ठेवी उरी ॥ २ ॥
अंगीं दैवत संचरे ।
मग तेथें काय उरे ॥ ३ ॥
नवसें कन्या पुत्र होती ।
तरि कां करणें लागे पती ॥ ४ ॥
जाणे हा विचार ।
स्वामी तुकयाचा दातार ॥ ५ ॥

पाठभेद—वेद्य-वैद.

अर्थ—वैद्य जर जीवाला जगविते, त्यांना जर माणसांचे प्राण वांचवितां आले असते तर मग देवाचें ध्यान कोणीं केलें असतें ? प्रारब्ध तें उरी ठेवी तीं कैसी परी, काय, न जाणों-कांहीं झालें तरी प्रारब्ध हें आपली बाकी ठेवतेंच हें कसें कळत नाहीं ? वैद्यानें प्रयत्न केला तरी शेवटीं रोगी जगणें न जगणें यांत दैवाचा अंश थोडासा असतोच हें कसें ?

३ त्याचप्रमाणें, अंगांत देव संचारल्यावर मग त्या ठिकाणीं काय उरावें आणि कां ? पण तें उरतें हें मात्र खरें, कां तें कळत नाहीं.

४ नवसानें जर मुलें बाळें झालीं असतीं तर लग्नें कशाला करावयाला पाहिजेत ? तर मग, पती करणें कां लागे ?

तुका म्हणे याचा विचार मला कांहीं कळत नाहीं, हें गूढ मला कांहीं उकलत नाहीं. देवाला कळतें.

चर्चा—च० २ परी=प्रकार. उरी=शिल्लक बाकी.

च० ३ अंगीं दैवत संचरे—हा चरण इंदुप्रकाशप्रतींत नाहीं. व त्याचें येथें नीटसें प्रयोजनहि दिसत नाहीं. अंगांत देव संचरतो, म्हणजे अंगांत येतें असें लौकिक समजुतींत आहे, त्याला लक्षून हा चरण असेल काय ?

एकंदर अभंग जगांतील परस्पर विरोधी प्रकार पाहून बुचकाळ्यांत पडलेल्या मनाचें चित्र आहे असें समजल्यास सर्व चरणांची संगति लागेल असें वाटतें.

आम्हीं रोग्याला वैद्याचें औषध देतों. पण रोग्याला वांचविणें जर वैद्यांच्या हातांत असतें तर मग देवाचें ध्यान कशाला ? पण आम्ही वैद्याकडेहि जातों व देवाकडेहि जातों. वैद्य व देव, दोन्ही झाले तरीहि कधीं कधीं गुण येत नाहींच. भलतेंच होतें. प्रारब्ध उरतेंच, हें कसें काय समजावें ? देवऋषीकडे जावें तर त्या ठिकाणीं अंगांत प्रत्यक्ष दैवत संचरलेलें दिसतें. मग त्या ठिकाणीं बाकी काय उरावें ? उरूं नये. पण उरतें. त्या लोकांनाहि इतरांप्रमाणेंच प्रसंगीं धांवांधांव करावी लागते हें कसें काय ? मूल व्हावें म्हणून नवस करितात, पण नवसानें मुलें होतीं तर नवरा करण्याची गरज ? पण नवराहि करतात व नव-

सहि करतात. तेव्हां यांतलें रहस्य काय ? तुकोबा म्हणतात–देव जाणे––

शेरा—संसाराचें गूढ मनुष्याला कळत नाहीं, देवाला मात्र कळतें.

१९१.

मारगीं बहुत ।
याचि गेले साधुसंत ॥ १ ॥
नका जाऊं आडरानें।
ऐसीं गर्जती पुराणें ॥ २ ॥
चोखाळिल्या वाटा।
न लगे पुसाव्या धोपटा ॥ ३ ॥
झळकती पताका ।
गरुड टके म्हणे तुका ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ ऐसी गर्जती पुराणें । नका जाऊं आड राणें.

अर्थ—याच (सांगितलेल्या) मार्गानें पुष्कळ साधुसंत गेले आहेत. तुम्ही (याच मार्गानें जा,) आडरानांत जाऊं नका, असें पुराणें गर्जना करून सांगत आहेत. ३ संतांच्या वाटा अनुभवानें पारखिलेल्या आहेत. धोपट आहेत, त्या पुसाव्या लागत नाहींत. पताका झळकत आहेत आणि टकेला, अग्रभागीं गरुड आहे. ही या वाटेची खूण.

चर्चा—टके. १ टक लावी, तीव्रदृष्टीनें पहातो.
२ अग्रभाग = टक–स्त्री० (कोशकार).

चोखाळिल्या=चोखाळलेल्या, पारख करून पाहिलेल्या, (२) रान अथवा झाडझुडूप छाटून साफ केलेल्या–माडगांवकर.

शब्द—**चोखाळिल्या**=चोखून पाहिल्या; **धोपट**=सरळ, स्पष्ट दिसणाऱ्या.
टके=टोकाला; अग्रभागीं.

शेरा—संताचे मार्ग धोपट. पंढरीच्या वारकऱ्यांना उद्देशून.

१९२.

एक नेणतां नाडलीं ।
एकां जाणिवेची भुली ॥ १ ॥
बोलों नेणे मुकें ।
वेडें वाचाळ काय निकें ॥ २ ॥
दोहीं सवा नाड ।
विहीर एकीकडे आड ॥ ३ ॥
तुका म्हणे कर्म ।
तुझें कळों नेदी वर्म ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—कोणी कळत नाहीं म्हणून, अज्ञानानें, नाडतात, फसतात तर दुसऱ्या कोणाला शहाणपणाचाच मोह पडतो म्हणून फसतात. आपल्या ज्ञानाची घमेंड त्यांना फसविते. मुक्याला बोलतां येत नाहीं (म्हणून तें निरुपयोगी), तर तिकडून वाचाळ असतें, ज्याला बोलतां येतें, तें वेडें खुळें असतें म्हणून तेंही वाईटच, निकें काय ? तें तरी बरें कसें म्हणावें ? मिळून दोन्ही बाजूंनीं अडचण होते. एकीकडे आड आणि दुसरीकडे विहीर असें हें आहे. तुका म्हणतात म्हणजे आमचें कर्म आम्हांला आड येतें, तेंच आम्हांला तुझें रहस्य समजूं देत नाहीं.

शब्द—**एक** = कित्येक. नपुं सामान्य. सर्वनाम. (अनेकवचनीं). **नेणतां** = अज्ञानानें. **नाडलीं** = अडलीं, **जाणीव** = पंडितंमन्यता, शहाणपण. **भुली.** = भूल. **सवा** = वाजूला. **निकें** = चांगलें. **नाडलीं** = वहकलीं आहेत. (माडगांवकर).

या अर्थानें जाणीव शब्दाचें स्वारस्य जातें. भुललीं आहेत, आपल्या शहाणपणाचा गर्व होऊन त्यामुळें फसलीं आहेत–असा अर्थ. (वा० ब० प०)

शेरा—कोणताही मार्ग पत्करला तरी प्रारब्ध आड येतें. देवाचें रहस्य कळत नाहीं. मधल्या स्थितींतील; मनाची चिंताजनक स्थिति दाखविणारा.

१९३.

म्हणावितों दास ।
मज एवढीच आस ॥ १ ॥
परि तें आंगीं नाहीं वर्म ।
करिं आपुला तूं धर्म ॥ २ ॥
बडबडितों तोंडें ।
रितें भावेंवीण धेडें ॥ ३ ॥
तुका म्हणे बरा ।
दावूं जाणतों पसारा ॥ ४ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ—देवा, मी तुझा दास म्हणवितों, तुझा दास म्हणवितां यावें एवढीच इच्छा आहे ती तूं पुरीव म्हणजे झालें. पण तें दासपण करण्याचें वर्म मात्र माझ्या आंगीं नाहीं; तेव्हां तुला काय करावयाचें असेल तें कर, जें बरें दिसेल तें कर. मी नुसता तोंडानें बडबडतों. पण हातून कांहीं होत नाहीं. मनांत भाव नाहीं आणि दिसावयाला मात्र मोठें धेंड–असा मी आहें. मला पसारा मात्र पुष्कळ दाखवितां येतो.

चर्चा—च० २ तुझा धर्म तूं कर–म्हणजे काय ? तुझा धर्म–देवाचा धर्म कोणता–भक्ताला पावन करण्याचा–तो तूं कर, असा अर्थ करावा काय ? अभंगाचा रोंख आंगांत भक्तपण बाणलेलें नाहीं, तेव्हां, देवा, तुझ्याकडे काय बोल ? असा दिसतो. (वा० ब० प०)

तुला बरें दिसेल तें तूं कर, करशील तें बरेंच आहे असा अर्थ दिसतो.
(संपादक).

शब्द–धेंड.=अर्धवट मनुष्य (माडगांवकर). असा अर्थ केल्यास अंभगांत आत्मनिर्भत्सनेची छटा आहे ती रहात नाहीं म्हणून " मोठें प्रस्थ " असाच अर्थ घ्यावा. (वा• ब० प०).

शेरा—भक्ती करावी, देवाची सेवा करावी हीच इच्छा. अभंग प्रौढपणांतील असावा. वा० ब० प०

१९४.

पूजा समाधानें ।
अतिशयें वाढे सीण ॥ १ ॥
हें तों जाणां तुम्ही संत ।
आहे बोलली ती नीत ॥ २ ॥
पाहिजे ते केलें ।
सहज प्रसंगीं घडलें ॥ ३ ॥
तुका म्हणे माथा ।
पायीं ठेवीं तुम्हां संतां ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ समाधानें–समाधान. वाढे–वाटे.

अर्थ—समाधानानें केलेली ती पूजा; विस्तार, अतिशय, अवडंबर हीं नकोत. दंभ नको, अतिशयानें शीण मात्र वाढतो. पूजा करणें हेंच समाधान, हें तुम्हांला कळतेंच आहे. ही नीति पूर्वापार सांगितलेलीच, जुनीच आहे. आतांपर्यंत जें पाहिजे तें केलें. प्रसंगानें जें जें घडलें तें तें केलें. आतां काय त्याचें ? आतां मात्र तो पसारा नको, संताच्या पायीं डोकीं ठेवतों. हीच त्यांची पूजा, आणि यांतच माझें समाधान; दुसरें अवडंबर नको.

चर्चा—१ हयीं तितकी मनसोक्त पूजा, तिचें अवडंबर, पसारा, यांच्या, मुळें शीण मात्र वाढतो. (रा. ब. मराठे).

२ समाधानानें केलेली ती पूजा, विस्तार, दंभ नको. डॉ. भांडारकर. मं० ठ०

३ समाधान कोणाचें ? पूजा करणाराचें–असें वरील अर्थांत गृहित धरलें आहे. हव्यास केल्यानें भक्ताचें समाधान होतेंच, त्याचकारितां तो 'अतिशय' करतो. पण अतिशयानें भक्तापेक्षां देवाचाच शीण वाढतो, त्याचें–देवाचें. समाधान ज्यानें होतें ती खरी पूजा, उगीच अवडंबर माजविलें तर त्याचा शीण देवालाच जास्त होतो. (संपादक).

च० ३ १ मी आतांपर्यंत जें हवें तें केलें, तें सहजच प्रसंगानें घडून आलें. आतांपर्यंत पसारा मांडला, अवडंबर माजविलें हें सर्व प्रसंगामुळें. तें आतां यापुढें नको असा अर्थ.

२ पायीं डोई ठेवणें एवढेंच पाहिजे होतें, तें सहज घडलें, तें केलें.

डॉ. भांडारकर.

३ मला वरील दोन्ही अर्थ पसंत नाहींत. अतिशयानें शीण होतो हें तुम्हांला कळतेंच, असें वरील चरणांत सांगून, या तिसऱ्या चरणांत, काय केलें पाहिजे, काय करावें, हें तुकाराम सांगतात. जें सहज, प्रसंगीं घडलें तें केलें पाहिजे. प्रसंगाला अनुसरून, वेळ प्रसंग पाहून जें सहज घडलें, घडावें, घडण्यासारखें असतें, तें केलें पाहिजे. त्यानें करणाराला आणि करून घेणाराला दोघांनाही समाधान; त्यांत अतिशय नाहीं, किंवा, शीणहि नाहीं. (सं.)

शब्द—अतिशय = हव्यास; पसारा.

शेरा—पसाऱ्यामुळें शीण मात्र वाढतो. संताचें वंदन. [illegible]

१९५.

स्वप्नींचिया गोष्टी ।
मज धरिलें होतें वेठी ।
जालिया सेवटीं ।
जालें लटिकें सकळ ॥ १ ॥
वायां भाकिली करुणा ।
मूळ पावावया सिणा ।
राव रंक राणा ।
कैंचे स्थानावरी आहे ॥ २ ॥
सोसिलें त अंगें ।
खरें होतें नव्हतां जागें ।

अनुभवही सांगे ।
दुःखें डोळे उघडिले ॥ ३ ॥
तुका म्हणे संतीं ।
सावचित्त केलें अंतीं ।
नाहीं तरी होती ।
टाळी बैसोनि राहिली ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ— मला एक स्वप्न पडलें त्यांतली गोष्ट सांगतों. मला कोणीं तरी वेठीस धरिलें होतें. धरून लावला गाड्याला. जेव्हां अखेर झाली तेव्हां मी जागा झालों, आणि सगळेंच लटकें असें समजलें. पण (तोपर्यंत)–वेठीला धरिलें असतांना–मला सोडा अशी त्या वेठीला लावणाऱ्या रावाची मीं करुणा व्यर्थ भाकिली; आणि शीण मात्र पावलों. पण जागा होऊन पाहिलें तों राव–रंक–राणा हें सगळें जाग्यावर कुठें आहे ? कोठून असणार ? जागेपणीं पाहिलें तों राव आणि रंक, कोणीच ठिकाणावर नाहीं. जोंपर्यंत जागा झालों नव्हतों तोंपर्यंक आंगीं सोसलें तें सगळें खरेंच असें वाटत होतें. अनुभवहि तसेंच सांगतो. कारण, त्या दुःखानेंच मीं जागा झालों व डोळे उघडले. तुका म्हणे, ' शेवटीं संतांनीं सावध केलें म्हणून बरें. नाहींतर, प्रपंचांत तंद्री लागून राहिली होती, मीं अगदीं बहिरा झालों होतों.

चर्चा—च० ३. जागा नव्हतों तोपर्यंत स्वतः सोसलें तें सर्व खरें वाटत होतें, असें माझ्या स्वतःच्या अनुभवावरून मला कळून आलें. कारण त्या स्थितींत सोसलेल्या दुःखानेंच माझे डोळे उघडले.

च० ४ टाळी=कानटाळी–बसली होती–बहिरा झालों होतों. वा. ब. प.

किंवा " स्वप्निचिया गोष्टी " याचा अर्थ–संसार म्हणजे स्वप्नांतल्या गोष्टी प्रमाणें लटका–असा करून पुढें अर्थ वर लिहिल्याप्रमाणें करावा. स्वप्नींचिया = स्वप्नांतल्याप्रमाणें खोट्या.

शब्द—**वेठी** = वेठ म्हणजे माणूस कामाला धरून लावणें. **भाकिली**–भाकणें = दीनपणानें मागणें. **राव** = श्रेष्ठ माणूस. **सावचित्त** = सावधान चित्त. **टाळी बसणें** = तोंड मिटणें; वाचा बंद होणें.

शेरा—संसार लटका. प्रौढपणींचा.

१९६.

आसुरी स्वभाव निर्दय अंतर ।
मानसीं निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥
याति कुळ येथें असे अप्रमाण ।
गुणांचें कारण असे अंगीं ॥ २ ॥
काळकूट पितळ सोनें शुद्ध रंग ।
अंगाचेंच अंग साक्षी देतें ॥ ३ ॥
तुका म्हणे वरी जातीसवें भेटी ।
नवनीत पोटीं सांठविलें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—अतिवादी आहे तो असुरी स्वभावाचा. मनाचा निष्ठुर, त्याच्या अंतःकरणांत दयामाया कांहीं नाहीं. या ठिकाणीं जात किंवा कुळी यांचें प्रमाण नाहीं, हीं पहाण्याचा उपयोग नाहीं, अंगांतच, अंगस्वभावांतच, बाह्य गुणांचें कारण आहे. याति, कुळ, पहाण्याचें कारण काय ? पितळ काळेंकुट्ट पडतें आणि सोन्याचा रंग शुद्ध रहातो. अंगाचें अंगच हें सोनें आणि हें पितळ अशी साक्ष देतें. ज्याचें तेंच सांगतें आपला गुण. तु. म्ह. आपल्यासारखेंच आपल्याला मिळालें, त्याच्याशीं गांठ पडली म्हणजे बरें. हें सार मीं पोटीं साठविलें, एवढा बोध या उदाहरणापासून मीं घेतला.

चर्चा—च० २ गुणांचें कारण असे अंगीं–अंग=देहस्वभाव; जाती कुळ यांच्यावर गुण अवलंबून नसतात; जसा देहस्वभाव असेल तसे गुण.

च० ३ काळकुट्ट विष, सोनें, आणि पितळ यांचा रंग चांगला दिसतो, पण अंगस्वभाव भिन्न...तिन्ही दिसावयाला बरीं दिसतात, पण त्यांचें अंगच, देहस्वभावच तीं काय आहेत याची साक्ष देतात. (वा० ब० प०)

१ काळकुट पितळ=काळें पडलेलें, पडणारें पितळ. मं. ठ.

२ वर दिल्याप्रमाणें (मं० ठ०)

शब्द--**अतिवादी** = भांडखोर. **याति** = जात. **नवनीत** = लोणी.

शेरा—याति कुळ येथें असे अप्रमाण। गुणांचें कारण असे अंगीं. प्रौढपणींचा.

१९७.

वींट नेघे ऐसें रांधा ।
जेणें वाधा उपजे ना ॥ १ ॥
तरीच तें गोड राहे ।
निरें पाहे स्वयंभ ॥ २ ॥
आणिकां गुणां पोटीं वाव ।
दावी भाव आपुला ॥ ३ ॥
तुका म्हणे शुद्ध जाती ।
ते मागुती परतेना ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—ज्याचा वींट येणार नाहीं, जें बाधणार नाहीं असें रांधा, असें अन्न शिजवा. तरच तें गोड असतें. रांधापकवायचें असेल तर वींट येणार नाहीं असें रांधा, नाहींतर, स्वयंभ मूळचें असेल तें, त्या स्वरूपांत, अन्न शुद्धच आहे. रांधण्याची जरूर नाहीं. पण रांधावयाचें असेल तर रांधून नासावयाचें असें तरी करूं नका.

जें शुद्ध आहे त्याच्या पोटीं इतर गुणांना वाव देणें म्हणजे, वाव दिला तर, त्यांत आपला, देणाराचा वावगा हेतु मात्र दिसतो.

" दुसऱ्या गुणांच्या पोटीं, म्हणजे, रांधलेलें अपक्व किंवा अशुद्ध असलें तर, त्यापासून पोटांत वारा धरतो आणि तो आपला प्रभाव दाखवितो. जें ज्ञान अर्धवट किंवा अशुद्ध असतें त्यापासून डोक्यांत वारें शिरतें, मनुष्य बहकतो असा घ्यावा—माडगांवकर.

यांत पोटीं=मुळें–(दुसऱ्या गुणांपोटीं) व २ पोटांत असे दोन अर्थ एकाच शब्दाचे करावे लागतात–" रांधा " यावरून सुचला. वा. ब. प.

शब्द—निरें =शुद्ध.

शेरा–=उपदेश करादयाचा असेल तर तो योग्य व नीट असावा. प्रौढपणींचा अभंग.

१९८.

नव्हतों सावचित ।
तेणें अंतरलें हित ॥ १ ॥
पडिला नामाचा विसर ।
वाढविला संसार ॥ २ ॥
लटिक्याचे पुरीं ।
वाहोनियां गेलों दुरी ॥ ३ ॥
तुका म्हणे नाव ।
आम्हां सांपडला भाव ॥४॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—सावध नव्हतों, त्यामुळें हित अंतरलें. देवाच्या नांवाचा विसर पडला आणि संसार वाढविला, संसाराच्या पाठीस लागलों. खोट्याला पूर आला आणि त्यांत मी वाहून गेलों पण तितक्यांत भक्तिरुप नाव आम्हाला सांपडली.

शब्द--सावचित = सावध. लटकें = खोटें.

शेरा—भावाचें माहात्म्य. परिपक्वतेच्या वेळचा.

१९९.

अन्नाच्या परिमुळें जरि जाय भूक ।
तरि कां हे पाक घरोघरीं ॥१॥
आपुलालें तुम्हीं करा रे स्वहित ।
वाचे स्मरा नित्य राम राम ॥२॥
देखोनि जीवन जरि जाय तान ।
तरि कां सांठवण घरोघरीं ॥३॥
देखोनियां छाया सुख न पवीजे ।
जंव न वैसीजे तया तळीं ॥४॥
हित तरी होय गातां आईकतां
जरि राहे चित्ता दृढ भाव ॥५॥
तुका म्हणे होसी भावेंचि तूं मुक्त ।
काय करिसी युक्त जाणिवेची ॥६॥

पाठभेद—च० ५ हित–सुख.

अर्थ—अन्नाच्या वासानें जर भूक जाती तर घरोघर स्वयंपाक कशाला झाले असते ? म्हणून तुम्हांला सांगतों कीं तुम्ही आपापलें हित काय असेल तेवढें करा. रामनामाचें वाचेनें नित्य स्मरण करा. पाण्याकडे पाहून जर तहान भागली असती, तर घरोघरीं हांडे भरून सांठवण कशाला पाहिजे होतें ? नुसती सांवली पाहून सुख होत नाहीं. जोंपर्यंत आपण खालीं–त्या सावलींत बसलें नाहीं तोंपर्यंत सावली पाहून सुख होत नाहीं. जर चित्तांत भाव असला तर परमेश्वराचें नांव गाण्यानें आणि ऐकण्यानें सुख होतें. तु. म्ह. तूं भावानेंच मुक्त होशील. भावच तुला तारील. ज्ञानाची युक्ती काय करावयाची ? पुष्कळ ज्ञान असलें तरी त्यानें मुक्ति मिळत नाहीं. त्या युक्तीचा उपयोग काय ?

शब्द—**परिमळ** = सुगंध, **न पवीजे** = पावत नाहीं, **जाणीव** = ज्ञान, पंडितं मन्यता.

शेरा—अनुभवाचा अभंग. प्रौढपणांतील. भावाचें माहात्म्य.

२००.

काय उणें आम्हा विठोवाचे पायीं ।
नाहीं ऐसें काई येथें एक ॥ १ ॥
नव्हे भोंवतालें ठायीं वांटूं मन ।
बराडी करून दारोदारीं ॥ २ ॥
कोण बळी माझ्या विठोवावेगळा ।
आणीक आगळा दुजा सांगा ॥ ३ ॥
तुका म्हणे मोक्ष विठोवाचे गांवीं ।
फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—विठोबाचे पाय असले म्हणजे मग आम्हांला काय कमी आहे ? या ठिकाणीं नाहीं, विठोबापाशीं मिळत नाहीं, असें काय आहे ? कांहीं नाहीं. म्हणून मनाला भिकारी करून दारोदारीं फिरवूं नये, फिरविण्याची जरूरी नाहीं. माझ्या विठोबाहून अधिक बळी, समर्थ, असा कोण आहे ? विठोबाचे गांवीं मोक्ष. त्याचीं भांडारें अगदीं फुकाचीं लुटावीं.

चर्चा—नाहीं.

शब्द—**बराडी** = भिकारी. **आगळा** = समर्थ.

शेरा—विठोबाचें माहत्म्य. सर्व सार काय तें भक्तींत आहें असें ठरून मन स्थिरावल्यावरचा असावा. किंवा अभंगाचा अर्थ लौकिक रीतीनेंहि करितां येईल.

२०१.

सेवितों हा रस वांटितों आणिकां
घ्यारे होऊं नका रानभरी ॥ १ ॥
विटेवरी ज्याचीं पाउलें समान ।
तोचि एक दानशूर दाता ॥ २ ॥

मनाचे संकल्प पाववील सिद्धी ।
जरी राहे बुद्धि याचे पायीं ॥ ३ ॥
तुका म्हणे मज धाडिलें निरोपा ।
मारग हा सोपा सुखरूप ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ सेवितों रस तो–असाहि पाठ आहे.

अर्थ—हा (भक्तीचा रस) मी स्वतः सेवन करितों आणि दुसऱ्यानांहि चाटतों. हा घ्या. रानभर होऊं नका. ज्याचीं पावलें विटेवर सारखीं आहेत तो विठ्ठलच खरा दाता, खरा दानशूर. जर त्याच्यापायीं आपण बुद्धि दृढ ठेविली, जर त्याच्या ठिकाणीं निष्ठा धरिली, तर सर्वांचें मनोरथ तो सिद्धीला पाववील. तु. म्ह. हा सोपा मार्ग लोकांना सांगावा असा निरोप देऊनच मला देवानें पाठविलें आहे.

चर्चा—च० १ सेवितों हा रस–मूळची कल्पना कृष्णाच्या गोपाळांबरोबरच्या क्रीडेंतून सुचलेली दिसते.

शब्द—**रस** = भक्तिरस. **समान** = सारखीं.

शेरा—विठोबाची भक्ति हाच निरोप मी घेऊन आलों आहे. प्रौढपणांतील.

२०२.

ऐसे ऐसियानें भेटती ते साधु ।
ज्यांच्या दरशनें तुटे भवबंधु ।
जे कां सच्चिदानंदीं नित्यानंदु ।
जे कां मोक्षासिद्धी तीर्थ वंदुं रे ॥ १ ॥
भाव सर्वकाळ मूळबंधु ।
सदा समबुद्धि नास्तिक्य भेदु ।

सूतकृपा मोडीं द्वेषकंदु ।
शत्रु मित्र पुत सम करीं बंधु रे ॥ २ ॥
मन बुद्धि काया वाचा शुद्ध करीं ।
रूप सर्वत्र देखोनि नमस्कारीं ।
लघुत्व सर्वभावें अंगिकारीं ।
सांडी मांडी मी तूं पण ऐसी थोरी रे ॥ ३ ॥
अर्थ काम चाड नाहीं चित्ता ।
मानामान मोह माया मिथ्या ।
वर्ते समाधानीं जाणोनि नेणतां ।
साधु भेट देती तया अवचिता रे ॥ ४ ॥
मनीं दृढ धरी विश्वास ।
नाहीं सांडीचा सायास ।
साधुदर्शन नित्यकाळ त्यास ।
तुका म्हणे जो विटला जाणीवेस रे ॥ ५ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—ज्यांच्या दर्शनानें जन्म मरणाचा बंध तुटतो, सच्चिदानंदाचे ठिकाणीं नित्य आनंद पावणारे, मोक्ष सिद्धीला जे तीर्थांप्रमाणें असे जे साधू पुरुष ते या उपायांनीं भेटतात. ते उपाय–सर्व कारणांना बांधून बंद करून टाकणारा भाव पाहिजे, सर्वांच्या ठिकाणीं नेहमीं समबुद्धि पाहिजे, नास्तिकपणा नको, भूतदया–जिच्या योगानें द्वेषाचें बीज मोडतें, ती पाहिजे. शत्रु मित्र,पुत्र सगळे सारखेच लेखतां आले पाहिजेत. म्हणून, तूं आपलें मन, बुद्धि, काया, वाचा, हीं सगळीं शुद्ध कर. सर्वत्र परमेश्वराचें रूप भरलेलें आहे असें पाहून अशा भावनेनें नम्रपणा शीक, आणि मीतूंपणाची थोरी विसर. मी मोठा, तो लहान असा अभिमान असेल तो टाकून दे.

ज्याच्या चित्ताला, अर्थाची, कामाची, चाड नाहीं मान अपमान, मोह, माया, हीं सर्व ज्याला खोटीं वाटतात, ज्ञानी असून देखील, नेणतेपणानें जो

समाधानानें रहातो, त्याला साधू अवचित भेटतात. ज्याच्या मनांत विश्वास दृढ आहे, सांडणें मांडणें, जोडणें, मोडणें, हा सायास जो करित नाहीं, आणि जो–जाणिवेला-ज्ञान आणि त्याच्यापासून होणारा गर्व यांना–जो विटला, त्याला साधूचें दर्शन काय, केव्हांहि आहेच.

चर्चा—च० १ ज्याच्या=ज्यांच्या असें पाहिजे.

मोक्षसिद्धी तीर्थ—मोक्षसिद्धी कारणें जे केवळ तीर्थच, तीर्थासारखे असे साधू.

भाव सर्वकारण मूळबंदू—सर्व कारणांचा मुळबंद=सर्व कारणांना बांधून बंद करून टाकणारा जो भाव तो, त्याच्या योगानें संत भेटतात.

दुसऱ्या चरणापासून पुढें सर्व चरणांतील क्रियापदें आज्ञार्थी घेऊन तूं असें कर म्हणजे तुला साधु भेटतील, साधू भेटण्याचे मार्ग हे असे आहेत असें एकंदर अभंगांत सांगितलें आहे अशा आशयानें अर्थ लावावा असें मला वाटतें. (सं.)

किंवा–चरण ४ यांत " साधु मेट देती तया अवचिता " असें आहेत त्याच्या अनुरोधानें, च० २, ३, ४, ५, यांत सांगितलेले गुण ज्यांच्या ठिकाणीं आहेत त्यांना साधूंचें दर्शन होतें असा आशय सनजावा.

च० ४ वर्ते समाधानीं जाणोनि नेणतां ।–

(१) मान, अपमान, हीं मिथ्या समजून, जणूं काय आपणाला कांहींच समजत नाहीं, अशा रीतीनें जो समाधान–वृत्तीनें रहातो. माडगांवकर

या अर्थाप्रमाणें " जाणोनि " हें पद थोडेसें मागें खेचावें लागतें तें बरोबर दिसत नाहीं. " जाणोनि नेणतां " हा प्रयोग तु. अभंगांत पुष्कळ वेळां येतो. ज्ञानानें येणारा जाणतेपणा आपल्या आंगीं नाहीं अशा भावनेनें मुलासारखें निर्लेप वर्तन करणारा, किंवा असें करण्याच्या योगानें, करून—असा अर्थ बरा वाटतो. (वा. ब. प.)

शब्द—**सांडी मांडी**–खटपट, सांडणें, मांडणें, जोडणें मोडणें अशा प्रकारचा व्याप.

शेरा—ओवी छंद. अभंग तुकारामाचाच आहे का ? गंभीरपणा नाहीं–तरुणपणांतील.

२०३.

भवसागर तरतां । कां रे करितसां चिंता ।
पैल उभा दाता । कटीं कर ठेवुनियां ॥ १ ॥
त्याचे पायीं घाला मिठी । मोल नेघे जगजेठी ।
भावा एकासाठीं । खांदां वाहे आपुल्या ॥ २ ॥
सुखें करावा संसार । परि न संडावे दोन्ही वार ।
दया क्षमा घर । चोजवीत येतील ॥ ३ ॥
भुक्तिमुक्तीची चिंता । नाहीं दैन्य दरिद्रता ।
तुका म्हणे दाता । पांडुरंग वोळगिल्या ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—भवसागर तरतांना, तरून जाण्याची, तुम्हांला इतकी काळजी ती कां वाटते ? पलीकडल्या तीरावर, कमरेवर हात ठेवून विठ्ठल तुम्हांला सहाय करण्याकरितां उभा आहे त्याच्यापायीं मिठी घाला. तो कांहीं मोल मागत नाहीं. केवळ त्याला तुम्हीं आपला भाव दिलात, त्याची भक्ति केलीत, कीं तो तुम्हांला आपल्या खांद्यावर घेऊन पैल तीराला नेईल.

संसार खुशाल करावा. पण तो करीत असतांना दोन्ही रीतींनीं फसूं नये. दोन्ही गोष्टी,–संसार व विरक्ति या–टाकून देण्याचें कारण नाहीं,–दोन्ही साधाव्यात. दया, क्षमा इत्यादि आपलें घर शोधीत येतील, आपोआप आपल्या-कडे चालून येतील (असें करावें). एक दाता पांडुरंग तो वोळगिल्या–त्याला मिठी मारिली म्हणजे म्हणजे मग दैन्य, दारिद्र्य नाहींत, किंवा भुक्ति (संसार) किंवा मुक्ति यांपैकीं कशाचीहि काळजी नाहीं.

चर्चा––च० ३ परि न संडावे दोन्ही वार–वार म्हणजे काय ?

भावा एका साठीं=एक शुद्ध भाव पाहिजे तो परमेश्वराला दिला म्हणजे त्याच्या मोबदल्यानें.

चोजवीत=शोधीत, कौतुक करीत. माडगांवकर.
किंवा घरीं आपण होऊन चालून येतील. पटवर्धन.

शब्द—मोल=नावेचें भाडें; **भाव**=भक्ति; **न संडावें**=घालवूं नये. **वार**=प्रकार? **चोजवीत-चोजवणें**=कौतुक करणें. **भुक्ति**=भोग, संसार, **मुक्ति**=मोक्ष.

शेरा—भाव शुद्ध पाहिजे.

२०४.

जे कां रंजले गांजले ।
त्यांसि म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोचि साधु ओळखावा ।
देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥
मृदु सवाह्य नवनीत ।
तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥
ज्यासि आपांगिता नाहीं ।
त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करणें जे पुत्रासी ।
तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगूं किती ।
तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जे (संसाराच्या तापानें) रंजीस आले, गांजले, त्यांना आपले म्हणतो, जवळ करतो, तोच साधू असें समजावें आणि देव त्याच्याच ठिकाणीं आहे असें म्हणावें. बाहेर व आंत दोहींकडे लोणी मऊच असतें. आणि तसेंच, लोण्यासारखेंच, सज्जनाचेंहि मन असतें. ज्याला कोणी सहाय करणारा नाहीं त्याला हृदयाशीं धरतो; ज्या प्रकारची दया आपल्या मुलावर करावी त्याच

प्रकारानें चाकर नोकरांनाहि वागवावें, अशा प्रकारानें जो वागतो त्याचें वर्णन मी किती करूं. तो केवळ परमेश्वरच, यापेक्षां दुसरें काय सांगावें ?

शब्द—सबाह्य = आंत बाहेर. आपंगिता = संभाळणारा.

शेरा—संतांचीं लक्षणें–प्रौढपणांतील.

२०५.

याजसाठीं भक्ती । जगीं रूढवावया ख्याती ॥ १ ॥
नाहीं तरी कोठें दुजें । आहे बोलाया सहजें ॥ २ ॥
गौरवासाठीं । स्वामिसेवेची कसोटी ॥ ३ ॥
तुका म्हणे अलंकारा । देवभक्त लोकीं खरा ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ रूढवावया–वाढवाया. च० ४ अलंकारा–अलंकार.

अर्थ—भक्ताची ख्याति जगांत पसरावी, रूढ व्हावी म्हणून (देवानें) भक्ताच्या पाठीमागें भक्ती लावली. भक्तीचा उपयोग तो एवढ्याच करितां. नाहींतर सहज बोलावयाचें म्हणजे भक्त आणि देव यांच्या ठिकाणीं द्वैतपण, दुजेपण, आहे कुठें ? देव आणि भक्त एकच. भक्ताचा गौरव व्हावा म्हणून त्याला देव स्वामीसेवेची कसोटी लावतो. (नाहींतर, देवाला आपल्या गौरवासाठीं भक्ताची पूजा पाहिजे असें थोडेंच आहे ?)

किंवा, १ जगांत देवाची ख्याति रूढ व्हावी याकरितां भक्ति, यासाठींच गौरव, स्वामिसेवेची कसोटी याचसाठीं. नाहींतर बोलण्याला दुसरें कोठें काय आहे ? लोकांमध्यें (लौकिक रीतीनें पाहिलें म्हणजे देवभक्त हा अलंकार. पण खरें पाहिलें तर देव भक्तांत अंतर आहे कुठें ? अंतर आहेत तें नुसतें लोकांत, लोकांपुरतें, ख्याति वाढावी यासाठीं. नाहींतर दुजें = द्वैतभाव आहे कुठें ? सुखटणकर.

च० ४ " अलंकारा " (असें क्रियापद) घेऊन—जो खरा भक्त असेल त्याचा गौरव करा. तो गौरव करण्याला पात्र आहे–असाहि अर्थ करितां येईल.

२ भक्ताची (भक्तीची) ख्याति व्हावी, भक्ति जगांत रूढ व्हावी, या-

चोजवीत=शोधीत, कौतुक करीत. माडगांवकर.

किंवा घरीं आपण होऊन चालून येतील. पटवर्धन.

शब्द—मोल=नावेचें भाडें; **भाव**=भक्ति; **न संडावें**=घालवूं नये. **वार**=प्रकार? **चोजवीत-चोजवणें**=कौतुक करणें. **भुक्ति**=भोग, संसार, **मुक्ति**=मोक्ष.

शेरा—भाव शुद्ध पाहिजे.

२०४.

जे कां रंजले गांजले ।
त्यांसि म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोचि साधु ओळखावा ।
देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥
मृदु सवाह्य नवनीत ।
तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥
ज्यासि आपांगिता नाहीं ।
त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करणें जे पुत्रासी ।
ते.चि दासा आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगूं किती ।
तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जे (संसाराच्या तापानें) रंजीस आले, गांजले, त्यांना आपले म्हणतो, जवळ करतो, तोच साधू असें समजावें आणि देव त्याच्याच ठिकाणीं आहे असें म्हणावें. बाहेर व आंत दोहींकडे लोणी मऊच असतें. आणि तसेंच, लोण्यासारखेंच, सज्जनाचेंहि मन असतें. ज्याला कोणी सहाय करणारा नाहीं त्याला हृदयाशीं धरतो; ज्या प्रकारची दया आपल्या मुलावर करावी त्याच

प्रकारानें चाकर नोकरांनाहि वागवावें, अशा प्रकारानें जो वागतो त्याचें वर्णन मी किती करूं. तो केवळ परमेश्वरच, यापेक्षां दुसरें काय सांगावें ?

शब्द—**सबाह्य** = आंत बाहेर. **आपंगिता** = संभाळणारा.

शेरा—संतांचीं लक्षणें—प्रौढपणांतील.

२०५.

याजसाठीं भक्ती । जगीं रूढवावया ख्याती ॥ १ ॥
नाहीं तरी कोठें दुजें । आहे बोलाया सहजें ॥ २ ॥
गौरवासाठीं । स्वामिसेवेची कसोटी ॥ ३ ॥
तुका म्हणे अलंकारा । देवभक्त लोकीं खरा ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ रूढवावया—वाढवाया. च० ४ अलंकारा—अलंकार.

अर्थ—भक्ताची ख्याति जगांत पसरावी, रूढ व्हावी म्हणून (देवानें) भक्ताच्या पाठीमागें भक्ती लावली. भक्तीचा उपयोग तो एवढ्याच करितां. नाहींतर सहज बोलावयाचें म्हणजे भक्त आणि देव यांच्या ठिकाणीं द्वैतपण, दुजेपण, आहे कुठें ? देव आणि भक्त एकच. भक्ताचा गौरव व्हावा म्हणून त्याला देव स्वामीसेवेची कसोटी लावतो. (नाहींतर, देवाला आपल्या गौरवासाठीं भक्ताची पूजा पाहिजे असें थोडेंच आहे ?)

किंवा, १ जगांत देवाचा ख्याति रूढ व्हावी याकरितां भक्ति, यासाठींच गौरव, स्वामिसेवेची कसोटी याचसाठीं. नाहींतर बोलण्याला दुसरें कोठें काय आहे ? लोकांमध्यें (लौकिक रीतीनें पाहिलें म्हणजे देवभक्त हा अलंकार. पण खरें पाहिलें तर देव भक्तांत अंतर आहे कुठें ? अंतर आहेत तें नुसतें लोकांत, लोकांपुरतें, ख्याति वाढावी यासाठीं. नाहींतर दुजें = द्वैतभाव आहे कुठें ? सुखटणकर.

च० ४ " अलंकारा " (असें क्रियापद) घेऊन—जो खरा भक्त असेल त्याचा गौरव करा. तो गौरव करण्याला पात्र आहे—असाहि अर्थ करितां येईल.

२ भक्ताची (भक्तीची) ख्याति व्हावी, भक्ति जगांत रूढ व्हावी, या-

साठीं भक्ताची प्रतिष्ठा, आणि त्याचा गौरव. नाहींतर, सहज बोलावयाला दुसरें आहे काय आणि कोठें ? गौरव, कसोटी, हीं त्याचसाठीं–भक्ती जगांत रूढ व्हावी म्हणून—म्हणून भक्त असेल त्याचा गौरव करा, त्याला अलंकारा.

दुसरा अर्थच सरळ वाटतो. वा० ब० प०

पहिले दोन चरण अद्वैतपर आहेत, व एकंदर अभंगांत भक्त आणि देव हे एकच असें गृहित धरलें आहे. पण अद्वैत मान्य असूनहि, देवाची भक्ति भक्तानें केली पाहिजे असा तु. अभिप्राय. तें कां ? तर भक्ताच्याच गौरवासाठीं. डॉ. भांडारकर.

शब्द— **ख्याति** = प्रसिद्धी. **रूढवाययया** = पसरावयाला; चालु करावयाला.

शेरा—अद्वैत मान्य असूनही देवाची भक्ती भक्तानें कां केली पाहिजे तें तुकाराम सांगतात.

२०६.

अमंगल वाणी । नये आयकों ते कानीं ॥ १ ॥
जो हे दूषी हरिची कथा । त्यासि क्षयरोगव्यथा ॥ २ ॥
याति वर्ण श्रेष्ठ । परि तो चांडाळ पापिष्ठ ॥ ३ ॥
तुका म्हणे पाप । माय नावडे ज्या वाप ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—हरिच्या कथेला दूषणें ठेवतो त्याला क्षयरोगाचां व्यथा, त्याची वाणी अमंगळ, ऐकूं देखील नये. तो जरी जातीनें श्रेष्ठ असला तरी गुणांनीं पापीचांडाळासारखाच, चांडाळच. ज्याला मायबाप आवडत नाहींत, देवाचा जो द्वेष करितो तो पापी.

शेरा—हरिकथेला दूषण देणारांना शिव्या. अभंग तरुणपणांतील, अल्लड-वृत्ति दाखविणारा.

२०७.

कैसा सिंदळीचा । नव्हे ऐसी ज्याची वाचा ॥ १ ॥
वाचे नुच्चारी गोविंदा । सदा करी परनिंदा ॥ २ ॥
कैसा निरयगांवा । जाऊन पवे विसांवा ॥ ३ ॥
तुका म्हणे दंड । कैसा न पवे तो लंड ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

जो गोविंदाचें नांव तोंडानें घेत नाहीं, सदा परानिंदा करितो, तो सिंदळीचा नव्हे असें कसें म्हणावें ? असा माणूस निरयगांवाला जाऊन विसावा कसा पावेल ? निरयगांवाला जाऊनहि त्याला विसावा कसा मिळणार ? असा जो लंड आहे त्याला दंड होणार नाहीं हें कसें ? होईलच.

चर्चा—च० ३ कैसा निरयगांवा जाउन पवे विसावा—माडगांवकर प्रतींत "जाउ न" असा पाठ आहे. तो घेऊन अर्थ लागत नाहीं. "जाऊन" असें घ्यावें. निरयगांवा जाऊन असा पुरुष विसावा कैसा पावेल ? तो नरकांत जाऊन तडफडणार. त्याला विसावा कोठचा ? डॉ. भांडरकर. वा० ब० प०

२ तो निरयगांवा कैसा न जाउ, ? विसावा कैसा पावे ! असा अन्वय सुचविण्यांत आला. पण तो ओढून ताणून आणलेला दिसतो.

३ तो जरी निरयगांवाला गेला, स्वर्गांत गेला, तरी तेथेंहि त्याला विश्रांति कोठची मिळावयाला ? वा० ब० प०

एकंदरींत (१) मधील अर्थच बरा दिसतो. असा जो निंदक असेल त्याला स्वर्गप्राप्ति नाहीं व विश्रांति नाहीं.

शेरा—जो देवाची स्तुति करीत नाहीं तो दंड पावेल.

२०८.

आचरणा ठाव ।
नाहीं अंगीं स्वतां भाव ॥ १ ॥
करवी आणिकांचे घात ।
खोडी काढूनि पंडित ॥ २ ॥

श्वानाचिया परी ।
मिष्ठान्नासी विटाळ करी ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा ।
सटवेची ना पांचां दिसां ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ स्वतां–स्वता (–) भाव.

अर्थ—सदाचरणाला ठिकाण नाहीं आणि उलट आंगीं अहंपणा मात्र फार, दुसरे करितील त्यांत खोडी काढून त्यांचे घात करवितो, आणि आपण मोठेपणाला पावूं पहातो असा माणूस म्हणजे चांगल्या अन्नाला शिवून विटाळ करून नास करणारें कुत्रें असतें त्याप्रमाणें. तु. म्ह. असा माणूस असेल तो जगून उपयोग काय ? तो जन्मतःच, पांचव्या दिवशीं, सटवत कां नाहीं ? त्याला सटवीचीं बाधा होऊन तो मरत कां नाहीं ?

चर्चा—च० १ स्वतां भाव—(१) आचरणा ठाव नाहीं आणि स्वतां आंगीं भाव (नाहीं) असा अन्वय केला तर भाव=श्रद्धा, विश्वास असा अर्थ. आचरणाला ठिकाण नाहीं, आणि देवावर भाव नाहीं (डॉ. भांडारकर.)

किंवा, २ स्वताभाव=अहंपणा. (स्वताभाव हा एक सामासिक शब्द)

वा. ब. प.

सटवणें–मूल जन्मल्यानंतर पांचव्या व सहाव्या दिवशीं पांचवी व षष्ठी पूजन करितात. कें केलें नाहीं तर " सटवी " बाधते, या समजाला उद्देशून म्हटलें आहे. सटवी. सहाव्या दिवशीं जिचें पूजन करितात ती देवी.

शेरा— दुर्जनाचें लक्षण. तरुणपणींचा.

२०९.

गर्भाचें धारण । तिनें वागविला सीण ॥ १ ॥
व्याली कुऱ्हाडीचा दांडा । वर न घलीच तोंडा ॥ २ ॥
उपजला काळ । कुळा लाविला विटाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे जाय । नरका अभक्ताची माय ॥ ४ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--अभक्त जो त्याच्या आईनें गर्भाचें धारण केलें म्हणजे शीण मात्र वागविला. ती नुसती कुऱ्हाडीचा दांडा व्याली. उपजतांच तोंडांत वार घालून तिनें असलें मूल मारून टाकिलें नाहीं. असा माणूस म्हणजे प्रत्यक्ष काळच जन्माला आला. कुळाला डाग लागला. असल्या अभक्ताची माय नरकाला जाते.

शब्द--**शाण** = त्रास. **वर** = वार.

शेरा--अभक्ताला शिव्या. अल्लडवृत्तींतला, तरुणपणांतील.

२१०.

पतनासी जे नेती । तिचा खोटा स्नेह प्रीती ॥ १ ॥
विधिपुरतें कारण । वहु वारावें वचन ॥ २ ॥
सर्वस्वासी नाडी । ऐसी लाघवाची बेडी ॥ ३ ॥
तुका म्हणे दूरी । राखतां हे तींचि वरी ॥ ४ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--स्त्रियांच्या मोहांत सांपडल्यामुळें माणसें नरकांत जातात. म्हणून त्यांच्याशीं स्नेह करणें, त्यांची प्रीति, हीं खोटीं. तिच्याशीं कार्यापुरतें कारण ठेवावें, फार बोलणें चालणें वारावें. सर्वस्वाला नाडणारी लाघवाची बेडी म्हणजे स्त्री. जितकी दूर राखतां येईल तितकी बरी.

चर्चा--लाघवाची = लाघव करणारी ? हळूच पायांत पडणारी बेडी.

वरील अभंग स्वस्त्रीसंबंधानें तुकारामांनीं लिहिला असें कित्येक म्हणतात. पण तो तसा दिसत नाहीं. एकंदर सामान्यत्वानें स्त्रीजातीसंबंधानें कवीनें आपलें मत येथें दिलेलें आहे असें वाटतें. तें बरोबर असेल तर इतर मराठी कवींच्या प्रमाणेंच तुकारामाचे विचारहि स्त्रियांच्याविषयीं अनुदारपणाचेच होते असें म्हटलें पाहिजे.

शब्द--**विधि** = धर्मबंधन. **कारण** = संबंध, काम.

शेरा--नाहीं.

२११.

देव आड झाला । तो भोगितां मी उगला ।
अवघा निवारिला । शीण शुभअशुभाचा ॥ १ ॥
जीवाशिवाचें भातुकें । केलें क्रीडाया कौतुकें ।
कैंचीं येथें लोकें । हा आभास अनित्य ॥ २ ॥
विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग ।
वांटिले विभाग । वर्णधर्म हा खेळ ॥ ३ ॥
अवघीं एकाचीच वीण । तेथें कैंचें भिन्नाभिन्न ।
वेदपुरुष नारायण । तेणें केला निवाडा ॥ ४ ॥
प्रसादाचा रस । तुका लाधला सौरस ।
पायांपाशीं वास । निकट नव्हें निराळा ॥ ५ ॥

पाठभेद--च० २ क्रिडाया कौतुकें—होतें कवतुकें. च० ४ वीण—विईण; च० ५ निराळा—निरोपी.

अर्थ--देवानें मला पाठिशीं घातलें. तो पुढें झाला, व मी उगाच राहून भोग भोगणें हें देवाकडे लागलें. शुभ आणि अशुभ यांचा मला जो शीण व्हावयाचा त्याचें देवानें निवारण केलें. ज्याप्रमाणें लहान मुलें भातुकलीनें खेळतात, त्याप्रमाणे जीव आणि शिव हीं खेळणीं त्यानें केलीं आहेत. तीं केवळ मौजेकरितां. या ठिकाणीं लोकें, ज्याला आपण विश्व असें म्हणतों तें, किंवा आपण आणि परका अशा प्रकारचा भाव आला कोठला ? हें सर्व अनित्य आहे, आभास मात्र आहे. सर्व जग विष्णुमय; त्या ठिकाणीं मात्र लाभ होतो, मन लागतें, जडतें. विभाग वांटले, वर्ण, धर्म, निरनिराळे उत्पन्न केले, हा नुसता परमेश्वराचा खेळ आहे. हे सगळे भिन्न भिन्न प्रकार ही एकाचीच प्रजा. त्या ठिकाणीं वेगळेपणा कुठला ? वेदपुरुष नारायणानेंच याचा निवाडा करून ठेवला आहे. त्याच्या प्रसादाचा रस गोड, तो मला मिळाला. त्याच्या पायापाशीं माझा निकटवास आहे, मी निराळा नव्हें.

चर्चा च० १ मी आणि प्रपंच यांच्यामध्यें देव उभा राहिला, त्यानें मला पाठिशीं घातलें.

शब्द—" **लाग** "–१ लाभ, मोठा लाभ, (२) मनाची धारणा. " **सौरस** " = गोडी.

२१२.

ध्यानीं यागीराज वैसले कपाटीं ।
लागे पाठोवाठीं तयांचिया ॥ १ ॥
तान भूक त्यांचें राखे शीत उष्ण ।
जाले उदासीन देहभाव ॥ २ ॥
कोण सखें तयां आणीक सोयरें ।
असे त्यां दुसरें हरिविण ॥ ३ ॥
कोण सुख त्यांच्या जीवासी आनंद ।
नाहीं राज्यपद घडी तयां ॥ ४ ॥
तुका म्हणे विष अमृतासमान ।
कृपा नारायण करितां होय ॥ ५ ॥

पाठभेद—च० १ पाठोवाटीं–पाटोवाटी.

अर्थ—योगीराज कपाटीं, अरण्यांत ध्यान करीत बसले. त्यांच्या पाठोवाटी लागे. त्यांचा पाठपुरावा (देव) करितो. देव त्यांची तहान भूक राखतो. शीत उष्णाची काळजी घेतो, राखण करितो. त्यांचे देहभाव, देहाविषयीं काळजी, आपलेपणा, नाहींसा झालेला, तेव्हां त्यांना हरीशिवाय दुसरे सखे-सोयरे, मायेचें असें कोण आहे ? देव त्यांची काळजी करितो, राखण करितो, हें योग्यच झालें. त्यांना, राज्यपद, घडामोड यांची कांहीं काळजी नाहीं. यांतच त्यांच्या जीवाला केवढें तरी सुख आहे. तु. म्ह. नारायणानें कृपा केली असतां विषदेखील अमृतासारखें होतें.

चर्चा च ४ "त्या योगिराजांना राज्यपद घडीभर देखील नाहीं." असा अर्थ जनक राजाची कथा लक्षांत ठेवून करावा. माडगांवकर. पटवर्धन.

शब्द—योगीराज–भक्तराज असतें बरें झालें असतें. तु. भक्तिमार्गाचा पुरस्कर्ता तो येथें केवळ योगाचा महिमा गात आहे असें दिसतें. बा. ब. प.

योगीराज=साधुसंत, भक्त, असाच अर्थ. योग आणि भक्ति यांतला वास्तविक फरक तु. माहित असला तरी सामान्यत्वें साधुसंत या अर्थी योगिराज यांत किंवा भक्तराज यांत फारसा फरक नाहीं. शिवाय ध्यानीं=ध्यानांत मग्न होऊन या अर्थाला असाच अनुरूप योगिराज हा शब्द आहे.

कपाटीं=गुहेंत, दारें लावून.
वाठोवाटीं लागे=पाठीराखेपणा करितो.
ध्यानी=ध्यानस्थ, ध्यान करण्यांत मग्न झालेला.
घडी=घडीभर; किंवा, घडणें व (मोडणें) ? संपादक

शेरा—हरिकृपेनें सर्व कांहीं आनंद. हरिकृपेचें माहात्म्य. प्रौढपणांतील.

२१३.

न व्हावें तें झालें देखियेले पाय ।
आतां फिरूं काय मागें देवा ॥ १ ॥
बहु दिस होतों करीत हे आस ।
तें आलें सायासें फळ आजि ॥ २ ॥
कोठवरि जिणें संसाराच्या आशा ।
उगवो हा फांसा एथूनियां ॥ ३ ॥
बुडालीं तयांचा मूळ ना मारग ।
लागला तो लाग सोडूनियां ॥ ४ ॥
पुढें उल्लंघितां दुःखाचे डोंगर ।
नाहीं अंतपार गर्भवासा ॥ ५ ॥
तुका म्हणे कास धरीन पीतांबरीं ।
तूं भवसागरीं तारूं देवा ॥ ६ ॥

पाठभेद–च० १ देखियेले पाय–देखिले हे पाय. च० २ संसाराच्या·संसाराची

अर्थ—जें व्हायचें नव्हतें तें झालें. कधीं आशा केली नव्हती तें घडून आलें तुमची भेट झाली देवा आतां मागें फिरूं काय ? आज फार दिवस आशा करीत होतों, तें आज मोठ्या सायासानें फळ आलें; आतां संसाराच्या आशेनें कुठवर जगावें ? आतां जिणें कोठवर–संसाराची आशा हा फांसा येथून पुढें (उगवो, उकलूं दे). जीं माणसें लागलेला लाग सोडून वुडालीं, हातीं आलेला कल्याणाचा ठेवा गमावून नरकाला गेलीं, सुखाला मुकलीं, तीं किती सांगूं ! त्यांचा मागमूस नाहीं. पुढें उल्लंघाया गेलें तर दुःखाचे डोंगर आहेत. गर्भवासा अंतपार नाहीं. तु. म्ह. पीतांबरीं कास धरीन. देवा, तूं या भवसागरांतलें माझें तारूं आहेस.

च० ३ उगवो हा फांसा–उगवों–असा पाठ घेऊन आम्ही हा पाश तोडून टाकूं असा अर्थ केला तर जास्त बरें.

शब्द–**आस** = आशा. **सायास** = श्रम. **उगवो, उगवणें** = उकलणें.

शेरा—भगवत्प्रसाद झाल्यावरचा अभंग.

२१४.

वैकुंठा जावया तपाचे सायास ।
करणें जीवनास नलगे कांहीं ॥ १ ॥
तया पुंडलिकें केला उपकार ।
फेडावया भार पृथ्वीचा ॥ २ ॥
तुका म्हणे सोपी केली पायवाट ।
पंढरी वैकुंठ भूमीवरी ॥ ३ ॥

पाठभेद—च० २ फेडावया–हरावया.

अर्थ—वैकुंठाला जावयाला तप करण्याचे सायास करावयाला नकोत, व कांहीं नुकसान करून घ्यावयाला नको, जीवाचा नाच करावयाला नको. पृथ्वीचा भार फेडण्याकरितां पुंडलीकानें उपकार केला. त्यानें विठ्ठलाची मूर्ति पंढरीस

आणिली, आणि सोपी पायवाट केली. पृथ्वीवर वैकुंठच आणिला. पंढरी वैकुंठ केली.

च० २ पंढरीची मूर्ति पुंडलीकानें आणिली काय ?

शेरा—लौकिकी अभंग. वारकरी पंथाला गोड वाटेल असा. प्रौढपणाचा असेल.

२१५.

शोकें शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ॥ १ ॥
येथें केलें नव्हे काई । लंडीपण खोटें भाई ॥ २ ॥
करिती होया होय । परी नव्हे कोणी साह्य ॥ ३ ॥
तुका म्हणे घडी । साधिलिया एक थोडी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—शोक करावा, दुःख करावें, तितकें तें वाढतें, कमी होत नाहीं. म्हणून या जगांत हिंमत घरून जे धैर्यानें रहातात ते बहादर खरे, गाढे धीराचे खरे. जगांत भित्रेपण धरून कांहीं निभावयाचें नाहीं. होस हो, पुष्कळ म्हणणारे भेटतील. परंतु खरी सहाय करण्याची वेळ आली म्हणजे कोणी नाहीं. त्यावेळीं उपयोगी पडेल, तो खरा. तु. म्ह. (आणीबाणीची) वेळ थोडी असते. क्षणभरच असते. तेवढी निभावून नेली पाहिजे. (अंगावर) आलेली लाट जाईपर्यंत धीर धरिला पाहिजे. डॉ. भांडारकर.

शब्द—गाढे = बळवंत, धीराचे.

लंडीपण = मुळचा शब्द लवंडीपणा हा आहे. लंवडी हा मुसलमानी स्त्री-वाचक शब्द आहे. लंडीपण = भित्रेपणा.

शेरा—अभंग व्यवहारिक व तात्त्विक अशा दुहेरी स्वरूपाचा आहे. संसारांत जसा मुहूर्त साधावयाचा तसें परमेश्वरप्राप्तीची वेळ साधावयाची असते. तेवढी साधली म्हणजे झालें–अल्लडपणा निघून गेल्यावरचा.

२१६.

म्हणऊनी खेळ मांडियेला ऐसा ।
नाहीं कोणी दिशा वर्जियेली ॥ १ ॥
माझिया गोतें हें वसलें सकळ ।
न देखिजे मूळ विटाळाचें ॥ २ ॥
करूनि ओळखी दिली एकसरें ।
न देखों दुसरें विषमासी ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं काळापाशीं गोवा ।
स्थिति मति देवावांचूनियां ॥ ४ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--म्हणूनच हा असा संसाराचा खेळ मांडिला. आणि कोणतीहि दिशा, कोणीहि दाखविलेला सरळ मार्ग, टाकिला नाहीं. हें सर्व माझ्या भोंवतीं दिसणारें जग माझ्यासारख्या संत मंडळींनीं भरून टाकिलें आहे. आणि त्यांत विटाळाचें मूळ पाहूं नये. सगळ्यांची एकसारखी ओळख करून दिली. तेणेंकरून वैषम्य उत्पन्न होण्यासारखें, दुजा भाव उत्पन्न होण्यासारखें येथें कांहीं दिसत नाहीं. यामुळें, तु. म्ह. आम्हांला गोंवून टाकण्यासारखें काळापाशीं कांहीं नाहीं. देवावांचून स्थितिमति नाहीं.

चर्चा--विरक्तपणा अंगांत पुरा बाणल्यानंतर संसार व परमार्थ एकच वाटूं लागले, त्यांत कोठें भिन्नभाव दिसत नाहींसा झाला अशा मनाच्या स्थितींतील हा अभंग असावा अशी कल्पना केली तर अर्थ खालीं दिल्याप्रमाणें करावा असें वाटतें.

आम्हीं हा संसाराचा खेळ, पसारा मांडलेला आहे आणि तो खेळत असतांनाहि, देवाकडे जाण्याची कोणतीहि दिशा, कोणताहि मार्ग, वगळलेला नाहीं. या ठिकाणीं सर्व लोक मला माझ्या गणगोतासारखेच दिसतात, परकें कोणीच दिसत नाहीं. या ठिकाणीं सर्वच माझ्यासारखे देवभक्त, तेव्हां कोणाचा विटाळ मानण्याचें कारण दिसत नाहीं. सगळ्यांची एकसारखी ओळख करून दिली. (घेतली).

चर्चा—च० १ म्हणऊनि खेळ सांडियेला ऐसा. खेळ = १ कीर्तन, भजन वगैरे. दिशा = देवाकडे जाण्याचा मार्ग. असा अर्थ करून–मी हा भजनपूजनाचा उद्योग, पसारा मांडिला आहे त्याचें कारण आपण या ठिकाणीं सर्वच देवाचे सेवक आहोंत.

च० २ सकळ = सगळी सृष्टि. माडगांवकर. वा० ब० प०

माझिया गोतें–माझ्या सग्यासोयऱ्यांनीं. सगळें जग देवमय झालें, जेथें तेथें माझे सगे सोयरेच भेटतात. आतां परकें, ज्याचा विटाळ मानावा, असें कोणीच नाहीं. सगळें माझें गणगोतच. द्वैत किंवा भेदबुद्धीचा येथें पत्ताच नाहीं. मा० वा० ब० प०

माझिया गोतें. मजसारख्या भक्तांनीं—मं० ठ०

च० ३ ओळखी—सर्व जग अंतरीं एकच, त्यांत भेद नाहीं असें ज्ञान.

एकसरें = एकदम, एकदाच.

न देखों दुसरें—सर्व एकसारखेंच, एकच दिसतें, जगांत सगेसोयरेच दिसतात, दुसरें, विषम, असें कांहीं दिसतच नाहीं. वा० ब० प०

च० ४ गोवा = गुंतणें. काळाच्या पाशांत आम्हीं गुंतलों नाहीं असा अर्थ.

आतां वैषम्य उत्पन्न होण्यालारखें कांहीं राहिलें नाहीं. अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे मग आम्हां भक्तांना कळाचें भय नाहीं. काळ आम्हांला संकटांत गुंतवील अशी भीति नाहीं. आणि आमचें सर्व चित्त काय तें देवाकडे सर्वस्वीं लागतें आणि देवाशिवाय आमच्या मनांत कसलाहि विचार येत नाहीं.

(संपादक.)

शब्द—**दिशा** = देवाची दशा, देवाकडे नेणारा मार्ग. **वजियेली** = वर्जिली वगळली **सकळ** = सर्व जग. **गोत** = गोत्र, कुळ, भाऊबंद, सोयरे.

माझिया गोतें = १ माझ्या गणगोतानें वा. ब. प.

२ माझ्यासारख्या भक्तमंडळानें मं. ठ.

खेळ = १ पसारा, संसार. २ कीर्तन, भजन वगैरे.

२१७.

वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥ १ ॥
नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन ॥ २ ॥
पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं ॥ ३ ॥
तुका म्हणे याती । हो कां तयाची भलती ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ निर्धारीं–निर्धारी.

अर्थ—ज्याची देवावर भक्ती, माया, तो वैष्णव याखेरीज दुसरें प्रमाण नाहीं. खरा वैष्णव कोण खोटा कोण हें ठरविण्याचें दुसरें प्रमाण नाहीं. देह, धन, लोक हीं सर्व त्याला तृणासारखीं वाटतात. कसलेंही मोटें संकट आलें तरी नेमाला टळत नाहीं, नियम सोडीत नाहीं, (तो खरा वैष्णव) मग त्याची जात कोणती कां असेना ?

चर्चा—च० २ (१) तन धन तृण जन = हीं सर्व आम्हांला सारखींच फुकट.
किंवा (२) तन=देह धन, जन हीं तृणासारखींच (संपादक)

शब्द—**प्रमाण** = प्रमाणभूत असणारी गोष्ट, साक्ष. जड = संकट.

शेरा—प्रौढपणाचा, देवावांचून दुसरें काहीं नाहीं.

२१८.

करोत तपादि साधनें । कोणी साधोत गोरांजनें ॥ १ ॥
आम्ही नवजों तया वाटा । नाचूं पंढरी चोहटां ॥ २ ॥
पावोत आत्मास्थिति । कोणी म्हणोत उत्तम मुक्ति ॥ ३ ॥
तुका म्हणे छंद । आम्हां हरिच्या दासां निंद्य ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ कोणी उत्तम म्हणोत मुक्ति.

अर्थ—कोणी मोक्षप्राप्तीकारतां जपतपादि साधनें करितात, करोत; कोणी देह जाळून घेतात, गोराजंन करितात, करोत; आम्हांला त्या वाटेनें जावयाचें नाहीं. आम्हीं पंढरीच्या चव्हाट्यावर नाचणार. कोणी आत्मस्थितीला पोंचण्याची खटपट करितात, पोंचलों म्हणतात, पोचूं दे त्यांना. कोणी मुक्ति उत्तम

म्हणतात, म्हणोत. आम्हीं हरीचे दास. आमच्या दृष्टीनें, त्यांचा हा सगळा छंद निर्वंच.

शब्द—गोराजंन = देह जाळून घेण्याचें साधन. वा. ब. प. **चोहटा** = चार वाटा ज्या ठिकाणीं मिळतात तो; चव्हाटा. = **छंद** = वेडसर चाळा; नाद.

शेरा—प्रौढपणांताल.

२१९.

देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ॥ १ ॥
ऐसा असोनि अनुभव । कासाविस होती जीव ॥ २ ॥
देवाची जतन । त्यासी बांधूं न शके अग्न ॥ ३ ॥
तुका म्हणे हरि । प्रल्हादासी यत्न करी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—देवाची कृपा असली म्हणजे सगळें जग आपल्यावर कृपा व करितें. असा अनुभव असून देखील जीव उगाच कासावीस होतात. ज्याला देवाची जपणूक असते त्याला अग्नि देखील बाधा करूं शकत नाहीं. तु. म्ह. प्रल्हादाला देवानेंच संभाळलें.

शब्द जतन = जपणूक. **यत्न** = जतन, संरक्षण.

शेरा—हरिकृपेची महति.

२२०.

भले म्हणवितां संतांचे सेवक ।
आइत्याची भीक सुखरूप ॥ १ ॥
ठसावितां बहु लागती सायास ।
चुकल्या घडे नास अल्प वर्म ॥ २ ॥
पाकसिद्धी लागे संचित आइतें ।
घडतां सोई तें तेव्हां गोड ॥ ३ ॥
तुका म्हणे वरें सांगतांचि गोष्टी ।
रणभूमि दृष्टी न पडे तों ॥ ४ ॥

पाठभेद:—म्हणवितां–भणवितां.

अर्थ:—संतांचे सेवक म्हणवितां, ठीक आहे. आयतां मिळणारी भीक तुम्हांला सुखाची वाटते. तेंहि योग्यच. पण लक्षांत असूं दे, कीं हें व्रत मनांत ठसवूं, बाणवूं, जातां फार कष्टाचें आहे. थोडकींशी जरी चूक झाली तरी नास होतो. पाकसिद्धी करावयाची असली म्हणजे सगळें साहित्य आयतें आणि स्वयंपाकहि सोईनें झाला, आपल्याला त्रास न होतां झाला, म्हणजे गोड लागतो. तु. म्हणे तुम्हांला (युद्धाच्या) गोष्टा तेवढ्या चांगल्या सांगतां येतात. जोंपर्यंत प्रत्यक्ष रणभूमीवर जाण्याची पाळी आली नाहीं तोंपर्यंतच तुम्ही शूर.

चर्चा:—च० ३ पाकासिद्धि लागे—

पाकसिद्धीला आयतें संचित लागतें. तुम्ही संतांचे सेवक म्हणवूं लागलां, ही संचिताची पाकसिद्धि झाली. संतांची गांठ पडावयालाच संचित चांगलें लागतें. तें तुमचें आयतेंच होतें त्यानें संतांची गांठ पडली. आतां त्यांची सेवा हातून झाली पाहिजे. ती नीट झाली म्हणजे साधलें.

स्वयंपाक सिद्ध होण्याला जशी आधीं सर्व साहित्याची तयारी लागते तशी संतदर्शनाला संचिताची लागते. ती आयती तुमची आहेच. संतांची गांठ पडली आहे, आतां पुढचें काम सोईनें झालें म्हणजे स्वयंपाक गोड होईल; असा अर्थ दिसतो. वा. ब. प.

शब्द—आयतें = श्रम न करतां मिळणारें. **संचित** = साहित्य.

शेरा—नाहीं.

२२१.

संतसमागम एखादिया परि ।
राहावें त्याचे द्वारीं श्वानयाती ॥ १ ॥
तेथें रामनाम होईल श्रवण ।
घडेल भोजन उच्छिष्टाचें ॥ २ ॥

कामारी वटीक सेवेचे सेवक ।
दीनपण रंक तेथें भलें ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व सुख त्या संगतीं ।
घडेल पंगतीं संतांचिया ॥ ४ ॥

पाठभेदः—च० १ द्वारीं–घरीं. च० ३ दीनपण रंक तेथें भलें–दीन तेथें रंकपण भलें.

अर्थः—संतसमागम कांहीं एकच, निराळाच आहे, अलौकिक आहे. संतांच्या दारीं कुत्र्याप्रमाणें देखील रहावें, इतकी त्या समागमाची योग्यता. त्या ठिकाणीं रामनामाचें श्रवण होईल. उच्छिष्टाचें भोजन होईल. त्या ठिकाणीं नम्रपणा हा उत्तम. कामकरीपणानें वटोक म्हणून राहणें, सेवेचे सेवक म्हणून रंकपणानें रहाणेंच, चांगलें. त्या संतांच्या संगतींत, त्यांच्या पंगतीलाच सर्व सुख घडेल,

१ **चर्चा**—च० १ एखादिया परी=अलौकिक अपूर्वाईक, विलक्षण.

किंवा, २ संत समागम एखाद्यालाच घडतो. पण ज्याला घडला असेल त्याची योग्यता इतकी कीं त्याचे घरीं कुत्र्याची जात होऊन रहावें–असाहि अर्थ हवा तर करावा. वा. ब. प.

च० ३ कामारी=कामकरी. ज्ञानेश्वरी १६–३५०.

च० ४ संतांची संगत लाभली तर सर्व सुख घडेल. वा. ब. प.

शेरा—संतमहिमा; पूर्ववयांतील !

२२२.

कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता ।
वहिणी वंधु चुलता कृष्ण माझा ॥ १ ॥
कृष्ण माझा गुरु कृष्ण माझें तारूं ।
उतरी पैलपारु भवनदीची ॥ २ ॥
कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन ।
सोईरा सज्जन कृष्ण माझा ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसांवा ।
वाटे न करावा परता जीव ॥ ४ ॥

पाठभेद--भवनदीची--भवनदी.

अर्थ--कृष्ण हेंच माझें सर्वस्व, आई, बाप, बहीण, भाऊ, चुलता, गुरु, सर्व कृष्णच. संसारसागरांतून तारून नेणारें तारूं तेंच. भवनदीच्या पार मला तेंच उतरील. मन, जन, सोयरा सज्जन, सर्व कांहीं कृष्णच. आणि शेवटीं तोच माझा विसावा. त्याच्या वेगळा जीव करूंच नये असें वाटतें.

चर्चा—व० २ भवनदीची **पैल पारू** = पलीकडील थड.

पार = कडा, थडी. (कोकणांत अशा स्त्री०-रूपानें वापरण्यांत आहे. माडगांवकर)

च० ३ कृष्ण माझें मन,...जन कोणतेंहि काम करावयाचें तें मनाला व जनाला पटेल असें करावें. मनाची नाहींतर, निदान जनाची तरी लाज धरावी असें आपण म्हणतों-त्यालाच अनुलक्षून अर्थ घ्यावा. कोणतेंहि काम करणें तें देवाला आवडेल असें केलें म्हणजे झालें. देव हेंच माझें मन, आणि जन—लोकमत हि तोच.

२२३.

कृपा करावी भगवंतें ।
ऐसा शिष्य द्यावा मातें ॥ १ ॥
माझें व्रत जो चालवी ।
त्यासि द्यावें त्वां पालवी ॥ २ ॥
व्हावा ब्रह्मज्ञानी गुंडा ।
तिहीं लोकीं ज्याचा झेंडा ॥ ३ ॥
तुका तुका हाका मारी ।
माझ्या विठोबाच्या द्वारीं ॥ ४ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--देवानें माझ्यावर कृपा करावी, आणि मला असा शिष्य द्यावा कीं जो माझें व्रत चालवील. देवा, त्याला तूं हांक मार, आणि त्याला हें असें व्रत दे. तो ब्रह्मज्ञानांत निपुण, गुंडा, असावा, आणि त्याची कीर्ति तीन्ही लोकीं

व्हावी. असा शिष्य असावा, कीं जो विठोबाच्या दारीं उभा राहून तुकारामाच्या नांवाचा जयघोष करील.

चर्चा—च० २ त्यासी द्यावें त्वां पालवी.

" पालवीं " असा पाठ शुद्ध दिसतो. त्याचप्रमाणें " द्यावें " च्या ऐवजीं " घ्यावें " असाहि पाठ असेल. वाचतांना चूक होणें संभवनीय आहे. तसा पाठ घेतला तर, पालवीं ही सप्तमी–पदरांत–" त्याला तूं पदरांत घ्यावें असा अर्थ होईल. (संपादक)

२ त्यासि पालवीं–हाक मार आणि व्रत (माझ्या शिष्यपणाचें) दे असा अर्थ घेणें जरूर. डॉ. भांडारकर.

त्याला माझे पालवीं द्यावें=तो माझ्या पदरीं द्यावा, मला शिष्य म्हणून द्यावा असा अर्थ बरा वाटतो. माडगांवकर. पटवर्धन.

शब्द—गुंडा = निपुण. **पालव** = पदर.

शेरा—पोक्तपणांतील गुरुपण आंगीं आल्यावरचा.

२२४.

जातो वाराणसी ।
निरवी गाई घोडे म्हैसी ॥ १ ॥
गेलों येतों नाहीं ऐसा ।
सत्य मानावा भरंवसा ॥ २ ॥
नका काढूं माझीं पेवें ।
तुम्ही वरळा भूस खावें ॥ ३ ॥
भिकारियाचे पाठीं ।
तुम्ही घेऊनि लागा काठी ॥ ४ ॥
सांगाल जेवाया ब्राह्मण ।
तरी कापाल माझी मान ॥ ५
वोकलिया वोका ।
म्यां खर्चिला नाहीं रुका ॥ ६ ॥

तुम्हीं खावें ताकपाणी ।
जतन करा तूप लोणी ॥ ७ ॥
नाहीं माझे मनीं ।
पोरें रांडा नागवणी ॥ ८ ॥
तुका म्हणे नष्ट ।
होतें तैसें बोले स्पष्ट ॥ ९. ॥

पाठभेद—च० जातो–जातों. च० २ मानावा–माना हा; च० ५ सांगाल–सांगा; कापाल–कापा; च० ९ नष्ट–नींट; बोले–केलें.

अर्थ—कोणी एक गृहस्थ काशीयात्रेला जातांना संसाराची निरवाविरवा करितो. पण त्याला लोभ सुटत नाहीं असा भाव मनांत धरून तुकारामांनीं अभंग लिहिला आहे.

एक गृहस्थ काशीयात्रेला निघाला, आणि जातेवेळीं, गाई घोडे म्हशी, धनधान्य यांची त्यानें निरवानिरव केली ती अशी—

मीं गेलों असें समजूं नका हो, गेलों नाहीं, परत येणार आहें. म्हणून बजावतों, धान्याचीं पेंवें भरलीं आहेत तीं उपसून काढून संपवूं नका. जरूरच लागली तर कोंडा भूस खाऊन रहा. भिकाऱ्याला कांहीं दानधर्म करून सगळें उधळून टाकाल बरें, तसें करूं नका, भिकारी दाराशीं आला तर काठी घेऊन त्याच्या पाठीं लागा. जेवावयाला ब्राह्मण सांगितलेत तर माझी मान कापलीत असें होईल. माझी शपथ आहे तुम्हांला. ओकलेल्या ओकाकरितां देखील, ओक काढून टाकावयाला देखील, मी अजून रुका खर्च केला नाहीं. ताकपाणी तेवढें खा. तूप लोणी जतन करून ठेवा. मला कांहीं बायकापोरांची नागवण करून आजच जायचें नाहीं. तु. म्ह. हा स्वभावाचा नष्ट. मनांत होतें तें खरें खरें बोलला.

चर्चा—च० १ "जातों" अशा पाठ घेतला तर–मीं काशीला जात आहें तेव्हां गाईम्हशींची निरवानिरव सांगतों तीं ऐका. "निरवीं" असाहि पाठ घ्यावयाला पाहिजे.

च० २ गेलों येतों नाहीं ऐसा—१ गेलों, येतों, हें कांहीं नाहींच. मी येथेंच आहे असा पक्का विचार मनांत ठेवा. वा० ब० प०

२ मी गेलों नाहीं कायमचा, येणार आहें अशी खात्री ठेवा. संपादक.

च० ८ नाहीं माझे मनीं।–वर मंडळींत ठरलेला अर्थ नमूद केलाच आहे. दुसराहि अर्थ लागेल तो असा—

काय करावें हो, माझ्या मनांत कांहीं या काशीयात्रेच्या यातायातींत पडावयाचें नाहीं, पण हीं बायका पोरें आहेत ना पाठीला लागलेलीं कीं आतां वृद्धापकाळीं काशीयात्रा करा; म्हणून नागवण आहे, पण करावयाचें काय, त्यांच्या समजुतींकरितां जातों. पण परत येणार आहें हो.

तु. म्ह. नष्टच तो, मनांत खरें खरें होतें तें बाहेर आलें खरें.

शब्द—**वरळा** = धान्य तीन वेळां पाखडून खालीं रहातें तें.

शेरा—तरुणपणींचा अभंग.

तुकारामांच्या वेळीं, किंबहुना आगगाडीनें प्रवास सुलभ होईपर्यंत, काशीयात्रेला जाणें संकटाचें होतें. पायवाटेचा प्रवास, चोर, वाटमारे, मुसल्मानी फौज यांची भीति, यांमुळे गेलेला माणूस परत येण्याची फार पंचाईत. म्हणून माणसें काशीयात्रेला वृद्धापकाळींच निघत व जातांना निरवा निरव करून जात.

२२५.

कास घालोनि बळकट ।
झालों कळिकाळासी नीट ।
केली पायवाट ।
भवसिंधुवरूनी ॥ १ ॥

यारे यारे लहान थोर ।
याति भलती नारी नर ।
करावा विचार ।
नलगे चिंता कोणासी ॥ २ ॥

कामीं गुंतले रिकामे ।
जपी तपी येथें जमे ।

लाविले दमामे ।
मुक्ता आणि मुमुक्षा ॥ ३ ॥
एकंदर शिका ।
पाठविला इहलोका ।
आलों म्हणे तुका ।
मी नामाचा धारक ॥ ४ ॥

पाठभेद--च० ३ मुक्ता—मुक्त.

च० ५ कामीं गुंतलें रिकामें । जपीतपी येथें जमे । लाविलें दमामें ।

अर्थ--बळकट कास घालून कळिकाळाला संमुख, तोंड देण्याला सज्ज, झालों. आणि भवसिंधुतरून जाण्याकरितां वरून नीट पायवाट केली. आतां ही वाट तयार झालेली आहे, ज्यांना पलीकडे जावयाचें असेल ते सगळे जण या. लहान, थोर, स्त्री पुरुष, उच्चनीच जातीचे, कोणी कां असानां, या. कसें जावें, कसें पार पडतां येईल, अशी शंका कोणीहि घ्यावयाला नको. सरळ वाट केलेली आहे, तेव्हां सगळे कोणी असाल ते या. रिकामे असोत गुंतलेले असोत,कामी असोत,निकामी असोत,जप करणारे असोत, तप करणारे असोत, मुक्तीची इच्छा करणारे कोणीहि असोत,ते सर्व लोक येथें जमवावयाचेच. मुक्ती, आणि मुमुक्षा हे दोन नगारे लाविले आहेत. परमेश्वरानें हा असा एकंदर शिक्का हा वट्टहुकूम आपल्या सहिशिक्यानिशीं पाठविला आहे कीं जे या वाटेनें जाणार असतील त्या सर्वांना पलीकडे न्यावें. त्याचा सेवक म्हणून मी या जगांत आलों आहें.

च० १ बळकट १ "कास"चें विशेषण वा० ब० प० किंवा २ "घालोनि" याचें क्रि. वि. संपादक.

नीट=१समोरा. सन्मुख. कळिकाळासी नीट झालों;

च० ३ कामी गुंतले "कामीं" असें सानुनासिक पद घेऊन, कामांत गुंतलेले असा अर्थ करावा.

दमामे. मुक्त=मुक्ति व मुमुक्षा हे दोन नगारे लाविले आहेत. त्या ठिकाणीं

सर्वांनीं जमावें. कांहीं जण, जपतप करणारे, मुक्त आहेतच. बाकीचे, मोक्षाची इच्छा करणारे, मुमुक्षु.

शब्द—दमामा=नगारा.

शेरा—-मोठेपणींचा. आपल्या आयुष्यांतील अवतारकार्य–भवसिंधूवरून पायवाट करणें–हें झालें असें तु. सांगतात.

२२६.

आम्ही वैकुंठवासी ।
आलों याचि कारणासी ।
बोलिले जें ऋषि ।
साच भावें वर्तायां ॥ १ ॥
झाडूं संतांचे मारग ।
आडरानीं भरलें जग ।
उच्चिष्ठाचा भाग ।
शेष उरलें तें सेवूं ॥ २ ॥
अर्थें लोपलीं पुराणें ।
नाश केला शब्दज्ञानें ।
विषयलोभीं मनें ।
साधनें बुडविलीं ॥ ३ ॥
पिटूं भक्तीचा डांगोरा ।
कळिकाळासी दरारा ।
तुका म्हणे करा ।
जयजयकार आनंदें ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ उरलें–उरला (वारकरी पाठ)

च० ३ मन–साधन अवघें बुडविलें (वारकरी पाठ.)

अर्थ--आम्हीं वैकुंठांत रहाणारे, ऋषींनीं जें पूर्वकाळीं सांगितलें कीं खऱ्या भावानें वर्तन करा, तें खरें करण्यासाठीं आलों. (२) पूर्वी ऋषी जें बोलले तें भावानें खरें होण्यासाठीं, हा मार्ग दाखविण्याकरितां, आम्हीं आलों. सगळें जग आड रानानें भरलें आहे,तें रान तोडून, संताचे मार्ग झाडून साफ करूं. त्यांनीं सेवन करून जें मागें उष्टें राहिंल त्या वेतनावर संतोषानें काम करूं. पुराणें आहेत; पण तीं अर्थाच्या बाजूनें लोपलेलीं आहेत. त्यांचें खरें ज्ञान कोणाला नाहीं. लोक शाब्दिक अर्थ घेतात, पण त्यानें 'नाश मात्र झाला आहे. लोकांचीं मनें विषयाच्या लोभाला गुंतलीं म्हणून जपतपादि इतर साधनें बुडालीं. आतां भक्ति हें एकच साधन शिल्लक उरलें आहे. त्या साधनाचा डांगोरा पिटूं. त्याची कळीकाळाला देखील भीति वाटते. तु. म्ह. आनंदानें जयजयकार करा, कीं हें साधन उपलब्ध आहे.

चर्चा--वर वारकरीपाठ नमूद केले आहेत ते पहावे.

भागशेष. सामासिक शब्द आहे का ? असेल तर पुल्लिंगीं, नपुंसकलिंगीं नव्हे. वा० ब० प०

शब्द—उच्चिष्ठ-उष्टें. शब्दज्ञान = वरवरचें ज्ञान.

शेरा—भक्तीचें माहात्म्य, भक्तीखेरीज इतर साधनें व्यर्थ.

२२७.

वळियाचे अंकित ।
आम्ही जालों बळिवंत ॥ १ ॥
लाता हाणोनि संसार ।
केला षड्‌ऊर्मींचा मार ॥ २ ॥
जन धन तन ।
केलें तृणाही समान ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां ।
आम्ही मुक्तीचिया माथां ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ हाणोनि-हाणिला. षड्‌ऊर्मींचा-षड्‌ऊर्मींमार.

अर्थ—बळिवंताचे–थोरांचे–दास आम्ही; म्हणून आम्हीहि बळवंतच झालों. त्या बळाच्या जोरावर संसाराला लाता हाणून मनाच्या ज्या सहा लाटा –उचल खाणाऱ्या भावना कामक्रोध वगैरे–यांचा मारा केला. यांना मारलें. जन, धन, आणि देह या सर्वांनाच तृणासारखें केलें. याची किंमत आम्हांला तृणासारखी वाटते. इतकेंच नव्हे तर आम्ही मोक्षापेक्षांहि श्रेष्ट आहोंत, त्याचीहि मातबरी आम्हांला वाटत नाहीं.

चर्चा—च० २ षड्ऊर्मि–ऊर्मि=लाट. मन हें समुद्रासारखें आहे. मूळचें शांत, गंभीर; पण शांत गंभीर अशा समुद्रावर ज्याप्रमाणें वाऱ्यामुळें लाटा उठतात व खळबळ करून सोडतात, त्याप्रमाणें विषयांच्या संगतीनें मनाची खळबळ होते व कामक्रोध इत्यादि मनोविकार उत्पन्न होतात. षड्ऊर्मि=सहा शत्रु–कामक्रोध हेच. त्यांना मारलें.

च० ३ नाहीं आणिक प्रमाण, तन धन तृण जन अ. २१७ पहावा.

च० ४ आम्ही आतां मोक्षाच्याहि डोक्यावर आहोंत त्यापेक्षांहि श्रेष्ठ आहोंत. त्याची आम्हांला मातबरी वाटत नाहीं.

शब्द—**षड्ऊर्मि** = मन खळबळून सोडणारे सहा मनोविकार.

शेरा—अनुभवप्राप्तीनंतरचा.

२२८.

मृत्युलोकीं आम्हां आवडती परी ।
नाहीं एका हरिनामेंविण ॥ १ ॥
विटलें हें चित्त प्रपंचापासूनी ।
वमन हें मनीं बैसलेंसे ॥ २ ॥
सोनें रुपें आम्हां मृत्तिकेसमान ।
माणिकें पाषाण खडे तैसे ॥ ३ ॥
तुका म्हणे तैशा दिसतील नारी ।
रिसाचियापरी आम्हांपुढें ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ बैसलेंसें मनीं रामनाम. च० ३ तैसे–जैसे.

अर्थ--या मृत्युलोकांत आम्हांला हरिनामाखेरीज दुसरे प्रकार आवडत नाहींत. प्रपंचापासून मन विटलें प्रपंच म्हणजे ओकच असें मनानें घेतलें व त्याची शिसारी वसली. सोनें, रूपें हीं आतां आम्हांला मातीसारखीं वाटतात. ४ त्याचप्रमाणें आमच्या दृष्टीला वायका अस्वलांप्रमाणें दिसतील. त्यांचा मोह आम्हांला पडणार नाहीं.

शब्द—**परी** = प्रकार. **वमन** = ओकारी. **रिस** = अस्वल.

शेरा--सांसारिक वस्तूंचा तिटकारा वर्णिलेला आहे.

२२९.

भक्तिप्रतिपाळे दीन वो वत्सले ।
विठ्ठले कृपाळे होसी माये ॥ १ ॥
पडिला विसर माझा कायगुणें ।
कपाळ हें उणें काय करूं ॥ २ ॥
तुका म्हणे माझें जाळूनि संचित ।
करीं वो उचित भेट देईं ॥ ३ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—परमेश्वराला प्रेमळ आईची उपमा देऊन तुकाराम म्हणतात—हे भक्तप्रतिपाळे, दीनवत्सले, विठ्ठले, आई, तूं स्वभावतःच कृपाळू आहेस. तुला माझा विसर कां पडला मग ? माझ्या गुणानेंच तसें झालें काय ! किंवा माझें नशीबच कमी ? कपाळच फुटकें, काय करूं ! तु. म्ह. देवा माझें संचित (पाप) असेल तें जाळून टाका आणि जें योग्य असेल तें करा, मला भेट द्या.

चर्चा--२ दोन चरणार्धें एकमेकांना पूरक आहेत. माझ्या गुणामुळेंच माझा विसर पडला काय ! (प्रथमार्ध) किंवा माझें नशींबच फुटकें असेल, त्याला मी काय करूं ! उत्तरार्ध.

शब्द—**वत्सल** = मायाळु; वत्साच्या किंवा मुलाच्या ठिकाणीं लोभ असणारी• **संचित** = जें या जन्मांत भोगावयाला होतें तें.

शेरा--नाहीं.

२३०.

तुजविण मज कोण वो सोयरें ।
आणीक दुसरें पांडुरंगे ॥ १ ॥
लागलीसे आस पाहें तुझी वास ।
रात्री वो दिवस लेखीं वोटीं ॥ २ ॥
काम गोड मज न लगे हा धंदा ।
तुका म्हणे सदा हेंचि ध्यान ॥ ३ ॥

पाठभेद—च० २ पाहे, लेखी, असे निरनुनासिक पाठ जोगांच्या गाथेंत आहेत.

अर्थ—हे आई पांडुरंगे, तुझ्याविण मला दुसरें सोयरें असें कोण आहे ? तुला भेटण्याची मला उत्कंठा लागली आहे. मी तुझी वाट पहात आहें. रात्रंदिवस एकामागून एक जातात ते बोटांनीं मोजीत बसलों आहें. मला काम गोड लागत नाहीं, धंदा सुचत नाहीं. नेहमीं तुझेंच ध्यान लागलें आहे.

माडगावकर

चर्चा—च० १ व. २ सर्व अभंगांत तुकाराम स्वतः संबंधानेंच बोलत आहेत, तेव्हां दुसऱ्या चरणांतहि तसेंच असलें पाहिजे असें वाटतें. तसें असेल तर जोगांचा पाठ त्या अर्थाशीं विसंगत आहे. जो० पाठाप्रमाणेंच अर्थ करावयाचा असेल तर आस हा कर्ता करून मला तुझी आशा-उत्कंठा लागली; ती आशा तुझी वाट पहाते आणि रात्र आणि दिवस बोटांनीं मोजते असा अर्थ होईल. आस हा अमूर्त कर्ता करून आडरानांत तु. मुद्दाम शिरला असेल असें वाटत नाहीं. तेव्हां " पाहें तुझी वास " किंवा " पाहातसें वास " किंवा " पाहों तुझी वास " असा एखादा पाठ असावा असें वाटतें.

शब्द--**वास** = वाट. **लेखीं** = मोजतों.

शेरा—हा व वरील अभंग हे दोन्ही एकाच प्रसंगानें रचिलेले दिसतात. दोन्हींतही देवाला आईच्या ठिकाणीं कल्पून तुकारामानें लडीवाळपणानें आळविलें आहे.

२३१.

पढियंते आम्ही तुजपाशीं मागावें ।
जीवीचें सांगावें हितगुज ॥ १ ॥
पाळशील लळे दीन वो वत्सले ।
विठ्ठले कृपाळे जननिये ॥ २ ॥
जीव भाव तुझ्या ठेवियेला पायीं ।
तूंचि सर्वांठायीं एक आम्हां ॥ ३ ॥
दुजियाचा संग लागों नेदीं वारा ।
नाहीं जात घरा आणिकांच्या ॥ ४ ॥
सर्व सत्ता एकी आहे तुजपाशीं ।
ठावें आहे देसी मागेन तें ॥ ५ ॥
म्हणउनि पुढें मांडियेली आळी ।
थिंकोनियां चोळी डोळे तुका ॥ ६ ॥

पाठभेद--च० १ पढियंते–पढीयंतें; तुजपाशीं–जयापें; च० २ जननिये होसी माये.

अर्थ--देवा आम्ही तुझे पढविलेले; आवडते, लाडके. आम्हांला जें आवडतें तें आम्हीं तुझ्यापाशीं मागावें. जीवाचें जें हितगुज असेल तें तुला सांगावें. तूंच आमचे लळे पुरविशील. तूं दीनवत्सल आहेस. आमचा जीव-भाव सर्व तुझ्यापायीं वाहिलेला आहे. आम्हांला सर्व ठिकाणीं तूंच आहेस असें वाटतें. आम्हीं आपल्याला दुसऱ्याचा संग मुळींच लागूं देत नाहीं. दुसऱ्याचा वारा देखील आम्हांला नको. आम्हीं दुसऱ्या कोणाच्याही घरीं जात नाहीं, त्यांचे उंबरठे झिजवीत नाहीं. सर्व सत्ता एका ठिकाणीं तुझ्यापाशीं आहे. आणि मी मागेन तें देशील हें मला ठाऊक आहे. म्हणून माझें काय भांडण आहे, मागणें आहे तें तुझ्यापुढें ठेवलें आहे. आणि तुझ्यापुढें स्फुंदून रडगाणें गाऊन मी डोळे चोळतों.

चर्चा— च० १ पढियंते–ज्याप्रमाणें एकादा पढविलेलेला पक्षी, पोपट असतो त्याप्रमाणें आम्ही आहोंत.

च. ३ तूंचि सर्वांठायीं एक आम्हां–आम्हांला सर्वंत्र, सर्व नात्यागोत्यांच्या ठिकाणीं तूंच आहेस. आईबाप, मित्र, सखा सोयरा, धनी, सर्व तूंच.

च० ५ सर्व सत्ता पाशीं ? तुझ्यापाशीं सर्व सत्ता आहे. तूं सर्व कांहीं करण्याला देण्याला समर्थ आहेस.

किंवा, २ आमची सर्व सत्ता एकट्या तुझ्यापाशीं आहे. तुझ्याकडे मागण्याचा आमचा हक्कच आहे, व मागूं तें तूं देशील हें आम्हांला माहित आहे.

च० ६ आळी = आळ, मागणें, भांडण.

थिंकोनिया = ठिणकोनियां, सारखी पिरपीर लावून, ठिणकून,

शब्द—पढियंते = पढविलेलें, आवडते. आळी = भांडण, तक्रार, मागणें. थिंकोनिया = स्फुंदून.

शेरा—नाहीं.

२३२.

कोण पर्वकाळ पहासील तीथ ।
होतें माझें चित्त कासावीस ॥ १ ॥
पाठवीं भातुकें प्रेमें झडकरी ।
नको राखों उरी पांडुरंगा ॥ २ ॥
न धरावा कोप मजवरी कांहीं ।
अवगुणी अन्यायी म्हणोनियां ॥ ३ ॥
काय रडवीसी नेणतियां पोरां ।
जाणतियां थोरां याचिपरी ॥ ४ ॥
काय उभी कर ठेवूनियां कटीं ।
बुझावीं धाकुटीं लडिवाळें ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां पदरासी पिळा ।
घालीन निराळा नव्हें मग ॥ ६ ॥

पाठभेद—च० १तीथ–थीत; प्रेमें–प्रेरीं. नको–नका.

अर्थ–पांडुरंगा, कोणती तीर्थ, कोणता पर्वकाळ पहाशील, पहात आहेस ? इकडे माझा जीव कासावीस होत आहे. झटून प्रेमपूर्वक मला भातुकें पाठीव. बाकी ठेवूं नको. मी अवगुणी, अन्यायी, म्हणून माझ्यावर रागावूं नको. जाणते थोर असोत, किंवा माझ्यासारखे नेणते लहान असोत, त्या दोघांनांहि तूं असाच रडवितोस का ? आई आपल्या मुलांची समजूत करते ती काय अशांच कमरेवर हात ठेवून स्वस्थ राहून करते काय ? देवा, मी आतां तुमच्या पदराला पीळ घालीन, पदर घट्ट धरून ठेवीन. आणि मन कांहीं केलें तरी निराळा होणार नाहीं. दूर होणार नाहीं.

चर्चा––च० ४ थोरांचिया–थोरांप्रमाणें, थोर मुलांना रडवावें त्याच प्रकारानें लहानांहि रडवावें हें, देवा, आपल्याला वरें वाटतें काय ? थोर मुलें रडलीं तरी आईला त्याचें फारसें वाटत नाहीं. म्हणून लहान मुलांनादेखील तिनें तसेंच करावें कीं काय ?

च० ५ उभी–उभाउभीं नुसतें कमरेवर हात ठेवून देवा तुम्हीं (पक्षीं आई) उभे राहिलांत तर त्यानें आमची (मुलांची) समजूत होणार आहे कीं काय ? (भांडारकर.)

कटिं कर ठेवुनियां उभी (मूर्ति) काय लडिवाळें बाळें समजावी, समजावूं शकेल ? वा. ब. प.

शब्द—**पर्वकाळ** = योग्य वेळ; ठरलेली वेळ; संधी. **बुझणें** = समजणें, समजूत पडणें, बुध्यते. **उभा** = उभाउभीं. **भातुकें** = खाऊ.

शेरा—नाहीं.

२३३.

कां हो देवा कांहीं न बोलाचि गोष्टी ।
कां मज हिंपुटी करीतसां ॥ १ ॥
कंठीं प्राण पाहें वचनाची आस ।
तों दिसे उदास धरिलें ऐसें ॥ २ ॥

येणें काळें बुंथी घेतलीसे खोळ ।
कां नये विटाळ होऊं माझा ॥ ३ ॥
लाज वाटे मज म्हणवितां देवाचा ।
न पुससी फुकाचा तुका म्हणे ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ ऐसें–तुम्हीं; च० ३ काळें–काळ; खोळ–खोल.

अर्थ—देवा, माझ्याशीं भाषण कां करीत नाहीं ? मला असा हिरमुसला कां करतां ? माझे प्राण अगदीं कंठांत आले. केवळ तुमचें भाषण ऐकावें या आशेनें मी जगलों आहें. आणि इकडे तुम्हीं तर अगदीं औदासीन्य धरलेलें दिसतें. देवा, तुम्ही या वेळीं तोंड झांकून जाईल अशा प्रकारचा खोल बुरखा घेतला आहे, तो काय माझा अगदीं विटाळ होऊं नये म्हणून घेतला आहे कीं काय ? मला आतां देवाचा सेवक म्हणवून घेण्याची देखील लाज वाटते; कारण तूं मला फुकाचा विचारीतहि नाहींस.

शब्द—**हिंपुटी** = हिरमुसला. **उदास धरिलें. उदास** = औदासीन्य, अबोला. **खोल बुंथी** = बुरखा. **येणें काळें** = या वेळीं.

शेरा—सलगीचा. प्रौढपणींचा अमंग.

२३४.

उचित तें काय जाणावें दुबळें ।
थोरिवेचें काळें तोंड देवा ॥ १ ॥
देतों हांका कोणी नायकती द्वारीं ।
ओस कोणी घरीं नाहीं ऐसें ॥ २ ॥
आलिया अतीता शब्द समाधान ।
करितां वचन काय वेंचे ॥ ३ ॥
तुका म्हणे तुम्हां साजे हें श्रीहरी ॥
आम्हीं निलाजरीं नव्हों ऐसीं ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ नव्हों–नाहीं.

अर्थ—देवा, आम्हीं दुबळे तेव्हां उचित काय आणि अनुचित काय, योग्य कोणतें आणि अयोग्य कोणतें, हें आम्हांला काय कळतें ? तरी पण

आम्हीं एवढें सांगूं कीं थोरपणा हा खोटा, त्याचें तोंड काळें. देवा, तुम्ही थोर, तुम्हांला तरी उचित अनुचित हीं कळावींत. पण थोरींव जाल्याच खोटी, त्याला तुम्हीं काय करणार ? मी किती वेळ तुमच्या दारीं हाका मारीत आहें. पण कोणी ऐकतच नाहीं. जणूं काय, घरांत कोणी नाहीं आणि सगळें घर ओसाड पडलें आहे. दारीं आलेल्या अतिथाचें गोड शब्द बोलून समाधान केलें तर तुमचें त्यांत काय वेचतें ? दानधर्म करावयाचा एकीकडेच राहिला. पण नुसतें ओ, देऊन, गोड शब्द बोलून समाधान देखील तुम्ही करीत नाहीं. तु. म्ह. देवा, श्रीहरी, हें असें करणें तुमचें तुम्हालाच शोभतें तुम्हीं लाज सोडिली आहे आम्हांला मात्र लाज सुटत नाहीं. (तुमचे दास म्हणवून घेण्याची आतां आम्हांला लाज वाटते.)

चर्चा—च० १ थोरींवेचें...देवा. आमच्या आंगीं थोरींवेचें तोंड काळें झालें आहे; आमच्या आंगीं थोरपणा नाहीं.

२ या उत्तरार्धांत देवाच्या थोरपगाचें उपरोधिक वर्णन आहे. आम्हीं दुबळे, तुमच्या दरवाज्यांत येऊन हांका मारितों. पण तुम्हीं 'ओ' हि देत नाहीं. हें उचित किंवा अनुचित, काय म्हणावें ? पण आम्हीं दुबळे आम्हांला त्यांत कांहीं समजत नाहीं. तरीपण एवढें मात्र आम्हांला कळलें कीं थोरपणा जाल्याच खोटा आहे. आणि याचें प्रत्यंतर तुमच्या वागणुकींतच दिसतें. तें कसें हें पुढील चरणांत सांगितलें आहे.

शब्द—नाहींत.

शेरा—विशेष सलगीचा उपरोध. प्रौढपणांतील अभंग.

२३५.

आह्मी मागों ऐसें नाहीं तुजपाशीं ।
जरी तूं भीतोसी पांडुरंगा ॥ १ ॥
पाहें विचारूनि आहे तुज ठावें ।
आह्मी घालों नांवें तुझ्या एक ॥ २ ॥

ऋधिसिद्धि तुझें मुख्य भांडवल ।
हें तों आम्हां फोल भक्तीपुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे जाऊं वैकुंठा चालत ।
वैसोनि निवांत सुख भोगूं ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ मुख्य–मोक्ष, च० ४ निवांत–निश्चित.

अर्थ—देवा, जर तूं भीत असशील कीं, याला हांक दिली तर हा कांहीं तरी भलतेंच मागेल मग तें द्यावें तरी पंचाईत न द्यावें तरी पंचाईत, तर मी आतांच सांगतों आम्हांला मागावेसें वाटेल असें तुझ्यापाशीं कांहीं नाहींच. देवा, मनांत विचार करून पहा, तुम्हांला ठाऊक आहे आम्हांला काय पाहिजे तें. तुमच्या एका नावानेंच आमचें समाधान झालें. येऊन जाऊन तुमचें भांडवल काय, ऋद्धिसिद्धि. तें आह्मी मागूं व मग काय करावें अशी तुम्हांला भीति वाटते. पण ती वाटण्याचें कारण नाहीं. भक्तीपुढें ऋद्धिसिद्धी आम्हांला फोल आहेत. त्या आम्हांला नकोत. तु. म्ह. आम्ही वैकुंठाला चालत जाऊं. आणि त्या ठिकाणीं निश्चित बसून सुख भोगूं.

चर्चा—च० १ आम्हीं कांहीं मागितलें आणि तेंच द्यावयाला तुजपाशीं नसलें तर–अशी जर तुला भीति असेल तर ती व्यर्थ आहे. डॉ. भांडारकर.

(२) किंवा, तिसऱ्या चरणाच्या अनुरोधानें अर्थ लाविल्यास देवा, आम्हीं कांहीं मागूं आणि मग काय करावें अशी जर तुला भीति असेल तर, देवा, आम्हाला ज्याचा लोभ सुटेल असें तुमच्या पाशीं कांहीं नाहींच. वा. ब. प.

शब्द—धालों—धाणें = समाधान पावणें; संतुष्ट होणें.

शेरा—नाहीं.

२३६.

न लगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान ।
गोजिरें सगुण रूप पुरे ॥ १ ॥
लागला उशीर पतितपावना ।
विसरोनि वचना गेलासि या ॥ २ ॥

जाळोनि संसार वैसलों अंगणीं ।
तुझे नाहीं मनीं मानसींही ॥ ३ ॥
तुका म्हणे नको रागेजूं विठ्ठला ।
उठीं देईं मला भेटीं आतां ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—तुझें ब्रह्मज्ञान मला नको, गोजिरें सगुण असें रूपच मला पुरे, या माझ्या म्हणण्याचा विसर पडला म्हणून, हे पतितपावना, तुला उशीर लागला काय ? देवा, संसार जाळून टाकून तुमच्या आंगणांत येऊन बसलों. पण तें तुझ्या ध्यानीं मनीं देखील नाहीं असें दिसतें. तु. म्ह. विठ्ठला मजवर रागावूं नको. ऊठ आणि मला भेट दे. मं. ठ.

चर्चा—च० १ हें भक्ताचें म्हणणें.

शेरा—सलगीचा.

अभंग २३३, २३४, २३५, २३६ हे चार अभंग एकाच प्रसंगीं रचिलेले दिसतात. तुकारामांना देवाच्या भेटीची उत्कंठा लागलेली आहे पण देवाचें दर्शन मात्र होत नाहीं, अशा प्रसंगाच्या अनुरोधानें देव माझ्यावर रागावले असतील काय ? मी इतका हीन आहें काय कीं देवानें माझें दर्शन देखील घेऊं नये ? (२३३) किंवा देव जर थोर म्हणावा तर गरीब माणूस दरवाजांत आला असतांना थोरानें दारहि उघडूं नये, फुकाचा गोड शब्द देखील बोलूं नये ? (२३४) भेट दिली तर भक्त माझ्यापाशीं कांहीं भलतेंच मागतील कीं काय असें वाटून का आम्हाला देव भेटत नाहीं? असें असेल तर आम्ही मागण्याजोगें आणि त्याला न देतां येण्याजोगें असें देवापाशीं कांहीं नाहींच. आम्ही कांहीं ऋद्धि सिद्धि मागत नाहीं (२३५) किंवा ब्रह्मज्ञान मागत नाहीं (२३६) मग देवानें आम्हाला भेट कां देऊं नये ?

२३७.

कमोदिनी काय जाणे तो परिमळ ।
भ्रमर सकळ भोगीतसे ॥ १ ॥
तैसें तुज ठावें नाहीं तुझें नाम ।
आम्हींच तें प्रेमसुख जाणों ॥ २ ॥
माते तृण वाळा दुग्धाची ते गोडी ।
ज्याची नये जोडी त्यासी कामा ॥ ३ ॥
तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटीं ।
नाहीं त्याची भेटी भोग तिये ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ कमोदिनी-कुमुदिनी.

अर्थ—कमळिणीच्या कमळाचा सुगंध तिला स्वतःला काय ठाऊक? भ्रमराला मात्र त्याची गोडी कळते. त्याचप्रमाणें देवा तुझी गोष्ट आहे. तुझ्या नांवाची थोरवी तुला कळत नाहीं. तें प्रेमसुख आम्हांला मात्र कळतें. दुधाची गोडी आईला कळत नाहीं. गवत खावें मातेनें, आणि दुधाची गोडी वासराला. ज्याची जोड असेल त्याला तो कामाला येत नाहीं. तु. म्ह. शिंपेंत मुक्ताफळ जन्माला येतें. पण त्याची भेट किंवा त्याचें सुख शिंपेला नाहीं.

चर्चा—च० ३ ज्याची नये जोडी त्यासी कामा. ज्यानें एकाद्या गोष्टीची जोडणी केली असेल त्याला तो गोष्ट उपयोगीं पडत नाहीं. जोडावें एकानें व भोगावें दुसऱ्यानेंच असा जगाचा क्रम आहे.

शब्द—**कमोदिनी** = चंद्रकमळाचें झाड.
शेरा—**नाममहिमा**—प्रौढपणींचा.

२३८.

काय सागा तुझ्या चरणांच्या सुखा ।
अनुभव ठाऊका नाहीं तुज ॥ १ ॥
कैसें वाटे खरेपण ।
अमृताचे गुण अमृतासी ॥ २ ॥

आम्ही एकएका ग्वाही मायपुतें ।
जाणों तें निरुतें सुख दोघें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां मोक्षाचा कंटाळा ।
कां तुम्ही गोपाळा नेणां ऐसें ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ चरणांच्या–चरणींच्या.

अर्थ—देवा, तुझ्या चरणांचें सुख काय सांगूं ? तुला त्या सुखाचा अनुभव ठाऊक नाहीं, तेव्हां मीं नुसतें वर्णन केलें तरी तुला काय कळणार ? तुला तें सुख कसें असतें हें कळावयाचें नाहीं असें म्हणणें देखील तुला खरें वाटणार नाहीं. अमृताचे गुण अमृताला काय ठाऊक ? आम्ही–तुझे चरण व मी–हीं दोघें मायलेंकरासारखीं आहोंत. देवा तुम्हांला आपल्या चरणांचें महत्त्व फारसें वाटत नसेल. पण त्यांच्या सांनिध्याचें सुख आम्हांलाच कळतें. तें तुम्हांला कळणार नाहीं. आम्हीं एकमेकांना साक्ष आहोंत. चरणांचें सुख काय तें मला माहीत. व माझ्या सांनिध्याचें सुख काय तें त्या चरंणांना माहीत. या सुखापुढें आह्मांला मोक्षहि नको हें तुम्हांला कसें कळत नाहीं ?

चर्चा—च. ३ "आम्ही" कोण ? "मी" आणि "चरण." देव वेगळा आणि त्याचे चरण वेगळे अशी भावना करून तुकाराम देवाला म्हणतात –मला चरणांच्या सान्निध्याचें सुख काय वाटतें किंवा चरणांना मी जवळ असण्यांत काय वाटतें हें इतरांना कळावयाचें नाहीं. देवा, तुम्हांला देखील कळावयाचें नाहीं. आम्हीं दोघें मायलेकांसारखीं आहोंत. एकमेकांना ग्वाही. एकमेकांना साक्ष.

शब्द—ग्वाही = साक्ष.

शेरा—नाहीं.

२३९.

देखोनियां तुझ्या रूपाचा आकार ।
उभा कटीं कर ठेवूनियां ॥ १ ॥
तेणें माझ्या चित्ता होतें समाधान ।
वाटतें चरण न सोडावे ॥ २ ॥

मुखें गातों गीत वाजवितों टाळी ।
नाचतों राऊळीं प्रेमसुखें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज तुझ्या नामापुढें ।
तुच्छ हें वापुडें सकळही ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—कमरेवर हात ठेवून उभा राहिला आहेस असें जें तुझें रूप तें पाहून, देवा, माझ्या मनाला समाधान होतें. व असें वाटतें कीं तुझे पाय सोडूं नयेत. तोंडानें मी तुझें गीत गातों, टाळ्या वाजवितों, आणि तुझ्या प्रेमाच्या सुखानें सुखी होऊन देउळांत नाचतों. तु. म्ह., देवा, तुमच्या नांवापुढें मला हें सगळें जग देखील तुच्छ आहे.

शब्द—**राऊळ**-देऊळ; राजगृह. राजाचें आलय? हें= हें दृश्य जग, सृष्टि.

शेरा—नाममाहिमा; प्रौढपणींचा.

२४०.

आतां येणेविणें नाहीं आम्हां चाड ।
कोण बडबड करी वांयां ॥ १ ॥
सुख तेंचि दुःख पुण्य पाप खरें ।
हें तों आम्हां वरें कळों आलें ॥ २ ॥
तुका म्हणे वाचा वाहिली अनंता ।
बोलायाचें आतां काम नाहीं ॥ ३ ॥

पाठभेद—च० ३ वाहिली–वाईली.

अर्थ—आतां याची आम्हांला पर्वा नाही. प्रपंचांत दादा बाबा करण्याची, किंवा ब्रह्मज्ञान सांगण्याची, चाड नाहीं. किंवा, हें (वरील अभंगांत सांगितलेलें जें बाह्य जग, पसारा, त्याची) त्याची आम्हांला चाड नाहीं. सुख आणि दुःख हीं एकच; पाप तेंच पुण्य आणि पुण्य तेंच पाप. हें आम्हांला कळून चुकलें. तु.म्ह. आतां वाचा अनंताला वाहिली.तिचा दुसरा उपयोग करावयाचा

नाहीं. इतर गोष्टींची चर्चा करण्याचें, इतर कांहीं वायफळ बोलावयाचें, काम राहिलें नाहीं.

चर्चा—२३९।२४० हे अभंग एकत्र वाचिले म्हणजे पहिल्या चरणांतील " येणें विण " या पदाचा अर्थ बरा लागतो. येणें विण = हें जें बाह्य जग, त्या शिवाय.

किंवा, आतां बोलायाचें काम नाहीं. या चरणाशीं संदर्भ घेऊन, देवाला वाचा वाहिली, तेव्हां इतर गोष्टींची—खरें काय, खोटें काय, याची व्यर्थ चर्चा करण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं असा अर्थ करावा.

शेरा—२३७ ते २४०. हे चार अभंग पूर्वीच्याच चार अभंगांच्या संदर्भानें व त्याच विषयाला धरून लावतां येतात. पूर्वीच्या चार अभंगांत देवाच्या भेटीविषयींची तळमळ सांगितली आहे, तर उलटपक्षीं देवाचें दर्शन झालें, त्याच्या चरणाचा लाभ झाला, म्हणजे त्यापासून होणाऱ्या सुखाचें रसभरित वर्णन या चार अभंगांत केलेलें आहे. देवाच्या चरणांची गोडी त्यास काय माहीत ? ती आम्हांलाच कळायची (२३७, २३८) त्यांचा एकदां लाभ झाला. आतां आम्हाला त्याशिवाय दुसरें कांहीं नको. (२३९,२४०.)

२४१.

बोलों अबोलणें मरोनियां जिणें ।
असोनि नसणें जनीं आम्हां ॥ १ ॥
भोगीं त्याग झाला संगींच असंग ।
तोडियेले लाग माग दोन्ही ॥ २ ॥
तुका म्हणे नव्हे दिसतों मीं तैसा ।
पुसणें तें पुसा पांडुरंगा ॥ ३ ॥

पाठभेद—च० १ जनीं–जनि. जनि = जन्म. जनीं हाच पाठ बरा. च० ३ पांडुरंगा विठोबासी. [भांडारकर

अर्थ—अबोलणें बोलतों, आमचें मौनच फार बोलकें आहे. मरूनही आम्ही जगतों. आम्हीं जगांत असूनहि नसल्यासारखेंच वागतों. भोग

भोगीत असतानांच आम्हांला त्यांचा त्याग घडलेला आहे. संग घडत असतानांच असंग होतो. आम्हीं जगाचे लागमाग, लागे बांधे, सर्व तोडिले. तु. म्ह. लोकांना सांगतात, बाबांनो मी जसा दिसतों तसा खरोखर नाहीं. खरा कसा आहें तें कांहीं मी सांगत नाहीं.तें मात्र देवाला, पांडुरंगाला, विचारा.

चर्चा—च० १ बोलों अबोलणें...

सगळ्या अभंगांत एका क्रियेच्या उलट दुसरी क्रिया असा विरोधाभास आहे. म्हणून बोलत असूनहि आमचें अबोलणें असतें, न बोलण्यासारखेंच असतें, आमच्या बोलण्यांत अहंकार नसतो–असा अर्थ घ्यावा.

किंवा अबोलणें हेंच बोलतों, मुकेपण हेंच आमचें बोलणें, आमच्या मुकेपणानेंच हजारों व्याख्यानांचें काम होतें, आमचें मौनच विलक्षण बोलकें असतें–असा अर्थ घ्यावा. वा. ब. प.

किंवा, ज्याचें विवरण यथार्थ करतां येत नाहीं तें आम्ही बोलतों,जें स्पष्टपणें बोलतां येत नाहीं तें आम्ही बोलतों. माडगांवकर

च० २ लागही तोडले. लागेबांधे तोडून टाकले. आम्हांला प्रापंचिक नात्यानें धुंडाळण्याचे मार्गहि तोडले. वा. ब. प.

शब्द—**अबोलणें** = न बोलणें. **लाग** = संबंध; लागाबांधा. **माग** = संबंध; लागाबांधा.

शेरा—नाहीं.

२४२.

अधिकार तैसा दाविंयेला मार्ग ।

चालतां हें मग कळों येतें ॥ १ ॥
जालूं नये नाव पावलेनि पार ।
मार्गील आधार बहुतांचा ॥ २ ॥
तुका म्हणे रोग वैद्याचे अंगीं ।
नाहीं करी जगीं उपकार ॥ ३ ॥

पाठभेद—च० १ तैसा दाविंयेला–तैसे दाविंयेला. च० ३ वैद्याचे–वैदाचे.

अर्थ—ज्याचा जसा अधिकार तसा त्याला मार्ग दाखविला आहे. मार्गानें चालावयाला लागलें म्हणजे ज्याचें त्याला मी काय म्हणतों त्याचें रहस्य कळेल. तेव्हां प्रत्येकाचा आपल्या परी जो मार्ग आहे तो त्यानें आपल्या-पाशींच ठेवूं नये; आपलें काम होतांच नाहींसा करूं नये. पैलतीराला पोचतांच नाव जाळून टाकूं नये. कारण, मागून येणारांना आधार असतो. तु. म्ह. एखादा रोग वैद्याचे अंगीं नसला तरी देखील वैद्य तो रोग बरी करण्याची आपली विद्या नाहींशी करून टाकीत नाहीं. जगावर उपकार करतो.

शेरा—प्रौढपणींचा. प्रत्येकानें आपल्या मार्गाचा उपदेश करावा.

न बुद्धिभेदं जनयेत्...या भगवद्गीता वाक्याला अनुलक्षून अभंग आहे असें वाटतें. आपापले मार्ग चालून गेलों म्हणजे आपल्या अधिकाराप्रमाणें ते योग्यच होते हें कळून येतें, आपला अधिकार वाढला आणि आपण पुढल्या अधिकारावर गेलें कीं मागचा मार्ग निरुपयोगी समजूं नये. नावेनें पैलतीरीं गेलों म्हणजे नांव जाळावी असें नाहीं. वा. ब. प.

२४३.

संवसार तीहीं केला पाठमोरा ।
नाहीं द्रव्य दारा जयां चित्तीं ॥ १ ॥
शुभाशुभ नाहीं हर्षामर्ष अंगीं ।
जनार्दन जगीं होऊनि ठेला ॥ २ ॥
तुका म्हणे देह दिला एकसरें ।
जयासि दुसरें नाहीं मग ॥ ३ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—ज्यांच्या चित्तीं धन आणि दारा यांचा लोभ नाहीं त्यांनीं संसार पाठमोरा करून, पाठीशीं घालून, परमार्थाकडे धांव मारिली. त्यांना शुभाशुभ कांहीं नाहीं. हर्षविषाद नाहींत. असा जो पुरुष असेल त्याला, त्याच्या दृष्टीनें जगांत सर्वत्र जनार्दनच भरून राहिला आहे. तु. म्ह. एकदां देह एकदमच

देऊन टाकिला, ज्याची देहावरील ममता उडाली, त्याला जगांत जनार्दनाशिवाय दुसरें कांहींच उरत नाहीं.

चर्चा--च० ३ एकदां, एकसरें एकदमच देहबुद्धि नष्ट केली--असा किंवा, घुढें त्याला जनार्दनाशिवाय दुसरें कांहीं उरलेंच नाहीं, असा अर्थ दिसतो.

वा. ब. प.

घुढील अभंगाचा पहिला चरण वाचिला म्हणजे या दोन अभंगांत परस्परांना विरोधी अशा वृत्तींचें वर्णन केलें आहे असें वाटतें. व त्यावरून या अभंगांतील तिसऱ्या चरणाचा खुलासा होतो. वा. ब. प.

शब्द-एकसरें = एकदम.

शेरा--प्रौढपणींचा; अनुभवानंतरचा.

२४४.

देहबुद्धि वसे लोभ जयां चित्तीं।
आपुलें जाणती परावें जे ॥ १ ॥
तयांसि चालतां पाहिजे सिदोरी।
दुःख पावे करी असत्य तो ॥ २ ॥
तुका म्हणे धर्म रक्षायाकारणें।
छाया इच्छी उन्हें तापला तो ॥ ३ ॥

पाठभेद—च० ३ धर्म रक्षाया कारणें--धर्म रक्षा या कारणें.

अर्थ—ज्यांना अजून चित्तामध्यें लोभ आहे, देहबुद्धि आहे, जे आपलें, परावें, हें आपलें हें परक्याचें हा भेद मानतात त्यांची अजून मुक्ति झाली नाहीं. त्यांना पूर्णता आलेली नाहीं. त्यांना अजूनहि बरोबर शिदोरी पाहिजेच. त्यांना अजून दुःख होतें, कष्ट दुःसह वाटतात, आणि खोटें काम करावयाला ते तयार होतात. तु. म्ह. या कारणें धर्म राखा. धर्म हीच त्यांची शिदोरी.

चर्चा—च० २ पहिल्या चरणांत ज्या प्रकारचे लोक सांगितले त्यांचा संसार लौकिकांत कसाहि असला तरी परमार्थाच्या दृष्टीनें तो अपूर्णच. त्यांना संसाराची यात्रा कष्टप्रद होते, त्यांना वाटेंत धर्माच्या शिदोरीची जरूर लाग-

णारच. जे मुक्त झाले त्यांच्याकरितां धर्म नको. जे सांसारिक अहित त्यांच्याकरितां धर्म पाहिजे. त्यांच्याकरितां तरी, धर्माचें, कर्ममार्गाचें रक्षण आपण केलें पाहिजे. कारण धर्म हा छायेसारखा आहे. उन्हानें तापलेल्याला जशी छाया लागते तशी संसाराच्या तापानें तापलेला धर्माच्या छायेची जरूरी वाटते असा अर्थ.

शब्द—सिदोरी = शिधा दोरी.

शेरा—ज्याला ऊन्ह लागतें त्यालाच छाया हवी असते, तोच सावली शोधतो, ज्याला अजून सोपान चढावयाचा आहे, वाट चालावयाची आहे, त्याला धर्माची जरूर हवी, त्याला वाट चालतांना धर्माच्या शिदोरीची जरूरी असते म्हणून त्यानें विधिनिषेध टाकितां कामा नये. डा. भांडारकर.

२४५.

काळें खादला हा अवघा आकार ।
उत्पत्तिसंहार घडामोडी ॥ १ ॥
बीज तो अंकुर आच्छादिला पोटीं ।
अनंता सेवटीं एकाचिया ॥ २ ॥
तुका म्हणे शब्दें व्यापिलें आकाश ।
गुढार हें कैसें कळों नये ॥ ३ ॥

पाठभेद—च० २ बीज—बींजें. च० ३ कैसें—तैसें.

अर्थः—हा सर्व आकार, दिसणारें हें सर्व विश्व काळाच्या पोटांत आहे. उत्पत्ति, स्थिति आणि लय अशी घडामोड नित्य काळाच्या पोटांत चालेली आहे. बीज काय किंवा अंकुर काय शेवटीं एका अनंताच्या पोटांतच दोन्ही सांठलेलीं आहेत. तु. म्ह. शब्दानें आकाश व्यापिलें, शब्द तेवढा राहिला हें गूढ लोकांना कळत कसें नाहीं ?

चर्चा—च० २ बीज आधीं कीं अंकुर आधीं असा वाद घालतात. पण बीज आणि अंकुर एकाच शेवटीं एकाच कालाच्या—अनंताच्या—पोटांत सांठविलेलीं आहेत हेंच खरें. जिकडे तिकडे शब्दजाल माजलेलें आहे व वावदूक

लोक वितंडवाद घालीत आहेत, बीज आधीं, कीं अंकुर आधीं–पण त्यांना हें गूढ कसें कळत नाहीं ? कां कळूं नये ? डा. भांडारकर. माडगांवकर.

च० ३ तत्त्ववेत्ते कांहीं म्हणोत आकाशचा गुण कोणता, तर शब्द, हें जसें कळतें तसें हें दुसरेंहि गूढ आहे. पण तें कसें हें कळून येत नाहीं. वा. ब. फ.

शब्द—खादला = खाऊन टाकिला, पोटांत सांठविला. गुढार = गूढ डोलारा. डॉ. भांडारकर.

शेरा--विश्व हें एक गूढ आहे.

२४६.

आणिक काळें न चले उपाय ।
धरावे ते पाय विठोबाचे ॥ १ ॥
अवघेंचि पुण्य असे तया पोटीं ।
अवघिया तुटी होय पापा ॥ २ ॥
अवघें मोकळें अवघिया काळें ।
उद्धरती कुळें नरनारी ॥ ३ ॥
काळ वेळ नाहीं गर्भवासदुःखें ।
उच्चारितां मुखें नाम एक ॥ ४ ॥
तुका म्हणे कांहीं नलगे सांडावें ।
सांगतसें भावें घेती तयां ॥ ५ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--काळाशीं दुसरा कांहीं उपाय चालत नाहीं. या विठोबाचे पाय धरावे एवढाच उपाय. त्या उपायाचे पोटीं, त्याचा अवलंब केला म्हणजे, सगळेंच पुण्यकर, सोपें होतें; सर्व पापाला तुटी होते, पापाचा नाश होतो. सर्वच सर्वकाळीं मोकळें, कशाचाहि बंध नाहीं. सर्वांना मुक्ती मिळते. काळवेळ पहावी लागत नाहीं. एका नामाचा उच्चार केला कीं गर्भवासादि दुःखें नाहींत. जे लोक देवाचें नांव तोंडानें घेतात त्यांना कांहीं टाकावें लागत नाहीं.

चर्चा— च २ अवघिया काळें=सर्वकाळीं, लक्षणेनें अर्थ करून—मी म्हणतों हें सर्वत्र सर्वकाळीं सत्य आहे—असा अर्थ करावा.

तु. म्ह. हें सर्व मी सांगतों खरें, पण तें कोणाकरतां ? जे भावानें ऐकतील त्यांना त्याचा उपयोग.

शेरा—नाममहिमा. लौकिकी; मध्यम वयांतला.

२४७.

कां रे माझा तुज नये कळवळा ।
असोनि जवळा हृदयस्था ॥ १ ॥
अगा नारायणा निष्ठुरा निर्गुणा ।
केला शोक नेणां कंठस्फोट ॥ २ ॥
कां हें चित्त नाहीं पावलें विश्रांती ।
इंद्रियांची गति कुंठेचिना ॥ ३ ॥
तुका म्हणे कां रे धरियेला कोप ।
सरलें नेणों पाप पांडुरंगा ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ कुंठेचिना—खुंटेचिना.

अर्थ—देवा, तूं माझ्या अगदीं जवळ आहेस, माझ्या हृदयांत आहेस, मग माझा तुला कळवळा कां बरें येत नाहीं ? देवा, नारायणा, निर्गुणा, निष्ठुरा, मी शोक केला, घसा फुटेपर्यंत रडलों तरी तुम्हांला दाद नाहीं. मी इतका प्रयत्न करितों तरी मनाला समाधान नाहीं तें कां ? इंद्रियांची गति अजून कां कुंठत नाहीं ? देवा, माझ्यावर राग कां केला ? देवा, माझें पाप अजून सरलें नाहीं असें वाटतें.

शब्द—कंठस्फोट = घसेफोड.

शेरा—फार प्रेमळ. प्रौढपणींचा.

२४८.

दीनानाथा तुझीं ब्रिदें चराचर ।
घेशील कैवार शरणागता ॥ १ ॥
पुराणीं जे तुझे गर्जति पवाडे ।
तें आम्हां रोकडें कळों आलें ॥ २ ॥
आपुल्या दासांचें न साहसी उणें ।
उभा त्या कारणें राहिलासी ॥ ३ ॥
चक्र गदा हातीं आयुधें अपारें ।
न्यून तेथें पुरें करूं धांवे ॥ ४ ॥
तुका म्हणे तुज भक्तीचें कारण ।
करावया पूर्ण अवतार ॥ ५ ॥

च० ते आम्हां रोकडे...असा निरनुस्वार पाठहि आहे.

पाठभेद—च० ४ तेथें–तेंचि.

अर्थ—दीनानाथा, तूं शरण आलेल्यांचा कैवार घेशील, घेतोस, हीं तुझीं ब्रीदें चराचर वस्तूंच्या ध्यानीं मनीं आहेत. तुझीं अशा प्रकारचीं कीर्ति पुराणें गातात व ती योग्य आहे, खरी आहे असें आम्हांला कळून आलें. तूं आपल्या दासाच्या ठिकाणीं जें कांहीं उणें, कमी असेल तें सहन करीत नाहींस, तसेंच राहूं देत नाहींस, त्यांचा पाठपुरावा करतोस. देवा, तुझ्या हातांत चक्र गदा अशीं अपार आयुधें आहेत. आणि ज्या ज्या ठिकाणीं कांहीं उणें असेल, त्या ठिकाणीं तेथें तें पुरें करावयाला देव धावून जातो. देवा, तुला अवतार पुरा करावयाला भक्तीचें कारण. भक्तीमुळें तुला अवतार घ्यावयाला लागतो.

चर्चा—च० १. चराचर वस्तूंना तुझीं ब्रीदें माहीत आहेत. तुझीं ब्रीदें चराचर वस्तूंच्या ध्यानीं मनीं आहेत, असें गर्भित ध्यावें लागतें.

डॉ. भांडारकर.

किंवा—दीनानाथा, चराचर वस्तू, हींच तुझीं ब्रीदें. हेंच तुझे मूर्तिमंत बाणे. या वस्तू म्हणजे तुझ्या ब्रीदाचे साक्षीदार आहेत–असा अर्थ होणार नाहीं काय ?

वा. ब प.

२४९.

वर्णूं माहिमा ऐसी मज नाहीं वाचा ।
न बोलवे साचा पार तुझा ॥ १ ॥
ठायींची हे काया ठेंवेली चरणीं ।
आतां ओंवाळूनी काय सांडूं ॥ २ ॥
नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा ।
जीव वाहूं देवा तोही तुझा ॥ ३ ॥
मज माझें कांहीं न दिसे पाहतां ।
जें तुज अनंता समर्पावें ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां नाहीं मज थार ।
तुझे उपकार फेडावया ॥ ५ ॥

पाठभेद—च० १ नाहीं मज वाचा–मज नाहीं वाचा.

अर्थ—तुझा महिमा जिच्या योगानें वर्णन करितां येईल अशी वाचा मला नाहीं. तुझा पार अंत–थोरवी–मला खरोखरच वर्णन करितां येत नाहीं. हा देह, ही माझ्याजवळची–माझी अशी म्हणतां येईल अशी काया, अगोदरच तुला वाहिली आहे. आतां तुझ्यावरून काय ओवाळून टाकूं ? तुझी सेवा करूं इतका भाव, इतकी श्रद्धा माझ्या ठिकाणीं नाहीं. तुला जीव वाहूं असें म्हटलें तर तोहि अगोदरच तुझा आहे. (तो तुला वाहणार मी कोण ?) देवा, अनंता, तुला समर्पण करितां येईल असें माझें मला कांहींच दिसत नाहीं. देवा, तुझे उपकार फेडावयाला मला कुठें जागाच नाहीं असें वाटतें.

शब्द—**ठायींची** = माझी अशी म्हणतां येईल ती. **थार** = जागा, अवकाश.

शेरा—प्रेमळ, प्रौढपणींचा, अनुभवानंतरचा.

२५०

नव्हे सुख मज न लगे हा मान ।
न राहे हें जन काय करूं ॥ १ ॥
देहउपचारें पोळतसे अंग ।
विषतुल्य चांग मिष्टान्न तें ॥ २ ॥
नाइकवे स्तुति वाणितां थोरीव ।
होतो माझा जीव कासावीस ॥ ३ ॥
तुज पावे ऐसी सांग कांहीं कळा ।
नको मृगजळा गोवूं मज ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां करीं माझें हित ।
काढावें जळत आगींतूनि ॥ ५ ॥

पाठभेद--च. २ विषतुल्या-वीषातुल्य.

अर्थ--मला हें सुखही नको, आणि हा मानही नको. परंतु हे लोक ऐकत नाहींत त्याला मी काय करूं ? किंवा, मला हा मानमरातब नको, यापासून मला सुख होत नाहीं. लोक उपचार म्हणून करावयाला येतात. पण त्यांनीं मला सुख होण्याच्या ऐवजीं अंग पोळलें असें वाटतें. कोणी चांगलें मिष्टान्न घातलें तर तें विषाप्रमाणें लागतें. लोक माझ्या थोरपणाची स्तुति करितात ती स्तुति मला ऐकवत नाहीं. जीव कासावीस होतो. देवा, जिच्यायोगानें तुला पावेन, तुझी प्राप्ती होईल, अशी कांहीं तरी युक्ती सांग. देवा, मला या मृगजळांत, दिसणाऱ्या पसाऱ्यांत गोवूं नको. माझें हित कर. जळत्या आंगींतून मला बाहेर काढ आणि वांचीवः—

शब्द--**वाणितां**-वाणणें = वर्णन करणें, स्तुती करणें.

शेराः--लौकिक प्रतिष्ठा म्हणजे जिवंत आग, हींतून मला सोडीव. अंतःकरणाची स्थिति दाखविणारा अभंग. प्रौढपणांतील.

२५१.

न मिळो खावया न वाढो संतान ।
परि हा नारायण कृपा करो ॥ १ ॥
ऐसी माझी वाचा मज उपदेशी ।
आणीक लोकांसी हेंचि सांगे ॥ २ ॥
विटंबो शरीर होत कां विपत्ती ।
परि राहो चित्तीं नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे नाशिवंत हें सकळ ।
आठवे गोपाळ तेंचि हित ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—खावयास न मिळालें तर न मिळूं दे, संतान नाहीं बाढलें तर न वाढो, परंतु देवाची कृपा सतत असो. २ हा असा उपदेश माझी वाणी मला नेहमीं करते, व इतर लोकांनाहि हेंच सांगते. ३ शरीराची विटंबना होवो, हालअपेष्टा भोगाव्या लागोत, व नानाप्रकारचीं संकटें येवोत, हें सर्व झालें तरीसुद्धां माझ्या अंतःकरणांत ईश्वर सतत वास करो तु. म्ह. हें सर्व जग नाशवंत आहे. ज्याच्या योगानें गोपाळ, आठवतो तेंच नित्य, हिताचें असें समजावें.

शब्द-नाशिवंत = नाश पावणारें.

शेरा—देवाच्या भक्तीशिवाय कांहीं नको.

२५२.

पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान ।
विलास मिष्टान्न करूनियां ॥ १ ॥
शरीर रक्षावें हा धर्म बोलती ।
काय असे हातीं तयांचिया ॥ २ ॥

क्षणभंगुर हें जाय न कळतां ।
ग्रास गिळों सत्ता नाहीं हातीं ॥ ३ ॥
कर्वतिली देहे कापियेलें मांस ।
गेले वनवासास शुकादिक ॥ ४ ॥
तुका म्हणे राज्य करितां जनक ।
अग्नीमाजी एक पाय जळे ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ कर्वतिली देहे–कर्वतिले देह.

अर्थ—विलासांनीं व मिष्टान्नांनीं शरीर (पिंड) पोसावे हाच धर्म अशा प्रकारचें ज्ञान हें अधम लोकांचें. अधम लोकांना इतकेंच समजतें.

जे लोक " शरीराचें रक्षण करणें " एवढाच मनुष्याचा धर्म आहे असें समजतात, त्यांचे हातांत शरिराचें रक्षण करण्याजोगी काय सत्ता आहे ?

कारण शरीर हें क्षणभंगुर आहे. म्हणून असल्या क्षणभंगुर वस्तूचें रक्षण मनुष्य काय करूं शकणार ? जेथें आतां आहे व मग नाहीं तेथें मनुष्याच्या प्रयत्नांचा (रक्षण करण्याकरतां) काय उपयोग ?

" घांस गिळोन " इतकीसुद्धां सत्ता मनुष्याचे हातांत नाहीं.

ताम्रध्वजानें स्वतःचें शिर कर्वतून घेतलें. शिबीनें स्वतःच्या मांडीचें मांस कापून दिलें. शुकादिक वनवासास गेले. या सर्वांनीं " देहाचें पोषण करणें " हाच मनुष्याचा धर्म मानला नाहीं.

आणि जनक तर राज्य करीत असतां त्याचा एक पाय विस्तवांत जळत होता.

चर्चा—च० २ **तयांचिया**–याचा अर्थ " त्या लोकांच्या " जे असें म्हणतात त्यांच्या. वा. ब. प. माडगांवकर.

शब्द–पिंड = देह, शरीर. **ग्रास** = घांस.

शेरा—शरीर पोषण करणें, जगणें, एवढाच कांहीं मनुष्यजन्माचा धर्म नव्हे.

२५३.

जरी माझी कोणी कापितील मान ।
तरी नको आन वदों जिव्हे ॥ १ ॥
सकळां इंद्रियां हे माझी विनंती ।
नका होऊं परतीं पांडुरंगा ॥ २ ॥
आणिकांची मात नाइकावी कानीं ।
आणिक नयनीं न पाहावें ॥ ३ ॥
चित्ता तुवां पायीं रहावें अखंडित ।
होउनी निश्चित एकविध ॥ ४ ॥
चला हात पाय हेंचि काम करा ।
माझ्या नमस्कारा विठोबासी ॥ ५ ॥
तुका म्हणे तुम्हां भय काय करी ।
आमुचा कैवारी नारायण ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जरी माझी कोणी मान कापितील तरी देखील, हे जिभे, इतर कांहीं बोलूं नकोस. ईश्वराच्या नांवाशिवाय दुसरें कांहींहि बोलूं नकोस. सर्व माझ्या इंद्रियांना हीच माझी विनंति–पांडुरंगापासून परतीं होऊं नका. ३ दुसऱ्याची गोष्ट कानानें ऐकूं नये, डोळ्यांनीं दुसरें कांहीं पाहूं नये. ४ हे चित्ता, तूं अखंडित एकविध व निश्चिन्त होऊन ईश्वराचें पायीं लीन हो. ५ हातपायहो, चला हेंच काम करा, माझ्या विठोबाला नमस्कार करावयास चला. ६ तुम्हांला भय काय करील ? आपला कैवारी नारायण आहे.

शेरा—अखंडभावपर अभंग.

२५४.

करिसी तैं देवा करीं माझें सुखें ।
परि मी त्यासी मुखें न म्हणे संत ॥ १ ॥
जया राज्य द्रव्य कारणें उपार्जना ।
वश दंभ माना इच्छे जाले ॥ २ ॥
जगदेव परी निवडीन निराळे ।
ज्ञानाचे आंधळे भारवाही ॥ ३ ॥
तुका म्हणे भय न धरीं मानसीं ।
ऐसियाचे विशीं करतां दंड ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ ऐशियाचे विशीं–ऐशियांचे विशीं.

अर्थ—देवा, माझें काय करावयाचें असेल तें खुशाल कर. पण मी तोंडानें त्यांना संत म्हणणार नाहीं. ज्यांना राज्य द्रव्य यांचें उपार्जन करावयाचें असतें, किंवा जे दंभ, माना इत्यादिकांच्या लोभाला वश झाले, ते मग कोणीहि असोत, ब्राह्मण, भूदेव, असले, किंवा एखादें बडें प्रस्थ असलें तरी त्यांना मी निराळे निवडून काढीन. ते ज्ञानाचे आंधळे, ज्ञानामुळें त्यांच्या डोळ्यांवर गर्वाचें पटल येऊन त्यांना आंधळेपण आलें आहे. ते केवळ ज्ञानाचा भार वाहणारे. अशांच्या संबंधानें माझें जें वर्तन आहे त्या वर्तनाबद्दल मला, देवा, जरी दंड केला तरी मी भीत नाहीं. (किंवा, अशा लोकांच्या संबंधानें, त्यांना दंड केलात तरी मी भीत नाहीं.)

चर्चा—च० ४ ऐशियांचे विशीं=अशा लोकांविषयीं.
ऐशियाचे विशीं=अशा वर्तनासंबंधानें.

शब्द—जगदेव = ब्राह्मण, भूदेव, बडें प्रस्थ.

शेरा—हा अभंग रामदासाला उद्देशून रचला असें म्हणतात. पण तसें दिसत नाहीं. रामदासाविषयीं तुकारामांचा ग्रह चांगला होता. दांभिकावर तडाखा.

२५५.

म्हणविती ऐसें आइकतों संत ।
न देखिजे होत डोळां कोणीं ॥ १ ॥
ऐसियांचा कोण मानितें विश्वास ।
निवडे तो रस घाईंडाईं ॥ २ ॥
पर्जन्याचे काळीं वोहळाचे नद ।
ओसरतां बुंद न थारेचि ॥ ३ ॥
हिऱ्याऐशा गारा दिसती दुरोन ।
तुका म्हणे घण न भेटे तों ॥ ४ ॥

पाठभेद––नाहींत.

अर्थ––(१) स्वतःला संत म्हणवून घेणारे संत पुष्कळ ऐकतों. किंवा, (२) किती एक लोक आपल्याला संत म्हणवितात असें ऐकतों. पण ते तसे (होत) आहेत असें प्रत्यक्ष कोणीं पाहिलें नाहीं. पण कोणी खरोखर संत आहेत असें माझ्या पहाण्यांत नाहींत. अशांवर विश्वास कोणी ठेवावा ? जो रस तेवढें खरें सत्व. पण तो मात्र घायांनीं, आघात झाले म्हणजे, डायांनीं, हेव्यादाव्यांनीं, संधि प्रसंगानें निवडला जातो, दिसून येतो. तो रस आहे हें घाय लागले म्हणजे दिसून येतें. पावसाळ्यांत वाहाळांचे नद पुष्कळ होतात पण एकदां पाणी ओसरलें म्हणजे त्या वहाळांत येंबहि दिसत नाहीं. गारा दुरून अगदीं हिऱ्यासारख्या दिसतात. पण घण भेटला नाहीं तोंपर्यंतच त्यांचें हिरेपण. घण लागला कीं गार ती गार, व हिरा तो हिरा.

चर्चा—च० १ याचे दोन अर्थ वर दिलेच आहेत " ऐसे " व कोणी असे निरनुस्वार पाठ घेतले तर दुसरा अर्थ लागेल. "ऐसें" व "कोणीं" असे पाठ घेतले तर पहिला अर्थ लागेल. एकंदरींत–स्वतःला संत म्हणविणारे पुष्कळ आहेत. पण खरोखरचे संत मला आढळले नाहींत असा अर्थ दिसतो.

च० २ घाईं डाईं–झाडावर घाव मारिले म्हणजे रस बाहेर पडतो, त्याचप्रमाणें चांगल्याचा हेवा दावा केला म्हणजे त्यांचें चांगलेपण जास्तच दिसून येतें. घायींडायीं–आघातांनीं. समाहारार्थी. वा० ब० प०.

शेरा—थोड्या शब्दांत अर्थ पुष्कळ, प्रौढपणातील.

२५६.

अतिवाद लावी ।
एक बोट सोंग दावी ॥ १ ॥
त्याचा बहुरूपी नट ।
नव्हे वैष्णव तो चाट ॥ २ ॥
प्रतिपादी वाळी ।
एका पूजी एका छळी ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं ।
भूतदया ज्याचे ठायीं ॥ ४ ॥

पाठभेद--च० १ अतिवाद-अतिवादें.

अर्थ--तु. म्हणतात-ज्याच्या अंगीं भूतदया नाहीं, प्राणीमात्रांच्या ठिकाणीं दया वत्सलता नाहीं तो वैष्णव नव्हे. तो चावट, तें वैष्णवाचें सोंग. असा माणूस ब्रह्मज्ञानाची केवळ वडबड करितो, वाद घालितो. एक बोट दाखवून म्हणतो ब्रह्म एक आहे. सोंग दाखवितो, बहुरूप्यासारखें. एक गोष्ट प्रतिपादितो, दुसरी सोडून देतो. एक पुजतो, दुसऱ्याचा छळ करितो.

चर्चा—च० २ त्याचा बहुरूपी नट.....

१ त्याचें सोंग बहुरूप्यासारखें. त्याच्यापाशीं खरें कांहीं नाहीं.

च० ३ प्रतिवादी-वाळी एकाचें प्रतिपादन करितो दुसरें टाकून देतो.

शब्द—**नट** = नटणें. **चाट** = चावट.

शेरा--दांभिकांवर तडाखा.

२५७.

पोटाचे ते नट पाहों नये छंद ।
विषयांचे भेद विषयरूप ॥ १ ॥
अर्थीं परमार्थ कैसा घडों सके ।
चित्त लोभी भीकें सोंग वांयां ॥ २ ॥
देवाचीं चरित्रें दाखविती लीळा ।
लाघवाच्या कळा मोहावया ॥ ३ ॥

तुका म्हणे चित्तीं राहे अभिलाष ।
दोघां नरकवास सारिखाचि ॥ ४ ॥

पाठभेद--च• २ भीकें भीके.

अर्थ—हे सारे नट, ढंग, पोरकारेंतां आहेत. तें आपण घेऊं नयेत, त्यांत लक्ष गुंतवूं नये. हे सगळे विषयाचे, ऐहिक वस्तूचे प्रकार आहेत, ते विषयरूपच असावयाचे. यांच्याकडे लक्ष गुंतलें तर परमार्थ कसा घडेल ? मनुष्याचें मन हें लोभी आहे. भिकेच्या आशेनें उगाच सोंग करितें. हे म्हणे देवाचीं चरित्रें दाखवितात. सगळ्या लाघवाच्या, फसवाफसवीच्या कळा आहेत. मनाला मोहून टाकण्याचे प्रकार आहेत झालें. तु. म्ह. यांच्या योगानें मनाला मोह पडतो. आणि शेवटीं फळ काय, तर मोहविणारा आणि मूढ असे दोघेहि नरकांत जातात.

सर्व अभंग निरनिराळ्या प्रकारचीं सोगें, बतावण्या करून देव लीला दाखवीत फिरणाऱ्या भोंदूंवर लिहिलेला आहे. अशा रीतीनें पाहिलें म्हणजे दुसऱ्या चरणाचा अर्थ बरोबर लागतो—हे देवलीला दाखवीत फिरतात यांच्या मुळें मोक्ष प्राप्ती यांना काय किंवा इतरांना काय थोडीच व्हावयाची आहे ? खरोखर यांचें चित्त लोभाला गुंतलेलें आहे. भीक मागणें, सोंग, हें सगळें फुकट.

शब्द-नट = नाटक सोंग, लाघव = मोह.

शेरा—दांभिकांना उद्देशून लिहिलेला.

२५८.

भुंकती तीं द्यावीं भुंकों ।
आपण त्यांचें नये शिकों ॥ १ ॥
भाविकांनीं दुर्जनाचें ।
मानूं नये कांहीं साचें ॥ २ ॥
होइल तैसें वळ ।
फजीत करावे ते खळ ॥ ३ ॥
तुका म्हणे त्यांचें ।
पाप नाहीं ताडणाचें ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ मानूं नये कांहीं साचें–कांहीं मानूं नये साचें.

अर्थ—जीं माणसें कुत्र्याप्रमाणें भुंकतात, उगाच निंदा व बडबड करतात त्यांना भुंकूं द्यावें. आपण त्यांचें शिकूं नये. भाविकांनीं दुर्जनांचें कांहींहि खरें मानूं नये, किंवा दुर्जनांच्या कोणत्याही कृत्याकडे भाविकांनीं वस्तुतः लक्ष देऊं नये. जसें बळ होईल त्याप्रमाणें दुर्जन फजीत करावे. त्यांचें ताडणाचें, त्यांना मारण्याचें पाप नाहीं.

शब्द—त्यांचें दुर्जनांचें, दुर्जनांना (ताडण्याचें).

शेरा—मानसिक धैर्याचा. लोकापवादाची बेपर्वा. प्रौढपणाचा.

२५९.

जप करितां राग ।
आला जवळी तो मांग ॥ १ ॥
नको भोंवतालें जगीं ।
पाहों जवळीं राख अंगीं ॥ २ ॥
कुड्याची संगती ।
सदा भोजन पंगती ॥ ३ ॥
तुका म्हणे ब्रह्म ।
साधी विरहित कर्म ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जप करीत असतां तो मांग राग जवळी आला; भोंवतालें जगीं पाहों नका. जवळी राख, मनीं राखच, अंतर्बाह्य राखच. निर्मळ कांहीं नाहीं. खोट्याची संगत, खोट्यांचा पंगत, आणखी काय म्हणे ब्रह्म साधतो आहे ! आणि कर्म पहावें तर सगळें विपरीत. (वा. ब. प.)

किंवा, जप करतोस तर राग येतो आणि मन विटाळतें तेव्हां हें भोंवतालचें, बाहेरचें जग, कांहीं नको. तिकडचें पाहूं नये. सत्यतत्त्व तें जवळच आहे तें अंगीं राख. अंगातलें सत्व राख. अंतर संभाळ. बाहेरचें जग राहूं दे.

खोट्याची संगत व खोट्याचीच पंगत; मग जपांत काय आहे ? असलें कर्म नको. कर्माविरहीतच–कर्मावांचूनच ब्रह्म साध. डॉ. भांडारकर.

आणखी एक अर्थ सुचतो तो असा कीं:—

जप करीत असतां (ज्याला) जवळी राग आला तो मांग. भोंवतालीं जगीं पहायाला नको. जवळच, अंगींच, राख; त्या मांगाचा कृष्णपणा पहाव-यास भोंवतीं जगीं पहायाला नको. जवळच, अंगींच, राख आहे तीं पहा म्हणजे झालें. नेहमीं वाईटाची संगत, वाईटाचीच पंगत; आणखी म्हणे ब्रह्म साधतो. आणि कर्म पाहिलें तर मुलखा वेगळेंच.

शब्द— कुडें = खोटें. विरहित = वेगळेंच, भलतेंच.

२६०.

कांहींच मी नव्हें कोणिये गांवींचा ।
एकटा ठायींचा ठायीं एक ॥ १ ॥
नाहीं जात कोठें येत फिरोनियां ।
अवघेंचि वायांविण बोलें ॥ २ ॥
नाहीं मज कोणी आपुलें दुसरें ।
कोणाचा मी खरें कांहीं नव्हे ॥ ३ ॥
नाहीं आम्हां ज्यावें मरावें लागत ।
आहों अखंडित जैसे तैसे ॥ ४ ॥
तुका म्हणे नांव रूप नाहीं आम्हां ।
वेगळा त्या कर्मा अकर्मासी ॥ ५ ॥

पाठभेद—च० २ अवघेंचि वायांविण बोलें–अवघेंचि वांयां विण बोल च० ५ नांव रूप–नाम.

अर्थ—मीं कांहींच नव्हे. कोणच्याच गांवचा नाहीं. मी एकटा आहें. जेथला तेथें एकच, जागचा जागीं आहें. कोठें जात नाहीं, फिरून येत नाहीं; आणि बोलतों तेंहि निरर्थकच किंवा मला माझ्याशिवाय दुसरें कोणी आपलें असें नाहीं. मी कोणाचा असेन तर तेंही खरें नाहीं. मला जगावें मरावें

लागत नाहीं. जसा आहे तसाच अखंडित आहें. मला नाहीं नाम, नाहीं रूप.

शब्द— ठायींचा = मूळचा. **ज्यावें**-जिणें = जगणें. **कर्मअकर्म** = विधिनिषेध.

शेरा—कैवल्यस्थितीचें वर्णन; अद्वैतपर.

२६१.

कोण जाणें कोणा घडे उपासना ।
कोण या वचनाप्रति पावे ॥ १ ॥
आतां माझा श्रोता वक्ता तूंचि देवा ।
करावी ते सेवा तुझीच म्यां ॥ २ ॥
कुशळ चतुर येथें न सरतें ।
करितील रिते तर्क मतें ॥ ३ ॥
तुका म्हणे जालें पेणें एके घरीं ।
मज आणि हरी तुम्हां गांठी ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ प्रती–प्रीति; च० ३ करितील रिते तर्क मतें–करितील रीति तर्क मत. च० ४ जालें पेणें–केणें जालें.

अर्थ:—कोणा उपासना घडे, कोणाच्या हातून उपासना होते व 'उपासना घडे' या वचनाप्रति कोण पावे, उपासना कोणाला होते, कोणाला पावते, उपासक कोण, उपास्य कोण, कोण जाणे ! तुझें माझें देवा इतकें सादृश्य झालें आहे कीं आपणां दोघांत उपासक कोण व उपास्य कोण हेंच समजत नाहीं. हा भेद उरला नाहीं; तरी मी तूं व पण सुटत नाहीं. म्हणून तूं सेव्य व मी दास असेंच मी म्हणतों. तूंच माझा श्रोता व वक्ता–सर्व कांहीं –माझें तूं ऐकतोस व तुझें मीच ऐकतों–तूंच सेव्य, तुझीच मी सेवा करावी. येथें कुशलचतुरांचें चालत नाहीं. उगाच तर्क मतें करितील. देवा, तुझा माझा मुक्काम एका घरीं, एका देहीं, झाला आहे. तुझी माझी गांठ पडली आहे.

—डॉ. भांडारकर व म. ठ.

चर्चा:—वर लिहिलेल्या अर्थानें मनाचें समाधान होत नाहीं. विशेषतः पहिले चरणांत घोंटाळा राहतो. तो असा:—" कोणा उपासना घडे कोण जाणे । " याचा अर्थ " कोणाचे हातून उपासना घडते–उपासक कोण हें समजत नाहीं, " असा घेतला. " उपासना घडे या वचनाप्रति कोण पावे, " ह्या चरणाचा अर्थ—" या वचनाप्रति " म्हणजे " उपासना घडे " या वचनाप्रति असें मंडळींनीं घेतलें. " उपासना घडे = उपासकत्व येतें " असें प्रथमार्धांत ठरलें. तेव्हां " उपासना घडे = उपासकत्व प्राप्त होतें " या वचनाप्रति कोण पावे ? म्हणजे उपासकत्व कोणास प्राप्त होतें ? याप्रमाणें प्रथमार्ध व द्वितीयार्ध दोनही एकाच अर्थाचीं आहेत असें म्हणावें लागतें. असें करण्यापेक्षां " या वचनाप्रति " चा संबंध दुसऱ्या चरणाकडे घ्यावा.

' आतां माझा श्रोता वक्ता तूंचि देवा । करावी ते सेवा तुझीच म्यां ॥ ' या वचनाप्रति कोण पावे ? असें घेतल्यास सबंध अर्थ असा—

—उपासना कोणा घडे, कोणाचे हातून होते. उपासक कोण, कोणाला ठाउक ? ' आतां माझा वक्ता तूंच व श्रोताही तूंच; मी तुझी सेवा करावी ' या वचनाप्रति कोण पावे, हें वचन कोणाला पोंचतें म्हणजे उपासक कोण व उपास्य कोण कोणाला ठाऊक ? कुशल चतुरांचें येथें कांहीं चालत नाहीं. ते रिकामीं तर्कमतें करतील. किंवा ते आपल्या मतानें तर्क रिते करतील. एके घरीं, एके शरीरांत, पेणें झालें, मुक्काम झाला आहे, तुझी माझी गांठ पडली आहे. पण उपास्य–उपासक भेद राहिला नाहीं. तरीपण तुझें तूंपण अजून गेलें नाहीं, तोंवर मीच सेवा करावी, व तूं घ्यावी. मी उपासक तूं उपास्य.

कोण या वचनाप्रति पावे–उपासना कोणाचे हातून होते व कोणाची होते ' असें म्हणण्यापर्यंत कोण पावतें–इतक्या स्थितीला कोण पोंचतो ? असाहि अर्थ होईल. कावतकर.

उपासना जाणतो कोण–उपासना करावी कशी–हें कोणाला समजतें ? (खरी) उपासना घडते कोणाला व–कोणाचे हातून ? " या वचनाप्रति " आम्हांला उपासना घडते असें म्हणण्याइतक्या अधिकाराप्रत पावतें कोण ? कोणी नाहीं. सुखटणकर.

या सर्वांहून एक निराळाच अर्थ वाटतो. तो असा—

वारकऱ्यांबरोबर तुकाराम पंढरीस गेला असून इतरांबरोबर भजन वगैरे करीत असतां जागृति झाली तेव्हांचा हा अभंग असावा. लाटेबरोबर वहात जावें त्याप्रमाणें प्रथम पंढरीस गेला. भजनांत रमला. पण असे दिवस गेल्यावर जिज्ञासा–विचारबुद्धि–जागृत झाली आणि तुकाराम स्वतःलाच प्रश्न करतो–मनाशींच शोध करतो–कीं " मी करतों ही उपासना पोंचते कोणाला ? ' आतां माझा वक्ता–श्रोता तूंचि देवा । करावी ते सेवा तुझीच म्यां ॥ ' असें मी नित्य भजनांत म्हणतों. पण हा ' तूं ' कोण ? हें माझें म्हणणें जातें कोणीकडे, या माझ्या म्हणण्याला पावतो कोण ? उपासना घडते कोणाची ? येथें चतुरकुशल यांचें काम नाहीं. ते नुसते तर्क आणि मतें करतात. तुझा व माझा या देवळांत मुक्काम आहे. गांठ पडली आहे. तेव्हां सांग तूं कोण ?

वा. ब. पटवर्धन.

२६२

आमचा विनोद तें जगा मरण ।
करिती भावहीन देखा वेखा ॥ १ ॥
न कळे संतत हिताचा विचार ।
तो हे दारोदार खाती फेरे ॥ २ ॥
वंदिलें वंदावें निंदिलें निंदावें ।
एक गेलें जावें त्याचि वाटा ॥ ३ ॥
तुका म्हणे कोणी नाइके सांगतां ।
होती यमदूतां वरपडे ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ देखोवेखीं–देखावेखीं असेही पाठ आहेत.
च० २ संतत–सतंत.

अर्थः—आमचा जो विनोद, ज्यापासून आम्हांला सुख होतें, ज्यांत आम्हांला आनंद तें जगाला मरण, मरणासारखें संकट वाटतें. लोक जर भजनास बसले,–भजनांत, देवाच्या भक्तींत आम्हांला आनंद वाटतो–तर भावहीन मनानें नुसतें देखावेखा, दिसण्यापुरतें, वरवर सोंग करितात. मनांत कांहीं

नाहीं. त्यांना आपलें खरें शाश्वतीचें हित कशांत आहे तें कळत नाहीं. आणि असें जोपर्यंत आहे तोंपर्यंत त्यांना दारोदार फेरे खावे लागणार. लोकांची रीत म्हणजे अशी आहे. दुसऱ्या कोणी एखादी गोष्ट वंदिली, बरी म्हटली, तर हेहि ती बरी म्हणणार; कोणी निंदिली तर हेहि तिची निंदा करणार. लोक सारासार विचार करित नाहींत. दुसरा कोणी जाईल त्या वाटेनें आपणहि जातात. जग हें गतानुगतिक आहे. यांना हित सांगितलें तरी ऐकत नाहींत. मुद्दाम आपण होऊन यमदूतांच्या गळ्यांत पडतात.

शब्दः—**विनोद** = आनंद; भजनामुळें होणारा आनंद. **देखावेखा**–नकल. वरकरणीं (संपादक). **देखावेखी**–वरवरचें पाहून. (वा. ब. प) **संतत**–नित्य. चिरकालचें. **सतंत**–तंतूसह, समग्र, किंवा स्वतंत्र, "देखावेखी" याच्या उलट. (वा. ब. प.)

२६३.

दीप घेऊनिया धुंडिती अंधार ।
भेटे हा विचार अघटित ॥ १ ॥
विष्णुदास आम्ही न भ्यों काळिकाळा ।
भुलों मृगजळा न घडे तें ॥ २ ॥
उधळितां माती रविकळा मळे ।
हें कैसें न कळे भाग्यहीना ॥ ३ ॥
तुका म्हणे तृणें झांके हुताशन ।
हें तंव वचन वाउगेंचि ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ हा–तो. च० २ भ्यों–भों.

अर्थः—भक्तांच्या ठिकाणीं मृत्यूचें भय असणें अशक्य आहे असें दाखवितांना—

हातांत दिवा घेऊन अंधार शोधावयाला गेलें तर तो सांपडेल असा विचार करणें म्हणजे नवलाचीच गोष्ट. हातांत दिवा घेऊन अंधार शोधारयाला जातात. सांपडेल असें त्यांना वाटतें तरी कसें कोण जाणे ? हें जसें अघटित–कधीं घडलें नाहीं, पुढें घडावयाचें नाहीं, त्याप्रमाणेंच

आम्ही विष्णुभक्त कळिकाळाला भिणार नाहीं, किंवा मृगजळाला भुलणार नाहीं. माती उधळली तर रविकळा मळेल हें शोभावें कसें ? ती तशी मळत नाहीं हें मूर्खाला कळत नाहीं गवतानें अग्नि झांकतो हें म्हणणें फुकट आहे.

चर्चा—च० ३ "उधळितां माती रविकळा मळे (ल) हें कसें? भाग्य हीना कळत नाहीं " असा अन्वय घेऊन–माती उधळल्यानें रविकळा मळेल; अशी अपेक्षा केली तर ती साधणार कशी ? पण त्यांतलाच प्रकार हे करीत आहेत. माती उधळीत आहेत व रविकला मळेल अशी अपेक्षा करित आहेत. तें कसें व्हावें ? दुर्दैवी आहेत, कळत नाहीं. त्यांना गर्भांथ आहे तो स्पष्ट करावा लागतो इतकेंच. वा. ब. प.

शब्द—**रविकळा** = सूर्याचें तेज. **हुताशन** = वैस्तव

शेरा—भक्तीनें येणारी मनाची बळकटी दाखविणारा.

२६४.

नटनाट्य अवघें संपादिलें सोंग ।
भेद दाऊं रंग न पालटे ॥ १ ॥
मांडियेला खेक कौतुकें बहूरूप ।
आपुलें स्वरुप जाणतसों ॥ २ ॥
स्पटिकाची शिळा उपाधी न मिळे ।
भाव दावी पिंवळे लाल संगें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही या जना विरहित ।
होऊनि निश्चिंत क्रीडा करुं ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ नटनाट्य–नटनाट्यें. दाऊं–दावी.
च० २ कौतुक–कौतुकें–कवतकें.

अर्थ—आम्ही जे दिसतों हें सगळें सोंग संपादिलेलें आहे. नाटक केलेलें आहे. आमचें मूळचें स्वरूप काय आहे तें आम्हांला कळतें. वरून जरी नानाप्रकार दाखवीत असलों तरी, रंग, अंतर्याम, खरा प्रकार–देव आणि आम्ही त्याला जाऊन मिळालों असा भाव–पालटत नाहीं. बहुरूप्या-

सारखा हा विविध प्रकारचा खेळ आम्हीं मांडिलेला आहे. परंतु आम्हीं स्वतां त्यापासून अलिप्त आहों. स्फटिकाची शीळा असते ती कांहीं उपाधीला जाऊन मिळत नाहीं. शेजारी असलेल्या पदार्थांशीं एकरूप होत नाहीं. परंतु उपाधीच्या सहवासानें शेजारघर्माप्रमाणें लाल, पिवळे, असे उपाधींचे, जवळील बस्तूंचे निरनिराळे रंग मात्र स्फटिकांत दिसतात तसे आम्ही आहोंत. वेगळे–त्यांच्यांत, संसारांत मिळून जाणार नाहीं. स्थित होऊन, संसाराच्या तापापासून अलिप्त राहून, संसारांत बहुरूप्यासारखें सोंगाची संपादणी करूं.

च० "दावी" हा पाठ अनेकवचनी इतर प्रयोगांशीं जमत नाहीं म्हणून गौण, त्याज्य.

शब्द—भाव = स्वरूप, रंग.

शेरा—पूर्णस्थितींतील अभंग.

२६५.

तुजविण वाणी आणिकांची थोरी ।
तरी माझी हरी जिव्हा झडो ॥ १ ॥
तुजविण चित्ता आवडे आणीक ।
तरी हा मस्तक भंगो माझा ॥ २ ॥
नेत्रीं आणिकासी पाहीन आवडी ।
जातु तेचि घडी चांडाळ हे ॥ ३ ॥
कथामृतपान न करिती श्रवण ।
काय प्रयोजन मग यांचें ॥ ४ ॥
तुका म्हणे काय वांचून कारण ।
तुज एक क्षण विसंवितां ॥ ५ ॥

पाठभेद—च० १ वाणी–वाणीं.

अर्थ—देवा, हरी, मी तुझ्या खेरीज इतरांची स्तुति करीन तर माझी जीभ झडून पडो. माझ्या मनाला तुझ्याशिवाय दुसरें कांहीं आवडेल तर माझें हें डोकें फुटून जाऊं दे. डोळ्यांनीं जर मी दुसऱ्याला पहाण्याचा

अभिलाष धरीन तर हे माझे चांडाळ डोळे त्याच क्षणीं जाऊन मी आंधळा होवों. कान जर तुझी अमृतासारखी कथा श्रवण करणार नाहींत, तर त्यांचा दुसरा काय उपयोग ? देवा, तुला जर मी एक क्षण विसरलों, तर मग जगून माझा काय उपयोग !

शब्द—**जातु** = जाऊत, जावोत. **कारण** = उपयोग.

शेरा—साधा, सरळ, एकनिष्ठ भक्तीचा अभंग.

२६६.

भाव धरी तया तारील पाषाण ।
दुर्जना सज्जन काय करी ॥ १ ॥
करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ ।
खापरा परीस काय करी ॥ २ ॥
काय करील तया साकरेचें आळें ।
बीज तैसीं फळें येती तया ॥ ३ ॥
तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ ।
कठिण हा खळ तयाहूनी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—जो श्रद्धा ठेवील त्याचा उद्धार दगडही करील. दगडाच्या मूर्तीवर भाव ठेविला तर त्या मूर्तीच्या योगानें भाविक तरणें शक्य आहे. पण जो दुर्जन आहे तेथें कोणाचें काय चालणार ? त्याला सज्जनाची संगत लागली तरी तो कसा सुधारणार ? कुत्र्याचें शेंपूट सरळ करूं गेलें तरी तें सरळ व्हावयाचें नाहीं. मूळचें खापर त्याला परीस भेटला तरी खापरच रहावयाचें, त्याचा खापरपणा बदलणार नाहीं. जसें बीं तशीं त्याला फळें येतात. त्याला साखरेचें आळें केलें तरी काय उपयोग ? (कारलें कडू असतें त्याला उपाय काय ? जसें बीं तसें फळ. तेथें साखरेचें आळें केलें तरी त्याचा काय उपयोग ? तु. म्ह. एक वेळ वज्रहि भंगेल. पण खळ हा वज्राहुनि कठीण. त्याच्यांत बदल होणें शक्य नाहीं. दुर्जन तो दुर्जन.

चर्चा—च. ३ " बीज तैसीं फळें येती तया, " " तया " चे ठिकाणीं " जया " असा पाठ असता तर व्याकरणाचीं ओढाताण न होती. वा. ब. प. आहे असाच पाठ तुकारामाच्या स्पष्टोक्तीचा जास्त निदर्शक आहे. संपादक

शब्द—च. १ **तया** = त्या गोष्टींला. च. ३ **तया** = त्याला, बीजाला.

शेरा—एक वेळ वज्र भंगेल. त्याच्याहून खळ कठीण. उपदेश कोणी ऐकत नाहीं या निराशेचा.

२६७

इच्छावें तें जवळी आलें ।
काय बोलें कारण ॥ १ ॥
नामरूपीं पडिली गांठी ।
अवघ्या गोष्टी सरल्या ॥ २ ॥
मुकियाचे परी जीवीं ।
साकर जेवीं खादली ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय बोलें ।
आतां भलें मौन्यची ॥ ४ ॥

पाठभेद—च. ३ खादली–खादल्या.

अर्थ—जें इच्छावें, इच्छित होतों, तें मला मिळालें. आतां बोलून काय उपयोग, बोलण्याचा काय उपयोग ? नामीं व रूपीं देवाची गांठ पडली, इतर गोष्टी संपल्या. यातायात संपली. मुक्या माणसाचे प्रमाणें आमचें सर्व कांहीं मनांतले मनांत आहे. नामरूपानें येणारा अनुभव आमचा आमच्यापाशीं, तो दुसऱ्याला सांगतां यावयाचा नाहीं. किंवा, जणूं काय साखर खाल्ल्याप्रमाणें झालें आहे. त्याची गोष्ट दुसऱ्या माणसाला केवळ शब्दांनीं सांगून काय कळणार ? अंतर्यामीं गोड. आतां बोलून काय करावयाचें ? गप्प बसावें हेंच बरें.

चर्चा—च. २ नामरूपीं–' नामरूप ' याचा तात्विक अर्थ पसारा= ज्याला नांव रूप आहे तें–असा आहे. ब्रह्म खरोखर नामरूप विरहित. पण

या ठिकाणीं नामीं व रूपीं = नामानें व रूपानें तुमची गांठ पडली, प्रत्यक्ष गांठ पडली असा अर्थ घ्यावा.

च. ३ जीवीं = अंतर्यामीं उदा. जीवीं भक्ति लागली गोड । नाहीं सांडली विषयाची चाड ॥ मुकुंदराज.

शेरा—परमेश्वरप्राप्तीनंतरची समाधानाची स्थिति यांत वर्णिली आहे.

२६८.

साधनें तरी हींच दोन्ही ।
जरी कोणी साधील ॥ १ ॥
परद्रव्य परनारी ।
यांचा घरीं विटाळ ॥ २ ॥
देवभाग्यें घरा येती ।
संपत्ती त्या सकळा ॥ ३ ॥
तुका म्हणे तें शरीर ।
गृह भांडार देवाचें ॥ ४ ॥

पाठभेद:—नाहींत.

अर्थ:—मोक्षाचीं साधनें करावयाचीं असतील तर एवढींच दोन करावींत. एवढींच पुरेशीं आहेत. परद्रव्य आणि परनारी यांचा विटाळ धरावा. अशा माणसांच्या घरीं देवाच्या भाग्यासारखीं उत्तम भाग्यें चालून येतात. सर्व संपत्ती त्यांच्या घरीं चालून येतात. किंवा, देवाच्या दयेनें त्याचे घरीं सर्व संपत्ती चालून येतात. तु. म्ह. अशा माणसाचें शरीर म्हणजे देवाचें गृह, देवाचें भांडार, देवघरासारखें, देवळासारखें, पवित्र.

शब्द—**देवभाग्यें**-देवभाग्य = देवांना ज्या प्रकारचें भाग्य प्राप्त होतें तसें भाग्य किंवा, २ देवाची कृपा. हा दुसरा अर्थ मला सरस वाटतो संपादक.

शेरा:—मध्यमवयांतील उपदेशभर अभंग.

२६९.

आम्हांसाठीं अवतार ।
मत्स्यकूर्मादि सूकर ॥ १ ॥
मोहें धांवे घाली पान्हा ।
नांव घेतां पंढरीराणा ॥ २ ॥
कोठें न दिसे पाहतां ।
उडी घाली अवचिता ॥ ३ ॥
सुख ठेवी आम्हांसाठीं ।
दुःख आपणासि घोटी ॥ ४ ॥
आह्मां घाली पाठीकडे ।
आपण कळिकाळासी भिडे ॥ ५ ॥
तुका म्हणे कृपानिधी ।
आह्मां उतरी नावेमधीं ॥ ६ ॥

पाठभेद:—च० ६ उतरी–उतरीं.

अर्थ—देवानें आमच्यासाठीं मत्स्य, कूर्म, इत्यादि अवतार घेतले. पंढरीराणा, विठोबा त्याचे नांव आठविलें असतां प्रेमानें धांवतो आणि पान्हा घालतो. आई जशी बाळानें हांक मारिली असतां ममतेनें घांव घेते आणि त्याला पाजते तसें, देव शोधूं गेल्यास कोठें दिसत नाहीं, पण प्रसंगीं एकदम उडी घालतो. सुख तेवढें आमच्यासाठीं राखून ठेवतो. दुःख तेवढें आपण घोंटून पिऊन टाकितो. देव आम्हांला पाठीशीं घालून आपण पुढें होतो, व कलिकाळाशीं आपण आमच्याकरितां भिडतो.

तु. म्ह. (हे कृपानिधी देवा, आम्हांला नावेंत उतर) किंवा, हा कृपानिधी देव आम्हांला नावेंत उतरितो, काळसागरांतून जातांना नावेंत घेऊन पलीकडे पोंचवितो.

शब्द—घोंटी = घोंट घेई, पिऊन टाकी.

शेरा—परमेश्वर महिमा. लौकिकी, पूर्वस्थितींतील.

२७०.

रवि रश्मिकळा ।
नये काढितां निराळा ॥ १ ॥
तैसा आम्हां झाला भाव ।
अंगीं जडोनि ठेला देव ॥ २ ॥
गोडी साकरेपासुनी ।
कैसीं निवडती दोन्ही ॥ ३ ॥
तुका म्हणे नाद उठी ।
विरोनि जाय नभापोटीं ॥ ४ ॥

पाठभेद:—नाहींत.

अर्थ:—रवि रश्मिकळा निराळा काढतां नये. रवि किरणांपासून निराळा काढूं म्हटलें तर तो तसा काढतां येत नाहीं. रविबरोबर रविकिरण व त्यांच्या बरोबर तो असावयाचाच. तसाच आमचा भाव झाला. तशीच आमची वृत्ति झाली. देवापासून मी किंवा माझ्यापासून देव निराळा काढतां येणार नाहीं. देव अंगाशीं जडून गेला, एकजीव झाला आहे. साखर आणि साखरेची गोडी हीं निराळीं कशीं निवडितां येतील ? शब्द हा आकाशाचा गुण, तेव्हां शब्द आणि आकाश हीं निराळीं कशीं करितां येतील ? शब्द उठतो आकाशांत आणि विरून जातोहि पण आकाशांतच. तसेंच माझें; माझा उदय, लय, सर्व देवांतच. देव व आम्ही एकांग व एकरूपच आहोंत.

शेरा—स्थितीपर अभंग.

२७१.

थोडें परी निरें ।
अविट तें खरें ॥ १ ॥
घ्यावें जेणें नये तुटी ।
वीज वाढे वीजा पोटीं ॥ २ ॥

चित्त ठेवीं ग्वाही ।
आणिकांशीं चाड नाहीं ॥ ३ ॥
आपलें तें हित फार ।
तुका म्हणे खरें सार ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—थोडकें का असेना, पण जें ध्यावयाचें असेल तें चोख, निर्भेळ अक्षय असेल तें ध्यावें. असें ध्यावें कीं, ज्याच्या योगानें तूट येऊं नये, येणार नाहीं. बीज जसें बीजापासून वाढतें तसें जें ध्यावयाचें तें वाढतें, वाढत जाणारें, असावें. इतरांशीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. स्वतांचें चित्त हेंच साक्षी. त्याच्याच साक्षीनें जें ध्यावयाचें तें ध्यावें. तु. म्ह. आपलें हित तेंच आपल्याला फार मोठें. तेंच सर्वस्व.

चर्चा—च. ४ तु. म्ह. ज्याच्या मुळें आपलें फार हित होतें तें खरें सारसर्वस्व असा अर्थ होईल. पण तो तितका बरा दिसत नाहीं. संपादक.

शब्द—**निरें** = निर्भेळ. **अविट**–१ न विटणारें.

शेरा—व्यर्थ भाराभर व्याप नको. ईश्वराचें भजन थोडें पण निर्भेळ पत्करावें. पोक्तपणींचा; उपदेशाचा.

२७२

अवघे देव साध ।
परी अवगुणांचा वाध ॥ १ ॥
म्हणउनी नव्हे सरी ।
राहे एक एका दुरी ॥ २ ॥
ऊंस कांदा एक आळां ।
स्वाद पाहतां निराळा ॥ ३ ॥
तुका म्हणे नव्हे सरी ।
विष अमृताची परी ॥ ४ ॥

पाठभेद—च. १ परी अवगुणाचे बाध ग. कृ. प्रत.

अर्थ--सारे देव साध. पण या देवांना अवगुणांचा बाध आहे. त्यांच्या आंगीं भक्तांचे अवगुण उतरले आहेत. म्हणून एकाची बरोबरी एकाला होत नाहीं. एका पासून दुसरा वेगळा रहातो (म्हणून हे सगळे देव सोडून एका अद्वितीय अशा देवाला भज.) उंस आणि कांदा एका आळ्यांत असले तरी दोहींचा स्वाद निराळा. तसेंच देव या शब्दांत परमेश्वर व इतर देव यांचा जरी समावेश होत असला, तरी परमेश्वर तो परमेश्वर आणि इतर देव ते इतर देव. त्यांची बरोबरी नव्हे. एक विष आणि दुसरें अमृत असा प्रकार आहे.

चर्चा--च. १ " या " हें देवांकडेस घेतलें तर त्या शब्दावर अनुस्वार हवा. तसा पाठ कोठें नाहीं. तुकारामांची भाषा पुष्कळदां त्रोटक असते तशी घ्यावी, आणि " या " हें " अवगुणांचा " या पदाचें विशेषण करावें. हे अवगुण = भक्तांचे अवगुण." सारे देव प्राप्त कर, पण भक्तांचे जे अवगुण त्या अवगुणांचाच तसें करण्यास बाध येतो. असा अर्थ करावा. वा. ब. प.

देव सारेच सारखे. पण भक्त आपले अवगुण देवांचे आंगीं चिकटवितात त्यामुळें त्यांना बाध येतो. त्यांच्यांत निरनिराळेपणा येतो. एक देव निराळा दुसरा निराळा असें होतें. एकाच आळ्यांत कांदे आणि ऊंस लाविले तर त्यांना वास निरनिराळा येतो त्याप्रमाणें:--

शद्ध--सरी = सारखेपणा, बरोबरी. **परी**--प्रकार.

शेरा--पोक्तपणींचा. उपदेशपर.

२७३

शांतीपरतें नाहीं सुख ।

येर अवघेंची दुःख ॥ १ ॥
म्हणउनि शांति धरा ।
उतराल पैल तीरा ॥ २ ॥
खवळलिया कामक्रोधीं ।
अंगीं भरती आधिव्याधी ॥ ३ ॥
तुका म्हणे त्रिविध ताप ।
जाती मग आपेंआप ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—एका शांतीखेरीज, मनाच्या समाधानाशिवाय, दुसरें सुख नाहीं. इतर सगळें दुःखच. म्हणून समाधानवृत्तीनें रहा. म्हणजे भवसागराच्या पलीकडे पोंचाल. कामक्रोध खवळले म्हणजे अंगांत मानसिक व शारिरिक दुःखें भरतात. पण समाधान असलें, मनाला शांति असली, म्हणजे मग त्रिविधताप आपोआप नाहींसे होतात.

शब्द—त्रिविध = तीन प्रकारचे. आपेंआप = अनायासें.

लक्ष्यप्रयोग—कामक्रोधीं खवळलिया = कामक्रोध खवळले म्हणजे.

शेरा—समाधानवृत्तीचें महात्म्य. पोक्तपणाचा.

२७४

गोडपणें जैसा गुळ ।
तैसा देव झाला सकळ ॥ १ ॥
आतां भजीं कवणे परी ।
देव सबाह्य अंतरीं ॥ २ ॥
उदकावेगळा ।
नव्हे तरंग निराळा ॥ ३ ॥
हेम अळंकार नामीं ।
तुका म्हणे तैसे आम्ही ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—गूळ जसा गोडीनें भरलेला तसा देवच सर्व झाला. देव सर्वत्र भरलेला आहे. तेव्हां सर्वत्र जर देवच आहे तर मी भजन तरी कोणाचें करूं आणि कसलें ? बाहेर आंत सर्वत्र देवच झाला. पाण्यापासून पाण्याचा तरंग निराळा नव्हे. किंवा सोनें हें अलंकाराशिवाय फक्त नावाचेंच. बाकी सोनें आणि अलंकार एकच. तसेंच देव व मी निराळे नव्हे. नावानें मात्र वेगळे.

चर्चा च० ४ अलंकार व हेम केवळ नांवाला निराळीं. बाकी अलंकार व सोनें एकच. मागील चरणांतील "वेगळा" "निराळा" अशासारखा शब्द अध्याहृत घ्यावा.

वा. ब. प.

शेरा—देव सर्वत्र भरलेला आहे. भाषा सोपी व दृष्टांत नेहमींच्या व्यवहारांतलाच पण समर्पक आहे. अभंग प्रौढपणींचा आहे असें वाटतें. संपादक.

२७५.

परमेष्ठिपदा । तुच्छ करिती सर्वदा ॥ १ ॥
हेंचि ज्यांचें धन । सदा हरीचें स्मरण ॥ २ ॥
इंद्रपदादिक भोग । भोग नव्हे तो भवरोग॥ ३ ॥
सार्वभौम राज्य । त्यांसि कांहीं नाहीं काज ॥ ४ ॥
पाताळींचें आधिपत्य । तें तों मानिती विपत्य ॥ ५ ॥
योगसिद्धिसार । ज्यासि वाटे तें असार ॥ ६ ॥
मोक्षा येवढें सुख । सुख नव्होचि तें दुःख ॥ ७ ॥
तुका म्हणे हरीविण । त्यासि अवघा वाटे सीण ॥ ८ ॥

पाठभेद—च० १ तुच्छ–तुष्य.

अर्थः—नेहमीं हरीचें स्मरण करणें हेंच ज्यांचें धन ते परमेष्ठिपदाला देखील नेहमीं तुच्छ लेखतात. इंद्रादिक पदें हे भोग असें म्हणतात. पण ते खरोखर सुखप्रद नव्हेत. ते भवरोगासारखे आहेत. त्याचप्रमाणें कोणी सार्वभौमराज्य दिलें तरी त्याचें त्यांना (हरीचें स्मरण ज्यांना प्रिय आहे त्यांना) कांहीं काम नाहीं. पाताळाचें आधिपत्य कोणी देऊं केलें तरी तो त्यांना विपत्ति असेंच वाटतें. योगादिक सिद्धि प्राप्त होण्यांतहि कांहीं अर्थ वाटत नाहीं. मोक्षासारखें सुख जरी मिळत असलें तरी तें दुःखासारखेंच वाटतें. तु. म्ह. हरीशिवाय इतर सर्व गोष्टींत त्यांना शीण वाटतो.

चर्चा—च० १ परमेष्ठिपद=ब्रह्मपद. ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी हा चरण पहावा.

किंवा
न पारमेष्ठ्यं न महेंद्रधीष्ण्यम् ।
न सार्वभौमं न रसाधिपत्यम् ।
न योगसिद्धिं न पुनर्भवं वा ।
मदर्पितात्मेच्छति न किमन्यत् ॥

या भागवतांतील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें.

शेरा—यावरून तुकारामांना भागवत चांगलें अवगत असावें असें वाटतें.

२७६.

मोहोऱ्याच्या संगें ।
सुत नव्हे आगीजोगें ॥ १ ॥
नाहीं तरी त्याचें भक्ष ।
काय सांगणें तें साक्ष ॥ २ ॥
स्वामिचिया अंगें ।
रूप नव्हे कोणा जोगें ॥ ६ ॥
तुका म्हणे खोडी ।
देवमणी न देती दडी ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ देवमणी (देहू व कऱ्हाड) देवमनी–देव मनीं.

अर्थ—मोहऱ्याला बांधलेलें सूत आगीजोगें रहात नाहीं. आगीनें तें जळत नाहीं. तसें तें बांधलेलें नसेल तर तें आगीचें भक्ष आहे हें उघडच आहे. त्याला दुसरी साक्ष कशाला पाहिजे ? प्रत्यक्ष प्रमाण.

तसेंच स्वामींच्या, देवाच्या अंगामुळें, देवाच्या संगतीनें, भक्त देवाच्या संगतींत असतो म्हणून, त्याला इतर कोणीहि अपकार करूं शकत नाहीं. इतरांचें त्याच्यापुढें कांहीं चालत नाहीं. तु. म्ह. खोडी असतात त्या देवमण्याला दडी देत नाहींत. कितीहि अवलक्षणें असलीं तरी त्यांचेमुळें देवमण्याचा प्रभाव नाहींसा होत नाहीं. देवमण्यानें सर्व अवलक्षणें जातात.

चर्चा—च० १ आगी जोगें=आगीनें, विस्तवामुळें अपकार होईल असें.

मोहरा होय अंगें । सूत न जळे ज्या संगें । या चरणांत सांगितल्याप्रमाणें.

च० ३ स्वामिचिया अंगें...अंगें = अंगामुळें. कोणाजोगें=कोणी अपकार करील असें; कोणाकडून अपकार होईल असें.

मोहऱ्यामुळें, मोहऱ्याच्या संगतीनें, जसा सुताला अपकार होत नाहीं तसेंच स्वामीच्या, देवाच्या, संगतीमुळें भक्ताला कोणी अपकार करूं शकत नाहीं. दृष्टांत व दार्ष्टांतिक यांत संबंध रहाण्यास असाच अर्थ सरळ घ्यावयाला पाहिजे.

किंवा, अंगें = कृपेनें. (स्वामीशीं एकरूप झाल्यामुळें) मराठे.

या अर्थाला अभंगांत आधार नाहीं. सूत कांहीं मोहऱ्याशीं एकरूप होत नाहीं.

च० ४. (१) देवमणी खोडीला दडी देत नाहीं. देवमणी = घोड्याच्या गळ्यावरच्या केंसांत रंगारंगाची गोम किंवा वींण असते ती.

एक देवमणी तेवढा घोड्याच्या अंगावर असला म्हणजे इतर बहात्तर खोडी असल्या तरी तो त्यांना लपावयाला जागा राहूं देत नाहीं, त्यांचा प्रभाव चालूं देत नाहीं.

हा अर्थ बरोबर दिसत नाहीं. प्रचारांत दडी देणें याचा अर्थ जागा राहूं देणें असा होत नाहीं. दडी देणें = लपून बसणें. तेव्हां " खोडी " हा कर्ता करावा व इतर अवलक्षणें कितीहि असलीं तरी ती देवमण्याला, त्याच्यापुढें, दडी देत नाहींत, असा अर्थ करावा. संपादक.

किंवा खोडीला देवमणी लपवितां येत नाहीं.

किंवा देवमणी खोडी न; दडी देती. असा अन्वय करुन देवमण्यापुढें खोडी टिकत नाहींत. लपतात, पळून जातात. रा. ब. मराठे

पण या अर्थाला " देवमणीं " असें सप्तम्यांत रूप घ्यावें लागेल म्हणून हा अर्थ गौण वाटतो. वा. ब. प.

" एक देव मणी हरी बहात्तर खोडी " या चरणावरून माझा अर्थच बरोबर वाटतो. संपादक.

देव मनीं असा पाठ कित्येक ठिकाणीं आहे. तो घेतला तर अर्थाची ओढाताण करावी लागते. देव मनांत दडी देऊन बसला नसला म्हणजे, देवाचा संग नसतां, भक्ताच्या स्वरूपांत ती एक खोडच समजावयाची, असा कांहीं तरी अर्थ करावा लागेल.

शेराः—अभंगाच्या चरणांत संगति कमी. तरुणपणींचा असावा.

२७७.

मजसवें नको चेष्टा ।
नव्हें साळी कांहीं कोष्टा ॥ १ ॥
वैस सांडोनी दिमाख ।
जाय काळें करी मुख ॥ २ ॥
येथें न सरे चार ।
हीन आणीक वेव्हार ॥ ३ ॥
तुका विष्णुदास ।
रस जाणतो नीरस ॥ ४ ॥

पाठभेद:—नाहींत.

अर्थ:—बायकोला उद्देशून असावा—लुगडेंबिगडें मागणाऱ्या बायकोला म्हणतात:—माझ्याशीं लाडीगोडी नको. मी कांहीं साळी किंवा कोष्टी नाहीं—(तुला लुगडीं हवीं तशीं घ्यावयाला.) रुसणें फुगणें नको. दिमाख सोडून वसावयाचें असलें तर वैस, नाहीं तर जा, तोंड काळें कर इथून. माझ्या पाशीं वेडे चार नकोत किंवा इतर तसलेच प्रकारहि नकोत, त्यांचा उपयोग व्हावयाचा नाहीं. मी विष्णुदास आहें. रसाला (शृंगाररसाला) हीन मानतों, माझ्याशीं लाडीगोडी नको.

शब्द—दिमाख = १ गर्व, २ रुसवा.

शेरा:—बायको लुगडें घेण्याचा हट्ट धरून बसली, रुसली—अशा प्रसंगाला अनुलक्षून असावा. पोक्तपणींचा. बायकांविषयीं हीन मत.

२७८.

भाव देवाचें उचित ।
भाव तोचि भगवंत ॥ १ ॥
धन्य धन्य शुद्ध जाती ।
संदेह कैंचा तेथें चित्तीं ॥ २ ॥

बहुत बराडी ।
देवावरी ते आवडी ॥ ३ ॥
तुका म्हणे हें रोकडें ।
लाभा अधिकारी चोखडें ॥ ४ ॥

पाठभेद:—च० ३ देवावरी–देवजवळीं.

अर्थ:—देवाला योग्य भावच. देवाला देण्याजोगें कांहीं असेल तर तो भावच. किंबहुना भाव म्हणजेच देव. भाव असला तर तो माणूस धन्य. शुद्धच तो. त्यांत संदेह कसला धरावयाचा ? शुद्ध भावानें देवाचे ठिकाणीं आवड फार. फार आशाळभूत मी. भाव एवढाच मागतों. भाव एवढाच रोकडा, खरा. अधिक लाभ रिचला, नाहींसा झाला, तरी चालेल. तो आम्हांला नको.

चर्चा:—च० २ धन्य धन्य...चित्तीं. ज्यांच्या मनांत संदेह नाहीं, त्यांची जातकुळी धन्य. म. ठ.

पण तो येथें कसा लागतो ? "तेथें" म्हणजे कोठें ? जे स्वभावतःच शुद्ध भावाचे असतात ते धन्य किंवा ज्यांच्या ठिकाणीं शुद्ध भाव आहे ते धन्य. त्यांचे ठिकाणीं संदेह कसचा ? असाच अर्थ सरळ लागतो.

च०–३ देवावरी ते आवडी––मी फार आशाळभूत, लोभी आहें. माझी आवड देवाच्याच ठिकाणीं बसली आहे. देवाखेरीज दुसरें मला कांहीं नको. किंवा मी फार आशाळभूत. मला देवच जवळ असावा असें वाटतें हींच माझी आवड. वा. ब. प.

देव जवळी आवडी–हा पाठ गौण वाटतो.

च० ४ "लाभ अधिक रिचो खडें."

—"लाभा अधिकारि चोखडें" हा पाठ कोणी सुचविला आहे. तो कोठून आणिला ? ग. कृ. प्रतीत तसा पाठ आहे व त्या ठिकाणीं "रोकडे" "चोखडे" असे निरनुस्वार शब्द आहेत. पोथींत तसा पाठ सांपडत नाहीं. म्हणून आहे तोच पाठ घेऊन "हें खडें रोकडें = रोखठोक आहे. मला देवावांचून दुसऱ्या कशानें समाधान होत नाहीं. इतर लाभ रिचो, नको, नाहींसा होवो" असा अर्थ करणें बरें.

लाभा अधिकारी चोखडें–असा पाठ घेऊन अर्थ केल्यास ' हें सर्व रोखठोक आहे, पण या लाभाला जे चोखडे, शुद्ध आहेत तेवढेच अधिकारी होतात. ' असा सरळ अर्थ लागतो. माडगांवकर.

पण " चोखडें " सानुस्वार आहे त्याची वाट काय ? वा. ब. प.

पाठ निरनुस्वार असेल तर हा अर्थ बरा. मं. ठ.

३ अधिक लाभाला खडे रिचों = रचतों, खडे घालतों. रा. व. मराठे.

या अर्थाला " रिचों " सानुस्वार पाहिजे.

शेरा—भावाचा महिमा.

२७९.

गौरव गौरवापुरतें ।
फळ सत्याचे संकल्प ॥ १ ॥
कठिण योगाहुनी क्षेम ।
ओकलिया होतो श्रम ॥ २ ॥
पावलें मरे सिवेपाशीं ।
क्लेश उरत ते क्लेशीं ॥ ३ ॥
तुका म्हणे बहु आणि ।
कठिण निघाँलिया रणीं ॥ ४ ॥

अर्थ—गौरव हा गौरवा पुरताच. (माणूस) जें फळ मनांत धरतें तेंच खरें. मनांत संकल्पिलेलें फळ प्राप्त झालें तर खरें. नाहीं तर व्यर्थ. श्रम हा लागलेला आहे. योगापेक्षां–इच्छिलेलें प्राप्त होण्यापेक्षां, त्याचें क्षेम तें मिळालें म्हणजे त्याचें जतन करणें हें, कठीण आहे तें ओकावें लागलें, सोडावें लागलें, तर तो त्याग दुःखाला मात्र कारण होतो. कोणी यात्रेला गेला, क्षेत्राच्या अगदीं शिवेपाशीं पोंचला आणि मेला, तर क्लेश तेवढे उरले, फलप्राप्ति मात्र कांहीं नाहीं.

तसेंच रणांत निघालें म्हणजे आणीबाणीचा प्रसंग मोठा कठीण आहे.

रणांत जाणें सोपें. पण तेथें गेल्यावर आणीबाणीच्या प्रसंगाला टिकणें मोठें कठीण आहे. तेव्हां, फळावांचून नुसतें गौरव व्यर्थ. फळ हेंच मुख्य.

डॉ. भांडारकर.

चर्चा—" फळ सत्याचे संकल्प " हा चरणार्ध शुद्ध दिसत नाहीं. गौरव गौरवापुरतें यांतील ' तें ' शीं जुळावयास द्वितीयार्धाचे शेवटीं " तें " पाहिजे " फळ सत्यच संकल्पें " असा पाठ आहे तोच जरा बदलून " फळ सत्य संकल्पे तें " असा वाचावा असें डॉ. भांडारकर म्हणतात. परंतु त्यांनीं लाविलेल्या अर्थानें माझें समाधान होत नाहीं. घेतलेला मार्ग मध्येंच सोडण्यांत अर्थ नाहीं, किंवा नुसता एखादा मार्गपत्करण्यांत अर्थ नाहीं, तो शेवटास नेण्यांत खरें गौरव आहे " असा एकंदर अभिप्राय असावा, असें डॉ. साहेबांचें म्हणणें. परंतु तसा अर्थ करितांना ओढाताण बरीच होते. मला वाटतें, 'Virtue is its own reward' या इंग्रजी म्हणीसारखींच "फळ सत्य संकल्प तें " ही म्हण असावी. असें धरल्यास अभंगाचा अर्थ थोडासा निराळा व जोरदार असा होतो; तो असाः—

गौरव किंवा बडेजाव हा बडेजावापुरताच. त्यांत कांहीं विशेष नाहीं. मोठेपण मोठेपणापुरतेंच. खरें फळ जें आहे तें सत्य संकल्पांतच आहे. सत्य सकल्प हेंच फळ. तो शेवटास जावो अगर मध्येंच खचो. तसें होणें शक्य आहे. कारण, तें सारेंच कठीण आहे.

संकल्पिताचा योग कठीण. व क्षेम त्याहूनहि कठीण. प्राप्ती कठीणच. संरक्षण त्याहूनहि कठीण. कारण तें असून सोडावें लागल्यास कठीण वाटतें. यात्रेचा संकल्पच विशेष. क्षेत्राच्या सीमेपर्यंत पोंचलें, आणि तिथें मृत्यू आला तर काय करावयाचें ? क्लेश तेवढे क्लेशाचे ठिकाणीं रहातात, पण संकल्पाचें फळ कांहीं जात नाहीं. त्याचप्रमाणें रणामध्यें निघालें म्हणजे आणीबाणीची वेळ कठीण खरीच. परंतु यशाची अपेक्षा नव्हे, संकल्प, हेंच फळ. असा अर्थ घेतां येईल.

वा. ब. प.

शब्द—योग = जोडणें, मिळाविणें, **क्षेम** = राखणें, जतन करणें.

लक्ष्यप्रयोग—तुका म्हणे बहु आणि कठिण..... ' आणि ' हें उभ. अव्यय वाक्याच्या आरंभीं पाहिजे तें क्रि. वि. व विशेषण यांच्या मध्यें घातलें आहे.

२८०

न संडी अवगुण । वर्म मानितसे सिण ॥ १ ॥
भोग देतां करिती काई । फुटतां यमदंडें डोई ॥ २ ॥
पाप पुण्य झाडा । देतां तेथें मोठी पीडा ॥ ३ ॥
तुका म्हणे वोला । माझ्या सिणली विठ्ठला ॥ ४ ॥

पाठभेद:--च० १ वर्म – वर्में.

अर्थ:—लोक अवगुण असेल ते सोडीत नाहींत. आणि त्या अवगुणांचा निषेध केला, वर्म काढलें, म्हणजे शीण मानतात. किंवा, वर्म–भजनाचें रहस्य देवाची भक्ती हें वर्म, हा उपाय, म्हणून सांगितला तर त्याचा कंटाळा करितात. पण भोग देण्याची पाळी येईल–आपल्या कर्माचीं फळें भोगावीं लागतील तेव्हां मग हे लोक काय करणार आहेत कोणास ठाऊक ? यमदंडानें डोकें फुटूं लागलें म्हणजे काय करणार आहेत ? परलोकांत पापपुण्याचा झाडा द्यावा लागेल तेव्हां फार जाचेल. देवा, मी जर यांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगावयाला लागलों तर हे लोक कंटाळतात.

शेरा:--लोकांना उपदेश करावयाला लागल्यानंतरचा–प्रौढपणींचा.

२८१.

पावे ऐसा नाश । अवघियां दिला त्रास ॥ १ ॥
अविटाचा केला संग । सर्व भोगी पांडुरंग ॥ २ ॥
आइताचि पाक । संयोगाचा सकळिक ॥ ३ ॥
तुका म्हणे धणी । सीमा राहिली होउनी ॥ ४ ॥

पाठभेद:—नाहींत.

अर्थ:—नाश पावे ऐसा अवघियां–सर्वांना–त्रास दिला. सुत मित्र धन दारा या प्रपंच पसाऱ्याला असा त्रास दिला कीं त्याचा नाश व्हावा, व त्याचा त्रास मला चुकावा. आणि, सर्वभोगी–सर्व भोगणारा–असा जो पांडुरंग त्याचा अविटाचा, अक्षरा!चा, संग केला. हा संयोग म्हणजे सुखाचा पाक होय. ही उत्तम रसई बनली. सर्व भोगणारा जो परमेश्वर त्याच्याशीं ऐक्य झाल्यावर

सर्व भोक्तृत्व आपणांस मिळतें. अत्यंत परमावधीची धणी, आनंदाची परमावधी, होऊन राहिली.

चर्चा:—च० १ " पावे ऐसा नाश " ज्यानें सगळयांना त्रास दिला तो हा असा नाश पावतो. सर्व लोकांना त्रास देणारा भक्त नाश पावतो असें तुम्हांला (लोकांना) वाटतें ना ? होय मीहि म्हणतों, तो नाश पावतो तो असा. असाहि अर्थ होईल व तो सरस वाटतो. वा. भावे. व वा. व. प.

शब्द—धणी = परमानंद. सीमा = परमावधि.

शेरा—पोक्तपणींचा.

२८२

दुर्बळ हें अवघें जन । नारायणीं विमुख ॥ १ ॥
झडोनियां हात जाती । पात्र होती दंडासी ॥ २ ॥
सिदोरी तें पापपुण्य । सवें सिण भिकेचा ॥ ३ ॥
तुका म्हणे पडिला वाहो । कैसा पहा हो लटिक्याचा ॥४॥

पाठभेद—च. १ विमुख – सन्मुख.

अर्थ—हें जग दुबळें आहे. नारायणाला विसरतें. हात (पाय) झडून जातात, मरतात, तेव्हां येथील सर्व संबंध जाऊन यमदंडास पात्र होतात. त्यांची शिदोरी म्हणजे पापपुण्य; कर्म. तें त्यांच्या बरोबर जावयाचें. आणखी, भिकेचा शीण बरोबर जाणार. म्हणजे पापपुण्यरूपी भांडवल, शिदोरी त्यांच्या बरोबर असल्यामुळें भिकाऱ्याचे शीणच त्यांना करावे लागणार. तु. म्ह. हा असला लटक्याचा सोस आणि वहिवाट कशी, किती, पडली आहे ती पहा.

चर्चा—च. ३–४ भिकेचा शीण.

१ स्वतःचें कांहीं साधन नसल्यामुळें आध्यात्मिक भीकच मागावी लागणार. डॉ. भांडारकर.

२ हा सगळया जनाचा वाहो-प्रघात–देवाला विमुख होण्याचा केवळ भिकेचा शीण, पर्यायानें, अवदशेला नेणारा शीण आहे. असा अर्थ बरा असें वाटतें. वा. व. प.

२८३

वाजतील तुरें । येणें आनंदें गजरें ॥ १ ॥
जिंकोनियां अहंकार । पावटणी केलें शिर ॥ २ ॥
काळा नाहीं वाव । परा श्रमां कोठें ठाव ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । सोपें वैकुंठासि जातां ॥ ४ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--आज मी अहंकार जिंकून शिर ~~पावटणी~~ केलें. मस्तक इतकें वाकविलें कीं, ज्यानें यावें त्यानें त्यावर पाय ठेवून जावें, हवें त्यानें तुडवावें, तरी मला राग येणार नाहीं, इतकी नम्रता मीं आंगीं आणिली आहे.

वा. ब. प. मं. ठ.

आतां काय, तुरें वाजतील ! आनंदाचा गजर होईल ! आतां काळाला देखील वाव नाहीं. मग इतर दुःखांना जागा कोठून ? तु. म्ह. आतां वैकुंठाला जावयाला सोपें.

शब्द-तुरें = तुताऱ्या, शिंगें. **पावटणी** = पाय ठेवण्याची जागा. **वाव** = अवकाश, जागा.

शेरा--मुमुक्षुस्थितींतील.

२८४.

झाड कल्पतरू । न करी याचकीं अव्हेरू ॥ १ ॥
तुम्ही सर्वीं सर्वोत्तम । ऐसा विसरतां धर्म ॥ २ ॥
परिसा तुमचें देणें । तो त्या जाणे अभिमानें ॥ ३ ॥
गाऱ्हाण्यानें तुका । गजें मारूनियां हांका ॥ ४ ॥

पाठभेद--च० २ ऐसें विसरतां नाम-असाहि पाठ आहे.

अर्थ--कल्पतरू झाड असून देखील आपला धर्म विसरत नाहीं. याचक आला म्हणजे त्याला वाटेल ती वस्तू देतो. आणि देवा, तुम्ही तर सर्वोत्तम असे असून आपला धर्म विसरतां हें कसें ? दयेचे सागर असें म्हणवितां आणि माझ्यावर कृपा कांहीं करीत नाहीं हें कसें ? परीस हा दगड; त्याला तुमचें

देणें. लोखंडाचें सोनें करावयाची शक्ति तुम्हीं त्याला दिली. पण तो आपला स्वधर्म अभिमानानें पाळतो. आणि तुम्ही तुक्याला हाका मारीत ठेवतां !

लक्ष्यप्रयोग—सर्वीं सर्वोत्तम--पुनरुक्तीमुळें मूळ शब्दाचा अर्थ दृढ होतो.

शेरा—काकुळतीचा-तरुणंपणींचा.

२८५.

वसवावें घर । देवें बरें निरंतर ॥ १ ॥
संग आसनीं शयनीं । घडे भोजनीं गमनीं ॥ २ ॥
संकल्प विकल्प । मावळोनि पुण्यपाप ॥ ३ ॥
तुका म्हणे काळ । अवघा गोविंद सुकाळ ॥ ४ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--माझ्या या देहाचे ठिकाणीं, मनांत, देवानें घर वसवावें, आपलें घरच देवानें या ठिकाणीं करावें; म्हणजे बसतां, उठतां, निजतांना, जातां येतां, सर्व वेळीं सर्व ठिकाणीं मला देवाचा संग घडेल. संकल्पविकल्प, बरे वाईट विचार सगळे जातील. पुण्यपाप मावळेल. आणि सर्वकाळ सुकाळ होईल.

शेरा—कळकळीचा.

२८६.

येथील हा ठसा । गेला पडोनियां ऐसा ॥ १ ॥
घरीं देवाचा अवोला । त्यासी तेचि सवे त्याला ॥ २ ॥
नाहीं पाहावें लागत । एकाएकीच ते रित ॥ ३ ॥
तुका म्हणे जन । तयामध्यें येवढें भिन्न ॥ ४ ॥

पाठभेद--च० २ त्यांची-हा पाठ बरा. च० ३ ते रित-तें रितें.

वा. ब. प.

अर्थ--(१) या लोकांत हा असा ठसाच पडून गेला आहे. प्रघातच

पडून गेला आहे. देवळांत जाऊनही त्यांचें तोंड उघडत नाहीं. कोणी भजन करित नाहीं. एकेकाची एकेक रीत. त्यांना डोळे असून बघावेसें वाटत नाहीं. पहाण्याची जरूर नाहीं. सगळे लोक एकच. पण त्यांच्यांत हें इतकें वेगळें आहे. डॉ. भांडारकर..

(२) हा ठसा असा पडलेलाच आहे. जन सर्व एकच. पण त्यांत एवढा भिन्न भाव आहे कीं कोणी मौन स्वीकारतात; कोणीं पहाणें टाकतात. त्यांची ती संवय, यांची ही रीत. रा. ब. मराठे.

३ हा अभंग भांडणाऱ्या माणसांना अनुलक्षून असावा.

शैव वैष्णवांस उद्देशून--यांचा हा ठसाच पडून गेला आहे. देवाच्या घरीं देखील यांचा अबोला. हे आपलें वैर बिसरत नाहींत. ज्याला जी एकदां संवय लागली ती सुटत नाहीं. एकमेकांकडे पहाण्याची पर्वा करीत नाहींत. एकेकाची एकेक तऱ्हा आहे. जन हे सारे एकच. पण त्यांच्यामध्यें असे वेगवेगळे प्रकार आहेत. हा अर्थ सरस वाटतो. वा. ब. प.

शेरा--भिन्नपणा-भेद.

२८७.

करितां देवार्चन । घरा आले संतजन ॥ १ ॥
देव सारावे परते । संत पुजावे आरते ॥ २ ॥
शाळिग्राम विष्णुमूर्ति । संत हो कां भलते याती ॥ ३ ॥
तुका म्हणे संधी । अधिक वैष्णवांची मांदी ॥ ४ ॥

पाठभेद--च० २ देव-तरि ते.

अर्थ--देवपूजा करीत असतां घरीं संत आले. असें झालें तर देवांची पूजा करावयाची म्हणून संतांना तिष्ठत ठेवूं नये. देव परते, पलीकडे, बाजूला, सारावे आणि संतांचा सत्कार आधीं करावा. संत असले मग ते भलत्या जातीचे का असेनात, ते विष्णूमूर्ति, शाळिग्रामासारखेच. वैष्णवांचा मेळा येणें हा विशेषच सुप्रसंग; एकटा दुकटा संत सज्जन घरीं येण्यापेक्षां दहा पांच आले तर तितकें बरेंच. The more the merrier.

चर्चा—देवार्चन करितांना संत आले तर देवापरीस संतांचा मेळाच अधिक, त्यांचेंच महत्त्व विशेष. वा. भावे.

शब्द—मांदी = मेळा-समुदाय.

शेरा—संतमहिमा.

२८८.

ज्याची खरी सेवा । त्याच्या भय काय जीवा ॥ १ ॥
करितां स्वामीसवें वाद । अधिक अधिक आनंद ॥ २ ॥
असावा तो धर्म । मग साहों जातें वर्म ॥ ३ ॥
वदे वाग्देवी । तुका विठ्ठली गौरवी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—ज्याची सेवा खरी आहे त्याला भय कसलें ?

स्वामीसवें वाद करितां देवाशीं आध्यात्मिक संवाद करितांना अधिकाधिक आनंद होतो. अंगांत धर्म असावा, खरेपणा असावा. म्हणजे रहस्य कळतें, पदरीं पडतें. तोडांतून वाग्देवीच्या प्रसादानें जीं कांहीं अक्षरें निघतात तीं अशींच. त्यांच्या योगानें तुका विठ्ठल माउलींचें गौरव करितो.

चर्चा—च० ३ साहों जातें वर्म. "रहस्य साधलें जाते, सहन होतें, पदरीं पडतें" असें मं. ठ. पण त्या अर्थाची शंका आहे. खालीं "साहिलें जातें, सहन होतें" असा अर्थ केला आहे. वा. ब. प.

किंवा, धर्म आंगीं असला म्हणजे मग कोणी वर्मी बोललें तरी तें साहिलें जातें, सहन होतें.

शेरा—साधा. मध्यम वयांतील. लौकिकी अनुवादाची छटा.

२८९.

देवें जीव धाला । संसार तो कडू झाला ॥ १ ॥
तेचि येतील ढेंकर । आनंदाचे हरिहर ॥ २ ॥

वेधि आणिकांस । ऐसा जया अंगीं कस ॥ ३ ॥
तुका म्हणे भूक । येणें न लगे आणिक ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—देवाचें सेवन केल्यामुळें जीवाचें समाधान झालें. आणि आतां संसार कडू वाटावयाला लागला आहे. त्या देवसेवेनेंच पोट भरलें आणि तेच ढेंकर यावयाला लागले. या स्थितींत, देवानें घालेल्या स्थितींत, असा कांहीं कस आहे कीं त्यामुळें जीव इतर विषयांकडे गुंतण्याऐवजीं, त्यांनाच आपल्याकडे वेधतो. ओढून घेतो–दुसरी कशाचीही भूक लागत नाहीं.

चर्चा—३. या देवें घाल्या स्थितींत असा कांहीं कस आहे कीं त्यानें सर्व विषयांचा नाश होतो.

शब्द—जया अंगीं. १ "देवें घाला" या स्थितीचे ठिकाणीं किंवा, (२) "देव" या अन्नाचे अंगीं.

वा. ब. प.

२९०.

नाम साराचेंही सार । शरणागत यमाकिंकर ॥ १ ॥
नाम उत्तम उत्तम । वाचें वोला पुरुषोत्तम ॥ २ ॥
नाम जपतां चंद्रमोळी । नामें तरला वाल्हाकोळी ॥ ३ ॥
तुका म्हणे वर्णूं काय । तारक विठ्ठलाचे पाय ॥ ४ ॥

पाठभेद— नाहींत.

अर्थ—सर्व सारांचें सार म्हणजे देवाचें नाम. यमकिंकर देखील नामाघुढें वांकतात; त्याला शरण येतात. नाम अतिशय चांगलें. म्हणून, विठ्ठल, विठ्ठल असें म्हणा. शिव देखील नामाच्या जपानें तरला. त्याचप्रमाणें वाल्या कोळी हि तरला. तु. म्ह. मी नामाचा महिमा काय वर्णन करूं? विठोबाचे पाय तारक आहेत.

शब्द—वाल्याकोळी = वाल्मिकी.
शेरा–नाममहिमा; लौकिकी अभंग.

२९१

गातों भाव नाहीं अंगीं । भूषण करावया जगीं ॥ १ ॥
परि तूं पतितपावन । करीं साच हें वचन ॥ २ ॥
मुखें म्हणवितों दास । चित्तीं माया लोभ आस ॥ ३ ॥
तुका म्हणे दावीं वेश । तैसा अंतरीं नाहीं लेश ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—मनांत भाव नसून मीं वरवर देवाचे गुण गातों; केवळ लोकांत भूषण व्हावें, लोकांनीं बरें म्हणावें म्हणून गातों. पण देवा, तूं पतितपावन आहेस. तें आपलें नांव खरें कर. जरी मी पतित आहें तरी मला हात दे. तोंडानें तुझा दास असें म्हणवितों. पण मनांत संसाराची माया, लोभ, आशा, हींच भरलीं आहेत. जसा बाहेर दिसतों, जसा माझा वेष तसा मी खरोखर नाहीं.

शेरा—स्वतांचें वर्तन, व तें जसें असावें या दोहींतला विरोध मनांत आणून लिहिलेला.

२९२

द्रव्य असतां धर्म न करी । नागविला राजद्वारीं ॥ १ ॥
माय त्यास व्याली जेव्हां । रांड सटवी नव्हती तेव्हां ॥ २ ॥
कथाकाळीं निद्रा लागे । कामीं श्वानापरी जागे ॥ ३ ॥
भोग स्त्रियेसि देतां लाजे । वस्त्र दासीचें घेऊनि निजे ॥ ४ ॥
तुका म्हणे जाण । नर गाढवाहुनी हीन ॥ ५ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—द्रव्य असून दानधर्म करीत नाहीं. पण राजद्वारीं दंड द्यावे लागले, नागविला, तरी त्याला त्याची खंत नाहीं. अशा माणसाला माय व्याली तेव्हां ती रांड विधवा नव्हती; असती तर बरें झालें असतें. म्हणजे असा कुपुत्र जन्मालाच आला नसता. कथाकाळीं निजतो आणि काम भोगांकरितां कुत्र्याप्रमाणें रात्रभर जागा रहातो. स्वस्त्रीला भोग देतां लाजतो आणि दासीचें वस्त्र पांघरून निजतो. असा माणूस गाढवाहूनहि नीच.

चर्चा—२ रांड.....तेव्हां.

१ त्याची माय तेव्हां रांड = विधवा नव्हती. आधींच नवरा मेला असता तर बरें नसतें का झालें ? किंवा,

२ सटवी रांड त्या वेळीं नव्हती, कोठें काळें करून गेली होती. नाहीं तर तिनें त्याच वेळीं, जन्मतांच, अशा पोराचा नाश करून टाकिला असता.

शेरा—दुर्जनाच्या वर्तनाचा निषेध. तात्कालीन समाजस्थितांचा निदर्शक.

२९३

मुखें बोले ब्रह्मज्ञान। मनीं धन अभिमान ॥ १ ॥
ऐशियाची करितां सेवा । काय सुख होय जीवा ॥ २ ॥
पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥ ३ ॥
विरळा ऐसा कोणी । तुका त्यासी लोटांगणी ॥ ४ ॥

पाठभेद—च. १ मुखें–सुखें. धन अभिमान–धन आणि मान.

अर्थ—तोंडानें ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतो आणि मनांत धनलोभ आहे. अशा माणसाची सेवा करावी लागली तर जीवाला काय सुख मिळावयाचें आहे ? पोटासाठीं या कलियुगांत पुष्कळांनीं संतपणाचें ढोंग पत्करिलें आहे. पण खरा संत विरळा. तसा कोणी असलाच तर त्याला तुका लोटांगण घाली.

शेरा—ढोंग नको.

२९४

एक वेळ प्रायश्चित । केलें चित्त मुंडण ॥ १ ॥
अहंकार नांवें दोष त्याचे ओस पाडिले ॥ २ ॥
अनुतापें स्नानविधि । यज्ञ–सिद्धि देहहोम ॥ ३ ॥
जीवाशिवा होतां चुका । तेथें तुका विनटला ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ त्याचें ओस पाडिलें–त्याचे ओस पाडिले.

अर्थ—चित्त मुंडन केलें. एकदमच प्रायश्चित केलें. अहंकार नांवाचा दोष

आहे त्याचें ओस पाडलें, वाटोळें करून टाकलें. प्रायश्चित करावयाचें म्हणजे स्नानविधि लागतो, तो अनुतापाच्या रूपानें पार पाडिला. देहाचा होम करावयाची तयारी करून यज्ञाची सिद्धि केली. या प्रमाणें एकदांच सर्व प्रायश्चित्त केलें. जीवशिवांचा हिशेब चुकता झाला, विल्हेवाट लागली. भेदभाव नाहींसा झाला. म्हणजे त्या स्थितींत तुकारामाला आनंद होतो.

चर्चा चरण २ अहंकार नावें = अहंकार या नावांचा. त्याचें ओस पाडिलें –" इंदु. प्रत. ओस = नपुं. नाम. ओसाड पाडलें = वाटोळे केलें, किंवा " ओस " विशेषण ' गांव ' या अध्याहृत नामाचें.

च. ४ चुका = हिशेबाचा निकाल. चुकवती, चुकती = विल्हेवाट.

वा. ब. प.

२९५.

त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं ।
आमचें त्या काई असे ओझें ॥ १ ॥
पाषाणाचे पोटीं बैसला दर्दूर ।
तया मुखीं चार कोण घाली ॥ २ ॥
पक्षी अजगर न करी संचित ।
तयासी अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥
तुका म्हणे तया भार घातलिया ।
उपेक्षीना दयासिंधु माझा ॥ ४ ॥

पाठभेद:—नाहींत.

अर्थ—त्रैलोक्याचें, सर्व विश्वाचें, पाळण करितांना देवाला कंटाळा आला नाहीं, त्याला आमच्या सारख्या एखाद्या जीवाचें पाळण करावयाचें ओझें तें काय व्हावयाचें आहे. दयडाच्या भगदाडांत बेडूक बसून जिवंत रहातो. त्याच्या तोंडीं चारा कोण नेऊन घालतें ? पक्षी किंवा साप अन्नाचा सांठा करून ठेवीत नाहींत. त्यांचा प्रतिपाळ देवच करतो कीं नाहीं ? तु. म्ह.

आपण त्याच्यावर भार घातला म्हणजे तो आपली उपेक्षा करणार नाहीं. तो कृपाळू आहे.

शब्द—उबगणें = त्रासणें, कंटाळणें. दर्दूर = बेडूक.

२९६.

वोली मैंदाची बरवी असे ।
वाटे अंतरीं घालावे फांसे ॥ १ ॥
कैसा वरिवरि दिसताहे चांग ।
नव्हे भाविक केवळ मांग ॥ २ ॥
टिळा टोपी माळा कंठीं ।
अंधारीं नेउनि चेपी घांटी ॥ ३ ॥
तुका म्हणे तो केवळ पुंड ।
त्यावरि वाजती यमदंड ॥ ४ ॥

पाठभेद—

अर्थ—दुष्ट लोकांचें बोलणें गोड असतें, मैंदाचें बोलणें गोड असतें त्याप्रमाणें. मैंद गोड बोलतो. पण त्याच्या मनांत दुसऱ्याच्या मानेला फांसा घालावा असें असतें. तो वरवर चांगला दिसतो. पण तो खरा भाविक चांगला नव्हे. मांग आहे. टिळा लावतो, टोपी घालतो, गळ्यांत माळा घालतो. पण वेळ आली कीं अंधारांत नेऊन गळा चेपावयाला चुकत नाहीं. तु. म्ह. तो चोर. त्याच्या अंगावर यमाचे फटकारे उ-तील.

२९७.

दोष पळती कीर्तनें । तुझ्या नामसंकीर्तनें ॥ १ ॥
हें कां करूं आदरिलें । खोटें वचन आपुलें ॥ २ ॥
तुम्ही पापा भीतां । आम्हां उपजावया चिंता ॥ ३ ॥
तुका म्हणे सेवा । काळिकाळा जिंकी देवा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—देवा, "माझ्या नामाच्या कीर्तनानें सर्व दोष जातील" असें तुमचें वचन आहे. पण यावेळीं, माझ्याघुरतें तें खोटें करून दाखवावयाचें असें आपण कां मनांत आणलें आहे ? देवा तुम्हीं पापाला भिऊन माझ्याकडे येत नाहीं. आणि त्यामुळें तुम्हीं येतां कीं नाहीं,—भक्तवत्सल आहांत कीं नाहीं —अशी शंका मात्र आमच्या मनाला उत्पन्न होते. पण देवा, तुमची सेवा काळ-काळांना देखील जिंकील हें मला माहीत आहे.

२९८.

करा नारायणा । माझ्या दुःखाची खंडणा ॥ १ ॥
वृत्ति राखा पायांपाशीं । वस्ती करूनि मानसीं ॥ २ ॥
पाळोनियां लळा । आतां पाववावें फळा ॥ ३ ॥
तुका म्हणे दीनें । त्यांचा हरतिया सीण ॥ ४ ॥

पाठभेद—च० २ करुनि–धरुनि. च० ४ दीनें–दीन.

अर्थ—देवा नारायणा, माझ्या दुःखाचें खंडन करा. माझ्या मनांत वसती करून माझी वृत्ति आपल्या पायीं स्थिर राहील असें करा. माझा लळा पाळून आतां मला फळाप्रत पोंचवा. तु. म्ह. देवा, आम्ही दीन आहोंत. आमचा शीण हरण करा.

चर्चा—च० ४.

२९९.

मीं तो दीनाहुनि दीन । माझा तुज अभिमान ॥ १ ॥
मी तों आलों शरणागत । माझें करावें स्वहित ॥ २ ॥
दिनानाथा कृपाळुवा । सांभाळावें आपुल्या नांवा ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । भलें नव्हे मोकलितां ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ--देवा, मी दीनाहूनहि दीन आहें. माझा अभिमान तुला.मी तुला शरण आलों आहें. आतां माझें उत्तम हित असेल तें करा. हे दीननाथा, कृपाळू प्रभो, आतां आपण मला टाकून दिलेंत तर तें बरें दिसणार नाहीं. आपली कीर्ती दीनांचें रक्षण करणारा अशी आहे, तिचें रक्षण करा.

शब्द—मोकलितां=टाकून दिलें तर.

३००.

सुख वाटे तुझे वर्णितां पवाडे ।
प्रेम मिठी पडे वदनासी ॥ १ ॥
व्याले दोन्ही पक्षी एका वृक्षावरी ।
आला दुराचारी पारधी तो ॥ २ ॥
वृक्षाचिया माथां सोडिला ससाणा ।
धनुष्यासि बाणा लावियेलें ॥ ३ ॥
तये काळीं तुज पक्षी आठविती ।
धांवें गा श्रीपती मायबापा ॥ ४ ॥
उडोनियां जातां ससाणा मारील ।
बैसतां विंधील पारधी तो ॥ ५ ॥
ऐकोनियां धांवा तया पक्षियांचा ।
धरिला सर्पाचा वेष वेगीं ॥ ६ ॥
डंखोनि पारधी भूमीसी पाडिला ।
बाण तो लागला ससाण्यासी ॥ ७ ॥
ऐसा तूं कृपाळु आपुलिया दासा ।
होसील कोंवसा संकटींचा ॥ ८ ॥
तुका म्हणे तुझी कीर्ति त्रिभुवनीं ।
वेदाचिये वाणी वर्णवेना ॥ ९ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ--देवा, तुझे पवाडे वर्णन करितांना सुख वाटतें. आनंद होतो. इतका कीं शेवटीं तोंडाला त्या गोडीची मिठी बसते. देवा, तूं कृपाळू आहेस.

उदा० एका वृक्षावर दोन पक्षी व्याले. त्या ठिकाणीं एक दुष्ट पारधी आला. त्यानें वृक्षाच्या माथां ससाणा सोडिला, आणि आपण धनुष्याला बाण लाविला. त्या वेळीं पक्ष्यांनीं तुझें स्मरण केलें तें असें. श्रीपती, देवा धांव. उडून गेलों तर ससाणा मारील, बसलों तर व्याध मारील. तेव्हां धांव. त्या पक्षांचा धांवा ऐकून, देवा, तूं तांबडतोंब सापाचें स्वरूप धरिलेंस. पारध्याला दंश करून जमिनीवर पाडिलेंस. त्याचा बाण चुकून ससाण्याला लागला. असा तूं कृपाळू आहेस. आपल्या भक्तांना संकटकाळीं आधार होशील; होत असतोस. देवा, तुझी कीर्ति त्रिभुवनांत आहे. वेदवाणीला देखील वर्णवत नाहीं.

लक्ष्यप्रयोग —होशील–रीतिदर्शकरूप.

३०१.

नाहीं दुकळलों अन्ना । परि या मान जनार्दना ॥ १ ॥
देवा केला सकळसाक्षी । काळीं आणि शुक्लपक्षीं ॥ २ ॥
भोगी भोगविता । बाळासवें तोचि पिता ॥ ३ ॥
कर्म अकर्म जळालें । प्रौढ तुका तें उरलें ॥ ४ ॥

पाठभेद—च. १ दुकाळलों. ग. कृ. च. १ उत्तरार्ध–" या " नाहीं. च. ४ " प्रौढ तुक्यातें उरलें " ग. कृ. च. ४ प्रौढें.....उरलें. चांगलें,

माडगांवकर.

अर्थ—मी अन्नाला मोताद झालों नाहीं. तरी देखील मला या देवाविषयीं, जनार्दनाविषयीं मान वाटतो. देवाला मीं सर्व साक्षी केला. कृष्णपक्षीं आणि शुक्लपक्षीं देव साक्षी केला. सर्व तोच असा भाव मनांत धरिला. भोगणारा, भोगविणारा, सर्व कांहीं तोच असें मानिलें. बाळ तोच, पिता तोच, असें मानलें. आतां माझें कर्म अकर्म सर्व जळालें. तुक्याला जें प्रौढ हिताचें तेवढें राहिलें आहे.

किंवा २ मी काहीं अन्नाला मोताद नाहीं. पण या देवाला फार मान आला आहे, ऐट चढली आहे. कृष्णपक्षीं, शुक्लपक्षीं सर्वत्र देव केला, देवाचें पूजन केलें, याला सगळे साक्षी आहेत; भोग घेत असतां, भोग देत असतां, मुला-

बरोबर खेळतांना, सर्व प्रसंगीं–देव हाच माझा पिता असें केलें. पण त्याला फार मान. आतां कर्म अकर्म कांहीं नको. संगळें जळालें. मींच (तुकाच) त्याच्यापेक्षां श्रेष्ठ–एवढेंच उरलें. (प्रौढ = मोठेपणा)

३ **आवटे** यांच्या आवृत्तींत हा अभंग "देवाशीं सलगीचीं भाषणें" या सदरांत दिलेला आहे. तसा धरून अर्थ केल्यास:—

३ मी कांहीं अन्नाला मोताद झालों नाहीं. अन्नाला मोताद होऊन कांहीं देवाकडे आलों नाहीं. तरी पण या जनार्दनाला फार मान चढला आहे. सदा सर्वकाळ देव केला याला सर्व साक्षी आहेत. पण देवाला त्याचें कांहींच नाहीं. तेव्हां तो आमचा पिताच नव्हे. पिता कोणाला म्हणावयाचें ? जो आपण भोग भोगतांना, बाळाला बरोबर घेऊन भोगवितो, भोग घेण्याला शिकवितो तो पिता. (असें वात्सल्य या देवाच्या ठिकाणीं दिसत नाहीं.) आतां काय त्याचें ? जाऊं द्या. आम्हांला कशाला पाहिजे जनार्दन ? आमचें कर्म अकर्म जळालें. हेंच आमचें प्रौढ. तुका म्हणतो—हेंच प्रौढ उरलें; यांतच आम्हांला अभिमान.

शेरा—मध्यमस्थितीतला.

३०२

संत मागे पाणी नेदी एक चूळ ।
दासीस आंघोळी ठेवी पाणी ॥ १ ॥
संतांसी देखोनि होय पाठमोरा ।
दासीचिया पोरा चुंबन देतो ॥ २ ॥
संतांसी देखोनि करितो टवाळ्या ।
भावें धुतो चोळ्या दासीचिया ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याच्या तोंडावरि थुंका ।
जातो यमलोका भोगावया ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—संत पाणी मागतो त्याला चूळभरहि देत नाहीं. आणि दासीला आंघोळीला पाणी ठेवतो. संतांना पुढें पाहून पाठ वळवितो आणि बटकीच्या

पोरांना आर्जवून त्यांचे मुके घेतो. संतांना पाहून टवाळ्या करितो आणि दासांच्या चोळ्या धुतो. अशा माणसाच्या तोंडावर थुंका. तो आपल्या कर्मांचीं फळें भोगावयाला यमपुरीला जातो.

शब्द—टवाळ्या = चेष्टा.

झोरा—तात्कालीन परिस्थिति.

३०३

एक प्रेमगुज ऐकें जगजेठी ।
आठवली गोष्टी सांगतसें ॥ १ ॥
एक मृग दोन्ही पाडसांसहित ।
आनंदें चरत होतीं वनीं ॥ २ ॥
अवचिता तेथें पारधी पावला ।
घेऊनियां आला श्वानें दोन्ही ॥ ३ ॥
एकीकडे त्याणें चिरिल्या वाघुरा ।
ठेविलें श्वानपुत्रा एकीकडे ॥ ४ ॥
एकीकडे तेणें वोणवा लाविला ।
आपण राहिला एकीकडे ॥ ५ ॥
चहूंकडोनियां मृगें वेढियेलीं ।
स्मरों तीं लागलीं नाम तुझें ॥ ६ ॥
राम कृष्ण हरि गोविंदा केशवा ।
देवाचिया देवा पावें आतां ॥ ७ ॥
कोण रक्षी आतां ऐसिये संकटीं ।
वापा जगजेठी तुजविण ॥ ८ ॥
आइकोनि तुम्ही तयांचीं वचनें ।
कृपाअंत;करणें कळवळिलां ॥ ९ ॥
आज्ञा तये काळीं केली पर्जन्यासी
वेगीं पावकासी विझवावें ॥ १० ॥

ससें एक तेथें उठवुनी पळाविलें ।
तया पाठीं गेलीं श्वानें दोन्ही ॥ ११ ॥
मृगें चमकोनी सत्वर चाललीं ।
गोविंदें रक्षिलीं म्हणोनियां ॥ १२ ॥
ऐसा तूं कृपाळुदयाळु आहेसी ।
आपुल्या भक्तांसी जिवलगा ॥ १३ ॥
ऐसी तुझी कीर्ति जीवीं आवडती ।
रखुमाईच्या पति तुका म्हणे ॥ १४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—हे जगजेठी, एक प्रेमगुज ऐक. आठवली आहे ती गोष्ट सांगतों. एक हरिणी आपल्या पाडसांसह वनांत आनंदानें चरत होती. त्या ठिकाणीं एक पारधी दोन कुत्रीं घेऊन अकस्मात आला. त्यानें एकीकडे जाळीं टाकिलीं व दुसरीकडे कुत्रीं ठेविलीं. एकीकडे वणवा पेटविला आणि स्वतः एकीकडे तो आपण उभा राहिला. हरिणें चोहोंकडून वेढिलीं. तेव्हां तीं तुझें स्मरण करूं लागलीं. रामा, कृष्णा, गोविंदा, हरी, केशवा, देवांच्या देवा, आतां पाव. बापा जगजेठी, तुझ्याशिवाय या संकटांतून आम्हांला दुसरें कोण रक्षील ? हीं त्यांचीं बोलणीं ऐकून, देवा तुम्हांला कळवळा आला. तेव्हां पर्जन्याला आज्ञा केली कीं वणवा लवकर विझवावा. तेथें एक ससा उठविला व पळावयाला लाविला त्या वरोवर कुत्रीं त्याचे मागें लागलीं. आणि हरणें चटदिशी बाजूनें निघून गेलीं. गोविंदानें रक्षण केलें म्हणून तीं वांचलीं. तूं असा कृपाळू आहेस. आपल्या भक्तांचा जिवलग आहेस. तु. म्ह. देवा, रखुमाईच्या पती, अशा प्रकारची तुझी कीर्ति मला आवडते.

शब्द—वाघुरा = जाळीं.

लक्ष्यप्रयोग—वाघुरा चिरिल्या = जाळीं पसरिलीं, जाळीं टाकिलीं.

शेरा—ईश्वरीलीला अगाध. तरुणपणींचा. संपादक.

३०४.

आशावद्ध वक्ता । भय श्रोतयांच्या चित्ता ॥ १ ॥
गातो तेंहि नाहीं ठावें । तोंड वाशी कांहीं द्यावें ॥ २ ॥
झालें लोभाचें मांजर । भीक मागे दारोदार ॥ ३ ॥
उभयतां लोभी मन । वांयां गेलें तें भजन ॥ ४ ॥
बहिरे मुके एके ठायीं । तैसें झालें तया दोहीं ॥ ५ ॥
माप आणि गोणी । तुका म्हणे रितीं दोन्हीं ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—हरिदास किंवा वक्ता आशाबद्ध असला म्हणजे श्रोत्यांच्या चित्ताला धाक पडतो कीं हा कांहीं मागेल कीं काय ? अशा वेळीं त्यांचें चित्त भजनाकडे लागत नाहीं, व भजन व्यर्थ होतें. कारण दोघेही लोभाला गुंतलेले. वक्त्याला मिळकतीची आशा असल्यामुळें भजनाकडे त्याचें चित्त लागत नाहीं. व श्रोत्याला देण्याची इच्छा नसल्यामुळें त्याचेंहि चित्त लागत नाहीं.

३ एक वहिरा आणि एक मुका अशांची गांठ पडली म्हणजे जशी अवस्था होईल तसें दोघांचें होतें.

४ किंवा, जसें माप तशी गोणी; दोन्ही रिकामींच. वक्ता मापासारखा, त्याला सांगावयाला कांहीं नाहीं, सांगण्यांत चित्त नाहीं म्हणून रिकामा. श्रोत्याचें मन ऐकण्याकडे नाहीं म्हणून तोहि रिकामाच.

शेरा—पैशाकरितां भजन करणारांवर तडाखा. वा. ब. प.

३०५.

विठ्ठला रे तूं उदाराचा राव ।
विठ्ठला तूं जीव या जगाचा ॥ १ ॥
विठ्ठला रे तूं उदाराची रासी ।
विठ्ठला तुजपाशीं सकळ सिद्धी ॥ २ ॥
विठ्ठला रे तुझें नाम बहु गोड ।
विठ्ठला रे कोड पुरविसी ॥ ३ ॥

विठ्ठला रे तुझें श्रीमुख चांगलें ।
विठ्ठला लागलें ध्यान मनीं ॥ ४ ॥
विठ्ठला रे वाचे बोला बहुरस ।
विठ्ठला रे सोस घेतला जीवें ॥ ५ ॥
विठ्ठला रे शोक करीतसे तुका ।
विठ्ठला तूं ये कां झडकरी ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—देवा, विठ्ठला, तूं उदारांचा राजा आहेस, तूं या जगाचा जीव आहेस. विठ्ठला, तूं उदाराची, उदारपणाची, रासच आहेस; तुझ्यापाशीं सर्व सिद्धि आहेत. विठ्ठला तुझें नांव फार गोड; तूं कोड, कौतुक, हौस पुरवितोस. विठ्ठला, तुझें श्रीमुख फार सुंदर आहे. तुझें ध्यान माझ्या मनांत भरलें. तुझें ध्यान मला लागलें. वाचेनें विठ्ठलच बोला; तोच बहुरस आहे. त्याचा माझ्या जीवानें सोस घेतला. किंवा मी, जीवें—मनापासून—त्याचाच सोस घेतला. तु. म्ह. मी कष्टी झालों आहे. म्हणून, देवा, तूं लवकर ये कसा.

शेरा—साधा, भजनी अभंग.

३०६.

चाहिर पडिलों आपल्या कर्तव्यें ।
संसारासि जीवें वेटाळिला ॥ १ ॥
एकामध्यें एक नाहीं मिळों येत ।
ताक नवनीत निवडीलें ॥ २ ॥
जालीं दोनी नामें एकाचि मथनीं ।
दुसरिया गुणीं वेगळालीं ॥ ३ ॥
तुका म्हणे दाखविल्या मुक्ताफळीं ।
शिपलोचि स्वस्थळीं खुंटलिया ॥ ४ ॥

पाठभेद—च० ४ शिंपले–शिंपल्या (तळेगांव पोथी).

अर्थ—१ जीवानें, मनाच्या ओढ्यामुळें, संसाराच्या पाशांत पडलों होतों पण कर्तव्याची जागृति होऊन त्या पाशाच्या बाहेर पडलों. कर्तव्य करावें तर संसाराच्या बाहेर पडावें लागतें, मनाचा ओढा नेईल तिकडे जावें तर जीव संसाराला चिकटून रहातो. संसार व कर्तव्य यांचा हा असा लढा आहे. हीं दोन एकांत एक मिळावयाचीं नाहींत.ताक आणि लोणी निवडून वेगळीं काढल्यावर तीं पुन्हां एकजीव होत नाहींत. तशींच हीं. ताक व लोणी हीं दोन्हीं वेगळीं झालीं, हें ताक हें लोणी—अशीं नावें त्यांना मिळालीं, तीं मंथन केल्यामुळें, घुसळण्यानें. घुसळणें हें एकच, पण त्याच्यामुळें हें ताक, व हें लोणी असे दोन वेगवेगळे पदार्थ झाले. त्यांना घुसळणें हें जरी एकच कारण असलें तरी इतर गुणांनीं तीं वेगळीं आहेत.

सारांश काय, शिंपीनें आपलें स्वरूप उकलून दाखविलें तर तें मोतीं. नाहीं तर शिंपीच. जशाच तसेंच खुंटलें तर शिंपीच. (तसाच मी. कर्तव्याचा विचार न करितां जागच्या जागींच राहिलों तर इतरांसारखाच मी एक. पण विचार केला, कर्तव्याला जागलों तर संसारापासून वेगळें झालें पाहिजे.)

चर्चा—च. ४ " मुक्ताफळीं ". पुढील चरणार्धांतील " स्वस्थळीं " या शब्दाशीं जुळण्याकरितां " मुक्ताफळीं " असा पाठ घेतला असावा.

या चरणाचे दोन अर्थ होतील.

१ मुक्ताफळीं दाखविल्यावर शिंपल्या स्वस्थळीं खुंटलिया, खुंटल्या. मुक्ताफळीं–विभक्ति संस्कृतांतील सप्तिसप्तमी सारखी समजावी. शिंपल्यांतले मोतीं प्रकट झाल्यावर शिंपले व मोतीं निराळीं होतात. वा. ब. प.

२ मुक्ताफळीं हें प्रथमेचें अनेकवचन. " उघडून दाखविल्यास मुक्ताफळीं–मोलें. स्वस्थळीं खुंटल्यास–नुसते शिंपलेच. वा. ब. प.

३०७.

वरवा वरवा वरवा रे देवा तू ।
जीवाहूनि आवडसी जीवा रे देवा तूं ॥ १ ॥
पाहतां वदन संतुष्ट लोचन ।
झाले आइकतां गुण श्रवण रे देवा ॥ २ ॥

अष्ट अंगें तनु त्रिविध ताप गेला सीण ।
वर्णितां लक्ष रे देवा ॥ ३ ॥
मन जालें उन्मन अनुपम ग्रहण ।
तुकयाबंधु म्हणे माहिमा नेणे रे ॥ ४ ॥

पाठभेद—नाहीत.

अर्थ—देवा, तूं बरवा; जीवाहून देखील प्रिय आहेस. तुझें वदन पाहतां डोळे, गुण ऐकतांना कान, संतुष्ट झाले. अष्ट अंगांसह तनुचा शीण गेला. मन उन्मन झालें. अनुपमाचें ग्रहण झालें. अनुपम असें जें सच्चिदानंद स्वरूप त्याचें मनाला आकलन झालें. तुकयाबंधु म्हणे देवा तुझी थोरवी किती मोठी आहे ही मला कळत नाहीं.

चर्चा—च. ३ " अनुपम " हें देवाला उद्देशून असावें. किंवा देवाच्या स्वरूपाची प्रतीती झाल्यावर होणारी आनंदमय स्थिति अनुपम असें घ्यावें.

वा. ब. प.

शेरा—लौकिकी—अभंग तुकारामांचा नव्हेच.

३०८.

सोईऱ्यासी करी पाहुणेर बरा ।
काढितो ठोंबरा संतालागीं ॥ १ ॥
गाईसी देखोनि वदवदा मारी ।
घोड्याची चाकरी गोड वाटे ॥ २ ॥
पान फुल नेतो वेश्येसी उदंड ।
ब्राह्मणासी खांड देऊं नेदी ॥ ३ ॥
पर्वकाळीं धर्म न करी नासरी ।
वेंची राजद्वारीं उदंडाचि ॥ ४ ॥
कीर्तना जावया होतसे हिंपुष्टी ।
खेळतो सोंकटी रात्रंदिवस ॥ ५ ॥
बाइलेच्या गोता आवडीनें पोसी ।
मातापितियांसी दवडीतो ॥ ६ ॥

तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी ।
जातो यमपुरी भोगावया ॥ ७ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ—सोयऱ्याला चांगला पाहुणचार करितो; पण संत घरीं आले तर त्यांना मारावयाला ठोंबरा काढतो. गाय पाहिली कीं, बदाबदा मारितो; पण घोड्याची चाकरी आवडीनें करितो. वेश्येकडे उदंड पान फुलें नेतो; पण ब्राह्मणांच्या दृष्टीला सुपारीचें खांडहि पडूं देत नाहीं. बायकोच्या गोतावळ्याला आवडीनें पोसतो; पण आईबापांना हाकलून देतो. तुकाराम म्हणतात--अशा माणसाच्या तोंडावर थुंका. तो यमपुरी भोगावयाला जातो.

शब्द – पाहुणेरु = पाहुणचार. **ठोंबरा** = कुंपणाची काठी.

शेरा—तात्कालीन लोकव्यवहार.

३०९.

सोलींव जें सुख अतिसुखाहूनि ।
उभें तें अंगणीं वैष्णवांच्या ॥ १ ॥
वृंदावन सडे चौक रंगमाळा ।
नाचे तो सोहोळा देखोनियां ॥ २ ॥
भूषणमंडित सदा सर्वकाळ ।
मुद्रा आणि माळ तुळसी कंठीं ॥ ३ ॥
नामओघ मुखीं अमृताचें सार ।
मस्तक पवित्र सहित रजें ॥ ४ ॥
तुका म्हणे मोक्ष भक्तांचिया मना ।
नये हा वासना त्याची करी ॥ ५ ॥

पाठभेद—च०५ त्याची—त्यांचीं.

अर्थ—अतिशय मोठ्या अशा सुखाहूनहि मोठें सुख, अगदीं सोलींव सुख, सुखाचा गाभाच, असें जर कोणतें सुख असेल तर तें हें कीं वैष्णवांच्या अंगणांत उभें रहाणें. त्याठिकाणीं सडे घातले आहेत, माळा लावल्या आहेत, रंगांनीं शोभा आणली आहे, वृंदावन आहे. असा तो सोहळा पाहून वैष्णव

किंवा भक्त जो असेल त्याला आनंद होतो व तो आनंदानें नाचूं लागतो. वैष्णव भक्त सर्वदा भूषणांनीं मंडित; नेहमीं मुद्रा, कंठांत तुळसीची माळ असते. केवळ अमृताचें सारच असें जें नाम त्याचा ओघ नेहमीं त्याच्या तोंडानें चाललेला असतो. त्याचें मस्तक देवाच्या चरणरजांनीं पवित्र झालेलें असतें. तुकाराम म्हणतात–खरे वैष्णव भक्त असतील त्यांना मोक्ष आवडत नाहीं. तो त्या इतर दुसऱ्या गोष्टींची वासना करितो. त्याला वृंदावन, चौक वैष्णवांचीं आंगणें या गोष्टी बऱ्या वाटतात. किंवा, भक्तांना मोक्ष आवडत नाहीं. उलट मोक्षालाच भक्त आपल्याकडे यावा असें वाटतें.

चर्चा—च० ४ " रजें सहित " कोणाचें रज ?

देवाच्या चरणरजांनीं असा अर्थ वर केला आहे.

किंवा, इतर त्याच्या सारखीच संत मंडळी घरीं येतात त्यांची पायधूळ मस्तकीं घेण्यांत त्याला आनंद वाटतो—असा अर्थ ? संपादक

च० ५ या चरणाचे दोन अर्थ वर दिले आहेत.

" मोक्षाला भक्त हवेत " या अर्थांत कवित्व खास आहे. पण स्वारस्य आहे काय ? मोक्षाचें भक्ताकडे येणें म्हणजे काय ? आणि त्यापासून मोक्षाला काय लाभ पुन्हा, हा–तो मधील विरोधावर कोटी किंवा शक्कल करण्याचा मोह या प्रेमळ अभंगांत तुकारामांना पडला असेल कीं काय ही शंकाच आहे.

वा. ब. प.

शब्द—**सोहळा** = उत्सव. सुखाचा प्रकार. **सोलींव**=उत्तम, गाळींव. **त्याची वासना करी. त्याची** = सोलींव सुखाची. वैष्णवाच्या अंगणांत उभें रहाण्यांत जें उत्तम सुख आहे त्याची.

शेरा—भक्तिरसाचा अभंग.

३१०.

तीर्थें केलीं कोटीवरी ।
नाहीं देखिली पंढरी ॥ १ ॥

जळो त्याचें ज्यालेंपण ।
न देखेचि समचरण ॥ २ ॥
योग याग अनंत केले ।
नाहीं समचरण देखिले ॥ ३ ॥
तुका म्हणे विठ्ठल पायीं ।
अनंत तीर्थें घडिलीं पाहीं ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—कोटींवरी तीर्थें केलीं, पण पंढरी पाहिली नाहीं. अशा माणसाच्या जिण्याला आग लागो. ज्यानें विठोबाचे समचरण पाहिले नाहींत त्याचें जिणें फुकट. अनेक योग याग केले, पण विठोबाचे पाय पाहिले नाहींत. तुकाराम म्हणतातः–विठ्ठलाचे पाय पाहिले म्हणजे अनंत तीर्थें केल्याचें श्रेय मिळालें.

शब्द-ज्यालेपण = जीवन, आयुष्य, जगणें. **समचरण** = विटेवर सारखे ठेविलेले विठोवाचे पाय–विठोबा, विठ्ठल.

शेरा—पंढरीच्या वारकऱ्याला अनुरूप–लौकिकी.

३११.

कोणतें कारण राहिलें यामुळें ।
जें म्यां तुज वळें कष्टवावें ॥ १ ॥
नाहीं जात जीव नाहीं होत हानी ।
सहज तें मनीं आठवलें ॥ २ ॥
नाहीं कांहीं चिंता मरतों उपवासी ।
अथवा त्या म्हैसी गाई व्हाव्या ॥ ३ ॥
हें तों तुज कळों येतसे अंतरीं ।
लाखणीक वरी साच भाव ॥ ४ ॥
तुका म्हणे देवा नासिवंतासाठीं ।
पायांसवें तुटी करिती तुझ्या ॥ ५ ॥

पाठभेद—च. १ कष्टवावें–कष्टविलें. च. ४ लाखणिक–लापणिक.

अर्थ—असें कोणतें कारण राहिलें आहे, असें काय व्हावयाचें राहिलें आहे कीं, जें होण्याकरितां मीं तुला मुद्दाम कष्ट द्यावेत, हांका माराव्यात ?

माझा कांहीं जीव चालला नाहीं, किंवा कांहीं मोठी हानी होत आहे असेंहि नाहीं; (कीं देवा यावेळीं या आणि मला यांतून वांचवा असें मी म्हणावें.) मग मी देवाचें नांव घेतों तें कां ?—सहज मनाला आठवलें म्हणून.

मनाला कांहीं चिंता नाहीं; किंवा मी उपाशीं मरत आहें असेंहि नाहीं. किंवा, गाई म्हशी अशी संपत्ति मला पाहिजे असाहि प्रकार नाहीं.

मी तुला हाका मारतों तें केवळ लाक्षणिक, वरवर, किंवा मनांत खरा भाव आहे म्हणून हें, देवा, तुलाच मनांतल्या मनांत कळलें पाहिजे, कळेलच.

तु. म्ह. देवा, नाशवंत, ऐहिक असें जें बाह्यजग याच्यासाठीं लोक तुझ्याशीं ताटातूट करितात. नाशवंत वस्तूच्या लोभानें देवाला पारखे होतात. पण मी कांहीं तसें करणार नाहीं.

चर्चा—च. १ " जें "–उभयान्वयी अव्यय = कीं, 'बळें'=१ जोरानें, (आक्रोशकरून)–वा. ब. प. किंवा, मुद्दाम—संपादक.

च. ४ लाखणिक वरी = वरवरचें, वरोपचारांचें, लाक्षणिक; तात्पुरतें. किंवा, लापणिक = बडबड, प्रलाप.

" लाक्षणिक " = हें नाम. " साच भाव " व " लाक्षणिक " यांचा विरोध. तेव्हां लाक्षणिक हाच पाठ बरा.

(हे सर्व पाश पसारे) तुझ्या पायांसवें तुटी करिती. वा. ब. प. किंवा, (लोक) नाशिवंतासाठीं तुझ्या पायांसवें तुटी करिती.

लक्ष्यप्रयोग—पायांसवें = पायांशीं.

३१२.

रामा अयोध्येच्या राया।
दीनानाथा रे सखया ॥ १ ॥
पाप ताप विघ्न हरीं।
दिनानाथा सुख करीं ॥ २ ॥

भिलटीचिया रे उच्छिष्टा ।
स्वीकारिसी रे तं भ्रष्टा ॥ ३ ॥
मी तों सलगीचें मूल ।
तुका म्हणे तू सखोल ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—रामा, अयोध्येच्या राया, दीनानाथा, माझें पाप, ताप, विघ्न, काय असेल, तें नाहींसें कर; सुख दे. देवा, तूं भिल्लिणीच्या उष्ट्याचा देखील स्वीकार करतोस–असा भ्रष्ट आहेस (मग माझ्या सारख्या भ्रष्टाचें, पाप्याचें, पाप नाहींसें करावयाला तुला काय हरकत आहे ? संपादक). तु. म्ह. देवा, मी त्या भिल्लीणीपेक्षां तुला किती तरी जवळचा; सलगीचें मूल. मुलासारख्या निष्कपटीपणानें मी तुझ्याशीं सलगी करितों, तुझ्यावर विसंबितों. मग माझ्यावर कां नाहीं कृपा करीत ? देवा, तूं सखोल, आंतल्या गांठीचा आहेस; पाताळयंत्री आहेस. तुझ्या मनांतलें कळावयाचें नाहीं.

शब्द—**भिलटी** = भिल्लीण. **सलगीचें** = सलगीनें, लडिवाळपणानें, वागणारें. **सखोल** = खोल, आंतल्या गांठीचा, कपटी.


शेरा—प्रेमळ अभंग; लौकिकी विषयावरचा.

३१३.

आमिषाचिये आसें गळ गिळी मासा ।
फुटोनियां घसा मरण पावे ॥ १ ॥
मरणाचे वेळे करी तळमळ ।
आठवी कृपाळ तये वेळीं ॥ २ ॥
अंतकाळीं ज्याच्या नाम आलें मुखा ।
तुका म्हणे मुखा पार नाहीं ॥ ३ ॥

पाठभेद—च० १ ' अंविसाचिया, ' ' आविसाचिये ' असेहि पाठ आहेत.

अर्थ—गळाला लाविलेल्या आमिषाच्या आशेनें मासा गळ गिळितो; आणि मग, घसा फुटून मरण पावतो. मरणाच्या वेळीं तळमळ करितो, त्या



वेळीं कृपाळू जो देव त्याला आठवण होते. तु: ह्मि. अतकाळीं जरी त्याच्या मुखाला नाम आलें–देवाचें नांव आलें–तरी देखील त्याच्या सुखाला पार नाहीं.

शब्द—आमिष= मासे धरण्याकरितां गळ्यांत टोकाला कांहीं तरी खाण्याचा पदार्थ लावितात तो.

शेरा--लौकिकी.

३१४.

तुजवरी ज्याचें मन । दरुशन दे त्याचें ॥ १ ॥
कैसा जाती शुद्ध भाव । हात पाव ना वृत्ती ॥ २ ॥
अवघियांचा करूनि मेळा । तुज डोळां रोखिलें ॥ ३ ॥
तुका म्हणे तुज आड । लपोनि कोड दावीं देवा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहीत.

अर्थ—मन तुझ्यावर लागलेलें आहे असा जो कोणी तुझा भक्त असेल, त्या भक्ताचें (वैष्णवाचें) दर्शन मला होईल असें कर. तो कसा आहे, कोणत्या जातीचा, त्याचा भाव कसा असतो, हात, पाय ना, अशी त्याची देहातीत वृत्ती कशी असते तें मला बघूं दे. या सर्व वृत्ति निराळ्या न करितां, सर्वांचा एकत्र मेळा करून, सर्व वृत्ती डोळ्यांच्या ठिकाणीं आणून त्यानें तुला रोखिलें, तुला निरखिलें. (असा जो तुझा भक्त तो मला पाहूं दे.) तुझ्या आड लपवून, देवा, हें माझें कौतुक पुरीव.

चर्चा—च. २ यांतील दोन चरणार्ध वेगळे करूनहि अर्थ लावितां येईल. पहिला चरणार्ध–तो कसा असतो, कोणत्या प्रकारचा असतो, त्याचा शुद्ध भाव कसा हें मला दाखीव. उत्तरार्धाचा तिसऱ्या चरणाशीं संदर्भ घेऊन "त्याच्या हात, पाव, अशा निराळ्या वृत्ती नसतात. हा हात, हे पाय, अशी त्याची वृत्ति नसते. तर या सर्व वृत्ति एकत्र करून, त्यानें डोळेभरून तुला पाहिलें, सर्व वृत्ति डोळ्यांत आणून त्यानें तुला रोखिलें. असा तो तुझा भक्तश्रेष्ठ तुला जसा दिसतो, तुझ्या समोर जसा असतो, तसाच, त्याच स्वरूपांत तो मला दिसावयाला

पाहिजे. पण तो तसा मला दिसणार नाहीं. म्हणून (४) तुझ्या आड मला लपवून, देवा, हें माझें कौतुक पुरीव असा भाव.

च० २ हात पाव ना—" हें वृत्तींचें विशेषण नव्हे. त्यांतील गर्भित अर्थ– देहातीतपणा हें वृत्तींचें विशेषण.

जाती शुद्ध––अंगचाच, ळचाच शुद्ध. माडगांवकर.

असा अर्थ व्हावयाला " जातिशुद्ध " हें सामासिक पद पाहिजे. तें तसें नाहीं. वा. ब. प.

शेरा—भक्ताच्या दर्शनाची कळकळ.

३१५.

विश्वव्यापी माया । तिणें झांकुळिलें छाया ॥ १ ॥
सत्य गेलें भोळ्यावारी । अविद्येची चाली थोरी ॥ २ ॥
आपुलेंचि मन । करवी आपणा बंधन ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । तुम्ही कोडीं हीं उगवा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—माया ही सर्व जगभर भरलेली आहे. आणि ज्याप्रमाणें छायेनें मूळ वस्तूच्या बरोबर असावें, छाया जशी मूळ पदार्थालाच धरून असते. तसें मायेनें सर्व जग झांकलें. मायेनें जग व्यापल्यामुळें सत्य भोळ्यावारी, भोळेपणानें, फसलें; त्याचा लोप झाला. आणि अविद्येची थोरी चाले = जिकडे तिकडे अज्ञान माजलें. हा सर्व खेळ आपल्या मनाचाच आहे; आपलें मनच आपल्याला बंधन करितें. तु. म्ह. देवा, हें कसें होतें (हें आम्हाला समजत नाहीं.) तें कोडें तुम्हांच उकलून सांगा.

शब्द—**चाली** = चाल, प्रचार, प्रघात. **थोरी माजली** = फार प्रघात पडला.

शेरा—मन संशयाच्या स्थितींत असल्या वेळचा. मनाच्या दुरध्यांतला.

वा. ब. प.

३१६.

पोटीं जन्मती रोग । तरि कां म्हणावे आप्तवर्ग ॥ १ ॥
रानीं वसती औषधी । तरि कां म्हणाव्या निरपराधी ॥ २ ॥
तैसें शरिराचें नातें । तुका म्हणे सर्व आप्तें ॥ ३ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—रोग पोटीं जन्मले म्हणून त्यांना आप्तपणा आला असें होतें का ? किंवा, उलटपक्षीं औषधी दूर रानावनांत उगवतात म्हणून त्या काय टाकाऊ म्हणाव्या ? सारांश, निकटपणा किंवा दूरपणा यांवरून स्नेहसंबंध किंवा मायाममता कमी किंवा जास्ती हें ठरविणें बरोबर नाहीं. शरीराच्या नात्याची अशीच अवस्था आहे. शरीरासंबंधानेंच नातें कां जोडावें ? सर्वच माणसें आपलीं आप्त आहेत असें म्हणावें. डॉ. भांडारकर.

चर्चा—च. ३ शरीराचें नातें तसें व सर्व आप्तेंहि तशींच, दूर असलीं म्हणून टाकाऊ नव्हेत; निकटपणानें ग्राह्य नव्हेत. त्यांचें ग्राह्याग्राह्यत्व एवढ्यानेंच ठरत नाहीं. शरीराचें नातें असल्यानें किंवा आप्तपणानें ग्राह्यत्व ठरत नाहीं, असा अर्थ असावा असें वाटतें. वा. ब. प.

किंवा, याच प्रकारें शरीराचा संबंध आहे. म्हणजे, जसे पोटांत उद्भवणारे रोग आपले आप्त असें कोणी समजत नाहीं तसेंच शरीराचा व आपला निकट संबंध आहे तरी त्या विषयीं आपलेपणा बाळगूं नये. तादात्म्य होऊं देऊं नये, आणि सर्व जीवांशीं आपलेपणा असावा. आपलेपणानें सर्वांना पहावें. माडगांवकर.

शब्द-**निरपराधी** = निपराधी = टाकाऊ.

३१७.

नव्हे शब्द एकदेशी । सांडी गवशी कोणाला ॥ १ ॥
झाली माझी वैखरी । विश्वंभरीं व्यापक ॥ २ ॥
मोकलिलें जावें वाणें । भातां जेणें वाईलें ॥ ३ ॥
आतां येथे कैंचा तुका । बोले सिका स्वामीचा ॥ ४ ॥

पाठभेद—भातां–भाता (मूळांत आहे).

अर्थ—माझा उपदेश एकदेशी, एकांगी, नाहीं कीं तो कोणाला सांडतो, व कोणाला शोधून काढतो, आंत घेतो. एकाला वगळतो, त्याची उपेक्षा करितो व दुसऱ्याला शोधून त्याचा संग्रह करितो, असा भेदभाव माझ्या उपदेशाच्या ठिकाणीं नाहीं. कोणाला टाकीत नाहीं, कोणाला आंत ओढीत नाहीं; सर्वांना सारखाच आहे. असा अर्थ. माझी वाणी सर्व जगभर भरून राहिली, तिनें सर्व जग व्यापिलें.

ज्यानें भातां–भात्यांत–घातलें (वाइलें) त्यानें मोकलिलें (सोडिलें) म्हणजे बाणानें जावें. बाण आपोआप भात्यांतून सुटत नाहीं. ज्यानें भात्यांत ठेविलें असेल त्यानें सोडिलें म्हणजे बाण सुटतो. त्याप्रमाणें, ज्यानें माझ्या ठिकाणीं वाणी घातली त्यानें बाहेर सोडली म्हणूनच मी बोलतों. माझें बोलणें हें माझें स्वतःचें नव्हे. देव मला जसें बोलवितो तसें मी बोलतों.

बाण भात्यांतून निघून गेला कीं भाता जसा मागें रिकामा रहातो तसा शब्द निघून कीं मी, तुका, मागें रिकामा रहातों. मी बोललोंच नाहीं. बोलणें माझें नव्हेच. बोलणारा मी नव्हें, देवाचा शिकाच बोलतो आहे.

(माडगांवकर.)

च० ३ " भातां " असा पाठ बरोबर दिसतो.

च० ४ वाइलें = " घातलें " माडगांवकर. मोलस्वर्थ असा अर्थ देत नाहीं. ज्ञानेश्वरींत वाइलें = पेरिलें असा अर्थ आहे. वा. व. प.

३१८.

गायनाचे रंगीं । शक्ति अद्‌भुत हे अंगीं ॥ १ ॥
हे तों देणें तुमचें देवा । घ्यावी अखंडित सेवा ॥ २ ॥
अंगीं प्रेमाचें भरतें । नाहीं उतार चढतें ॥ ३ ॥
तुका म्हणे वाणी । परम अमृताची खाणी ॥ ४ ॥

पाठभेद—च० ३ भरतें–भातें.

अर्थ—गाण्याला रंग चढला कीं त्या भरांत अंगांत अद्‌भुत शक्ति आहे

असें वाटतें. किंवा, गाण्यांत तन्मय होणें ही एक अंगांत अद्भुत शक्ति आहे. पण देवा, ही तुमचीं देणगी आहे, तुम्हीं दिलेली, तेव्हां त्या देणगीनें तुम्हीं मजकडून सेवा करून घ्या. अंगांत प्रेमाचें भरतें आलें म्हणजे कायम टिकतें. त्याला चढउतार नाहीं. तु. म्ह. माझी वाणी म्हणजे नामामृताची खाणच होत आहे.

चर्चा—च० ३ अंगीं प्रेमाचें भरतें चढतें (असतें) उतार नाहीं. तें सारखें चढतच रहतें. वा. ब. प.

किंवा, अंगांत प्रेमाचें भरतें आलें म्हणजे तें कायम टिकतें, चढउतर, भरतीओहोटी, होत नाहीं. वा. ब. प. संपादक.

शेरा—भजनरंगाचें महात्म्य सांगितलें आहे.

३१९.

माप म्हणे मी मावितें ।
भरी धणी ठेवी रितें ॥ १ ॥
देवा अभिमान नको ।
माझें ठाईं देऊं सकों ॥ २ ॥
देशीं चाले सिका ।
रितें कोण लेखी रंका ॥ ३ ॥
हातीं सूत्रदोरी ।
तुका म्हणे त्याची थोरी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

माप अभिमानानें म्हणतें कीं मी भरतें, पण तें भरणें किंवा रिकामें ठेविणें हें धनी करतो. मापाला कांहींच करितां येत नाहीं. देवा, (मी त्या अभिमानी मापासारखा आहें) मला तशा प्रकारचा अभिमान होऊं देऊं नको. देशावर शिक्क्याचें नाणें चालतें. शिक्क्याच्या नाण्याला देशभर मान आहे. त्या शिक्क्याशिवाय जें असेल त्या बिचाऱ्याला कोण विचारतो ? सारांश—पदार्थांची किंमत नाहीं; त्या पदार्थांत जो किंमत आणितो त्याची किंमत.

ज्याच्या हातांत सूत्रदोरी तो थोर. तो हालवील त्याप्रमाणें बाहुलीं नाचतात. तूं थोर, मी नव्हें, असा भाव.

च० १., घणी=धनी, मालक.

'धणी' याचा अर्थ–मनमुराद पोटभरून, पुरें–असा लावून भरणारा माप पुरें भरील किंवा रिकामें करील ठेवील असा अर्थ ओढून ताणून लाविता येईल. पण तसें करणें गौण दिसतें.

च० २ देवा, माझेठायीं–अभिमान सकों देऊं नको. देवा, माझ्या ठिकाणीं अभिमानाला बळावूं देऊं नको. सकणें=जोरावणें; वा. ब. प.

च० ३ रितें = शिक्क्याशिवाय, राजमुद्रेशिवाय.समानार्थी अभंग १२७६; जन पूजी याचा मज कां आभार. याच अभंगांतील च० २—"पत्र कोण मानी वंदितील। शिक्का गौरव सेवका त्याचि मुळें" या चरणावरून या अभंगाचा अर्थ सुबोध लागतो, विशेषतः तिसऱ्या चरणाचा लागतो.

३२०.

कोण सांगायास। गेलें होतें देशोदेश ॥ १ ॥
नेलें वाऱ्याहातीं माप। समर्थ तो माझा बाप ॥ २ ॥
कोणाची हे सत्ता। झाली वाचा वदविता ॥ ३ ॥
तुका म्हणे या निश्चयें। माझें निरसलें भय ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—माझा उपदेश, माझें म्हणणें देशोदेशीं सर्व देशभर सांगावयाला कोण गेलें होतें ? मी कांहीं माझा उपदेश तुम्ही ऐका असें देशभर सांगितलें नाहीं. पण माझा बाप, देव, समर्थ आहे. त्यानें माझ्या उपदेशाचें माप वाऱ्याच्या हातानें सर्व देशभर नेलें. मला वाचा झाली, ही सत्ता कोणाची ? माझी नव्हे. ती प्रेरणा मला देवानें केली. या निश्चयानें, अशी समजूत ठाम झाल्यामुळें, माझें भय निरसलें.

लक्ष्यप्रयोग—कोणाची हे सत्ता (जी) वाचा **वदविता** झाली ?

वदविती असें पाहिजे कारण तें सत्तेचें विशेषण आहे. परंतु 'कोणाची' यांतील कोण=देव हें पुल्लिंगी नाम लक्षांत येऊन ज्यानें मला बोलावयाला

लावलें तो वदविता कोण असा प्रयोग–व ही वदविती=वदविणारी सत्ता कोणाची असा दुसरा प्रयोग–यांचा घोटाळा झाला आहे.

३२१

सकळिकांच्या पायां माझी विनवणी ।
मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
अहो श्रोते वक्ते सकळही जन ।
बरें पारखून बांधा गांठीं ॥ २ ॥
फोडिलें भांडार धन्याचा हा माल ।
मी तंव हमाल भारवाही ॥ ३ ॥
तुका म्हणे चाली झाली चहूं देशीं ।
उतरला कसीं खरा माल ॥ ४ ॥

पाठभेद––नाहींत.

अर्थ––श्रोते, वक्ते, सर्वांच्या पायीं माझी एक विनंति आहे. सर्वांच्या पायांवर मी डोकें ठेवितों. अहो श्रोते, वक्ते, सर्वजन हो माझ्या म्हणण्यांत जर कांहीं बरें, हिताचें, असलें तर तें पारखुन घ्या; आणि गांठीं बांधा, त्याचा संग्रह करा. हा खजिना फोडिलेला आहे. माल माझ्या धन्याचा, देवाचा; मी केवळ भार वहाणारा ओझ्याचा हमाल आहें. तु. म्ह. या मालाचा प्रसार पुष्कळ देशांत झाला आहे. हा पुष्कळांना पसंत पडलेला आहे. कसाला लावून पाहून खरा ठरल्यामुळें सर्वांना हवासा आहे.

शेरा––प्रेमळ अभंग.

३२२.

कोण त्याचा पार पावला धुंडितां ।
पुढें विचारितां विश्वंभरा ॥ १ ॥
अणुरेणु सूक्ष्मस्थूळा पार नाहीं ।
श्रुती नेती त्याही खुंटलिया ॥ २ ॥

फळांत कीटक एवढें आकाश ।
ऐसा तरुवरास अनेक किती ॥ ३ ॥
दाविलें अंतीं अर्जुनासी पोटीं ।
आणीक त्या सृष्टी कृष्णलोक ॥ ४ ॥
तुका म्हणे लागा संताचिया कासे ।
ठाव घेतां कैसे वांचा जीवें ॥ ५ ॥

पाठभेद--नाहींत.

अर्थ--विश्वंभरा पुढें विचारितां, देवाचा आणखी जास्त जास्त विचार करितां, तो कशाला ? त्याच्या शोधाला लागून त्याचा अंत ज्याला कळला असा कोण आहे ? अणुरेणु--सूक्ष्म स्थूळ--यांना त्याचा अंत लागत नाहीं. अणुरेणु हे अतिशय सूक्ष्म--पण त्यांनीं त्याचा लहानपणा मोजतां येत नाहीं. तसेंच स्थूल पदार्थांनीं त्याचा स्थूलपणाहि मोजतां येत नाहीं. वेद देखील नेति नेति, तो हा नव्हे, एवढेंच सांगतात. (पण तो खरोखर कसा आहे हें कोणीच सांगत नाहीं. फळांत कीटक असतो तसें हें आकाश. अनंत दिसतें खरें, पण फळांत जसा बारीक किडा असतो त्या मानानें एकंदर विश्वांत आकाशाचें महत्व. आणि त्या परमेश्वररूपी झाडाला अशीं किती तरी फळें आहेत. देवानें अर्जुनाला आपल्या पोटांत कृष्णलोक, अनंत सृष्टि दाखविल्या. तु. म्ह. पण तुम्हीं देवाचा अंत पहाण्याच्या भरीला पडूं नका. देव अनंत आहे. त्याचा ठाव काढूं लागाल तर कसे वांचाल ? जन्म गेला तरी ठाव लागणार नाहीं. म्हणून संतांची कांस धरा. वा. ब. प.

२२३.

जें जें कांहीं करितों देवा । तें तें सेवा समर्पे ॥ १ ॥
भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ॥ २ ॥
आम्ही दुजें नेणों कोणा । हेंचि मना मन साक्ष ॥ ३ ॥
तुका म्हणे जगन्नाथा । हें अन्यथा नव्हे कीं ॥ ४ ॥

पाठभेद—च• १ समर्पें–समर्पे.

अर्थ—देवा, मी जें जें कांहीं करितों तें तें तुला सेवा म्हणून समर्पण करितों. हे सर्वात्मना नारायणा, माझ्या हृदयामध्यें भेद नाहीं नारायणा, आम्हीं कोणाला दुजें लेखित नाहीं. कोणाशींहि आमचा दुजा भाव नाहीं. ही मनोमन साक्ष आहे. तु. म्ह. देवा, मी म्हणतों हें अगदीं, सर्वस्वीं, खरें.

चर्चा–च० १ मीं जें जें कांहीं करितों तें तें देवाच्या ठिकाणीं सेवा म्हणून समर्पण करितों.

गौणपाठ–समर्पें–समर्पण होतें. **देवा**–देवाला. असाहि अर्थ करितां येईल.

च०२ असें या ठिकाणीं सांगण्यांत स्वारस्य तें काय ? सर्वात्मना हें नारायणाचें विशेषण. तूं सर्वात्मा म्हणून तूं व मी यांच्या ठिकाणीं भेद नाहीं.

वा. ब. प.

च० ३ आम्हीं तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला जाणीत नाहीं. तुझ्याखेरीज आम्हांला दुसरें कोणी नाहीं असा भाव असेल काय ? संपादक

किंवा–सर्वात्मना=अगदीं मुळींच. सर्वभावेंकरून ? संपादक.

शेरा—साधा, प्रौढपणींचा.

३२४.

स्तुति करूं तरी नव्हेचि या वेदा ।
तेथें माझा धंदा कोणीकडे ॥ १ ॥
परी हे वैखरी गोडावली सुखें ।
रसना रस मुखें इच्छीतसे ॥ २ ॥
रूप वर्णावया कोठें पुरे मती ।
रोमीं होती जाती ब्रह्मांडें हीं ॥ ३ ॥
तुका म्हणे तूंच ऐसा एक साचा ।
ऐसी तंव वाचा जाली नाहीं ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—परमेश्वराची स्तुति करूं जाईन म्हटलें तर ती वेदालाहि करितां आली नाहीं. तेथें माझा काय पाड ? मी वंदा करून कितीसें यश मिळविणार ? परंतु माझी ही वाणी त्या सुखानें लाचाबलेली आहे. त्या सुखाची गोडी तिला कळलेली आहे. आणि जीभहि तोच रस चाखावयाची इच्छा करिते.

तुझें रूप वर्णन करावयाला लागलें तर बुद्धि कुंठित होते. तुझ्या एकाद्या रोमांत देखील ब्रह्मांडें होतात जातात एवढा तूं मोठा आहेस.

तु. म्ह. देवा, तुझ्यासारखा तूंच. तुझें वर्णन करील अशी वाणी अजून झालीच नाहीं.

स्तवार्थ तुझिया तुझ्यास्तव कवी कधीं जन्मति—मोरोपंत—केकावली.

शब्द—**वैखरी** = वाचा. **गोडावली** = गोडीला भुलली; लाचावली

शेरा—देवाचा महिमा.

३२५.

तुज वर्णीं ऐसा तुजविण नाहीं ।
दुजा कोणी तींही त्रिभुवनीं ॥ १ ॥
सहस्रमुखें शेष सिणला वापुडा ।
चिरलिया धडा जिव्हा त्याच्या ॥ २ ॥
अव्यक्ता अलक्षा अपारा अनंता ।
निर्गुणा सच्चिता नारायणा ॥ ३ ॥
रूप नाम घेसी आपुल्या स्वइच्छा ।
होसी भाव तैसा त्याकारणें ॥ ४ ॥
तुका म्हणे जरी दाविसी आपणा ।
तरिच नारायणा कळों येसी ॥ ५ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—१ तिन्ही लोकांत तुला वर्णील असा तुझ्या शिवाय दुसरा कोणी नाहीं. सहस्रतोंडें असूनहि शेष तुझें वर्णन करितां करितां थकला. आणि त्याच्या धड जिव्हा देखील चिरल्या. हे अव्यक्त, अपार, अनंत, अशा

परमेश्वरा, तूं आपल्या इच्छेप्रमाणें रूप नाम घेतोस. जसा ज्याचा भाव असेल त्याप्रमाणें तूं त्याला होतोस. तु. म्ह. नारायणा, जर तूं आपण होऊन आम्हांला दाखविशील तरच तूं दिसावयाचा, नाहीं तर तूं कसा आहेस हें कांहीं आम्हांला कळणार नाहीं.

चर्चा च० २ सापाला दोन जिभा असतात असा समज आहे. त्याचें या ठिकाणीं सांगितलेलें कारण मोठें गमतीचें आहे खरें.

शेरा—भगवत्स्तवन.

३२६.

पूर आला आनंदाचा । लाटा उसळती प्रेमाच्या ॥ १ ॥
बांधूं विठ्ठल सांगडी । पोहुनि जाऊं पैथलडी ॥ २ ॥
अवघे जन गडी । घाला उडी भाइनों ॥ ३ ॥
हें तों नाहीं सर्वकाळ । अमुप अमृताचें जल ॥ ४ ॥
तुका म्हणे थोरा पुण्यें । ओघा आला पथें येणें ॥ ५ ॥

पाठभेद—च० ४ अमृताचे जळ—अमृतजळ.

अर्थः—आनंदाचा पूर आला. प्रेमाच्या लाटा जिकडे तिकडे उसळत आहेत. यावेळीं आपण विठ्ठलाच्या नांवाची सांगड बांधूं आणि पोहून भवनदीच्या पलीकडे पोचूं. म्हणून म्हणतों कीं, बाबानों, ही संधि आहे, भाई हो, सर्व जण या वेळीं उडी घाला आणि विठ्ठलनामाच्या सांगडीनें तरून भवलोकाला जा. हें अमृताचें जळ आहे. हें तुम्हांला अमर करणारें आहे. पण हें नेहमीं मिळावयाचें नाहीं. आहे तों पर्यंत याचा फायदा करून घ्या. तु. म्ह. तुमच्या थोर पुण्यानें यावेळीं प्रवाहाचा ओघ तुमच्याकडे वळलेला आहे. त्याचा उपयोग करून घ्या–असा भाव.

चर्चा—च० २–३ हे दोन्ही चरण मिळून ओंवीसारखें एक कडवें असावें असें वाटतें. " घाला उडी भाईनों " या निर्यमक चरणार्धावरूनहि तेंच बरोबर वाटतें. म्हणून त्याप्रमाणें पाठ छापिला आहे. इतरांनीं दोन चरण वेगळे छापिले आहेत.

२२७.

आणिक दुसरें मज नाहीं आतां
नेमिलें या चित्ता पासुनिया ॥ १ ॥
पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं ।
जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥
पडिलें वळण इंद्रियां सकळां ।
भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ ३ ॥
तुका म्हणे नेत्रीं केलें ओळखण ।
तटस्थ तें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ नेमिलें—न मिळे (चुकीचा वाटतो.)

अर्थ—आतां माझ्या या मनाला (देवाच्या ध्यासाशिवाय दुसरें कांहीं नेमिलेलें असें राहिलें नाहीं.) देवाशिवाय कशाचा ध्यास राहिला नाहीं. जागृतीमध्यें, स्वप्नांत, ध्यानीं मनीं, सगळीकडे मला पांडुरंगच आहे. इंद्रियांना तेंच वळण पडलें आहे. व मनांत देखील वेगळा भाव येत नाहीं, दुसरें कांहीं सुचत नाहीं.

४ तु. म्ह. नेत्रांनींहि त्याच विटेवरील साजिऱ्या रूपाचें ओळणखण केलें. त्याचीच ओळख धरिली आहे. त्यांना जगांत दुसरें कांहीं दिसत नाहीं.

च० ४ " ओळखण–" हें ओळखणें याचें यमका करितां केलेलें रूप आहे. म्हणून नपुंसकलिंगी योजिलें आहे. स्त्रीलिंगीं नव्हे. म्हणून " केली " असा पाठ घेण्याचें कारण नाहीं.

२२८.

मी तों सर्वभावें अनधिकारी ।
होईल कैसी परी नेणों देवा ॥ १ ॥
पुराणींचे अर्थ आणितां मनास ।
होय कासावीस जीव माझा ॥ २ ॥

इंद्रियांचीं आम्ही पांगिलों अंकितें ।
त्यांचे रंगीं चित्त रंगलेंसे ॥ ३ ॥
एकाचेंही मज न घडे दमन ।
अवघीं नेमून कैसीं राखों ॥ ४ ॥
तुका म्हणे जरी मोकलिशी आतां ।
तरी मी अनंता वांयां गेलों ॥ ५ ॥

पाठभेद—च० २ मनास–मानसीं; कासावीस–कासावीसी.

च० ३ इंद्रियांचे आम्ही पांगिलों अंकित–असाहि पाठ आहे.

अर्थ—मी तर सर्व प्रकारांनीं अनधिकारीच आहें. तेव्हां माझी अवस्था काय होईल तें कांहीं कळत नाहीं. पुराणांत सांगितलेल्या हकीगती मनांत आणिल्या म्हणजे जीव कासावीस होतो. आम्हीं इंद्रियांच्या अंकित होऊन अगदीं पांगळे झालों आहोंत. अगदीं त्यांच्या आधीन झालों आहोंत. आणि त्यांच्या रंगानें आमचें चित्त रंगून गेलें आहे. त्यांच्या सुखांत गुरफटलेलें आहे. त्यांच्यापैकीं एकाचेंहि दमन मज न घडे. एकालाहि ताब्यांत ठेवणें माझ्याकडून होत नाहीं मग सगळ्यांचें नियमन करून त्यांना मी कशीं आवरून धरूं ? तु. म्ह. देवा, पंढरीनाथा, मला तारा; नाहीं तर तुमचा दासअसून देखील मी फुकट जाईन अशी मला भीति वाटते.

शब्द—अर्थ = कथा, गोष्टी.

लक्ष्यप्रयोग—च० ३ आम्ही इंद्रियांचीं अंकितें पांगिलों.

च० ५ वायां गेलों–जाईन याअर्थी.

शेरा—इंद्रियनिग्रह कठीण.

३२९.

लक्षूनियां योगी पाहाती आभास ।
तें दिसे आम्हांस दृष्टीपुढें ॥ १ ॥
कर दोनी कटीं राहिलासे उभा ।
सांवळी हे प्रभा अंगकांती ॥ २ ॥

२२७.

आणिक दुसरें मज नाहीं आतां
नेमिलें या चित्ता पासुनिया ॥ १ ॥
पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं ।
जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥
पडिलें वळण इंद्रियां सकळां ।
भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ ३ ॥
तुका म्हणे नेत्रीं केलें ओळखण ।
तटस्थ तें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ नेमिलें—न मिळे (चुकीचा वाटतो.)

अर्थ—आतां माझ्या या मनाला (देवाच्या ध्यासाशिवाय दुसरें कांहीं नेमिलेलें असें राहिलें नाहीं.) देवाशिवाय कशाचा ध्यास राहिला नाहीं. जागृतीमध्यें, स्वप्नांत, ध्यानीं मनीं, सगळीकडे मला पांडुरंगच आहे. इंद्रियांना तेंच वळण पडलें आहे. व मनांत देखील वेगळा भाव येत नाहीं, दुसरें कांहीं सुचत नाहीं.

४ तु. म्ह. नेत्रांनींहि त्याच विटेवरील साजिऱ्या रूपाचें ओळणखण केलें. त्याचीच ओळख धरिली आहे. त्यांना जगांत दुसरें कांहीं दिसत नाहीं.

च० ४ "ओळखण–" हें ओळखणें यावें यमका करितां केलेलें रूप आहे. म्हणून नपुंसकलिंगी योजिलें आहे. स्त्रीलिंगीं नव्हे. म्हणून "केली" असा पाठ घेण्याचें कारण नाहीं.

२२८.

मी तों सर्वभावें अनाधिकारी ।
होईल कैसी परी नेणों देवा ॥ १ ॥
पुराणींचे अर्थ आणितां मनास ।
होय कासावीस जीव माझा ॥ २ ॥

इंद्रियांचीं आम्ही पांगिलों अंकितें ।
त्यांचे रंगीं चित्त रंगलेंसे ॥ ३ ॥
एकाचेंही मज न घडे दमन ।
अवघीं नेमून कैसीं राखों ॥ ४ ॥
तुका म्हणे जरी मोकलिशी आतां ।
तरी मी अनंता वांयां गेलों ॥ ५ ॥

पाठभेद—च० २ मनास–मानसीं; कासावीस–कासावीसी.

च० ३ इंद्रियांचे आम्ही पांगिलों अंकित–असाहि पाठ आहे.

अर्थ—मी तर सर्व प्रकारांनीं अनधिकारीच आहें. तेव्हां माझी अवस्था काय होईल तें कांहीं कळत नाहीं. पुराणांत सांगितलेल्या हकीगती मनांत आणिल्या म्हणजे जीव कासावीस होतो. आम्हीं इंद्रियांच्या अंकित होऊन अगदीं पांगळे झालों आहोंत. अगदीं त्यांच्या आधीन झालों आहोंत. आणि त्यांच्या रंगानें आमचें चित्त रंगून गेलें आहे. त्यांच्या सुखांत गुरफटलेलें आहे. त्यांच्यापैकीं एकाचेंहि दमन मज न घडे. एकालाहि ताब्यांत ठेवणें माझ्याकडून होत नाहीं मग सगळ्यांचें नियमन करून त्यांना मी कशीं आवरून धरूं ? तु. म्ह. देवा, पंढरीनाथा, मला तारा; नाहीं तर तुमचा दासअसून देखील मी फुकट जाईन अशी मला भीति वाटते.

शब्द—अर्थ = कथा, गोष्टी.

लक्ष्यप्रयोग—च० ३ आम्ही इंद्रियांचीं अंकितें पांगिलों.

च० ५ वायां गेलों–जाईन याअर्थीं.

शेरा—इंद्रियनिग्रह कठीण.

३२९.

लक्षूनियां योगी पाहाती आभास ।
तें दिसे आम्हांस दृष्टीपुढें ॥ १ ॥
कर दोनी कटीं राहिलासे उभा ।
सांवळी हे प्रभा अंगकांती ॥ २ ॥

व्यापूनि वेगळें राहिलेंसे दुरी ।
सकळां अंतरीं निर्विकार ॥ ३ ॥
रूप नाहीं रेखा नामही जयासी ।
आपुल्या मनासीं शिव ध्यान ॥ ४ ॥
अंत नाहीं पार वर्णा नाहीं धार ।
कुळ याति शिर हस्त पाद ॥ ५ ॥
अचेत घेतलें भक्तीचीया सुखें ।
आपुल्या कौतुकें तुका म्हणे ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—योगी एकाग्र लक्ष लावून पहातात तरी त्यांना आभासमात्रानेंच दिसतें असें जें परमेश्वराचें स्वरूप तें आम्हांला सगुणस्वरूपानें प्रत्यक्ष डोळ्यांपुढें दिसत आहे. कडेवर दोन्ही हात आहेत, उभा राहिलेला आहे. आणि अंगाची प्रभा सांवळी आहे. हा परमेश्वर सकळांचीं अंतरें व्यापून शिवाय निराळा राहिला आहे. सर्वांच्या अंतःकरणांत असून शिवाय निर्विकार आहे. याला रूप नाहीं, रेषा नाहीं, नांवहि नाहीं. असें तें विष्णूचें स्वरूप शिव देखील आपल्या मनांत ध्यातो. याला अंत नाहीं, पार नाहीं, याला वर्ण नाहीं, कुळ नाहीं, शिर, हात, पाय, कांहींहि नाहीं. असें जें परमेश्वराचें स्वरूप, मूळचें अचेत असें, तें भक्तांच्या सुखानें चेतलें, सचेत झालें; प्रसन्न झालें.

चर्चा—च० ४ " शिव आपुल्या मानसीं ध्याय–" या ठिकाणीं शिव म्हणजे " जीव " असा अर्थ घ्यावा असें वा. ब. प. म्हणतात. त्यांच्या मतें अभंगाचा हेतु–जें मूळचें निर्गुण, निराकार, तें भक्तीच्या सुखें सगुण, साकार झालें असें सांगण्याचा आहे. त्यांत चरण १।२ हे सगुण स्वरूपाचें वर्णन करितात. व चरण ३।४।५ निर्गुणाचें माहात्म्य सांगतात. एकंदर अभंगाचा मतितार्थ असाच असेल तर " शिव " म्हणजे कल्याणप्रद चैतन्य, किंवा जीव, असाच अर्थ घ्यावा हें बरोबर दिसतें असा वा. ब. प. यांचा अभिप्राय आहे.

रा. माडगांवकर यांचें म्हणणें " शिव " याचा अर्थ शंकर असा घ्यावा असें आहे. हालाहल विष प्राशन केल्यावर झालेला अंगाचा दाह शंकरानें

" राम " नामानें शांत केला या कथेला उद्देशून हा चरण असावा. शिवाय, तें शिवाला विष्णू पूजनीय आहे या वैष्णवांच्या श्रद्धेला सुसंगतहि आहे. तेव्हां " शिव " म्हणजे शंकर हा हें रामनाम अंतरीं ध्यातो असा एकंदर चरणार्धाचा अर्थ करावा असें माडगांवकरांचें म्हणणें.

चरणाच्या पूर्वार्धांत " रूप नाहीं, नाम नाहीं, " असें ज्याचें वर्णन केलें त्याला रामनाम आहे असें कसें म्हणतां येईल ? हें रामनाम आलें कोठून ! असा वा. ब. प. यांचा यावर आक्षेप.

माझ्या मतें या चरणार्धाचा इतका कीस काढण्याचें कारण नाहीं. अभंगाचा उद्देश शेवटल्या चरणांत सांगितल्याप्रमाणें परमेश्वर मूळचा निर्गुण, निराकार, अचेत असला तरी भक्तीच्या सुखानें साकार सगुण होतो, चेततो " असें सांगण्याचा आहे. व त्या निराकार-साकार परमेश्वराचें वर्णन अभंगांत केलें आहे. त्यांत ३।४।५ हे चरण मुख्यत्वें निर्गुण स्वरूपाच्या वर्णनपर आहेत. व मूळचें स्वरूप असें निर्गुण निराकार असलें, योग्यांना देखील केवळ आभास रूपानेंच गम्य होत असलें, तरी आम्हांल-भक्तांना-तें सगुण विठ्ठल रूपानें दिसतें असें चरण १।२ यांत सांगितलें आहे. संपादक.

शब्द-लक्षूनियां लक्ष देऊन. **थार** = थारा, ठिकाण. **अचेत** = ज्याला चेतना, विकार विचार-हें कांहीं नाहीं असें. **भक्तीचिया सुखें**-भक्तीपासून प्राप्त होणाऱ्या सुखामुळें.

शेरा—देव निर्गुण निराकार असला तरी भक्तांकरितां, भक्तीचें सुख अनुभवण्याकरितां, साकार व सगुण होतो.

३३०.

कैसें करूं ध्यान कैसा पाहूं तुज ।
वर्म दावीं मज याचकासी ॥ १ ॥
कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा ।
कोण्या भावें देवा आतुडसी ॥ २ ॥
कैसी कीर्ती वाणूं कैसा लक्षा आणूं ।
जाणूं हा कवणु कैसा तुज ॥ ३ ॥

कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं ।
कैसी स्थिति मती दावीं मज ॥ ४ ॥
तुका म्हणे जैसे दास केले देवा ।
तैसें हें अनुभवा आणी मज ॥ ५ ॥

पाठभेद—च. ४ गीतीं–किर्ती.

अर्थ—ध्यान कसें करूं ? तुला कसें पाहूं ? देवा, मला याचकाला, तुझ्या दर्शनाचें मागणें मागणाऱ्या मला, हें वर्म सांग. देवा, तुझी ~ ऊं, तुझी सेवा कशी करूं, कोणत्या प्रकारचा भाव माझ्या मनांत असला म्हणजे तूं प्राप्त होशील तें सांग. देवा, तुझी कीर्ति कशी गाऊं, तुझें ध्यान कसें करूं किंवा तूं कोण, कसा, हें कसें जाणतां येईल तें सांग. कोणत्या गीतांनीं तुझें वर्णन करूं, चित्तांत तुझें ध्यान कसें करूं, तुझी स्थिति काय, याविषयीं मति मला दे. तुकाराम म्हणतात–जसें, ज्या अर्थी मला दास केलेंत, त्या अर्थी हें मला आतां अनुभवाला आणून द्या.

चर्चा—च. ४ स्थितिमति–हा शब्द घुष्कळदां जोड, समासरूपानें, येतो. त्या वेळीं त्याचा अर्थ वेगळा आहे. तसा पाठ घेतला तर, देवा तुझी स्थिति कशी, तुझी मति कशी, तुझ्याविषयीं विचार कसा करावा, हें मला दाखीव. या ठिकाणीं ' स्थिति ' व ' मति ' असे दोन निराळे आहेत म्हणून देवा, तुझी स्थिति कशी आहे हें माझ्या मतीला दाखीव असा अर्थ केला आहे.

वा. ब. प.

वरील दोन शब्द जोड न घेतां निराळे घेतले ' तरी देवा, तुझी स्थिति कैसी, मति कैसी, मज दावी ' असा अन्वय लावितां येईलच व त्याप्रमाणें म्हणजे चर्चेंत सांगितल्या प्रमाणें–अर्थहि करितां येईल. तसा करणें मला बरें वाटतें.

संपादक.

शब्द—आतुडसी-आतुडणें = प्राप्त होणें.

३३१.

निगमाचें वन ।
नका शोधूं करूं सीण ॥ १ ॥
या रे गौळियांचे घरीं ।
बांधलेंसे दावेंवरी ॥ २ ॥
पीडलेती भ्रमें ।
वाट न कळतां वर्मैं ॥ ३ ॥
तुका म्हणे भार ।
माथा टाका अहंकार ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—वेदवेदांताचें रान धुंडित बसूं नका. तो शीण करूं नका. गौळ्यांच्या घरीं चला; तुम्हांला आम्हाला जें हवें आहे तें त्या ठिकाणीं दांव्यावर बांधिलेलें सांपडेल. वाट न सांपडल्यामुळें, वर्मैं न कळल्यामुळें, तुम्हांला संकट पडलें आहे; भ्रम झाला आहे. म्हणून अहंकार आहे, माया आहे, तेवढी टाकून द्या. म्हणजे भ्रम नाहींसा होईल, वर्म कळेल, वाट सांपडेल, असा अर्थ.

चर्चा—च० ३ वाट न कळतां वर्मैं १ वाट व वर्मैं न कळल्यामुळें.

बा. ब. प.

किंवा, २ वर्मैं = वर्मानें, गुज जाणून–असा अर्थ कोणी सुचविला. तोहि बरा आहे.

वा. ब. प.

यमकाकारितां " वर्मैं " असा प्रयोग केला; अर्थाला ' वर्म ' असेंच पाहिजे.

शेरा—वेदवेदांगाच्या अभ्यासानें देवाची प्राप्ती होत नाहीं. भक्तीनें, प्रेमानें, ती होते म्हणून भक्ती करा–असा उपदेश.

३३२

मन वोळी मना ।
बुद्धि बुद्धि क्षणक्षणा ॥ १ ॥
मीच मज राखण जालों ।
ज्याणें तेथींचि धरिलों ॥ २ ॥

जें जें जेथें उठी ।
तें तें तया हातें कुंठीं ॥ ३ ॥
भाजली खांजणी ।
तुका साक्ष उरला दोन्ही ॥ ४ ॥

पाठभेद—च. ३ कुंठीं—कुंठी. च. ४ भाजली खाजनी—भंजनी खंजनी.

अर्थ—१ मनच मनाला वळवितें; बुद्धि बुद्धीला वळविते. प्रत्येक क्षणाला हें असें घडत आहे. स्वतःला राखण मी स्वतःच झालों आहें, आणि त्यामुळेंच आहें त्या ठिकाणीं स्थिर राहिलों आहे, नाहींतर वहावलों असतों; पतन पावलों असतों. जें जें ज्या ठिकाणीं उठतें, ज्या ज्या विकारा विचारांचा जेथें उद्भव होतो, तेथेंच, त्याक्षणीं ते विचार विकार खुंटून टाकतों. तोडून टाकतों; त्यांची वाढ होऊं देत नाहीं. भंजनीं खंजनीं, जन्ममरणीं, दोन्ही स्थितींत तुका साक्ष उरला. दोन्ही स्थितींचा अनुभव घेऊन तुकाराम वेगळा राहिला आहे.

चर्चा—च० २ ज्याणें = ज्यामुळें; मी स्वतांला राखण राहिलों आहे या मुळेंच. च० ३ जें जें उठी तें तें तया–स्वतांला–कुंठित करितें. 'कुंठी' असें अननुमासिक रूप असल्या मुळें असा अर्थ करावा लागतो. पण तो बरोबर नाहीं. 'कुंठीं' असाच पाठ हवा. मी खुंटून टाकितों. हाच अर्थ बरोबर.

भंजनीं खंजनीं–हा समाहारार्थी शब्द. गुणावगुण, कर्मवर्म, यां सारखा. अर्थ मात्र अगदीं समाधानकारक लागला नाहीं.

चर्चा–च. २।३. प्रत्येक चरणांत जो कर्ता तेंच कर्म असा क्रम आहे. दुसऱ्या चरणांत मी कर्ता, मज कर्म; तिसऱ्या चरणांत तें कर्ता, तया कर्म. 'तें तें हातें तया कुंटी' असा अन्वय.

शेरा—भक्तिमार्गांतील उद्योगाचे वेळचा अभंग; तयारीचा.

३३३

ब्रह्म न लिंपे त्या मेळें ।
कर्माअकर्मावेगळें ॥ १ ॥
तोचि एक तया जाणे ।
पावे अनुभविलें खुणें ॥ २ ॥
शौच अशौचाचे संधी ।
तन आळा तनामधीं ॥ ३ ॥
पापपुण्या नाहीं ठाव ।
तुका म्हणे सहज भाव ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—१ ब्रह्म कर्मा अकर्मा वेगळें आहे. तें त्या कर्मा अकर्माच्या मेळानें, संयोगानें, लिंपत नाहीं. कर्माचा किंवा अकर्माचा त्याला डाग लागत नाहीं. ज्यानें तें मूळ खूण ओळखून अनुभविले तोच एक जाणतो; त्याप्रत पोंचतो. शुद्ध अशुद्धाच्या संधी (मिलाफांत) तनामधीं तन आला. शुद्धअशुद्धाच्या मिलाफांत देहाचेंच देहाला बंधन होतें. येथें पापपुण्याला ठाव नाहीं. ही सहज स्थिति आहे.

चर्चा—च० ३ ब्रह्म शुद्धाशुद्धाचे संधींत आहे. ज्या प्रमाणें गवताच्या आळ्यांत गवत असतें त्याप्रमाणें समजावें. ह. प. जोगवुवा.

म्हणजे काय ? संपादक.

शेरा—अर्थ नीट लागत नाहीं.

३३४.

काय दरा करील वन । समाधान नाहीं जंव ॥ १ ॥
तरी काय तेथें असतीं थोडीं । काय जोडी तयांसी ॥ २ ॥
रिघतां धांवा पेवामध्यें । जोडे सिद्धि ते ठायीं ॥ ३ ॥
काय मस्म करील राख । अंतर पाक नाहीं तो ॥ ४ ॥
वर्णाआश्रमाचे धर्म । जाती श्रम जालीया ॥ ५ ॥
तुका म्हणे सोंग पाश । निरसे आस तें हित ॥ ६ ॥

पाठभेद—च० ४ पाक–पाख.

अर्थ—जोंवर मनाला समाधान नाहीं तोंवर दरा काय करणार आणि वन तरी काय करणार ? वनांत गेलें, दरींत किंवा गुहेंत बसलें तरी व्यर्थच. त्या ठिकाणीं श्वापदें तरी काय थोडीं असतात ? पण त्यांना त्या रहाण्याचा काय लाभ होतो ? पेवामध्यें रिघतां. गुहेंत, तळघरांत, शिरून तपाचरण केलें तर सिद्धि प्राप्त होते हें खरें आहे. पण त्याचा काय उपयोग ? मनाला समाधान नाहीं तोंपर्यंत सर्व व्यर्थ आहे. जोंपर्यंत अंतरंग निर्मळ नाहीं तोंपर्यंत राख आणि भस्म यांनीं काय होणार ! वर्णाश्रमाचे धर्म झाले तर श्रम; ते दुःखदायक होतात व जाती फुकट जातात. तु. म्ह. कोणत्याहि प्रकारचें असो, सोंग हा पाशच, बंधनच आहे. ज्याचे योगें आशा नाहींशी होते, समाधान होतें, तें खरें, हिताचें.

शब्द—पाक = निर्मळ.

शेरा—साधनांवरील श्रद्धा उडून मनाचें समाधान नाहींसें झालें या स्थितींतील.

३३५.

तेंही नव्हे जें करितां कांहीं ।
ध्यातां ध्यायीं तेंही नव्हे ॥ १ ॥
तेंही नव्हे जें जाणवी जना ।
वाटे मना तेंहि नव्हे ॥ २ ॥
त्रास मानिजे कांटाळा ।
अशुभ वाचाळा तेंही नव्हे ॥ ३ ॥
तेंही नव्हे जें भोंवतें भोंवे ।
नागवें धांवे तेंही नव्हे ॥ ४ ॥
तुका म्हणे एकचि आहे ।
सहजीं पाहे सहज ॥ ५ ॥

पाठभेद—च० १ ध्यातां ध्यायीं–ध्याता ध्यायी–ध्यानीं (इंदिरा.)

च० २ वांट मना तें नव्हे तेंहि नव्हे.

च० ४ तेंहि नव्हे जें भोवतें नाहीं नव्हे जें भोवतें.

अर्थ—१ तुम्हीं जें कांहीं करितां तें (खरें वस्तु) नव्हे. जें ध्यायीं ध्यातां, ज्याचें तुम्ही ध्येय म्हणून ध्यान करितां, जें वस्तु पहाण्याकरितां मन एकाग्र करितां, ज्याचें ध्यान करितां तेंहि खरें वस्तु नव्हे. जें जना जाणवी, लोकांना भासतें, स्वतांला ज्ञानविषय करतें तें ही मुख्य वस्तु नव्हे. ज्याचा त्रास मानावा, कंटाळा मानावा जें अशुभ मानावें तेंहि नव्हे. जें मनाला वाटतें तेंहि नव्हे. अरे बडबड्या, तुला खरें मर्म कोठें कळेंल आहे ? जें भोंवती फिरतें, नागवें धांबतें, तेंहि नव्हे. तु. म्ह. खरी गोष्ट एकच आहे. जें मूळचें तें सहज पहाणें ओळखणें हेंच आहे.

चर्चा–च० १ ध्यायीं ध्येयीं–ध्यानीं (इंदिरा. गाथापंचक). एकंदरींत अर्थ एकच–ज्याचें तुम्हीं ध्यान करितां तें—इ०.

च० २ जाणवी––हा चरण एकंदरींत ज्ञानमार्गाला अनुलक्षून दिसतो. जें लोकांना ज्ञानमार्गाच्या योगानें प्राप्त होतें किंवा चिंतनानें मिळतें तें खरें वस्तु नव्हे.

च० ३–४ हे चरण आसुरी मार्गाचा ब्रह्मप्राप्तीकरितां अवलंब करणारांना उद्देशून आहेत.

त्रास मानण्यांत, कंटाळा करण्यांत, अशुभ मानण्यांत, गरगर फिरण्यांत नागवें फिरण्यांत, कशांतहि अर्थ नाहीं.

कर्मांत अर्थ नाहीं, ध्यान.त नाहीं, ज्ञानांत नाहीं, मनाच्या वृत्तींत नाहीं, त्रासांत कंटाळ्यांत, अशुभ मानण्यांत, गरगर फिरण्यांत, नागवें फिरण्यांत कशांतहि अर्थ नाहीं. जें सहज, मूळचें, ठायींचें, तें ठायींच पहाण्यांत खरा अर्थ आहे. कोणी कर्म करितात. ज्ञानमार्गानें जाणें, चिंतन करितात कोणी वैताग करितात, आसुरी साधनें करितात. पण हें सर्व व्यर्थ.

चर्चा च० ३ अशुभ वाचाळा तेंहि नव्हे. याचा अर्थ नीटसा लागत नाहीं.

संपादक.

" वाचाळ " देवप्राप्ती विषयीं केवळ बडबड करणारा कोणी तरी कल्पून त्याला उद्देशून म्हटलें आहे. सामान्य जनाला अनुलक्षून म्हटलें आहे असें म्हटलें तरी चालेल.

शेरा—निरनिराळीं साधनें करून मनाचो तळमळ गेली नाहीं, अशा स्थितींतला.

३६६.

बोल बोलतां वाटे सोपें।
करणी करितां टीर कांपे ॥ १ ॥
नव्हे वैराग्य सोपारें ।
मज बोलतां न वाटे खरें ॥ २ ॥
विष खावें ग्रासोग्रासीं ।
धन्य तोचि एक सोसी ॥ ३ ॥
तुका म्हणे करूनि दावी ।
त्याचे पाय माझे जीवीं ॥ ४ ॥

पाठभेद—च० १ बोलबोलतां सोपे—असाहि पाठ आहे.

अर्थ—गोष्टी बोलावयाला सोपें असतें. पण प्रत्यक्ष कृती करावयाची वेळ आली कीं टीर फाटतें. वैराग्य सोपें नाहीं. कोणी वैराग्याच्या नुसत्या गोष्टी सांगितल्या तर ते मला खरें वाटत नाहीं. प्रत्येक घासांगणीक क्षणोक्षणीं विष खावें आणि तें पचवावें, सोसावें, तर त्यांत धन्यता आहे. तें जसें कठीण तसेंच वैराग्यहि कठीण. मला बोलणें नको तु. म्ह. जो प्रत्यक्ष कृती करून दाखवील, आचरणांत उतरून दाखवील, तो मला प्रिय, वंदनीय आहे.

३३७.

होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ॥ १ ॥
हाचि माझा नेम धर्म । मुखीं विठोवाचें नाम ॥ २ ॥
हेचि माझीउपा सना । लागें संतांच्या चरणा ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । करीन ते भोळी सेवा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—मी पंढरीचा वारकरी होईन; भिकारी झालों तरी चालेल. पण वारकरी होईन. माझा सर्व नेमधर्म काय तो हाच. माझें सर्वस्व कायतें विठोबाचें नांव. संतांचे पायां पडेन; त्यांच्या पायां पडणें हीच माझी उपासना. तु. म्ह. देवा, माझी भोळेपणाची सेवा आहे ती मी करीन.

३३८.

सांठविला हरी ।
जींहीं हृदयमंदिरीं ॥ १ ॥
त्यांची सरली वेरझार ।
जाला सफळ व्यापार ॥ २ ॥
हरी आला हाता ।
मग कैंची भय चिंता ॥ ३ ॥
तुका म्हणे हरी ।
कांहीं उरों नेदी उरी ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—ज्यांनीं हृदयांत देवाचा सांठा केला, त्यांची येरझार, जन्ममरण, संपलें. त्यांचा सगळा व्यापार फळाला आला. देवच हातीं लागल्यावर मग काळजी कसली, मग कशाचें भय ? तु, म्ह. हरी बाकी कांहीं करावयाचें किंवा व्हावयाचें उरूं देत नाहीं.

शब्द—उरी, = बाकी.

३३९

मोक्ष तुमचा देवा ।
तुम्ही दुर्लभ तो ठेवा ॥ १ ॥
मज भक्तीची आवडी ।
नाहीं अंतरीं ते गोडी ॥ २ ॥
आपल्या प्रकारा ।

करा जतन दातारा ॥ ३ ॥
तुका म्हणे भेटी ।
पुरे एकचि शेवटीं ॥ ४ ॥

पाटभेद—नाहींत.

अर्थ—१ देवा तुमचा मोक्ष मिळावयाला कठीण आहे. तो तुमचा तुम्हीं ठेऊन घ्या. तो मला नको. मला (मोक्षापेक्षां) भक्तीची आवड जास्त. भक्ती जितकी आवडते तितका मोक्ष आवडत नाहीं. मोक्षाची गोडी माझ्या मनांत नाहीं. देवा, तुम्हांला जसें बरें वाटेल त्या रीतीनें, आपल्या रीतीनें, मला जतन करा.

चर्चा—शेवटीं = ज्या वेळीं सगळेंच नाहींसें व्हावयाचें असेल त्या वेळीं, अखेरीस, मला भेट द्या म्हणजे झालें. असाहि अर्थ टीपणांत नमूद केला आहे. तो बरोबर आहे असें वाटत नाहीं. तुकारामांना देव नेहमींच हवा होता. शेवटीं भेद दे–असें म्हणण्यांत काय अर्थ ? संपादक.

किंवा तुमचा जो मोक्ष हा प्रकार आहे तो तुम्हींच जपून ठेवा. तो मला नको. वा. ब. प.

हा अर्थ गौण आहे. तितका बरा वाटत नाहीं. संपादक.

देवा, शेवटीं थोडक्यांत सार सांगावयाचें म्हणजे मला तुमची भेट झाली म्हणजे पुरे. माझें अखेरचें मागणें तें एवढेंच.

३४०

नामपाठ मुक्ताफळांच्या ओवणी ।

हें सुख सगुणीं अभिनव ॥ १ ॥
तरी आम्ही जालों उदास निर्गुणा ।
भक्तांचिया मना मोक्ष नये ॥ २ ॥
द्यावें घ्यावें ऐसा एथें उरे भाव ।
काय ठाया ठाव पुसोनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां अभयदान करा ।
म्हणा विश्वंभरा दिलें ऐसें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—नामाचे पाठ म्हणजे मोतीं ओंवून केलेले सर होत. आणि या नामपाठापासून होणारें जें कांहीं सुख आहे तें सगुणाच्या ठिकाणीं आहे आणि कांहीं अलौकिकच आहे, विशेष प्रकारचें आहे, तसें निर्गुणांत नाहीं. त्यामुळेंच आह्मीं निर्गुणाविषयीं उदास झालों. आमच्या—भक्तांच्या—मनाला मोक्ष पटत नाहीं. या सगुण भक्तीच्या ठिकाणीं—घ्यावें घ्यावें—असा भाव उरतो. या ठिकाणीं देवघेवीला जागा आहे. प्रेम देणारा भक्त आणि घेणारा देव, किंवा भक्तीची आवड मला द्यावी असें मागणारा भक्त आणि ती आवड भक्ताला देणारा देव, यांच्यांत देवघेवीला अवकाश मिळतो. या ठिकाणीं भक्तीच्या पलीकडलें असें जें शाश्वत, निर्गुण ब्रह्म—त्याचा ठाव पुसून—'मागमूस नाहींसा करून' अंत पाहून काय उपयोग ? सगुणापलीकडे, निर्गुण, शाश्वत, असें जें आहे तें काय हें पहात बसण्यांत काय फायदा ?

चर्चा—च० ३ भक्तीला, सगुणोपासनेला, जो देवभक्तपणांत आधार असतो, तो ब्रह्म निर्गुण आहे असें कल्पिलें म्हणजे नाहींसा होतो, म्हणून असें करण्यांत काय अर्थ ? माडगांवकर.

चर्चा—'मरण माझें मरोन गेलें' या १६१५ व्या अभंगांत घुसणें = नाहींसें करणें या अर्थीं योजिलें आहे. तो अभंग आधारभूत घेऊन प. न्या. रानडे यांनीं एकदा उपासना चालविली होती. तेव्हां त्याच्या दुसऱ्या चरणाच्या पूर्वार्धांत 'ठाव पुसिलें' असे शब्द आले आहेत. त्यांचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणेंच केल्याचें मला पक्कें स्मरतें. ज्ञानेश्वरींत या दोन शब्दांचा याअर्थीं प्रयोग आहे असें मला वाटतें. माडगांवकर.

३४१.

भवसिंधूचें काय कोडें ।
दावी वाट चाले पुढें ॥ १ ॥
तारूं भला पांडुरंग ।
पाय भिजों नेदी अंग ॥ २ ॥

मागें उतरिले बहुत ।
पैल तीरीं साधुसंत ॥ ३ ॥
तुका म्हणे लागवेगें ।
जाऊं तयाचिया मागें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—१ संसाराचें मोठें कठीण कोडें असें काय आहे ? पांडुरंग आम्हांला वाट दाखवितो, तो आमच्या पुढें चालतो. देव, पांडुरंग, हें आमचें चांगलें तारूं आहे. तो (संसारसमुद्रांतून पार जात असतांना) आमचे पाय, आमचें अंग, काहीं भिजूं देत नाहीं. या नावेनें आजपर्यंत पुष्कळ साधुसंत पलीकडल्या तीराला नेऊन पोंचविले आहेत. तु. म्ह. चला, आपण झटपट त्या देवाच्या मागें जाऊं.

शब्द-लागवेगें = लगबगीनें लवकर.

३४२.

नाहीं साजत हा मोठा ।
मज अळंकार खोटा ॥ १ ॥
असें तुमचा रजरेण ।
संतां पायींची वाहाण ॥ २ ॥
नाहीं स्वरूपीं ओळखी ।
भक्तिभाव करीं देखीं ॥ ३ ॥
नाहीं शून्याकारीं ।
क्षर ओळखी अक्षरीं ॥ ४ ॥
नाहीं विवेक या ठायीं ।
आत्मा अनात्मा तें काई ॥ ५ ॥
कांहीं नव्हे तुका ।
पायां पडणें हें ऐका ॥ ६ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—१ हा मोठा अलंकार (मला साधू असें लोक म्हणतात तो) मला शोभत नाहीं. माझ्या अंगावर मी घातला तर तो खोट्यासारखा वाटतो. मी तुमचा रज, रेणु आहें. वाळूच्या कणासारखा क्षुल्लक आहें मी. तुमच्या संतांच्या पायांची वहाण आहें; माझी यायता इतकी कमी आहे. देवाच्या खऱ्या स्वरूपाचो ओळख मला झालेला नाहीं. मी देवाची भक्ती करितों ती केवळ दिखाऊ, दिसण्यापुरती, आहे. नकलेनें लोकांचें पहून भक्ती भाव करितों. अक्षरीं क्षर—ओळखी नाहीं, निराकार—शून्यांत, अक्षरांत क्षराचें अंतर्धान होतें याची ओळख मला झालेली नाहीं.

देवा, तें कांहीं नव्हे, या कशांतहि अर्थ नाहीं. मी तुमच्या पायां पडतों. मला पदरांत घ्या एवढें माझें ऐका म्हणजे झालें.

चर्चा—३।४ मला सगुण भक्ती किंवा निर्गुण भक्ती यांपैकीं कोणतेंच अजून साधलेलें नाहीं. आत्मा म्हणजे काय, अनात्मा म्हणजे काय हें कांहीं मला कळत नाहीं. विवेक नाहीं. एकापासून दुसरें वेगळें करितां येत नाहीं.

शब्द—रज रेण = कण, क्षुल्लक पदार्थ. **अक्षर** = अढळ, शाश्वत, अमें जें (ब्रह्म स्वरूप) तें **विवेक** = भेद पाहून निवड करण्याची शक्ति, विवेचकपणा.

३४३.

सत्य साच खरें । नाम विठोबाचें बरें ॥ १ ॥
जेणें तुटती बंधनें । उभयलोकीं कीर्ति जेणें ॥ २ ॥
भाव ज्याचे गांठीं । त्यासी लाभ उठाउठी ॥ ३ ॥
तुका म्हणे भोळा । जिंकूं जाणे काळिकाळा ॥ ४ ॥

पाठभेद:—नाहींत.

अर्थ—विठोबाचें नांव तेवढें खरें; तें सत्य आणि म्हणून तेंच बरें. त्या नामामुळें भवबंधनें तुटतात आणि उभय लोकीं कीर्ति होते. ज्याचे गांठीं भाव आहे, ज्याच्या मनांत श्रद्धा, भक्ती, आहे, त्याला ताबडतोब लाभ होतो. भोळा श्रद्धाळू भक्त या भक्तीमुळें काळिकाळाला देखील जिंकितो.

३४४.

सत्य तो आवडे । विकल्पानें भाव उडे ॥ १ ॥
आम्हीं तुमच्या कृपादानें । जाणों शुद्ध मंद सोनें ॥ २ ॥
आला भोग अंगा । न लावूं उशीर त्या त्यागा ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । अंजन ते तुझी सेवा ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—आम्हांला भाव आवडतो. खरा भाव आम्हांला पाहिजे. आम्हांला विकल्प नको, कारण विकल्पानें, संदेह मनांत आला कीं, भाव उडून जातो, नाहींसा होतो. देवा, आमच्यावर तुमची कृपा आहे, त्या कृपेमुळें आम्हांला शुद्ध सोनें कोणतें आणि मंद कोणतें; कोणता भाव खरा कोणता हीण; हें समजतें. भोग अंगा आला तर त्याच्या त्यागा उशीर न लावूं. सुखदुःखांच्या भोगानें आमचीं मनें विकल्पग्रस्त होतात असें दिसलें तर लागलींच आम्हीं भोगांचा त्याग करूं. देवा, आम्हांला विकल्प उरला नाहीं. आमची दृष्टी स्थिर व स्वच्छ झाली आहे. तुमची सेवा हें आम्हांला अंजन मिळालें आहे.

शब्द—**मंद** = अशुद्ध, भेसळ.

३४५.

करावें चिंतन । तेंचि वरें न भेटून ॥ १ ॥
वरवा अंगीं राहे भाव । तग तोचि जाणा देव ॥ २ ॥
दर्शनाची उरी । अवस्थाचि अंग धरी ॥ ३ ॥
तुका म्हणे मन । तेथें सकल कारण ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—देवाचें चिंतन करावें–त्याची भेट होऊं नये हेंच एकंदरींत बरें दिसतें. भेट न झाली म्हणजे अंगांत भाव टिकून रहातो. आणि भाव अखंडपणानें तगून, टिकून, असणें यालाच नांव देव; किंवा भाव आहे तोंपर्यंतच तो भाव म्हणजेच देव. तोंपर्यंत देव आहे. दर्शनाची उरी राहिली, दर्शन व्हावयाचें राहिलें म्हणजे, चिंतन, भजन, ध्यान, भावाची अवस्था अंग धरते;

टिकते. दर्शन होतांच चिंतन संपतें. तसें होऊं नये म्हणून दर्शनावांचून चिंतनच बरें. या सर्वांच्या मुळाशीं मन आहे. तें मन तुला सोडून जाऊं नये म्हणून तुझी भेट झाली नाहीं हेंच बरें. म्हणजे तुझें चिंतन नेहमीं होईल.

चर्चा--च० २ बरवा अंगीं राहे भाव, **तंव** तोचि जाणा देव. असा पाठ जोगांनीं दिला आहे तो पाठ घेतला तर "अंगांत भाव राहे–जोंपर्यंत भाव आहे तोंपर्यंत तो भाव म्हणजेच देव" असा अर्थ करितां येईल. संपादक.

२ जोंपर्यंत अंगांत भाव राहतो तोंपर्यंत तो भावच देव, किंवा भक्त हा देव, ? म्हणून "तंव" असा पाठ घेतां येत नाहीं. वा. ब. प.

३४६.

जें जें जेथें पावे । तें तें समर्पावें सेवे ॥ १ ॥
सहज पूजा याचि नांवें । गळित अभिमानें व्हावें ॥ २ ॥
अवघें भोगिता गोसावी । आदीं अवसानीं जीवीं ॥ ३ ॥
तुका म्हणे सीण । न धरितां नव्हे भिन्न ॥ ४ ॥

पाठभेद:--नाहींत.

अर्थ:--१ आपल्याला जें जें ज्या ठिकाणीं मिळेल तें तें त्या ठिकाणीं देवाच्या सेवेला लावावें अशा रीतीनें देवाची पूजा आपोआपच होते. एक अभिमान तेवढा सोडावा म्हणजे झालें. माझें कांहीं नव्हे सर्व देवाचें ही वृत्ति ठेवावी. सर्व भोग देवाला अर्पण करून भोगावे. त्यांचा भोक्ता देव. आरंभीं, आयुष्यभर, शेवटीं, सर्व देवच होतो. भोक्ता तोच होतो. तु. म्ह. कर्माचा, भोगाचा, शीण धरिला नाहीं. भ्रम मानिला नाहीं, म्हणजे कर्मांचें कर्तृत्व देवाकडे जातें. मग देव व मी भिन्न नव्हें.

चर्चा--च० ३ गोसावी = देव असा अर्थ करून, शेवटीं सर्व भोग भोगणारा देवच असा अर्थ मूळांत केला आहे. त्यापेक्षां निराळा व थोडासा बरा असा अर्थ सुचतो तो तो असा--

आदीं, आरंभीं, किंवा अखेरीस, नेहमींच, सर्व भोग भोगित असतांना गोस्वामी (व्हावें) इंद्रियनिग्रह करावा, भोग भोगिले तरी त्यांचे मुळें मन

दूषित होऊं देऊं नये. भोग भोगीत असतांनाहि अलिप्तपणें रहावें. गोसावी= गोस्वामी–इंद्रियांवर ज्याचा ताबा आहे असा पुरुष. या अर्थानें चरणाची संगति बरी लागते. संपादक.

जीवामध्यें वास्तव्य करून सर्व कांहीं भोग आत्माराम जन्मापासून मरेपर्यंत भोगीत आहे. जोग.

शब्द— याचि नांवें. = यालाच

शेराः--भगवद्भक्ति होणें कठिण आहे असें वाटल्यास हें समाधान आहे

३४७.

नसे तरी मनीं नसो ।
परी वाचे तरी वसो ॥ १ ॥
देह पडो या चिंतनें ।
विठ्ठलनामसंकीर्तनें ॥ २ ॥
दंभस्थिति भलत्या भावें ।
मज हरिजन म्हणावें ॥ ३ ॥
तुका म्हणे काळें तरी ।
मज सांभाळील हरी ॥ ४ ॥

पाठभेदः—नाहीत.

अर्थ—मनांत देव नसला तर नसो. निदान तोंडानें त्याचें नांव आलें तरी पुरे. वाणीनें त्याचें भजन होऊं दे. विठ्ठलाच्या नांवाचें कीर्तन होतांना, त्याचें नांव गातां गातां, देह पडूं दे मरण येऊं दे. दंभस्थितीनें कां असेना, मी वरवर दिसतों म्हणून कां होईना, पण मला हरिजन म्हणा. माझी संतांत गणना होऊं दे. तु. म्ह. म्हणजे मग आज नाहीं उद्यां, कालांतरानें तरी मला देव संभाळील. केव्हां तरी माझ्यावर हरिकृपा होईल.

शेराः—खरा भाव मनांत वागेना तेव्हां निदान तोंडानें तरी हरिनाम येऊं दे. असा अर्थ. ३४५–३४६–३४७ हे तीन्ही अभंग मनांत भक्ति स्थिर झाली नव्हती त्या वेळचे दिसतात. वा. ब. प.

३४८.

नये जरी कांहीं । तरी भलतेंचि वाहीं ॥ १ ॥
म्हणविल्या दास । कोणी न धरी वेठीस ॥ २ ॥
समर्थाच्या नांवें भलतैसें विकावें ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्ता । वरी असते बहुतां ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थः—मला कांहीं येत नाहीं. तरी देखील मला शोभणार नाहीं, भलतेंच दिसेल असें रूप, असे शब्द यांचा मी वाहक झालों आहें—धारण केले आहेत. तुझा दास म्हणविल्यामुळें मला कोणी वेठीस धरीत नाहीं. माझ्यावर या जगांत कोणाचीहि सत्ता चालत नाहीं. समर्थ धनी, त्याच्या नांवावर, मी भलत्या मोलानें विकतों. माझ्या अंगांत नसलेली योग्यता लोक मला चिकटवितात. तु. म्ह. समर्थांचा पाठिंबा असला म्हणजे पुष्कळांवर सत्ता चालते.

चर्चा—च० २ यांत–वेठीस कोण नाहीं धरीत? असा अर्थ डा भांडारकरांनीं सुचविला. पण तो नीट जमत नाहीं असें वाटतें. वा. ब. प.

३४९.

न संडवे अन्न । मज न सेववे वन ॥ १ ॥
म्हणउनी नारायणा । कीव भाकितों करुणा ॥ २ ॥
नाहीं अधिकार । कांहीं घोकाया अक्षर ॥ ३ ॥
तुका म्हणे थोडें । आयुष्य वंचे अवघें कोडें ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—माझ्यानें उपास करवत नाहींत. घरदार टाकून वनांत जाववत नाहीं, (म्हणून तप करणेंही दुरच राहिलें). म्हणून, देवा, नारायणा, तुझी कींव भाकितों. तुला करुणा येऊं दे अशी प्रार्थना करितों. मी शूद्र, तेव्हां वेदवेदांगांचा अभ्यास करावयाला मला अधिकार नाहीं. तु. म्ह. एकंदरींत

काय आयुष्य थोडें आणि त्यांतून काय करावें तें कळत नाहीं. सगळेंच बुचकळ्यांत पडल्यासारखें वाटतें.

शेरा—साधन काय करावें या विचारानें मन अनिश्चित झालें होतें अशा स्थितींतला अभंग.

३५०.

एकाचीं उत्तरें । गोड अमृत मधुरें ॥ १ ॥
ऐशा देवाच्या विभूती । भिन्न प्रारब्धाची गती ॥ २ ॥
एकाचीं वचनें । कडु अत्यंत तीक्ष्णें ॥ ३ ॥
प्रकाराचें तीन । तुका म्हणे केलें जन ॥ ४ ॥

पाठभेद—नाहींत.

अर्थ—कित्येकांचें बोलणें गोड, अमृतासारखें मधुर असतें. देवाच्या विभूति अशा असतात. माणसामाणसांत भेद पडतो तो प्रारब्धाच्या गतीमुळें पडतो. दुसरे कित्येक असतात त्यांचीं वचनें अतिशय तीक्ष्ण, कडू असतात. तु. म्ह. जन हें त्रिविध आहे. नाना प्रकारचें केलेलें आहे.

चर्चा—च० १ एकांचीं = कोणाचीं, कित्येकांचीं (सामान्य सर्वनाम).

च० २।३ यांपैकीं तिसरा चरण अगोदर असून दुसरा नंतर आला पाहिजे, म्हणजे अर्थाची संगति लागते. विभूति=देवाचा अंश अंगीं असणारीं माणसें.

च० ४ जन–(नपुं.) लोक, जग. " तीन " हा शब्द " नाना " " अनेक " या अर्थीं घ्यावयाचा. किंवा दोन प्रकारचे लोक सांगून तिसऱ्या प्रकारचा हवाला ओळ्यांच्या माहितींवर दिला आहे असें समजावें वा. व. प.

जन त्रिविध आहे अशी म्हणच आहे. तींत ' त्रिविध ' याचा अर्थ चंचल, वाटेल तें बोलणारें असा आहे तोच अर्थ एकंदरींत घ्यावा असें वाटतें. एकादा चरण गहाळ झाला आहे काय ? संपादक.

या खंडांत आलेल्या अभंगांतील पहिल्या ओळींची
वर्णानुक्रमानें

सूचि.

ओळ.	अभंगाचा क्रमांक.
अतिवाद लावी । एक बोट सोंग दावी ॥	॥ २५६ ॥
अतिवादी नव्हे शुद्ध या बोजाचा ॥	॥ ९३ ॥
अघमाची यारी ।	॥ १४१ ॥
अधिकार तैसा दावियेला मार्ग ।	॥ २४२ ॥
अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक ।	॥ १९९ ॥
अमंगळ वाणी । नये आइकों ते कानीं ॥	॥ २०६ ॥
अरे हें देह व्यर्थ जावें ।	॥ १६८ ॥
अवगुणांचे हातीं । आहे अवघी फजीती ॥	॥ १६९ ॥
अवघे देव साध । परी या अवगुणांचा बाध ॥	॥ २७२ ॥
अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव ।	॥ १६९ ॥
आचरणा ठाव । नाहीं अंगीं स्वतां भाव ॥	॥ २०८ ॥
आणीक काळें न चले उपाय ।	॥ २४६ ॥
आणिकांची स्तुति आम्हां ब्रह्महत्या ।	॥ १५२ ॥
आणिकांच्या कापिती माना ।	॥ १२१ ॥
आणिकांच्या घातें ।	॥ १४७ ॥
आणीक दुसरें मज नाहीं आतां ।	॥ ३२७ ॥
आतां उघडीं डोळे । जरी अद्यापि न कळे ॥	॥ ८६ ॥
आतां तरी पुढें हाचि उपदेश ।	॥ ७६ ॥
आतां येणेंविण नाहीं आम्हां चाड ।	॥ २४९ ॥
आपुलिया हिता जो असे जागता ।	॥ ९ ॥
आमचा विनोद तें जगा मरण ।	॥ २६२ ॥
आमचे गोसावी अयाचित वृत्ति ।	॥ १६० ॥

आमिषाचिये आसे गळ गिळी मासा ।	॥ ३१३ ॥
आह्मासाठीं अवतार । मत्स्यकूर्मादि सूकर ।	॥ २६९ ॥
आम्ही तरी आम । जालों टाकुनी उदास ।	॥ २२ ॥
आह्मी मागों ऐसें नाहीं तुजपाशीं ।	॥ २३५ ॥
आम्ही वैकुठवासी । आलों याचि कारणासी ॥	॥ २२६ ॥
आ'ह्मी सदैव सुडके । जवळीं येतां चोर धाके ।	॥ ३५ ॥
आलिंगनें घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ॥	॥ २६ ॥
आशावद्ध जन । काय जाणे नारायण ॥	॥ ४४ ॥
आशाबद्ध वक्ता । नाहीं श्रोतयाच्या चित्ता ।	॥ ३०४ ॥
आ'सुरी स्वभाव निर्दय अंतर ।	॥ १९६ ॥
आहाकटा त्याचे करिता पितर ।	॥ ५० ॥
आहे तें सकळ कृष्णाचि अर्पण ।	॥ २९ ॥
इच्छावें तें जवळी आलें ।	॥ २६७ ॥
इनामाचीं भरली पेंठ ।	॥ १७५ ॥
इहलोकींचा हा देहे ।	॥ ११९ ॥
उचित तें काय जाणावें दुर्बळें ।	॥ २३४ ॥
उजळावया आलों वाटा ।	॥ १७९ ॥
उपदेश तो भलत्या हातीं ।	॥ ११३ ॥
उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा ।	॥ ५५ ॥
एक तटस्थ मानसीं ।	॥ १७० ॥
एक नेतां नाडलीं ।	॥ १९२ ॥
एक प्रेमगुज ऐकें जगजेठी ।	॥ ३०३ ॥
एक वेळ प्रायश्चित्त । केलें चित्त मुंडण ॥	॥ २९४ ॥
एकांचीं उत्तरें गोड अमृत मधुरें ।	॥ ३५० ॥
एकादशीस अन्नपान ।	॥ १७२ ॥
एकादशी सोमवार न करिती ।	॥ ४७ ॥
ऐका महिमा आवडीची ।	॥ १५७ ॥
ऐसा हा लौकिक कदा राखवेना ।	॥ १२४ ॥
ऐसे ऐसियानें भेटती ते साधू ।	॥ २०२ ॥

अंगीं ज्वर तया नावडे साकर ।	॥ १६६ ॥
अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ॥	॥ १० ॥
आंधळ्यासि जन अवघेचि आंधळे ।	। १६३ ॥
कन्या गो करी कथेचा विकरा ।	॥ ९८ ॥
कन्या सासुऱ्यासि जाये ।	॥ १३१ ॥
कपट कांहीं एक ।	॥ १३७ ॥
कमोदिनी काय जाणे तो परिमळ ।	॥ २३७ ॥
कर कटावरी तुळसीच्या माळा ।	॥ ५ ॥
करणें तें देवा ।	॥ १४५ ॥
करवितां व्रत अर्धें पुण्य लाभे ।	॥ १७४ ॥
करा नारायणा । माझ्या दुःखाची खंडणा ।	॥ २९८ ॥
करावी ते पूजा मनेंचि उत्तम ।	॥ ४६ ॥
करावें गोमाटें ।	॥ १३० ॥
करावें चिंतन । तेंचि बरें न भेटून ।	॥ ३४५ ॥
करितां देवार्चन । घरा आले संतजन ।	॥ २८७ ॥
करिसी तें देवा करी माझें सुखें ।	॥ २५४ ॥
करोत तगादि साधनें । कोणा साधोत गोरांजनें ॥	॥ २१८ ॥
कानडीनें केला म्हाटा म्हतार ।	॥ ६२ ॥
काय उणें आम्हां विठोबाचें पायीं ।	॥ २०० ॥
काय कळे बाळा ।	॥ १७१ ॥
काय काशी करिती गंगा ।	॥ १०९ ॥
काय दरा करील वन ।	॥ ३३४ ॥
काय दिनकरा । केला कोंबड्यानें खरा ॥	॥ ७९ ॥
काय सांगों तुझ्या चरणांच्या सुखा ।	॥ २३८ ॥
कां रे माझा तुज नये कळवळा ।	॥ २४७ ॥
कास घालोनी बळकट । झालों कळिकाळासी नीट ॥	॥ २२५ ॥
कांहींच मी नव्हें कोणिये गांवींचा ।	॥ २६० ॥
कांहीं नित्यनेमाविण । अन्न खाय तोचि श्वान ।	॥ ९७ ॥
कां हो देवा कांहीं न बोलाचि गोष्टी ।	॥ २३३ ॥

काळें खादला हा अवघा आकार । ॥ २४५ ॥
कुंभ अवघा एक आवा । ॥ १४८ ॥
कृपा करावी भगवंतें । ऐसा शिष्य द्यावा मातें ॥ ॥ २२३ ॥
कृपा करुनी देवा । ॥ १८३ ॥
कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । ॥ २२२ ॥
केला मातीचा पशुपति । ॥ १२७ ॥
कैसा सिंदळीचा । नव्हे ऐसी ज्याची वाचा ॥ ॥ २०७ ॥
कैसें करूं ध्यान कैसा पाहों तुज । ॥ ३३० ॥
कोण जाणे कोणा घडे उपासना । ॥ २६१ ॥
कोणतें कारण राहिलें यामुळें । ॥ ३११ ॥
कोण त्याचा पार पावला धुंडितां । ॥ ३२२ ॥
कोण पर्वकाळ पहासी तीथ । ॥ २३२ ॥
कोण सांगायास । गेलें होतें देशोदेश ॥ ॥ ३२० ॥
कोणें तुझा सांग केला अंगीकार । ॥ १५८ ॥
कंठीं कण्णमणी । नाहीं अशुभ ते वाणी ॥ ॥ ७२ ॥
गरूडाचें वारिकें कासे पीतांबर । ॥ ७ ॥
गर्भाचें धारण । तिनें वागविला सिण ॥ ॥ २०९ ॥
गहूं एक जाती । ॥ १८६ ॥
गातों भाव नाहीं अंगीं । ॥ २९१ ॥
गायनाचे रंगीं । शक्ति अद्‌भुत ते अंगीं ॥ ॥ ३१८ ॥
गेली वीरसरी । मग त्यासि रांड मारी ॥ ॥ ७० ॥
गोडीपणें जैसा गूळ । ॥ २७४ ॥
गौरव गौरवापुरतें । फळ सत्याचे संकल्प ॥ ॥ २७९ ॥
गौळीयाचीं ताकपिरें । काय पोरें चांगलीं ॥ ॥ ७५ ॥
गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी । ॥ १२२ ॥
घरीं रांडा पोरें मरती उपवासी । ॥ १०१ ॥
घेऊनियां चक्र गदा । हाचि धंदा करी तो ॥ ॥ ९० ॥
चवदा भुवनें जयाचिये पोटीं । ॥ १२६ ॥
चाल कैलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥ ॥ १०६ ॥

चित्त समाधानें । तरी विष वाटे सोनें ॥ ॥ ३८ ॥
चित्तीं नाहीं तें जवळी असोनि काय । ॥ १०८ ॥
चुंबळींचा करी चुंबळीशीं संग । ॥ ११५ ॥
चोरें चोरातें करावा उप्पदेश । ॥ ९५ ॥
चंदनाचे हात पाय ही चंदन । ॥ १५१ ॥
छळी विष्णुदास कोणी । ॥ १६४ ॥
जन विजन आलें आम्हां । विठ्ठलनामा प्रमाणें ॥ ॥ २४ ॥
जप करितां राग । आला जवळी तो मांग ॥ ॥ २५९ ॥
जरी माझी कोणी कापितिल मान । ॥ २५३ ॥
जया नाहीं नेम एकादशीव्रत । ॥ ३४ ॥
जातों वाराणसी । निरवीं गाई घोडे म्हैसी ॥ ॥ २२४ ॥
जे कां रंजले गांजले । ॥ २०४ ॥
जें जें कांहीं करितों देवा । ॥ ३२३ ॥
जें जें जेंथें पावे । तें तें समर्पावें सेवे ॥ ॥ ३४६ ॥
जेणें घडे नारायणीं अंतराय । ॥ ८३ ॥
जेणें मुखें स्तवी । ॥ १४० ॥
जेवितां ही धरी । नाक ह्मागतिया परी ॥ ॥ ८० ॥
जेविले जे संत मागें उष्टावळी । ॥ १४ ॥
ज्यार्चा खरी सेवा । त्याच्या भय काय जीवा ॥ ॥ २८८ ॥
झाड कल्पतरु । न करी याचकीं अव्हेरू ॥ ॥ २८४ ॥
ठायींची ओळखी । ॥ १८४ ॥
ढेकरें जेवण दिसे साचें । ॥ ४५ ॥
तान्हेल्याची धणी । ॥ १४३ ॥
तिर्थीं धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥ ॥ ८९ ॥
तीर्थें केलीं कोटीवरी । ॥ ३१० ॥
तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोध तैसाचि खळ ॥ ॥ ६५ ॥
तुजवरी ज्याचें मन । दरुशन दे त्याचें ॥ ॥ ३१४ ॥
तुज वर्णी ऐसा तुजविण नाहीं । ॥ ३२५ ॥

तुजविण मज कोण वो सोयरें । ॥ २३० ॥
तुजविण वाणीं आणिकांचा थोरी । ॥ २६५ ॥
तुझें वर्म ठावें । ॥ १८५ ॥
ते माझे सोयरे सज्जन सांगाती । ॥ १२८ ॥
तेलणीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥ ॥ ३१ ॥
तें ही नव्हे जें करितां कांहीं । ॥ ३३५ ॥
त्रलोक्य पाळितां उबगला नाहीं । ॥ २९५ ॥
थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ॥ ॥ ८५ ॥
थोडें परी निरें । अविट तें घ्यावें खरें ॥ ॥ २७१ ॥
दया तिचें नांव भूतांचें पाळण । ॥ १२९ ॥
दाता नारायण । ॥ १८२ ॥
दानें कापें हात । नावडे तेविशीं मात ॥ ॥ ५९ ॥
दिवट्या वाद्यें लावुनि खाणें । ॥ १३३ ॥
दीनानाथा तुझीं ब्रिदें चराचर । ॥ २४८ ॥
दीप घेउनियां धुंडिती अंधार । ॥ २६३ ॥
दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरी । ॥ २० ॥
दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी । ॥ ९२ ॥
युर्जनासि करी साह्ये । तो ही लाहे दंड हे ॥ ॥ ४१ ॥
दुर्बळ हें अवघें जन । नारायणीं विमुख ॥ ॥ १८२ ॥
देव आड जाला । तो भोगिता मी उगला ॥ ॥ २११ ॥
देव सखा जरी । जग अवघें कपा करी ॥ ॥ १२९ ॥
देव होईजेत देवाचे संगती । ॥ १८८ ॥
देवाचे म्हणोनि देवीं अनादर । ॥ ११२ ॥
देवाच्या प्रसादें करारे भोजन । ॥ १५ ॥
देवें जीव घाला । संसार तो कडू झाला ॥ ॥ २८९ ॥
देहबुद्धि वसे लोभ जयां चित्तीं । ॥ २४४ ॥
देखोनियां तुझ्या रूपाचा आकार । ॥ १३९ ॥
देखोनी पुराणिकांची दाढी । रडे फुंदे नाक ओढी ॥ ॥ ९१ ॥
देखोनी हरवली अंड । पुत्र जाला म्हणे रांड ॥ ॥ ५२ ॥

दोष पळती कीर्तनें । तुझ्या नाम संकीर्तनें ॥ ॥ २९७ ॥
द्रव्य असतां धर्म न करी । ॥ २९२ ॥
धर्म रक्षावयासाठा । ॥ १२५ ॥
धर्माची तूं मूर्ती । पाप पुण्य तुझे हातीं ॥ ॥ १८ ॥
धाकुट्याचे मुखीं घांस घाली माता । ॥ १११ ॥
धिग जिणें तो बाईले आधीन । ॥ १६७ ॥
ध्यानीं योगीराज बैसले कपाटीं । ॥ २१२ ॥
न करीं रे संग राहें रे निश्चळ । ॥ ८७ ॥
नटनाट्य अवघें संपादिलें सोंग । ॥ २६४ ॥
न देखोन कांहीं । ॥ ११८ ॥
न मिळो खावया न वाढो संतान । ॥ २५१ ॥
नये जरी कांहीं । तरी भलतेंचि वाहीं ॥ ॥ ३४८ ॥
नये जरी तुज मधुर उत्तर । ॥ ७ ॥
न ये नेत्रां जळ । नाहीं अंतरीं कळवळ ॥ ॥ ५७ ॥
न लगे चंदना सांगावा परिमळ । ॥ १५० ॥
न लगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान । ॥ २३६ ॥
नव्हतों सावचित । तेणें अंतरलें हित ॥ ॥ १९८ ॥
न व्हावें तें जालें देखियेले पाय । ॥ २१३ ॥
नव्हे आराणूक संवसारा हातीं । ॥ ४८ ॥
नव्हे शब्द एक देशी । ॥ ३१७ ॥
नव्हे सुख मज नलगे हा मान । ॥ २५० ॥
नसे तरी मनीं नसो । ॥ ३४७ ॥
न संडवे अन्न । मज न सेववे वन ॥ ॥ ३४९ ॥
न संडी अवगुण । वर्मे मानीतसे सिण । ॥ २८० ॥
नामपाठ मुक्ताफळांच्या ओवणी । ॥ ३४० ॥
नाम साराचें ही सार । ॥ २९० ॥
नाहीं दुकळलों अन्ना । ॥ ३०१ ॥
नाहीं साजत हा मोठा । ॥ ३४२ ॥
निगमाचें वन । नका शोधूं करूं सीण ॥ ॥ ३३१ ॥

नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर । ॥ ५३ ॥
निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥ ॥ २३ ॥
पढियंते आह्मीं तुजपाशीं मागावें ॥ ॥ २३१ ॥
पतनासि जे नेती । तिचा खोटा स्नेह प्रीती ॥ २१० ॥
परमेष्टिपदा । तुच्छ करिती सर्वदा । ॥ २७५ ॥
परावीया नारी माउलीसमान । ॥ ३६ ॥
परिमळ म्हूण चोळूं नये फूल । ॥ ३९ ॥
पवित्र सोंवळीं । एक तींच भुमंडळीं ॥ ॥ ४३ ॥
पावलें पावलें तुझें आम्हां सर्व । ॥ १२ ॥
पावे ऐसा नाश । अवघियां दिला त्रास । ॥ २८१ ॥
पुण्यवंत व्हावें ॥ १८७ ॥
पूजा समाधानें । अतिशयें वाढे सीण ॥ ॥ १९४ ॥
पूज्या एकासनीं आसनीं आसन । ॥ १३९ ॥
पूर आला आनंदाचा । लाटा उसळती प्रेमाच्या ॥ ॥ ३२६ ॥
पोटाचे ते नट पाहों नये छंद । ॥ २५६ ॥
पोटीं जन्मती रोग । तरि का म्हणावे आप्तवर्ग ॥ ॥ ३१६ ॥
पंडित वाचक जरी जाला पुरता । ॥ १२० ॥
पंढरीचा महिमा । देतां आणीक उपमा । ॥ ८८ ॥
पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान । ॥ २५२ ॥
प्रारब्ध क्रियमाण । ॥ १५५ ॥
वरा कुणबी केलों । ॥ १८१ ॥
बरबा बरवा बरवा रे देवा तूं । ॥ ३०७ ॥
बळियाचे अंकित । आम्ही जालों बळिवंत ॥ ॥ २२७ ॥
बाईल सवाशिण आई । ॥ ५८ ॥
बाहिर पडलों आपुल्या कर्तव्यें । ॥ ३०६ ॥
बाळ बापा म्हणे काका । ॥ १०७ ॥
बोल बोलतां वाटे सोपें । ॥ ३३६ ॥
बोलविसी तैसें आणीं अनुभवा । ॥ १६५ ॥
बालायाचा त्यासीं । नको संबंध मानसीं ॥ ॥ ६४ ॥

बोलावें तें धर्मा मिळे । ॥ १८० ॥
बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता । ॥१०३ ॥
बोली मैंदाची बरवी असे । ॥ २९६ ॥
बोलों अबोलणें मरोनियां जिणें । ॥ २४१ ॥
ब्रह्म न लिंपे त्या मेळें । ॥ ३३३ ॥
ब्रह्महत्या मारिल्या गाई । ॥ १३५ ॥
ब्रह्मादिक जया लाभासि ठेंगणे । ॥ १९ ॥
भक्तऋणी देव बोलती पुराणें । ॥ ६७ ॥
भक्ताविण देवा । कैचें रूप घडे सेवा ॥ ॥ ७७ ॥
भक्तिप्रतिपाळे दीन वो वत्सले । ॥ २२९ ॥
भजन घाली भोगावरी । ॥ १७२ ॥
भले म्हणवितां संतांचे सेवक । ॥ २२० ॥
भवसागर तरतां । कां रे करीतसां चिंता । ॥ २०३ ॥
भवसिंधूचें काय कोडें । ॥ ३४१ ॥
भाव देवाचें उचित । ॥ २७८ ॥
भाव धरी तया तारील पाषाण । ॥ २६६ ॥
भुंकतां तीं द्यावीं भुंकों । ॥ २५८ ॥
भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ॥ ६८ ॥
भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । ॥ ६९ ॥
मज दास करी त्यांचा । संत–दासांच्या दासांचा ॥ ॥ ३२ ॥
मजसवें नको चेष्टा । ॥ २७७ ॥
मन करा रे प्रसन्न । ॥ १५२ ॥
मन वोळी मना । बुद्धि बुद्धी क्षणक्षणां । ॥ ३३२ ॥
महारासी सिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥ ॥ ३० ॥
माकडें मुठीं धरिले फुटाणे । ॥ १०४ ॥
मागें नेणपणें घडलें तें क्षमा । ॥ १४६ ॥
माझिया मीपणा । जाला यावरी उगाणा ॥ ॥ २७ ॥
माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ॥ ॥ ५४ ॥
माझें म्हणतां याला कां रे नाहीं लाज । ॥ १६२ ॥

मान अपमान गोवे । अवघे गुंडूनी ठेवावे ॥	॥ ८४ ॥
माप म्हणे मी मवितें ।	॥ ३१९ ॥
माय बापें जरी सर्पीण कीं बोका ।	॥ १५३ ॥
माया तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया ।	॥ ४० ॥
माया ब्रह्म ऐसें म्हणती धर्मठक ।	॥ ७३ ॥
मारगीं बहुत ।	॥ १९१ ॥
मी तों दीनाहूनि दीन ।	॥ २९९ ॥
मी तों सर्वभावें अनधिकारी ।	॥ ३२८ ॥
मुखें बोले ब्रह्मज्ञान । मनीं धन अभिमान ॥	॥ २९३ ॥
मृगजळ दिसे साचपणा ऐसें ।	॥ ७४ ॥
मृगजळा काय करावा उतार ।	॥ १६१ ॥
मृत्युलोकीं आह्मां आवडती परी ।	॥ २२८ ॥
मैत्र केले महाबळी । कामा न येती अंतकाळीं ॥	॥ ६१ ॥
मोहोऱ्याच्या संगें । सुत नव्हे आगीजोगें ॥	॥ २७६ ॥
मोक्ष तुमचा देवा । तुह्मी दुर्लभ तो ठेवा ॥	॥ ३३९ ॥
मांडवाच्या दारा । पुढें आणिला म्हातारा ॥	॥ ९६ ॥
मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात ।	॥ १४९ ॥
ह्मणउनि खेळ मांडियेला ऐसा ।	॥ २१६ ॥
ह्मणविती ऐसें आइकतों संत ।	॥ २५५ ॥
ह्मणवितों दास । मज एवढीच आस ।	॥ १९३ ॥
याचा कोणी करी पक्ष ।	॥ १३६ ॥
याजसाठीं भक्ति । जगीं रूढवावया ख्याती ॥	॥ २०५ ॥
युक्ताहार न लगे आणिक साधनें ।	॥ ७१ ॥
येथीचिया अळंकारें ।	॥ १७८ ॥
येथील हा ठसा । गेला पडोनियां ऐसा ॥	॥ २८६ ॥
योगाचें तें भाग्य क्षमा ।	॥ ५६ ॥
रडोनियां मान ।	॥ १३८ ॥
रवि रश्मिकळा । नये काढितां निराळा ॥	॥ २७० ॥
राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।	॥ ४ ॥

रामा अयोध्येच्या राया । ॥ ३१२ ॥
लक्षूनियां योगी पाहाती आभास । ॥ ३२९ ॥
वक्त्या आधीं मान । गंध अक्षता पूजन । ॥ १०० ॥
वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज वाचा । ॥ २४९ ॥
वसवावे घर । देवें बरें निरंतर ॥ ॥ २८५ ॥
वळितें जें गाई । त्यासि फार लागे काई ॥ ॥ ६० ॥
वाजतील तुरें । येणें आनंदें गजरें ॥ ॥ २८३ ॥
विठ्ठला रे तूं उदारांचा राव । ॥ ३०५ ॥
विधीनें सेवन । ॥ १७७ ॥
विश्वव्यापी माया । तिनें झाकुळिलें छाया ॥ ॥ ३१५ ॥
विश्वाचा जनिता । म्हणे यशोदेसि आता ॥ ॥ ७८ ॥
विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । ॥ २१ ॥
वींट नेघे ऐसें रांधा । ॥ १९७ ॥
वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती ॥ ॥ ४२ ॥
वेदाचें गव्हर न कळे पाठका । ॥ १७६ ॥
वैकुंठा जावया तपाचे सायास । ॥ २१४ ॥
वैद्य वांचविती जीवा । ॥ १९० ॥
वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥ ॥ २१७ ॥
वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी । ॥ १३ ॥
व्याल्यावीण करि शोभनतांतडी । ॥ ८२ ॥
शब्द नाहीं धीर । ज्याची बुद्धी नाहीं स्थिर ॥ ॥ ९४ ॥
शास्त्राचें जें सार वेदांची जो मूर्ति । ॥ १५६ ॥
शिकल्या बोलाचे सांगतील वाद । ॥ १५४ ॥
शुकसनकादिकीं उभारिला बाहो । ॥ १०२ ॥
शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ ॥ ३७ ॥
शोकें शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ॥ ॥ २१५ ॥
शोधिसील मूळें । ॥ १८९ ॥
शांतीपरतें नाहीं सुख । ॥ ३७३ ॥
शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । ॥ ११० ॥

श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी ॥ ॥ ५१ ॥
सकळ चिंतामणी शरीर । ॥ २८ ॥
सकळिकांच्या पायां माझी विनवणी । ॥ ३२१ ॥
सत्य तो आवडे । ॥ ३४४ ॥
सत्य साच खरें । ॥ ३४३ ॥
सदा तळमळ । चित्ताचिये हळहळ ॥ ॥ ३३ ॥
सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । ॥ ३ ॥
समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझा हरी वृत्ति राहो ॥ ॥ १ ॥
सर्प विंचू दिसे । ॥ ११७ ॥
साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । ॥ १५९ ॥
सावध जालों सावध जालों । ॥ ८ ॥
साधनें तरी हीच देवा । ॥ २६८ ॥
सांपडला संदीं । ॥ ११६ ॥
साळं–कृत कन्यादान । ॥ १३३ ॥
सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥ ॥ ६३ ॥
सुख वाटे तुझे वर्णितां पवाडे । ॥ ३०० ॥
सुखें वोळंब दावी गोहा । ॥ ११ ॥
सेवितों हा रस वांटितों आणिकां । ॥ २०१ ॥
सोइरियाासि करी पाहुणेरु बरा । ॥ ३०८ ॥
सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । ॥ १२३ ॥
सोलींव जें सुख अतिसुखाहुनी । ॥ ३०९ ॥
संत मागे पाणी नेदी एक चूळी । ॥ ३०२ ॥
संतसमागम एखादिया परी । ॥ २२१ ॥
संताचा अतिक्रम । ॥ १४४ ॥
संताचे गुणदोष आणितां या मना । ॥ ११४ ॥
संवसार तापें तापलों मी देवा । ॥ ६६ ॥
संवसार तिहीं केला पाठमोरा । ॥ २४३ ॥
सांटविला हरी । जीहीं हृदयमंदिरीं ॥ ॥ ३३८ ॥
सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटेवरी ठेवूनियां ॥ ॥ २ ॥

स्तुति करूं तरी नव्हेचि या वेदा । ॥ ३२४ ॥
स्मशान ते भूमि प्रेतरूप जन । ॥ ४९ ॥
स्वप्नींचिया गोष्टी । मज धरिलें होतें वेठी ॥ ॥ १९५ ॥
हरिच्या जागरणा । जातां कां रे नये मना ॥ ॥ १७ ॥
हरि तूं निष्ठुर निर्गुण । ॥ १०५ ॥
हरिहरा भेद । नाहीं करूं नये वाद ॥ ॥ ९९ ॥
हार्तीं होन दावी बेना । ॥ १३२ ॥
हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥ ॥ २५ ॥
होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ॥ ॥ ३३७ ॥
हो कां । पुत्र पत्नी बंधु । त्यांचा तोडावा संबंधु ॥ ॥ ८१ ॥

REFBK-003293

